यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय प्रयोगशाळेसाठी आवश्यक असलेले इथेनॉल खरेदी करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन, पुढील कार्यवाही करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

१८ श्री साईप्रसादालय प्रयोगशाळेसाठी काचेचे साहित्य खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून मिळणेबाबत.

श्री साई प्रसादालय प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारे काचेचे साहित्य खरेदीस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.24,000/- पर्यंतचे खर्चास दि.01.11.2016 टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ई-मेलद्वारे तसेच दुरध्वनीद्वारे संबंधित प्रयोगशाळासाहित्य पुरवठाधारकांशी संपर्क साधून दि.15.11.2016 अखेर दरपत्रके पाठविणेस सांगणेत आलेले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	दरपत्रकधारकाचा तपशिल	आवक क्रमांक	दिनांक
01.	मे.वरद एजन्सिज, श्रीरामपूर	14892	08.11.2016
02.	मे.पराग एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर	15260	11.11.2016
03.	मे.शितल एंटरप्राईजेस, पुणे	15368	12.11.2016
04.	मे.डि.हरीदास ऍण्ड कंपनी, पुणे	15514	15.11.2016

उपरोक्त अ.क्र.3 चे शितल एन्टरप्राईजेस, पुणे यांनी इथिल अल्कोहोल व प्रयोगशाळा काचेच्या साहित्याकरीता दरपत्रके एकत्रित पाकिट पाठविलेले आहे.

प्रसादालय विभागाकडील दि.16.11.2016 दरपत्रके उघडणेबाबतची टिपणी मा.उप-कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर केली असता, सदरील टिपणीवर उपसमिती समोर उघडणेबाबत निर्देश देणेत आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	दरपत्रक सादरकर्त्याचे नांव	दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु.
०१.	मे.वरद एजन्सिज, श्रीरामपूर	**१८,८६३.७०**
०२.	मे.पराग एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर	२०,३६४.००
०३.	मे.शितल एंटरप्राईजेस, पुणे	३१,४६७.००
०४.	मे.डि.हरीदास ऍण्ड कंपनी, पुणे	२१,५७३.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामधील प्रयोगशाळेसाठी आवश्यक असलेले काचेचे साहित्य खरेदी करणेकामी मे.वरद एजन्सिज, श्रीरामपूर यांचे रु१८,८६३.७० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

१९ **संस्थानचे विविध विभागांसाठी बसविण्यात आलेल्या युपीएससाठी नविन बॅटऱ्या खरेदी करीता प्राप्त झालेले कोटेशन/ निविदा उघडून निम्नतम निविदाधारक/ पुरवठादार यांना कार्यादेश देणेबाबत.**

अधिनियम 2004 मधील तरतुद:- कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा. व्य.समितीचे दि.07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799.

प्रस्ताविक: मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799 नुसार साईटेक प्रकल्पाचे उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असून, सदर कार्यवाहीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्तीनुसार संस्थानचे सर्व विभागांमध्ये संगणके व युपीएस बसविण्यात आलेले आहेत. त्यातील कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी दिलेले युपीएस व्यतिरिक्त 500 रुम भक्तनिवासस्थान, कॅन्टीन व वाहन विभाग येथे संस्थानचे युपीएस वापरात आहेत. सदरचे युपीएस मधील बऱ्याच ठिकाणच्या बॅटऱ्या वापरुन खराब झालेल्या आहे. त्यामुळे विज पुरवठा खंडीत झाल्यानंतर सदरचे युपीएस बंद पडतात. त्यासाठी सदरचे युपीएसच्या 26Ah च्या 03 व 42Ah च्या 03 नग नविन बॅटऱ्या खरेदी करुन बसविणेकामी उपरोक्त दि. 11.10.2016 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये अंदाजे रक्कम रुपये 22,500/- मात्र + टॅक्सचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली असुन याकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर दि. 22/10/2016 ते दि. 02/11/2016 या कालावधीत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दि. 28 व 31.10.2016 रोजी अन्वये विविध पुरवठाधारकांकडुन संस्थानचे आवक विभागाकडे मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.न.	कंपनीचे / पुरवठाधारकाचे नाव	आवक नंबर व दिनांक	शेरा
1	Intime Services,Mumbai	आ.नं. 14128 दि.28/10/2016	मुदतीत प्राप्त
2	Microtronics, Aurangabad	आ.नं. 14234 दि.31/10/2016	मुदतीत प्राप्त
3	Surendra Traders, Nashik	आ.नं. 14235 दि.31/10/2016	मुदतीत प्राप्त
4	Eastern Batteries, Nashik	आ.नं. 14239 दि.31/10/2016	मुदतीत प्राप्त
5	Sai Auto Battery Service	आ.नं. 14301 दि.31/10/2016	मुदतीत प्राप्त

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलानुसार युपीएसच्या 26Ah च्या 03 व 42Ah च्या 03 नग नविन बॅटऱ्या खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा मा. उप-समितीचे सभेसमोर उघडुन त्यातील न्युन्नत्तम निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून खरेदी करणेकामी कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 22,500/- मात्र + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान:- तांत्रीक व आर्थिक

प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलानुसार युपीएसच्या 26Ah च्या 03 व 42Ah च्या 03 नग नविन बॅटऱ्या खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेतआला.

अ.न.	कंपनीचे/ पुरवठाधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.	
		26Ah बॅटऱ्या ०३ नग	**42Ah** बॅटऱ्या ०३ नग
1	Intime Services, Mumbai (Exide)	१२,३२६/-	१८,२१३/-
2	Microtronics, Aurangabad (Amron Quanta)	**६,४५०/-**	**१०,२००/-**
3	Surendra Traders, Nashik (Exide)	९,०००/-	१५,०००/-

4	Eastern Batteries, Nashik (HBL)	६,०७५/-	९,०२४/-
5	Sai Auto Battery Service (Exide)	७,८००/-	१२,०००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांमध्ये बसविण्यात आलेल्या युपीएससाठी नविन बॅटऱ्या खरेदी करणेकामी Microtronics, Aurangabad यांचे Amron Quanta या ब्रँडसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

२० **आटा चाळणी यंत्र खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४) मध्ये १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

श्री साईप्रसादालयातील गिरणीचा आटा चाळणी करणेकामी नविन तीन चाळणी यंत्र विहीत पद्ध्तीने खरेदी करणेस व याकामी येणा.म रुया अंदाजे रक्क- २,४६,००० मात्रचे खर्चास -/दिनांक १९.९.२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ६५२ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा. नं. एसएसएस/ वशि/ मेकॅनिकल/ ३४९१/२०१६ दिनांक ३.१०.२०१६ अन्वये ७ पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. कोटेशन पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक २०.१०.२०१६ अशी देणेत आलेली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे ४ पुरवठादार यांचेकडून कोटेशन्स प्राप्त झालेली असून मे. मुक्ती एन्टरप्राईजेस, पुणे यांचे दरपत्रक आवक विभागाकडून उघडून आलेले आहेव उर्वरीत तीन दरपत्रक बंद पाकीटात प्राप्त् झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे .

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	आवक क्रमांक	दिनांक
१.	मुक्ती एन्टरप्राईजेस, भोसरी, पुणे	१२३७२	७.१०.२०१६
२	जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर	१३२९२	१९.१०.२०१६
३	श्री राम इंजिनिअरींग वर्क्स, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर	१३२९३	१९.१०.२०१६
४.	ओम श्री चैतन्यप्रसाद मेटल इंडस्ट्रीज, कोल्हापूर	१३२९१	१९.१०.२०१६

उपरोक्त तपशीलाप्रमाणे प्राप्त झालेली ४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव	दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु.
०१.	मुक्ती एन्टरप्राईजेस, भोसरी, पुणे	४,६१,६२५/-
०२.	जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर	**२,४५,०२७/-**
०३.	श्री राम इंजिनिअरींग वर्क्स, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर	२,५९,०६५/-
०४.	ओम श्री चैतन्यप्रसाद मेटल इंडस्ट्रीज, कोल्हापूर	२,७२,२११/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयासाठी आटा चाळणी यंत्र खरेदी करणेकामी जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर यांचे रु२,४५,०२७/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२१ **गॅस लिकेज डिटेक्शन सिस्टीम खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४) मध्ये १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

जुने एल.पी. गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादालयातील सिलेंडर मेनी फोल्ड येथे गॅस लिकेज डिटेक्शन यंत्रणा बसविणेकामी विहीत पद्ध्तीने खरेदी करणेस व याकामी येणा.म रुया अंदाजे रक्क- २,००,००० मात्रचे खर्चास -/ दिनांक १४.६.२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ३५३ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा. नं. एसएसएस/ वशि/ मेकॅनिकल/ ३४९२/ २०१६ दिनांक ३.१०.२०१६ अन्वये ५ पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. कोटेशन पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक २०.१०.२०१६ अशी देणेत आलेली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे ३ पुरवठादार यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	आवक क्रमांक	दिनांक
१.	ग्लोब गॅस इक्युपमेंन्ट इंडस्ट्री प्रा. लि. मुंबई	१२४३७	०८..१०.२०१६
२.	एच. जोशी ब्रदर्स, नाशिक	१३१६७	१७.१०.२०१६
३.	यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक	१३४२१	२०.१०.२०१६

उपरोक्त तपशीलाप्रमाणे प्राप्त झालेली ३ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव	दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु.
०१.	ग्लोब गॅस इक्युपमेंन्ट इंडस्ट्री प्रा. लि. मुंबई	५,५८,५००/-
०२.	एच. जोशी ब्रदर्स, नाशिक	५,७४,८००/-
०३.	यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक	५,९२,७००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, गॅस लिकेज डिटेक्शन सिस्टीम खरेदीकामी प्राप्त झालेले दर अंदाजपत्रकापेक्षा जास्त असल्यामुळे, याकामी सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेरप्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच कार्बन डिटेक्शन व दर्शन रांगेमधील ऑक्सीजन यासंदर्भातील माहितीही त्यासोबत ठेवण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२२ **श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील कंपाऊंड तसेच द्वारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील कंपाऊंड तसेच व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 31/08/2016 रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्याकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ५,७५,८६५/ - मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर निविदा दिनांक ८/१०/२०१६ रोजी अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोंडीगसाठी २०/१०/२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये दोनच निविदा प्राप्त झालेमुळे ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दिनांक २८/१०/२०१६ रोजी पर्यंत पुन्हा मुदतवाढ देणेत आलेली होती. परंतु सदर कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त न झालेमुळे दिनांक ५/११/२०१६ रोजी दुपारी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आलेली होती. त्यानुसार खालील पाच निविदाधारकांच्या ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

(1) अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद
(2) सुपर फॅब्रिकेशन ॲन्ड फर्निचर्स, साकुरी
(3) प्रेस व्हॅक स्टिल इंडस्ट्रीज, सिन्नर
(4) पी. एस.टेंबुर्णीकर, औरंगाबाद
(5) अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद

उपरोक्त प्राप्त ५ ई निविदेतील तांत्रिक निविदा-(Technical Bid) दिनांक ०८/११/२०१६ रोजी मा . प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई. एम. डी. रक्कमेचा डि.डि., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त पाचही तांत्रिक निविदा पात्र आहे.

श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील कंपाऊंड तसेच व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव	दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु.
०१	अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद	५,९१,२७०/-
०२	अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद	६,४३,०२४/-
०३	प्रेस व्हॅक स्टिल इंडस्ट्रीज, सिन्नर	७,१६,६९०/-
०४	सुपर फॅब्रिकेशन ॲन्ड फर्निचर्स, साकुरी	५,८२,२६६/-
०५	पी. एस.टेंबुर्णीकर, औरंगाबाद	**५,६७,५८९/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लँटचे टाकीवर ग्रील कंपाऊंड तसेच द्वारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी पी.एस. टेंबुर्णीकर, औरंगाबाद यांचे रु५,६७,५८९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२३ **संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता बिस्कीटे खरेदी कामी ई-निविदेचे Online Commercial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता बिस्किटे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२६.०९.२०१६ ते दि.१५.१०.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तसेच या प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी ब्रिटानिया, पार्ले, पतंजली, प्रिया गोल्ड, सनफीस्ट वगैरे बिस्किटांचे कंपनी/ पुरवठादार/ वितरक यांना ई-मेलव्दारे कळविण्यात आलेले होते.

मुदतीअंती दि.१५.१०.२०१६ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत दोनच निविदा प्राप्त झालेने सदर ई-निविदा प्रक्रियेस प्रथम दि.२२.१०.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानंतर दि.२२.१०.२०१६ अखेर सायं.५ वाजेपर्यंत दोनच निविदा प्राप्त झालेने सदर ई-निविदा प्रक्रियेस दुस-यांदा दि.२९.१०.२०१६ पर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली होती. मुदतीअंती याकामी तीन निविदा प्राप्त झाल्याचे आय.टी. विभागाकडे चौकशी करता सांगीतले होते.

सदर तीन निविदांचे Technical Bid दि.१०.११.२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. चे दरम्यान उघडले असता एकूण तीन निविदाधारकांनी खालीलप्रमाणे Online तांत्रिक निविदा सादर केलेल्या होत्या.

१. मे.अग्रवाल एजन्सिज, साकुरी
२. मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे
३. मे.रविराज बिजनेस, साकुरी

वरील तांत्रीक निविदा खरेदी समितीचे सदर बैठकीत उपस्थित सदस्यांसमोर उघडून निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता वरील अ.क्रं. १ ते ३ निविदाधारकांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या ई-निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत.

तरी उपरोक्त प्राप्त तीन ई-निविदाधारकांचे Online Commercial Bid बीड उघडणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत चहा, बिस्कीट पुरविणेत येत आहे. याकरीता कमी बिस्कीटे असलेले (२ किंवा ४), बिस्कीट पुडे खरेदी करणेत यावेत व बिस्कीट खरेदीकामी योग्य दर मिळणेसाठी एकाच कंपनीच्या कमीत कमी ३ पुरवठाधारकांकडूनदर मागवावेत. तसेच कॅन्टीन विभागाकडे बिस्कीट टंचाई होऊ नये यामुळे तात्काळ अल्प कालावधीच्या ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२४ **श्री साईबाबा व साईआश्रम भक्तनिवासस्थानांकरीता मेडिमिक्स साबण खरेदीकामी प्राप्त ई-निविदेचे Online Commercial Bid उघडणेबाबत.**

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने ३,४८,४८० नग १२ ते १५ ग्रॅमच्या साबण वडया खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७,६०,०००/- (अक्षरी रु. सात लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४.०६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४४ अन्वये मान्यता घेऊन, सदर निर्णयाचे प्रतीसह प्रस्ताव खरेदी विभागाकडे दि.२५.०७.२०१६ रोजी पाठविलेला आहे.

तसेच साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागानेही मेडिमिक्स साबण ३५,७१२ नग खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८९,२८०/- मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४७ अन्वये मान्यता घेऊन, सदर निर्णयाचे प्रतीसह दि. २६.०७.२०१६ रोजीचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पाठविलेला आहे.

वरील निर्णयानुसार, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने फक्त १२ ते १५ ग्रॅम साबण वडया खरेदी करणेबाबत कळविले आहे. तर साईआश्रम विभागाने चोलाईल कंपनीचे मेडिमिक्स साबण १२ ग्रॅम वडी खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वरील नमूद निर्णयान्वये मान्यता घेतलेली आहे.

सदर दोन्ही प्रस्ताव एकत्रित करुन दोन्ही विभागासाठी साबण वडया एकत्रित खरेदी करुन देणेबाबत निर्णय क्रं.३४४,३४७ नुसार निर्णय झालेला आहे. सदर दोन्ही मिळून एकत्रित ३,८४,१९२ साबण वडया होतात व याकामी अंदाजे एकूण खर्च रु.८,४९,२८०/- असल्यामुळे दि.२८.०९.२०१६ ते दि.१५.१०.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

सदरच्या ऑनलाईन प्राप्त तांत्रिक निविदा दि.२०.१०.२०१६ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आल्या असता एकूण ७ निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

१. मनिषा एंटरप्रायझेस, बीड
२. युनियन ट्रेडींग, नाशिक
३. अग्रवाल एजन्सीज, साकूरी
४. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई
५. ॲस्पायर टेक्नोबील्ड, पुणे
६. सचिन एजन्सीज, शिर्डी
७. महर्षी वाल्मिकी आदिवासी बहुउद्देशीय संस्था, चाळीसगाव

सदर सात निविदांचे तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असता अ.नं. १ ते ५ निविदा पात्र ठरल्या आहेत. तर अ.नं. ६ मे. सचिन एजन्सीज, शिर्डी यांनी व्हॅट टिन नंबर सर्टिफिकेट निविदेसोबत सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरली. तसेच अ.नं. ७ महर्षी वाल्मिकी आदीवासी बहूउद्देशीय संस्था, चाळीसगाव यांचे दुकान नोंदणी दाखल्यावर धंदयाचे स्वरुप केटरींग, भाजीपाला पुरवठा, मटण पुरवठा (कार्यालय) असे नमुद असल्यामुळे व संस्थानची सदरची निविदा ही मेडिमिक्स सोप पुरविणेची असल्यामुळे, मेडिमिक्स साबण पुरविणे व नोंदणी दाखल्यातील धंद्याच्या स्वरुपाचा काही संबंध नाही, त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरली आहे.

तरी उपरोक्त पात्र पाच निविदाधारकांचे ऑनलाईन प्राप्त Commercial Bid उघडणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर

यावर सविस्तर चर्चा होऊन, मेडीमिक्स या एकाच कंपनीचे छोटे साबण घेणेऐवजी इतर छोटया साबण निर्मात्या कंपन्यांचा समावेश करणेत येऊन, फेर ई-निविदा मागविणेत याव्यात. त्यामध्ये एकाच कंपनीच्या कमीत कमी ३ पुरवठाधारकांकडूनदर मागवावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२५ **आरोग्य विभागाकरीता सन- २०१६-१७ करीता वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त ई-निविदेचे Online Commercial Bid उघडणेबाबत.**

आरोग्य विभागाकरीता सन २०१६-१७ करीता वार्षिक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,७१,२५०/- (अक्षरी रु. नऊ लाख एक्काहत्तर हजार दोनशे पन्नास) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४.०६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४२ नुसार मान्यता मिळालेली होती. त्यानुसार सदरचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडून दि.०२.०८.२०१६ रोजी खरेदी विभागाकडे प्राप्त झालेला होता.

सदरचे आरोग्य साहित्य खरेदीकामी दि.१३.०९.२०१६ ते दि.२८.०९.२०१६ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. यामध्ये तीन स्वतंत्र BOQ ठेवण्यात आलेले होते. यामध्ये BOQ क्रं.१ साठी ६, BOQ क्रं.२ साठी ६ व BOQ क्रं.३ साठी ४ निविदाधारकांनी ऑनलाईन ई-निविदा भरलेल्या होत्या. यामध्ये एकूण ९ निविदाधारक होते.

सदरच्या तांत्रिक निविदा दि.०४.१०.२०१६ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता प्राप्त ९ निविदाधारकांच्या निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेल्या आहेत. पात्र निविदाधारकांनी निविदेसोबत साहित्यांचे नमुने सादर केलेले आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	साहित्याचा तपशिल
१.	मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई	झाडू १, कुंचे १, वायफर १, सेंटेड फिनेल १ लिटर
२.	मे. मगनलाल देवशंकर, नाशिक	झाडू १, कुंचे १, वायफर १, सेंटेड फिनेल १ लिटर
३.	मे. साईकेम एंटरप्रायझेस, रामपूर	झाडू १, कुंचे १, ओडोपिक पावडर १ बॅग
४.	मे. निलकमल लिमिटेड, नाशिक	-
५.	मे. विरभद्र ट्रेडर्स, कोपरगाव	झाडू १, कुंचे १
६.	मे. युनियन ट्रेडींग, नाशिक	झाडू १, कुंचे १, ओडोपिक पावडर १ बॅग
७.	मे. सुदर्शन स्पेशालिटी केमसॉव्ह, मुंबई	फिनेल १ लिटर
८.	मे. महेश इंजिनिअर्स, नाशिक	-
९.	मे. क्लासिक स्टेशनर्स, मुंबई	झाडू १, कुंचे १, वायफर १, ओडोपिक पावडर १ बॅग

उपरोक्त ऑनलाईन प्राप्त ई-निविदेतील पात्र ९ निविदाधारकांचे ३ स्वतंत्र BOQ प्रमाणे ३ स्वतंत्र Commercial Bids आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

(अ) झाडु, कुंचे व वायफर खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	खराटे २००० नग	कुंचे २००० नग	वायफर २२५ नग
		निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.		
१.	मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई	६५,०००/-	१,७०,०००/-	२८,१२५/-
२.	मे. क्लासिक स्टेशनर्स, मुंबई	**५३,०००/-**	**१,१८,५००/-**	**२४,५२५/-**
३.	मे. साईकेम एंटरप्रायझेस, रामपूर	६२,०००/-	१,२०,०००/-	---
४.	मे. मगनलाल देवशंकर, नाशिक	६२,७६०/-	१,४२,०००/-	५०,८५०/-
५.	मे. युनियन ट्रेडींग, नाशिक	६५,०००/-	१,३६,०००/-	१,०१,२५०/-
६.	मे. विरभद्र ट्रेडर्स, कोपरगाव	५८,०००/-	१,१९,०००/-	२४,७५०/-

(ब) सेंटेड फिनेल, क्लिनींग पावडर खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	सेंटेड फिनेल १५०० लिटर	ओडोपीक वॉश पावडर ४५०० कि.ग्रॅ.
		निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.	
१.	मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई	**१,७२,५००/-**	१,२१,५००/-
२.	मे. क्लासिक स्टेशनर्स, मुंबई	२,३२,५००/-	९३,३७५/-
३.	मे. साईकेम एंटरप्रायझेस, रामपूर	३,०७,५००/-	९४,५००/-
४.	मे. मगनलाल देवशंकर, नाशिक	२,२६,५००/-	---
५.	मे. युनियन ट्रेडींग, नाशिक	३,१५,०००/-	**९२,०२५/-**
६.	मे. सुदर्शन स्पेशालिटी केमसॉव्ह, मुंबई	२,४०,०००/-	---

(क) फायबर/ प्लॅस्टिकच्या कचरा कुंडया खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	फायबर/ प्लॅस्टिकच्या कचरा कुंडया २०० नग
	निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.	
१.	मे. निलकमल लिमिटेड, नाशिक	३,८५,०००/-
२.	मे. क्लासिक स्टेशनर्स, मुंबई	४,३३,०९६/-
३.	मे. युनियन ट्रेडींग, नाशिक	**३,३४,४००/-**
४.	मे. महेश इंजिनिअर्स, नाशिक	४,४५,२००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागासाठी सन- २०१६-१७ करीता प्रस्तावित वार्षिक साहित्य खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनापुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२६ **हमाली कामाचे दरपत्रक उघडून कार्यादेश देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०६ अन्वये सन २०१६-१७ करीता हमालीचे काम देणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्धी देवून स्थानिक हमालांकडून कोटेशन/ दरपत्रक मागवून न्युनतम दरधारकास पुढील सहा महिन्यांसाठी हमाली कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानंतर दि.१३.१०.२०१६ रोजीचे मंजूर टिप्पणी अन्वये जा.नं. एसएसएस/भांडार/३९०७/२०१६ दि.२५.१०.२०१६ नुसार ४ स्थानिक हमालांना कोटेशन/ दरपत्रक मागणी फॉर्म पाठविणेत आले होते तसेच संस्थानचे संकेतस्थळावर उपरोक्त जाहिरात व कोटेशन फॉर्म प्रसिद्ध करणेत आले होते. उपरोक्त दरपत्रक जमा करणेची अंतीम मुदत दि.०५.११.२०१६ सायं.५ वा. अशी निश्चित करणेत आलेली होती.

उपरोक्त विहित मुदतीत खालील तपशिलाप्रमाणे दरपत्रक प्राप्त झालेले आहेत.

अ.नं.	कोटेशन/ दरपत्रक धारकांचे नांव	आवक क्रमांक/ दिनांक
०१	श्री रामराव शंकर गायकवाड, शिर्डी	१४२०३/ २९.१०.२०१६
०२	श्री बबन बन्सी तनपुरे, शिर्डी	१४३९४ ०२.११.२०१६
०३	श्री योगेश ज्ञानदेव खळदकर, बहादरपुर	१४५०६ ०३.११.२०१६

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली बंद पाकिटे (दरपत्रके) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	मालाचा तपशिल	परिमान/ वजन	श्री रामराव शंकर गायकवाड, यांचे दर रु.	श्री बबन बन्सी तनपुरे, यांचे दर रु.	श्री योगेश ज्ञानदेव खळदकर, यांचे दर रु.
१	साखर, गहू, तांदूळ, हरभरा, तुरदाळ, मुगदाळ, हरभरा डाळ व इतर किराणा माल. (२५/३०/५० कि.ग्रॅ. वजनाची गोणी)	प्रति क्विंटल	४.००	३.७५	४.००
२	मिनरल वॉटर बॉक्स (१ लि. / ५००मि.)	प्रति बॉक्स	१.००	०.६०	०.७०
३	बिस्कीट, पेपर कप, चहा पावडर, कॉफी इ. बॉक्स	प्रति बॉक्स	१.००	०.५०	०.५०
४	पेपर पिशवी. (२५ किलो वजनाची बॅग)	प्रति बॅग	०.५०	०.५०	०.५०
५	गावरान तुप, वनस्पती तुप, खाद्यतेल व काजु पाकळी यांचे डबे. (१०/१५ कि. ग्रॅम वजनाचा डबा)	प्रति डबा	१.००	०.९०	०.८०
६	पत्रावळ (१,००० नगाचा बंडल)	प्रति बंडल	१.००	०.७५	२.००
७	ब्लिचींग पावडर (२५ किलो वजणाची गोणी)	प्रति गोणी	०.५०	०.५०	१.००
८	लिंडेन बी.एच.सी. किंवा इतर पावडर. (५० किलो गोणी)	प्रति गोणी	१.००	०.५०	१.५०
९	तुरटी (सुटी असल्याने)	प्रति क्विंटल	१०.००	५.००	२.५०
१०	लोखंडी सामान.	प्रति टन	२०.००	५०.००	४०.००
११	पुस्तके/ फोटो, प्लॅस्टीक वस्तु व इतर	प्रति क्विंटल	४.००	५.००	४.५०
१२	क्वॉयर फोम गाद्या, चादरी गाठ, बेडशिट्स गाठ, उश्या गाठ.	तळमजला	५.००	२.००	१.००
		पहिला मजला	६.००	३.००	१.००
		२/ ३ रा मजला	१५.००	४.००	१.००
१३	वाराई (संस्थानव्यतिरिक्त आलेल्या वाहनातुन)	प्रति टन	५०.००	५०.००	४०.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील हमालीचे काम देणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनाजानेवारी, २०१७ पासुन पुढील सहा महिने कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

२७ फाडलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांचे विक्री करीता मागविणेत आलेले कोटेशन/ दरपत्रके उघडणेबाबत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०७ अन्वये भांडार विभागात पडुन असलेल्या ३,००,००० नग (४०० किलो) फाडलेल्या आयडीया कंपनीच्या प्लॅस्टिक पिशव्यांचे विक्री करीता संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिद्धी देऊन परिसरातील भंगारचे व्यावसायीकांकडुन विहित पद्धतीने कोटेशन/ दरपत्रके मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त पिशव्यांचे विक्री करीता दि.१५.१०.२०१६ रोजी विहित मान्यता घेवून जा.नं. एसएसएस/ भांडार/ ४०२२/२०१६, दि.०३.११.२०१६ अन्वये ७ स्थानिक व्यावसायीकांना कोटेशन/ दरपत्रक मागणी फॉर्म पाठविणेत आले होते. तसेच दि.०३.११.२०१६ रोजी संस्थानचे संकेतस्थळावरही उपरोक्त जाहिरात व कोटेशन मागणी फॉर्म प्रसिद्ध करणेत आले होते. उपरोक्त दरपत्रके संस्थानकडे जमा करणेची अंतीम मुदत दि.२०.११.२०१६ सायं. ५ वा. अशी निश्चित करणेत आलेली होती, त्यानुसार विहित मुदतीत खालील तपशिलाप्रमाणे कोटेशन/ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	कोटेशन/ दरपत्रक धारकांचे नांव	आवक क्रमांक/ दिनांक
०१	श्री रियाज अकबर पठाण, कोपरगांव	१४७१०/ ०५.११.२०१६
०२	श्री अमदखॉ उमरखॉ पठाण, राहाता	१४७११/ ०५.११.२०१६
०३	श्री अकबरखॉ संडेखॉ पठाण, कोपरगांव	१४७१२/ ०५.११.२०१६

उपरोक्त फाडलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांची बाजार भावानुसार अंदाजे किंमत रु.३,२००/- मात्र इतकी आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ३ बंद पाकिटे (दरपत्रके) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशन/ दरपत्रक धारकांचे नांव	दरपत्रकामधील प्रती किलो मुळ दर रु.
०१	श्री रियाज अकबर पठाण, कोपरगांव	४.००
०२	श्री अमदखॉ उमरखॉ पठाण, राहाता	४.७५
०३	श्री अकबरखॉ संडेखॉ पठाण, कोपरगांव	६.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फाडलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांची विक्री करणेकामी श्री अकबरखॉ संडेखॉ पठाण, कोपरगांव यांचे प्रती किलो रु.६/- मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

२८ **आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साई आश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्विच बसविणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०७-०८-२०१६ चे सभेतील विषय नं.४६ निर्णय क्र.४९१अन्वये आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींगचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,८४,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४-०९-२०१६ रोजी दै.सार्वमत, अहमदनगर व दैनिक देशदुत, नाशिक या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२५-०९-२०१६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व २३ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.२७-०९-२०१६ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०२ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२६-०९-२०१६ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२६-०९-२०१६ रोजी दुपारी १७.२० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. ०३-१०-२०१६ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६-१०-२०१६ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.

दि.०३-१०-२०१६ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये तीन ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच शिर्डी कार्यालयात ०३ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या होत्या. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०३ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या ०३ निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी विद्युत विभागाचे प्रशासकिय अधिकारी, श्री.औटी, व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.घोरपडे यांचे उपस्थितीत समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहे.

आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींगचे काम करणेसाठी निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०३ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या ०३ निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.औटी व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.घोरपडे यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून ०३ निविदाधारक तांत्रिक निविदामध्ये पात्र झालेले असल्याने सदर कामाचे ऑनलाईन अपलोड करण्यात आलेले ०३ कमर्शियल बीड मा.व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे उघडावे लागणार आहे. अपलोड करण्यात आलेल्या निविदाधाराकांचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे नांव	शेरा
०१)	मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे	पात्र
०२)	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक	पात्र
०३)	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	पात्र

उपरोक्तप्रमाणे आय.एस.ओ.ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींगचे काम करणेसाठी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले तीन ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.क्र.	ई-निविदाधारकाचे नांव	ई-निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.
०१)	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	९,०२,५२०.००
०२)	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक	१०,१६,६४०.००
०३)	मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे	७,४०९३९.९२

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणे व त्यासाठीचे वायरींगचे काम करुन घेणेकामी मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे यांचे एकत्रित रु७,४०९३९.९२ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२९ **स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रियल फॅन खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०७-०८-२०१६ चे सभेतील विषय नं.४४ निर्णय क्र.४८९अन्वये स्टॅण्ड फॅन,सिलिंग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ७,९४,४१६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४-०९-२०१६ रोजी दै.सार्वमत, अहमदनगर व दैनिक देशदुत, नाशिक या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२५-०९-२०१६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व २३ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.२७-०९-२०१६ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०३ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२६-०९-२०१६ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२६-०९-२०१६ रोजी दुपारी १६.४० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. ०३-१०-२०१६ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६-१०-२०१६ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.

दि.०३-१०-२०१६ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये चार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच शिर्डी कार्यालयात ०४ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या होत्या. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी विद्युत विभागाचे प्रशासकिय अधिकारी, श्री.औटी व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.घोरपडे यांचे उपस्थितीत समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून तीन निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहे.

स्टॅण्ड फॅन,सिलिंग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.औटी व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.घोरपडे यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून तीन निविदाधारक पात्र झालेले आहे व मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल्स्, पुणे यांनी टेंडर फी व अर्नेस्ट मनी डिपॉझिट चे कॉ-ऑपरेटिव्ह बँकेचा अकाऊंट पे चेक जोडल्याने अपात्र झालेले आहे. तरी तीन निविदाधारक तांत्रिक निविदामध्ये पात्र झालेले असल्याने सदर कामाचे ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन कमर्शियल बीड मा.व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे उघडावे लागणार आहे. अपलोड करण्यात आलेल्या निविदाधाराकांचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ. नं.	ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे नांव	शेरा
०१)	मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, पुणे	टेंडर फी व अर्नेस्ट मनी डिपॉझिट चे कॉ-ऑपरेटिव्ह बँकेचा अकाऊंट पे चेक जोडल्याने अपात्र
०२)	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	पात्र
०३)	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक	पात्र
०४)	मे.मार्क इंडस्ट्रीज, मुंबई	पात्र

उपरोक्तप्रमाणे स्टॅण्ड फॅन, सिलिंग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ. नं.	ई-निविदाधारकाचे नांव	मे.मार्क इंडस्ट्रीज, मुंबई	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक
		ई-निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.		
1	Pedestal type air circulator 450 mm/ 18 inch 20 nos.	**१,१५,३६०/-**	१,२९,४००/-	१,६०,०००/-
2	Pedestal type air circulator 600 mm/ 24 inch 30 nos.	**२,०४,८४०/-**	२,९१,९००/-	२,७०,०००/-
3	Table fan of A.C. 230 V. 50 cycles 400 mm/ 16 inch 10 nos.	**१७,४८०/-**	२१,०००/-	१८,०००/-
4	Erecting Cabin fan of A.C. 230 V. 50 cycles 250 mm/ 300 mm 5 nos.	**७,४९०/-**	९,५००/-	१२,०००/-
5	Erecting Cabin fan of A.C. 230 V. 50 cycles 400 mm/ 16 inch 5 nos.	**८,७९०/-**	१०,५००/-	१२,५००/-
6	Tubular type man coolers Fan 450 mm/ 18 inch 4 nos.	६८,९९२/-	७९,६००/-	**६४,०००/-**
7	Tubular type man coolers Fan 450 mm/ 18 inch, 2 nos.	४३,४३६/-	४७,०००/-	**४०,०००/-**
8	Tubular type man coolers Fan 600 mm/ 24 inch 2 nos.	४२,३९६/-	४६,०००/-	**३६,०००/-**
9	Tubular type man coolers Fan 600 mm/ 24 inch 2 nos.	**५१,९९६/-**	६४,०००/-	६०,०००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रियल फॅन खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

३० **स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०७-०८-२०१६ चे सभेतील विषय नं.४३ निर्णय क्र.४८८ अन्वये स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच.टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४,६०,७००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४-०९-२०१६ रोजी दै.सार्वमत, अहमदनगर व दैनिक देशदुत, नाशिक या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२५-०९-२०१६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व २३ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.२७-०९-२०१६ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०२ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२६-०९-२०१६ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२६-०९-२०१६ रोजी दुपारी १६.३० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. ०३-१०-२०१६ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६-१०-२०१६ रोजी

सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.

दि.०३-१०-२०१६ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये तीन ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच शिर्डी कार्यालयात ०३ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या होत्या. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०३ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी विद्युत विभागाचे प्रशासकिय अधिकारी, श्री.औटी, व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.घोरपडे यांचे उपस्थितीत समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहे.

स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच.टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०३ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२८-१०-२०१६ रोजी मा.प्रशासकीयअधिकारी-श्री.औटी व मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,श्री.घोरपडे यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून ०३ निविदाधारक तांत्रिक निविदामध्ये पात्र झालेले असल्याने सदर कामाचे ऑनलाईन अपलोड करण्यात आलेले ०३ कमर्शियल बीड मा.व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे उघडावे लागणार आहे. अपलोड करण्यात आलेल्या निविदाधाराकांचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे नांव	शेरा
०१)	मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे	पात्र
०२)	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक	पात्र
०३)	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	पात्र

उपरोक्तप्रमाणे स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच.टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.क्र.	ई-निविदाधारकाचे नांव	ई-निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.
०१)	मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी	४,५५,२८०/-
०२)	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक	५,३१,१६०/-
०३)	मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे	**४,३६,३१०/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन्स प्रा.लि., पुणे यांचे एकत्रित रु४,३६,३१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

३१ साईनिवास अतिथीगृह इमारतीमधील व्ही.आय.पी.सुटस् मधील बाथरुमकरीता एक्झॉस्ट फॅन खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून निर्णय होणेबाबत.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९-१०-२०१६ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.७२४ अन्वये साईनिवास अतिथीगृह इमारतीमधील व्ही.आय.पी.सूटस् मधील बाथरुमकरीता एक्झॉस्ट फॅन खरेदी करणेकामी **शासन निर्णयानुसार** विहीत पध्दतीने बाहेरील कोटेशनधारकांना पत्र पाठवुन कोटेशन मागविणेस, येणा-या खर्चास, कामास व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन मागविणेकामी येणा-या रक्कम रुपये ४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत / ४२७५ / २०१६ दिनांक १६-११-२०१६ अन्वये १५ बाहेरील कोटेशनधारकांना कोटेशन पत्र पाठविण्यात आली होती. तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. कोटेशन विक्री दि.१७-११-२०१६ ते दि.२९-११-२०१६ अखेर ठेवण्यात आलेली होती. सिलबंद कोटेशन जमा करण्याची अंतिम दिनांक ३०-११-२०१६ अशी होती. त्यानुसार मुदतीत जमा झालेल्या चार सिलबंद कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	कोटेशनधारकाचे नांव	शेरा
०१)	मे.मार्क इंडस्ट्रीज, मुंबई	कोटेशन बंद पाकीट-०१
०२)	मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर	कोटेशन बंद पाकीट-०२
०३)	मे.ठाकूर श्रॉफ ॲण्ड इलेक्ट्रीक कंपनी, पुणे	कोटेशन बंद पाकीट-०१
०४)	मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स,पुणे	कोटेशन बंद पाकीट-०२

उपरोक्तप्रमाणे साईनिवास अतिथीगृह इमारतीमधील व्ही.आय.पी.सूटस् मधील बाथरुमकरीता एक्झॉस्ट फॅन खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ०४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.क्र.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१)	मे.मार्क इंडस्ट्रीज, मुंबई	४८,५४०/-
०२)	मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर	४७,८५०/-
०३)	मे.ठाकूर श्रॉफ ॲण्ड इलेक्ट्रीक कंपनी, पुणे	**४७,६७०/-**
०४)	मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, पुणे	४९,५००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह इमारतीमधील व्ही.आय.पी.सुटस् मधील बाथरुमकरीता एक्झॉस्ट फॅन खरेदी करणेकामी मे.ठाकूर श्रॉफ ॲण्ड इलेक्ट्रीक कंपनी, पुणे यांचे एकत्रित रु.४७,६७०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

३२ **वाहन क्र.एम.एच.१७/ टी- ७१११ (महिंद्रा मॅक्स) करीता नवीन टायर खरेदीबाबत.**

वाहन विभागाकडील दिरोजीचे मंजुर टिपणीनुसार २०१६/११/०२.,वाहन क्रं.एम.एच.१७/टी-७१११ (महिंद्रा मॅक्स) या वाहनाकरीता अपोलो कंपनीचे 7:00:R15 (नॉयलॉन, अमर गोल्ड) (ट्युब, फ्लॅपसह (या साईजचे ०४ टायर्स खरेदी करणे कामी परिसरातील अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून दरपत्रके बोलाविणेस व या कामी येणा२४.या अंदाजे रु,०००तापर्यंतचे खर्चास मान्य (चौवीस हजार .म रुअक्षरी रक्क) -/ घेण्यात आली होती.

यानुसार, इकडील जादि २०१६/४०६०/वाहन/एसएसएस.नं..०३ रोजीचे पत्राने अपोलो २०१६/११/ कंपनीचे खालील प्रमाणे ०८ अधिकृत डिलर्स यांचेकडून 7:00:R15 (नॉयलॉन, अमर गोल्ड) (ट्युब, फ्लॅपसह (या साईजचे ०४ टायर्स खरेदी करणे कामी दिअखेर दरपत्र २०१६/११/१०.के बोलाविण्यात आली होती.

अ.नं.	**दरपत्रकधारकाचे नांव**
०१	राम टायर्स, कोपरगांव
०२	नरेद्र टायर्स, कोपरगांव
०३	ओम टायर्स, शिर्डी
०४	साई सेवा टायर्स ॲन्ड कार ॲसेसरीज, साकुरी
०५	माऊली टायर्स, पळसे
०६	ओम साई गणेश टायर्स, साकुरी
०७	सतिष टायर्स, श्रीरामपुर
०८	सुदर्शन टायर, शिर्डी

खालीलप्रमाणे ४ दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	**दरपत्रकधारकाचे नांव**	**आवक क्र./ दिनांक**	
०१	राम टायर्स, कोपरगांव	१४६५७-०४/११/२०१६	बंद दरपत्रक
०२	नरेद्र टायर्स, कोपरगांव	१४६५८-०४/११/२०१६	बंद दरपत्रक
०३	ओम टायर्स, शिर्डी	१४८९३-०८/११/२०१६	बंद दरपत्रक
०४	साई सेवा टायर्स ॲन्ड कार ॲसेसरीज, साकुरी	१५१३४-१०/११/२०१६	बंद दरपत्रक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.क्र.	दरपत्रकधारकाचे नांव	दरपत्रकामधील मुळ दर प्रती नग रु.
०१)	राम टायर्स, कोपरगांव	६,२००/-
०२)	नरेद्र टायर्स, कोपरगांव	५,४४५/-
०३)	ओम टायर्स, शिर्डी	५,७००/-
०४)	साई सेवा टायर्स ॲन्ड कार ॲसेसरीज, साकुरी	**५,४३७/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्र.एम.एच.१७/ टी- ७१११ (महिंद्रा मॅक्स) करीता नवीन टायर्स खरेदी करणेकामी साईसेवा टायर्स ॲण्ड कार ॲसेसरीज, साकुरी यांचे प्रती नग रु.५,४३७/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

३३ **वाहन क्र.MH-17, BD- 2442 (तवेरा रुग्णवाहीका) करीता टायर खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.२८/११/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन क्र.एमएच-१७-बीडी-२४४२ तवेरा रुग्णवाहीका वाहनाकरीता अपोलो कंपनीचे 205/65/R15-T.L. या साईजचे ऑनलॅक-4G या प्रकारचे ट्युबलेस सन-२०१६ मधील उत्पादीत ०४ टायर्स खरेदी करणे कामी परिसरातील अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर्स / पुरवठादार यांचेकडून दरपत्रके बोलाविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.२४,१००/- (अक्षरी रक्कम रु. चौविस हजार शंभर) पर्यंतचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/४५९३/२०१६ दि.०१/१२/२०१६ रोजीचे पत्राने, १० अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर्स / पुरवठादार यांचेकडून 205/65/R15-T.L.या साईजचे ऑनलॅक-4G या प्रकारचे ०४ टायर्स खरेदी करणे कामी दि.१०/१२/२०१६ अखेर दरपत्रके बोलाविण्यात आली होती.

अ.नं.	दरपत्रकधारकाचे नांव
०१	राम टायर्स, कोपरगांव
०२	नरेद्र टायर्स, कोपरगांव
०३	ओम टायर्स, शिर्डी
०४	ओम साई गणेश टायर्स, साकुरी
०५	सुदर्शन टायर, शिर्डी
०६	सतिष टायर्स, श्रीरामपुर
०७	माऊली टायर्स, पळसे
०८	साई सेवा टायर्स ॲन्ड कार ॲसेसरीज, साकुरी
०९	गुरुकृपा टायर्स, साकुरी
१०	चंद्रप्रभा टायर, साकुरी

त्यानुसार खालील प्रमाणे ०४ दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	दरपत्रकधारकाचे नांव	आवक क्र./ दिनांक	
०१	ओम साई गणेश ट्रेडर्स & टायर्स, साकुरी	१७७७८-१०/१२/२०१६	बंद दरपत्रक
०२	राम टायर्स, कोपरगांव	१७७७९-१०/१२/२०१६	बंद दरपत्रक
०३	ओम टायर्स, शिर्डी	१७७८०-१०/१२/२०१६	बंद दरपत्रक
०४	नरेद्र टायर्स, कोपरगांव	१७७८२-१०/१२/२०१६	बंद दरपत्रक

उपरोक्तप्रमाणे टायर खरेदी कामी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.क्र.	दरपत्रकधारकाचे नांव	दरपत्रकामधील मुळ दर प्रती नग रु.
०१)	राम टायर्स, कोपरगांव	४,७००/-
०२)	नरेद्र टायर्स, कोपरगांव	४,६१५/-
०३)	ओम टायर्स, शिर्डी	४,८००/-
०४)	ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी	**४,५९५/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्र.MH-17, BD- 2442 (तवेरा रुग्णवाहीका) करीता टायर खरेदीकामी ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी यांचे प्रती नग रु.४,५९५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

३४ **वाहन क्र.MH-17, AJ- 1016 (कार्डीयाक रुग्णवाहीका) करीता टायर खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.०८/११/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन क्र.एमएच-१७-एजी-१०१६ या रुग्णवाहीका वाहनाकरीता अपोलो कंपनीचे (AMAZER) या प्रकाराचे व 215/75R/15 /LT-115/113 या साईजचे (ट्युब, फ्लॅपसह) सन-२०१६ मधील उत्पादीत ०४ टायर्स खरेदी करणे कामी परिसरातील अपोलो

कंपनीचे अधिकृत डिलर्स / पुरवठादार यांचेकडून दरपत्रके बोलाविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.२४,५००/- (अक्षरी रक्कम रु. चौवीस हजार पाचशे) पर्यंतचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/४६६०/२०१६ दि.०३/१२/२०१६ रोजीचे पत्राने, १० अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर्स/ पुरवठादार यांचेकडून अपोलो कंपनीचे (AMAZER) या प्रकाराचे व 215/ 75R/ 15 /LT-115/113 या साईजचे (टयुब, फ्लॅपसह) सन-२०१६ मधील उत्पादीत ०४ टायर्स खरेदी करणे कामी दि.१३/१२/२०१६ अखेर दरपत्रके बोलाविण्यात आली होती.

अ.नं.	दरपत्रकधारकाचे नांव
०१	राम टायर्स, कोपरगांव
०२	नरेद्र टायर्स, कोपरगांव
०३	ओम टायर्स, शिर्डी
०४	ओम साई गणेश टायर्स, साकुरी
०५	सुदर्शन टायर, शिर्डी
०६	सतिष टायर्स, श्रीरामपुर
०७	माऊली टायर्स, पळसे
०८	साई सेवा टायर्स ॲन्ड कार ॲसेसरीज, साकुरी
०९	गुरुकृपा टायर्स, साकुरी
१०	चंद्रप्रभा टायर, साकुरी

त्यानुसार खालील प्रमाणे ०४ दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	दरपत्रकधारकाचे नांव	आवक क्र./ दिनांक	
०१	ओम साई गणेश ट्रेडर्स & टायर्स, साकुरी	17785-10/12/2016	बंद दरपत्रक
०२	राम टायर्स, कोपरगांव	17784-10/12/2016	बंद दरपत्रक
०३	ओम टायर्स, शिर्डी	17781-10/12/2016	बंद दरपत्रक
०४	नरेद्र टायर्स, कोपरगांव	17783-10/12/2016	बंद दरपत्रक

उपरोक्तप्रमाणे टायर खरेदी कामी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.क्र.	दरपत्रकधारकाचे नांव	दरपत्रकामधील मुळ दर प्रती नग रु.
०१)	राम टायर्स, कोपरगांव	५,२००/-
०२)	नरेद्र टायर्स, कोपरगांव	४,८२५/-
०३)	ओम टायर्स, शिर्डी, साकुरी शिव	**४,७००/-**
०४)	ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी	४,८०९/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्र.MH-17, AJ- 1016 (कार्डीयाक रुग्णवाहीका) करीता टायर्स खरेदीकामी ओम टायर्स, शिर्डी, साकुरी शिव यांचे प्रती नग रु.४,७००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

३५ **वार्षिक स्नेहसंमेलन २०१६-१७ बक्षीस खरेदीकामी मागविण्यात आलेले बंद कोटेशन उघडून न्युनतम पुरवठाधारकास आदेश होणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ– मा.व्यवस्थापन समिती दि. १५/०३/२०१४ रोजीची सभा निर्णय क्र.२५३.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतुद- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील क्रमांक १७ (१) व १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक– मा.व्यवस्थापन समिती दि. १५/०३/२०१४ रोजीची सभा निर्णय क्र. २५३.

प्रास्ताविक– मा. व्यवस्थापन समिती दि. १५.०३.२०१४ रोजीचे सभेत विषय नं. ८३ नुसार संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडे सालाबाद प्रमाणे साजरे करण्यात येणा-या वार्षिक स्नेहसंमेलन व वार्षिक क्रीडा स्पर्धा दरम्यान होणा-या, शैक्षणिक संकुलाकडील उपक्रमासाठी संबधित विभागांना खालीलप्रमाणे येणाऱ्या खर्चास स्थायी मंजूरी देणेबाबत प्रस्ताव मांडला होता.

अ.नं.	विभाग	अंदाजे विद्यार्थी	वर्ग तपशिल	अंदाजे खर्च
१	श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्था	४०० ते ४५०	औद्यगिक क्षेत्र एकूण 11 ट्रेड कोर्स चे विद्यार्थी	१,००,०००/-
२	श्री साईबाबा इं. मि. स्कुल	१८०० ते २०००	ज्यु.व सिनी केजी इयत्ता 1 ली 10 वी	१,००,०००/-
३	श्री साईबाबा क. वि. मंदीर	७०० ते ७५०	इयत्ता 5 वी 10 वी	७५,०००/-
४	श्री साईबाबा ज्यु. कॉलेज	१२०० ते १४००	इयत्त 11 वी 12 वी	७५,०००/-
५	बांधकाम विभाग	चार दिवस मंडप व्यवस्था	मंडप व्यवस्था	१,५०,०००/-
			एकूण अंदाजे खर्च	५,००,०००/-

निर्णय क्र. २५३ यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तवास मान्यता देण्यात आली.

मागणी:- सालाबाद प्रमाणे संस्थानचे शैक्षणिक संकुलाचे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील स्नेहसंमेलन दि. २१ डिसेंबर २०१६ ते दि. २३ डिसेंबर २०१६ या कालावधीत घेण्याचे नियोजीत असून शालेय गुणवत्ता परिक्षा स्पर्धा, शालेय क्रीडा स्पर्धा तसेच ज्या विद्यार्थ्यांनी राज्य स्तरीय स्पर्धा, जिल्हा स्तरीय स्पर्धा, तालुका स्तरीय स्पर्धेत यश संपादन केले आहे तसेच आपल्या शाळेत शालेय उपक्रमात विशेष गुण प्राप्त केले व शालेय क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले त्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करणेकामी बक्षिसे खरेदी करुन वाटप करावयाचे आहेत.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल विभागात इयत्ता ज्यु.के.जी ते इयत्ता १० वी पर्यंत एकुण ५१ वर्ग तुकडया कार्यरत असुन २५०१ विदयार्थी/विदयार्थीनी शिक्षण घेत आहेत. वार्षिक स्नेहसंमेलन २०१६-१७ करीता खालीलप्रमाणे एकूण ११०१ नग बक्षिसे खरेदी करावयाचे असून याकामी अंदाजे रु. ७०,०००/- इतका खर्च येत आहे.

अ. न.	विभाग	तपशिल	ॲकडमी बक्षिस संख्या	क्रीडा स्पर्धा बक्षिस संख्या	एकूण बक्षिस संख्या	अंदाजे खर्च रक्कम
१	ज्यु. केजी व सिनी केजी	ट्रॉफी व मेडल	९५	१२०	२१५	१०,०००/-
२	इयत्ता 1 ली ते 5 वी	ट्रॉफी व मेडल	२४३	२१६	४५९	२६.०००/-
३	इयत्ता 6 वी ते 10 वी	ट्रॉफी व मेडल	१४६	२६६	४१२	२३,०००/-
४	विविध स्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा व इतर	मोठी ट्रॉफी	------	१५	१५	११,०००/-
		एकूण	४८४	६१७	११०१	७०,०००/-

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधील वार्षिक स्नेहसंमेलन २०१६-१७ करीता खालीलप्रमाणे एकूण ११०१ नग बक्षिसे खरेदी करावयाचे असून याकामी परिसारातील पुरवठाधारकांकडून दरपत्रकांची बंद पाकीटे मागविण्यात आली होती दि. १५.१२.२०१६ अखेर खालीलप्रमाणे ०३ दरपत्रकांची बंद पाकिटे प्राप्त झालेली आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.नं.	कोटेशन धारकांचे नांव	आवक नंबर/दिनांक	पाकिट
१.	आकार ग्राफिक्स , कोपरगांव	१७९९१ /१५.१२.२०१६	बंद पाकिट
२.	स्पोटर्स ट्रॉफी हाऊस , अ. नगर	१७९८९ / १५.१२.२०१६	बंद पाकिट
३.	इमेज एनग्रेव्हर्स , नासिक	१७९८६/ १५.१२.२०१६	बंद पाकिट

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार शासन निर्देश् तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान – आर्थिक खर्चाचा विषय आहे.

विभागाचा अभिप्राय – सदरचे बक्षिस खरेदी खर्चाकामी इं. मि. स्कुलचे सन २०१६-१७ चे बजेट मध्ये एकूण रु. ७०,०००/- तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी बक्षिसे खरेदीकामी प्राप्त झालेले बंद कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	तपशील	आकार ग्राफिक्स, कोपरगांव	स्पोटर्स ट्रॉफी हाऊस, अ. नगर	इमेज एनग्रेव्हर्स, नासिक
		दर प्रती नग रु.		
१.	ट्रॉफी			
	11 इंच	**५९५/-**	६२०/-	६२५/-
	7.5 इंच	**६४/-**	७२/-	७०/-
	6.5 इंच	**५५/-**	६१/-	६०/-
	5.5 इंच	**४०/-**	५०/-	४५/-
	मेडल			
२.	2.5 इंच (लेससह)	**४२/-**	५०/-	५२/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधील वार्षिक स्नेहसंमेलन २०१६-१७ करीता बक्षिसे खरेदी करणेकामी आकार ग्राफिक्स, कोपरगांव यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

३६ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे स्वयं नियंत्रित स्कुल बेल सिस्टम खरेदीकामी प्राप्त झालेले बंद कोटेशन उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – प्रशासकीय मान्यता

प्रस्ताविक– श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळेत पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक असे एकूण तीन विभाग कार्यरत असून शाळेत एकूण २४९६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सध्याचे संगणकीय युगाचा विचार करता शाळेकडे स्वयं नियंत्रित स्कुल बेल सिस्टम खरेदी करणेकामी दि. १२.११.२०१६ रोजीचे टिपणीने रु. १५,०००/- खर्चास मंजूरी घेण्यात आली आहे व दि. २३.११.२०१६ रोजीचे टिपणीने पुरवठाधारकांकडून बंद निविदा मागविण्यात आलेल्या आहे. दि.०७.१२.२०१६ अखेर खालीलप्रमाणे बंद कोटेशन इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत.

अ.नं.	पुरवठाधारकाचे नांव	गांव	आवक नंबर
०१	साईसर इंजिनिअरींग प्रोडेक्टस्	संगमनेर	१७०५४ दि. ०३.१२.२०१६
०२	आर्यन एन्टरप्रायजेस	संगमनेर	१७०५५ दि. ०३.१२.२०१६
०३	संदीप इलेक्टॉनिक्स	संगमनेर	१७०५६ दि. ०३.१२.२०१६

मागणी- तरी उपरोक्त प्राप्त झालेले बंद कोटेशन मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे उघडून त्यामधील न्युनतम दराचे पुरवठाधारकांस आदेश देणेबाबत व स्वयं नियंत्रित स्कुल बेल सिस्टम खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:- आर्थिक खर्चाचा विषय आहे.

विभागाचा अभिप्राय- तरी मागणीप्रमाणे स्वयं नियंत्रित स्कुल बेल सिस्टम खरेदी करणेकामी आलेले बंद कोटेशन उघडणेकामी व येणा-या खर्चास मान्यता मिळणेकमी निर्णयार्थ सविनय सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे स्वयं नियंत्रित स्कुल बेल सिस्टम खरेदीकामी विद्युत विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन, फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

३७ **१६ गुंठे परिसरात रेलींग करणेकामी प्राप्त कोटेशन उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

दिनांक 30 डिसेंबर 2016 ते 2 जानेवारी 2017 या कालावधीत नाताळ सुट्या, नवीन वर्षारंभ असल्याने साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असलेने. या काळात साईभक्तांना श्रींचे दर्शन सुलभतेने होणेसाठी / गर्दीचे नियोजन करणेसाठी दिनांक 27/12/2016 रोजी '0' नंबर कक्षात मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली होती. तसेच मिटींग संपलेनंतर संस्थान परिसरात राऊंड घेण्यात आला होता. या मिटींग व राऊंडमध्ये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी गेट नं. 2 मधून दर्शनाकरीता जाणा-या साईभक्तांना दर्शन रांगेत सोडतेवेळी अडचण येऊ नये म्हणून 16 गुंठे परिसरात तातडीने रेलींग करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

कुंभमेळा 2015 करीता जुने प्रसादालय हॉलमध्ये दर्शन रांगेकरीता नवीन रेलींग तयार करुन बसविणेत आलेली होती. Time Darshan प्रणालीमुळे सदरील हॉलचा दर्शन रांगेकरीता वापर करणेत येत नाही. त्यामुळे तेथील हॉलमधील रेलींग कट करुन 16 गुंठे परिसरात बसविता येईल. मात्र सदरचे काम (जुने प्रसादालय येथून रेलींग कट करणे, वाहतुक करणे व 16 गुंठे परिसरात नव्याने रेलींग फॅब्रिकेशन करणे इत्यादी) पुर्ण करणेकरीता उरलेला कालावधी व कामाचे स्वरुप, उपलब्ध अपुरे मनुष्यबळ याचा विचार करता आऊटसोर्स पध्दतीने परिसरातील फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागवून करुन घ्यावे लागणार आहेत. याकामी अंदाजे रुपये 24,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तकामी स्थानिक फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन देणेबाबत कळविण्यात आले होते, त्यानुसार खालील फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटात कोटेशन प्राप्तझालेली आहेत :

1) मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी
2) मे. साई समर्थ फॅब्रिकेशन, साकुरी

3) मे. सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, साकुरी

उपरोक्त फॅब्रिकेटर्स यांचे बंद पाकीटात प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर प्रती नग रु.
१	मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी	**३००/-**
२	मे. साई समर्थ फॅब्रिकेशन, साकुरी	३५०/-
३	मे. सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, साकुरी	३२०/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १६ गुंठे परिसरात रेलींग करणेकामी मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी यांचे प्रती नग रु.३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

३८ नाताळ सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे दर्शन व्यवस्थेसाठी बायोमट्रीक दर्शन व्यवस्थेचे काऊंटर समोर प्लॅटफॉर्म तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुद: अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ख) अन्वये " रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजन करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच सदर कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनांसाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना: दि.२५ डिसेंबर, २०१६ ते दि.०२ जानेवारी, २०१७ अखेर ०९ दिवस नाताळ निमीत्त शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्या आहेत. याकालावधीत श्रीं चे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात साईभक्त येणार/येत असल्याने, जुने प्रसादालय हॉलचे पूर्व बाजूकडील खिडकी येथे बायोमट्रीक मोफत दर्शन प्रवेश कार्ड काऊंटर सुरु करावयाचे असल्याने, सदरहू खिडकी उंचीवर असल्याने, साईभक्तांना कार्ड घेणेसाठी आवश्यक उंचीसाठी जमिनीवर २' उंचीचा प्लॅटफॉर्म तयार करुन घ्यावा लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.नं.	तपशिल	साईज	परिमाण / एकक	कालावधी	दर	रक्कम
०१.	२४'X१२' साईजचा ॲंगल फ्रेममध्ये प्लॅटफॉर्म तयार करुन, त्यावर भक्कम असे प्लायवूड टाकुण व्यवस्था करणे तसेच सदरचे प्लॅट समोरील भागामध्ये १'X२४' साईजमध्ये साईभक्तांना जाणेसाठी पायरी तयार करणे. इत्यादीसह.	२४'X१२'	२८८ चौ. फुट	३०/१२/२०१६ ते ०१/०१/२०१७ अखेर ०३ दिवस	१६/- प्र. दि. प्र. चौ. फुट	१३,८२४./-
					एकुण पुर्णांकीत रुपये..	**१३,८२४/-**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक२२ डिसेंबर, २०१६ रोजीचे सभेत शिर्डी महोत्सव व नाताळ सुट्यांचे कालावधीत (गर्दीचे) वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती करुन घेणेस व याकामी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देणेत आली आहे.

उपरोक्त काम तातडीने पूर्ण करावयाचे असल्याने, याकामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून सिलबंद कोटेशन मागविणेत आले आहेत

१. न्यु बालाजी मंडप, निमोण
२. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
३. सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता

नाताळ सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे दर्शन व्यवस्थेसाठी बायोमट्रीक दर्शन व्यवस्थेचे काऊंटर समोर प्लॅटफॉर्म तयार करणेकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली व सदरहू कामी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील ०३ दिवसांकरीताचे एकत्रित मुळ दर रु.
१	न्यु बालाजी मंडप, निमोण	**११,२३२/-**
२	रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर	१७,२८०/-
३	सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता	१७,२८०/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, नाताळ सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे दर्शन व्यवस्थेसाठी बायोमट्रीक दर्शन व्यवस्थेचे काऊंटर समोर प्लॅटफॉर्म तयार करणेकामी न्यु बालाजी मंडप, निमोण यांचे ०३ दिवसांकरीता एकत्रित रु.११,२३२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३९ **साई धर्मशाळा निवासस्थान येथे दक्षता विभागाने सुचविलेल्या मेंन्टेनन्स कामाकरीता आवश्यक मटेरियल खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्यस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई धर्मशाळा प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन सदर प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासून साईभक्तांकरीता खुला करण्यात आला आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत प्रकल्पातील इमारतीचे बांधकाम देणगीदाखल करण्यात आले आहे. सदर इमारतीचे बांधकामाकरीता त्यांचेमार्फत ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि. दिल्ली यांची नियुक्ती करणेत आली होती. ठेकेदार यांचा कामाचा दोषदायीत्व कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आला आहे. सदरचा दोषदायीत्व कालावधी संपुष्टात आलेनंतर सदर प्रकल्पाचे व इमारतीचे मेंटेनन्स संस्थानमार्फत करण्यात येत आहे. साई धर्मशाळा येथे एकूण १९२ हॉल्स आहे.

दि.२९/०९/२०१६ रोजी दक्षता पथकामार्फत साईधर्मशाळा व परिसराची पहाणी केली असता, त्यांनी विविध विभागांच्या कामासंदर्भात सुचना दिलेल्या आहेत. त्यापैकी बांधकाम विभागामार्फत F- इमारत संडास बाथरुमच्या बाजरी काचा बसविणे तसेच प्रत्येक हॉलमध्ये कपडे अडकविण्याचे हॅंगर्स काढून योग्य जागेवर लावणेबाबत सूचना दिल्या आहेत. त्यासाठी तीन एम एम जाडीची बाजरी काच खरेदी करावी लागेल. तसेच साई धर्मशाळा येथील नोटीस बोर्डला काच बसविणेसाठी ५ एम एम जाडीची प्लेन काच खरेदी करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामापैकी हॅंगर योग्य जागेत बसविणेसाठी मॅकेनिकल विभागामार्फत सपोर्ट तयार केल्यानंतर बांधकाम विभागामार्फतयोग्य ठिकाणी बसविता येतील.

प्रस्ताव- याकामी इकडील दि.०२/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये साई धर्मशाळा येथील मेंन्टेनंन्स कामासाठी बाजरी काचा खरेदी करणेकामी रक्कम रु.२२,०७७/- मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता घेणेत आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.४४०२/२०१६ दि.२१/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये एकूण ०६ पुरवठाधारकांकडून सिलबंद कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

अ.नं.	पुरवठाराचे नांव / गांव	आवक क्र / दिनांक
१	साई ग्लास ॲल्युमिनीअम वर्क्स, साकुरी	१६९४२/०१-१२-२०१६
२	शिवम एन्टरप्रायजेस्, साकुरी	१६८३५/३०-११-२०१६
३	यशश्री ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव	१६३७१/२५-११-२०१६

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	साई ग्लास ॲल्युमिनीअम वर्क्स, साकुरी	शिवम एन्टरप्रायजेस्, साकुरी	यशश्री ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव
		कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.		
१	३ एमएम जाडीची बाजरी काच			
	साईज २०" X ४" (५०० नग)	१५,३१२.५०	१४,८७५.००	**११,९१३.१२**
	साईज ४५" X २७" (१० नग)	२,९५२.९५	२,८६८.५८	**२,२३७.४९**
२	प्लेन काच, ५ एमएम जाड (७० चौ.फुट)	३,३६०.००	३,१५०.००	---

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा निवासस्थान येथे दक्षता विभागाने सुचविलेल्या मेंन्टेनंन्स कामाकरीता प्रस्तावित मटेरियल खरेदीमधील ३ एमएम जाडीची बाजरी काच खरेदी करणेकामी यशश्री ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ५ एमएम जाडीची बाजरी काच खरेदी करणेकामी तीनपेक्षा कमी कोटेशन प्राप्त झालेले आहेत, याकरीता सदरहूकामी फेरकोटेशनची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

४० **श्री साईप्रसादालय रसोडा किचन, चपाती किचन येथील खिडक्यांना ॲल्युमिनीअम, किटक संरक्षक जाळी बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद: अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना: श्री साईप्रसालय येथील अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचेमार्फत दि.१०/०२/२०१६ रोजी तपासणी अहवालानुसार श्री साई प्रसादालयातील रसोडा किचन व चपाती किचन येथील खिडक्यांना किटक संरक्षण जाळी बसविणेबाबत सूचविण्यात आले आहे. याबाबत प्रसादालय विभागाने त्यांचे दि.०९/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये इकडेस कळविले आहे.

प्रस्ताव:- श्री साईप्रसादालय येथील, रसोडा किचन व चपाती किचन येथील खिडक्यांची मोजमापे घेऊन नमुना जाळी बसविणेत आली आहे. त्यानुसार सर्व खिडक्यांना जाळी बसविता येईल. याकामी २४,६४०/- मात्रचे अपेक्षीत खर्चास व विहित पध्दतीने मटेरीअल व मजुरीसह कोटेशन्स मागविणेस दि.२७/१०/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.क्र.४२८२ दि.१६/११/२०१६ पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले आहे. याकामी खालील पुरवठादार यांनी कोटेशन सादर केले आहे.

अ.नं.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	आवक नंबर/ दिनांक
०१	साई ग्लास ॲण्ड ॲल्युमिनीअम वर्कस् , साकुरी	१६९४०/०१/१२/२०१६
०२	शिवम एंटरप्रायजेस, साकुरी	१६८३६ /३०/११/२०१६
०३	यशश्री ॲल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव	१६३७२/२५/११/२०१६

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	साई ग्लास ॲण्ड ॲल्युमिनीअम वर्कस् , साकुरी	२१,७२८/-
०२	शिवम एंटरप्रायजेस, साकुरी	३२,४८०/-
०३	यशश्री ॲल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव	**२०,३३९/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामधील रसोडा किचन, चपाती किचन येथील खिडक्यांना २२४ चौ.फुट ॲल्युमिनीअम, किटक संरक्षक जाळी बसविणेकामी यशश्री ॲल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे एकत्रित रु२०,३३९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

४१ **संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी व पोलचे मटेरीअल खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत ...**

श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:- अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी व पोलचे मटेरीअल खरेदीकामी मा.त्रीसदस्य समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. २९८ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदणे, चैनलीक जाळीचे कंपाऊंड व गेटचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. १,३६,४६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".

वरीलप्रमाणेचे मान्यतेनुसार सप्लायर्स यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. सदरहू प्राप्त कोटेशन मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असता सप्लायर्स यांनी कोटेशन पत्रातील मागणीप्रमाणे दर न देता भिन्न स्वरुपाचे दर दिल्याने सदरहु कोटेशन प्रक्रीया रद्द करुन फेर कोटेशन मागविण्यास दि.१५/०८/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

प्रस्ताव:- त्यानुसार सप्लायर्स यांचेकडून चेनलिंक जाळी व कॉक्रीट पोल खरेदीकामी जाक्र. २९८७ दि.१०/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये फेर कोटेशन मागविणेत आले असून खालील सप्लायर्स यांनी कोटेशन सादर केले आहे.

अ.क्र.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	आवक नं. / दिनांक
०१	साई समर्थ ट्रेडर्स, साकुरी, ता. राहाता	१८७६६ दि.२२/१२/२०१६
०२	वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी ता. राहाता	१८७६७ दि.२२/१२/२०१६
०३	कृष्णा टेडर्स, साकुरी ता. राहाता	१८७६८ दि.२२/१२/२०१६
०४	माहेश्वरी स्टिल ट्रेडर्स, बाभळेश्वर ता. राहाता	१८९४३ दि.२६/१२/२०१६

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	साई समर्थ ट्रेडर्स, साकुरी, ता. राहाता	वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी ता. राहाता	कृष्णा टेडर्स, साकुरी ता. राहाता	माहेश्वरी स्टिल ट्रेडर्स, बाभळेश्वर ता. राहाता
		कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.			
०१	५ फुट उंचीची चेनलींग जाळी (जी.आय.वायर) १२ गेज (५० फुट लांबीचे १० बंडल) प्रमाणे ५०० फुट लांब ५०० किलो	२८,०००/-	२८,०००/-	२७,५००/-	२५,९९०/-
०२	काँक्रीट पोल, ६ फुट उंचीचे (साईज ४" X ४") ८५ नग	---	२२,५२५/-	१७,८५०/-	---

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी खरेदीसाठी ०४ कोटेशनधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. परंतु सिमेंट पोल खरेदीकामी फक्त दोनच कोटेशनधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, याकरीता सदरहूकामी फेरकोटेशन मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

४२ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(१) कोणत्याही प्रकारची दरपत्रके/ निविदा/ ई-निविदा उघडणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करतेवेळी, मागील दर व सध्याचा बाजारभावातील दर याचा तौलानिक तक्ता, खरेदीबाबतच्या अटी/ शर्ती याचा समावेश त्यामध्ये करणेत यावा. (कार्यवाही- सर्व अधिक्षक/ विभागप्रमुख)

---

(२) अधिनियम- २००४ मधील तरतुदीनुसार मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चाचे अधिकार देण्यात आलेले आहेत. संस्थानचे काम जलद गतीने होणेसाठी रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या खरेदीसाठीची दरपत्रके पुर्वीप्रमाणेच कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उघडणेत येऊन, पुढील कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- सर्व अधिक्षक/ विभागप्रमुख)

विषय नं.०३ **दिनांक २८.१२.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.०३ दिनांक २८.१२.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१६-१७) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल करीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७.०७.२०१५ निर्णय क्र.२३३ अन्वये रु.६५३२७६५/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले होते. त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६५२४/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त छपाई/ स्टेशनरी खरेदी करणेकामी दि.३१.०८.२०१६ मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता.यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल करीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी सोबत परिशिष्ट अ म्हणुन सादर केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधुन दरधारकास निम्नतम दरधाकास पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच ज्या छपाई स्टेशनरीसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत अशा पुरवठाधारकांना सम प्रमाणात विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा व ज्यासाठी दर आलेले नाहीत किंवा तीन पेक्षा कमी पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत अशा छपाई / स्टेशनरीकरीता फेर-ई-निविदांची मागणी करणेत यावी, असा निर्णय झालेला होता.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात दि.११.१०.२०१६ रोजीचे दैनिक सामना-पुणे, आपला वार्ताहार-मुंबई, दै.पुण्यनगरी-औरंगाबाद, दै.दिव्य मराठी-नाशिक, दि.१२.११.२०१६ रोजीचे दै.पुढारी-अहमदनगर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.१५/१०/२०१६ ते ३१/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर हार्डकॉपी निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०३/११/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती.छपाई व स्टेशनरीचे जास्त ॲटम असल्यामुळे सदरचे विक्रीची मुदत दुस-यांचा दि.०७.११.२०१६ व तिस-यांदा दि.१४.११.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यानुसार निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. तसेच सदर खरेदीकामी तांत्रिक निविदांची Hard Copy संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०६ निविदा प्राप्त झालेली असून, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

प्राप्त ०६ तांत्रिक निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे–

Sr. No.	Name of Tenderer	Received Date	Received Place
1	M/s.Classic Stationers co., Mumbai	31/10/2016	Shirdi
2	M/s.Shri Ganesh Enterprises, Nashik	31/10/2016	Shirdi
3	M/s.Printwell Printers, Malegaon	31/10/2016	Shirdi
4	M/s. Krishna enterprise, Ahmedabad	04/11/2016	Shirdi
5	M/s.Rohan Printers & Stationary, Aurangabad	04/11/2016	Shirdi
6	M/s.Shri Gajanan offset, Kopargaon	07/11/2016	Shirdi

तरी उपरोक्त खरेदीकामी निविदाधारकांनी दिलेल्या ०६ तांत्रीक सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सामान्य प्रशासन शाखेकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/२०१६ दि.१९/०१/२०१६ अन्वये संस्थान अंतर्गत असणा-या विविध विभागांसाठी आवश्यक साहित्य / कामासाठी शासन निर्णयानुसार खरेदी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. ऑनलाईन तांत्रिक निविदा उघडून तांत्रिक निविदेमध्येतीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारक प्राप्त ठरले, तर लगेचच मुळ निविदा उघडून घेता येतील.

वरील खरेदीकामी प्राप्त झालेल्या व ऑनलाईन प्राप्त झालेल्या छपाई स्टेशनरी २०१६-२०१७ फेर तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१६-१७) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो आय.सी.यु. विभागासाठी लागणारे Syringe Pump खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.८७० अन्वये श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो आय.सी.यु.या विभागाकरिता लागणारे Syringe Pump विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.९,१८,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२०/०२/२०१५ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन चार निविदा प्राप्त झालेल्या होत्या. परंतु Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकल्या नाहीत, त्यामुळे दि.२३/१०/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा फेर ई-निविदा मागविण्यास मंजुरी घेऊन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२१/०८/२०१६ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी चार ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो आय.सी.यु.या विभागाकरिता लागणारे Syringe Pump खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो आय.सी.यु. विभागासाठी लागणारे Syringe Pump खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन सर्जिकल आय.सी.यु. विभागासाठी लागणारे Syringe Pump खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.८६९ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.९,१८,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२०/०२/२०१५ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. परंतु Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकल्या नाहीत, त्यामुळे दि.२३/१०/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा फेर ई-निविदा मागविण्यास मंजुरी घेऊन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२१/०८/२०१६ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी तीन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन सर्जिकल आय.सी.यु. विभागासाठी लागणारे Syringe Pump खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईनाथ रक्तपेढी व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता विविध प्रकारच्या मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रक्तपेढी व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता खालील मशिनरी व उपकरणे खरेदीस व खर्चास विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद ई-निविदा मागवुन खरेदी करणेस मा. त्रिसदस्य समिती सभेची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे –

Tender Sr. No.	M.C. Res. No. – Date & Hon. Court Sanction No. - Date	Subject	App. Estimated Cost in Rs.
A	निर्णय क्र.३९८ - दि.२७/१०/२०१५ सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०७२ दि.१२/०२/२०१६	श्री साईबाबा रुग्णालयातील सि.व्ही.टी.एस.ओ.टी.नं. २ करीता Imported Operation Table with Accessories खरेदी करणेबाबत.	३५००००.००
B	निर्णय क्र.१७१- दि.१६/०२/२०१६	श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Deep Freezer खरेदी बाबत.	४००००.००
C	निर्णय क्र.६३- दि.१८/०२/२०१५ सिव्हील ॲप्लीकेशन नं.८३३५ दि.२४/०७/२०१६	श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागाकरीता CNS System with Monitor & All Accessories खरेदीबाबत.	४२५००००.००
		एकुण रक्कम रु.	**८१५००००.००**

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळ www.mahatenders.gov.in यावर दि.०६/०६/२०१६ ते दि.२७/०६/२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. तांत्रिक निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे स्विकारण्याची अंतिम तारीख दि.२९/०६/२०१६ अशी ठेवण्यात आलेली होती.

त्यास अनुसरुन वरील खरेदीकामी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

Sr.No.	Name of Tenderer	Tender Received Date
	Tender – A श्री साईबाबा रुग्णालयातील सि.व्ही.टी.एस.ओ.टी.नं. २ करीता Imported Operation Table with Accessories खरेदीकामी प्राप्त ई-निविदा.	
01	Austin Health Care, Pune	28/06/2016
02	Axenic Labs Pvt.Ltd., Nashik	28/06/2016
03	Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai	27/06/2016
04	Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai	28/06/2016
05	Mediconz International, Mumbai	29/06/2016
06	South India Surgical Co.Ltd., Chennai	28/06/2016
07	Warden Surgical Co.Pvt.Ltd., Navi Mumbai	27/06/2016

Tender – B श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Deep Freezer खरेदीकामी प्राप्त ई-निविदा.		
01	Austin Health Care, Pune	28/06/2016
02	JK Sales & Services, Aurangabad	21/06/2016
03	Rattan Sales Corporation, New Delhi.	27/06/2016
04	Siddhi Medical Distributors, Aurangabad	21/06/2016
05	Vidhi Sales, Dhule	28/06/2016
Tender – C श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु.विभागाकरीता CNS System with Monitor & All Accessories खरेदीकामी प्राप्त ई-निविदा.		
01	Allengers Glonal Healthcare Pvt.Ltd., Chandigarh	27/06/2016
02	Austin Health Care, Pune	28/06/2016
03	Axenic Labs Pvt.Ltd., Nashik	28/06/2016
04	Care Mediquip, Silvassa.	28/06/2016
05	Excel Corporation, Nashik	28/06/2016
06	Wipro GE Healthcare Pvt.Ltd., Pune	27/06/2016

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्यलेखाधिकारी, प्र.वैद्यकिय संचालक तसेच बायोमेडिकल इंजिनियर यांनी संस्थान रुग्णालयांकरीता विविध प्रकारच्या मशिनरी/ उपकरणे खरेदी करतेवेळी त्यांच्या तांत्रिक निविदा उघडणेसाठी या क्षेत्रातील तज्ञांची समिती तयार करावी व यापुढे सदरहू खरेदीप्रक्रियेमधील तांत्रिक निविदा या तज्ञ समितीपुढे उघडणेत येऊन, दरांबाबच्या निविदा उघडतेवेळी तांत्रिक निविदांचा अहवाल त्यासोबत सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०५ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता 10KVA यु.पी.एस. खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.०७/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग १० KVA यु.पी.एस. ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे वापरत असलेला यु.पी.एस. हा वापरुन खराब झालेला आहे व तो दुरुस्तीसाठी लागणारे स्पेअर पार्ट उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यांनी नविन यु.पी.एस.ची दि.०७/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१४/०५/२०१५) मागणी केलेली आहे.

सदरहू खरेदीकामी M/s.Microtronics, Aurangabad यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार M/s.Microtronics, Aurangabad यांनी दि.२२/०५/२०१५ चे ई-मेल अन्वये १० KVA यु.पी.एस.चे दर कळविलेले असून सदर खरेदीकामी अंदाजे रु.3,93,750/- (अक्षरी रु.- तीन लाख त्र्यान्नव हजार सातशे पन्नास मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

Sr. No.	Description	Qty.	Rate per inRs.	Total Amt. in Rs.
01.	10 KVA UPS – Input & Output -3 Phase	01	393750.00	393750.00
		Total Amt. in Rs.		**393750.00**

दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.२०४(२८) अन्वये उपरोक्त एक नग १० KVA यु.पी.एस. महाराष्ट्र शासनाचे दर सूचीनसार खरेदी करण्यात यावा, असे ठरले होते. परंतू महाराष्ट्र शासनाचे दि.30/10/2015 चे आदेशान्वये शासनाचे दर करारानूसार खरेदी करण्यात येऊ नये असे ठरलेले आहे. त्यामुळे सदर एक नग १० KVA यु.पी.एस. खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी – नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद– मुंबई या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते दि.२७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०५ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. परंतू संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेली असून, मुंबई कार्यालयात एक निविदा प्राप्त झालेली असून उर्वरीत ०१ निविदाधारकाची तांत्रिक निविदा प्राप्त झालेली नाही. प्राप्त ०४ निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे –

Sr.No.	Name of Tenderer	Received Date	Received Place
1	M/s. Micronics Systems & Services, Nashik	30/01/2016	Shirdi Office
2	M/s. Tejas Electronice, Ahmednagar	29/01/2016	Shirdi Office
3	M/s. SV Electronics, Nashik	29/01/2016	Shirdi Office
4	M/s. RSP Power Solutions, Mumbai	28/01/2016	Mumbai Office

उपरोक्त ०५ निविदाधारकांनी Upload केलेल्या Online निविदा तसेच ०४ तांत्रीक सिलबंद दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यामध्ये M/s. Prasa Infocom And Power Solutions Pvt. Ltd., Pune यांनी Online तांत्रिक निविदा ही Upload केलेली आहे परंतू त्यांनी त्याची Hard Copy दिलेली नाही. तसेच त्यांनी निविदेसोबत अनामत रक्कम व निविदेची किंमतीचे डी.डी. देखील दिलेले नाहीत.

तसेच M/s.Tejas Electronics, Ahmednagar यांनी Online निविदा भरताना Technical Specification compliance दिलेला नाही तर उर्वरीत तीन निविदाधारकांपैकी M/s. RSP Power Solutions, Mumbai व M/s. Micronics Systems Services, Nashik यांनी निविदेमध्ये Single Phase यु.पी.एस. चे दर दिलेले आहेत तर M/s. SV Electronics, Nashik यांनी एकट्यानेच 3 Phase यु.पी.एस. चे दर दिलेले आहेत. त्यामुळे M/s. SV Electronics, Nashik यांची एकमेव निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र आहे.

खरेदीकामी कमीत कमी ०३ निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.०९/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.०६/०९/२०१६ ते २१/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०९/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकुण पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक ई-निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन कॅथलॅब मशिन देणगी स्वरुपात मिळणार असलेबाबतची माहिती वैद्यकिय संचालक यांनी सभेस दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन कॅथलॅब मशिन खरेदीकामीची ई-निविदा प्रक्रिया चालु केलेली असल्यामुळे सदरहू विषय रद्द करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.१ करीता Instrument खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CTVS O.T. या विभागाने मागणीपत्रकान्वये Instrument ची मागणी केलेली आहे. श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डियाक ओ.टी. या विभागात दैनंदिन हृदयाच्या शस्त्रक्रिया होतात. (उदा.A.S.D., V.S.D., बायपास, व्हॉल्व रिप्लेसमेंटचे) सदरचे ऑपरेशन हे हृदयाशी निगडीत असते. छातीचे दोन भाग करुन सदर ऑपरेशन केले जाते. सदर ऑपरेशनच्या वेळेस Instruments ची अत्यंत आवश्यकता असते.

सदर Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. South India Surgical Co. Ltd., Mumbai यांचेकडून ई-मेलव्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. South India Surgical Co. Ltd., Mumbai यांचे दरानुसार उपरोक्त Instrument खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४,०८,३७५/- (अक्षरी रुपये - चार लाख आठ हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३९५ अन्वये उपरोक्त Instrument विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.४,०८,३७५/- (अक्षरी रुपये- चार लाख आठ हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र) इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०१/१०/२०१६ ते दि.२२/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/१०/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०५ निविदाधारकांनी ऑनलाईन ई-निविदा Upload केलेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.नं.१ करीता Instrument खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.नं.२ करीता Cautery Machine खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस. ओ.टी नं.2 मध्ये दि.१०/०३/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील Cautery Machine जळाल्यामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.11/05/2015 (औषध भांडार प्राप्त दि.14/05/2015) चे मागणी पत्रकान्वये 1 नग Cautery Machine ची मागणी केलेली आहे.

सदर Cautery Machine खरेदीकामी M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानूसार सदर Cautery Machine खरेदीकामी अंदाजे रु.५,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. खराब झालेल्या Cautery Machine ची विमा पॉलीस काढण्यात आलेली असल्यामुळे सदर Cautery Machine खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमापॉलीसी कडून परत मिळणार आहे.

उपरोक्त ०१ नग Cautery Machine विहित पध्दतीने ई - निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.५,५०,०००/- चे खर्चास दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३९१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार दैनिक दबंग दुनिया – मुंबई, पुण्यनगरी – नाशिक, सामना - पुणे, सामना – औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०३ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या असून, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही, तसेच Upload केलेल्या ३ निविदाधारकांपैकी एका निविदाधारकाची प्रत्यक्षात तांत्रिक निविदा प्राप्त झालेली नाही. Upload केलेल्या ०३ निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे –

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai	29/01/2016
2	M/s. Austin Healthcare, Pune	29/01/2016
3 व	M/s. Aditi Enterprises, Nashik	30/01/2016

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तथापि वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai यांनी प्रत्यक्षात निविदेची Hard Copy दिलेली नाही, तसेच Online Upload निविदेमध्ये Machine चा Technical Compliance दिलेला नाही. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरवावी लागणार आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा पात्र ठरतात, तसेच खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.०९/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.०६/०९/२०१६ ते २१/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०९/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण ०९ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकुण तीन ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.नं.२ करीता Cautery Machine खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Instrument खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाने मागणीपत्रकान्वये Instrument ची मागणी केलेली आहे. Neuro O.T. या विभागामध्ये मेंदूच्या वेगवेगळया शस्त्रक्रिया (उदा. मणक्याच्या, मानेच्या, मेंदूच्या इ. शस्त्रक्रिया) करण्यात येत असून दिवसेंदिवस राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे ऑपरेशनची संख्या वाढलेली आहे. मेंदूच्या ऑपरेशनसाठी वेगवेगळया Instrument ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे ८ – ९ वर्षापूर्वी खरेदी केलेले होते व ते वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करताना अडचणी निर्माण होतात त्यामुळे त्यांनी नवीन Instruments ची मागणी केलेली आहे.

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४०३ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता अ व ब प्रस्तावात नमुद केलेले Instrument विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.४,१९,०९६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०१/१०/२०१६ ते दि.२२/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/१०/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०५ निविदाधारकांनी ऑनलाईन ई-निविदा Upload केलेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Instrument खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, या अहवालासह पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा उघडणेसाठीचा प्रस्ताव पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९ **श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण या विभागाकरीता Leed Sheet व Lead Glass खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयातील क्ष किरण विभागात दि. ०३/११/२०१४ रोजी B.A.R.C.चे तंत्रज्ञांनी पहाणी केली होती त्यामध्ये त्यांनी क्ष किरण विभागात काही बदल सुचविले आहेत. सदर बदल हे संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यामध्ये एका दरवाजाचे Leed Sheet वापरून थटर बसवायचे आहे तसेच भिंतीला एक खिडकी करून तेथे Leed Glass बसविणेबाबत सुचविले आहे. दरवाजाचे शटरला बसविणेकरीता 0.89m x 2.11m मापाचे एक Lead Sheet तसेच 0.6m x 0.6m मापाची एक Lead Glass खरेदी करून उपलब्ध करून देणेबाबत बांधकाम विभागाने त्यांचे पत्र क्र.जा.क्र.२९८, दि. ०१/१२/२०१४ अन्वये कळविले होते.

दि.१७/०५/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण व साईबाबा रूग्णालयातील सि.टी. स्कॅन या विभागाकरिता Lead Sheet हे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. ७६,३७७/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती.त्यानुसार इकडील पत्र क्र. १६०दि. ०९/०४/२०१५ अन्वये एकूण ११ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि. २०/०४/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१३६० दि. २६/०९/२०१६ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि. १५/१०/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे: -

Sr. No.	Name of Supplier	Received Date
1	M/s Anita Medical Systems Pvt.Ltd., Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१०/२०१६
2	M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१० /२०१६
3	M/s. The X-Ray Shop, Delhi	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१०/२०१६

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

Sr. No.	Name of Supplier	Rate per in Rs.
1	M/s Anita Medical Systems Pvt.Ltd., Mumbai	१६,९१८/-
2	M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik	१९,१५०/-
3	M/s. The X-Ray Shop, Delhi	**११,९२५/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण या विभागाकरीता Leed Sheet व Lead Glass खरेदी करणेकामी M/s. The X-Ray Shop, Delhi यांचे एकत्रित रु.११,९२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Biopolar Cable व Biyonet Forcep खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाने Biopolar Cable व Biyonet Forcep ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

Neuro O. T. या विभागामध्ये मेंदूच्या शस्त्रक्रिया करतांना सदर Bipolar Cable ला Bayonet forcep जोडण्यात येत असते.ऑपरेशनच्या वेळेस मेंदूचे रक्तस्त्राव होत असतो. सदर Bayonet forcep हे जेथून रक्तस्त्राव होत आहे तेथील शीर दाबून रक्त पुरवठा थांबविण्याचे काम करते. जेणेकरुन ऑपरेशन करण्याच्या वेळेस पेशंटचे जास्त रक्तस्त्राव होत नाही व पेशंटच्या जीवला धोका उद्भवू शकत नाही.उपरोक्त Biopolar Cable व Biyonet Forcep खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २८,०००/- मात्र इतका खर्च येणार आहे.

दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील मंजुर टिपणीअन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरिता Biopolar Cable व Biyonet Forcep विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. २८,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार इकडील पत्र क्र. २४७३, दि. ०९/१२/२०१५ अन्वये एकूण ०५ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि३१/१२/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१०५४ दि. २२/०८/२०१६ अन्वये एकूण १७ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि १५/०९/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०५ सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे **: -**

Sr. No.	Name of Supplier	Received Date
1	M/s. Vishal Surgical Equipment Co. Pvt..Ltd., Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/०९/२०१६
2	M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१४/०९ /२०१६
3	M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०८/०९/२०१६
4	M/s. PSI Marketing Pvt.Ltd., Nagpur	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२५/०८/२०१६
5	M/s. Aarya Enterprises, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१५/०९/२०१६

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

S. N.	Description	Qty.	Make	Total Amt. in Rs.	Warranty
1	**Bipolar Cable Cord**	**30**			
1	**M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur**	-	**Girish**	**24270.00**	**6 Month**

2	M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai		Bipolar Cable 3M. With 4mm. Plugs. Sili cone.	38850.00	1 Year
3	M/s. Aarya Enterprises, Pune		Bipolar Silicon Cable Autoclavable aisco	51511.00	1 Year
4	M/s.Purnima Surgical Enterprises, Nashik			70500.00	
5	M/s. Vishal surgical Equipment Co. Pvt. Ltd., Mumbai	-	KLS MARTIN _ Germany Bipolar Cable, Small Coax 3M	195000.00	1 Year
2	**Bipolar Bayonet Forcep Simple**	**10**			
1	**M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur**	-	**Girish**	**12130.00**	**6 Month**
2	M/s. Aarya Enterprises, Pune		Bipolar Blue Fprceps Bayonet 1.5 tip 18CM/7"Aisco	47818.00	1 Year
3	M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai		Bipolar. Bynt. 1.5mm. Tips. 19cm/7.5".	54600.00	1 Year
4	M/s.Purnima Surgical Enterprises, Nashik			63000.00	Not given
5	M/s. Vishal surgical Equipment Co. Pvt. Ltd.,Mumbai		KLS MARTIN _ Germany Bipolar FCPS., Bay.,BL.,2.0MM, 18CM	175000.00	1 Year
3	**Bipolar bayonet forcep micro**	**10**			
1	**M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur**	-	**Girish**	**10520.00**	**6 Month**
2	M/s. Aarya Enterprises, Pune		Bipolar Blue Fprceps Bayonet 1 tip 15CM/6"Aisco	47818.00	1 Year
3	M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai		Bynt. 1mm. Tips. 19cm/7.5".	54600.00	1 Year
4	M/s.Purnima Surgical Enterprises, Nashik			63000.00	Not given
5	M/s. Vishal surgical Equipment Co. Pvt. Ltd., Mumbai		KLS MARTIN _ Germany Bipolar FCPS., Bay.,SH.,0.3 MM, 16CM	185000.00	1 Year

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Biopolar Cable व Biyonet Forcep खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनापुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

११ श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ ओ.टी. मधील जुन्या गाद्या दुरुस्त करुन घेणेबाबतचे प्राप्त बंद कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले होते.

सदर लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक २७/१०/२०१५ नि.क्र.४०० अन्वये रु.३,८४,५२१/-(तीन लाख चौ-याऐंशी हजार पाचशे एकवीस मात्र) इतक्या रकमेचे लिनन जाळुन नष्ट केलेले असुन, सदर लिननमध्ये वॉर्ड/ ओ.टी च्या फाटलेल्या ८३ नग गादया जमा झालेल्या होत्या, सदर गादया २००५-२००६ मध्ये रु.४८३७/- प्रती नगाप्रमाणे खरेदी केलेल्या होत्या. वॉर्डमध्ये रोजच्या वापराने व पेशंटचे रक्ताने सदर गादयांचे फोम खराब झालेले आहे त्यामुळे २० गादयांचा दुर्गंध येत असल्याने त्या जाळुन नष्ट केल्या असुन उर्वरीत ६३ नग गादया

जमा आहेत त्यापैकी काही गादया कमी प्रमाणात फाटलेल्या आहेत तर काही जास्त प्रमाणात फाटलेल्या आहेत त्यामुळे ६३ नगांपैकी ज्या गादयांचे फोम जास्त खराब झालेले असेल तर त्याचे फोम बदलुन किंवा ६३ पैकी ज्या गादयांचे मटेरीयल वापरता येण्यासारखे असेल ते वापरुन गादयांचे फोम व रेक्झीन बदलुन सदर गादया दुरुस्त करून वॉर्डमध्ये वापरता येतील व उर्वरीत गादया जाळुन नष्ट करण्यात येतील.

यापुर्वी श्री साईबाबा हॉस्पिटलचे सोफा दुरुस्तीचे काम मे.कृष्णा फर्निशींग,राहाता यांनी केलेले असल्याने गादया दुरुस्ती करीता अंदाजे खर्च किती अपेक्षीत आहे याकरीता त्यांना गादया दाखविण्यात आलेल्या आहेत त्यांनी गादया दुरुस्ती करीता लागणारे मटेरीयल व येणारा अंदाजे खर्चाचे कोटेशन दिलेले आहे त्याप्रमाणे एका गादीला दुरुस्ती करीता रु.२१५५/- खर्च अपेक्षीत आहे. एकुण ५० नग गादी दुरुस्ती करीता रु.१,०७,७५०/- इतका खर्च अपेक्षीत आहे त्यामुळे गादया दुरुस्त करणेकरीता इ.पत्र क्र.१४१४ दि.०५/१०/२०१६ अन्वये एकुण ९ पुरवठाधारकांकडुन दि.१७/१०/२०१६ अखेर कोटेशन पत्र मागविण्यात आले होते त्यास अनुसरुन एकुण ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत ते खालीलप्रमाणे.

अ.नं.	पुरवठाधारकाचे नाव	प्राप्त दिनांक	प्राप्त स्थिती
१	मे.साईराज कुशन,निघोज	१३/१०/२०१६	बंद स्थिती
२	मे.प्रगती कुशन, राहाता	१३/१०/२०१६	बंद स्थिती
३	मे.कृष्णा फर्निशींग,राहाता	१३/१०/२०१६	बंद स्थिती

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे,त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.३०ऑक्टोबर २०१५ अन्वये-परिच्छेद ३.२.३- खरेदी रु.५००० ते ३ लाखापर्यंत असेल तेव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधीत खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
१	मे.साईराज कुशन,निघोज	१,०४,२५०/-
२	मे.प्रगती कुशन, राहाता	६९,२५०/-
३	मे.कृष्णा फर्निशींग, राहाता	**६४,२५०/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ ओ.टी. मधील ५० नग जुन्या गाद्या दुरुस्त करुन घेणेकामी मे.कृष्णा फर्निशींग, राहाता यांचे एकत्रित रु.६४,२५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता Consumable Material खरेदी करणेसाठी प्राप्त झालेले कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाने विविध प्रकारच्या Consumable Material ची मागणी मागणीपत्रकान्वये केलेली आहे.

New Surgical I.C.C.U या विभाग हे नव्याने सुरु होत असल्यामुळे त्यांनी सर्व नवीन मटेरियलची मागणी केली आहे. तसेच G.I.C.U. व I.C.C.U या विभागातील मटेरियल Consumable असल्यामुळे ते खराब झाल्यामुळे त्यांनी नवीनची मागणी केली आहे. सदर मटेरियल शिल्लक नसल्यामुळे नवीन खरेदी करावे लागणार आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

Sr. No.	Name of Department	Bed Pan			X - ray View Box (Double Screen)			Plastic Urine Pot			Plastic Bucket		
	M/s. Farmachem Enterprises, Pune	Expo india	6750.00	6 Month
	M/s. S.S. Scientfic Co., Dhule	6"X2.5"	7329.25	1 Year
	M/s. S.S. Scientfic Co., Dhule	8"X3"	7548.00	1 Year
	M/s. Lab-Hosp Instruments & Equipment Mfg Co., Mumbai	6"X2.5"	8000.00	1 Year
	M/s. Lab-Hosp Instruments & Equipment Mfg Co., Mumbai	8"X3"	8295.00	1 Year
	M/s. Labline Stock Centre, Mumbai	6"X2.5"	9460.00	1 Year
	M/s. Labline Stock Centre, Mumbai	8"X3"	9648.00	1 Year

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology या विभागाकरीता ०१ नग Tissue Floting Bath खरेदीकामी M/s. R.S. Enterprises, Pune यांचे एकत्रित रु.५,०५१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२६ **श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडिकल वॉर्ड या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडिकल वॉर्ड या विभागाने दि.१९/०८/२०१४ रोजीचे मागणी पत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.११/०९/२०१४) एक नग Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेला Monitor व्यवस्थित काम देत नाही. रुग्णालयात ॲडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलांचे नियमित निरीक्षण करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर रुग्णांवर योग्य ते उपचार पद्धती ठरवु शकतात. नविन एक Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०६/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.९८० अन्वये ०१ नग Multiparameter Monitor विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.३,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार आपला वार्ताहर मुंबई, पुढारी – पुणे, दिव्य मराठी - नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन – अहमदाबाद, हितवाद– नागपूर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०४ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते दि.१८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Austin Health Care, Pune	19/02/2015

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी दि.२७/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर ई निविदा मागविण्यास मान्यता घेऊन वर्तमान वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/१०/२०१५ ते दि.२४/१०/२०१५ पर्यंत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेरपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Austin Health Care, Pune	26/10/2015

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा वर्तमान जाहिरात देऊन देखील एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी दि.२४/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन वर्तमान वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१५/०२/२०१६ ते दि.०५/०३/२०१६ पर्यंत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेरपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Shree Enterprises, Nagpur	08/03/2016
2	M/s. Excel Corporation, Nashik	08/03/2016
3	M/s. Austin Health Care, Pune	08/03/2016

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे तिस-यांदा जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	ई-निविदाधारकाचे नाव	ई-निविदेमधील मुळ दर रु.
1	M/s. Shree Enterprises, Nagpur	**१,८५,०००/-**
2	M/s. Excel Corporation, Nashik	७,९५,०००/-
3	M/s. Austin Health Care, Pune	२,१०,२००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडिकल वॉर्ड या विभागाकरीता ०१ नग Multiparameter Monitor खरेदीकामी M/s. Shree Enterprises, Nagpur यांचे रु.१,८५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२७ **श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser या मशिनकरीता लागणारे लॅब केमिकल्स मंजुरदराने खरेदी करणेबाबत.**

दि.१३/०१/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे M/s.Galaxy Medical Devices Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून Roche कंपनीचे मॉडेल Cobas 221 हे मशिन रु.९,५६,२५०/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणारे केमीकल्स तक्त्यात नमुद केलेल्या दराप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता खरेदी करण्यात यावे असे ठरलेले आहे.

वरीलप्रमाणे ठरावास अनुसरुन M/s.Galaxy Medical Devices Pvt.Ltd., Mumbai यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ वशी/ एसएसबीएच/ स्टोअर (पी/एस)६१८१/२०१२ दि.२३/०२/२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार M/s.Galaxy Medical Devices Pvt.Ltd., Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मागील पाच वर्षापासुन मशिन व्यवस्थित कार्यान्वित असून ठरावातील मंजुर दरानुसार त्यांनी आवश्यकतेनुसार केमीकल्सचा पुरवठा केलेला आहे. तथापि ठरावानुसार त्यांचेकडून केमीकल्स खरेदी करावयाचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये Fully Automatic Blood Gas Analyser Machine करीता लागणा-या लॅब केमीकल्सचा समावेश करण्यात आलेला असून सदरहू प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन केमीकल्स उपलब्ध होण्यास कमीत कमी ३-४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे प्रयोगशाळा विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून तुर्तास त्यांना आवश्यक असणारे लॅब केमीकल्स M/s.Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai यांना जा.क्र.एसएसएस/ वशी/एसएसबीएच/ स्टोअर(पी/एस)/६१८१/२०१२ दि.२३/०२/२०१२ अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Name of Item	Required Qty.	Sanctioned Rate per in Rs.	Total in Rs.
01	S1 Rinse Solution	21	17600.00	369600.00
02	S2 Fluid Pack	39	27787.50	1083712.50
03	S3 Fluid Pack	28	17100.00	478800.00
04	MSS Cassette (Glu/Lac/Urea)	7	4275.00	29925.00
05	Printer Paper OMNI/OMNI S (Pack of 6 PC)	21	810.00	17010.00
		Total Amt.in Rs.		**1979047.50**

वरीलप्रमाणे लॅब केमीकल्स मंजुर दराने खरेदीस पुर्णांकित रक्कम रु.१९,७९,०४८/- (अक्षरी रु.एकोणावीस लाख एकोणऐंशी हजार अठ्ठेचाळीस मात्र) इतका खर्च येईल.

तसेच Roche कंपनीच्या Fully Automatic Blood Gas Analyser Machine करीता त्याच कंपनीचे केमीकल्स वापरावे लागतात.

तरी श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser Machine करीता वरील तक्त्यात नमुद केलेले लॅब केमीकल्स मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.१९,७९,०४८/- (अक्षरी रु.एकोणावीस लाख एकोणऐंशी हजार अठ्ठेचाळीस मात्र) चे खर्चाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser या मशिनकरीता आवश्यक असणारे प्रस्तावित लॅब केमिकल्स मागील मंजुर दराने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.१९,७९,०४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२८ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.I व II या विभागाकरीता Surgical Instrument खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I या विभागाने दि. २८/१०/२०१४ आणि CVTS O.T. II या विभागाने दि.२९/१०/२०१४ रोजीच्या मागणी पत्रकान्वये काही Instrument ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतानी अडचणी निर्माण होतात.

सदर Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडून ई- मेलव्दारे दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांनी त्यांचे दि.०१/०१/२०१५ रोजीचे ई- मेलपत्रान्वये दर कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

Sr. No.	Description	CVTS O.T. I	CVTS O.T. II	Total Qty.	App. Rate Per in Rs.	App. Total Amt. in Rs.
1	Stilli Scissor 8”	12	12	24	845.00	20280.00
2	Staut Scissor Curved 8”	12	12	24	710.00	17040.00
3	Needle Holder 2-0	12	12	24	3020.00	72480.00
4	Needle Holder 3-0	12	12	24	3020.00	72480.00
5	Tubing Clap 8”	12	12	24	2535.00	60840.00
					App. Total Amt. in Rs.	**243120.00**

दि.०५/०५/२०१५ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढील विषय नं.२ निर्णय क्र. १४४ (२२) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT I व II या विभागाकरिता Surgical Instrument विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.२,४३,१२०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ४७ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१५/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०२/०७/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेली आहे, मुंबई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Vishal Surgical Equipment Co. Pvt. Ltd., Mumbai	30/06/2015
2	M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur	02/07/2015
3	M/s. Austin Healthcare, Pune	03/07/2015
4	M/s. Seva Medical Equipment, Pune	04/07/2015

उपरोक्त पैकी अ.नं. ०३ व ०४ यांच्या निविदा मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आहेत, परंतु तुलनात्मक दर मिळणेचे दृष्टीने त्यांचा विचार करण्यात येऊन प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक सिलबंद निविदा मा वैद्यकीय संचालक यांचे समोर दि.०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत.

सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यांच्या कमर्शियल निविदा उघडण्यात आलेल्या नाहीत. कारण रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने दि.१९/०९/२०१५ रोजी Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे दि.१०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यामुळे दि.०३/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये खरेदीकामी पुन्हा दैनिक सामना – औरंगाबाद, गावकरी – नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय दोन्ही मिळून ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur	08/03/2016
2	M/s.Warden Surgical Co.Pvt.Ltd.,Navi Mumbai	08/03/2016
3	M/s. Austin Healthcare, Pune	08/03/2016
4	M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai	08/03/2016
5	M/s. Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune	05/03/2016
6	M/s. Visionary Medtech Solutions Pvt.Ltd., Ahmedabad	04/03/2016

वरीलप्रमाणे खरेदीकामी जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून प्राप्त निविदाधारकांना Demo देणेकामी दि.१३/०४/२०१६ ते १४/०४/२०१६ रोजी हॉस्पिटलमध्ये (ठिकाण – नविन सर्जिकल आयसीयु) बोलविण्यात आले होते, त्यानुसार दि.०७/०४/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये संबंधित विभागातील सर्जिकल इन्स्ट्रुमेंटचा वापर करणारे डॉक्टर व संबंधित कर्मचारी यांनी Demo साठी हजर राहून तसेच त्यांनी दिलेल्या Demo बाबतचा अभिप्राय औषध भांडार विभागाकडे देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधित विभागाचा अभिप्राय वेळेत प्राप्त न झाल्यामुळे दि.२७/०४/२०१६ व दि.१७/०५/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये स्मरणपत्र देण्यात आले होते, त्यास अनुसरुन संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०६ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.१५/०७/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत, त्यावर दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५८३ (२) अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I व II या विभागाकरीता प्रस्तावित Surgical Instrument खरेदीकामी M/s. Warden Surgical Co.Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे एकत्रित रु.५०,७४९.४४ मात्र निम्नत्तम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आलेली आहे, तथापि प्रत्यक्षात तुलनात्मक दरांचे तक्त्यात प्रत्येक साहित्याकरीता स्वतंत्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत व त्यानुसार M/s. Warden Surgical Co.Pvt.Ltd., Navi Mumbai यांना रक्कम रु.३३,४१५.२० इतक्या रक्कमेचा व M/s.Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune यांना रक्कम रु.१४,४००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश द्यावा लागेल.

तरी दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८३ (२) मध्ये बदल करुन प्रत्यक्षात तुलनात्मक दरांचे तक्त्यात प्रत्येक साहित्याकरीता स्वतंत्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत व त्यानुसार M/s. Warden Surgical Co. Pvt. Ltd., Navi Mumbai यांना रक्कम रु.३३,४१५.२० इतक्या रक्कमेचा व M/s. Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune यांना रक्कम रु.१४,४००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.I व II या विभागाकरीता Surgical Instrument खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे करणेत आलेल्या कार्यवाहीस व त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२९ **सोनोग्राफी मशिनचा प्रोब दुरुस्तीबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयाकरीता वरील संदर्भ क्र. 01 अन्वये मे. विप्रो जीई मेडीकल सिस्टीम प्रा. लि. मुंबई यांचेकडूनUltra Sound Machine हे मशिन (दोन प्रोबसहीत) एकुण रू. 6,00,000/-इतक्या रकमेचे श्री अशोक मिरपुरी यांचेकडुन देणगी दाखल प्राप्त झाले आहे. सदर मशिन दि. 11/12/2009 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असून मशिनचा एक वर्षाचा वॉरंटी कालावधी 10/12/2010 रोजी संपला आहे. मशीनचे नियमीत दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2017 या कालावधीकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता लागणारे सर्व स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार असुन कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट (Probe UPS, Batteries Accessories & Consumables इत्यादी) ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या सोनोग्राफी मशिनचा प्रोब व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र. क्र.20, दि. 10/10/2016 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर प्रोबची तपासणी केली असता सदर प्रोब सततच्या वापरामुळे खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर मशिन नियमीत वापरात असुन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी मशिनचे पुरवठाधारक कंपनी मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि. पुणे यांचेकडे प्रोब दुरूस्ती करीता विचारणा केली असता कंपनीने सदर प्रोब दुरूस्त होत नसल्यामुळे नवीन प्रोब करीता त्यांचे पत्र क्र.QTN/ APTGE/ USG/370/NA/16-17, दि. 22/11/2016 अन्वये रू.2,36,250/-चे कोटेशन पाठविले आहे.

परंतु अशा प्रकारचे प्रोब दुरूस्त करणाऱ्या मे. श्री साई मेडीकल सिस्टीम,येवला यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सदर प्रोब दुरूस्त होउ शकत असल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र. SSMS/ DR/ 2016/52 दि.14/11/2016अन्वये सर्व करांसहीत एकुण रू.20,000/-(अक्षरी रू.वीस हजार मात्र) इतका रकमेचे कोटेशन पाठविले आहे. कंपनीने सदर प्रोब दुरूस्तीची सहा महिन्यांची वॉरंटी देत ओ. इतर पुरवठाधारक देखील उपरोक्त सोनोग्राफी मशिनचा प्रोब दुरूस्त करुन देउ शकतात. त्यामुळे सदर प्रोब दुरूस्त करणेस विविध पुरवठाधारकांकडून कोटेशन्स मागणी करून निम्नतम दराने दुरूस्त करुन घेता येईल असे नम्र मत आहे.

तरी सोनोग्राफी विभागातील प्रोब विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन्स मागणी करून निम्नतम दराने दुरूस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील सोनोग्राफी विभागातील प्रोब दुरुस्ती करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३० **श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु.विभागातील Adult Ventilator Buyback करुन नविन मशिन खरेदीकामी प्राप्त निम्नत्तम दर धारक M/s Maquet Medical India Pvt.Ltd, Mumbai यांना चर्चा/ वाटाघाटासाठी बोलावून निर्णय होणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागात अत्यवस्थ रुग्ण दाखल झालेले असतात. त्यांचे उपचारासाठी Ventilator ची आवश्यकता असते. सध्या आय.सी.सी.यु. विभागात सन २००० या वर्षात Siemens कंपनीचे एक व Drager कंपनीचे एक असे एकुण दोन Ventilator मशिन आहेत. त्यापैकी Siemens कंपनीचे Ventilator हे वारंवार बंद पडते तसेच Siemens कंपनीने देखील त्याचे उत्पादन बंद केलेले आहे. त्यामुळे त्याचे स्पेअर्स पार्टस बाजारात उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे आय.सी.सी.यु. विभागाने दि.२९/०६/२०१३ रोजीचे मागणीपत्रकान्वये एक नग नविन Ventilator मशिन मागणी केलेली आहे. जुन्या Siemens कंपनीचे मशिनची किंमत रु.७,४६,४५०/- इतकी होती, सध्या सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२५,०४६/- इतकी आहे.

सदरहू Ventilator खरेदीकामी M/s. Inter Medics, Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार नविन Ventilator मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Name of Item	Qty.	Rate Per in Rs.	Total Amount in Rs.
1	Adult Ventilator	1	1250000.00	1250000.00
			Total Amt. in Rs.	**1250000.00**

त्यानुसार दि.१२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.५२० अन्वये Adult Ventilator मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.१२,५०,०००/- (अक्षरी रु. बारा लाख पन्नास हजार मात्र) चे खर्चास व जुने Adult Ventilator Machine बायबॅक करणेस तसेच सदरचे खरेदीकामी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस व मा.खंडपीठाने सुचविलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावास अनुसरुन दि.०३/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये विधी विभागास Adult Ventilator Machine खरेदीकामी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सिव्हील अर्ज क्र.६८४६ दि.१७/०७/२०१५ अन्वये सदरचे खरेदीस खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Austin Health Care, Pune	29/01/2016
2	M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai	29/01/2016
3	M/s. Excel Corporation, Nashik	29/01/2016
4	M/s. Aditi Enterprises, Nashik	30/01/2016

वरीलप्रमाणे खरेदीकामी वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली असून त्यांनी मशिनचा Demo मिळणेबाबतची शिफारस केलेली आहे. परंतु वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Excel Corporation, Nashik यांनी मशिनचा Online Technical Complinace दिलेला नाही, त्यामुळे त्यांची निविदा अपात्र होत आहे.

त्यामुळे उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.२२/०८/२०१६ रोजीचे रुग्णालय उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांनी दिलेले रक्कम रु.११,८०,०००/- हे दर निम्नतम येतात. त्यामुळे

M/s.Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांना त्यांनी देऊ केलेल्या दरात अजुन सुट मिळणेकामी पुढील समितीचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात असे ठरले आहे.

त्यानुसार M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांना त्यांनी देऊ केलेल्या दरात अजुन सुट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले असून उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधी श्री.लक्ष्मीकांत भार्गवे हे दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दिलेल्या दरामध्ये रु.३०,०००/- मात्र सुट देऊ केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु.विभागातील Adult Ventilator Buyback करुन नविन मशिन खरेदीकामी M/s Maquet Medical India Pvt.Ltd, Mumbai यांनी चर्चेअंती देऊ केलेले रु.११,५०,०००/- (मशिन्सच्या नवीन अपडेटस् सह) मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत फेरसादर.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण 52 कंपन्यांचे एकुण रु.37,05,48,969.38 इतक्या रकमेचे अंदाजे 859 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या (परीशिष्ट 'अ') Ground Floor येथील 15 नग मशिन्सचे संबंधीत 13 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या उपरोक्त संदर्भीय निर्णय क्र.386, व्यवस्थापन समिती सभा दि. 23/06/2016 अन्वये वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यास मान्यता देण्यात आली होती.

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 55 कंपन्यांचे एकुण रु.10,50,15,612/- इतक्या रकमेचे अंदाजे 470 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी,उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट 'ब') दिलेल्या 43 नग मशिन्सचे संबंधीत 11 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा.व्य.समितीच्या उपरोक्त संदर्भीय निर्णय क्र.387, व्यवस्थापन समिती सभा दि. 23/06/2016 अन्वये वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार, सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअर पार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

परंतू, उपरोक्त संदर्भीय (संदर्भ क्र. 4) शासन निर्देशानुसार-

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत प्रपत्रामध्ये दर्शविलेप्रमाणे सर्व उपकरणांकरीता पहिल्या 5 वर्षांकरीता सर्वंकष देखभाल दुरूस्ती करार (CMC), तर त्यानंतर वार्षिक देखभाल दुरूस्ती करार (AMC) अंतर्भुत असण्याची अट उपकरणांची खरेदी करताना अथवा निवीदा प्रक्रिया अवलंबताना टाकण्यात यावी. तसेच प्रशासनिक विभाग यांना सर्वंकष देखभाल करार (CMC) करण्याचे उपकरणांच्या पुस्तकी किमतीच्या 5% पर्यंतचे अधिकार व संचालक, आरोग्य सेवा यांना वार्षिक देखभाल करार (AMC) करण्याचे उपकरणांच्या पुस्तकी किमतीच्या 1% पर्यंतचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

तसेच, उपरोक्त संदर्भीय निर्णय क्र.12, व्यवस्थापन समिती सभा दि. 22/08/2016 अन्वये-

विविध खरेदी बाबत महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार AMC देणेसाठी उत्पादक कंपनीला 1 % दर देण्यात यावा असे तरतुद दिसुन येते व संस्थानमधील बऱ्याचश्या मशिनरीच्या AMC साठी 5 % पर्यत दर दिला जात आहे. याकरीता संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलाविणेत यावे, असे ठरले.

सोबतच्या तक्त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलच्या एकुण 15 नग मशीन्सचे व श्री साईनाथ रूग्णालयाच्या एकुण 43 नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपनी प्रतिनिधींना आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, समक्ष बोलवुन दरांबाबत चर्चा करणेत आली. चर्चेअंती कंपनी प्रतिनिधींनी दिलेले अंतीम दर खालीलप्रमाणे.

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठीच्या अंतीम दरांचा तक्ता-

Sr. No.	Deptt.	Equipment Name	Name of Company	(Year 2015-16) AMC, CMC Amount in Rs.	Quoted Year 2016-17 AMC Amount in Rs.	Final Amount after Negotiation in Rs.
1	Pathlab	Immunoassy Analyser (Vidas PC)	M/s. Biomerieux (I) Pvt. Ltd. New Delhi	46204	46609	**46609**
2	Pathlab	5 Part Diff. Blood Cell Counter (Make:Sysmax; XS-1000i, Sr.# 66463)	M/s. Transasia Biomedical .Ltd. Mumbai	81168	115150	**97878**
3	Pathlab	3 Part Cell Counter (Erma PCE-210; Sr.# 22120)	M/s AGD Biomedical Pvt. Ltd. Mumbai	31556	23200	**23200**
4	Pathlab	Blood Gas Analyzer (Model:Cobas b221)	M/s.Roche Diagnostics India Pvt .Ltd Mumbai.	134832	137400	**137400**
5	Pathlab	Fully Automatic Biochemistry Analyzer (Konelab 20i)	M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd. Chennai	59387	62630	**60000**
6	Histo path	Leica Tissue Processor (Model– TP 1020)	M/s DHR Holding India Pvt. Ltd, Mumbai	23404	23506	**23506**
7	Radiology	Laser Imager (DVB 8900)	M/s. Carestream Health India Pvt. Ltd., Mumbai	181827	165000	**165000**
8	Radiology	CR Classic	M/s. Carestream Health India Pvt. Ltd., Mumbai	75000	75000	**75000**
9	Radiology	500 mA X-ray with motorized Table (HD/KLH Sr. No. 3837)	M/s Siemens Ltd. Mumbai	42141	44247	**43405**
10	C.T.Scan	160 K.V.A.UPS (Socomec)	M/s.Socomac India Pvt Ltd.	116613	118320	**116613**
11	Gen.OT	Cautery Machine (ACC-PU)	M/s . Surgicare Ltd. Mumbai	3216	3216	**3216**
12	Gen.O.T.	C-arm II TV System (MM5E; S.#3360)	M/s. Siemens Ltd. Mumbai	39613	41593	**40801**
13	Ortho OT	C-arm II TV System (MM5C; Sr.# 3207)	M/s. Siemens Ltd. Mumbai	44250	46462	**45578**
14	Neuro OT	Operating Microscope (Model- OPMI Vario)	M/s Carl Zeiss India Pvt. Ltd	41569	43838	**42961**
15	Neuro OT	Boyles Machine with Ventilator (Febius Plus; S.# ASDD-0025)	M/s Draeger Medical (I) Pvt. Ltd.	58396	58396	**57228**

(ब) श्री साईनाथ रुग्णालयामधील मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठीच्या अंतीम दरांचा तक्ता-

Sr. No	Department	Equipment Name	Name of Company	(Year 2015-16) AMC, CMC Amount in Rs.	(Year 2016-17) Quoted Amount in Rs.	Final Amount after Negotiation in Rs.
1	ICCU	Ventilator with Compressor–1 No (EVITA 2 DURA; Sr.#APRB-0090)	M/s. Draeger Medical India Pvt. Ltd. Mumbai	26396	26517	**25987**
2	Blood Bank	Tube Sealer (Compo Safe)-2 No;	M/s.Terumo Penpol Ltd.Mumbai	21603	21603	**21603**
		Blood Collection Monitor-3 Nos. (D 601)		27480	27480	**27480**
3	Pathology Lab	Fully Automatic Biochemistry Analyser-1 No (EM-200).	M/s. Transasia Biomedical Ltd. Mumbai	78219	80575	**80575**
4	Pathology Lab	Cell Counter Machine-1 No. (Erma PCE-210; Sr. # 22073)	M/s. AGD Biomedical Pvt. Ltd., Mumbai	31556	23200	**23200**
5	Pathology Lab	Cell Counter Machine-1 No. (Erma PCE-210; Sr. # 29701)	M/s. AGD Biomedical Pvt. Ltd., Mumbai	15276	15276	**14000**
6	ICCU &O.T.	Star-55-11 nos. & Skyline 55-1 no.	M/s.Skanray Technologies Pvt.Ltd	175667	184450	**175667**
7	Blood Bank	Various Remi Equipts.-8 Nos. (BR -280 SR (BDI-763/08); UDF 165 (BDI-4466/06); RPFV-240 (BDI-1184/09); BR-120 SR (BDI1211/09); BR-120 SR (BDI-1212/09); BR120 SR (BDI1210/09); RS-12R (LCCM-1647/09) KBM-70+)	M/s Remi Sales & Engg. Ltd. Thane	118709	124644	**118709**
8	Radiology Dept.	500 mA X-ray Machine with 2 Tube and II TV (HD/KLH; Sr.# 31173)	M/s. Siemens Ltd, Mumbai.	82131	86237	**84595**
9	Ortho O.T	C-Arm (MM5E; Sr. # 3189)	M/s. Siemens Ltd, Mumbai.	43128	45284	**44422**
10	Surg.O.T.	Valleylab Cautery Machine (Force FX; Sr.# F1D67724A)	M/s. Vitek Medical System Pvt.Ltd. Mumbai	11576	14261	**14261**
11	Opthal O.P.D	Carl Zeiss Equipments-6 nos; Humphrey Field Analyser (HFA 720i) Slit Lamp (SL 115)-	M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai	314222	240450	**240450**

		2No. Yag Laser (Yag III) Green Laser (Visulas 532s) Op.Microscope (Model-OPMI VISU140)				
12	Sonography Deptt	Ultrasound Machine (Logiq-C2)	M/s.Wipro GE Healthcare Pvt.Ltd,Pune	67253	70642	**NR**
13	Surg.O.T., ENT OT	10KVA online UPS-3 Nos, 2KVA Online UPS- 1No.	M/s Tejas Electronics, A` Nagar	13518	14200	**14200**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच ज्या कंपन्या दर कमी करणेसाठी प्रतिसाद देत नाहीत, अशा कंपन्यांना यापुढे खरेदीप्रक्रियेसाठी बोलविणेत येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३२ **CT Scan (64 Slice) व MRI मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे.सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन एकुण रू.3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 16/07/2006 रोजी पूर्ण झाला असून मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 13/03/2004 च्या सभेतील निर्णय क्र.95 अन्वये आणि कंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/2005 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs. 30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

तसेच मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून Magnetom Avanto हे MRI मशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि.1/06/07 रोजी कार्यान्वित करण्यात आले असून कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.'

वरील अटीनुसार आजपावेतो मे.सिमेन्स हेल्थकेअर, मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर दोन्ही मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दरवर्षी करणेत आले आहे.

मे.सिमेन्स ली. मुंबई यांनी CT Scan मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी एकुण रु.55,26,498/- (पुर्णांकित एकुण अक्षरी रु. पंचावन्न लाख सव्वीस हजार चारशे अठयान्नव मात्र) इतक्या रक्कमेची आणि MRI मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु. 32,36,332/- (अक्षरी रु.बत्तीस लाख छत्तीस हजार तीनशे बत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचा CMC करीता करारनामा पाठविला आहे.

यावर्षी CT Scan मशिनचे दि.17/07/2016 ते दि.16/07/2017 या एक वर्षाच्या व MRI मशीनचे दि. 01/06/2016 ते दि. 31/05/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी मा.व्य.समितीच्या दि.09/10/2016 च्या सभेतील आयत्या वेळेच्या विषया नुसार मान्यता देण्यात येउन मा. व्य.उपसमिती सभेपुढे कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस मिळाली आहे. त्यानुसार दि.10/10/2016 रोजी मा.व्य.उपसमिती सभेपुढे कंपनी प्रतिनिधीशी CMC चे दरांबाबत चर्चा करणेत आली.

त्यावेळी नवीन मशिन बाबत माहीती कंपनी प्रतिनिधीस विचारण्यात आली. परंतू त्यांनी त्याकरीता कंपनीचे वरीष्ट प्रतिनिधीशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे यापुढील मा.व्य.उपसमिती सभेपुढे कंपनीचे वरीष्ट प्रतिनिधीशी CMC चे दरांबाबत चर्चा करणेस बोलविण्यात यावे असे ठरले.

तरी उपरोक्त दोन्ही मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी कंपनीचे प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतरव उर्वरीत 50% रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, CT Scan (64 Slice) व MRI या दोन्ही मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठीचे दर कमी करणेबाबत सदरहू कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी श्रीमती सत्या अय्यर यांचेबरोबर समक्ष चर्चा करणेत आली असता, त्यांनी कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या एकत्रित मुळ दरांवर रु.२,००,०००/- मात्र सुट देऊ केली, ती मान्य करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३३ मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत

आजचे रुग्णालय उपसमिती सभेमध्ये मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(१) महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे Chairman & Managing Director श्री.आनंद महिंद्रा यांनी साई ॲम्ब्युलन्स प्रकल्पामध्ये संस्थानला २५ ॲम्ब्युलन्स देणगी स्वरुपात देण्यास इच्छुक आहेत. संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असणाऱ्या मोठया रकमेच्या मशिनरी/ साहित्यांची यादीही त्यांना पाठविणेत यावी. त्यामधील काही मशिनरी/ साहित्य संस्थानला ते देणगी स्वरुपात देऊ शकतील. तसेच संस्थानला पाण्याचा तुटवडा जाणवू नये याकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीने साठवण तलाव देणगी दाखल बांधून दिलेला आहे , या तलावास साईमहिंद्रा अथवा तत्सम नाव देण्यात यावे. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

(२) ई-निविदेमधील निम्नतम दरधारकास त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२,१२,२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९६६ (११) नुसार वैद्यकिय संचालक यांना औषधांच्या तुटवडयामुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता संस्थानकडे उपलब्ध नसलेली तातडीची/ जीवनावश्यक औषधे खरेदी करणेकामी रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चाचे अधिकार देण्यात आलेले आहेत. दैनंदिन आवश्यक असणारी औषधेही सदरहू खर्चाचे मर्यादेत खरेदी करणेचे अधिकार वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात आले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(४) कोणत्याही प्रकारची दरपत्रके/ निविदा/ ई-निविदा उघडणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करतेवेळी, मागील दर व सध्याचा बाजारभावातील दर याचा तौलानिक तक्ता, खरेदीबाबतच्या अटी/ शर्ती याचा समावेश त्यामध्ये करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(५) अधिनियम- २००४ मधील तरतुदीनुसार मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चाचे अधिकार देण्यात आलेले आहेत. संस्थानचे काम जलद गतीने होणेसाठी रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या खरेदीसाठीची दरपत्रके पुर्वीप्रमाणेच कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उघडणेत येऊन, पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच विविध मशिनरींची रु.२५,०००/- मात्र खर्चापर्यंतची ए.एम.सी./ सी.ए.एम.सी. मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात करणेत यावी व यापुढे रुग्णालयांसाठी नवीन मशिनरी खरेदी करतेवेळेस ५ ते १० वर्षासाठी स्पेअरपार्टसह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.०४ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार छाननी समितीबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ (सुधारित-४ जुन २०११) मधील कलम २१ पोटकमल २ (दोन) "राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील,"आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल, अशी तरतुद आहे.

या तरतुदीनुसार मा व्यवस्थापन समितीच्या दिनांक १६/०८/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ५६५ अन्वये सदर छाननी समितीमध्ये व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुरेश काशिनाथ हावरे, व

व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम,या दोन सदस्यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आलेली आहे.

उपरोक्त नमुद अधिनियमातील कलम २१ पोटकमल २ (दोन) मधील तरतूदीन्वये छाननी समितीची नियुक्ती करणेसाठी शासन स्तरावरुन कार्यवाही होणेकामी, जा.नं.एसएसएस/वशी-४/२६२७/२०१६. दि. २७/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार शासन निर्णय क्र. सासंवि१०१६/१३१४/प्र.क्र.१६५/का.१६ दि. ०५/०१/२०१७ अन्वये खालील प्रमाणे छाननी समितीचे गठण केलेले आहे.

शासन निर्णय-

श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोटकमल २ (दोन)च्या परंतुकानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथे पुढीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे.

१. छाननी समितीचे अध्यक्ष व सदस्य

अ) न्या. के. यु. चांदिवाल (निवृत्त) - अध्यक्ष

ब) श्री. सुरेश काशिनाथ हावरे - सदस्य

क) श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम - सदस्य

२. छाननी समितीचा कालावधी- श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) (दोन) च्या परंतुकानुसारछाननी समितीचा कालावधी व्यवस्थापन समितीचा कालावधी संपेपर्यंत असेल.

३. छाननी समितीची कार्यकक्षा- श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४अन्वये सुधारीत करण्यात आलेल्या कलम २१ (२) (एक) व (दोन) व कलम २९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समितीची कार्यकक्षा असेल.

४. छाननी समितीवरील अध्यक्ष व सदस्यांचे मानधन- छाननी समितीचे अध्यक्ष न्या.के.यु. चांदिवाल (निवृत्त) यांना प्रती बैठक रु. १०,०००/- इतके मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधन संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यात येईल. तसेच बैठकीकरीता येण्या-जाण्यासाठी वाहनव्यवस्था आणि शिर्डी येथे निवासव भोजनव्यवस्था संस्थानकडून करण्यात येईल. छाननी समितीचे अन्य सदस्य हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष असल्याने त्यांना स्वतंत्रपणे मानधन व भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

वरीलप्रमाणे छाननी समितीमार्फत संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मदाय विश्वस्तव्यस्थांकडून समितीस प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन शिफारस करणेत येईल.

अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसारछाननी समितीबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मदाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीस प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय होणेसाठी लवकरच या छाननी समितीच्या सभेचे आयोजन करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.०५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सन २०१६- २०१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदीस मंजुरीमिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब-ब्लड बॅंक केमीकल्स, क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय. फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो ओ.टी. मटेरीयल, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.०५/०१/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव/ शिल्लक असलेला साठा यांचा विचार करुन व डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नवीन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे अशा प्रकारे सर्व बाबींचा विचार करुन व नवीन औषधांचा यादीत समावेश करण्यात आलेला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

अ.नं.	तपशिल	सन २०१६-१७ करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु.
१	गोळया (Tablet)	24892374.86
२	इंजेक्शन व आय.व्ही.फ्ल्युड्स	62732844.86
३	लिक्वीड ओरल्स	3850201.43
४	मलम	1092663.97

५	आय, इअर व नोझल ड्राप्स	2581282.65
६	डेंटल मटेरीयल	578495.19
७	क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एमआरआय फिल्म्स व इतर साहित्य	29953251.15
८	श्री साईनाथ रुग्णालय – लॅब केमीकल्स	4824083.13
९	श्री साईबाबा हॉस्पिटल – लॅब केमीकल्स	34058575.97
१०	ब्लड बॅंक केमीकल्स	10412290.84
११	Miscellaneous (इतर किरकाळ साहित्य)	10460793.01
१२	ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल	66287224.05
१३	कॅथलॅब, कार्डीयाक ओ.टी. व परफ्युजनीस्ट मटेरीयल व सर्जिकल साहित्य	79678396.25
१४	डायलेसीस युनीट	1104779.64
१५	न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य	1913501.74
१६	आयुर्वेदीक औषधे	4098675.19
१७	होमिओपॅथीक औषधे	74786.25
१८	कॅटगट अॅन्ड सुचर्स मटेरीयल (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व ओ.टी.)	45505962.72
१९	On Consignment Basis Items (Stent/ Valve/ Balloon/ Pacemaker/ Devices/ Ortho & Neuro Surgery Items etc.)	100000000.00
	एकूण रक्कम रु.-	**48,41,00,182.90**
	पुर्णांकित एकूण रक्कम रु- .	**48,41,00,183.00**

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

०१) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्याइत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील आंतररुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

अ. नं.	तपशिल	सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09)	सन 2009 - 2010 (01.04.09 ते 31.03.10)	सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11)	सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12)	सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13)	सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14)	सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15)	सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16)
०१	आंतर रुग्ण संख्या	9365	11573	11639	11900	15220	14075	12279	8628
०२	बाहय रुग्ण संख्या	240890	223844	261321	260414	303668	298226	297184	213134

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर,दोन्ही कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एमआरआय, २-डी इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ ९ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा/ तपासण्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ. नं.	तपशिल	सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09)	सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10)	सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11)	सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12)	सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13)	सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14)	सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15)	सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16)
०१	कॅथलॅब प्रोसिजर	4616	4922	5482	7332	9254	9805	5915	4577
०२	ह्दय शस्त्रक्रिया	721	1023	1216	1491	1579	1700	1716	1665
०३	ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया	289	542	699	श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर				
०४	आर्थोपेडीक शस्त्रक्रिया	710	728	763	817	925	1030	936	548
०५	जनरल शस्त्रक्रिया	817	1535	1664	2249	2221	1984	1565	1036

०६	न्युरो शस्त्रक्रिया	253	489	571	611	586	337	383	565
०७	युरोलॉजी शस्त्रक्रिया	328	397	440	548	570	615	643	556
०८	सि.टी.स्कॅन	8091	8024	9995	9656	9546	8780	7827	7851
०९	एम.आर.आय	7943	8777	10060	15596	13050	13317	13244	12084
१०	2 - डि इको	6402	6785	8793	11960	14113	16591	15692	14971
११	डायलेसीस	1777	1850	1960	2078	2516	2337	2611	2162
१२	आंतर रुग्ण संख्या	11147	12689	13489	15533	17266	17226	12792	11033
१३	बाहयरुग्ण संख्या	66543	73068	102478	130105	147147	153034	146526	127668
	एकूण संख्या	109890	120986	150213	189153	207940	226756	209850	184716

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते.

१) दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणारा खप तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढू शकते.

२) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, टॅबलेट, ऑईन्टमेन्ट, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रित मागणी केलेली आहे.

३) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठी विशिष्टरक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याची अंमलबजावणी देखील चालू झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणा-या औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

४) महाराष्ट्र शासनाने दि.१६/११/२०१३ पासून सुरु केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत श्री साईबाबा रुग्णालयात होणा-या शस्त्रक्रिया कराव्या लागतात व त्यामध्ये रुग्णांना ॲडमिट आहे तोपर्यंत व डिसचार्ज दिल्यानंतर पुढील १० दिवसांची औषधे मोफत द्यावी लागतात.तसेच पुढील तपासणीसाठी रूग्ण आल्यानंतर त्यास ३ महिने औषधे मोफत द्यावी लागतात. त्यामुळे देखील औषधांचे मागणीत खूपच वाढ झालेली आहे. त्यासाठी देखील अंदाजे रुग्णांची संख्या विचारात धरुन अंदाजे औषधे मागणी केलेली आहे. सदर मागणी प्रत्यक्ष आलेल्या रुग्णानुसार कमी जास्त होऊ शकते.

५) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमिकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचविलेली आहे.

६) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबिरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इत्यादीमुळे वाढणारी गर्दी व राजीव गांधी योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा. किडनी स्टोन शिबिरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, आध्यात्मिक शिबिरे, पालखी सोहळा इत्यादी).

७) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणा-या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ५६२६ तर श्री साईबाबा रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीत ८९४७ इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

८) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य ही On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. ते साहित्य रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतूद केलेली आहे. मागील वर्षाच्या टेंडरमध्ये खरेदी नियमानुसार सर्व Product हे निम्नतम दराने घेण्यात आलेले होते. प्रत्यक्षात बघता सदरचे दर हे Branded कंपनीचे दरापेक्षा ब-याच ठिकाणी निम्यानी कमी आहे त्यामुळे सोबतच्या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजूर दराने संस्थानने जी औषधे खरेदी केलेले आहे त्या दरावर २० टक्के साधारणता दर वाढ करणे आवश्यकतेनुसार वाढ करुन केवळ हिशोबासाठी अंदाजे दर धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदेमध्ये प्राप्त होणारे दर हे हयापेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे.

दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ (१२ महिने) या महिन्यांच्या कालावधीमध्ये औषधे खरेदीवर एकूण रु.१८,४५,२७,६८६/- इतका खर्च झालेला आहे.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त होणा-या निविदांवर अंतीम निर्णय घेणेकरीता सरकारी सहा.वकील श्री. पी. पी. मोरे, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक यांची समिती गठीत करुन सदर समितीने औषधे खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आदेश पारीत केले होते, त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षाकरीता लागणारी औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी ई-निविदांची संपूर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदी केली गेली तर खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येईल जेणेकरुन संस्थानला त्याचा फायदा होईल असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ४८,४१,००,१८३/-(अक्षरी रु. अठ्ठेचाळीस कोटी एकेचाळीस लाख एकशे त्र्याऐंशी मात्र) चे खर्चास, तसेच सदरचे खरेदीकामी ई-निविदांची संपूर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदीस व औषधे खरेदीच्या कार्यपध्दतीस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव दि. १०/१०/२०१६ रोजीचे रुग्णालय उपसमितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

बऱ्याचशा नामांकीत रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.

औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळा बेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/ भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय व वैद्यकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत अशा निर्णय झालेला आहे.

या निर्णयास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ७५६/५ प्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि. १८/१०/२०१६ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा. वैद्यकीय संचालक, परचेस मॅनेजर यांनी मुंबई येथील DMER/DHS या संस्थेला भेट दिलेली असून खरेदीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी त्यांनी Demand Committee व Specification Committee नेमून दि. ०९/०१/२०१७ रोजी Demand Committee व दि. १६/०१/२०१७ रोजी Specification Committee बैठक आयोजीत करण्यात येऊन, त्यास दोन्हीही हॉस्पिटलचे डॉक्टरांशी चर्चा / विनियमय करण्यात येऊन त्यांचेकडून Demand व Specification निश्चित करुन ई-निविदा प्रक्रिया राबवावी असे सुचित केलेले आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांची Demand व Specification Committee तयार करण्यात येऊन, निविदा भरतांना खालील Pre Qualification Criteria ठरविण्यात आली आहे.

१) Manufacturing Company with Valid Drug Licence
२) Vat / CST Registration Certificate
३) WHO / GMP Certificate with Product list
४) Annual Turnover of last 3 years
५) दिनांक ३०/१०/२०१५ रोजीचे शासन नियमावलीनुसार निविदा शुल्क व बयाणा रक्कम घेणे
६) प्राप्त मागणीचे ८ भाग करण्यात आलेले आहेत.

सदरकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ३०/११/२०१६ मध्ये वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दि.२३/१२/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये दोन्ही रुग्णालयाचे वॉर्ड / विभागातून आलेल्या मागणीचा तक्ता देण्यात येऊन मागणी व तांत्रिक बाबी तपासून मिळणेबाबत कळविण्यात आले होते.

तसेच दि.०२/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये दोन्ही रुग्णालयाचे वॉर्ड / विभागातून प्राप्त (Requirement 2016-17) पाठविण्यात येऊन सदरहू मागणी संबंधित डॉक्टरांना दाखवून त्यात नगसंख्या वाढविणे, कमी करणे, काही ठिकाणी नवीन मागणी टाकणे किंवा औषधांचे Specification बदलणे गरजेचे वाटत असतील तर त्या ठिकाणी बदल करुन औषधांची यादी औषध भांडार विभागात जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दोन्ही रुग्णालयाचे वॉर्ड विभागातून तपासून आलेली मागणी एकत्रित करण्यात आलेली असून त्याचा तक्ता सोबत सादर केलेला असून सदरचे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५९१९१८३६.२२ इतका खर्च अपेक्षित आहे.

त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

Total Purchase Part	Medicine Details	App.Tender Cost	Earnest Money Deposit	Tender Form Cost	Partwise Minimum Annual Turnover in India Should be as per below
1	Ayurvedic Medicines	4715043.56	50000.00	3000.00	Each 50 Lakh
	Homeopathic Medicines	63236.25			
	Total -	**4778279.81**			
2	Catgut & Suture Material	**91402572.63**	200000.00	20000.00	Each 30 Crore
3	Injections & I.V. Fluids	118688607.04	250000.00	25000.00	50 Crore
	Tablets	26784670.83	150000.00	15000.00	Each 30 Crore
	Liquid Orals (Syrup)	6450134.42	100000.00	10000.00	
	Ointment	1229489.81	50000.00	3000.00	
	Eye, Ear & Nasal Drops	10897630.00	150000.00	15000.00	
	Total -	**164050532.10**			
4	Lab. Chemicals of Shri Sainath Hospital	7167363.74	200000.00	20000.00	Each 30 Crore
	Lab. Chemicals of Shri Saibaba Hospital	37312574.60			
	Blood Bank Chemicals	13543434.81			
	Total -	**58023373.15**			
5	Cathlab, Cardiac O.T. & Perfusinist Material	127814051.74	250000.00	25000.00	50 Crore
	O.T.& Other Surgical Material	102868170.50	250000.00	25000.00	
	Neuro Operation Theatre Surgical Material	2755856.06	50000.00	3000.00	30 Crore
	Total -	**233438078.30**			
6	Dialysis Unit	1522659.55	50000.00	3000.00	Each 50 Lakh
	Miscellaneous	15253747.50	150000.00	15000.00	
	Dental Material	647164.77	10000.00	2000.00	
	Total -	**17423571.82**			
7	X-ray, C.T. Scan & MRI Films	**29873386.84**	150000.00	15000.00	Each 30 Crore
8	On Consignment Items	**100000000.00**	200000.00	20000.00	50 Crore
	Total of All Items-	**698989795.28**			
	Less 20% Total Amt.	**559191836.22**			

औषधे वेळोवेळी नियमित उपलब्ध होणेचे दृष्टीने खालील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-

१) राजीव गांधी योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या औषधांबाबत –

राजीव गांधी योजनेअंतर्गत पेशंटला औषधे/ सर्जिकल साहित्य पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी रुग्णालयाची असल्याने त्यांना ती औषधे कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन दयावी लागतात. कधी-कधी त्या मटेरीयलचा वार्षिक औषध खरेदीमध्ये समावेश नसतो किंवा तर ते मटेरीयल फेर कोटेशन/ निविदा मागवून खरेदीची कार्यवाही चालू असते अथवा त्याचा पुरवठाधारकाने वेळेवर पुरवठा न केल्याने तुटवडा भासतो. अशा वेळी राजीव गांधी योजनेअंतर्गत पेशंटचे नातेवाईक औषधांसाठी वरिष्ठांकडे तथा वर्तमान पत्राव्दारे तक्रार

नोंदवितात त्यासाठी काही औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून सदर औषधे नजीकच्या पुरवठा धारकाकडून वाजवी दर असल्याची पडताळणी करुन तातडीने खरेदी करणेस मान्यता असावी.

२) औषधे अतिरीक्त खरेदीबाबत–

नवीन नियमावलीनुसार वार्षिक औषधांचे पुरवठा आदेश दिल्यानंतर पुढील सहा महिन्यातच अतिरिक्त औषधे खरेदी करता येणार आहे. परंतु ब-याच वेळा वार्षिक औषधे खरेदीचा कालावधी संपून पुढील वार्षिक खरेदीस विलंब लागल्याने वार्षिक औषधांची वर्षाची मागणी संपते यासाठी कमीत कमी एक वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन जातो तसेच कधी कधी संसर्गजन्य रोगांची लागण झाल्यामुळे सुध्दा वार्षिक मागणी संपून अतिरीक्त मागणी करावी लागते. तेंव्हा वार्षिक खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभेने दिलेल्या रक्कमेच्या मंजूरीतंर्गत ती औषधे / सर्जिकल साहित्य मंजूर दराने अतिरिक्त खरेदीस मंजूरी मिळावी.

३) औषधे / सर्जिकल साहित्याची मागणी –

ब-याच वेळेस नवीन डॉक्टर रुजू झाल्यास अथवा नवीन मशिन खरेदी केल्यास त्यांना नवीन औषधे / सर्जिकल साहित्य तथा केमिकल्स लागतात. तेंव्हा ती नवीन खरेदी नियमावलीनुसार खरेदी करणे शक्य होत नाही. रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी ती औषध काही प्रमाणात तातडीने खरेदी करता यावीत.

४) औषध / सर्जिकल साहित्य खरेदीबाबत प्राप्त तक्रारीबाबत –

सन २०१५ – २०१६ या वर्षाच्या खरेदीमध्ये ज्या औषधे / सर्जिकल साहित्य विषयी तक्रारी आलेल्या आहेत त्या कंपनीला सन सन २०१६ – २०१७ च्या औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीमध्ये विचारात घेण्यात येऊ नये तसेच यानंतर ज्या औषधांच्या तक्रारी येतील त्यांना काळ्या यादीत (Blacklist) टाकण्याचे सर्व अधिकार मा. कार्यकारी अधिकारी सो यांना राहतील.

५) सन २०१६ – २०१७ च्या वार्षिक खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या Demand Committee कडे वार्षिक मागणी तपासणीकरिता पाठविले असता ब-याशा डॉक्टरांनी Branded Company तसेच Specific Company च्या औषधांची मागणी केली आहे. तरी त्याबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे.

६) शिबीरासाठी लागणारे औषधे / सर्जिकल साहित्याबाबत – संस्थानव्दारे शिर्डी परिसरात येवला, मनमाड, राहुरी, वैजापूर व इतर ठिकाणी महिना / दोन महिन्यांत प्राथमिक तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच रक्तदान शिबिर व युरोलॉजी / ऑप्थल कॅम्पचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी लागणारे औषधे ही वार्षिक मागणीतील औषधांमधूनच पुरविण्यात येतात. त्यामुळे सुध्दा वार्षिक मागणीवर परिणाम होतो, तेंव्हा अतिरीक्त खरेदीकामी मंजूर बजेट रक्कमेतून खरेदीस मान्यता मिळाल्यास ते पुरविणे शक्य होईल व जे औषधे आपणाकडे शिल्लक नसतील ती औषधे वाजवी दराने तातडीने खरेदी करण्यास मान्यता असावी.

७) संसर्गजन्य रोगांचे प्रादुर्भाव वाढल्याने पुरविण्यात येणा-या औषधांबाबत–

ब-याच वेळा डेंग्यु, मलेरीया, गोचीड ताप, चिकनगुण्या, स्वाईन फ्ल्यु तसेच रक्तपेशी वाढणे अथवा कमी होणे या प्रकारचे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पेशंटची वाढती संख्या त्यांच्या करण्यात येणा-या Lab Test तसेच त्यांचे उपचारासाठी लागणारे औषधे यांची मागणी वार्षिक मागणीच्या दुप्पट / तिप्पट असते तेंव्हा याकामी सुध्दा अतिरिक्त खरेदीकामी नवीन खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंजूर बजेटच्या रक्कमेतून ती खरेदी करण्यास मान्यता असावी तसेच काही मटेरीयल हे वार्षिक मागणीमध्ये नसते तेंव्हा ते मा. वैद्यकीय संचालक यांचे अधिकारात वाजवी दराने तातडीने खरेदीस मान्यता असावी.

८) श्री साईनाथ रुग्णालयात सर्व प्रकारचे उपचार मोफत सेवा दिल्यामुळे –

दिनांक ०१ जानेवारी २०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयात मोफत सेवा देण्यात येत आहे. त्यामुळे तेथील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांना लागणारे औषधे ही सुध्दा वाढणार आहे. त्यामुळे सध्या वार्षिक मागणीमध्ये दिलेली मागणी सुध्दा भविष्यात अपुरी पडणार आहे. तेंव्हा त्यांचेसाठी सदर औषधे वाजवी दराने तातडीने नजीकच्या पुरवठाधारकांकडून खरेदी करणेस मान्यता असावी.

९) शासन कर प्रणालीमध्ये बदल झाल्यास –

शासन नियमावलीनुसार औषधे / सर्जिकल साहित्याकमी कर प्रणालीत वाढ / कमी झाल्यास त्याकामी मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीने त्याबाबत पुरवठाधारकांना पत्र पाठवून कर प्रणालीप्रमाणे झालेला बदल अंमलात आणून त्याप्रमाणे बिले वित्त विभागामार्फत अदा करण्यात यावीत.

१०) संस्थान कर्मचा-यांना तसेच त्यांचे अवलंबितांना पुरविण्यात येणा-या औषधांबाबत–

संस्थानचे कायम / कंत्राटी कर्मचारी व त्यांचे अवलंबितास आपले स्टोअर विभागामार्फत लागणारे औषधे पुरविले जातात. परंतु, जे औषधे आपणाकडे शिल्लक नसतात ती औषधे बाहेरुन विकत घेऊन वैद्यकीय बील परताव्याव्दारे त्यांना ती रक्कम परत भेटते. त्यामध्ये बाहेरुन घेतलेल्या औषधांसाठी **MRP** दर आकारले जातात. त्यामुळे जास्तीची रक्कम द्यावी लागते. त्याकरिता वार्षिक खरेदीमध्ये संस्थानचे कर्मचा-यांना लागणा-या सर्व औषधांची मागणी करण्यात येऊन कर्मचा-यांना शक्यतो आपणाकडे असलेले औषधे डॉक्टारांनी लिहून द्यावीत म्हणजे संस्थान कर्मचा-यांना औषधांची उपलब्ध होऊन वैद्यकीय बील परतावा देणेकामी संस्थानचे आर्थिक नुकसानीचे प्रमाण कमी करता येईल.

११) औषधे वापरणारे डॉक्टर/ तत्रज्ञ यांच्या शिफारसीन्वये मागणी करण्यात येते परंतु, ब-याच वेळी असा अनुभव येतो की, सदर शिफारसी केलेले डॉक्टर / तत्रज्ञ सोडून गेल्यास ते औषधांचा वापर बंद केला जातो तसेच काही औषधांबाबत मागणी वर्षाचा खप पाहून मागणी केले जाते प्रत्यक्षात चालू वर्षात त्या औषधांचा खप इतका कमी होतो की, ते मटेरियल कधी– कधी मुदतबाह्य सुध्दा होते अथवा पुरवठाधारक परत घेत नाही त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्तयता नाकारता येत नाही. आपणाकडे बरेच पुरवठाधारक संस्थान खातर सेवाभावी म्हणून दर भारतात परंतु, त्यांचे मटेरियल न वापरताच त्यांना परत केल्यामुळे त्यांचे नुकसान होते त्यामुळे बरचसे पुरवठाधारक आपणाकडे निविदा भरण्यास तयार होत नाही. काही डॉक्टर/ तंत्रज्ञ हे Specific कंपनीच्या औषधांची मागणी करतात त्यामुळे सुध्दा आपणाकडील औषध साठ्यांचा वापर न झाल्याने ते पार्टीस परत करावे लागते अथवा पुरवठाधारकांने परत न घेतल्यास ते मुदतबाह्य होऊन संस्थानचे आर्थिक नुकसान होते तेंव्हा सदर कामी संस्थानचे डॉक्टर / तंत्रज्ञ यांना प्रथमतः औषध भांडारमधील असलेला साठ्यांचा वापर करावा जेणेकरुन आपणास पुरवठाधारकास औषध परत करणे अथवा औषध मुदतबाह्यता टाळता येऊन संस्थानचे आर्थिक नुकसान टाळता येईल.

१२) विभागाकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर मध्यवर्ती औषध भांडार विभागातील O.P.D. व्दारे राजीव गांधी योजनेतंर्गत पेशंटला ब्याच गोळया औषधे देण्यात येतात. सदरकामीचा खप पाहता त्यांची मागणी औषध भांडार विभागामार्फत वाढविण्यात आली असून, काही ठिकाणी प्राप्त मागणीचा विचार करता त्याचा खप पाहून मागणी नोंदविण्यात आली आहे.

१३) काही पुरवठाधारक मटेरियल वेळेत पुरवठा न केल्यामुळे सदर मटेरियल हे इतर पुरवठाधारकांकडून जास्तीची रक्कम अदा करुन खरेदी करावे लागते तेंव्हा जास्तीची रक्कम त्यांचे सुरक्षा रक्कमेतून किंवा चालू बिलांमधून वसूल करण्यात यावी.

१४) जर एखादे कंपनीस पुरवठा आदेश दिला व त्या कंपनीने पुरवठाकरणेकामी एखाद्या नजीकच्या विक्रेतामार्फत पुरवठा करणेकामी मान्यता घेतली असता कधी कधी सदर कंपनीधारक काही तांत्रिक कारणामुळे दुस -या विक्रेत्यांकडून पुरवठा करतो. त्यासाठी लागणारी मंजुरी ही मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने देण्यात यावी कारण याव्दारे संस्थानचे कोणतीही आर्थिक नुकसान होणार नसून त्याव्दारे मटेरिअल मागविण्यास अडचण येणार नाही.

१५) ब-याच वेळेस काही मटेरिअल हे पुरवठा आदेशाच्या मागणी पेक्षा जास्त प्राप्त होते अथवा काही मटेरिअल हे पुरवठा आदेश नसतानाही कंपनीकडून पाठविले जाते. त्याबाबत पुरवठा धारकांना वारंवार फोन तथा पत्र करुन सुध्दा पुरवठा धारक परत घेऊन जात नाही कधी-कधी ते मटेरिअल आपणाकडे पडून मुदतबाह्य सुध्दा होते. यामध्ये संस्थानचा कोणताही संबंध नसताना सदर बाबत लेखापरिक्षण मध्ये मुद्दा उठविला जातो. तेव्हा सदर कामी प्राप्त मटेरिअल हे जर पुरवठाधारकांनी परत नेले नाही तर ते मुदतबाह्य झाल्यास ते विहीत पध्दतीने नष्ट करण्यास वैद्यकीय संचालक यांना कार्यवाही करण्यास अधिकार देण्यात यावेत.

१६) रूग्णालयासाठी काही मशिन नव्याने खरेदी केल्यास त्याकामी लागणारे केमिकल्स/ कन्झुमेबल मटेरिअल हे नव्याने खरेदी करावे लागते पण त्यासाठी वार्षिक खरेदी कामीचे पुरवठा आदेशांची कार्यवाही ब-याच वेळेस पूर्ण झालेली असते तेव्हा सदर बाबत मशीन खरेदीच्या वेळेस त्यासाठी लागणारे केमिकल्स/ कन्झुमेबल मटेरिअल खरेदीकामी त्या पुरवठाधारकांसोबत १ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्तीचा करार करण्यात यावा म्हणजे मशीन वापरणे सोयीस्कर होईल.

१७) औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्यासाठी वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात यावी.

१८) ई-निविदांची संपूर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन सदर समितीने वेळोवेळी केलेली कार्यवाही एकत्रितरित्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवता येईल.

१९) सदर मागणीमध्ये काही मागणी ही Specific तथा Monopoly Item म्हणून असून काही मागणी पाहता निविदाधारकास त्यांची निविदा किंमत/ अनामत रक्कम भरणे सुध्दा परवडणार नसल्याने त्याकामी निविदा न प्राप्त झाल्यास सदरकामी रक्कम रु. ३००००००/- पर्यंतीची औषधे/ सर्जिकल साहित्य कोटेशन मागणी करुन खरेदी करता येईल म्हणजे आपणास पुढील फेर निविदा प्रक्रिया होईपर्यंत मटेरियलची कमतरता भासणार नाही.

२०) सर्व प्राप्त ई-निविदा हया मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात येऊन तांत्रिक बाबींची छाननी करुन तद्नंतर पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा Online उघडून खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

२१) सदर खरेदीमध्ये औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा तर On Consignment Basis वरील Stent/ Valve/ Balloon/ Pacemaker/ Devices इत्यादी आयटमची स्वंतत्र ई-निविदा करण्यात यावी.

२२) सन २०१६-१७ मधील खरेदी प्रक्रिया ही सन २०१७ मध्ये पूर्ण होणार असून त्यामध्ये देण्यात येणा-या पुरवठा आदेशातील माल पुढील वर्षामधील खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खरेदी करण्यास मान्यता असावी.

मागणी:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील १० ऑपरेशन थिएटर, ०६ आयसीसीयु, ०२ अपघात विभाग व इतर वॉर्ड तथा राजीव गांधी योजनेतंर्गत पेशंटला लागणारे वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीबाबत

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२ /भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२ – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तू निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकूण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय- सोबतच्या तक्त्यातील Annual Tender Req. 2016-17 या कॉलममध्ये केलेल्या मागणीनुसार औषधे, केमिकल्स, किरकोळ साहित्य, ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे एकूण रु.५५,९१,९१,८३६.२२ इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात होणारा खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो. वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६.२२ इतक्या खर्चास तसेच सदरकामी ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडून खरेदी करणेसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करुन औषधे खरेदीस व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते २२ चे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्ताव सन २०१६- २०१७ या वर्षासाठी औषधे/ सर्जिकल खरेदीबाबतचा होता, परंतु सन २०१६- २०१७ चा कालावधी संपुष्टात आलेला असून या आर्थिक वर्षामध्ये औषधे/ सर्जिकल साहित्यांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता वेळोवेळी अतिरिक्त खरेदीस मान्यता देण्यात आलेली होती. त्यामुळे सन २०१६- २०१७ साठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत यावा.**

या प्रस्तावामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदीकामी नमुद केलेली कार्यपध्दती सन २०१७-२०१८ या वर्षाच्या खरेदीसाठी राबविण्यात यावी व फक्त उत्पादकांकडूनच औषधे खरेदी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

यापुढे संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करतेवेळी ते वापरणाऱ्या संबंधीत डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यात येऊन, वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक यांचेसह रुग्णालय उपसमिती यांनी गुणवत्ता व दर याचा विचार करुन नामांकित कंपनीची औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करावे, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.०६ **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि.०१/०१/२०१७ पासून सर्वांसाठी मोफत करणेबाबतची नियमावली.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.९४४ दि.२२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि.०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार सर्वांसाठी मोफत करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

सदर निर्णयाची प्रत दि.०२/०१/२०१६ रोजी रुग्णालये विभागास प्राप्त झाल्याने, आदेश पारीत करण्यात येऊन रुग्णालय स्तरावर कार्यवाही सुरु करणेत आली आहे.

समाजातील गरीब व गरजू रुग्णांना खरोखरच मोफत उपचाराची गरज आहे. अशा रुग्णांना उपचारात सवलत मिळणे आवश्यक वाटते. श्री साईनाथ रुग्णालयात उपचारासाठी येणा-या नेमक्या कोणत्या रुग्णांना मोफत उपचार दयावेत याबाबत शंका आहे. ज्या रुग्णांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा जास्त आहे, असे रुग्ण देखील मोफत उपचारासाठी येऊ शकतात. त्यामुळे गरीब व गरजू रुग्ण यापासून वंचित राहू शकतात. यावर बंधन घालणेकामी व रुग्णालयाच्या दर्जा टिकवून ठेवणेकामी सदर मोफत उपचारांबाबत पुढीलप्रमाणे नियमावलीची आवश्यकता आहे. तसेच सदर नियमावलीत परिस्थितीनुरुप बदल करणेबाबतचे अधिकार वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांना देणेत यावेत असे मत आहे.

१) श्री साईनाथ रुग्णालयात उपचारांसाठी येणा-या रुग्णांची किमान वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रु. १ लाख पेक्षा कमी असावी. सदर रुग्णाकडे पिवळे किंवा केसरी रेशन कार्ड असेल किंवा तहसिलदार यांचेकडील रु. १ लाख पेक्षा कमी उत्पन्न दाखला असेल अशाच रुग्णांना मोफत उपचार देणेत यावेत.

२) श्री साईनाथ रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांच्या आवश्यक असलेल्या परंतु उपलब्ध नसलेल्या तपासण्यांसाठी श्री साईबाबा रुग्णालयाकडे रेफर होणा-या रुग्णांच्या सर्व तपासण्यांसाठी श्री साईबाबा रुग्णालयातील चॅरिटी नियमावलीप्रमाणे चॅरिटी करणेत येईल. (उदा. पिवळे व केशरी रेशन कार्ड, तहसीलदार यांचा रु. १ लाख पेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला)

३) श्री साईनाथ रुग्णालयातील कोणत्याही भरती रुग्णांना रक्त व रक्तघटकांची गरज पडते अशा वेळेस रक्तपिशव्या किंवा रक्तघटक श्री साईनाथ रक्तपेढीतून वेळोवेळी मोफत देणेत यावेत.

४) श्री साईनाथ रुग्णालयात बाहयरुग्ण विभागात आलेला रुग्ण १० रु. शुल्काच्या एका केसपेपरवर पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी इ. विभागातील तपासण्या करुन घेवू शकतो. तसेच एका रुग्णास एका दिवसात फक्त एकाच डॉक्टरांकडे उपचार घेता येतील. जर संबंधित डॉक्टरांनी दुस-या डॉटरांकडे रेफर केल्यास त्याच केसपेपरवर दुस-या विभागात तपासणीसाठी जाता येईल.

५) काही रुग्ण संस्थान रुग्णालयाव्यतिरिक्त इतर खाजगी डॉक्टरांनी सांगितलेल्या पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी व इतर तपासण्या श्री साईनाथ रुग्णालयात येवून करु शकणार नाहीत. तरी सदर खाजगी डॉक्टरांनी सांगितलेल्या तपासण्या रुग्णालयात करण्यात येवू नयेत.

६) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना वेळोवेळी ॲम्ब्युलन्स नियमावली (जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ १३/ २०१६) नुसार रुग्णवाहीका पुरविण्यात येते. तरी रुग्णांना इतर रुग्णालयात रेफर केल्यास रुग्णवाहीका अत्यावश्यक वेळेस मोफत देणेत यावी. परंतु रुग्ण डिसचार्ज असल्यास रुग्णास घरी जाणेकामी सदर नियमावलीचा आधार घेवून ॲम्ब्युलन्स सेवा मोफत देणेत येवू नये.

७) रुग्णालयातील रुग्णसेवेचा दर्जा टिकवून ठेवणेसाठी प्रत्येक विभागासाठी एका दिवसात ठराविक रुग्ण संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. यामुळे रुग्णालयातील सर्व विभाग व अपुरे मनुष्यबळावर ताण न येता रुग्णसेवा सुरळीत राहील. यासाठी केसपेपर विभागातून एका दिवसाला ८०० ओपीडी केसपेपर देणेत यावेत. तसेच केसपेपर विभाग सध्या सकाळी ८.३० ते दु. १२.३० व दु. २.०० ते सायं. ५.३० यावेळेत सुरु आहे. तरी सर्व ओपीडींची वेळ सकाळी ९ ते १.३० व दु. ३ ते सायं. ६.०० असावी.

याव्यतिरिक्त रुग्णालयातील अपघात विभाग २४ तास सुरु राहील. तसेच अपघात विभागात बाहयरुग्ण विभागांचे वेळापत्रकाव्यतिरिक्त फक्त तातडीचेच रुग्ण तपासले जातील. इतर जनरल आजारांचे रुग्ण तपासणेत येणार नाहीत.

८) रुग्णालयातील रुग्णांना बहुतेक वेळा रुग्णालयातून औषधे दिली जातात. परुतु, रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे तसेच ऑर्थो. इंप्लांटस, संस्थान रक्तपेढीत उपलब्ध नसलेले रक्त व रक्तघटक रुग्णाने स्वतः विकत आणावेत.

तरी सदर नियमावलीची अंमलबजावणी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि.०१/०१/२०१७ पासून सर्वांसाठी मोफत करणेत आलेले असून त्यासाठी प्रस्तावित केलेल्या नियमावली मधील अ.नं.०३, ०४, ०५ व ०६ या मुद्दयास मान्यता देण्यात आली.**

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकिय सेवा मिळत असल्यामुळे खाजगी वैद्यकिय व्यावसायिक त्यांचेकडील रुग्णांना वैद्यकिय चाचण्या करण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयात पाठवितात, अशा प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊ नये व याबाबत रुग्णांना कळविण्यासाठी तेथे फलक लावण्यात यावा.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोर-गरीब रुग्ण उपचार घेत असतात, याकरीता मोफत उपचार करणेसाठी आर्थिक निकष लावणेत येऊ नये. रुग्ण, रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उपचार घेऊ शकेल व जादा मनुष्यबळ वापरणेऐवजी आवश्यक त्या ठिकाणी नवीन सॉफ्टवेअर विकसीत करणेत यावे. तसेच संस्थान रक्तपेढीमध्ये रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध नसल्यास इतर रक्तपेढयांकडे रक्ताची मागणी करण्यात यावी, रक्त अथवा रक्तघटकां अभावी रुग्णांची गैरसोय होऊ देऊ नये. याकरीता इतर रक्तपेढयांबरोबर MOU करणेत यावा व रक्त दात्यांची यादीही बनविणेत येऊन, दि.०१ मार्च, २०१७ पासुन रुग्णांना रक्त व रक्त घटक मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेत यावी व केसपेपर विभागामध्ये काऊंटरची संख्या वाढविणेत यावी, असे ठरले.(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

विषय नं.०७ **श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणे व त्यासाठी सदरहू इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईनचे सल्लागार यांची नेमणूक करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय. :

१ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५६०.

२ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५८.

३ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५९.

प्रस्तावना: श्री साईबाबा संस्थानमार्फत गरजू रूग्णांचे सोयीसाठी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल सुरु असून, त्यापैकी नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिमेस श्री साईबाबा हॉस्पीटल व सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत (पूर्वीचे धर्मशाळा इमारतीत) श्री साईनाथ रुग्णालय कार्यान्वीत आहे. सदरहू रुग्णालयांमध्ये रुग्णांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. सदर हॉस्पीटलमध्ये येणा-या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने, तसेच सदरहु हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीब व गरजू रुग्णांना सेवा देणेत येत असल्याकारणाने हॉस्पिटलमध्ये बेडची संख्या कमी पडत आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरून तसेच दि.२३/१०/२०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांचे श्री साईनाथ रुग्णालयास भेटीचेवेळी दिलेल्या सुचनांनुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.

१. सर्व्हे नं. १४८ मध्ये श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील जागेत नविन इमारत बांधकाम करणेसाठी आर्कीटेक्ट नेमणूकीसाठी ईनिविदा- ऐवजी Request for Proposal मागविणे.

२. सध्याचे साईनाथ रुग्णालय इमारतींवर अधिक एक मजल्याचे बांधकाम करणे.

प्रस्ताव: श्री साईबाबा हॉस्पीटल विस्तारीकरण कामाचे वेळी नव्याने बांधण्यात आलेल्या पश्चिम बाजूकडील इमारत व दक्षिण बाजूकडील इमारत या दोन इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करता येईल तसेच सदरहु कामासाठी एफ.एस.आय. शिल्लक असल्याबाबत आर्कीटेक्ट काबरे चौधरी यांनी दि.२२/०१/२०१४ रोजीचे ई-मेलद्वारे अभिप्राय दिला आहे. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलचे उपरोक्त दोन इमारतीवर एका वाढीव मजल्याचे काम हाती घेता येईल. त्यासाठी सन २०१६-१७ चे जिल्हादरसूचीनुसार अंदाजे रु.२,६६,७५,९३२/- खर्च अपेक्षित आहे. परंतू या इमारतीवरील मजल्यांचे बांधकाम कालावधीमध्ये इतर मजले बंद ठेवावे लागतील. कॅथलॅब इत्यादींचा विचार करता ते व्यवहार्य होणार नाही.

करीता या परीसरातील सध्याचे ब्लडबॅन्क व जनरल वॉर्ड इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणेबाबत विचार करता येईल. सदरहु इमारतीचे बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर. सी. सी. कन्स्लटंट श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी केले आहे. त्यामुळे तिसरा मजला वाढविणे कामाबाबत इकडील दि.१९/११/२०१६ रोजीचे इ-मेलद्वारे आर. सी. सी. कन्स्लटंट, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आला आहे. श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी दि.२२/११/२०१६ रोजीचे इ-मेलद्वारे ब्लडबॅन्क इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणेबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..I had designed abovementioned work and accordingly the drawings were prepared and sent to you. The building is constructed as per those drawings. Referring to this design and drawings it is seen that the building was designed for G+Three stories. In actual G+2 stories are constructed and there is a provision of one storey. So additional floor can be constructed.

For that roof slab is to be designed. Slab area of the building is @2550 sq.ft. and consultancy charges are Rs.5 per sq.ft. so total charges will be Rs.12750. Site visit charges will be Rs.3000."

तसेच जनरल वॉर्ड इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणेबाबत करणेबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..I had designed abovementioned work and accordingly the drawings were prepared and sent to you. The building is constructed as per those drawings. Referring to this design and drawings it is seen that the building was designed for G+2 stories and accordingly G+2 stories are constructed hence there is no provision of additional storey. So RCC roof slab cann't be constructed over existing terrace to utilize it as third floor. However it can be utilized by removing waterproofing done over terrace, constructing light

weight ACC block walls along outer periphery, partition walls in furniture and providing precoated GI sheet roofing over terrace.

For that roof shed is to be designed. Shed area of the building is @4400 sq.ft. and consultancy charges are Rs.5 per sq.ft. so total charges will be Rs.22000. Site visit charges will be Rs.3000."

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल परीसरातील ब्लडबॅन्क व जनरल वॉर्ड इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणेस तसेच याकामी आर्कीटेक्ट व स्ट्रक्चरल कन्सल्टन्टची नेमणूक होणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीवर वाढीव मजल्याचे बांधकाम करणे व त्याकामी डिझाईन तयार करणेसाठी सल्लागाराची विहीत पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ब्लड बँक इमारतीचे वरील मजल्याचे बांधकाम आर.सी.सी. स्ट्रक्चर मध्ये व वार्ड/ कॅथलॅब इमारतीवरील मजल्याचे बांधकाम स्टील स्ट्रक्चरमध्ये फॉम शिट/ टीन शिट छतासह करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.०८ **श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन सॉफटवेअर (HMIS, PACS, TELEMEDICINE) प्रणाली संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन अद्ययावत संगणकीय साहीत्य व संगणकीय प्रणाली खरेदी करणेसाठी लागणा-या अंदाजे खर्चाचा प्रस्ताव दि. 09/10/2016 रोजी मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर केला असता, सदरचा विषय संदर्भ क्र. 1 नुसार दि. 10/10/2016 रोजीचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर ठेवण्यात यावा असे ठरले. त्यानुसार, दि. 10/10/2016 रोजी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत उपसमितीने अवलोकन केले असता त्यामध्ये प्रिंटर्सची संख्या जास्त दिसून येते, प्रिंटरची संख्या कमी करणेसाठी रुग्णांचे शक्य तेवढे रिपोर्टस् इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे रुग्णांना देण्याची व्यवस्था करावी व रुग्णालयामधील प्रत्येक विभागासाठी आवश्यकतेनुसार एकाच प्रिंटर्सचा समावेश करणेत येऊन नविन अंदाजपत्रक तयार करणेत यावे तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता विकसीत करावयाच्या संगणकीय प्रणालीचे स्वरुप व हार्डवेअर कसे असावे हे निश्चित करणेसाठी रुग्णालयाच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी इतर ठिकाणच्या मोठया रुग्णालयामधील संगणकीय प्रणालीचे पाहणी करुन फेरप्रस्ताव सादर करावा अशी उपसमितीने शिफारस केलेली आहे.

तसेच, संदर्भ क्र.2 नुसार दि. 30/09/2016 रोजीचे परिपत्रकान्वये, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयासाठी कार्यान्वित करावयाची ई-निविदा प्रसिद्ध करण्यापुर्वी मा. विश्वस्त श्री. प्रताप भोसले साहेब यांचेशी चर्चा करावी, असे कळविले आहे. त्यानुसार इकडील विभागाने मा. श्री. प्रताप भोसले साहेब यांचे सुचनेनूसार व मार्गदर्शनानुसार त्यांचे समवेत रुग्णालयाच्या संबंधीत अधिकारी यांनी पुणे येथील नोबेल हॉस्पिटलची संगणकीय प्रणाली पाहणेकामी शुक्रवार, दि. 14/10/2016 रोजी समक्ष भेट दिलेली असून त्याचा अहवाल संदर्भ क्र. 3 अन्वये सादर केलेला आहे. सदर भेटीदरम्यान विविध नामांकित कंपन्यांना श्री साईबाबा हॉस्पिटल येथे रुग्णालयाचे संबंधीत User समोर संगणकीय प्रणालीचा डेमो दाखविण्याचे आयोजन करावे असे ठरले. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. 21/10/2016 ते 27/10/2016 रोजी मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा.लि. कोल्हापुर, बिर्लामेडीसॉफ्ट प्रा.लि. पुणे., केअरसॉफ्ट ठाणे, पलश हेल्थकेअर सोल्युशन प्रा.लि. पुणे व मे. सॉफ्टस्क्रिप्ट सिस्टीम ॲन्ड सर्व्हिसेस लि. मुंबई इ. कंपन्यांचे डेमो संबंधीत User समोर घेण्यात आलेले आहेत. तसेच, दरम्यानचे काळात मा. अध्यक्ष साहेब यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 4 नुसार - दि. 23 व 24 ऑक्टोबर 2016 रोजी हॉस्पिटलमध्ये घेतलेल्या राऊंडमध्ये हॉस्पिटलसाठी Telemedicine सुविधा घेणेकरीता सुचविलेले आहे. त्यानुसार इकडील विभागाने सदरचे सुविधा सुरु करणेबाबत विविध कंपन्यांकडून अंदाजीत दरपत्रके घेतलेले आहेत.

उपरोक्त नमुद अधोरीखीत केलेल्या शिफारशीप्रमाणे, नविन संगणकीय प्रणाली व अनुषांगीक साहित्य खरेदी करणेचा फेरप्रस्ताव तयार करणेकामी इकडील विभागाने प्रथमत: दोन्ही हॉस्पिटलमधील आवश्यक असणाऱ्या साहित्यांबाबत विभागप्रमुखांकडून मागणी (Requirement) घेतलेली असून त्याबाबतचा सर्वे इकडील विभागामार्फत केलेला आहे. तसेच, दोन्ही हॉस्पिटलमधील आवश्यक व अनावश्यक प्रिंटर्सबाबत दि. 01/11/2016 रोजी डिजिटल ऑफिस, नाशिक यांचेमार्फत, तसेच दि. 05/12/2016 रोजी Sharp Imaging, Ahmednagar यांचेमार्फत, तसेच केबल्स व तत्सम साहित्य वापरणेबाबतची खात्री करणेकामी व नविन नेटवर्क जाळयाची उभारणी करणेकामी दि. 08/11/2016 रोजी Active Network बाबत संगणकीय नेटवर्क क्षेत्रात नामांकीत असलेली Cisco या कंपनीमार्फत, तसेच दि. 09/12/2016 Tyco या कंपनीचे प्रतींनिधी दोन्ही हॉस्पिटलमध्ये आवश्यक असलेल्या Passive Network (Cat-6 केबल व Fiber केबल) बाबत तसेच, दि. 21/12/2016 रोजी सर्व्हरचा सर्व्हे Dell या कंपनीमार्फत इ. सर्वे करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त परिच्छेदमध्ये नमुद, सर्व्हे केलेल्या सर्व कंपन्यांचे प्रतिनिधींशी इकडील विभागाने चर्चा केली असता, नव्याने घेण्यात येणाऱ्या संगणकीय प्रणालीकरीता कोणकोणत्या प्रकारचे किती प्रिंटर्स, बारकोड प्रिंटर्स, बारकोड स्कॅनर्स असे इ. साहीत्य निश्चित नाहीत., तसेच, सर्व्हरची क्षमता किती असावी तसेच सर्व्हरकरीता कुठली डेटाबेस प्रणाली वापरावी., तसेच सध्याचे कार्यान्वित असलेले स्विचेस हे जुने झालेले असून ते Manageable नाहीत. तसेच सध्या कार्यान्वित असलेल्या Cat-6 केबल व Fiber केबल या देखील जुन्या झाल्याने ते नविन प्रणालीकरीता अडचणीचे होऊ शकते, असे संबंधीत प्रतिनीधींनी सांगीतले त्याअनुषंगाने, रुग्णालयासाठी नविन संगणकीय प्रणालीची खेरदी प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निश्चित झालेल्या संबंधीत सॉफ्टवेअर कंपनीशी समन्वय साधून, त्यांचे सॉफ्टवेअर करीता आवश्यक (Compatible) असणारे सर्व्हर, प्रिंटर्स व इतर अनुषांगीक साहित्यांसहीत Active व Passive नेटवर्क करीता लागणारे साहीत्य नव्याने संस्थानचे विहित पद्धतीने खरेदी करता येतील, असे नम्र मत आहे.

तसेच, मा. विश्वस्त साहेब यांचेशी चर्चा करून त्यांचे सुचनेनुसार दि. 27/12/2016 रोजी Seven Hills हॉस्पिटलला संबंधीत अधिकारी यांचे समवेत भेट देण्यात आलेली असून त्याचा अहवाल संदर्भ क्र. 5 अन्वये सादर केलेला आहे. सदर हॉस्पिटलमधील अधुनिक तंत्रज्ञान पाहता संस्थानचे रुग्णालयाचे अधुनिकीकरण करणेकरीता प्रथमत: संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता नव्याने संगणकीय प्रणाली खरेदी करणेबाबत मा. विश्वस्त श्री. भोसले साहेब यांचेशी चर्चा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार इकडील विभागामार्फत सॉफ्टवेअर प्रणाली. (HMIS – Hospital Management Information System.), PACS- (Picture Archiving and Communication System), Telemedicine System या सुविधा पुरवित असलेल्या विविध कंपन्यांशी संपर्क साधुन त्यांचेकडून संबंधीत प्रणालीचे अंदाजीत दरपत्रके मागविण्यात आलेली असून ते खालीलप्रमाणे-

परिशिष्ट "अ"

सॉफ्टवेअर प्रणाली - (HMIS – Hospital Management Information System.)

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता संगणकीय प्रणाली (**HMIS**), खरेदी करणेकरीता अंदाजीत खर्च ठरविणेकामी विविध नामांकीत कंपन्यांशी ई-मेल द्वारे संपर्क साधुन उपरोक्त संदर्भ क्र. 6 अन्वये दरपत्रके मागविलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

सॉफ्टवेअर प्रणालीकरीता अंदाजीत दरपत्रके-

अ.नं.	**सॉफ्टवेअर कंपनी नावे**	**सॉफ्टवेअर (HMIS) करीता अंदाजीत रक्कम (इन्स्टॉलेशन/ इम्प्लिमेन्टेशन सह)**	**देखभाल दुरुस्ती AMC (%)**	**देखभाल दुरुस्ती प्रती वर्षी**	**देखभाल दुरुस्ती पुढील 4 वर्षाकरीता**
1	बिर्ला मेडीसॉफ्ट प्रा.लि. पुणे.	70,65,000/-	10 **(%)**	7,06,500/-	28,26,000/-
2	पलश हेल्थकेअर सोल्यु. प्रा.लि. पुणे.	90,00,000/-	-	-	72,00,000/-
3	केअरसॉफ्ट हॉस्पिटल इन्फॉरमेशन सिस्टीम.	30,00,000/-	15 (%)	4,50,000/-	18,00,000/-
4	मनोरमा इन्फो.सोल्यु. प्रा.लि. कोल्हापुर	77,25,000/-	-	13,55,200/-	54,20,800/-
5	सेव्हन हिल्स हॉस्पिटल,मुंबई.	1,60,00,000/-	18 **(%)**	21,60,000/-	86,40,000/-
	एकूण रक्कम	**4,27,90,000/-**			**2,58,86,800/-**

उपरोक्त तत्क्यात विविध कंपन्यांनी त्यांचे सॉफ्टवेअरकरीता व पुढील 4 वर्षाकरीता साहित्य देखभाल दुरुस्ती (AMC) चे दर दिलेले असून त्या दरांची सरासरी रक्कम काढण्यात आलेली असून ती खालील तत्क्यात नमुद केलेली आहे.

सॉफ्टवेअरकरीता (HMIS) **सरासरी रक्कम**	85,58,000/-
सॉफ्टवेअर देखभालीची (AMC) **सरासरी रक्कम**	51,77,360/-
सॉफ्टवेअरची (HMIS) + **सॉफ्टवेअर** देखभाल (AMC) सरासरी रक्कम	1,37,35,360/-

परिशिष्ट "ब"

PACS - (Picture Archiving and Communication System)

रेडीओलॉजी विभागातील केल्या जाणाऱ्या सर्व तपासण्यांचे (MRI, CT-Scan, X-Ray इ.) रिपोर्टच्या प्रिंट ऐवजी ऑनलाईन स्वरुपात डॉक्टरांना रिपोर्टींग करता यावे याकरीता PACS (Picture Archiving and Communication System) ही प्रणाली खरेदी करणेकरीता अंदाजीत खर्च ठरविणेकामी विविध नामांकीत कंपन्यांशी ई-मेल द्वारे संपर्क साधुन उपरोक्त संदर्भ क्र. 7 अन्वये दरपत्रके मागविलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

PACS प्रणालीकरीता अंदाजीत दरपत्रक-

अ.नं	PACS कंपनी	PACS करीता अंदाजीत रक्कम	देखभाल दुरुस्ती AMC (%)	देखभाल दुरुस्ती प्रती वर्षी	देखभाल दुरुस्ती पुढील 4 वर्षाकरीता
1	मेडीसिनॅप्टीक प्रा.लि. पुणे.	36,50,000/-	10 (%)	3,65,000/-	14,60,000/-
2	सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मुंबई	29,00,000/-	18 (%)	5,22,000/-	20,88,000/-
3	मेडपॅक सिस्टीम, बेंगलोर	6,00,000/-	15 (%)	90,000/-	3,60,000/-
	एकूण रक्कम	**71,50,000/-**			**39,08,000/-**

उपरोक्त नमुद तक्त्यात विविध कंपन्यांनी त्यांचे PACS करीता व पुढील 4 वर्षाकरीता वर्षाकरीता AMC दर दिलेले असून त्या दरांची सरासरी रक्कम काढण्यात आलेली असून ती खालील तत्क्यात नमुद केलेली आहे,

PACS **करीता सरासरी रक्कम**	23,83,333/-
सॉफ्टवेअर देखभाल करीता सरासरी रक्कम	13,02,667/-
PACS + **सॉफ्टवेअर देखभाल सरासरी रक्कम**	36,86,000/-

परिशिष्ट "क"

टेलिमेडीसीन प्रणाली. (Telemedicine System)

तसेच, मा. अध्यक्ष साहेब यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 4 नुसार - दि. 23 व 24 ऑक्टोबर 2016 रोजी हॉस्पिटलमध्ये घेतलेल्या राऊंडमध्ये हॉस्पिटलसाठी **Telemedicine** सुविधा घेणेकरीता सुचविलेले आहे. त्यानुसार सदरची प्रणाली खरेदी करणेकरीता अंदाजीत खर्च ठरविणेकामी विविध नामांकीत कंपन्यांशी ई-मेल द्वारे संपर्क साधुन उपरोक्त संदर्भ क्र. 8 अन्वये दरपत्रके मागविलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

Telemedicine सुविधेकरीता अंदाजीत दरपत्रक-

अ.नं.	टेलिमेडीसीन कंपनी	टेलिमेडीसीनकरीता अंदाजीत रक्कम (इन्स्टॉलेशन/ इम्प्लिमेन्टेशन सह)	देखभाल दुरुस्ती AMC (%)	देखभाल दुरुस्ती प्रती वर्षी	देखभाल दुरुस्ती पुढील 4 वर्षाकरीता
1	**पलश हेल्थकेअर सोल्यु. प्रा.लि. पुणे.**	10,50,000/-	-	2,00,000/-	8,00,000/-
2	मनोरमा इन्फो.सोल्यु. प्रा.लि. कोल्हापुर	13,66,000/-	15 (%)	2,04,900/-	8,19,600/-
3	मेडपॅक सिस्टीम, बेंगलोर	3,00,000/-	-	-	-
	एकूण रक्कम	**27,16,000/-**			**16,19,600/-**

उपरोक्त नमुद तत्क्तयात विविध कंपन्यांनी त्यांचे Telemedicine करीता व **पुढील** 4 **वर्षाकरीता** AMC दर दिलेले असून त्या दरांची सरासरी रक्कम काढण्यात आलेली असून ती खालील तत्क्यात नमुद केलेली आहे.

टेलिमेडीसीनची सरासरी रक्कम	9,05,333/-
सॉफ्टवेअर दुरुस्तीची सरासरी रक्कम	5,39,867/-
टेलिमेडीसीनची + सॉफ्टवेअर दुरुस्तीची सरासरी रक्कम	14,45,200/-

तरी, उपरोक्त् नमुद केलेप्रमाणे **(परिशिष्ट "अ") , (परिशिष्ट "ब") व (परिशिष्ट "क")** करीता **पुढील** 4 **वर्षाकरीता** AMC सहीत एकत्रित अंदाजीत दर खालीलप्रमाणे,-

HIMS + AMC	1,37,35,360/-
PACS + AMC	36,86,000/-
Telemedicine +AMC	14,45,200/-
एकत्रित अंदाजीत दर	1,88,66,560/-

HIMS प्रणाली, PACS सिस्टीम व TELEMEDICINE सुविधेचे AMC सहीत एकत्रित अंदाजीत दरातुन उपरोक्त नमुद दि. 06/01/2017 रोजीचे संदर्भ क्र. 9 चे परिपत्रकानुसार HMIS करीता अंदाजीत रक्कमेपैकी 30% रक्कम कमी करुन येणारी अंदाजीत रक्कम खालील प्रमाणे-

एकत्रित अंदाजीत दर	1,88,66,560/-
एकत्रित अंदाजीत दर - 30 %	56,59,968/-
एकुण अंदाजीत रक्कम (कर विरहीत)	**1,32,06,592/-**

उपरोक्त नमुद विविध कंपन्यांचे अंदाजीत दरपत्रकानुसार परिशिष्ट "अ", परिशिष्ट "ब" व परिशिष्ट "क" - असे एकित्रत (HIMS, PACS, TELEMEDICINE) प्रणाली पुढील 4 वर्षाकरीता AMC सहीत खरेदी करणेकरीता, अंदाजीत रक्कम रु. 1,32,06,592/- (कर विरहीत) इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी, उपरोक्त विषयांकीत प्रकरणी श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता सॉफ्टवेअर (HMIS, PACS, TELEMEDICINE) खरेदी करणेकामी (पुढील 4 वर्षाकरीता) AMC सहीत अंदाजीत एकूण रक्कम रु. 1,32,06,592/- (एक कोटी बत्तीस लाख सहा हजार पाचशे ब्यान्नो रुपये) मात्रचे (कर विरहीत) खर्चास, तसेच सदरची कार्यवाही संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे होणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर !

निर्णय क्र.०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन सॉफटवेअर (HMIS, PACS, TELEMEDICINE) प्रणाली संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू प्रणाली खरेदी केल्यानंतर त्या सॉफ्टवेअरला सुसंगतअसे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.०९ **साईटेक प्रकल्प टप्पा- 2 साठी ई-निविदा प्रक्रिया राबविणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१५रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२९

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२

प्रास्ताविक : साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल २०१७ मध्ये संपुष्टात येणार आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली व अनुषंगिक बाबींची पुढील काळासाठी दुरुस्ती व देखभाल करणेकामी नविन कंपनीची नेमणुक करण्यासाठीची प्रक्रिया संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार इकडील विभागाकडून सुरु करण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२९ नुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडुन अंतिम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" करणेकामी ई-निविदा राबवुन नविन कंपनीची नेमणुक करणेसाठी M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांचे एक वर्षाकरीताचे निम्नत्तम दर रक्कम रुपये ३८,४०,०००/- मात्र मान्य करण्यात येऊन त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७२ दि. २३/०८/२०१६ रोजी अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांचे प्रतिनीधींनी प्रत्यक्ष शिर्डी येथे येऊन साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली व त्यांचे तांत्रिक बाबींचा अभ्यास केलेला आहे. तसेच संस्थानचे विविध विभागांना भेटी देऊन कार्यप्रणालीबाबत त्यांचे अभिप्राय व करावयाच्या सुधारणा याबाबत माहिती घेतलेली आहे. सदर माहितीचे अधारे M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांचे प्रतिनीधींनी साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल निविदा प्रक्रीयेबाबतचे सादरीकरण मा. व्यवस्थापन समितीसमोर दि. ०१/१२/२०१६ रोजी सादर केलेले आहे. M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांनी सादरीकरणामध्ये, ई-निविदा प्रक्रिया राबवुन पुरवठाधारकाची नेमणुक करणेकामी रु. २०.९१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानासह) अथवा रु. २३.६१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानाविरहीत) इतका खर्च येईल असे नमुद केलेले आहे. यावेळी मा. अध्यक्ष सो. यांनी निविदेचा मसुदा लवकरात-लवकर सादर करणेस M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांना सुचित केलेले होते. त्यास अनुसरून M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांनी दि. २८/१२/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदेचा मसुदा इकडील विभागास सादर केलेला आहे.

निविदा मसुद्याबाबत इकडील विभागाच्या शंकाबाबत तसेच आवश्यक सुधारणांबाबत चर्चा करणेसाठी M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांचे प्रतिनीधींना शिर्डी येथे बोलविण्यात आले होते. त्यानुसार त्यांचे प्रतिनीधींनी दि. ११/०१/२०१७ रोजी शिर्डी येथे येऊन मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे

कक्षात प्रशाकीय अधिकारी व आयटी विभाग यांचेशी सविस्तर चर्चा करुन यांना मसुद्यामध्ये असलेल्या शकांचे निरसन तथा आवश्यक असलेल्या बदलाची नोंद घेतलेली आहे.

M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांचेकडून अंतिम मसुदा प्राप्त झालेनंतर, संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणुक करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्प करारनाम्यानुसार मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल २०१७ अखेर संपुष्टात येणार असल्याने, "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" साठी नविन कंपनीची नेमणुक करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांनी नमुद केलेप्रमाणे येणा-या रु.२०.९१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानासह) अथवा रु. २३.६१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानाविरहीत) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुनअनुमान : तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- साईटेक प्रकल्प करारनाम्यानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल २०१७ अखेर संपुष्टात येणार असल्याने, "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" साठी नविन कंपनीची नेमणुक करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbai यांनी नमुद केलेप्रमाणे येणा-या रु.२०.९१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानासह) अथवा रु.२३.६१ कोटी (क्लाउड तंत्रज्ञानाविरहीत) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे समभेसमोर सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.०९ **उपरोक्त विषयावर चर्चा सुरु असताना समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी सभेस अशी माहिती दिली की, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे संस्थानमध्ये चाललेले काम समाधानकारक नाही व जोपर्यंत समाधानकारक काम होत नाही, तोपर्यंत त्यांचे पुर्ण बील देण्यात येऊ नये, या आशयाचे पत्र संस्थानला दिलेले होते. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीने सदरहू पत्र श्रीप्रताप भोसले यांना दाखवून आमचे बील का थांबविले, अशी विचारणा केली. सदर बाब गंभीर आहे. यापुर्वीही या कंपनीचे कामकाज समाधानकारक नसलेचे व त्यांचेकडून योग्य सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, समितीने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. संस्थानला दिलेले पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीकडे कसे गेले, याचबरोबर मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे ही कंपनी व त्यामधील भागीदारी याची मुख्यलेखाधिकारी यांनी चौकशी करुन समितीसमोर अहवाल सादर करावा. तसेच या कंपनीकडून संस्थानचे सोर्स कोड काढून घेण्यात यावे असे ठरले.

तसेच साईटेक प्रकल्प टप्पा- २ साठी या क्षेत्रातील नामांकित कंपन्यांकडून ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.१० **साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेली संगणके व संगणकीय साहित्याचे Facility Management support साठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम 2004 मधील तरतुद :- 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. 01) दि.07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799. 02) दि.16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र.529.

प्रास्ताविक: मा.व्यवस्थापन समितीचे दि.07/11/2009 रोजचे सभेतील निर्णय क्र.799 अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रकल्प उभारणीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्रं. 3.02-08 नुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व संगणके व संगणकीय साहित्यांची 60 महिने दुरुस्ती व देखभाल हि कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी पाहणे अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचा कालावधी 31 जुलै 2016 रोजी संपुष्टात आला आहे. तसेच करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पाचा कालावधी एप्रिल -2017 अखेर संपुष्टात येणार आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहाव्यात व साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरिता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत पुढील 6 महिन्यांकरीता संगणके व संगणकीय साहीत्य यांचा Functional Support चालु ठेवणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 529 नुसार प्रतिमाह रक्कम रु. 3,62,000/- (अधिक कर) खर्चास मान्यता मिळाल्याने, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दि. 29/09/2016 रोजीचे पत्राने कार्यादेश देण्यात आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाची दुरुस्ती देखभालीसाठी नविन कंपनी नेमणेकामी M/s. KPMG यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबविणेकामी त्यांना कार्यादेश देण्यात आलेला असुन त्याबाबतची कार्यवाही चालु आहे.
कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत चालु असलेल्या Facility Management support ची मुदत जानेवारी - 2017 अखेर संपुष्टात येत आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालु राहाव्यात याकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्ती व दरानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देता येईल व त्यांचे याकामी येणारे बील त्यांनाअदा करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी: प्रस्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची साईटेक प्रकल्प Facility Management support ची मुदत जानेवारी -2017 अखेर संपुष्टात येत असल्याने, त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्ती व दरानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व त्याकामी त्यांचे येणारे बील अदा करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : प्रशासकीय व तांत्रिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत: प्रस्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची साईटेक प्रकल्प Facility Management support ची मुदत जानेवारी -2017 अखेर संपुष्टात येत असल्याने, त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्ती व दरानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व त्याकामी त्यांचे येणारे बील अदा करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेली संगणके व संगणकीय साहित्याचे Facility Management support ची मुदत जानेवारी, २०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने याकामीची नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.११ **आयकर कायद्यातील तरतूदीन्वये दि.३१.०३.२०१६ अखेर शिल्लक असलेल्या अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ वे कलम १० (२३) (सी) (V) अन्वये करमुक्त आहे. सन २००२ मधील सुधारित तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि, ते शक्य न झाल्यास उत्पन्नापैकी अखर्चित राहीलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पुर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर लागू असलेल्या दराने आयकर आकारणी केली जाईल.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे आयकर रिटर्न दि.१६ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयकर कार्यालयाकडे दाखल केलेले आहे. त्यानुसार दि.३१ मार्च, २०१६ अखेर अखर्चित उत्पन्न खालीलप्रमाणे शिल्लक आहे.

अ.क्र.	आर्थिक वर्ष	शिल्लक अखर्चित रक्कम (रुपये)	खर्च करावयाची अंतिम मुदत
१	२०११-१२	१०८,८१,८८,४४३/-	३१.३.२०१७
२	२०१२-१३	१८३,२६,८४,५५६/-	३१.३.२०१८
३	२०१३-१४	३४३,९१,४२,४२५/-	३१.३.२०१९
४	२०१४-१५	२३०,८४,२६,८४३/-	३१.३.२०२०
५	२०१५-१६	२२४,५५,८९,३७७/-	३१.३.२०२१
	एकूण -	**१०९१,४०,३१,६४४/-**	

कोणत्याही वर्षात एकूण उत्पन्नाच्या पूर्ण ८५ % रक्कम खर्च न झाल्यामुळे अखर्चित उत्पन्नाचा आकडा दरवर्षी वाढत गेला असून, दि.३१.३.२०१६ रोजी एकूण अखर्चित उत्पन्न रक्कम रु.१०९१.४० कोटींवर पोहचले आहे. म्हणजेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये कमीत कमी रक्कम रु.१०८.८२ आणि जास्तीत जास्त रक्कम रु. १०९१.४० एवढी खर्च करता येईल. याबाबत संस्थानचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता नेमण्यात आलेल्या आयकर सल्लागार श्री.एस.जी.अंदाणी, चाटर्ड अकौंटंट, अहमदनगर याचे अभिप्राय घेतले असून, त्यांनी चालू आर्थिक वर्षामध्ये माहे डिसेंबर २०१६ अखेर एकूण रककम रु. ७६.८४ कोटी एवढी रक्कम खर्च झालेली असून, उर्वरीत रक्कम रु. ३१.९८ कोटी मार्च २०१७ अखेर खर्च होणे आवश्यक असल्याचे पत्राव्दारे कळविलेले आहे.

उपरोक्त नमुद दि. ३१ मार्च, २०१६ अखेरचे अखर्चित उत्पन्न रु. १०९१.४० कोटी एवढी रक्कम सन २०२०२१ या आर्थिक वर्षाअखेर टप्या-टप्याने खर्च करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. अन्यथा अखर्चित उत्पन्नावर त्या-त्या वर्षासाठी लागू असलेल्या दराने आयकर भरावा लागेल.

तरी प्रत्येक वर्षात वाढणा-या उत्पन्नाच्या प्रमाणात खर्चातही त्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक असून वर नमूद केल्याप्रमाणे करावयाचे खर्चाबाबत धोरणात्मक निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायद्यातील तरतूदीन्वये दि.३१.०३.२०१६ अखेर शिल्लक असलेल्या अखर्चित उत्पन्नाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

तसेच दि.३१.०३.२०१६ अखेर शिल्लक असलेल्या अखर्चित उत्पन्नाच्या खालीलप्रमाणे विनियोग करणेत यावा, असे ठरले.

संस्थानमार्फत अतिदुर्गम/ आदिवासी/ पहाडी भागातील गोर-गरीब, आदिवाशी रुग्णांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेत असून, या प्रकल्पासाठी खरेदी करावयाच्या ५०० वाहनांचा खरेदी आदेश देण्यात यावा व प्रथमत: रुग्णवाहिकेसाठी १०० वाहने खरेदी करणेत यावी. यासाठी साईभक्तांनी दिलेल्या देणगी रक्कम कमी पडत असल्यास उपरोक्त अखर्चित रकमेचा वापर करणेत यावा व साईभक्तांकडून रुग्णवाहिका प्रकल्पासाठी येणारी देणगी यामध्ये समाविष्ट करणेत यावी.

संस्थानमार्फत आय.ए.एस. अकॅडमी सुरु करणेसाठी देणगी स्वरुपात घ्यावयाच्या इमारतींचे मुद्रांकव नोंदणी शुल्क भरणेकामी तसेच साईसमाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर साईभक्तांच्या सुविधेसाठी प्राधान्याने आवश्यक असणारे रस्ते तयार करणेसाठी अखर्चित उत्पन्नातील रकमेचा वापर करणेत यावा.

संस्थानची पाणी पुरवठा योजनेमधील पाईपलाईन्स खराब झालेल्या असल्यामुळे वेळोवेळी लिकेज होत असतात, या अखर्चित उत्पन्नातील रकमेचा वापर करणेत येऊन, या पाईपलाईन्स बदलविणेत याव्यात. तसेच नवीन पाईपलाईन योजनेसाठीही या रकमेचा वापर करणेत यावा.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ बांधकाम विभागप्रमुख/ पाणी पुरवठा विभागप्रमुख)

विषय नं.१२ **जनसंपर्क कार्यालयाचे सशुल्क दर्शन/ आरती पास वितरण काऊंटर सध्याचे साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे ठिकाणी स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नुतणीकरण करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा -अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना- दरवर्षी नववर्षानिमित्त देशभरातून व जगभरातून लाखो साईभक्त श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येतात. या वर्षी नाताळ व नववर्षारंभ कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांसाठी उपलब्ध करावयाच्या सोयी सुविधांबाबत दि.२२/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष सो.,मा. उपाध्यक्ष सो., मा. विश्वस्त श्री. सचिन तांबे, कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी जुने प्रसादालय परिसराची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान मा. अध्यक्ष सो. यांनी खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१) जनसंपर्क कार्यालयाचे सध्याचे सशुल्क दर्शन/आरती पास वितरण काऊंटर साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालयात स्थलांतरीत करावे.

२) सध्याचे साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालयात एकूण १० दर्शन/आरती पास वितरण काऊंटर्स सुरु करावे.

३) साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालय जनसंपर्क कार्यालयाचे सध्याचे दर्शन/आरती पास वितरण काऊंटरचे जागेत स्थलांतरीत करावे.

मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेले सूचनेप्रमाणे सध्याचे सशुल्क दर्शन/आरती पास वितरण काऊंटर साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालयात स्थलांतरीत करावयाचे झालेस सदर जागेत १) १० दर्शन/आरती पासेस वितरण काऊंटर २) साईभक्तांना बसण्यासाठी प्रतिक्षा गृह ३) जनसंपर्क अधिकारी कक्ष ४) स्टोअर रुम आदि बाबी करावयाचे झालेस सदर जागा अपुरी पडते. या कार्यालयाची एकूण जागा १२३.११ चौ. मी. इतकीच आहे व यासाठी एकूण रु.१७,६७,२७३/- मात्र इतका अपेक्षित खर्च आहे.

दि.२५/०१/२०१७ रोजी मुंबई येथे मा. अध्यक्ष सो. यांचेसमवेत मा. कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, उपकार्यकारी अभियंता(बांधकाम) यांची बैठक झाली. सदर बैठकी दरम्यान वरील

विषयांकित काऊंटर साईप्रसाद निवासस्थान विभाग कार्यालय येथे स्थलातंरीत करणे अथवा आहे त्याच ठिकाणी विस्तारीकरण व नूतनीकरण करणे अशा दोन्ही पर्यायांचे नकाशे सादर करुन त्यावर चर्चा करणेत आली. त्यावेळी सध्याचे साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालयात स्थलांतर करणेच्या पर्यायानुसार काम करणेत यावे अशी सूचना मा. अध्यक्ष सो. यांनी दिली आहे.

प्रस्ताव- तरी वरीलप्रमाणे जनसंपर्क कार्यालयाचे दर्शन/आरती पास वितरण काऊंटर स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नूतनीकरण करणेसाठी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) सदर काऊंटर साईप्रसाद निवासस्थान विभागाचे कार्यालयाचे ठिकाणी स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नूतनीकरण करणेस व त्यासाठी अपेक्षित खर्च रु.१७,६७,२७३/- मात्रला मान्यता मिळणेस विनंती.

2) सदर नियोजित कामासाठी बांधकाम विभागांतर्गत इंटेरिअर डिझाईन-ड्रॉईंग तयार करुन त्यानुसार काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जनसंपर्क कार्यालयाचे सशुल्क दर्शन/ आरती पास वितरण काऊंटर सध्याचे साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे ठिकाणी स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नुतणीकरण करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

सदर नियोजित कामासाठी विभागांतर्गत इंटेरीअर डिझाईन- ड्राईंग तयार करुन त्यानुसार काम करुन घेण्यात यावे.

तसेच जनसंपर्क कार्यालयाचे नाव स्वागतकक्ष व जनसंपर्क अधिकारी यांचे पदनाम स्वागताधिकारी असे करणेत यावे. व्ही.व्ही.आय.पी. साईभक्तांसाठी दर्शन पासवर रबरी शिक्के मारुन पुढील (नंदी/ अभिषेक गेट) गेटने दर्शनासाठी प्रवेश दिला जातो. दि.०१ मार्च, २०१७ पासुन सदर रबरी शिक्के बंद करणेत यावे व पुढील गेटसाठी साईटेक प्रकल्पांतर्गत बारकोडचा वापर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सा. प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ बांधकाम/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.१३ **विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा -अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक- मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक२२.१२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७१.

प्रस्ताविक– मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.१२.२०१६ चे सभेत विशिष्ट स्वरुपाची देणगी देणा-या साईभक्तांस तहयात विनापास/मोफत दर्शन/आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा. यासाठी मुल्य निश्चित करणेत येऊन, गोल्डन कार्डसारखी योजना राबविणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा अशा सुचना केल्या आहेत.

श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोप-यासह जगभरातून साईभक्त शिर्डीत येत असतात. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेले हे साईभक्त आपआपल्या इच्छाशक्तीप्रमाणे बाबांना देणगी अर्पण करतात. कोणी देणगी पेटीत देणगी टाकतात तर कोणी देणगी काऊंटरकडे देणगी देतात. साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधूनच श्री साईबाबा संस्थान साईभक्तांसाठी विविध सुविधा पुरवित आहे. तथापि श्री साईबाबा संस्थानला मोठया देणग्या देणा-या देणगीदार साईभक्तांना वेगळया सुविधा उपलब्ध करुन दिल्यास देणगी देण्याचे प्रमाण वाढेल असे वाटते.

याबाबत सिध्दीविनायक देवस्थान, मुंबई यांचेकडे माहिती घेतली असता त्यांनी उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत मार्गदर्शक सुचना, महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग क्र.संकीर्ण-२०१०/३५/(प्र.क्र.८५)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई दिनांक ०७.०९.२०१० च्या शासन निर्णयानुसार सिध्दीविनायक मंदिरात सुरु असलेली गोल्डनकार्ड योजना बंद केलेली आहे. उपरोक्त शासन निर्णय खालीलप्रमाणे-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील महत्वाच्या मंदिरांमध्येउत्सवाच्या वेळी व इतर महत्वाच्या दिवशी काही भक्तांना नियमित प्रवेशव्दारातून न सोडता इतर प्रवेशव्दारातून दर्शनासाठी प्रवेश दिला जात असल्याने गर्दीच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्रसारमाध्यमांव्दारे व प्रत्यक्ष प्राप्त होतात. अनेक देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी अथवा इतर महत्वाच्या दिवशी व्ही.आय.पी.दर्शन तसेच काही ठिकाणी शुल्क, देणगी इ. आकारुन दर्शन दिले जाते. सर्व महत्वाच्या

देवस्थानांमध्ये सर्वसामान्य भाविकांना समानतेने व शांततेने दर्शन दिले जावे व कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने दर्शन देण्यात येऊ नये तसेच रांगेचे सुयोग्य पध्दतीने नियोजन करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय- वरील परिस्थितीत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमित रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये.

२) कोणत्याही देवस्थानामध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये.

३) प्रत्येक देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गर्दीचा दिवस कोणता आहे याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धर्मादाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील.

४) कोणत्याही देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरीता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत.

५) कोणत्याही देवस्थानमध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, जेणे करुन सर्वसामान्य भाविकांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही. तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलिस यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य रांगेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महत्वाच्या दिवशी तसेच इतर दिवशीही रांगेचे सुयोग्य नियोजन करुन सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन घेण्याची व्यवस्था सर्व देवस्थान समित्यांनी करणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास त्याची शासनाकडून गंभीर दखल घेण्यात येईल व संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी, असा आहे.

तसेच याबाबत आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार भक्तांना कोणत्या सुविधा देते याबाबत माहिती घेतली असता खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

अ) आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार साईभक्तांना देणगीच्या प्रमाणावर विशेष दर्शन / आरती, प्रसाद (भोजन), निवास आदि सुविधा उपलब्ध करुन देतात.

रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त रक्कम देणातऱ्या देणगीदारासाठी देण्यात येणाऱ्या सवलती खालील प्रमाणे.

१. प्रत्येक देणगीदार व त्यांचे कुटुंब (कुटुंबाची संख्या ५ पेक्षा जास्त नसावी) यांना व्ही.आय.पी सुट (रु २५००/- शुल्क असलेले) प्रती वर्षी केवळ ०३ दिवस निवासासाठी देण्यात येते.

२. देणगीदार व त्यांचे कुटुंबास वर्षातून ०३ वेळेस ब्रेक दर्शनासाठी व्हि.आय.पी रांगेतून निशुल्क सोडले जाते.

३. याव्यतिरिक्त देणगीदार व त्यांच्या कुटूंबास ०३ दिवस निशुल्क सुप्रभात दर्शनास सोडले जाते.

४. देणगीदारास कोणत्याही एका तारखेस (देणगीदार ठरवेल त्या तारखेस) देणगीदाराला वर्षातून फक्त एकदाच वेद आर्शीवचनम पूजा वेदपंडीतांव्दारे रंगनायकुला मंडपात दिले जाईल.

५. देणगीदारास भेटी दरमान्य १० मोठे लाडू प्रसादरुपाने दिले जातील.

६. देणगीदारास भेटी दरम्यान दुपट्टा व ब्लाऊजपीस बहुमान म्हणून भेट देण्यात येईल.

७. देणगीदाराच्या केवळ पहिल्या भेटी दरम्यान ५ ग्रॅमचे सोन्याचे नाणे व एक सोन्याचा लेप दिलेले चांदीचे तबक (मेडल) त्यावर श्रीवरु व देवी पद्मावती यांची चित्र छापलेली असेल ते दिले जाते.

८. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नांवे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

९. दिलेली देणगी ही करसवलतीस पात्र असते.

१०. देणगीदाराच्या भेटी दरमान्य त्यास १० महाप्रसाद पाकीटे वर्षातून एकदा देण्यात येतात.

रुपये १० लाख व त्या वरील देणगीदारांसाठी देण्यात येणाऱ्या एक समान सवलती खालील प्रमाणे.

१. रुपये ५००/- भाडे असलेल्या व्ही.आय.पी सुटमध्ये निशुल्क वर्षीतून एकदा ३ दिवसासाठी निवासासाठी देण्यात येते.

२. देणगीदार व त्यांचे कुटुंबास वर्षातून ०३ वेळेस ब्रेक दर्शनासाठी उपलब्धतेनुसार सोडले जाते.

३. देणगीदारास भेटी दरम्यान वर्षातून एकदा २० लहान लाडू प्रसादरुपाने दिले जाते.

४. देणगीदारास भेटी निमित्ताने दुपट्टा व ब्लाऊजपीस बहुमान म्हणून भेट देण्यात येतात.

५. देणगीदाराच्या केवळ पहिल्या भेटी दरमान्य ५ ग्रॅमचे सोन्याचे नाणे व एक सोन्याचा लेप दिलेले चांदीचे तबक (मेडल) त्यावर श्रीवरु व देवी पद्मावती यांची चित्र छापलेली असेल ते दिले जाते.

६. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नावे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

७. दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असते.

८. देणगीदाराच्या भेटी दरम्यान त्यास १० महाप्रसाद पाकीटे वर्षातून एकदा देण्यात येते.

५ लाख व त्यावरील देणगीदारांना देण्यात येणा-या सवलती खालील प्रमाणे-

१. देणगीदार व त्यांचे कुटुंबास ARP काऊंटरव्दारे ०३ दिवस मोफत निवासाची सोय व व्हि.आय.पी. व्यवस्था उपलब्धतेनुसार रक्कम भरुन उपलब्ध करुन देण्यात येते.

२. देणगीदारा व त्यांच्या कुटूबिय यांना वर्षातील०३ दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.

३. वर्षातून एका वेळेस प्रसाद म्हणून देणगीदारास १० लहान लाडू प्रसादरुपाने दिले जाते.

४. देणगीदार भक्ताला एक दुपट्टा व ब्लाऊज पीस वर्षातून एकदा बहूमान म्हणून दिला जातो.

५. एक सोन्याने मढवलेले श्रीवरु व देवी पद्मावतींचे चांदीचे तबक (मेडल) देणगीदाराच्या प्रथम भेटीच्या वेळेस दिले जाते.

६. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नावे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

७. दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असते.

८. देणगी दिलेल्या वर्षात दिलेल्या भेटीत ५ महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

तिरुपती देवस्थानामार्फत उपरोक्त प्रमाणे सवलती देणगीदार भक्तांना दिल्या जातात. या सवलती ज्या देणगीदार भक्तांना देण्यात येतात त्यांना देणगी देतांना देवस्थानकडून एक पुस्तिका देण्यात येते, त्या पुस्तिकेमध्ये त्यांना दिल्या जाणा-या सवलतींच्या वेळोवेळी नोंद घेण्यात येते.

ब) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत श्री साईबाबा संस्थानला रुपये २५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तूरुपाने किंवा रोख रक्कमेच्या स्वरुपात) देणगीदार साईभक्तांना त्याच दिवसाकरीता ०१ वेळेस दर्शन व ०१ वेळेस आरतीची व्यवस्था मोफत करण्यात येते. त्याच प्रमाणे देणगीदार साईभक्तांने प्रसाद भोजनाची मागणी केल्यास त्यांची साईप्रसादालयात एकदा प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येते तसेच देणगीदार साईभक्तांचा शॉल, श्रीफळ व उदीप्रसाद देवून सत्कार करण्यात येतो.

तिरुपती देवस्थान देणगीदारांना देत असलेल्या सुविधांचा विचार करता श्री साईबाबा संस्थानमार्फत रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांना पुढील सुविधा द्याव्यात असे वाटते. सदर सुविधा बाबतची माहिती व प्रत्येकवेळी कोणत्या सुविधांचा लाभ घेतला याची नोंद घेणेकामी तिरुपती देवस्थानप्रमाणे संस्थानचे लेखाशाखा विभागाने मराठी व इंग्रजी भाषेचा समावेश असलेली पुस्तिका देणगीकाऊंटरवर देणगी देतेवेळी देणगीदार भक्तांस उपलब्ध करुन द्यावी. सदर पुस्तिकेमध्ये देणगीदारासह त्यांच्या कुटूंबातील ०५ अशा एकूण ०६ व्यक्तींचे फोटो, पत्ता, मेल-आयडी, दुरध्वनी क्रमांक, आधारक्रमांक आदिच्या नोंदी घेण्यात याव्यात. पुस्तिकेमध्ये नमुद विभागांनी त्यांचे अखत्यारीतील सुविधा देणगीदारास देवून तशा नोंदी सदर पुस्तिकेत कराव्यात. देणगीनुसार देणगीदार साईभक्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभागामार्फत करणेत येईल. संस्थानला मोठया देणग्या देणा-या देणगीदारांची प्रामख्याने दर्शन/आरतीची मागणी मोठया प्रमाणावर असते. मोठया देणग्या देणारे देणगीदार नेहमीच दर्शनासाठी येत नाहीत.

I) <u>श्री साईबाबा संस्थानला रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.</u>

१) एका वर्षात २४ वेळा मोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येईल. तर फर्मच्या/ कंपनीच्या नांवे २० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात २४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी निशुल्क उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधनकारक राहील

३) देणगी दिलेल्या दिवशी देणगीदार भक्तांस सहकुटूंब एकदा पाद्यपूजा करता येईल. तसेच त्यापुढे कमी गर्दीच्या कालावधीत वर्षात एकदा अशी ५ वर्ष पाद्यपूजा करता येईल.

४) देणगी रक्कम ज्या प्रोजेक्टसाठी/वस्तूसाठी देण्यात आली आहे त्या प्रोजेक्टला देणगीदाराचे नांव देण्यात येईल.

५) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

६) देणगीदारांस देणगी देतेवेळी २५ लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

७) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात तहहयात (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करण्यात येईल.

८) दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असेल.

९) देणगीदारानी शिफारस केलेल्या व्यक्तीची दर्शन/आरतीची व्यवस्था प्राधान्याने नियमानुसार सशुल्क करण्यात येईल.

ii) श्री साईबाबा संस्थानला रुपये ५० लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.

१) एका वर्षात १२ वेळा मोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येईल. तर फर्म /कंपनीच्या नांवे २० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात १२ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांस देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील.

३) देणगी दिलेल्या दिवशी देणगीदार भक्तांस सहकुटूंब एकदा पाद्यपूजा करता येईल.

४) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

५) देणगीदारांस देणगी देतेवेळी २० लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

६) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात तहहयात (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

७) दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असेल.

८) देणगीदारानी शिफारस केलेल्या व्यक्तीची दर्शन/आरतीची व्यवस्था प्राधान्याने नियमानुसार सशुल्क करण्यात येईल.

III) श्री साईबाबा संस्थानला रुपये १० लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.

१) एका वर्षात ०४ वेळेस मोफत आरती/दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास व फर्म /कंपनीच्या नांवे केवळ १० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात ०४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील

३) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

४) देणगीदारांस देणगी देतेवेळी १० लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

५) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात एका वर्षात १४ वेळा (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

६) दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असेल.

IV) श्री साईबाबा संस्थानला रुपये ०५ लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.

१) एका वर्षात ०४ वेळेस मोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास व फर्म /कंपनीच्या नांवे केवळ ०५ वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात ०४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील

३) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

४) देणगीदारांस देणगी देतेवेळी ०५ लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

५) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात एका वर्षात १० वेळा (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

६) दिलेली देणगी ही कर सवलतीस पात्र असेल.

श्री साईबाबा संस्थानला रुपये ५० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या (वस्तू/रोख स्वरुपातील) देणग्या देणारे देणगीदार/कंपन्या खालीलप्रमाणे-

१) मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., यांनी संस्थानला सुमारे ०२ कोटी रुपये किंमतीचा पाणी साठवण तलाव संस्थानला देणगीदाखल दिलेला असून संस्थानने सुरु केलेल्या ॲम्ब्युलन्स योजनेसाठी २५ ॲम्ब्युलन्स देणगी देण्याची घोषणाही केली आहे. तसेच त्यांच्या कंपनीचे पहीले वाहन संस्थानला देणगी दाखल देत असून आजतागायत त्यांनी १३ वाहने संस्थानला देणगीदाखल दिलेली आहेत.

२) श्री.सुधीर प्रभू, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सुमारे ०१ कोटी रुपये किंमतीचे आय.सी.यु.युनिटचे साहित्य देणगी दिलेले आहे.

३) श्री.मुकेश गुप्ता दिल्ली यांनी साईबाबा मंदिरासाठी सुमारे ९० लाख रुपये किंमतीची वातानुकुलीत सिस्टीम देणगीदाखल दिलेली आहे.

४) मॉन्टोकार्लो लि. अहमदाबाद यांनी पावती नं.३५ सीडी-एसी-९२४ दिनांक २२.०५.२०१३ ने रुपये ५२,३५,०००/- व पावती नं.३५ सीडी-एसी-१२३२ दिनांक०५.११.२०१५ ने रुपये ७०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

५) श्रीमती.हंसा बाकारु मुंबई यांनी पावती नं.३५सीडी-एसी-९६५ दिनांक ०९.१०.२०१३ ने रुपये ५०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

६) अनघा संथानम मुंबई यांनी पावती नंसीसीडीडी-एमयु-१३० दिनांक १०.०६.२०१५ ने रुपये ५०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

७) स्वर्गीय नामदुराई कनका दुर्गा हैद्राबाद यांनी पावती नं. सीएचडीडी-एसी ९५७१ दिनांक ११.०१.२०१६ ने रुपये १,००,०१,१३३/- देणगी दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांस रुपये ०५ लाख व त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी रोख किंवा वस्तुस्वरुपात देणा-या देणगीदारांना I ते IV प्रमाणे सुविधा संस्थानमार्फत विनाशुल्क देता येतील. तसेच वर निर्देशीत केलेल्या देणगीदारांनी संस्थानला मोठया रकमेच्या रोख किंवा वस्तू स्वरुपात देणगी दिलेल्या असून त्यांनाही उपरोक्त सुविधा देण्यात याव्यात असे वाटते.

विभागाची मागणी- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांस रुपये ०५ लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना दर्शन/आरती, निवास, भोजन आदि सुविधा मोफत देणेबाबत.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांस रुपये ०५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम रोख अथवा वस्तु स्वरुपात देणगी देणा-या साईभक्तांना श्री साईबाबा संस्थानमार्फत I ते IV प्रमाणे सुविधा मोफत देण्यात याव्यात. देणगीदार भक्तांना देण्यात येणा-या सुविधाबाबतची माहिती व प्रत्येकवेळी कोणत्या सुविधांचा लाभ घेतला याची नोंद घेणेकामी मराठी व इंग्रजी भाषेचा समावेश असलेली पुस्तिका देणगी काऊंटरवर देणगी देते वेळी लेखाशाखा विभागाकडून देणगीदार भक्तांस देण्यात यावी. सदर पुस्तिकेमध्ये देणगीदारासह त्यांच्या कुटूंबातील एकूण ०६ व्यक्तींचे फोटो, पत्ता, मेल-आयडी, दुरध्वनी क्रमांक, आधारक्रमांक आदिच्या नोंदी घेण्यात येऊन यापुर्वी देणगी दिलेल्या देणगीदार साईभक्तांस तसेच यापुढे देणगी देणा-या साईभक्तांस वरील नमुद सुविधा (उदा. दर्शन/आरती व्यवस्था जनसंपर्क विभाग, निवास व्यवस्था साईआश्रम निवासस्थान, प्रसाद भोजन व्यवस्था श्री साईप्रसादालय विभाग, लाडू प्रसाद व्यवस्था कॅन्टीन विभाग) संस्थानमार्फत विनाशुल्क देता येतील. सदरच्या सुविधांचा लाभ देणगीदारांनी देणगी देताना पुस्तिकेत नमुद केलेल्या व्यक्तींनाच घेता येईल. तसेच उपरोक्त सुविधा देणगीदारांना देणेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाकडून योग्य ती संगणक कार्यप्रणाली तयार करुन संबंधीत विभागांकडे कार्यान्वित करता येईल. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांसाठी गोल्डन कार्डसारखी योजना सुरु केल्यामुळे भक्तांमध्ये भेदभाव होऊ शकतो, असे समितीचे मत झाले. तसेच सर्व महत्वाच्या देवस्थानांमध्ये सर्वसामान्य भाविकांना समानतेने व शांततेने दर्शन दिले जावे व कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने दर्शन देण्यात येऊ नये, अशा सुचना विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी यापुर्वी दिलेल्या आहेत. परंतु मोठया स्वरुपाती देणगी देणाऱ्या भक्तांचा सन्मान करायला पाहिजे, असेही समितीस वाटते. याकरीता रु.५ लाख मात्र रोख अथवा वस्तु स्वरुपात तसेच साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी ०१ पेक्षा जास्त रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देणाऱ्या भक्तांना प्रस्तावातील IV मध्ये नमुद केलेप्रमाणे सुविधा देण्यात याव्या व याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

विषय नं.१४ **महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणेकामी नियमावलीत सुधारणा करणे.**

प्रस्ताव- साई-रुग्णवाहीका प्रकल्प राबविणे कामी विविध नियमावलीस मान्यता मिळणे करीता खालील प्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ तरतुद-

१) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील १७ (२-ण) मध्ये मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

२) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील १७ (४) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये विहित केलेले पन्नास हजार रुपयापेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्यालेखी पुर्वमंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडुन विकण्यात येणार नाही तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करता येणार नाही.

३) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील २१ (१क)(२)मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

प्रास्तविक- श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्ये संस्थान मार्फत श्री साईबाबा व श्रीसाईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे अशेच चालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता मा. व्यवस्थापन समितीने दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये,"*राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहीका* (Ambulance) *खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहीकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहीका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहीका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी*" असा निर्णय घेतलेला आहे.

श्री साईभक्तांकडून देणगीरक्कम स्विकारणे करीता प्रथम कोणत्या प्रकारच्या रुग्णवाहीका द्यावयाच्या आहेत? हे निश्चित होणे आवश्यक आहे. सध्या बाजारात उपलब्ध असलेले लहान आकाराच्या रुग्णवाहीकाची माहिती खालील प्रमाणे आहे.

रुग्णवाहीका प्रकार -

०१) पेट्रोल -	**अंदाजे किंमत (विम्यासह)**	**७५%**	**२५%**
०१) मारुती व्हॅन (ओमनी)	३,१५,०००/-	२,३६,३५०/-	७८,७५०/-
०२) मारुती इको	४,१५,०००/-	३,११,२५०	१,०३,७५०/-
०२) डिझेल -			
०१) टाटा सुमो	५,५०,०००/-	४,१२,५००/-	१,३७,५००/-
०२) टाटा विंगर	८,१०,०००/-	६,०७,५००/-	२,०२,५००/-
०३) तवेरा	७,४०,०००/-	५,५५,०००/-	१,८५,०००/-
०४) ट्रक्स (फोर्स कं.)	७,००,०००/-	५,२५,०००/-	१,७५,०००/-
०५) बोलेरो (महिंद्रा कं.)	५,८४,०००/-	४,३८,०००/-	१,४६,०००/-

वर नमुद केलेप्रमाणे ५०० रुग्णवाहीका खरेदी करणेसाठी बाजारामध्ये विविध प्रकार उपलब्ध आहेत. परंतू सर्व दृष्टीने योग्य अशा एकाच कंपनीच्या रुग्णवाहीका ई-निविदेद्वारे खरेदी कराव्या लागतील. त्यासाठी रुग्णवाहीकेची कंपनी व प्रकार (मॉडेल) निश्चित होणे आवश्यक आहे.

मा.व्यवस्थापन समितीने दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये ५०० रुग्णवाहीका खरेदी करुन त्या महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांच्या सेवेसाठी सुरु करणे करीता त्या ठिकाणी काम करणा-या स्वयंमसेवी संस्थेकडून निर्णयात ठरले प्रमाणे त्यांचेकडून २५ टक्के रक्कम जमा करुन घेवुन त्यांचेशी विहीत पध्दतीने करारनामा करुन त्यांना त्या संस्थानचे अटी-शर्तीवर रुग्ण सेवेकरीता देता येतील.

तसेच या प्रकल्पात देणगी देवुन जे साईभक्त सामील होतील त्यांचेसाठी संस्थान नियमावली असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संस्थान, श्री साईभक्त व स्वयंसेवी संस्था यांचेसाठी खालील प्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे. नियमावलीत नमुद केले प्रमाणे रुग्णवाहीका प्रकल्पाशी संबंधीत असलेले विभाग व त्यांनी करावयाची कामे या बाबत अलाहीदा आदेश / परिपत्रक काढुन विभागवार कामे सोपविले जातील.

अ) संस्थानसाठीची नियमावली

१) देणगीदार साईभक्ताकडुन रु.२,२५,०००/- व सेवाभावी संस्थेकडून रु.७५,०००/- अगर ॲम्बुलन्सच्या किंमतीच्या एकुण ७५ % साईभक्ताने व उर्वरित २५% सेवाभावी संस्थेची राहील.

२) ॲम्बुलन्स सेवाभावी संस्थेस ५ वर्षाचे मुदती करीता चालविण्यास देण्यात येईल.

३) सेवाभावी संस्थेची नियमाप्रमाणे आवश्यकती कागदपत्रे तपासुन एका संस्थेस फक्त एक रुग्णवाहीका या प्रकल्पाअंतर्गत देण्यात येईल.

४) रुग्णवाहीकेची खरेदी ई-निविदाद्वारे मोठ्याप्रमाणात वर्तमानपत्रात जाहीरात देऊन करणेत येईल.

५) ॲम्बुलन्सची नोंदणी व पहिल्या वर्षीचा विमा ॲम्बुलन्स हस्तांतरीत करतेवेळेस संस्थानमार्फत संस्थानच्या नावावर करण्यात येईल.

६) संस्थानच्या वाहन विभागाने ॲम्बुलन्स प्रकल्पातील ॲम्बुलन्स खरेदी पर्यंतची कार्यवाही करावयाची आहे. त्यापुढील संपुर्ण कार्यवाही नियमावलीप्रमाणे संस्थानचे रुग्णालय अनुदान विभागामार्फत केली जाईल. त्यामध्ये प्रतीवर्षी रुग्णवाहीकेची विमा नुतणीकरणाची प्रत सदर सेवाभावी संस्थेकडून प्रात करुन घेणे सर्व ॲम्बुलन्सचा हिशोब ठेवणे. त्यांच्या नोंदी अद्यायावत करणे. ॲम्बुलन्सची तपासणी करुन लॉगबुक पाहणे व तत्संबंधीत सर्व कामे रुग्णालय विभाग पाहील.

७) ॲम्बुलन्सचे ५ वर्ष पुर्ण झालेनंतर त्या रुग्णालय विभागाने संबंधीत सेवाभावी संस्थेकडून जमा करुन घेवुन संस्थानचे वाहन विभागात जमा कराव्यात.

८) संस्थानने संबंधीत सेवाभावी संस्थेकडून ॲम्बुलन्सचा वापर व परत संस्थानकडे जमा करणे इत्यादी गोष्टीचा नमुण्यात ठरवुन दिल्या प्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे.

९) ॲम्बुलन्स प्रकल्पासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार या प्रकल्पासाठी व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मान्यता मिळालेनंतर संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता झालेनंतरच वाहन विभागामार्फत ई-निविदेद्वारे खरेदी प्रक्रीया राबविणे.

१०) जे देणगीदार साईभक्ताचे संपुर्ण ॲम्बुलन्सच्या ७५ टक्के देतील त्यांना ५ वर्षे प्रत्येकी वर्षी १ वेळेस दर्शन, आरती त्यांच्या कुटूंबास देण्याची सोय करणे.

११) जे साईभक्त एका ॲम्बुलन्सच्या पुर्ण किमतीच्या ७५ टक्के रक्कम देणगी म्हणुन देतील त्या साईभक्तांनी दिलेली १ / २ नांवे एका ॲम्बुलन्सवर संस्थानने ठरवुन दिलेल्या नमुन्यात व आकारात मराठी / इंग्रजी मधुन प्रदर्शित करणे.

१२) मा.व्यवस्थापन समितीने ठरविले प्रमाणे सदर साई ॲम्बुलन्स हा प्रकल्प ५०० रुग्णवाहीके करीता मर्यादीत असुन महाराष्ट्रातील सर्व तालुक्यात तसेच प्राध्यान्याने आदिवासी, दुर्गम भागात रुग्णाचे सेवेसाठी सदर प्रकल्प सेवाभावी संस्थेमार्फत राबविण्यात येईल.

ब) सदर प्रकल्पासाठी देणगी देणारे साईभक्तांसाठी नियमावली.

१) देणगीदार साईभक्तांना देणगी देणेसाठी कमीत कमी व जास्तीत जास्त रक्कमेची अट राहणार नाही. ते स्वच्छेने या प्रकल्पातील रुग्णवाहीकेसाठी देवु शकतील.

२) जे साईभक्त एका ॲम्बुलन्सच्या पुर्ण किमतीच्या ७५ टक्के रक्कम देणगी म्हणुन देतील त्या साईभक्तांनी दिलेले १ / २ नांवे एका ॲम्बुलन्सवर संस्थानने ठरवुन दिलेल्या नमुन्यात व आकारात मराठी / इंग्रजी मधुन प्रदर्शित केले जातील.

३) साईभक्तांना त्यांनी दिलेल्या रक्कमेची देणगी पावती त्वरीत देता येईल.

४) जे साईभक्त किमान २५ हजाराची देणगी देतील त्यांना सध्याचे संस्थान नियमाप्रमाणे एक वेळेस दर्शन / आरतीची सोय करता येईल.

५) जे देणगीदार साईभक्ताचे संपुर्ण ॲम्बुलन्सच्या ७५ टक्के देतील त्यांना ५ वर्षे प्रत्येकी वर्षी १ वेळेस दर्शन व आरती त्यांच्या कुटुबास देण्याची सोय करण्यात येईल.

६) देणगीदार साईभक्तांचे या प्रकल्पातील कोणत्याही रुग्णवाहीकेवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रण अगर मालकी राहणार नाही.

क) स्वयंसेवी संस्थेकरीता नियमावली-

१) स्वयंसेवी संस्था म्हणून रोटरी क्लब, लायन्स क्लब व नोंदणीकृत सेवाभावी संस्था यांचा समावेश राहील.

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक ॲम्बुलन्स रुग्णसेवे करीता मिळु शकेल.

३) सेवाभावी संस्था मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असावी.

४) सदर संस्थेची नोंदणीकृत दाखला किमान ३ वर्षपुर्वीचा असावा.

५) सेवाभावी संस्थेतील लेखापरिक्षण नियमित (प्रतिवर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ वर्षाचे ताळेबंद जोडणे आवश्यक राहील.

६) सेवाभावी संस्थेची आर्थिक वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) रु.दहा लाख असावा.

७) सेवाभावी संस्थेवर कोणतेही गैरव्यवहारातील आरोप / गुन्हे नसावेत.

८) सेवाभावी संस्थेवरील अध्यक्ष व इतर पदाधिकारी सामाजीक कार्याशी संबंधीत असावेत.

९) या प्रकल्पाकरीता संस्थानने ठरवुन दिलेली इतर कागदपत्रे तपासणीनंतर व सेवाभावी संस्थेकडुन २५ टक्के रक्कम भरलेनंतर त्या संस्थेचा या प्रकल्पात समावेश करण्यात येईल.

१०) स्वयंसेवी संस्थेला सदर रुग्णवाहीका ही रुग्णांना सेवा देणेकरीता वापरावी लागेल. त्यात कोणत्याही प्रकारची अवैध्य प्रवासी वाहतुक करता येणार नाही, असे अढळुन आल्यास त्यावर गुन्हा नोंदविण्याचे व रुग्णवाहीका परत घेण्याचे संपुर्ण हक्क संस्थानला राहतील.

११) स्वयंसेवी संस्थेला रुग्णाकडून सदर रुग्णवाहीका वापरासाठी घ्यावयाचा सेवाआकार प्रति कि.मी. संस्थान निश्चित करुन दिलेल्या दरानेच आकारणी करावी लागेल.

१२) स्वयंसेवी संस्थेला प्रथम वर्षानंतरचा विमा नुतणीकरण स्वखर्चाने करावे लागेल. विमा नुतनीकरण केलेनंतर त्याची प्रत १० दिवसाचे आत संस्थानचे रुग्णालय अनुदान विभागाकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

१३) सदर रुग्णवाहीकेचा PUC, फिटणेस व टॅक्स माफी इत्यादी कामे वेळेत नुतनीकरण करणे संस्थेवर बंधनकारक राहील व या संबंधीत पुर्तता केलेबाबतची प्रतसंस्थानकडे वेळीच सादर करावी लागतील.

१४) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत स्वतंत्र करारनामा करुन द्यावा लागेल.

१५) काही कायदेशिरबाब उदभवल्यास त्याकरीता न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

साई रुग्णवाहीका प्रकल्प राबविणेसाठी रुग्णवाहीकेची कंपनी व प्रकार (मॉडेल) निश्चित होणे, देणगी रक्कम स्विकारणेची कार्यवाही निश्चित होणे, उपरोक्त नमुद केले प्रमाणे नियमावलीस मान्यता मिळणे, मान्यतेनंतर सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मान्यतेस पाठविणे, शासन मान्यता मिळालेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा राबवुन रुग्णवाहीका खरेदी करणे, तत्संबंधीत करावयाची कार्यवाहीसाठी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर करण्यात आला होता.

यावर, मा. व्यवस्थापन समितीने दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.०२ निर्णय नं.७५६ (२४) अन्वये, "महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब, गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणे बाबतच्या प्रस्तावित नियमावलींचे अवलोकन करणेत येऊन, या नियमावलीस व सदरहू प्रकल्प राबविणेसाठी महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात यावी. तसेच शहरी भागामध्ये वापरण्यात येणा-या साई रुग्णवाहीका तयार करणेकामी मारुती इको व ग्रामीण, पहाडी भागामध्ये वापरण्यात येणा-या साई रुग्णवाहीका तयार करणेकामी टाटा सुमो अथवा महिंद्रा बोलेरो या कंपन्यांची वाहने खरेदी करणेत यावी. यासाठी सदरहू कंपन्याबरोबर समिती सदस्य मा.श्री. प्रताप भोसले यांनी दरांबाबत चर्चा करावी, अशी दि.१०/१०/२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे शासन मान्यता घेणेपुर्वी खालील बाबींवर येणा-या अडचणींचा विचार करुन त्यावर निर्णय घ्यावा लागेल.

०१) रुग्णवाहीका आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन बाबत.

संस्थान नांवे रजिस्ट्रेशन केलेस खालील बाबी संस्थानवर बंधनकारक राहतील.

१) वाहनाचा अपघात झालेस त्याचे दाव्याकरीता प्रत्येक वेळी संस्थानला हजर राहुन माहिती द्यावी लागेल.

२) विमा क्लेम करीता चालणारे दाव्या करीता संस्थान प्रतिनिधी हजर ठेवावा लागेल.

३) प्रतीवर्षी टॅक्स माफी करीता सर्व N.G.O. यांना शिर्डी येथे बोलावुन संस्थानमार्फत विहीत फॉर्म भरुन RTO कार्यालयाकडून टॅक्स माफी करुन घ्यावी लागेल.

४) प्रती वर्षी सर्व वाहने फिटनेस करीता प्रथम शिर्डी कार्यालयात तपासणी करुन विहीत फॉर्म भरुन RTO कार्यालयाकडे तपासणी कामी पाठवावी लागेल.

५) या कामी सर्व वाहने एकाच वेळी उपलब्ध होतील असे नाही त्यामुळे सदर काम वेळोवेळी करावे लागेल.

ब) स्वयंसेवी संस्थेच्या नांवावर रजिस्ट्रेशन करणे असलेस

१) हायर पर्चेस अग्रीमेंट सारखे सदर वाहन संबंधीत एनजीओ. च्या नावची नोंद करुन नावावर त्यांचे क्षेत्रातील RTO कार्यालयाकडे रजिस्ट्रेशन करता येईल.

२) त्यामुळे त्यांचे RC बुकवर प्रथम स्वयंसेवी संस्थेचे नांव व नंतर संस्थानचे नांव असेल.

३) त्यामुळे अपघात व विमा संबंधीत दावे संबंधीत संस्थेच्या नावावर चालतील.

४) संस्थान परवानगी शिवाय सदर वाहन त्या संस्थेला परस्पर विक्री करता येणार नाही.

५) या करीता वाहन खरेदीची सेलनोट स्वयंसेवी संस्थेच्या नावावर लागेल.

०२) रुग्णवाहीका प्रकार:-

सदर वाहने स्वयसेवी संस्थेच्या नांवावर रजिस्ट्रेशन करावयाची असल्यास त्या संस्थेच्या कार्याक्षेत्रातील आर.टी.ओ. कार्यालयात करावी लागतील. सध्या काही RTO कार्यालयात BS-III प्रकारची वाहने रजिस्ट्रेशन होतात. तर काही RTO कार्यालयात रजिस्ट्रेशनसाठी BS-IV असणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाकरीता आवश्यक रुग्णवाहीका स्वयंसेवी संस्थेचे ठिकाणानुसार BS-III / BS-IV प्रकारातील घेणे आवश्यक आहे.

०३) प्रथम वर्षाच विमा रक्कम:-

सदर रुगणवाहीका खरेदी किंमतीतच प्रथम वर्षाच्या विमा हप्त्याची रक्कम समाविष्ट असावी. जे-णे करुन विम्या करीता पुन्हा वेगळी प्रक्रिया राबवावी लागणार नाही.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या सुधारित नियमपुस्तीकेतील अ.नं.३.२.३ मध्ये,"रु.३ लाख ते एक कोटी पर्यंतची खरेदीची किंमत असलेल्या ब्रॅंडेड वस्तुची खरेदी DGS&D च्या दरकरारावर देखील करता येईल. तसेच कोणत्याही वाहनाचे दर करार DGS&D असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. १ कोटी पेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रिये मार्फतच करण्यात यावी." अशी तरतुद आहे.

वरील बाबींवर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणे आवश्यक असुन झालेल्या निर्णयानुसार आवश्यकतेप्रमाणे नियमावलीत बदल करुन छाननी समिती व महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल. शासन मान्यतेनंतर रुग्णवाहीका खरेदी प्रक्रिया ई-निविदेद्वारे राबविता येईल.

तरी वरील बाबींवर निर्णय होणे करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा मिळणेसाठी संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणेकामी खालीलप्रमाणे अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.

अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठीचे नियम ...

१) संस्थानने साई रुग्णवाहीका प्रकल्प हा महाराष्ट्र राज्यातील अदिवासी, दुर्गम पहाडी व ग्रामीण भागातील गरजूना तातडीची वैद्यकीय मदत मिळण्यासाठी राबविण्याचे ठरविले आहे. या प्रकल्पात एकुण ५०० रुग्णवाहीका समाविष्ठ करण्यात येतील. प्रकल्प पुर्तीसाठी हा प्रकल्प टप्याटप्याने राबविण्याचे ठरविले आहे. पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहीका सुरु करण्यात येतील.

२) साई रुग्णवाहीका हा प्रकल्प महाराष्ट्र राज्यातील अदिवासी, दुर्गम पहाडी व ग्रामीण भागातील कार्यकरणाऱ्या सेवाभावी संस्थांमार्फत राबविण्यात येऊन प्रत्येक सेवाभावी संस्थेस फक्त एक रुग्णवाहीका दिली जाईल.

३) साई रुग्णवाहीका प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी देणगीदार साईभक्तांना अवाहन करण्यात येईल. रुग्णवाहीकेच्या खरेदी किंमतीच्या साधारणपणे ७५% श्री साईभक्तांच्या देणगीतून तर ऊर्वरीत २५% रक्कम सेवाभावी संस्थेकडून जमा करुन घेतली जाईल.

४) साई रुग्ण्वाहीका प्रकल्पासाठी स्वयंसेवी संस्थाकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवून घेतले जातील. आलेल्या अर्जाची छाननी मा.व्यवस्थापन समितीची स्थानिक उपसमिती करेल. पात्र स्वयंसेवी संस्थेची शिफारस मा.उपसमितीने केल्यानंतर स्वयंसेवी संस्थेकडून सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येऊन, त्यांना एक रुग्णवाहीका सदर प्रकल्पांतर्गत देण्यात येईल.

५) रुग्णवाहीका खरेदी करतांना खरेदी किंमतीमध्ये प्रथम वर्षाच्या विम्यांचा समावेश करण्यात येईल.

६) रुग्णवाहीकेवर एका बाजूने देणगीदार साईभक्त व संसथानचे नाव तर दुसऱ्या बाजूने सबंधित स्वयंसेवी संस्थेचे नाव रुग्णवाहिका हस्तांतरण करतेवेळी टाकण्यात येईल.

७) प्रत्येक रुग्णवाहीकेस संस्थानचा अधिकृत नंबर देण्यात येऊन, रुग्णवाहीकेमध्ये जीपीएस सिस्टीम संस्थानमार्फत बसविण्यात येईल. याव्दारे सर्व रुगणवाहिकेवर नियत्रंण ठेवण्यात येईल. यांचे नियंत्रण कक्ष संस्थानमध्ये असेल.

८) संस्थानने रुग्णवाहीका खरेदीच्या ७५% देणगी रक्कम या प्रकल्पात मिळालेल्या देणगी रक्कमेमधून वापरावयाची आहे. काही रक्कम कमी पडत असलेस ती सर्वसाधारण देणगी निधीतून या प्रकल्पात वर्ग करण्यात येईल.

९) रुग्णवाहिका हस्तांतर करतांना संस्थान प्रथम तात्पुरत्या नोंदणी क्रमांकासह स्वयंसेवी संस्थाना हस्तांतर करेल. स्वयंसेवी संस्थानी त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिवहन कार्यालयात त्यांच्या नावावर कायम नोंदणी स्वखर्चाने करावयाची असून रुग्णवाहिका नोंदणी पुस्तकावर त्यांचे नावाखाली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नाव HPA प्रमाणे नोंद करणे बंधनकारक आहे.

१०) इतर नियम व अटी करारनाम्यात करुन घेण्यात येतील.

ब) साई रुग्णवाहीका प्रकल्पातील देणगीदार साईभक्तांसाठीचे नियम...

१) साई रुग्णवाहीका प्रकल्पासाठी देणगीदार साईभक्त या प्रकल्पात त्यांच्या इच्छेप्रमाणे देणगी देऊन सहभागी होऊ शकतात.

२) कमीत कमी एका रुग्णवाहीकेस देणगी देणाऱ्या साईभक्तांच्या इच्छेनुसार त्यांनी दिलेले नाव, विहित नमुन्यात सदर रुग्णवाहीकेवर संस्थानमार्फत टाकण्यात येईल.

३) कमीत कमी एक रुग्णवाहीकेसाठी देणगी देणाऱ्या साईभक्ताची वर्षातून एकदा एक वेळेस दर्शन व एका आरतीची सोय पाच वर्ष विनामुल्य करण्यात येईल. यामध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

४) देणगी देणाऱ्या साईभक्ताची देणगी हि विना अट स्वरुपाची राहील. रुग्णवाहिका ठराविक क्षेत्रात अगर ठराविक स्वयंसेवी संस्थेला देण्याचा अधिकार हा पुर्णपणे संस्थानचा असुन देणगीदार साईभक्ताचा त्यावर कोणताही हक्क अगर अधिकार नाही.

५) रुग्णवाहिका कोणत्या स्वयंसेवी संस्थेस दिली आहे, याचे पत्र सदर देणगीदार साईभक्तास देण्यात येईल.

क) साई रुग्णवाहीका प्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या या स्वयंसेवी संस्थांसाठीचे नियम...

१) सेवाभावी संस्था मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असावी.

२) संस्थेचा नोंदणीकृत दाखला किमान ३ वर्षापुर्वीचा असावा.

३) स्वयंसेवी संस्था म्हणून नोंदणीकृत सेवाभावी संस्था यांचा समावेश राहील.

४) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिका रुग्णसेवेकरीता देण्यात येईल.

५) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रतिवर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) सेवाभावी संस्थेची आर्थिक वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान पाच लाख रुपये असावा.

७) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. याबाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

८) साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानने ठरवुन दिलेली कागदपत्रे तपासणीनंतर संस्थानने निश्चित केलेल्या व सेवाभावी संस्थेकडुन २५ टक्के रक्कम संस्थानमध्ये जमा केलेनंतर त्या संस्थेचा या प्रकल्पात समावेश करण्यात येईल.

९) स्वयंसेवी संस्थेला दिलेली रुग्णवाहीका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही, असे अढळुन आल्यास सदर संस्थेवर गुन्हा नोंदविण्याचे व रुग्णवाहिका परत घेण्याचे संपुर्ण हक्क संस्थानला आहेत.

१०) स्वयंसेवी संस्थेला रुग्णाकडून सदर रुग्णवाहीका वापरासाठी घेण्याचा कमाल सेवाआकार प्रति कि.मी. संस्थान निश्चित करुन देईल त्यापेक्षा अधिक दराने आकारणी करता येणार नाही. संस्थेच्या आर्थिक परिस्थीतीनुसार संस्था यापेक्षा कमी दराने अथवा मोफत रुग्णवाहिकेचा वापर करु शकेल. जादा सेवाआकार आकारलेचे निदर्शनास आल्यास सदर रुग्णवाहिका संस्थानकडे जमा करुन घेण्यात येईल.

११) स्वयंसेवी संस्थेला प्रथम वर्षानंतरचा विमा नुतणीकरण स्वखर्चाने करावयाचा आहे. पुढील प्रति वर्षी विमा नुतनीकरण केलेनंतर त्याची प्रत १० दिवसाचे आत संस्थानकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

१२) रुग्णवाहीकेचा PUC, फिटणेस व टॅक्स माफी इत्यादी कामे वेळेत नुतनीकरण करणे संस्थेवर बंधनकारक राहील व या संबंधीत पुर्तता केलेबाबतची प्रत संस्थानकडे वेळीच सादर करणे आवश्यक आहे.

१३) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा करुन द्यावा लागेल.

१४) रुग्णवाहिकेस लागणारे इंधन, टायर-ट्युब, वाहनाची दुरुस्ती-देखभाल तसेच वाहन चालकाचा पगार व इतर बाबींचा अनुशंगिक खर्च स्वयंसेवी संस्थेला करावयाचा आहे. रुग्णवाहिकेचा पुढील कोणताही खर्च संस्थानमार्फत केला जाणार नाही.

१५) स्वयंसेवी संस्थेने संस्थानने तात्पुरत्या स्वरुपात केलेल्या रजिष्ट्रेशन नंतर त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिवहन कार्यालयात कायम स्वरुपी नोंदणी स्वखर्चाने करावयाची आहे. रुग्णवाहिका नोंदणी पुस्तकावर त्यांचे नावाखाली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नाव HPA प्रमाणे नोंद करणे बंधनकारक आहे. त्याची प्रत संस्थानला १५ दिवसाच्या आत दयावयाची आहे.

१६) कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१७) रुग्णवाहिकेचा वापराचा कालावधी आर.टी.ओ नियमाप्रमाणे पुर्ण झाल्यानंतर स्वयंसेवी संस्थेने विहीत नमुन्यात संस्थानला अर्ज करावयाचा आहे. त्यानंतर रुग्णवाहिकेच्या नोंदणी पुस्तकातील संस्थानचे नाव कमी करण्याबाबत संस्थान पत्र देईल.

१८) स्वयंसेवी संस्थाना देण्यात आलेल्या रुग्णवाहिका त्यांना कोणताही मोबदला न देता त्यांचेकडून परत घेण्याचा अधिकार संस्थानला आहे.

१९) स्वयंसेवी संस्थेला दिलेली रुग्णवाहिका इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा या कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर हे साईभक्त असुन त्यांचे कंपनीमध्ये तयार होणारे पहिले वाहन ते नियमितपणे श्री साईबाबा संस्थानला देणगी देत असतात. तसेच संस्थान मध्ये पाण्याची कमतरता पाहता त्यांनी संस्थानसाठी रु. दोन कोटी मात्र खर्च करुन संस्थानला पाणी साठवण तलाव तयार करुन दिलेला आहे. साई-रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता २५ रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देत आहेत. तसेच या प्रकल्पाकरीता लागणाऱ्या बोलेरो रुग्णवाहिका सदर कंपनी संस्थानला विशेष सवलतीच्या दरात देण्यास तयार आहेत.

या सर्व बाबींचा विचार करता, तसेच सदर साई रुग्ण्वाहिका प्रकल्प महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम, आदीवासी, पहाडी इत्यादी भागात राबवावयाचा असल्यामुळे या भागांचा भौगोलिक परिस्थितीचा विचारकरता या प्रकल्पाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो BS-IV (डिझेल) हे वाहन महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून थेट खरेदी करणे संस्थान हिताचे असल्याने ते त्यांच्याकडून खरेदी करण्यात याव्यात.

साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये जमा झालेली देणगी रक्कम कमी पडत असल्यास संस्थानच्या सर्वसाधारण निधीमधून ती खर्च करावी. या प्रकल्पाच्या प्रथम टप्यामध्ये १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा या कंपनीस कार्योदेश देण्यात यावा.

या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यास यावा, असे ठरले. (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

विषय नं.१५ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ व महाराष्ट्र शासनाने दि.२४.०१.२०१३ पासुन लागु केलेले विनियमांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या, बदल करणेकामी तज्ञ सल्लागार/ तज्ञ समितीची नेमणुक करणे व त्यांना द्यावयाचे मानधन ठरविणे.**

प्रस्ताव- दि.१९/०९/२०१६, रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषयामध्ये, विषय नं.३०, मा. विश्वस्तांच्या सुचनांबाबत सादर करण्यात आला, त्यावर निर्णय क्र. ६८७, अन्वये, (१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, मधील कलम ११ नुसार (२) व्यवस्थापन समिती सभेसाठी आठ सदस्यांची गणपुर्ती असावी अशी तरतुद महाराष्ट्र शासन यांचेकडील, दि.२८/०७/२०१६, रोजीचे अधिसुचनेनुसार, अध्यक्ष, उपाध्यक्ष व १० सदस्यांची व्यवस्थापन समिती अस्तित्वात आलेली आहे, काही अपरिहार्य कारणास्तव सभेसाठी सर्व सदस्यांना उपस्थित रहाणे शक्य होत नाही व त्यामुळे सभेची गणपुर्ती पुर्ण होत नाही , याकरिता अधिनियम-२००४, मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, मधील, कलम १४, पोटकलम (२) (ख), अन्वये, मा. कार्यकारी अधिकारी, यांना रु.२५,०००/-, मात्र पर्यंतचे खर्चाचे अधिकार दिलेले आहेत, सध्या श्री साईबाबा संस्थानचा वाढता कारभार पहाता, मा.कार्यकारी अधिकारी, यांना रु.१,००,०००/-, मात्र पर्यंत खर्चाचे अधिकार मिळावेत, यासाठीही, अधिनियम-२००४, मध्ये दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडे सादर करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी,. अधिनियम-२००४, लागू झाल्यापासून, सदर अधिनियमात, मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार शासनास आस्थापना विभागामार्फत वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत, तपशील खालील प्रमाणे :-

अ. क्र.	मा. व्य. स.दि. व निर्णय क्र.	अधिनियम -२००४ मधील तरतूद	दुरुस्त करावयाची तरतुद
१.	२९/१/२००५ ८ –अ	**कलम ३(१)** नियत दिवशी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये, शिर्डी, जिल्हा अहमदनगर, येथील, श्री साईबाबा शिर्डी संस्थान, या नावे नोंदणी झालेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थे ऐवजी (यात यापुढे जिचा निर्देश पुर्वीची विश्वस्त व्यवस्था असा करण्यात आला आहे.) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) या नावाची विश्वस्तव्यवस्था ही, या अधिनियमान्वये पुर्नगठीत करण्यता आल्याचे मानण्यात येईल.	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, या नाव ऐवजी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, अशी दुरुस्ती व्हावी.
२.	२९/१/२००५ ८ –ब	**कलम** ७ सदस्याचा पदावधी – (१) सदस्यांची नेमणूक ही तीन वर्षाच्या कालावधीसाठी असेल, परंतू, अशा मावळत्या सदस्याचा पदावधी हा, नवीन समिती स्थापन करणारी अधिसुचना राजपत्रात प्रकाशीत झाल्याच्या दिनांका पर्यन्त वाढवला गेल्याचे व त्या दिनांकास समाप्त होत असल्याचे मानण्यात येईल.	समिती सदस्यांची नेमणूक सध्या तीन वर्षासाठी आहे. त्याऐवजी ती पाच वर्षासाठी असावी.
३.	२९/१/२००५ ८ – क	**कलम ११** समितीच्या सभा आणि कार्यपध्दतीचे नियम.(१) समिती आपले कामकाज चालवण्या साठी, वेळोवेळी, ती ठरवील अशा कालांतराने अशा वेळी सभा भरवील, तथापी, दोन सभांमध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक काळ जाणार नाही.	दोन सभांमध्ये सध्या तीस दिवसांचे अंतर आहे, त्याऐवजी ते ६० दिवसांचे असावे.

४.	२९/१/२००५ ८ – ड	**कलम -१३** समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी (४) समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-याची (कार्यकारी अधिका-या व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल, परंतु, या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशी कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येई पर्यन्त केली जाणार नाही.	रु.२०००/- पेक्षा अधिक मानधनावर तात्पुरत्या नेमणुका करता येणार नाहीत, ही मर्यादा रु.१०,०००/- इतकी असावी.
५.	२९/१/२००५ ८ – इ	**कलम-१४** समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये (ख) बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठ्यासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्वीकारण्याचे.	संस्थानचे दैनंदिन वैविध्यपूर्ण कामकाज विचारात घेता, बांधकामासाठी किंवा इतर मालाच्या/ साहित्याच्या खरेदीसाठी निविदांऐवजी दरपत्रके मागवून रुपये एक लाखापर्यन्त (रुपये पंचवीस हजाराऐवजी) खरेदी करण्याचे अथवा कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावेत.
६.	२९/१/२००५ ८ – ई	**कलम -२०** विश्वस्त व्यवस्था निधी (२) (च) विश्वस्तव्यवस्थे करिता किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने, समितीला किंवा कोणत्याही सदस्याला मिळालेल्या, किंवा समितीने किंवा सदस्याने वसुल केलेल्या कोणत्याही रकमा. (४) समितीने प्राधिकृत केलेल्या सदस्याकडून किंवा अधिका-यांकडून, विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून करण्यात येईल.	(२) (च) देणगीरुपाने मिळणा-या रक्कमा अथवा समितीने अथवा समिती सदस्याने अथवा विश्वस्त व्यवस्थेच्या कोणत्याही अधिका-याने वसूल केलेल्या रक्कमा व्यवस्थापनाने प्राधिकृत केलेल्या कार्यालयात भरणेत येतील. समितीस अथवा समिती सदस्यास अथवा अधिका-यास वैयक्तिकरित्या रक्कमा जमा करण्याचा अधिकार रहाणार नाही. या रक्कमेची जमा पावती रितसर व्यवस्थापनाने प्रधिकृत केलेल्या कार्यालयांकडूनत्वरीत दिली जाईल. (४) विश्वस्तव्यवस्थेचा सर्व आर्थिक व्यवहारांसाठी मा. कार्यकारी अधिकारी यांना अधिकार असावेत. सदर अधिकार कायद्यात समाविष्ट असावेत.
७.	२९/१/२००५ ८ – उ	**कलम -२१** विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग (२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीकडून पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात व खर्च करण्यात येईल; (एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने कोणतीही शैक्षणीक संस्था, क्रिडा अकादमी किंवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निरश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी सुधारगृह किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था किंवा कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी यांची नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांच्याकडून स्थापना करुन घेण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी, किंवा (दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे, परंतु, राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्चन्यायालयाच्या पुर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या, मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली, तीन सदस्य, आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य यांची मिळून बनलेली एक छाननी समिती करील, आणि तिचा कालावधी समितीच्या	वैयक्तीक स्वरुपाच्या शस्त्रक्रियेसाठी, मात्र थेट निवडक रुग्णालयांच्या नावे चेकव्दारे अर्थ सहाय्य पाठविण्याची सुरु असलेली योजना पुढेही अंमलात राहण्यासाठी या योजनेची समावेशक तरतूद अधिनियमामध्ये होणे आवश्यक आहे. तसेच विशेष सर्वसाधारण स्वरुपाच्या वैद्यकिय मदती, शैक्षणिक, अर्थसहाय्य, सार्वजनिक व धार्मिक उत्सव आदिसाठी प्रत्येक प्रकरणामध्ये निश्चीत मर्यादेपर्यंन्त (उदा. रुपये पन्नास हजार मात्र) अनुदान देण्यासाठी स्थायी स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे असावीत व त्यांनुसार उचित आर्थिक अनुदाने देण्याचे स्थायी अधिकार व्यवस्थापन समितीस असावेत.

		कालावधीबरोबरच संपेल. परंतु, आणखी असे की, छाननी समिती सभांचे आयोजन करण्यास आणि कामकाज पाहण्यासाठी, तसेच, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी विनियम तयार करील आणि संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जांची शिफारस करण्यासाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयाने, केवल आर. सेमलानी यांच्या प्रकरणामधील रिट विनंती अर्ज क्र. २००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निदेश आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुरुप अशी मार्गदर्शक तत्वे तयार करुन ती प्रकाशीत करील.	
८.	२९/१/२००५ ८ – ऊ	**कलम - २२** व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग (२) व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चीत करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटेल तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निदेश देता येईल.	प्रस्तुत व्यवस्थापन निधीच्या विनियोगविषयक बाबींवर मागील तीन वर्षात झालेल्या खर्चाचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे. **<u>सन २००१-२००२</u>** ढोबळ उत्पन्न रु. ६१,३६,५१,७२३/- विहित बाबींवरील खर्च रु. ११,८४,५४,२२३/- **प्रमाण – १९.३० टक्के** **<u>सन २००२-२००३</u>** ढोबळ उत्पन्न रु. ६१,३५,६५,४२३/- विहित बाबींवरील खर्च रु. १२,१९,७१,७५०/- **प्रमाण – १९.८८ टक्के** **<u>सन २००३-२००४</u>** ढोबळ उत्पन्न रु. ६८,७७,५८,७४१/- विहित बाबींवरील खर्च रु. १३,२८,५७,०८६/- **प्रमाण – १९.३२ टक्के** उपरोक्त तपशील विचारात घेता व्यवस्थापन निधीचे प्रमाण मागील वर्षाच्या ढोबळ उत्पन्नाच्या १० टक्के असावे अशी तरतुद आहे, त्यात बदल करुन, हे प्रमाण २५ टक्के करण्यात यावा.
९.	२९/१/२००५ ८ – ए	**कलम - २९** समितीचा वार्षीक अहवाल (१) समिती दिनांक ३१ मार्च रोजी समाप्त होणा-या प्रत्येक वित्तीय वर्षासाठी, लेखापरिक्षकाच्या अहवालासह, वार्षिक अहवाल तयार करील, ज्यामध्ये विश्वस्तव्यवस्थेची वित्तीय स्थिती, तिच्या जमेचे व खर्चाचे तपशील, छाननी समितीचा अहवाल, विश्वस्तव्यवस्थेकडून ज्यांना वित्तीय सहाय्य देण्यात आले अशा, देणग्या स्विकारणा-या संस्थांची तपशीलवार यादी (संपुर्ण पत्त्यासह) उद्देशाशी संबंधित माहिती, अशा वित्तीय सहाय्याची रक्कम, दर्शविलेली असेल, आणि त्या अहवालाची प्रत, त्या वर्षाच्या ३० जून च्या नंतर नसेल अशा वेळी, राज्य शासनास आणि धर्मादाय आयुक्तास सादर करील. (२) पोट कलम (१) खाली प्राप्त झालेली अहवालाची प्रत, राज्य शासन, ती प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवील आणि त्याची प्रत किंवा त्यामधील कोणतेही उतारे, त्यांची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला, समिती निर्धारित करील अशी वाजवी फी किंवा आकार प्रदान केल्यावर, विश्वस्तव्यवस्थेकडून दिले जातील.	या तरतुदीनुसार, संस्थानचा लेखापरिक्षण अहवाल (वार्षिक अहवालासह) राज्य शासनास व मा. धर्मादाय आयुक्ताकडे, दिनांक ३० जूनपूर्वी सादर करावा असे निर्देशीत करण्यात आले आहे, हा कालावधी अत्यंत अपुरा असल्याने, ही कालमर्यादा पूर्वीप्रमाणेच दिनांक ३० सप्टेंबरपर्यन्त वाढविणे आवश्यक आहे.

१०.	२८/०८/२०१४ ६९३	**कलम-१३** (४) समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-याची (कार्यकारी अधिका-या व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल. परंतू, या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा **दोन हजार** रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशी कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त केली जाणार नाही.	(४) समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-याची व कर्मचा-यांची **कंत्राटी पध्दतीने** नेमणूक करता येईल. परंतू, समितीस जेव्हा राज्य शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधाव्यतिरिक्त ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-यांला दरमहा **पन्नास हजार** रुपयापेक्षा अधिक वेतन देय असेल अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-यांची नेमणूक शासनाचे पूर्व परवानगीने करील.
११.	२८/०८/२०१४ ६९३	**समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये १४ (२)** (ख) बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठ्यासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य **२५,०००/-** रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्वीकारण्याचे.	**समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये १४(२)** (ख) बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठ्यासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य **रु. दहा लाख** पेक्षा अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्वीकारण्याचे.
१२.	२८/०८/२०१४ ६९३	**१७ (४)** विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेली, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्या खेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.	**(४)** विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेली, **पाच लाख** रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्या खेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमीत करण्यात येणार नाही.

उपरोक्त प्रमाणे, सन-२००५, ते २०१४, या कालावधीत, उपरोक्त नमुद केलेले नियम, विनियम व संस्थानचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या विनियमांमध्ये दुरुस्ती / बदल करुन घेणे गरजेचे असल्याने, तत्कालीन, मा. व्यवस्थापन समिती व मा. त्रिसदस्य समितीने नियम, विनियमात दुरुस्ती करणेबाबत वेळोवेळी निर्णय घेतले होते व त्यानुसार, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आले होते, तथापी, त्यास शासन मान्यता मिळालेली नाही.

तथापी, मा.व्यवस्थापन समिती चे, दि.१८/७/२००५, रोजीचे, सभेतील निर्णय क्र.३६९ नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे, अधिनियम, नियम, विनियम या संबंधात तरतूदी सुचविणे व तदनुसार प्रारुप मसुदा तयार करणेचे कामी, मा.श्री सुधाकर जोशी, आय.ए.एस. (निवृत्त), पुणे, यांची कन्सल्टंट म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, त्यांनी तयार केलेले नियम, विनियम शासनास सादर करण्यात आले होते, त्यावर, शासनाने दि.३/१२/२००८, व दि.१४/२/२०११, रोजीचे निर्णयाने नियम, विनियम अंतिम करण्यासाठी ६ सदस्यांची समिती गठीत केली होती, त्यानंतर, शासनाने, दि.२८/१०/२०१३, रोजीचे पत्राने खालील विनियम व नियमास काही सुधारणांसह शासन मान्यता देण्यात आली आहे.

1) Regulations for Meeting of the Committee.
2) Regulation of Sub-Committee.
3) Advisory Council Regulations.
4) Regulation for Scrutiny Committee.
5) Bhakta Mandal Regulations.
6) Service Regulations -2013.
i) General Conditions of Service Regulations,
ii) Conduct Regulations.
iii) Leave Regulations.
iv) Joining Time & Payment during Suspension, Dismissal & Removal Regulations.
v) Pay and Allowances Regulations.

उपरोक्त प्रस्तावात नमुद करण्यात आलेले, परंतू अधिनियमात बदल/ दुरुस्ती न झालेले नियम, विनियम व दैनंदिन कामकाजात अडचण येत असलेले नियम, विनियमात आवश्यक ती दुरुस्ती करणेकामी तज्ञ सल्लागार/ तज्ञ समितीची नेमणूक करुन, त्यांनी तयार केलेला सुधारीत अहवाल शासन मान्यतेसाठी सादर करता येईल, याबाबत, तज्ञ सल्लागार/ तज्ञ समितीची नेमणूक करणे, तसेच, त्यांना द्यावयाचे मानधन ठरविणेबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ व महाराष्ट्र शासनाने दि.२४.०१.२०१३ पासुन लागु केलेले विनियमांमध्ये आवश्यक दुरुस्त्या/ बदल करणेसाठी विधी व न्याय विभागामध्ये उपसचिव दर्जाच्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची तज्ञ म्हणून नेमणूक करणेत यावी. तसेच सदरहू बदल/ दुरुस्त्या कोणत्या कारणांसाठी करावयाचे आहेत याचा प्रस्तावामध्ये उल्लेख करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, अस ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.१६ **श्री साई प्रसादालयाच्या शेजारील कार्यक्रमासाठीचा हॉल ॲकॉस्टीक करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम -२१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- दि.२४ नोव्हेंबर २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी संस्थानच्या विविध विभागांनी करावयाच्या कामकाजाबाबत मा. कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी यांना मुंबई येथील बैठकीत श्री साई प्रसादालयाच्या VVIP डायनिंग हॉल शेजारील कार्यक्रमासाठीचा हॉल ॲकॉस्टिक करणेकामी सुचना केली आहे. यापुर्वी माहिती तंत्रज्ञान विभागाशेजारील हॉलमध्ये विविध कार्यक्रम, प्रशिक्षण तसेच मा. मंत्री महोरदयांच्या सभा होत असत. आता प्रसादालय VVIP डायनिंग हॉल शेजारील हॉलचा वापर कार्यक्रमांसाठी सुरु करणेत आला असल्याबाबत ध्वनीक्षेपन विभाग प्रमुख, यांनी दि.०७/१२/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये इकडील विभागास कळविले आहे. श्री साई प्रसादालयाच्या VVIP डायनिंग हॉल शेजारील कार्यक्रमाच्या हॉलला डोम असल्याने स्पिकरचा आवाज घुमतो त्यामुळे हा हॉल ॲकॉस्टिक करणेकामी प्रथमतः हॉलचे अद्ययावतीकरण / नुतनीकरण त्या दृष्टीने होणे अत्यंत आवश्यक असलेबाबत इकडील विभागास कळविले आहे.

प्रस्तावः- ध्वनीक्षेपन विभागाने कळविल्याप्रमाणे श्री साई प्रसादालयाच्या VVIP डायनिंग हॉल शेजारील कार्यक्रमाचा हॉलला Acoustic करणेकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

Sr.No.	Descrition	Qty./ Unit	Rate	Amount
01	Ceiling using plywood frame, 50mm Synthetic wool & Techno acoustic panels.	360 sqm.	3500/-	12,60,000/-
02	Wall panelling using Ecophon, 20mm fabric wrapped panels.	150 sqm.	3200/-	4,80,000/-
			Total Amount -	**17,40,000/-**

श्री साई प्रसादालयाच्या VVIP डायनिंग हॉल शेजारील कार्यक्रमाच्या हॉलला Acoustic करणेकामी वरील प्रमाणे रक्कम रु.१७,४०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी विषयांकीत कामासाठी येणारे खर्चास व याकामी सल्लागाराची नेमणूक करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाच्या VVIP डायनिंग हॉल शेजारील कार्यक्रमाच्या हॉलमध्ये प्रतिध्वनी जास्त येतो, याकरीता सदरहू हॉलला Acoustic करणे व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.१७ **सन २०१६-१७ करीता गावरान तूप खरेदी करणे व जानेवारी ते मार्च २०१७ कालावधीसाठी तूप घेणे.**

प्रस्ताव- सन २०१६-१७ चे गावरान तुप खरेदीकामी मार्च-२०१७ पर्यंत पुरवठा आदेश इकडील जा.क्र.एसएसएसटी/वशी-खरेदी/१८६७/२०१६ दिनांक १६.०७.२०१६ अन्वये मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि.,फलटण यांना देण्यात आला होता व तसा करारनामाही दि.१७/८/२०१६ रोजी करण्यात आलेला होता. तसेच सदर कंपनीची शासन खरेदी नियमावलीनुसार एकूण पुरवठा आदेशाच्या ३ टक्के रक्कम रु.९६,११,१००/- संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून जमा केलेली आहे.

सन २०१६-१७ चे गावरान तूप खरेदीचा प्रस्ताव दि.१०/०६/२०१६ रोजी Circulatery Agenda व्दारे सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

"सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण कंपनीसंदर्भात वेबसाईटवरुन माहिती काढली असता, असे दिसून आले की, सदरील कंपनी ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नामांकित आहे. संस्थानला अशीही माहिती मिळाली की, सदर गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण ही सध्या श्री तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुपती या संस्थानला गाईचे गावरान तूपाचा पुरवठा करीत आहे व त्यांची

पुरवठा सेवा व्यवस्थित आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता व लाडू प्रसाद निर्मिती विभागाचे काम विना अडथळा सुरळीत चालण्यासाठी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण कंपनीला १ महिन्यासाठी प्रायोगिक तत्वावर गावरान तूप खरेदीकामी पुरवठा आदेश देणे उचित होईल, असे समितीला वाटते. सबब संबंधित खरेदी विभागाने अंदाजे १ महिन्याकरीता आवश्यक असणारे सुमारे १००० क्विंटल गाईचे गावरान तूपाचा पुरवठा आदेश प्रती क्विंटल रु.३५,४००/- दराने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रायव्हेट लिमिटेड, फलटण यांना दयावा असे समितीने एकमताने ठरविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली".

मा.उप समितीने दि.२७/०५/२०१६ रोजीचे सभेमध्ये केलेली शिफारस दिनांक १४.०६.२०१६ चे सभेत निर्णय क्र.३२३ (८) नुसार कायम होताना खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्र.३२३ (८) – यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता संस्थानसाठी गायीचे गावरान तुप खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधीन मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचे प्रती क्विंटल रु३५,४००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच उपरोक्त प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचा पुढील ३ वर्षांसाठी काळ्या यादीत समावेश करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तथापि दि.१४/७/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.४३० खालीलप्रमाणे झालेला आहे.

निर्णय क्रं.४३० – "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे, मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे गावरान तूपाचा तपासणी अहवाल तसेच प्रत्यक्ष तूप वापरणारे लाडू कंत्राटदार यांचेकडील आचा-यांचा अभिप्राय या बाबींचा विचार करता मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून तीन महिने कालावधीसाठी आवश्यक असणारे गावरान तूप प्रती क्विंटल रु.३५,४००/- मात्र या दराने खरेदी करण्यात यावे, असे ठरले".

सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा केली असता, सन २०१६-१७ चे गाईचे गावरान तूप खरेदीबाबतचे प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती नवीन मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन गावरान तूप खरेदी सन २०१६-१७ चे वस्तुस्थितीबाबत सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.९/१०/२०१६ चे सभेसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.७२७- 'उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गावरान तूपाच्या खरेदीसाठी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे मंजूर दर हे सध्याचे बाजारभावाच्या दरापेक्षा जास्त आहेत, याकरीता मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना उर्वरित गावरान तूपाचा पुरवठा आदेश देणेपूर्वी दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा करणेत यावी तसेच याकामी मा. व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.'

सदर निर्णयास अनुसरुन, इकडील जा.नं.एसएसएसटी/खरेदी/४१४९/२०१६ दि.८/११/२०१६ अन्वये मा.श्री.प्रताप भोसलेसाहेब, सदस्य यांना लेखी पत्र देण्यात येऊन मार्गदर्शन मिळणेची विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मा.श्री.प्रताप भोसलेसाहेब, यांचेशी दिनांक २०.१२.२०१६ रोजी संपर्क केला असता, संबंधित पुरवठाधारकाशी संपर्क साधून गावरान तुपाचा भाव कमी करणेबाबत प्रशासन स्त रावर चर्चा करणेबाबत सुचना केल्या आहेत.

संस्थानने सन २०१६/१७ करिता गावरान तूप खरेदीकामी ई-निविदा प्रसिध्द केली होती. त्यातील अट क्रं. १ खालीलप्रमाणे होती.

पुरवठा करावयाचे गावरान तूपाचा अंदाजे तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यात दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. दराच्या बाबतीत वाटाघाटी केल्या जाणार नाहीत, निविदेमध्ये नमुद केलेल्या अंतिम दराशिवाय निविदाधारकास श्री साईबाबांची सेवा म्हणून काही सवलत/सुट देण्याची इच्छा असल्यास त्याने या रकमेपेक्षा किती टक्के सुट देऊ ती रक्कम ऑनलाईन निविदा भरतानाच कमी करुन भरावी.

सदर अटी-शर्तीस अनुसरुन त्यांचेशी दराबाबत पूर्वी चर्चा केलेली नव्हती.

शासनाच्या खरेदी नियमावलीमधील ४.४.४.१ नुसार - L1 दर असना-या निविदाधारकाशी वस्तुची/साहित्याची किंमत असमर्थनिय असेल, बाजारातील भावापेक्षा जास्त असेल व निविदाकाराने संघ स्थापन केला असल्याचा संशय असेल तर अशा परिस्थितीत वाटाघाटी करता येतात. मात्र कोणत्याही परिस्थितीत निविदांना त्यांच्या वैधता कालावधीमध्येच अंतीम स्वरुप देण्यात येईल याची काळजी घेण्यात यावी, अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दर कमी करणेबाबतचे निर्णयास अनुसरुन व खरेदी विभागाकडील याबाबतचे प्रस्तावावरील आदेशास अनुसरुन मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना नं.एसएसएसटी/ वशी-खरेदी/ ५२८३/ २०१७ दि. १२/०१/२०१७ अन्वये गाईचे गावरान तूपाचे दर कमी करणेबाबत पत्र देण्यात आले होते.

मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांनी दिनांक ०६.०१.२०१७ चे पत्राने प्रती किलो रु.२५/- म्हणजेच रु.३५,४००/- प्रती क्विंटल दराऐवजी रु.३७,९००/- प्रती क्विंटल दराने संस्थानने गावरान तुप खरेदी करणेची विनंती केलेली आहे.

तसेच संस्थानने दर कमी करणेसाठी दिलेले पत्राला त्यांनी त्यांचे दिनांक १८/१/२०१७ चे पत्राने खालीलप्रमाणे लेखी उत्तर कळविले आहे.

" उपरोक्त विषयानुसार आपले पत्र दि.१२ जानेवारी २०१७ मिळाले. यावरुन बाजारामधील तूपाचे दर कमी झाल्याचे कळाले. परंतु आमच्या भागात दूधाचे दर जास्त असून तूपाचे दर वाढलेले आहेत. जर आपणास कमी दरामध्ये बाजारात गाईचे तूप मिळत असल्यास आपण ते सदरचे पुरवठादाराकडून खरेदी करु शकता. त्याबद्दल आमची कोणतीही हरकत नाही. "

सध्या संस्थानकडे २४८ क्विंटल गावरान तुप शिल्लक आहे. तसेच मागील महिनयातील १०० क्विंटल तूप मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचेकडून येणे बाकी आहे सदर तुप हे अंदाजे ८-१० दिवस पुरेल. त्यामुळे संस्थानला तूपाची त्वरित गरज आहे. माहे जानेवारी २०१७ मध्ये संस्थानकडून तूप खरेदीचे चलन काढण्यात आलेले नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण हे संस्थानकरीता गाईचे गावरान तूपाचे दर कमी करणेस तयार नाहीत असे दिसते. तसेच त्यांनी रु.२५/- प्रतीकिलोप्रमाणे भाववाढ मिळणेचीही मागणी केलेली आहे. संस्थानने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांचेशी केलेले करारनाम्यात मंजूर दरापेक्षा भाववाढ देण्याची तरतूद नाही.

तरी सन २०१६-१७ च्या निविदा कालावधीतील माहे जानेवारी ते मार्च २०१७ या कालावधीत संस्थानला आवश्यक असलेले गाईचे गावरान तूप मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचेकडून प्रतीक्विंटल दराने घ्यावे अगर कसे? याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ च्या निविदा कालावधीतील माहे जानेवारी ते मार्च २०१७ या कालावधीत संस्थानला आवश्यक असलेले गाईचे गावरान तूप मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचेकडून प्रतीक्विंटलमंजुरदराने खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.१८ **सन २०१६-१७ करीता बिस्कीटे खरेदी करणे व जानेवारी ते मार्च २०१७ कालावधीमधील बिस्कीटांच्या उपलब्धतेबाबत.**

प्रस्ताव- सन २०१६-१७ चे किराणामाल खरेदीमध्ये ५ प्रकारची बिस्कीटे खरेदीचा समावेश होता. दि.२१/४/२०१६ ते दि.१२/५/२०१६ पर्यंत ई-निविदा प्रथम एकत्रितरित्या मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये बिस्कीटासाठी एकच निविदाधारक मे. अग्रवाल एजन्सीज, राहाता यांनी भाग घेतला होता. तथापि त्यांनी कागदपत्राची पुर्तता न केलेमुळे त्यांची निविदा अपात्र ठरली होती.

त्यामुळे एकत्रित किराणा माल निविदेतील चहा पावडर, कॉफी व बिस्कीटांसाठी दुस-यांदा ई-निविदा दि.२३.०६.२०१६ ते ०५.०७.२०१६ या कालावधीत मागविण्यात आल्या होत्या. तथापि बिस्कीटे खरेदीकामी तीन निविदा प्राप्त न झालेमुळे खरेदी विभागाकडून दि०५.०७.२०१६ ते १२.०७.२०१६ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि प्रथम मुदतवाढ देऊनही दोनच निविदा प्राप्त झालेमुळे खरेदी नियमावलीस अनुसरून पुन्हा एक आठवडयाची म्हणजे दि.१९.०७.२०१६ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि दोन वेळेस निविदा व २ वेळेस मुदतवाढ देऊनही याकामी दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे बिस्कीटाची गरज लक्षात घेऊन सदर प्राप्त दोन निविदांचे तांत्रिकबीड दि.२५.०७.२०१६ रोजी उघडण्यात आले होते. यामध्ये मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे व अग्रवाल एजन्सीज, राहाता यांच्या दोन्ही निविदा पात्र ठरल्या होत्या.

सदर पात्र निविदांचे कमर्शियल बीड उघडणेकामी मा.उपसमितीचे दि.२२/८/२०१६ चे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.उपसमितीच्या दि.२२/८/२०१६ रोजी झालेले सभेत, 'दोनच निविदा असल्याने व पतंजलीनिर्मित बिस्कीटेही बाजारमध्ये कमी भावात मिळत असल्यामुळे, त्यांनाही ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणेबाबत कळविणेत यावे, अशी उपसमितीने शिफारस केली होती. तसेच सदर निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/९/२०१६ चे सभेत निर्णय क्रं.५३८ (७) मान्य करण्यात आला होता.

निर्णय क्रमांक- ५३८(७) यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असलेली बिस्किटे खरेदीकामी दोनच निविदा पात्र असल्यामुळे सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येऊन, याकामी नव्याने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच पतंजलीनिर्मित बिस्किटेही बाजारमध्ये कमी भावात मिळत आहेत, त्यांनाही ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणेबाबत कळविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयास अनुसरून मे.पंतजली बिस्कीट, प्रियागोल्ड, पार्ले व ब्रिटानिया या कंपन्यांना तसेच एरिया सेल्स मॅनेजर, पतंजली, नाशिक यांनाही संस्थानचे बिस्कीटाची निविदा भरणेकामी मेल करण्यात आले होते. तसेच मे.पतंजली आयुर्वेद लि., हरिद्वार यांना जा.क्र.एसएसएसटी-वशी-खरेदी-३०६९-२०१६ दि.१४/९/२०१६ अन्वये पत्र देण्यात आले होते.

तथापि संस्थानच्या निविदेसाठी वरील कुठल्याही कंपन्यांचा प्रतिसाद मिळालेला नव्हता. दरम्यानचे कालावधीत दि.२६.०९.२०१६ ते १५.१०.२०१६ या कालावधीत आवश्यक असणारे बिस्कीट खरेदीसाठी,

खरेदी नियमावलीनुसार कंपनी/ ब्रॅन्डचा उल्लेख न करता तिस-यांदा फेर ई-निविदा नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीकरीता मागविण्यात आल्या होत्या. तथापि मुदतीनंतर फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे खरेदी नियमावलीनुसार दि.२२.१०.२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.७/८/२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ५०९ अन्वये पुन्हा एक आठवडयांची म्हणजेच दि.२९.१०.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

यामध्ये नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीकरीता मागविण्यात आलेल्या ई-निविदेच्या मुदतीनंतर याकामी ३ निविदा प्राप्त झालेमुळे याकामीच्या तांत्रिक निविदा मा.खरेदी समितीचे दि.१०.११.२०१६ चे सभेत उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये खालील तीन निविदाधारक पात्र ठरले होते.

१. मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी
२. मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे
३. मे.रविराज बिजनेस, साकुरी

वरील तीनही निविदा पात्र ठरल्यामुळे बिस्कीटे खरेदीकामीचे कमर्शियल बीड मा.उपसमितीचे सभेत उघडणेकामी दि.२२.११.२०१६ रोजी सभा कामकाज विभागाकडे प्रस्ताव देण्यात आला होता.

सदर बिस्कीट खरेदीचे कमर्शियल बीड उघडणेकामीचा प्रस्ताव मा.उपसमितीचे दि.२८.१२.२०१६ चे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावेळी "यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत चहा, बिस्किट पुरविणेत येत आहे. याकरीता कमी बिस्किटे असलेले (२ किंवा ४), बिस्किट पुडे खरेदी करणेत यावेत व बिस्किट खरेदीकामी योग्य दर मिळणेसाठी एकाच कंपनीच्या कमीत कमी ३ पुरवठाधारकांकडून दर मागवावेत, तसेच कॅन्टीन विभागाकडे बिस्किट टंचाई होऊ नये यामुळे तात्काळ अल्प कालावधीच्या ई-निविदांची मागणी करणेत याती, अशी या उपसमितीची शिफारस आहे," असे ठरले.

दरम्यानचे कालावधीत मागीलवर्षीही बिस्कीटे खरेदीसाठी निविदेला प्रतिसाद मिळालेला नव्हता. त्यामुळे मागीलवर्षी ३-४ वेळेस ई-निविदा प्रक्रिया करुन, अंतिम निर्णय होऊन माहे मार्च-२०१६ महिन्याकरीता मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांना बिस्कीटे पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आला होता. तसेच त्यामुळे मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून माहे जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, या कालावधीसाठी बिस्कीटे खरेदी करण्यात आलेले होते. नोव्हेंबर-२०१७ करीताही रु.११,३५,०२०/- मात्रची बिस्कीटे खरेदी करण्यात आलेली होती.

नोव्हेंबरसाठी खरेदी केलेल्या बिस्कीटांचा पुरेसा साठा असल्यामुळे व नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत पात्र ठरलेल्या ३ ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडून त्याबाबत अंतिम निर्णय होणे अपेक्षित असल्यामुळे डिसेंबर २०१६ या महिन्याकरीता बिस्कीटे खरेदीचा प्रस्ताव सादर केला नव्हता.

सध्या दि.१७.०१.२०१७ अखेर खालीलप्रमाणे बिस्कीटाचा साठा संस्थान भांडार विभागाकडे आहे.

१. पारले लहान - २१६० नग
२. पारले मोठा - --
३. मोनॅको - २५२०० नग
४. क्रॅकजॅक - ४३७७६ नग
५. पारले मारी - १६५६० नग

सदर साठयामधूनच साईभक्तांना मोफत बिस्कीटे वाटपही चालू आहे. ही बिस्कीटे साधारण महिनाअखेरपर्यंत पुरतील असा अंदाज आहे.

कॅन्टीन विभागाने दि.०३.०१.२०१७ चे पत्राने जानेवारी-२०१७ ते मार्च-२०१७ या ३ महिन्यांकरीता खालीलप्रमाणे मागणी नोंदविली आहे.

अ.नं.	तपशिल	मागणी	दर प्रती पुडा	रक्कम रु.
१	बिस्किटे ग्लुकोज लहान	१,०८,००० पुडे	३.७८	४,०८,२४०.००
२	बिस्किटे ग्लुकोज मोठा	१४,७०० पुडे	७.५६	१,११,१३२.००
३	बिस्किटे नमकीन लहान	४०,५०० पुडे	३.७०	१,४९,८५०.००
४	बिस्किटे स्नॅक्स लहान	७९,२०० पुडे	३.७०	२,९३,०४०.००
५	बिस्किटे मारी लहान	३९,००० पुडे	३.७०	१,४४,३००.००
			एकुण रक्कम रु.	**११,०६,५६२.००**

वरील मागणीप्रमाणे बिस्कीटे खरेदी करणेकामी अंदाजे १२ लाखापर्यंत खर्च येईल.

माउपसमितीचे निर्णयाप्रमाणे. कमी बिस्किटे असलेले पुड्यांची माहिती घेणे तसेच याकामी अल्प मुदतीची ई करणेनिविदा प्रसिध्द-, ३ निविदा प्राप्त होणे, तांत्रिक निविदा उघडणे, त्यानंतर कमर्शियल निविदा उघडणे व अंतिम निर्णय होणे या कार्यवाहीसाठीही वेळ लागेलनिविदा -नचे कालावधीत सदर ईमुळे दरम्यात्या . न करु काऊंटरवर उपलब्धनमध्येटे वाटपाचे सेवेत तसेच कॅन्टीना मोफत बिस्कीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत साईभक्तां असटे उपलब्धसाठी बिस्कीदेण्याणे गरजेचे आहे.

तरी कॅन्टीन विभागाने जानेवारी ते मार्च २०१७ या कालावधीसाठी केलेले वरील मागणीप्रमाणे बिस्कीटे मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून आवश्यकतेप्रमाणे वरील नमूद ५ प्रकारची बिस्कीटे मागील निविदा दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कॅन्टीन विभागास जानेवारी, २०१७ ते मार्च, २०१७ या कालावधीसाठी आवश्यक असलेली ५ प्रकारची बिस्कीटे मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.१९ **सन २०१७-१८ करीता लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी गाईचे गावरान तूप वार्षिक खरेदी करणे.**

प्रस्ताव- संस्थानचे लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागासाठी सन २०१७-१८ करिता (माहे एप्रिल-२०१७ ते मार्च-२०१८) खरेदी करावयाच्या किराणा माल व गावरान तूप खरेदीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती पुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने, संबंधित विभागांना उपरोक्त कालावधीत दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तूप व त्याबाबतचे खर्चाची सविस्तर मागणी सादर करणेबाबत इकडील जा.क्र.१७१८/२०१६ दि.०२.०८.२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांनी त्यांचेकडील सन २०१७-१८ करिता आवश्यक गावरान तुपाची मागणी कळविलेली आहे. सदर मागणी एकत्रित व पूर्णांकित करुन त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.३०.१०.२०१५ रोजीचे शासन निर्णयामध्ये खरेदी नियमावली लागू केलेली आहे तसेच यामध्ये दि. ०१/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाणे सुधारणा केलेली आहे. ती संस्थानला लागू आहे. त्यास अनुंसरुन गाईचे गावरान तूपाची वार्षीक खरेदी ई-निविदा पध्दतीने करावी लागणार आहे. मागील वर्षी मा.उच्च न्यायालयाचे ५ एप्रिल, २०१३ चे निर्देशास अनुसरुन ई-निविदा पध्दतीनेच गाईचे गावरान तूप खरेदी करण्यात येत आहे.

मागील वर्षी गाईचे गावरान तूप खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात आली होती.

१. मा.व्यवस्थापन समितीची सदर तूप खरेदीस व खर्चास तत्वत: मान्यता मिळालेनंतर (मा.उच्च न्यायालयाचे परवानगीनंतर) ई-निविदा पध्दतीने खरेदीसाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली या राज्यांतील प्रमुख शहरात म्हणजेच पुणे, नागपूर, मुंबई, कोल्हापूर, सातारा, नाशिक, अहमदनगर, अहमदाबाद, बडोदा, चेन्नई, हैद्राबाद, बेंगलोर, इंदौर, लखनौ, दिल्ली या ठिकाणी प्रसिध्द होणारे वर्तमानपत्रात ई-निविदा प्रसिध्दीची जाहिरात देण्यात आली होती.

२. नियमानुसार निविदा कालावधी ठेवून ई निविदा प्रसिध्द करणे तसेच Turnover व इतर आवश्यक कागदपत्रे तांत्रीक निविदेमध्ये मागविणे.

३. ई-निविदा प्रक्रियेची मुदत संपल्यानंतर तूपाचे नमुने व तांत्रीक लिफाफा बोलाविणे.

४. तांत्रिक निविदा खरेदी समिती सभेत उघडणे, निविदांची छाननी करुन पात्र निविदाधारक ठरविणे, यावेळी संबंधित निविदाधारकांना उपस्थित राहणेबाबत निविदा सूचनेमध्ये आवाहन करणे.

५. पात्र निविदाधारकांचे प्राप्त नमुने शासकीय/NABL लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविले होते.

६. बंद पाकीटातील प्राप्त लॅब रिपोर्ट मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेसमोर उघडले होते.

७. ज्या निविदाधारकांचा लॅब रिपोर्ट Food Safety Act नुसार योग्य असेल त्यांचेच Commercial Bid मा.खरेदी समितीचे सभेत उघडले होते व यावेळी संबंधित निविदाधारकांना बोलविले होते.

८. मा.व्यवस्थापन समितीचे अंतिम निर्णयानंतर पुरवठा आदेश देणे.

गावरान तुपाचे सध्याचे खरेदीचे दर प्रती क्विंटल रु.३५,४००/- आहेत. तर Estimated Cost काढण्यासाठी २५ कंपन्यांना ई-मेलव्दारे दराबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यातील खालीलप्रमाणे ४ कंपन्यांनी ई-मेलव्दारे दिलेले प्रती क्विंटलचे दर त्यांचेसमोर नमुद केले आहेत.

अ.नं.	कंपनीचे नांव	दर प्रती क्विंटल व्हॅटसह
A.	मे.प्रभात डेअरी प्रा.लि., रांजणखोल (प्रभात)	- 47,700/-
B.	मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी (सोनाई)	- 39,220/-
C.	मे.इंडीया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे (ब्रिटानिया)	- 47,200/-
D.	मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण (गोविंद)	- 46,500/-

वरील ४ ही दरांची सरासरी विचारात घेता तुपाचा दर अंदाजे प्रती क्विंटल रु४५,१५५/- येत आहे. जळगाव जिल्हा दूध संघ , जळगाव यांचे विकास ब्रॅण्ड तूपाचे दराबाबत दुरध्वनीवरुन माहिती घेतली असता त्यांनी त्यांचा पुढील वर्षाचा तूपाचा दर अंदाजे प्रति किलो रु.५००/- चे दरम्यान राहिल असे सांगीतले तर अमूल तूप यांचे प्रतिनिधीशी संपर्क साधला असता त्यांनी त्यांचे सध्याचे दर रु.४१५/- प्रती किलो आहेत तथापि पुढील वर्षाचे दराबाबत आताच काही सांगता येणार नाही असे सांगीतले आहे स्थानिक बाजार पेठेत म्हणजे मे. के.एल.

चुग, राहाता यांचेकडे तूपाचे दराबाबत चौकशी करता त्यांनी रक्कम रु.४६०/- प्रती किलो असे दर दूध्वनीवरुन सांगितले आहेत.

वरील सरासरी प्रती क्विंटल दर रु.४५,१५५/- X ११,२०० क्विंटल तुपाची वार्षिक मागणी विचारात घेता याकामी एकुण अंदाजित खर्च रक्कम रु.५०,५७,३६,०००/- निश्चित करण्यात आली आहे.

तरी

(अ) प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी ११,२०० गाईचे गावरान तूप ई-निविदा पध्दतीने वार्षिक खरेदीकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.५०,५७,३६,०००/- (अक्षरी रुपये पन्नास कोटी सत्तावन्न लाख छत्तीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस,

(आ) गावरान तूप खरेदीकामी मागील वर्षीप्रमाणे कार्यपद्धती वापरावयाची किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस,

(इ) वरील अ.नं.१ मध्ये प्रस्तावित केलेले ठिकाणी विस्तृत प्रसिध्दीसाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेस,

वरील अ, आ व इ मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत पुढील निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी गाईचे गावरान तूप खरेदी करणेसाठी वार्षिक दर घेण्याऐवजी ई-निविदेद्वारे प्रत्येकी ३ महिन्यांचे दर घेण्यात येऊन, निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या खर्चास सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.२० **सन २०१७-१८ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी किराणा माल व अनुषंगिकसाहित्य आणि भाजीपाला वार्षिक खरेदी करणे.**

प्रस्ताव- संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन, लाडुनिर्मिती व मंदिर विभागांसाठी सन२०१७-१८ करिता (माहे एप्रिल-२०१७ ते मार्च-२०१८) खरेदी करावयाच्या किराणामाल खरेदीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती पुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने, संबंधित विभागांना उपरोक्त कालावधीत दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तूप व त्याबाबतचे खर्चाची सविस्तर मागणी सादर करणेबाबत इकडील जा.क्र.१७१८/२०१६ दि.०२.०८.२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन उपरोक्त विभागांनी त्यांचेकडील सन २०१७-१८ करिता आवश्यक किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तुंची मागणी कळविलेली आहे.

तसेच सदरच्या तक्त्यामध्ये कॅन्टीन विभागाने मागणी केलेल्या आयटेममध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे निर्णयामुळे २५ टक्के वाढ धरावी असे दि.०३.०१.२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्याप्रमाणे सदर मागणी एकत्रित व पूर्णांकित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.३०.१०.२०१५ रोजीचे शासन निर्णयामध्ये खरेदी नियमावली लागू केलेली आहे. तसेच यामध्ये दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाणे सुधारणा केलेली आहे. ती संस्थानला लागू आहे. त्यास अनुसरुन किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तुंची वार्षीक खरेदी ई-निविदा पध्दतीने करावी लागणार आहे. मागील वर्षी मा.उच्च न्यायालयाचे ५ एप्रिल, २०१३ चे निर्देशास अनुसरुन ई-निविदा पध्दतीनेच सदरची खरेदी करण्यात येत आहे.

माहे एप्रिल-२०१६ ते डिसेंबर-२०१६ या कालावधीत प्रत्यक्ष वापर व जानेवारी-२०१७ ते मार्च-२०१७ या कालावधीत अंदाजे होणारा वापर खर्च याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सन २०१६-१७ चे टेंडर जुन-२०१६ पासून कार्यान्वित झाले होते. तथापि वरीलप्रमाणे वापर व खर्च मात्र एप्रिल-२०१६ पासून काढण्यात आला आहे. त्यास अनुसरुन एप्रिल-२०१६ ते डिसेंबर-२०१६ या कालावधीत किराणामालासाठी रक्कम रु.२६,१०,९९,५१६/- खर्च झाला आहे व जानेवारी-२०१७ ते मार्च-२०१७ या कालावधीत अंदाजे रक्कम रु.८,७०,३३,१७२/- खर्च अपेक्षित आहे.

मागील वर्षी किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तु खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात आली होती.

१. मा.व्यवस्थापन समितीची सदर किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तु खरेदीस व खर्चास तत्वत: मान्यता मिळालेनंतर (मा.उच्च न्यायालयाचे परवानगीनंतर) ई-निविदा पध्दतीने खरेदीसाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली या राज्यांतील प्रमुख शहरात म्हणजेच पुणे, नागपूर, मुंबई, कोल्हापूर, सातारा, नाशिक, अहमदनगर, अहमदाबाद, बडोदा, चेन्नई, हैद्राबाद, बेंगलोर, इंदौर, लखनौ, दिल्ली या ठिकाणी प्रसिध्द होणारे वर्तमानपत्रात ई-निविदा प्रसिध्दीची जाहिरात देण्यात आली होती.

२. नियमानुसार निविदा कालावधी ठेवून ई निविदा प्रसिध्द करणे तसेच Turnover व इतर आवश्यक कागदपत्रे तांत्रीक निविदेमध्ये मागविणेत आले होते.

३. ई – निविदा प्रक्रियेची मुदत संपल्यानंतर पुढील तीन दिवसांमध्ये मालाचे व साहित्याचे नमुने सिलबंद कापडी पिशवीत बोलविण्यात आले होते.

४. तांत्रिक निविदा खरेदी समिती सभेत उघडून, निविदांची छाननी करुन पात्र निविदाधारक ठरविले होते, यावेळी संबंधित निविदाधारकांना उपस्थित राहणेबाबत निविदा सूचनेमध्ये आवाहन करण्यात आले होते.

५. राहुरी येथील कृषी तज्ञ व संस्थान आचारी यांचेसमोर नमुने निवडतांना आलेल्या नमुना पिशवीला संस्थानच्या कापडी पिशवीचे कव्हर घालून निविदाधारकांचे पिशवितून नमुना काढून ताटामध्ये तज्ञांसमोर ठेवण्यात आले होते. या प्रक्रियेचे वेळी पारदर्शकता राहण्यासाठी संबंधीत निविदाधारकांना बोलाविणेत आले होते. त्याची ध्वनिक्षेपन विभागामार्फत Video Shooting घेण्यात आली.

६. यामधील खाद्यतेल, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर, पेपर पिशवी, पेपरकप साठी पात्र निविदाधारकांचे प्राप्त नमुने शासकीय/NABL लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविले होते. बंद पाकीटातील प्राप्त लॅब रिपोर्ट मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेसमोर उघडले होते.

७. तज्ञांनी निवडलेले नमुन्यांची यादी केल्यानंतर नमुने नवीन पिशवीमध्ये बंद करुन बॉक्समध्ये ठेऊन बॉक्स सिलबंद करण्यात आले होते. तज्ञांनी निवडलेल्या नमुन्यांची यादी अंतिम झाल्यानंतर ती सिलबंद बॉक्समध्ये ठेवण्यात आली होती.

८. Commercial Bid उघडण्याचे दिवशीच वरील नमुन्यांचे सिलबंद केलेले बॉक्स उघडण्यात आले होते, त्यावेळीही निविदाधारकांना बोलाविणेत आले होते. त्यावेळी त्यांना निवडलेल्या नमुन्यांची यादी वाचून दाखवण्यात आली होती.

९. निवडलेल्या नमुन्यांचाच Commercial Bid मधुन प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, त्यावर खरेदी समिती सदस्य व मा.अध्यक्षांच्या स्वाक्ष-या घेणेत आल्या होत्या.

१०. त्यानंतर सदर तुलनात्मक तक्ता मा.त्रिसदस्य समितीपुढे Circulatory Agenda व्दारे सादर करण्यात आला होता. त्यास मान्यता मिळालेनंतर पुरवठा आदेश देण्यात आले होते.

११. दरम्यानच्या कालावधीत अंतीम मंजूर नमुन्यांच्या दोन सिलबंद बरण्या दोन प्रशासकीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सिलबंद करुन एक बरणी संस्थानकडे ठेऊन व एक बरणी पुरवठा आदेश देताना निविदाधारकांना देण्यात आली होती.

सन २०१७-१८ वर्षाकरीता खरेदी करावयाचा किराणामाल व अनुषंगिक साहित्य आणि भाजीपाला याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे –

(A) किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदी-

सन २०१७-१८ (एप्रिल २०१७ ते मार्च २०१८) या वर्षासाठी प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदीर विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू हरबरा इ. धान्य तसेच तांदूळ, तेल, साखर, चहा, दूध, विविधप्रकारचा किराणा माल, मसाला पदार्थ, ग्लासीन/पोस्टर लॅमिनेटड पेपर पिशवी, पेपर कप, बिस्कीटे, मिनरल वॉटर, इ. मालाचा तपशीलवार तक्ता तयार केलेला आहे.

सदर तक्त्यातील किराणामाल व अनुषंगिक साहित्याची Estimated Cost काढण्यासाठी १७ व्यापा-यांना ई-मेलव्दारे दराबाबत विचारणा करण्यात आली होती. तथापि ई-मेलव्दारे दर प्राप्त न झाल्याने त्यांचेकडून दुरध्वनीवरुन दर घेण्यात आले आहेत. या सर्व दरांची सरासरी काढून आलेले दर विचारात घेऊन एकूण खर्चाची रक्कम काढण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे सर्व समावेशक माहितीचा तक्ता सोबत सादर केला आहे.

सदर तक्त्यानुसार सन २०१७-१८ करीता ई-निविदा पध्दतीने किराणामाल खरेदीस व त्याकामी अंदाजे रक्कम रुपये ५६,७०,००,०००/- (अक्षरी रुपये छपन्न कोटी सत्तर लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचे किराणामालाची खरेदी ही जाहिर ई-निविदा पद्धतीने करावी लागेल.

(B) भाजीपाला खरेदी –

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला सध्या राहाता येथील कृषि उत्पन्न बाजार समिती येथून दर गुरुवारी व रविवारी प्रसादालयाकडून केलेल्या मागणीप्रमाणे खरेदी करण्यात येतो. तसेच गर्दीचे अंदाजानुसार राहाता या ठिकाणी भाजीपाला उपलब्ध न झाल्यास आवश्यकतेनुसार कोपरगांव, नाशिक व इतर ठिकाणाहून खरेदी करणेत येतो.

याकामी प्रसादालय विभागाने सुधारीत अंदाजे रक्कम रु.२,२०,००,०००/- (रुपये दोन कोटी वीस लाख) मात्र खर्च अपेक्षित असलेबाबत कळविलेले आहे. मागील वर्षाप्रमाणेच भाजीपाला खरेदी मोंढयावरुन लिलाव पध्दतीने खरेदी करता येईल.

वरील "A" व "B" मागणी एकत्रित केल्यास सन २०१७-१८ या वर्षाकरीता किराणामाल व भाजीपाला खरेदीकामी येणारा अंदाजे एकत्रित खर्च खालीलप्रमाणे –

A. किराणामाल वगैरे खर्च	-	५६,७०,००,०००/-
B. भाजीपाला खरेदी	-	२,२०,००,०००/-
एकुण खर्च (A+B)	-	**५८,९०,००,०००/-**

वर नमुद केल्याप्रमाणे किराणामाल व भाजीपाला खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु.५८,९०,००,०००/- (रुपये अठ्ठावन्न कोटी नव्वद लाख) मात्र खर्च अपेक्षित असून सदर खर्चाला मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी,

(अ) किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तु खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५६,७०,००,०००/- व भाजीपाला खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२,२०,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेस,

(आ) किराणामाल व इतर अनुषंगिक वस्तु खरेदीकामी मागील वर्षीप्रमाणे कार्यपद्धती वापरावयाची किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस,

(इ) भाजीपाला खरेदी मागील वर्षाप्रमाणे राहाता येथील कृषि उत्पन्न बाजार समिती येथून दर गुरुवारी व रविवारी प्रसादालयाकडून केलेल्या मागणीप्रमाणे खरेदी करणेस, तसेच गर्दीचे अंदाजानुसार राहाता या ठिकाणी भाजीपाला उपलब्ध न झाल्यास आवश्यकतेनुसार कोपरगांव, नाशिक व इतर ठिकाणाहून खरेदी करणेस,

(ई) वरील अ.नं.१ मध्ये प्रस्तावित केलेले ठिकाणी व अधिक विस्तृत प्रसिद्धीसाठी अकोला, जालना, जळगांव, सांगली, औरंगाबाद या ठिकाणी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिद्ध करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेस,

वरील "अ" "आ" "इ" व "ई" मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत पुढील निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू बर्फी प्रसाद निर्मिती व मंदिर विभागासाठी किराणा माल व अनुषंगिक साहित्य आणि भाजीपाला खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

सदरहू निविदा प्रक्रिया राबवितेवेळी जादा वापर होत असलेला माल खरेदी करणेकामी ३ महिन्यांप्रमाणे (तिमाही), वर्षासाठी ४ दर घेण्यात यावे व प्रत्येक तिमाहीतील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा. इतर (कमी वापर असलेला) माल हा तिमाहीप्रमाणे दर घेऊन खरेदी केल्यास, तुलनेत खरेदी कमी असल्यामुळे पुरवठादारांकडून जादा दर आकारणीची शक्यता आहे. त्यामुळे इतर मालासाठी वार्षिक खरेदीचे दर मागविणेत यावे.

त्याचप्रमाणे गहु-४९६, तांदुळइंद्रायणी व सोनामसुरी, खाद्यतेल- सुर्यफुल, चहा पावडर- सपट, टाटा, ब्रुक ब्रॅण्ड, वनस्पती तूप- जेमिनी, शाबुदाना- कॅमल, डबलहत्ती, क्राऊन यांचे दर मागविणेत यावे.

तसेच, प्रसादालय विभागाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला इ. खरेदी करणेकामी ३ महिन्यांप्रमाणे (तिमाही), वर्षासाठी ४ दर घेण्यात यावे व प्रत्येक तिमाहीतील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा.

याप्रमाणे सन २०१७-१८ करीता आवश्यक माल खरेदी करणेस व याकामी प्रसतावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.२१ **संस्थानचे विविध विभागामार्फत करावयाच्या खरेदीसाठी खरेदी समितीचे कार्यपध्दतीबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दि.३०.१०.२०१५ नुसार शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमावली लागु केलेली होती, सदर नियमावली संस्थानलाही लागू केलेमुळे, श्री.साईबाबा संस्थानला कराव्या लागणा-या विविध वस्तु/ साहित्याच्या खरेदीच्या पध्दतीबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३०.११.२०१६ च्या सभेत प्रस्ताव सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रमांक- ८८३- यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे विविध विभागामार्फत करावयाच्या खरेदीसाठी खरेदी समितीचे कार्यपध्दती निश्चित करणेसाठी उदयोग-ऊर्जा विभागाकडील दि.३०.११.२०१५ रोजीच्या शासन निर्णयाच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविणेत याव्यात व त्यानंतर सदरहु प्रस्ताव सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

तथापि वरील दि.३०.१०.२०१५ ची खरेदी नियमावली, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दि.०१.१२.२०१६ अन्वये सुधारित केलेली आहे. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयास अनुसरून सुधारित शासन निर्णय पान.नं. १ ते ९ व नियम पुस्तिका पान.नं. १ ते १३२, असा संपुर्ण सुधारीत खरेदी नियमावली व शासन निर्णयासह कागदपत्रांचा सेट स्पायरल बाईडिंग करून मा.व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.सदस्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/ वशी-खरेदी/५३१३/२०१६ दि. १४.०१.२०१७ चे पत्रासोबत पाठविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाचे उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दि.०१.१२.२०१६ नुसार, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमावली लागु केली आहे.

सदर नियमावली शासननिर्णयातील अ.नं.२ व नियमपुस्तिकेतील परिच्छेद २.४ (५) मध्ये नमूद केल्यानुसार, 'विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था (नाव कोणतेही असले तरी) किंवा राज्य शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था,' यांनाही लागू केलेली आहे. म्हणजेच संस्थानलाही ही सुधारीत नियमपुस्तिका या निर्णयान्वये लागू झालेली आहे.

सदर शासननिर्णयान्वये उदयोग ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेले सर्व शासननिर्णय/ परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत असून वरील नियमपुस्तिकेला मान्यता देऊन सर्व खरेदीदार विभागांनी त्यांना लागणा-या वस्तूंची खरेदी या नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दि.०१.१२.२०१६ पासुन लागु केलेली आहे.

वरील बाबीचा विचार करता संस्थानसाठी सदरचे नियमावलीनुसार खरेदीचे कामकाज राबविणे बंधनकारक आहे.

याबाबत लेखाशाखेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ चे सभेत सदर नियमपुस्तीका लागू करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.५१२- यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे शासनाच्या नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आली व त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत येऊन, संस्थानसाठी विविध खरेदीचे अधिकार या समितीस प्रदान करणेत आले.

१.	कार्यकारी अधिकारी	- अध्यक्ष
२.	उप कार्यकारी अधिकारी	- सदस्य
३.	मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी	- सदस्य
४.	संबंधित विभागप्रमुख, अधिक्षक/प्र.अधिक्षक	- सदस्य सचिव

सदरचे निर्णयाचे अनुषंगाने जा.क्र.एसएसएसटी/ वशी-साप्रशा/ आस्था/ ३९६६/ २०१६ दिनांक १९.०१.२०१६ अन्वये खरेदी समिती स्थापित करुन ही नियमपुस्तिका संस्थान खरेदी कामकाजासाठी लागू करण्याचे आदेशही पारीत झालेले होते.

आता महाराष्ट्र शासनाने दिनांक ३०.१०.२०१५ ची नियमावली व या संबंधातील पुर्वीचे सर्व नियम अधिक्रमित करुन उद्योग, उर्जा व कामगार विभाग– शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दि.०१.१२.२०१६ नुसार लागु केलेले नियमावलीप्रमाणे कामकाज बंधनकारक आहे.

या नियमावलीमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

१. खरेदी समितीची स्थापना करणे.
२. खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता घेणे.
३. माल/ साहित्य खरेदी करावयाच्या पद्धती – खरेदीचे प्रकार.
४. विशेष परिस्थितीतील खरेदी.
५. खरेदीच्या विशेष पद्धती.
६. ई-निविदा/दरपत्रक प्रक्रियेसाठी मार्गदर्शक सुचना व अन्य मार्गदर्शक सुचना.
७. कारागृह, माजी सैनिक, प्रशिक्षण उत्पादन केंद्र सातारा, हापकिन यांचेकडून खरेदी करावयाचे वस्तुंचे आरक्षण.
८. सुक्ष्म व लघु उद्योगांकरीता वस्तुंचे आरक्षण.
९. अंध व अपंग यांच्यासंस्थांकडून करावयाची खरेदी.
१०. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ (महाटेक्स) यांचेकडून खरेदी करावयाचे वस्तुंचे आरक्षण.
११. शासकीय महामंडळे उपक्रम यांचेकडून खरेदी करावयाचे वस्तुंचे आरक्षण.
१२. सुधारीत नियमपुस्तिकेमधील खरेदी संबंधांची परिशिष्ट क्रमांक १ ते १६.

सदर सुधारीत खरेदी नियमावली पुस्तिकेमध्ये वरील बाबींबाबतची सविस्तर माहिती तसेच या व्यतिरीक्त खरेदी प्रक्रियेचे कामकाजाची माहिती नमुद केलेली आहे व त्यानुसार खरेदीचे कामकाज करणे बंधनकारक आहे.

तरी वरील बाबी विचारात घेता,

अ. संस्थानला खरेदी करावयाच्या वस्तु व साहित्यासाठी सदर सुधारीत खरेदी नियमावलीप्रमाणे कामकाज करणेस,

ब. खरेदी समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव यांचे निवडीबाबत निर्णय घेऊन खरेदी समितीची स्थापना करणेस,

वरील **"अ"** व **"ब"** बाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागामार्फत करावयाच्या खरेदीसाठी महाराष्ट्र शासनाकडील उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भांखस- २०१४/ प्र.क्र.८२/ भाग- III/ उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ सोबतची शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका लागु करण्यास मान्यता देण्यात आली व सदर नियमपुस्तिकेस अनुसरुन खालीप्रमाणे खरेदी समिती स्थापन करण्यात आली.**

१) कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष
२) उप कार्यकारी अधिकारी - सदस्य
३) मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी - सदस्य
४) संबंधित विभागप्रमुख, अधिक्षक/प्र.अधिक्षक - सदस्य सचिव

या खरेदी प्रक्रियेच्या सभेसाठी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.सचिन तांबे यांनाही बोलविणेत यावे

संस्थानच्या विविध विभागांसाठी आवश्यक असलेल्या वस्तु/ साहित्यांची खरेदी प्रक्रिया राबविणेचे अधिकार या समितीस प्रदान करणेत आले. प्रत्येक सोमवारी सदरहू समितीची सभा राहील. ज्या विभागांचे खरेदीबाबतचे प्रस्ताव असतील त्यांनी खरेदी प्रक्रियेमधील तांत्रिक व वाणिज्यिक निविदा या खरेदी समितीसमोर उघउणेत येऊन, त्याचा अहवाल शिफारशीसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा व स्थानिक उपसमितीची शिफारस मिळाल्यानंतर अंतीम निर्णयार्थ व्यवस्थापन समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.२२ **संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामी बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभाग यांचेमार्फत होणाऱ्या एकत्रित खर्चास तसेच कर्मचारी वर्ग व गायी खरेदीकामी कमीटी स्थापन करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-**

21 (1) (ड) मधील श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

प्रस्ताविक- दि.30/11/2016 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं. 16 व निर्णय क्रं. 859 अन्वये, संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या गोशाळेमध्ये गावरान गायांचा समावेश करण्यात यावा असे ठरले.

त्यानुसार संस्थानमार्फत गोशाळा सुरु करणेकामी मार्गदर्शन घेणेसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व पशुधन विकास अधिकारी शिर्डी यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला असुन त्यांनी गोशाळे संबंधी प्राथमिक माहिती दिलेली आहे. ती खालीलप्रमाणे-

01. **गायींचे प्रजाती व खरेदी-** भारतीय वंशाच्या गिर, खारपरकर, सहेवाल ह्या जातींच्या गायींची रोगप्रतिकारक शक्ती चांगली असुन सदर गायी प्रतिदिन 10 ते 12 लिटर पर्यंत दुध देत असल्याने दुधासाठी ह्या गायी पाळता येतील. सदर गायी राजस्थान-गुजरात बॉर्डर ह्या ठिकाणाहुन खरेदी करता येतील. त्यामध्ये गिर गाया पाळणे फायदेशीर ठरतील. सदर गायी आनंद डेअरी, गुजरात, महाराष्ट्रात कोल्हापुरला काही प्रमाणात मिळतील. त्यांची फॅट 4 ते 5 टक्के असते. साधारणत: दुसऱ्या वेतनाच्या गायी खरेदी केल्यास गायींमध्ये काही शारीरीक दोष व गायींचे दुधाचे प्रमाण कळुन येते. जेणेकरुन दुधाच्या उत्पन्नात भर पडुन फायदेशीर ठरते.

02. **चारा व पाणी -** गायींसाठी हिरवा, वाळलेला चाऱ्याची आवश्यकता असते. सदर गायीसाठी घास, ऊस, मुरघास, कडवळ, मका, कांडीगवत व समप्रमाणात वाळलेला कडबा आवश्यक आहे. गायीसाठी दररोज 30 किलो हिरवा चारा व 15 किलो वाळलेला चारा तसेच 10 लिटर दुध देणाऱ्या गायीसाठी प्रतिदिन 4 किलो खाद्याची आवश्यकता आहे. जनावरांचे वय व वजानाप्रमाणे चारा व खाद्य देण्यात येते. तसेच प्रतिगायीस पिण्यासाठी दररोज 40 ते 50 लिटर तसेच उन्हाळ्यात 60 ते 70 लिटर पाणी लागते.

03. **दुध / मशिनरी-** सदर प्रजातींच्या गायी 10 ते 12 लिटर पर्यंत दुध देत असल्याने गायी पिळण्यासाठी 10 गायींसाठी एका मिल्कींग मशिनची आवश्यकता आहे. तसेच 100 गायींसाठी अंदाजे 3 ते 4 मोठ्या कडबा कुट्टी मशिनची आवश्यकता आहे. तसेच दुध तपासणी यंत्र, दुध साठविण्यासाठी शितगृह व अन्य साधणाची आवश्यकता आहे.

04. **औषधोपचार-** गोशाळेमध्ये पाळावयाच्या सदर प्रजातींच्या गायींची रोगप्रतिकारक क्षमता चांगली आहे. परंतु बदलत्या हवामाना नुसार जनावरांना कासेचे आजार, गोचीडताप, पातळ हागवण किंवा अन्य साथींचे आजार होऊ शकतात. तसेच जनावरांच्या आजारानुसार तातडीने औषधे खरेदी करावी लागतील. तिन महिन्यातुन जंताची औषधांचा डोस देणे तसेच लसीकरण करणे नियोजीत असु शकते.

05. **पशुवैद्यकिय अधिकारी/ कामगार-** सदर गोशाळेतील गायींच्या देखभालीसाठी शासनामार्फत पशुवैद्यकीय अधिकारी यांची नेमणुक करता येईल. किंवा संस्थानमार्फत पशुवैद्यकिय अधिकाऱ्याची नेमणुक करता येईल. गोशाळेतील गायींचे दैनंदीन कामासाठी दुध काढणे, शेण काढणे, साफ-सफाई करणे, जनावरांना चारा व पाणी देणे इ. कामासाठी मोठ्या प्रामाणात कामगारांची आवश्यकता भासणार आहे.

06. **रेतन पध्दती-** गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या गायींसाठी गर्भधारणा करणेसाठी नैसर्गीक रित्या रेतनासाठी 2 वळु पाळावे लागतील. तसेच कृत्रिम रित्या रेतन करणेसाठी सिमेनची आवश्यकता असल्याने सदर सिमेन गायी खरेदी केलेल्या ठिकाणाहुन (राजस्थान, गुजरात) मागवावे लागेल.

07. **गोठा-** गोशाळेत गायी ठेवणेसाठी गोठ्यात हवा खेळती राहणेसाठी दक्षिण-उत्तर असा मुक्त गोठा असावा.व त्यामध्ये एका बाजुला पाणी व चाऱ्याची सोय असावी. व जनावरांना फिरण्यासाठी मोकळी जागा असावी. अंदाजे प्रति गायीसाठी 4 ते 7 फुट जागेची आवश्यकता आहे. तसेच गोठ्यात गाभण गायी, दुधाळ, भाकड गायी/ वासरे यांचेसाठी स्वतंत्र कडघरांची आवश्यकता आहे

तसेच स्वच्छ व निर्मळ दुधासाठी दुधाळ गायींकरीता एक अद्यावत स्वतंत्र शेड/गोठा करता येईल. ज्यामध्ये दररोज गायी स्वच्छ धुवुन एकाच ठिकाणी मिल्कींग मशिनद्वारे दुध काढुन एकत्रीकरण करणेसाठी नविन सोयी-सुविधांयुक्त अद्यावत गोठ्याची निर्मिती करणे फायदेशीर राहील. असे कळविलेले आहे.

त्यानुसार संस्थानमार्फत गोशाळा तयार करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुद आवश्यक आहे.

अ) बगीचा विभाग-

अं.नं.	तपशिल	एकुण	अंदाजे दर		एकुण रक्कम
01	गिर गायी खरेदी	100 गायी	रु.40,000/- प्रति गाय	रु.30 ते 50 हजार पर्यंत चांगल्या प्रतिची	40,00,000/-
02	चारा खरेदी	दररोज हिरवा चारा- 3 टन व वाळलेला चारा -1.5 टन	रु.3 प्रति किलो रु.3 प्रति किलो	रु. 13,500/- रोजाप्रमाणे	49,27,500/- (वार्षिक)
03	औषधे	-	-	-	50,000/-
04	खाद्य (पेंड)	व्यालेल्या व गाभण गायींसाठी	23 प्रति किलो	रु. 5,500/-रोजाप्रमाणे	20,07,500/- (वार्षिक)
05	कर्मचारी खर्च (कंत्राटी)	एकुण 25 कर्मचारी (3 शिफ्ट मध्ये)	रु.250/- रोजाप्रमाणे		22,81,250/- (वार्षिक)
06	मशिनरी खरेदी	1. गायी पिळणे - 10 मशिन 2. कुट्टी मशिन - 2 मशिन	रु.50,000/- रु.30,000/-	5,00,000/- 60,000/-	5,60,000/-
				एकुण खर्च	1,38,26,250/-

तसेच गोशाळेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे.

अं.नं.	पदनाम	संख्या	कामे
01	डॉक्टर (B.V.S.C)	2	जनावरांची देखभाल करणे
02	लिपीक	2	आलेल्या मालाची आवक-जावक नोंदी घेणे
03	सुपरवायझर	4	कर्मचाऱ्यांकडुन कामे करुन घेणे
04	कंत्राटी कर्मचारी	25 (3 शिफ्ट)	शेण काढणे, जनावरांना पाणी देणे, चारा घालणे, दररोज गाया पिळणे इ. कामासाठी

ब) बांधकाम विभाग- संस्थानच्या वतीने निमगाव कोऱ्हाळे शिवारातील गट नं.235 मध्ये गोशाळा सुरु करणेकामी सुमारे दोन एकर क्षेत्रात चेनलींक फेन्सींग करुन गोशाळेतील गायीचे ऊन, पाऊस, थंडी यापासुन रक्षण होणेकरीता पत्राशेड, तसेच चारा/खाद्य डेपोसाठी व्यवस्था, चारा खाणेसाठी आर.सी.सी. पाईपचे गव्हाण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाकरीता हौदाची निर्मिती, जाणे-येणेसाठी रस्ता, देखरेखी करीता नेमण्यात आलेले कर्मचारी यांचेकरीता कार्यालय तसेच स्टोअर रुम इ. सुविधा तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

टप्पा क्रमांक- 1

अं.नं.	तपशिल	खर्च
01	2 एकर जागेत मुरुम टाकणे (102 मी x 78 मी.)	3,99,132
02	2 एकर क्षेत्रावर चेनलींक फेन्सींग करणे, (102 मी x 78 मी.)	8,06,815
03	चारा शेडसाठी चेनलींक फेन्सींग मुरुम टाकणेसह (12 मी x 24 मी.)	1,22,562
04	गायीसाठी शेड तयार करणे (09 मी x 30 मी.)	10,16,820
05	गव्हाण 12 मिटरचे 5 ठिकाणी	1,21,530
06	पिण्यासाठी पाण्याचे स्टोअरेज	2,24,883

07	पाणी साठवण टाकी 20,000 लिटर क्षमता	1,80,000
08	600 मिटर लांबीची 6 इंच व्यासाची पीव्हीसी पाईप लाईन कनकुरी तळ्यापासुन टाकणे	61,200
09	गायीचे खाद्य स्टोअर दुधासाठी खोली (09 मी x 12 मी.)	5,45,638
10	कर्मचारी व कार्यालय शेड	2,26,820
11	अंतर्गत रस्ता	1,59,411
	एकुण अंदाजीत रक्कम रुपये (अ)	38,64,811
	अधिक 5 टक्के कन्टेजेन्सी	1,93,241
	एकुण रुपये	**40,58,052**

टप्पा क्रमांक- 2

अं.नं.	तपशिल	खर्च
01	प्रदक्षिणा मार्ग पेव्हींग ब्लॉकसह	13,69,860
02	पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी 30 से.मी. व्यासाची पाईपलाईन (400 मी)	3,26,400
03	पार्किंग व्यवस्था	1,11,931
04	भक्तांसाठी टॉयलेट ब्लॉक	9,70,192
	एकुण अंदाजीत रक्कम रु. (ब)	27,78,383
	अधिक 5 टक्के कन्टेजेन्सी	1,38,919
	एकुण रुपये	**29,17,302**

क) विद्युत विभाग

संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेकामी सदर ठिकाणी विद्युत व्यवस्थेच्या येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मागीतला असता विद्युत विभागामार्फत गोशाळा पत्राशेड,कर्मचारी कार्यालय,स्टोअर रुम यांचे वायरींग करणे तसेच सदरील प्लॉटमध्ये स्ट्रीटलाईट उभारणी करणे, अर्थिंग करणे, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडुन विद्युतपुरवठा जोडुन घेणेकरीता पोल उभे करुन कंडक्टर ओढणे इ. कामासाठी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

अं.नं.	तपशिल	एकुण रक्कम
01	विद्युतीकरण खर्च	12,00,000
02	विद्युत पुरवठा जोडुन घेणेकामी येणारा खर्च + डिपॉझीट खर्च	60,000
	एकुण रक्कम	**12,60,000**

ड) पाणीपुरवठा विभाग

संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेकामी सदर ठिकाणी पाण्याच्या सोयीसाठी पाणीपुवरठा विभागाकडे खर्चाचा प्रस्ताव मागीतला असता पाणीपुरवठा विभागामार्फत खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

अं.नं.	साहित्य तपशिल	कंपनी	परिमाण	एकक	अंदाजे दर	रक्कम
1	4" पि.व्ही.सी.पाईप (6 Kg, ग्रे कलर)	फिनोलेक्स	3000	फुट	92.00	276000.00
2	4" पि.व्ही.सी.बेन्ड (90°).	फिनोलेक्स	15	नग.	269.00	4035.00
3	4" पि.व्ही.सी. टी.	फिनोलेक्स	6	नग.	312.20	1873.20
4	4"x2" पि.व्ही.सी. टी.	फिनोलेक्स	3	नग.	128.40	385.20
5	4" पि.व्ही.सी. टेलपिस.	फिनोलेक्स	12	नग.	59.70	716.40
6	4" पि.व्ही.सी. गेटव्हॉल.	फिनोलेक्स	6	नग.	900.00	5400.00
7	नॉन रिटर्न बटरफ्लाय व्हॉल (गियर टाईप).	फिनोलेक्स	3	नग.	3400.00	10200.00
8	2" पि.व्ही.सी. गेटव्हॉल.	फिनोलेक्स	6	नग.	300.00	1800.00
9	1" ऐअर व्हॉल (ब्रास, इटालियन मॉडेल)		6	नग.	450.00	2700.00
10	4"x1" सॅडल	फिनोलेक्स	6	नग.	118.40	710.40
11	2"x1m रिंग पाईप फिटींग सटक (6 Kg, ग्रे कलर)	फिनोलेक्स	20	नग.	107.00	2140.00
12	2.1/2"x1m रिंग पाईप फिटींग सटक (6 Kg, ग्रे कलर)	फिनोलेक्स	20	नग.	149.00	2980.00
13	3"x1m रिंग पाईप फिटींग सटक (6 Kg, ग्रे कलर)	फिनोलेक्स	20	नग.	213.00	4260.00
14	4"x1m रिंग पाईप फिटींग सटक (6 Kg, ग्रे कलर)	फिनोलेक्स	20	नग.	308.00	6160.00
15	4" पि.व्ही.सी.बेन्ड (45°).	फिनोलेक्स	10	नग.	184.20	1842.00
16	5 H.P.इलेक्ट्रिक मोटार, 33 ते 45 मिटर हेड.	टेक्स्मो	2	नग.	24000.00	48000.00
17	स्टार्टर- 9-14 रिलेसह.	एल ॲन्ड टी	2	नग.	1500.00	3000.00
18	32 Amp मेनस्वीच	स्टेनले	2	नग.	1350.00	2700.00

19	63 Amp कटाऊट	स्टेनले	6	नग.	300.00	1800.00
मटेरियल एकुण खर्च तपशिल-						**376702.20**
1	विहीर खोदाई व बांधकाम खर्च तरतूद		1	नग.	400000.00	400000.00
2	जे.सी.बी मशिन भाडोत्री लावणेकरीता (खोदाईसाठी)		40	तास	700.00	28000.00
					एकुण खर्च -	**804702.20**

मागणी-

संस्थानमार्फत गोशाळा सुरु करणेकामी होणारा एकुण खालीलप्रमाणे एकत्रीत खर्च अपेक्षीत आहे.

अं.नं.	विभाग	एकुण खर्चाचा तपशिल
01	बगीचा विभाग	रु.1,38,26,250/-
02	बांधकाम विभाग (टप्पा क्रं.1 व 2)	रु. 69,75,354/-
03	विद्युत विभाग	रु.12,60,000/-
04	पाणीपुरवठा विभाग	रु.8,04,702/-
	एकुण सर्वसमावेशक खर्च	**रु.2,28,66,306/-**

विभागाचा अभिप्राय- गोशाळा सुरु करणेकामी संबंधीत विभागाचे खर्चानुसार त्यांचेकडुन सदर कामे करुन घेता येईल. तरी संस्थानमार्फत निमगाव कोऱ्हाळे शिवारातील गट नं.235 मध्ये गोशाळा सुरु करणेकामी बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभाग यांच्या वरीलप्रमाणे येणाऱ्या रु.2,28,66,306/- (दोन कोटी अठ्ठावीस लाख सहासष्ट हजार तिनशे सहा) मात्र एकत्रीत खर्चाच्या प्रस्तावास तसेच बगीचा विभागासाठी कर्मचारी वर्ग मंजुर होणे व गायी खरेदीसाठी कमीटी स्थापन होणेस तसेच संबंधीत विभागाकडुन वरीलप्रमाणे कामे होणेसाठी मान्यता मिळावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या वतीने भारतीय वंशाच्या गायांची गोशाळा तयार करणेत यावी. या गायांचा मुक्त गोठा करणेत यावा. या गोठयाच्या भोवती भक्तांना प्रदक्षिणा करता येईल व गो सेवा करता येईल, अशी व्यवस्था करावी. तसेच संस्थान मालकीच्या शक्य त्या जमीनींमध्ये गायींच्या चाऱ्याची व्यवस्था करावी तसेच आवश्यकतेनुसार चारा विकत घेणेसाठी प्रस्ताव सादर करावा. या गायींच्या तपासणीसाठी सरकारी डॉक्टर्सची नियुक्ती करावी व गायींपासुन गो अर्काचे उत्पन्न घेण्यात यावे, असे समितीचे मत झाले. यासाठी गोशाळेची माहिती असलेले समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांना संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामीचे अधिकार प्रदान करणेत आले.**

समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले व कृषी सहाय्यक, बगीचा विभाग यांनी परिसरातील गोशाळांचा अभ्यास करुन सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.२३ **सन २०१७-१८ करीता मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व सदरकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१(१घ) नूसार साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील ठराव – नविन प्रस्ताव

प्रस्ताविक - उपरोक्त अधिनियमास अनुसरुन प्रसादालय विभागातुन दि.०३/०१/२०१४ रोजी पासुन लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाची स्वतंत्र स्थापना करणेत आलेली आहे.

दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे "श्रीं" चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०००० ते ३५००० लाडु पाकीटे कॅन्टीन विभागाकडे विक्री करणेसाठी तयार करुन पाठविली जातात.

मोतीचूर लाडू व सुटी बुंदी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे किराणा मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) इ. संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्रक देऊन त्यांचेकडुन सदरचे मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येत आहे. सध्या दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक या ठेकेदारामार्फत मोतीचूर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी तयार करुन घेणेत येत आहे.

सन २०१७-१८ मध्ये शताब्दी वर्ष असल्याने भक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने लाडु व बुंदी प्रसाद निर्मिती करणेकामी लागणारे मटेरीयल व मजुरी खर्च वाढणार आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे सध्याची अंदाजपत्रकीय तरतुद रक्कम रु.१,५०,००,०००/- इतकी आहे. सदरची तरतुद शताब्दी

वर्षाकरीता अपुरी पडणार असल्याने त्यामध्ये रु.१,५०,००,०००/- वरुन रक्कम रु. २,५०,००,०००/- इतकी वाढ करावी लागणार आहे.

सन २०१६-२०१७ साठी (दि.०१/०६/२०१६ ते दि.३१/०५/२०१७) दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले असुन, सदरहू कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०५/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

त्यासअनुसरुन दिनांक ०१/०६/२०१७ ते दि.३१/०५/२०१८ या कालावधीसाठी नव्याने मोतीचूर बुंदीचे लाडू तयार करुन हाताने पॅकींग करणे, सुटी बुंदी तयार करुन हाताने पॅकींग करणे व बर्फी निर्मितीचे उक्त्या पध्दतीने मजूरीची ई निविदा प्रसिध्द करुन नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे.

सन २०१२ पासून ते आजपावेतो लाडू व बर्फी निर्मिती प्रक्रीयेकामी नेमलेल्या ठेकेदारांना खालीलप्रमाणे मजुरी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

अ.नं.	तपशिल	अदा केलेली रक्कम
१	सन २०१२-१३	१,३६,७०,४६४/-
२	सन २०१३-१४	१,३२,९९,६२०/-
३	सन २०१४-१५	१,४१,२९,२३४/-
४	सन २०१५-१६	१,३६,०३,९३२/-
५	दि. ०१.०६.२०१६ ते दि.३१.१२.२०१६ अखेर मजुरी	९१,६३,१२९/-

त्याचप्रमाणे सध्या ठेकेदारास मोतीचुर लाडु तयार करुन पॅकींग करणे, सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पॅकींग करणे व बर्फी तयार करणे इ. कामाकरीता पुढीलप्रमाणे मजुरी रक्कम अदा करणेत येत आहे.

अ.नं.	तपशिल	सध्याचे मजुरी दर रु.
१	मोतीचुर लाडु तयार करुन पॅकींग करणे	२२०/- (प्रति १००० नगास)
२	सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पॅकींग करणे	२६०/- (प्रति १००० पाकीटास)
३	बर्फी तयार करणे	१८५/- (१ क्विंटल साखरेसाठी)

मागणी - नियुक्त करण्यात येणारे ठेकेदार श्रीं चा प्रसाद बनविणेकामी वापरण्यात येणार असुन, येणा-या शताब्दी वर्षाची संभाव्य गर्दीचे नियोजन करणेसाठी व भक्तांना लाडु व बुंदी प्रसाद वेळेत पुरविणेसाठीच्या कामात अडचणी निर्माण होवु नयेत याकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे विहीत पध्दतीने जाहीरात देऊन ई-निविदा प्रसिध्द करुन मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करणेकामी नविन ठेकेदाराची नेमणुक करता येईल.

अनुमान – आर्थिक व धोरणात्मक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- सन २०१७-१८ मध्ये शताब्दी वर्षानिमित्त होणा-या भक्तांच्या गर्दीनुसार प्रसाद वाटप व विक्रीचे नियोजन करणेसाठी मोतीचूर बुंदीचे लाडू तयार करुन हाताने पॅकींग करणे, सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची हाताने पॅकींग करणे व बर्फी निर्मितीकामी सध्या एकूण रक्कम रु. १,५०,००,०००/- मात्र तरतुद करणेत आलेली आहे. परंतु शताब्दी वर्ष असल्याने सदर कामासाठी अंदाजे एकूण रक्कम रु.२,५०,००,०००/- (अक्षरी रुपये- दोन कोटी पन्नास लाख) खर्च अपेक्षीत आहे, याकरीता अंदाजपत्रकीय तुरतुदीमध्ये १,५०,००,०००/- वरुन २,५०,००,०००/- अशी वाढ करण्यास, अंदाजे येणा-या खर्चाचे मान्यतेसाठी तसेच विहीत पध्दतीने जाहीरात देऊन ई-निविदा बोलाविणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.२४ **सन २०१७-१८ करीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, मुर्ती, गोवरी व अष्टगंध खरेदी करणे व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

अ.क्र	कलम/तरतूद क्रमांक	कलम/ तरतूदीचे शीर्षक	पोटकल/उपकलम क्रमांक	तरतूद
०१	२१	विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग	१(क)	मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन
०२	२१	विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग	१(ख)	रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.
०३	२१	विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग	१ (ग)	भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

प्रस्तावना:- प्रति वर्षी मंदिर विभागामार्फत निविदा मागवुन त्यातील न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देण्यात येतो. माहे-एप्रिल-२०१७ ते मार्च-२०१८ या कालावधीसाठी फुटाणे प्रसाद, विड्याची पाने, पावडर व प्युअर मार्बल मुर्ती, श्रीद्वारकामाईकरीता गोवरी व अष्टगंध या साहित्याची निविदा मागवुन न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देणेस व खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

प्रस्ताव:-

अ) श्रींचे धुपारतीनंतर दर शुक्रवारी एकादशीचे दिवस वगळता फुटाण्याचा प्रसाद वाटण्यात येतो. त्याकरीता स्थानिक फुटाणा व्यापारी यांचेकडुन फुटाणे प्रसाद मंजूर दराने खरेदी करण्यात येतात शुक्रवारी वाटण्यात येणा-या फुटाणे प्रसाद खरेदीची माहे मार्च-२०१७ अखेर सदर मुदत संपणार आहे. माहे एप्रिल-२०१७ ते माहे-मार्च-२०१८अखेर या आर्थिक वर्षात प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९ किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक खरेदीत अंदाजे ४५०किलो फुटाणे खरेदी करणे आवश्यक आहे. माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-डिसेंबर-२०१६ या कालावधीत एकूण **३३३ किलो फुटाणे** प्रसाद दर रुपये **२५/- प्रति किलो** खरेदी करण्यात आले असून त्यासाठी एकूण **रु.८,३२५/-** मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये रु.२,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

आ) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांकरीता मंदिर परिसरामध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजा करण्याची सुविधा आहे. प्रत्येक सत्यनारायणाच्या पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर दोन विड्याची पाने ठेवण्यात येतात. यासाठी स्थानिक दुकानदार यांचेकडुन प्रति शेकडा प्रमाणे मंजूर न्युनतम दराने विड्याची पाने खरेदी करण्यात येतात. सत्यनारायण पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर विड्याची पाने खरेदीची मुदत माहे-मार्च-२०१७ अखेर संपणार आहे. त्याकरीता पुढील आर्थिक वर्षात सत्यनारायण पूजेकरीता विड्याची पाने खरेदी करावी लागणार आहेत. तसेच अभिषेक पूजा चौरंग मांडणी करुन सत्यनारायण पूजेप्रमाणे करणे प्रस्तावित असल्याने भक्त अभिषेक पुजेकरीताही विड्याची पाने खरेदी करावे लागणार आहेत. श्रीसत्यनारायण पूजेकरीता माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-डिसेंबर-२०१६ अखेर या कालावधीत एकूण **८००२६ नग** विड्याची पाने दर **रु.७०/-** प्रति शेकडा प्रमाणे त्याकरीता एकूण **रु.५०,७००/-** मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये रु.१,७५,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

इ) श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष सो, मा.उपाध्यक्ष सो, मा.विश्वस्त मंडळ, मा.कार्यकारी अधिकारी सो, मा.उपकार्यकारी अधिकारी सो, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. त्यासाठी स्थानिक दुकानदार यांचेकडुन अशा मुर्ती मंजूर दराने वेळोवेळी खरेदी करण्यात येतात. मान्यवरांना तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर ५ अशा पावडर मूर्ती मागविण्यात येतात. माहे-मार्च-२०१७ अखेर मुर्ती खरेदीची मुदत संपणार आहे. त्यामुळे माहे- सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता पावडर मार्बल मूर्तीचे दरपत्रके मागविणे आवश्यक आहे. माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-डिसेंबर-२०१६ अखेर या कालावधीत एकूण ३ नंबर मूर्ती-२५९४नग दर रु.९०/-, ४नंबर मूर्ती- ७८नग दर रु.१४०/-, ५नंबर मूर्ती-२८ नग दर रु.४४०/-खरेदी करण्यात आलेल्या आहेत व त्यासाठी एकूण **रु.२,५२,१६०/-** मात्र खर्च झालेला आहे. त्यामध्ये श्रीसाई मंदिर विश्वस्त परिषदेकरीता एकूण २५००नग ३ नंबर पावडर मुर्ती खरेदी केल्या आहेत. तरी पुढील आर्थिक वर्षाकरीता पावडर व प्युअर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव लक्षात घेता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये **रु.१०,००,०००/-**ची तरतूद करण्यात आलेली आहे.

ई) त्याचप्रमाणे मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, सर्व राज्याचे मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी. व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ, देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी(मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार) प्युअर मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते . ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केटमधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. काही अतिमहत्वाचे व्यक्तींना वेळप्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते . अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-डिसेंबर-२०१६ अखेर मंदिर विभागामार्फत प्युअर मार्बल मुर्ती खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्याकामी कोणताही खर्च झालेला नाही (खर्च निरंक आहे). तरी आवश्यकतेप्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती थेट खरेदी

करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता असावी. तसेच सदर बीलाची रक्कम लेखाशाखेमार्फत आदा होणेस मान्यता असावी, ही विनंती.

उ) श्रीसाईभक्तांना श्रीद्वारकामाईचे धुनीतील पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिर विभागामार्फत प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करुन त्याचा वापर धुनी प्रज्वलीत राहणे व उदी निर्माण होणे याकामी करण्यात येतो. श्रीसाईभक्तांना पवित्र उदी मिळणे व शींची धुनी अखंड प्रज्वलीत राहणेकामी प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करावी लागते. सदर खर्च अंदाजे रुपये तीन लाखापेक्षा जास्त असल्याने त्याची सन-२०१६मध्ये खरेदी विभागामार्फत निविदाप्रक्रीया खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीयेद्वारे करणेत आलेली आहे. तरी मागील वर्षाप्रमाणे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीया करणेस गोवरी खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.१०,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

ऊ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२ (३) नुसार सभेच्या सुरुवातीस झालेल्या चर्चेप्रमाणे साईभक्त हा केंद्रस्थानी माननेत येऊन, त्यासाठी संस्थानतर्फे साईभक्तांना आणखी सुविधा देण्यात याव्यात. याबाबत चर्चा करणेत आली व चर्चेअंती पुण्यतिथीच्या मुहूर्तावर यापुढे दर्शन रांगेमधील सर्व भक्तांचे श्रींचा गंध लावून स्वागत करणेत यावे असे ठरले आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत कर्मचारी नेमुन सर्व साईभक्तांना गंध लावणेत येत आहे. त्याकरीता अंदाजे महिन्याकरीता ३०-४० किलो अष्टगंध लागते. त्यानुसार पुढील वर्षाकरीता अंदाजे४००किलो अष्टगंध लागणार आहे. याकामी अंदाजे रु.९०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तसेच याकामी मंदिर उपबजेटमध्ये रु.१,००,०००/-ची तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालील तपशीलाप्रमाणे सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी करावे लागणार आहे-

अ.क्र	तपशील	एप्रिल-१६ ते डिसेंबर-१६ खर्च सध्याचे दर व खर्च		सन-१७-१८ ची आवश्यकतेनुसार मागणी (अंदाजे)	अंदाजे दर			अंदाजे खर्च रुपये	एकूण अंदाजे खर्च रुपये
		दर रुपये	प्रमाण		रुपये	पैसे	प्रमाण		
०१	**फुटाणे प्रसाद**	२५.००	२८८किलो	४५० किलो	६०	००	किलो	२७,०००/-	**२७,०००/-**
०२	**विड्याची पाने**	०.७० पैसे	६३३४३नग	३,००,००० नग	००	७०	नग	२,१०,०००/-	**२,१०,०००/-**
०३	**पावडर मूर्ती नं.३**	९०.००	२५९४ नग	२०० नग (आवश्यकतेप्रमाणे)	१२०	००	नग	२४,०००/-	**१,२५,०००/-**
	पावडर मूर्ती नं.४	१४०.००	७८ नग	२०० नग (आवश्यकतेप्रमाणे)	१६०	००	नग	३२,०००/-	
	पावडर मूर्ती नं.५	४४०.००	२८ नग	१५० नग (आवश्यकतेप्रमाणे)	४६०	००	नग	६९,०००/-	
०४	**रानशेणी गोवरी (खरेदी विभागामार्फत)**	५.४५ पैसे	१६,९०० किलो	१,५०,००० किलो (आवश्यकतेप्रमाणे)	०६	००	किलो	९,००,०००/-	**९,००,०००/-**
०५	**अष्टगंध पावडर**	----	-----	४०० किलो (आवश्यकतेप्रमाणे)	२००	००	किलो	८०,०००/-	**८०,०००/-**
०६	**प्युअर मार्बल मूर्ती**	-----	खर्च नाही (निरंक)	(आवश्यकतेप्रमाणे)	---	---	---	१,००,०००/-	**१,००,०००/-**

<u>विभागाचा अभिप्राय</u>:- तरी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रति वर्षाप्रमाणे माहे एप्रिल-२०१७ ते माहे मार्च-२०१८ अखेर या आर्थिक वर्षामध्ये-

१) तकत्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.०१ ते ०५ चे साहित्याकरीता निविदा प्रक्रीयेद्वारे खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन दरपत्रके मागवुन मा.व्य.समितीचे सभेपुढे उघडणेस व त्यातील न्युनतम दर धारकास कार्यादेश देणेस व त्याकामीचे खर्चास मान्यता असावी, मान्यता असावी.

२) उपरोक्त तकत्यातील अ.क्र.०६ चे प्युअर मार्बल मुर्ती आवश्यकतेप्रमाणे मंदिर विभागामार्फत थेट खरेदी करणेस मान्यता असावी.

३) त्याचप्रमाणे तक्त्यात नमूद केलेले अ.क्र.०४ ची रानशेणी गोवरीची खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयाद्वारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती आहे.

निर्णय क्र.२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, मुर्ती, गोवरी व अष्टगंध विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच दररोज किती उदी पाकिटे तयार होतात व त्याचे कशाप्रकारे/ किती वाटप केले जाते याबाबतचे सर्व अभिलेख अद्ययावत ठेवावेत.

याचवेळी समिती सदस्यांनी अशी माहिती सभेस दिली की, श्रींचे द्वारकामाई मधील धुनीचा तळ खराब झालेला असून तेथील अँगल तुटलेले आहेत. यावर सभेने सदरहू धुनी दुरुस्तीचे काम तातडीने करुन घेण्यात यावे, अशा सुचना दिल्या. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.२५ **आरोग्य विभागासाठी वार्षिक स्वच्छता साहित्य खरेदी करणे.**

प्रस्ताव- आरोग्य विभागामार्फत मंदिर परिसर, साईबाबा भक्त निवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, शैक्षणिक संकुल या इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते. यासाठी आवश्यक लागणा-या साहित्याची खरेदी वार्षिक पध्दतीने करण्यात येते. मा.व्य. समितीचे दि. १४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३४२ ने रु. ९७१२५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली असून सदर खरेदीची कार्यवाही खरेदी विभागामार्फत चालू आहे. सदर खरेदीत नमुद केलेल्या साहित्याचे व्यतिरिक्त इतर साहित्य वापरुन संपत आलेले आहे. त्यामुळे उर्वरित साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे. या विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य मार्च २०१७ अखेर पर्यंत पुरेसे आहे.

आरोग्य विभागासाठी सन २०१६-२०१७ करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक असणा-या साहित्याची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' मध्ये जोडली आहे. परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते ०७ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रुपये ५,८४,७००/- (अक्षरी रु. पाच लाख चौ-यांशी हजार सातशे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात स्वच्छता साहित्य खरेदीकामी बजेट तरतूद करण्यात आली आहे. स्वच्छता साहित्य खरेदीकामी बजेट खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवून विहित पध्दतीने खरेदी करावे लागेल.

तरी सोबतचे परिशिष्ठातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,८४,७००/- (अक्षरी रु. पाच लाख चौ-यांशी हजार सातशे मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागास दैनंदिन कामासाठी आवश्यक असणारे प्रस्तावित स्वच्छता साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच आरोग्य विभागाकडील जुन्या डस्टबीन व इतर तुटलेल्या/ खराब झालेल्या वस्तुही बदलणेत याव्यात, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

विषय नं.२६ **सन २०१७-१८ या एक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींगसाठी (आऊट सोर्सिंग) ई- निविदा करणे व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत व्दारावती भक्तनिवास येथे साई भक्तांना राहाण्याची व्यवस्था करण्यात येते. व्दारावती भक्तनिवास विभागाचे इमारतीमध्ये ८० ए.सी. व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी दैनंदिन वापर करुन खाली केलेनंतर त्याची साफ-सफाई तसेच हाऊसकिपींग व व्दारावती विभागाचे इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे, आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना उपरोक्त कामासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील दि.२८/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र.२५, निर्णय क्र.६४३ नुसार कार्यादेश जा.नं.एसएसएस/ वशी-व्दारावती/२०८८/२०१६ दि.२९/०७/२०१६ अन्वये दि.०१/०७/२०१६ ते दि.३०/०६/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी स्वच्छतेसाठी आवश्यक असणा-या मशिनरी, केमिकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यांसह दरमहा सर्व करांसह रु.८,४९,५३८/- (अक्षरी रुपये- आठ लाख, एकोणपन्नास हजार, पाचशे, अडवतीस मात्र) एका वर्षास रु १,०१,९४,४५९, (अक्षरी रुपये– एक कोटी, एक लाख, चौ-यानो हजार चारशे, एकोनसाठ मात्र) चा कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कामाची मुदत दि.३०/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे.

अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमान:-

दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ या पुढील एक वर्ष कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे व हाऊसकिपींग कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे. त्याकरीता मोठया विविध प्रकारच्या मशिनरी, लहान विविध उपकरणे, निविदेत नमुद केलेप्रमाणे स्वच्छतेचे केमिकल्स व ७६ कर्मचा-यांसह स्वच्छता/हाऊसकिपींग कामाकरीता (आऊटसोर्सिंग) ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

व्दारावती विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४७७ अन्वये सर्व निवासस्थानांच्या स्वच्छता कामांच्या ई-निविदा एकत्रित काढण्यात याव्यात जेणेकरुन चांगली सेवा मिळेल व त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल याकरीता साईधर्मशाळा विभागाचे सध्या यांत्रिकीकरणसह हाऊस किपींग, विद्युत, प्लबींग, मेटेनन्स/ स्वच्छतेचे काम सध्या करत असलेल्या ठेकेदारास इतर निवास यांची मुदत संपेपर्यतच्या कालावधीसाठी मुदत वाढ देण्यात यावी असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार सन- २०१७-१८ एका वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता हाऊसकिपींग (आऊट सोर्सींग कामासाठी) नव्याने नामांकित कंपन्यांकडून ई-निविदा मागविणे बाबत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करावी लागेल. व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग आऊटसोर्सिंग कामाकरीता कर्मचारी संख्या प्रतिदिनी ७६ व दरमहा सर्व करांवह खर्च रु.८,४९,५३८/- त्या रक्कमेवर १०% वाढीव दर रु. ८४,९५३/- असे एकुण प्रति महा अंदाजे रुपये- ९,३४,४९१/- (अक्षरी रुपये- नऊ लाख, चौतीस हजार, चारशे, एक्यान्नव) मात्रचे खर्चास मान्यता मिळावी व याकामी येणा-या अंदाजे वार्षिक खर्च रु.१,१२,१३,८९२/- (अ.रु.-एक कोटी, बारा लाख, तेरा हजार, आठशे, ब्यान्नव मात्र) खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदरचा विषयावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी गुणवत्ता व दर याचा विचार करुन, विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहू आऊट सोर्स कामासाठी प्राप्त होणाऱ्या निविदांना कॅग रिपोर्टप्रमाणे (७०%-३०%) गुण देऊन, निविदाप्रक्रिया अंतीम करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

विषय नं.२७ **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी येणाऱ्या वार्षीक खर्चास व ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्ताविक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी एकूण १५३६ खोल्या कार्यरत असून, या ठिकाणी साईभक्तांना चांगल्या दर्जाची निवासव्यवस्था मिळावी यासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाउाकिपींग, विद्युत,प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छतेचे आऊटसोर्सिगं पध्दतीने करुन घेणेकामी मा. उच्च न्यायालय मुंबई औरगांबाद खंडपिठाने सिव्हील ॲप्लिकेशन नं.११५/२०१६ अन्वये रु.८,५५,००,०००/- (अक्षरी रु. आठ कोटी पंच्चावन्न लाख) मात्रचे वार्षिक खर्चास मान्यता दिलेली आहे. तसेच ५३६ मनुष्यबळ संख्या व २३९ मशिनरी व उपकरणे यांची मान्यता घेवून, ई-निविदा ई-निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आली.

मा.व्यवस्थापन समिती दि.१४/०७/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३८ व मा.त्रिसदस्य व्यवस्थापन समिती दि.०५/०७/२०१६ रोजीचे चक्रीय पध्दतीने मान्यता घेऊन साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छता ही कामे आऊटसोर्सिंगचे काम मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि., पुणे यांचे रु.७,०१,९४,०००/-(अक्षरी रु. सात कोटी एक लाख चौ-यानो हजार) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, दि.०१/०७/२०१६ ते दि.३०/०६/२०१७ अखेर एक वर्ष कालावधीसाठी खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मनुष्यबळ संख्या	स्वच्छता कामी मशिनरी संख्या	इतर साहीत्य	विभाग	उपकरणे	दरमहा सर्व करांसह रक्कम रु.	वर्षाला रुपये
५३६	७८	१६१	विद्युत पाणी पुरवठा (प्लंबिग) बांधकाम (सुतारी/गवंडी)	२५ ५४ १५४	५८,४९,५००/-	**७,०१,९४,०००/-**

तसेच मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि.,पुणे यांची सदर कामाची मुदत दि.३०/०६/२०१७ अखेर संपुष्ठात येत आहे. त्यानंतर पुढील वर्षासाठी नवीन ठेकेदाराची नेमणुक करणेकामी व्दारावती विभागामार्फत एकत्रित ई-निविदा प्रक्रीया करावी लागणार आहे. त्यासाठी मनुष्यबळ संख्या व येणा-या अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

मागणी:- साईआश्रम भक्तनिवास यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. मेन्टेनन्स/ स्वच्छता कामासाठी नव्याने व्दारावती विभागामार्फत एकत्रित ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करुन, ई-निविदा प्रक्रिया करावी लागेल. यासाठी मागील वर्षाच्या रु.७,०१,९४,०००/- या रकमेमध्ये बाजार भावापेक्षा २० % वजा करुन रु.५,६१,५५,२००/- नुसार पुर्णांकित रक्कम रु.५, ६५,००,०००/- (अक्षरी रु. पाच कोटी पासष्ट लाख मात्र) या येणा-या अंदाजे वार्षिक खर्चास, तसेच सन २०१७-१८ या आार्थिक वर्षाकरीता नविन कंत्राटदाराची नेमणुक करणेकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात एकत्रित ई-निविदा जाहीरात देऊन, एकत्रित ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी सदर विषय मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता असावी. ही विनंती.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- यासाठी..

१) जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात देऊन,एकत्रित ई- निविदा प्रक्रीया राबविणेस,

२) सन २०१७-१८ या वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास,

उपरोक्त ०१ व ०२ बाबींस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी, गुणवत्ता व गुण याचा विचार करुन, विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहू आऊट सोर्स कामासाठी प्राप्त होणाऱ्या निविदांना कॅग रिपोर्टप्रमाणे (७०%-३०%) गुण देऊन, निविदाप्रक्रिया अंतीम करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

विषय नं.२८ **यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेन्टेनन्स/ स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी ५ महिन्याचे वाढीव कालावधीसाठी कार्यादेश देणे.**

प्रस्ताव- अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव:- दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४७७ अन्वये- यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सर्व निवासस्थानांच्या स्वच्छता कामांच्या निविदा एकत्रित काढण्यात याव्यात, जेणेकरुन चांगली सेवा मिळेल व त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल. याकरीता साईधर्मशाळा विभागाकडे सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लंबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे काम सध्या करत असलेल्या ठेकेदारास इतर निवासस्थांनाची मुदत संपेपर्यतच्याकालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी.

प्रस्तावना:- मे.सुमित फॅसिलिटीज् प्रा.ली. चिचंवड, पुणे. यांना साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह, विद्युत, प्लंबीग, मेटेनन्स/स्वच्छता इत्यादी हाऊसकींपीगचे कामासाठीचे एक वर्षाचे कालावधीसाठी (दि.१६/०२/२०१६ ते १५/०२/२०१७ अखेर) कंत्राट देण्यात आलेले आहे. सदरहु यांची मुदत दि. १५/०२/२०१७ अखेर संपुष्टात येणार आहे.

दि.०७/०८/२०१६ रोजीचे निर्णयानुसार दि. २९/०८/२०१६ रोजीचे टिपणीबाबत झालेले चर्चानुसार सध्या चालू असलेल्या इतर हाऊसकिपींगचे कामाचे न्युनतम दराचा विचार करता संबंधीत ठेकेदारास म्हणजेच मे बी.व्ही.जी.ई.ली. पुणे व सुमित फॅसिलीटीज प्रा.ली.पुणे यांना दराबाबत विचारणा केली असता, साई आश्रम भक्तनिवासस्थान येथील कंत्राटदार मे.बी.व्ही.जी.ई.ली. पुणे, यांनी उपरोलिखित वाढीव कालावधीसाठी साईधर्मशाळा विभागाचे हाऊसकिपींग कामासाठी सर्व करासह प्रतिमाह रक्कम रु. १८,००,०००/- (अक्षरी रुपये– अठरा लाख रुपये मात्र) घेऊन काम करण्यास आम्ही तयार असलेबाबत पत्राने कळविले आहे.

तसेच साई धर्मशाळा येथिल कंत्राटदार मे. सुमित फॅसिलीटीज् प्रा.ली पुणे यांनीही दि १६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ या वाढीव कालावधीसाठी साईधर्मशाळा विभागाचे हाऊसकिपींग कामासाठी सर्व करासह प्रतिमाह रक्कम रु.१८,००,०००/- (अक्षरी रुपये– अठरा लाख रुपये मात्र) या दरामध्ये ५ महिन्याचे कालावधीसाठी काम करण्यास आम्ही तयार आहोत, असे दि.०३/१२/२०१६ रोजीचे पत्राने कळविले आहे.

मागणी- साईधर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेटेनन्स/ स्वच्छतेचे आऊटसोर्सिंग पध्दतीने कामाबाबत ५ महिने कालावधीसाठी (दि.१६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर) मे.सुमित फॅसिलीटीज् प्रा. लि. यांचे न्युनतम दर प्रतिमाह रक्कम रु. १८,००,०००/-, नुसार कामाचा कार्यादेश देणेबाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- मे.सुमित फॅसिलीटीज् प्रा.ली. पुणे यांना साई धर्मशाळा विभागासाठी बुधवार दि.२७/०४/२०१६ रोजी झालेल्या व दि.१७/११/२०१६ रोजी झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

साईधर्मशाळा विभागासाठी हाऊसकींपीग कामासाठी मनुष्यबळ संख्या १६५, तसेच मशिनरी व उपकरणे १०८ यासाठी दि.१६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर ५ महीन्याचे कालावधीसाठी मे सुमित फॅसिलीटीज् प्रा. लि. यांना प्रतिमाह सर्व करासह रक्कम रु. १८,००,०००/-, (अक्षरी रु.अठरा लाख मात्र) चे कार्यादेश देणेस, व उपरोक्त कालावधीसाठी रक्कम रु. ९०,००,०००/- (अक्षरी नव्वद लाख रुपये) मात्रचे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागाचे यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेन्टेनन्स/ स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी मे.सुमित फॅसिलीटीज् प्रा.ली., पुणे यांना पुर्वीचेच अटी/ शर्तीवर ५ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

विषय नं.२९ **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१) १४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव :- निरंक

प्रस्ताविक:- श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास १२ इमारती असुन, १ इमारती मध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारती मध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती असुन १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे. व उर्वरीत ५ इमारतीमध्ये एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे एकुण १६० हॉल असुन, सदरील हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

साईआश्रम भक्तनिवास तसेच साईधर्मशाळा इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी नियुक्त केलेल्या कंत्राटाची माहिती खालील प्रमाणे-

अ. नं.	कामाचे स्वरुप	इमारतीमध्ये व परसिरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट,फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval)					
१	विभाग	साईआश्रम भक्तनिवास			साई धर्मशाळा		
२	क्षेत्रफळ	१	१२ इमारतीमधील खोल्या, शौचालय, स्नानगृह व स्टोअर रुम यांचे	एकुण ३,४९,७३ ५ चौ. फुट	१	०६ इमारतीमधील हॉल, शौचालय, स्नानगृह व स्टोअर रुम यांचे	एकुण १,५७,९८२. ३२ चौ. फुट
		२	संपुर्ण परिसर चारही बाजुचे क्षेत्रफळ (धुरीकरणासाठी)	४,१८,२२ ० चौ. फुट	२	संपुर्ण परिसर चारही बाजुचे क्षेत्रफळ (धुरीकरणासाठी)	४,८७,६११ चौ. फुट
		३	संपुर्ण परिसर चारही बाजुचे क्षेत्रफळ (डास आळी प्रतिबंधक साठी)	४,१८,२२ ० चौ. फुट	३	संपुर्ण परिसर चारही बाजुचे क्षेत्रफळ (डास आळी प्रतिबंधकसाठी)	४,८७,६११ चौ. फुट
३	कंत्राटदाराचा पत्ता	मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि., देवगिरी अपार्टमेंट, ए/ २०१, दुसरा मजला , गणेश मळा, सिंहगड रोड, पी.एल देशपांडे गार्डन समोर, पुणे-४११०३०			स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस प्रा.ली. ठाणे , ३ मैत्री लोटस को, ऑ. हा. सो. लि. मैत्री गार्डन, पोखरण रोड नं. ०२, ठाणे (प)		
४	कार्यादेश	जा.नं.एसएसएस/ वशी– साईआश्रम भक्तनिवास / ११८९ / दि.०९/०६/२०१४ रोजीचा कार्यादेश			जा.नं.एसएसएस/ वशी– साईधर्मशाळा / २१८/ दि.१८/०४/२०१६ रोजीचा कार्यादेश		
५	कंत्राट कालावधी	दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अखेर			दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अखेर		
६	वार्षिक मंजुर बजेट	रु. ४,००,०००/-			रु. २,००,०००/-		
७	मंजुर दर	किटकनाशक फवारणी - इमारतीनिहाय वार्षिक रक्कम प्रति चौरस फुटा प्रमाणे– ०१.०१ पैसे. फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) रु. २४९४/- (प्रति फवारणी १५ दिवसासांठी एक) (महिन्यातुन २ फवारणी) डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) रु.८९९ /- (पाच महिन्यासाठी जुन ते ऑक्टोबर) (प्रति फवारणी १५ दिवसासांठी एक)			१) किटकनाशक फवारणी - इमारतीनिहाय वार्षिक रक्कम प्रति चौरस फुटा प्रमाणे – ००.६३ पैसे. २) फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) रु. १११/- (प्रति फवारणी १५ दिवसासांठी एक) (महिन्यातुन २ फवारणी) ३) डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) रु. ५१ /- (पाच महिन्यासाठी जुन ते ऑक्टोबर) (प्रति फवारणी १५ दिवसासांठी एक)		

मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि., पुणे जां.न.एसएसएस/ वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ५५३७/ २०१७ दि. २५/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये संस्थानच्या काळया यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

मे स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.ली.ठाणे यांची मुदत दि. ०१/०४/२०१६ ते दि. ३१/०३/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे.

दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अखेर या आर्थिक वर्षात सदर कंत्राटदाराकडुन किटक नाशक फवारणी करुन घेण्यात आली त्यानां अदा करण्यात आलेली रक्कम बाबत तपशिल खाली प्रमाणे –

अ.नं.	फवारणी तपशिल	अदा करण्यात आलेली रक्कम रुपये	
		साईआश्रम भक्तनिवास	साई धर्मशाळा
१	पहीली किटकनाशक फवारणी माहे - मे – २०१६	५९,८०५/-	१६,५८८/-
२	दुसरी किटकनाशक फवारणी माहे - जुलै – २०१६	-	१६,५८८/-
३	तिसरी किटकनाशक फवारणी माहे- ऑक्टोंबर– २०१६	सप्टेंबर – ३६,२७७/- स्टर्लिगं पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, ठाणे	१६,५८८/-
४	चौथी किटकनाशक फवारणी माहे - डिसेंबर – २०१६ मध्ये झाली असुन बील अदा होणे बाकी आहे.	-	१६,५८८/-
५	पाचवी किटकनाशक फवारणी माहे- फेब्रुवारी– २०१६	-	१६,५८८/-
६	सहावी किटकनाशक फवारणी माहे- एप्रिल– २०१७	-	१६,५८८/-
	एकुण खर्च	**९६,०८२/-**	**९९,५२८/-**

जर साईआश्रम भक्तनिवास येथे रेग्युलर किटक नाशक फवारणी/फॉगींग/डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी केली असती तर ६ फवारणीसाठी रु.४,२२,०७९/- इतका खर्च झाला असता.

साई धर्मशाळा विभागागाकरीता सदर कामी रु. ९९,५२८/- इतका खर्च झाला आहे.

साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकरीता एकत्रित औषध फवारणी कामी ई निविदा प्रक्रीया राबविण्याकामी IPCA कंपनीधारकांचे सध्याचे बाजारभावाचे दर, वार्षिक उलाढाल व कंपनी स्थापना कधी झाली इ. बाबत माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार ६० ते ७० IPCA कंपनीधारकांना ई-मेल व्दारे कळविण्यात आले.

सदरहु ई-मेल व्दारे कंपनीचे बाजार दर प्राप्त झाले असून त्याची माहिती खालील प्रमाणे-

अ.नं.	औषध फवारणी तपशील	KHFM Hopitality & Facillity Management Services,Mumbai	Pestomatic controls, Mumbai	Indra pest control Nashik	Pest contrl M Walshe, Mumbai	Westfield pest control, Mumabi	सरासरी दर (प्रति फवारणी)	Estimated Cost प्रति फवारणी (सरासरी कॉलमवर आधारीत)	
								साई आश्रम भक्तनिवास ३,४९,७३५ चौ. फुट	साईधर्मशाळा १,५७,९८२.३२ चौ. फुट
१	किटक नाशक फवारणी	Rs.2.60 Sq fit	Rs.2.50 Sq fit	Rs.2.00 Sq fit	Rs.2.40 Sq fit	Rs.2.00 Sq fit	Rs. **2.30** Sq fit	Rs. 8,04,390.50	Rs. 3,63,359.33
२	फॉगींग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) प्रति फवारणी १५ दिवसासाठी एक (महिन्यातुन २ फवारणी)	Rs 17,000	Rs 22,500	Rs 27,000	Rs 1,800	Rs 12,000	Rs. **16,060**	Rs. **96,360.00**	Rs. **96,360.00**
३	डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी महिन्यातुन २ फवारणी)	Rs 8,000	Rs 16,800	--	Rs 1,800	Rs 10,000	Rs. 7,320	Rs. **73,200.00**	Rs. **73,200.00**
							एकुण -	**9,73,950.50**	**5,32,919.33**

(ई- मेल प्रती अवलोकनार्थ सोबत जोडले आहेत.)

त्यानुसार सरासरी रु.२.३० पैसे प्रमाणे किटकनाशक फवारणीचे वार्षिक कामासाठी साईआश्रम भक्तनिवास यांना सरासरी रु.९,७३,९५०.५० इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच साई धर्मशाळा रु. ५,३२,९१९.३३ इतका खर्च अपेक्षीत आहे.

मागणी:- सन २०१७ -१८ करीता (दि. ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८) अखेर साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी दोन्ही विभागाच्या कामासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

संस्थान अधिनियम / ठराव नुसार अनुमान:- प्रशासकीय मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-

अ) सन २०१७/२०१८ (दि.०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेर) सदरकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रीयाव्दारे ई-निविदा मागविणेस.

किंवा

साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवास व साईप्रसाद निवासस्थान या भक्तनिवासांची एकत्रित ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली असुन ती अंतिम टप्यात असुन जो न्युनतम दर मान्य होईल त्या निविदाधारकांकडुन साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकरीता पेस्ट कंट्रोल करुन घेता येईल असे नम्र मत आहे.

ब) उपरोक्त कामाची ई निविदा मागवितांना खालील अटी व शर्तीचा समावेश करावा लागेल, असे नम्र मत आहे.

१) ठेकेदार/कंपनीस I.S.O मानाकंन असावे व कंपनी I.P.C.A/ P.C.A, ची सभासद असणे आवश्यक आहे.

२) पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल, फॉगींग ट्रिटमेंन्ट, डास आळी प्रतिबंधक फवारणी करणे कामी Central Insecticide Board चे Approve केलेले (House Hold) औषध वापरणे बंधनकारक राहील.

३) शासकीय कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा.

४) ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र असणे आवश्यक.

५) मागील ३ वर्षाचे ऑडीट रिपोर्ट सादर करावे.

६) निविदाधारकांची वार्षिक उलाढाल ही रुपये १ कोटी पेक्षा जास्त असावी.

क) उपरोक्त तक्त्यातील सरासरी दरानुसार किटकनाशक फवारणीचे वार्षिक कामासाठी साईआश्रम भक्तनिवास यांचा रु. ९,७३,९५०.५० व साई धर्मशाळा रु.५,३२,९१९.३३ इतका खर्च असा एकुण रु. १५,०६,८६९.८३ पुर्णांकित रक्कम रु. १५,०७,०००/- मात्र, (अक्षरी रु. पंधरा लाख सात हजार मात्र) इतका अंदाजे खर्च अपेक्षीत आहे, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावास तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी, गुणवत्ता व दर यांच्या आधारे, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहूकामी प्राप्त होणाऱ्या निविदांना कॅग रिपोर्टप्रमाणे (७०%-३०%) गुण देऊन, निविदाप्रक्रिया अंतीम करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

विषय नं.३० **तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांचीपदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणे.**

प्रस्ताव- मंजुर आकृतीबंधानुसार कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पा.पु.), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता व प्रसादालय मॅनेजर इत्यादी विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन अर्ज मागविणेत आलेले आहेत. सदर अर्जांवर कार्यवाही करणेकामी विषय मा.व्यवस्थापन समिती दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.६१५ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पा.पु.), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता व प्रसादालय व्यवस्थापक या पदासाठी आलेल्या अर्जांवर पुढील कार्यवाही करणेसाठी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून प्रस्ताव मागविणेत यावा."

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३०८४/ २०१६ दि.१४/०९/२०१६ व जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/४७००/२०१६ दि.०६/१२/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना पत्र देऊन व्यवसायिक प्रस्ताव मागविणेत आलेला आहे.

आता, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी दि.१९/०१/२०१७ रोजी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे व्यवसायिक प्रस्ताव सादर केलेला आहे.

This refers to your letters Nos.3084/2016 dt.14 Sept.2016 and 4700/2016 dt.6 Dec.2016 regarding recommendation of suitable candidates to fill-in the posts mentioned therein. Scanned copies of the letters are attached herewith for ready reference.

This is to communicate that we thankfully accept the said work and quote our fee as below:

There will be seven faculty to be deputed to the Sansthan as below:

Department of Civil Engg.: 1) Prof.S.D.Kulkarni 2) Prof.B.M.Dawari

Department of Mech.Engg.: 3) Prof.S.S.Pardeshi 4) Prof.A.P.Bhattu
Department of Elect. & Tel.Comm.: 5) Prof.R.A.Patil 6) Prof.S.P.Mahajan
Administration: Shri G.B.Joshi, Administrative Officer Number of applicants being large, two faculty will be deputed from each department

Fee payable by the Sansthan to COEP, in advance, in the from of a DD or payment online will be as below:

Sr.No.	Particulars	Amount
01	Per faculty for the visit, Rs.15,000/- x 7 No. of faculty	Rs. 1,05,000/-
02	Institute's Share	Rs. 35,000/-
	Total Basic Fee -	Rs.1,40,000/-
03	Service Tax @15%	Rs. 21,000/-
	Total Basic Fee + Service Tax -	**Rs.1,61,000/-**
04	Transport either to be arranged by the Sai Sansthan **or** Rs.20,000/- to be paid to COEP towards the same two vehicles x Rs.10,000/- per vehicle for two days = Rs.20,000/-	Rs.20,000/-
	TOTAL -	**1,81,000/-**

Note:- Arrangements of lodging and boarding of the team during entire stay at Shirdi is to be done by the Sai Sansthan, Shirdi.

On accepting this proposal and on payment of the fee mentioned above, 100% in advance, programme of the visit of the above-mentioned team to the Sansthan can be decided as per mutual convenience. Hope, you will find this in order. Looking forward to your response, with regards.

वरीलप्रमाणे मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी सदरचे कामापोटी रक्कम रुपये १,८१,०००/- (अक्षरी रुपये एक लाख एक्याऐंशी हजार रुपये मात्र) इतके मानधन कळविलेले आहे. तसेच सदरचे १०० टक्के मानधन अगाऊ एक रकमी मिळणेस विनंती केली आहे.

जाहीरातीनुसार आलेल्या अर्जांची माहिती खालीलप्रमाणे –

अ.नं.	पदनाम	विहीत मुदतीत आलेले अर्ज
०१	कार्यकारी अभियंता	२७
०२	उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)	२२
०३	यांत्रिकी अभियंता	३८
०४	इलेक्ट्रॉनिक्स अभियंता (ध्वनीक्षेपन व टेलीफोन)	४२
०५	प्रसादालय व्यवस्थापक	२८
	एकूण -	१५७

वरीलप्रमाणे मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी दिलेल्या व्यवसायिक प्रस्तावावर खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक, व्यवसायिक तसेच अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करुन जाहीरातीनुसार लेखी परिक्षेसाठी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन संस्थानला सादर केल्यानंतर मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना एकूण मानधनाच्या ५० टक्के रक्कम अदा करता येईल.

२) पात्र उमेदवारांची विषय निहाय प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका तयार करणे, त्यासाठी लागणा-या सर्व साहित्यासह उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेऊन मेरीटलिस्ट संस्थानला सादर करणे. तसेच उत्तीर्ण उमेदवारांची संस्थान निश्चित करेल त्या ठिकाणी व तारखेला मुलाखत घेण्याची कार्यवाही करणे. मुलाखतीनंतर अंतिम निवड यादी संस्थानला सादर करणे. हे सर्व कामकाज पूर्ण झालेनंतर उर्वरीत ५० टक्के रक्कम संस्थानमार्फत मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना अदा करता येईल

३) सदरचे कामापोटी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना मानधन रु१,४०,०००/- अधिक सर्व्हिस चार्ज १५ टक्के रु.२१,०००/- असे एकूण रक्कम रु.१,६१,०००/- (एक लाख एकसष्ट हजार मात्र) वरीलप्रमाणे दोन भागात अदा करता येईल.

४) सदरचे कामासाठी ज्या ज्या वेळेस संबंधीत तज्ज्ञ शिर्डी येथे भेट देणार आहेत. त्यावेळी त्यांना जाणे-येणेसाठी संस्थान वाहन मोफत वाहन पुरविता येईल. तसेच त्यांना संस्थानमार्फत चहा, नाष्टा, प्रसाद भोजन, दर्शन/आरती व निवासव्यवस्था मोफत पुरविता येईल.

५) वरीलप्रमाणे सदरचे कामकाज हे त्यांनी कार्यादेश मिळालेचे दिनांकापासून पुढे ३० दिवसात पुर्ण करुन द्यावे लागेल. त्याचबरोबर संबंधीत कामासाठी ज्याज्या वेळी संस्थानला आवश्यकता वाटेल त्या त्या वेळी संस्थानला सहकार्य करावे लागेल, असे कळविता येईल.

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांवर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

विषय नं.३१ **शासनाने श्री साईबाबा संस्थान करीता मंजुर केलेल्या निळवंडे धरण उद्धव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network इ. अनुषंगीक कामे संस्थानमार्फत करणे व निळवंडे ते शिर्डी पाईपलाईनसह उर्वरित कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करणे अथवा संस्थानमार्फत करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अ.नं.	कलम/ तरतुद क्र.	कलम/तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपकलम क्र.	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

प्रस्तावना:- संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आलेला असून तो ६.६० MLD क्षमतेचा आहे. प्रस्तावित WTP हा २३ MLD क्षमतेचा आहे व संस्थानचे ०४ साठवण तलावांची एकुण क्षमता ही ३११ ML इतकी आहे. सदरहू साठवण तलावातील पाणीसाठा हा आता साधारणत ५५ ते ६० दिवस पुरतो. सदरची पाणी पुरवठा योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी अशी संयुक्त पाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेतून श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी या गावांसाठीही पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरहू योजना १९९२ साली कार्यान्वित झालेली असल्याने, सदरचा ६.६० MLD क्षमतेचा प्लान्ट सध्या २४ तास कार्यान्वित ठेवावा लागतो. तसेच सदर योजनेची सध्याची पाईपलाईन जीर्ण झालेली आहे व ती ब-याच वेळी लिकेज होते. त्यामुळे सदर नविन योजना हाती घेणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.१३/०१/२०१४ रोजी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ - रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अहमदनगर यांचे मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण नागरी व ग्रामीण, ठाणे यांना अग्रषित दि.०७/०२/२०१३ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, या योजनेचे सर्वेक्षणाचे वेळी खात्रीशीर उदभव म्हणून प्रामुख्याने १) निळवंडे धरण. २) मुळा धरण. ३) गोदावरी उजवा तट कालवा यांचा विचार करण्यात आलेला असून, निळवंडे धरणाचे अंतर जरी जास्त असले तरी पाणी हे गुरुत्ववाहिनीने येत असल्याने योजना तयार करणे किफायतशीर होणार आहे हे गृहीत धरुन निळवंडे धरणात पाणी आरक्षण प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे पाठविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्धव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये सदरहू प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेसाठी १४.६५ दलघमी (५१७.२९ दलघफु) आरक्षणाचा प्रस्ताव असून, रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे योजनेची

किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतकी रक्कम होते.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.

यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."

वाढीव शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्तीक प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेविषयी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६/२०१४ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी व दि.२१/०४/२०१६ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ व दि.२१/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर प्रकरणी शासनास त्यांचे म्हणणे त्वरीत सादर करणेबाबत आदेश दिलेले होते.

मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/१३९०/२०१६, दि.२२/०६/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१५/०७/२०१६ रोजी दिलेले आदेशात सरकारी वकील यांनी सादर केलेल्या म्हणण्यानुसार या प्रकरणी या तारखेपासून पुढील चार आठवडयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांची तांत्रिक मान्यता घेवून पुढील दोन आठवडयात प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येईल असे आदेशात नमुद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६ दि.१९/०७/२०१६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने सुचित केल्याप्रमाणे या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानमार्फत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे सादर करावा तसेच या संदर्भात व्यक्तिश: पाठपुरावा करुन अधिकाधिक तीन आठवडयाच्या कालावधीत तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेवून मान्यता प्राप्त प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी या विभागास सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२०१६, दि.२७/०७/२०१६ अन्वये या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांनचेकडे सादर करणेत आलेला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत जा.क्रं/मुअ/नाशिक/तांशा-२/१५२७/२०१६, दि.१२/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार रु.१६३४२.९६ लक्ष निव्वळ व रु.१९१९१.४० लक्ष ढोबळ (९% ETP Charges सह) किमतीचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडयांना बाब क्रं.३० माहे ऑगस्ट २०१६ पत्र क्रं.मजीप्रा/तांमा/१५३२, दि.१२/०८/२०१६ नुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजना तातडीने पूर्ण होवून कार्यान्वित होणे गरजेचे असलेने महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रं.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.१९/०७/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, तांत्रिक

मान्यता घेवून योजना तांत्रिक मान्यतेसह विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावी असे निर्देश दिलेले असलेने, इकडिल जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२५७३/२०१६, दि.२३/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये पुढीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथे सध्या असणारी पाण्याची कमतरता विचारात घेता श्री साईबाबा महासमाधी शताब्धी महोत्सवाच्या कालावधीत शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये व त्यांना मुबलक स्वरुपात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव शिर्डी संस्थान, पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ व रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (९% ETP Charges सह तसेच रु.१८३९३.०० लक्ष निळवंडे धरण हिस्सा वगळून) किमतीच्या अंदाजपत्रकासह सदर योजनेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

१. *सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.*

२. *सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी पूर्ण ठेव पध्दतीने ठेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाव्दारे ही योजना केवळ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानसाठी राबविण्यात येईल.*

३. *योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रे व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत.*

४. *योजनेची अंमलबजावणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार ई-निविदा मागवून पारदर्शक पध्दतीने करण्यात यावी.*

५. *सदर योजनेच्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींची काटेकोरपणे पुर्तता करण्यात यावी.*

६. *योजनेचा उद्भव विकसीत केल्याशिवाय इतर कामे करु नयेत. योजनेचा उद्भव भूपृष्ठीय व शाश्वत असल्यास अधिक्षक अभियंतांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच पुढील सर्व कामे हाती घेण्यात यावीत.*

७. *योजनेची अंमलबजावणी करताना समाज व्यवस्थापन तत्वांचा अवलंब करणे तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक दि.०५/०८/२०१४ व्दारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील*

८. *योजनेची कामे नियोजनानुसार विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. योजनेचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल त्रैमासिक बार चार्ट स्वरुपात विधी व न्याय विभाग व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत शासनास सादर करण्यात येईल.*

९. *योजनेची १०० % कामे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदार, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांनी जिल्हा तांत्रिक समितीच्या सदस्यासह योजनेची संयुक्त पाहणी करावी. तदनंतर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर योजना भौतिक दृष्टया पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच योजना पूर्ण झाली असे समजण्यात येईल.*

१०. *भौतिकदृष्टया पूर्ण झालेली योजना अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे त्वरीत हस्तांतरीत करण्यात येईल.*

११. *पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-७, दि.१५/०७/२०१५ नुसार योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे अनिवार्य राहील.*

१२. *पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-७, दि.०७/०७/२०१४ नुसार सदर योजना पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष ही योजना राबविणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. तदनंतर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.*

१३. *सदर योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पुर्णत्वाचे दाखले संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांकडू प्राप्त करुन घेऊन शासनास सादर करण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील."*

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे कडील उपरोक्त शासन निर्णयानवये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेस वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरहू शासन निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे.

तरी विषयांकित योजनेबाबत वर नमूद शासन निर्णयास अनुसरुन पुढील कार्यवाही करणेसाठी सर्वप्रथम खालील बाबींविषयी निर्णय होणेकरीता प्रस्ताव दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत आला होता.

१. सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करणे.

२. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करणे.

३. श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता योजनेतील WTP, RCC MBR Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे पहिल्याटप्यात हाती घेणेकामी कार्यवाही करणे .

४. शासन निर्णयातील इतर अटी-शर्तीबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाहीची रुपरेषा ठरविणे

त्यावर निर्णय क्रं. ७३९ पुढीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"... यावर सवितस्तर चर्चा होऊन , श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे उद्भव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेचे काम संसथानमार्फत करावे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत करावे याबाबतचा तौलानिक प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणोत यावा असे ठरले."

सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांचेमार्फत सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन याप्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे या क्षेत्रातील तज्ञ असुन ते महाराष्ट्र शासनाचा एक उपविभाग आहे . उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणमार्फत करावयाची आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे याबाबत आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध आहे. तसेच या योजनेसाठी आवश्यक शासनाचे सर्व शासकीय विभागांचे ना हरकत दाखले मिळविणे , तांत्रिक मंजुरया घेणे, निळवंडेपासुन ते शिर्डीपर्यंत सर्व्हे करुन लेव्हल घेणे, त्याचे डिटेल डिझाईन व ड्रॉईंगतयार करणे, ई-निवीदा तयार करुन ई-निविदा प्रक्रीया राबविणे, पाईप लाईनचे कामातील अडचणींचे निरसन करणे, पाईप / इतर मटेरीयलच्या तत्सम बाबींची तपासण्या करणे, सुरु असलेल्या कामावर दैनंदिन पर्यवेक्षण करणे, कामाचा दर्जा राखणे बाबत आवश्यक त्या बाबींची तपासण्या करणे, कामाचा मासिक अहवाल तयार करणे, प्रत्यक्ष झालेल्या कामांबाबत ठेकेदार यांचे देयके तपासणे व सदर देयके आदा करणेबाबत कार्यवाही करणे, प्रकल्प आढावा बैठकांना उपस्थीत राहणे, मिटिंग इतिवृत्त तयार करणे इत्यादी सर्व कामे करावी लागणार आहे.

वर नमूद कार्यवाही करण्यासाठी संस्थानकडे पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता पहिल्या टप्प्यात सदर योजनेतील WTP, RCC MBR, Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे संस्थानमार्फत हाती घेणेकामी कार्यवाही करता येईल तथापी याबाबत प्रथम खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

१) याबाबत प्रथमता पहिल्या टप्प्यातील वर नमूद कामे संस्थानने करावयाची झाल्यास त्यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करावा लागेल.

२) उपरोक्त बाबींची कामे हाती घेणेपुर्वी संबंधीत प्राधिकरणाची परवानगी घेणे.

३) या कामांची सविस्तर अंदाजपत्रके महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी तयार केलेली आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची परवानगी घेऊन त्यांनी तयार केलेल्या डिझाईननुसार प्रकल्पाचे काम करता यईल. अथवा तज्ञप्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, डिटेल सर्व्हे करणे, सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे तयार करणे, ई- निविदा तयार करणे, आवश्यक आहे.

तसेच या प्रकल्पातील निळवंडे ते शिर्डी पाईप लाईनचे उर्वरित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करता येईल. याबाबत प्रथम मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

तरी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, निळवंडे धरण उद्भव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्र. १ मधील WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करुन घ्यावीत व सदर संपूर्ण योजना संस्थानमार्फत राबविणेत यावी. याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येऊन, त्यांना शासकीय दराने सल्लागार फी देण्यात यावी. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करणेत यावा.** (कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

विषय नं.३२ **शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील वातानुकुलीत करावयाच्या दर्शनरांग हॉलचे वाढीव विद्युत भाराकरीता कराव्या लागणाऱ्या विद्युतीकरण कामाविषयीची कन्सल्टंटची कामे कन्सल्टंट मे.रामराज्य इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक यांचेकडून त्यांचे मंजुर दराप्रमाणे करुन घेणे, बांधकाम विभागाकडून जनसेट व पॅनेल रुमचे बांधकाम करुन घेणे व सध्याचे ट्रान्सफॉर्मर, जनसेट व पॅनेल बायबॅक करणे.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

जा.नं.एसएसएस / वशी-का.अ./२८१४२०१६ दि.०७/१०/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये दिनांक २३ व २४ आक्टोबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप-कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिरपरिसरात घेतलेल्या राऊंडमध्ये शांतीनिवास व भक्तनिवास येथील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकरीता त्वरीत प्रस्ताव सादर करणेकरीता मेकॅनिकल विभागास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सदरचे चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी येणा-या एकत्रित खर्चाचा प्रस्ताव मेकॅनिकल विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने या चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी अंदाजे ५५० ते ६०० के.डब्ल्यु.विद्युत लोडची आवश्यकता असून सदर लोड शिल्लक नसलेस त्याकामी कराव्या लागणा-या उपाययोजना व त्याकरीता येणारा अपेक्षित खर्च याबाबतचा तपशील इकडील विभागास तातडीने कळविणेबाबत मेकॅनिकल विभागामार्फत कळविण्यात आलेले होते.

सध्या मंदिर परीसराकरीता वापरात असलेल्या जनरेटरसेट पैकी जनसेट क्र.०१ हा ५०० केव्हीए क्षमतेचा जनसेट सन-१९८९ मध्ये बसविण्यात आलेला असून सदरच्या जनसेटला आज रोजी २८ वर्ष पुर्ण झालेले आहेत. तसेच जनसेट क्र.०२ हा ५०० केव्हीए क्षमतेचा जनसेट सन-२००० मध्ये बसविण्यात आलेला असून सदरच्या जनरेटरला आज रोजी १७ वर्षे पुर्ण झालेले आहेत. त्याचप्रमाणे सध्या वापरात असलेला १००० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर सन-२००४ मध्ये बसविण्यात आलेला असून सदरच्या ट्रान्सफॉर्मरला आज रोजी १३ वर्षे पुर्ण झालेले आहे. उपरोक्तप्रमाणे बसविण्यात आलेले ५०० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटरसेट तसेच १००० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर हा त्यावेळचा विद्युत लोड ग्राह्य धरुन बसविण्यात आलेला आहे.

सध्या मंदिर परीसरातील सबस्टेशनचा मंजुर विद्युत लोड ५०० केव्हीए **(**४८१ के.डब्ल्यु.**)** इतका असून यापुर्वी मंदिराकरीता उभारण्यात आलेल्या वातानुकूलीत यंत्रणेकरीता १०० केव्हीए लोड तसेच आता मेकॅनिकल विभागाचे पत्रानुसार शांतीनिवास व भक्तनिवास दर्शन लाईन वातानुकूलीत करणेकरीता ५५० ते ६०० के.डब्ल्यु.इतका वाढीव लोड मिळून एकुण लोड हा जादा क्षमतेचा होत असल्याने सध्याच्या विद्युत संच मांडणीवर चालणार नसल्याने वाढीव लोडकरीता १२०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर, १०१० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटरसेट, सी.टी./ पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड नविन बसवून केबल वर्क करावे लागेल. तसेच नविन जनरेटर जुन्या जनरेटर सेटच्या जागेवर बसविता येणार नसल्याने जनरेटर सेट व पॅनेलकरीता नविन रुमचे बांधकाम करावे लागणार असून याकामी रुपये दोन कोटी इतका अंदाजित खर्च तसेच रु. २५,९२,०००/- इतका मासिक बीलाचा अपेक्षित खर्च असून नविन वातानुकूलीत यंत्रणेचा तपशील तसेच त्यासाठी विद्युत संचाचे तपशीलाचे सर्व कामे विद्युत विभागामार्फत नेमण्यात आलेल्या कन्सल्टंट यांचेकडून तपासून घेऊन त्याचे अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार काम करुन घ्यावे लागणार असल्याचे मेकॅनिकल विभागास कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मेकॅनिकल विभागामार्फत शांतीनिवास व भक्तनिवास येथील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणे कामाचा मेकॅनिकल विभाग, बांधकाम विभाग तसेच विद्युत विभागाच्या एकत्रित खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आलेला होता. मेकॅनिकल विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या एकत्रित खर्चाच्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३०-११-२०१६ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.२४ निर्णय क्र.८६७ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार विद्युत विभागाचे वाढीव लोडकरीता १२०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर, १०१० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, सी.टी. / पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड नविन बसवून केबल वर्ककरीता रक्कम रुपये दोन कोटी इतका खर्च तसेच रु. २५,९२,०००/- इतका मासिक बीलाचा अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

दि.०२-०२-२०१६ रोजी झालेल्या मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्र.०३ निर्णय क्र.०३ **(**०७**)** अन्वये भविष्यातील विद्युत विभागामार्फत निघणा-या कामांकरीता मे.रामराज्य इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक यांचे ई-निविदेतील दिलेले १.५ **% +** सर्व्हीस टॅक्स मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांची जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ ८३५/ २०१६ दिनांक २४-०५-२०१६ रोजीचे कार्यादेशान्वये कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्यामुळे शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील चारही हॉल वातानुकूलीत करणेकरीता सध्या असलेले कमी क्षमतेचे जनरेटर सेट, ट्रान्सफॉर्मर, सी.टी./ पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड बदलून त्याजागेवर नविन १२०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर, १०१० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, सी.टी. / पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड खरेदी करणेकरीता तसेच सदरचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडून करुन घेणेकरीता ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेसाठी ई-निविदा तसेच पॅनलचे ड्रॉईंग, जनसेट ड्रॉईंग, पॅनल डिटेल्स, जनसेट डिटेल्ससह टेंडर फॉर्म तयार करावे लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे,

मागणी:- ०१). नविन जनसेट व नविन पॅनेलसाठी तयार कराव्या लागणा-या नविन जनसेट रुमचे बांधकाम करणेस मान्यता मिळवून त्यावर बांधकाम विभागामार्फत पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

०२). ई-निविदा तसेच पॅनलचे ड्रॉईंग, जनसेट ड्रॉईंग, पॅनल डिटेल्स, जनसेट डिटेल्ससह टेंडर फॉर्म तयार करणे तसेच ठेकेदार यांनी सादर केलेले रनिंग बीले तसेच फायनल बीले चेक करणे, नविन वातानुकूलीत यंत्रणेचा तपशील तपासणे इत्यादि कामे हे इलेक्ट्रीकल कन्सल्टंट मे.रामराज्य इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक यांचेकडून त्याचे मंजूर दरानुसार करुन घ्यावे लागणार आहे.

०३). शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील चारही हॉल वातानुकूलीत करणेकरीता सध्या असलेले कमी क्षमतेचे जनरेटर सेट, ट्रान्सफॉर्मर, सी.टी./ पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड बदलून त्याजागेवर नविन १२०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर, १०१० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, सी.टी. / पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड खरेदी करणेकरीता तसेच सदरचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडून करुन घेणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणे आहे.

०४). सध्या वापरात असलेले ट्रान्सफॉर्मर, ५०० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटरसेट, चेंजओव्हर पॅनेल तसेच मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल ही यंत्रणा बायबॅक करणेकरीता शासनाची मान्यता घेणेस व त्याचा समावेश सदरच्या ई-निविदेमध्ये करावा लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- उपरोक्त मागणीप्रमाणे ०१, ०२, ०३ व ०४ करीता मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील वातानुकुलीत करावयाच्या दर्शनरांग हॉलचे वाढीव विद्युत भाराकरीता कराव्या लागणाऱ्या विद्युतीकरण कामाविषयीची कन्सल्टंटची कामे कन्सल्टंट मे.रामराज्य इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक यांचेकडून त्यांचे मंजुर दराप्रमाणे करुन घेणे, बांधकाम विभागाकडून जनसेट व पॅनेल रुमचे बांधकाम करुन घेणे व सध्याचे ट्रान्सफॉर्मर, जनसेट व पॅनेल बायबॅक करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

विषय नं.३३ **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील एकूण १५ रस्त्यापैकी ०६ रस्ते भूसंपादीत करुन विकसीत करणे व ०८ रस्ते विकसीत करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:

०१. निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६.
०२. निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०.
०३. निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११.
०४. निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११.
०५. निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४.
०६. निर्णय क्र. ७५० दि. ११/०९/२०१४.
०७. निर्णय क्र. ७९९ दि. ११/०९/२०१४.
०८. निर्णय क्र. ४६७ दि. १०/११/२०१५.
०९. निर्णय क्र. ६५६ दि. २८/१२/२०१५.

मा. शासन निर्णय: मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयक्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१) का.सोळा, दि.०४/०९/२०१४
२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

प्रस्तावना: शिर्डी शहरातील सार्वजनिक सोयीसुविधांचा विस्तार करण्याचे दृष्टीने व ज्यांचा साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्था न व्यवस्थापन शिर्डी

नगरपंचायतीस मदत करीत आहे. या विविध पायाभूत सुविधांअंतर्गत शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहरातील रस्ते संस्थान निधीतुन विकसीत करणेस तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

१) **शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणे**: मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार प्रथम प्राधान्य गटातील १०.०६ किलोमीटर लांबीचे एकुण ११ रस्ते संस्थान निधीतून भूसंपादन व विकसीत करणेसाठी येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच सदरहु खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे. या रस्त्यांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

रस्ता क्र.	रस्त्याचे नाव	लांबी(मी.)	रुंदी (मी.)	कामाची सद्यस्थिती
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचे मार्फत विकसीत करणेत करणेत आलेले ०५ रस्ते – (खर्च रु.९.३० कोटी)				
०१.	शिर्डी -निमगांव शिव रस्ता कॉन्क्रीटीकरण (नगर-मनमाड रोडचे पूर्वेकडील) -भूसंपादन आवश्यक नाही.	७७०	१०.१२	काम पूर्ण
०२.	शिर्डी रुई रस्ता कॉन्क्रीटीकरण (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) -भूसंपादन आवश्यक नाही.	६२६	६/८	काम पूर्ण
०४.	कनकुरी रस्ता कॉन्क्रीटीकरण	१०७०	१२	काम पूर्ण
१०.	गावठाण हद्दीतील विकास योजनेतील द्वारकामाई ते ताजीमखान बाबा चौका पर्यंत रस्ता.- पेव्हींग ब्लॉक्स	७५	९	पेव्हींग ब्लॉक्स बसविणेसाठी वेळीच जागा उपलब्ध न झाल्याने व कंत्राटदाराचे कामाचा कालावधी संपल्याने सदर कामाची पुर्तता करणे शक्य नसल्याचे मरारविम यांनी दि. १२/११/२०१२चे पत्राने कळविले आहे.
११.	गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर (पालखी रस्ता ते नविन पिंपळवाडी रस्ता) - पेव्हींग ब्लॉक्स	३०	६	काम पूर्ण

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत विकसीत करणेत करणेत आलेले ०६ रस्ते – (खर्च रु.२५.३४ कोटी)				
रस्ता क्र.	**रस्त्याचे नाव**	**लांबी(मी.)**	**रुंदी (मी.)**	**कामाची सद्यस्थिती**
०३.	नांदुर्खी रस्ता – (नगरमनमाड रस्ता ते नांदुर्खी शिव) - कॉन्क्रीटीकरण	१८७७	१८	चेनेज १००० ते १२७५ (डावी बाजू), चेनेज१००० ते १०८० (उजवी बाजू) व चेनेज१६०० ते १८७७ (दोन्ही बाजू) या भागातील हरकतींचे निवारण नगरपंचायतीकडून वेळेत न झाल्याने ठेकेदार यांनी फुटपाथचे काम केले नाही. उर्वरीत काम पूर्ण.
०५.	विकास योजनेतील १८ मीटर रुंद वळण रस्ता (आरक्षण क्र. ३१ ते नाला क्र. ३४ पर्यन्त) - डांबरीकरण	१८४०	१८	कनकुरी रस्ता ते नगर-मनमाड रस्ता या दक्षिणेकडील ९०० मी. वळण रस्त्याचे काम पूर्ण. उर्वरीत रस्त्याचे एकूण ९४० मी. भागात खडीकरण पूर्ण. डांबरीकरण बाकी. वेळीच जागा उपलब्ध न झाल्याने ठेकेदार यांनी पूर्ण केलेनाही.
०६.	विकास योजनेतील १५ मीटर रुंद रस्ता (आरक्षण क्र. ३१ ते नविन पिंपळवाडी रस्त्यापर्यन्त) -कॉन्क्रीटीकरण	५६५	१५	काम पूर्ण
०७.	विकास योजनेतील २४ मिटर वळण रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते साई श्रध्दा हौसींग सोसायटी) -डांबरीकरण	४५०	२४	काम पूर्ण
०८.	विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर निमगांव शिव ते पिंपळवाडी रस्ता- १८ मिटर रुंदीचा रस्ता-कॉन्क्रीटीकरण	४५०	१८	काम पूर्ण

०९. ०९.अ	विकास योजनेतील १८ मिटर रुंदीचा रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते स.क्र.९ मधील १८ मिटर रिंग रस्ता) पूर्व-पश्चिम-कॉन्क्रीटीकरण	८४०	१८	६२० मी. भागातील काम पूर्ण. लक्ष्मीनगर वसाहतीतील घरांमुळे व त्यालगत असे १८५ मी., भाग वेळेत उपलब्ध न झाल्याने काम बाकी.
	विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा पूर्व-पश्चिम रस्ता ते आरक्षण क्र. ३१ पोहच -डांबरीकरण	१५००	१८	भूसंपादन कायर्वाही पूर्ण न झाल्यमे ९अ या वळण रस्त्याचे काम सुरु करता आलेले नाही.

सदरहु प्रकल्पातील रस्त्यांचे भूसंपादनासाठी रु.३५,४३,८१,८०३/- व रस्ते विकसनासाठी रु.३४,६४,०२,९६६/- असा एकूण रु.७०,०७,८४,७६९/- खर्च झालेला आहे.

२) **<u>शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणे</u>:** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि१०/०६/२०११ व दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये, सदरहू प्रकल्पातील एकुण ०६ रस्त्यांचे भूसंपादनासाठी रु.४३.७३ कोटी व या सहा रस्त्यांसह भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करणेकामी अंदाजे रु.८२.३७ कोटी असे एकुण रु.१२६.१०० कोटी खर्चाचा खालील रस्त्यांचे भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करणे व रस्ते विकसित करणेबाबतचा प्रस्ताव संस्थानला सादर केला होता. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३८ अन्वये, द्वितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

(अ) सदरचे मान्यतेनुसार खालील सहा रस्ते भूसंपादनासाठी रु.४३.७३ कोटी व विकसनासाठी रु.५७.२८ कोटी असा एकुण रु.१०१.०१ कोटी खर्चाचा प्रस्ताव इकडील दि.०४/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आला होता

अ. नं.	रस्त्याचे नांव	लांबी (मी.)	रुंदी (मी.)	अस्तित्वा तील रुंदी (मी.)	भूसंपादन करावयाची रुंदी (मी.)
०१	विकास योजनेतील २४ मीटर रुंद वळण रस्ता (साई श्रध्दा हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता)	२६५०	२४	-	२४.००
०२	विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता)	५५०	१२	५.५०	६.५०
०३	विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता- वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे)	५००	१५	१०	५.००
०४	विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता)	३२०	१५	-	१५.००
०५	विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा जुना पिंपळवाडी रस्ता (पुष्पांजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत)	१०००	१५	१०	१५.००
०६	विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रस्ता यांना जोडणारा निता हॉटेल पश्चिमबाजू दक्षिणोत्तर रस्ता)	३००	१५	--	१५.००
	एकूण लांबी	५३२०			

त्यानंतर उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी या सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु.४३.७३ कोटी ऐवजी रु.५४.२६ कोटी येत असलेबाबत कळविले होते. त्यानुसार सदरहू कामी एकुण रु.१११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७८ अन्वये मान्यता मिळाली. त्यानुसार दि.१०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आला.

याबाबत विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये, भूसंपादनाची आवश्यकता असणारे सात रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन, मा. उच्च न्यायालयाच्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि.१६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी असे कळविले. त्यानुसार द्वितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असलेले सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी आवश्यक असणारा रु.१११.५४५ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र.८७०९/२०१४ अन्वये सादर करणेत आला होता.

तदनंतर या सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी रु.५४.२६ कोटी ऐवजी आता नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ दि.०१/०१/२०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने, या कायद्याचे कलम २४ तसेच कलम २६ ते ३० प्रमाणे हिशोबीत करुन द्यावी लागणार असल्याने सुधारीत भूसंपादन खर्च एकुण रु.१५०,१८,८८,७९७.०० इतका येत असलेबाबत उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी कळविले. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० खालील प्रमाणे झाला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी प्रस्तावित कामी येणा-या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, अद्याप पर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा. औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा. औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरी मिळालेनंतर वाढीव रकमेचा प्रस्तव समितीपुढे सादर करणेत यावा असे ठरले."

(ब) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ अन्वये, भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या खालील १७ रस्त्यांचे नकाशे व अंदाजपत्रके युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांचेमार्फत तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावे असे ठरले.

अ. नं.	रस्त्याचे नांव	लांबी(मी.)	रुंदी(मी.)
०१	डॉ. हेडगेवार नगर येथील रस्ता (दोडिया लगत रस्ता)	६००	५.००
०२	१२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शिव रस्ता) विकसन व १२ चारी बंदीस्त करणे.	१८००	५.५०
०३	शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पूर्व बाजू)	१०००	३.५०
०४	शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पश्चिम बाजू)	१५००	३.५०
०५	नांदुर्खी शिव रस्ता (नांदुर्खी रस्ता ते साकुरी शिव) दक्षिणोत्तर रस्ता	९५०	३.५०
०६	५०० रुम भक्तनिवास ते साईश्रध्दा हौसींग सोसायटी रस्ता (न.म. रस्ता ते बिरेगाव शिव)	१२५०	९.००
०७	पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १२ चारी रस्ता जोडणारा रस्ता)	४१०	३.००
०८	सन एन् सॅड ते कंम्पोस्ट डेपो पर्यंत रस्ता (एसटीपी- शिर्डी शिव रस्ता)	२५००	३.५०
०९	बिरेगांव नाला रोड (लुटे वस्ती गणेश बंधारा व साकुरी शिव पर्यंत)	३०००	४.००
१०	चौफुली रोड ते नविन कंम्पोस्ट डेपो (सर्व्हे नं. १३६चे पुर्वेस राहाता नगरपालिका संयुक्त कंम्पोस्ट डेपो)	१५००	३.५०
११	रज्जाक शेखलगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंतचा रस्ता.	३५०	४.५०
१२	श्रीकृष्ण नगर रस्ते	७००	३.५०
१३	सर्व्हे नं. १३४ सर कॉलनीकडे जाणारे रस्ते.	२५०	३.५०
१४	बन रस्ता (वराह चौकापासून १२ चारीच्या पुर्व बाजूलगत ते सौंदडी देवस्थान पर्यंत)	८००	५.००
१५	गणेशवाडी मधील रस्ते.	८००	३.००
१६	शिर्डी शहरातील नगरमनमाड रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५००	३०.००
१७	हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा रस्ता (१२ चारी इनामवाडी रस्ता)	१५००	३.००
	एकूण लांबी	२१४१०	

सदर निर्णयानुसार साईभक्त/ नागरीकांचे दैनंदिन वापरातील उपरोक्त १७ रस्ते विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी इकडील दि.०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे रु.३५ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला.सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी प्रचलित दरसुचीप्रमाणे सुधारीत खर्चाचा प्रस्ताव मान्येसाठी सादर करणेबाबत दि.०६/०१/२०१४ रोजी निर्देश दिले होते.

सदर निर्देशानुसार सदरहू कामाचे सन २०१३-१४ चे जिल्हा दरसुचीनुसार सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी सादर केलेले रु.४७,०२,४४,९७८.०० मात्र रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक, शासनास इकडील दि.०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आले. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये मान्यता देणेत आली.

सदर प्रस्तावाबाबत मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि. २१/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये "..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करण्यासाठी येणाऱ्या रु.४७,०२,४४,९७७.०० इतक्या खर्चाचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. असे कळविले.

(i) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील त्रिसदस्यीय समितीची सदर प्रस्तावास सहमती घेण्यात यावी.

(ii) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

(iii) सदर प्रस्तावात प्रस्तावित केलेले व्दितीय प्राधान्य गटातील १७ रस्ते फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्यात यावेत. श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्रपणे स्वतः संस्थानमार्फत निविदा काढून सदरचे रस्ते विकसित करता येणार नाहीत.

२. सदर रस्ते विकसित करण्यासाठी अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजित खर्चापेक्षाजास्त खर्च न होण्याची दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर कामाबाबत प्रगती अहवाल वेळोवेळी संबंधित अभियंत्यांकडून प्राप्त करुन शासनास सादर करण्यात यावा.

३. सदर रस्ते विकसित करण्यासाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून कामाच्या प्रगतीनुसार संबंधितांना टप्प्या टप्प्याने अदा करुन त्याबाबतचा स्वतंत्र लेखा ठेवून त्याचा अहवाल संस्थानच्या त्या वर्षाच्या वार्षीक अहवालाव्दारे सादर करण्यात यावा. ''

त्यानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं. ५०७२/२०१५ सादर करणेत आले होते.

दरम्यान, शिर्डी नगरपंचायत यांनी १७ पैकी ०८ रस्त्यांकरीता सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजने अंतर्गत निधी मंजूर झाला आहे करीता सदरहू ०८ रस्ते वगळणेत यावेत व उर्वरीत रस्ते विकसीत करणेबाबत कळविले. (नगरोत्थान योजनेसाठी नगरपंचायतीच्या कर्जाच्या हिश्याची रक्कम मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.४३५ अन्वये ठरलेनुसार संस्थानने अनुदान स्वरुपात दिली आहे.)

नगरपंचायतीचे विनंतीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.४६७ अन्वये, "..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या १७ रस्त्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्त्यांची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. "

तसेच मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५६ खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील ०६ रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणे व ०९ रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सुधारीत सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मागविणेत यावा, त्यांचेकडून प्रस्ताव आल्यानंतर मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत यावा, असे ठरले."

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने उर्वरीत एकूण १५ रस्त्यांपैकी शिर्डी हद्दीतील नगरमनमाड रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे कामाचा खर्च वगळता इतर १४ रस्त्यांचे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला.

(अ)	०६ रस्ते भूसंपादन खर्च	: रु.१६३,५५,२६,२१०.००
	०६ रस्ते विकसन खर्च	: रु.४३,७२,२७,५४३.००
	०६ रस्ते एकूण खर्च	**:** रु.२०७,२७,५३,७५३.००
(ब)	०८ रस्ते विकसन खर्च	: रु.२२,६९,९१,५१०.००
	एकूण खर्च (अ+ब)	: **रु.२२९,९७,४५,२६३.००**

सदरहु प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु होती. दरम्यान दि.२८/०७/२०१६ रोजी पासून मा. व्यवस्थापन समिती अस्तीत्वात आलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत सिव्हील अर्ज मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेत आली आहे.

वरीलप्रमाणे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील अ) सहा रस्त्यांचे भूसंपादन करणे व विकसीत करणेकामी रु.२०७,२७,५३,७५३.०० तसेच ब) अस्तीत्वातील आठ रस्ते विकसीत करणेकामी रु.२२,६९,९१,५१०.०० असे एकुण रु.२२९,९७,४५,२६३.०० मात्र रकमेस मान्यता मिळणेस व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला असता, त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नियम क्रमांक २१ (२) नुसार विश्वस्तव्यवस्थेच्या शिल्लक रकमेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या ३०% पेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस अधिनियमात नमूद प्रयोजन व संस्था तसेच शिर्डी नगरपंचायत यांना देता येतो.

एकूण वितरणयोग्य निधी रु.५१.४१ कोटी आहे. त्यामुळे सदर रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने निधीच्या उपलब्धतेनुसार करावी लागतील किंवा साई शताब्दी आराखड्यात समाविष्ट असल्यास प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करण्यास हरकत नसावी."

प्रस्ताव: मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार एकूण वितरणयोग्य निधी रु.५१.४१ कोटी आहे. तथापि शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सहा रस्त्यांचे भूसंपादन करणे व विकसीत करणे तसेच अस्तीत्वातील आठ रस्ते विकसीत करणेकामी येणारे एकुण रु.२२९,९७,४५,२६३.०० मात्रचे खर्चाचा समावेश श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालात संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याच्या कामांचे अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ कृती समितीची मान्यता प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेल्या रस्त्यांपैकी ज्या रस्त्यांचे भू-संपादन करण्याची आवश्यकता नाही, अशा रस्त्यांविषयी तसेच दि.२१.०८.२०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये मान्यता मिळालेल्या शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील १७ रस्त्यांविषयी व शिर्डी नगरपंचायतीला सुवर्ण जयंती नगरोथ्थान महाभियान योजनेअंतर्गत मंजूर८ रस्त्यांविषयीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

तसेच द्वितीय प्राधान्य गटातील ६ रस्त्यांचे भूसंपाद्न व विकसन करणे संदर्भातील स्वतंत्र प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.३४ **शिर्डी सर्व्हे नं.१६४ मधून सार्वजनिक रस्ता व संस्थानच्या बसेसकरीता बस थांबा विकसीत करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील कलम २१ मधील पोटकलम (२) च्या खंड (दोन) अन्वये "स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयाकडे जाणेसाठी संस्थानमार्फत नगर– मनमाड रस्त्यापासून अस्तित्वातील शीव रस्ता विकसित करणेत आलेला आहे. सदर रस्ता कमी रुंदीचा असून सदर रस्त्यावर प्रसाद घेण्यासाठी जाणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. त्यातच साईभक्तांची वाहने, रिक्षा यांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. सदर रस्त्यास पर्याय म्हणून २०० रुम धर्मशाळेकडून नाला रस्त्याकडे येणा-या १८ मी. रुंदीचे विकास योजना रस्त्यापासून ते श्री साईप्रसादालयाकडे सर्व्हे क्र.१६४ मधून जाणे – येणेकरीता रस्त्यासाठी दक्षिणोत्तर जागा उपलब्ध करुन देणेबाबत श्रीमती इंदूबाई भाऊसाहेब गोंदकर व श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर, शिर्डी ता. राहाता यांनी दि.२५/०७/२०१६ रोजीच्या अर्जान्वये संस्थानला कळविले होते.

अर्जदार यांचेमार्फत उपलब्ध करण्यात येणारे वर नमूद जागेतून संस्था नमार्फत रस्ता विकसित करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांचे अभिप्राय व सहमती संस्थानला कळविणेतबाबत इकडील जावक नं. ३४६९/२०१६ दि.०३/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. याबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी जानं.२६८३ दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्राने खालिल अटीस अधिन राहून रस्ता विकसीत करणेस हरकत नसल्याचे कळविले आहे.

सर्व्हे क्र.१६४ मधुन जाणार प्रस्तावित दक्षिण उत्तर रस्ता हा शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र. ४८ (कॅम्पींग ग्राउड) मधुन जात आहे. त्यामुळे आरक्षीत जागेचे भुसंपादन व विकास करते वेळी जागा मालकास कोणतीही हरकत घेता येणार नाही.

विकसीत करण्यात येणारा रस्ता साईभक्तांचे वापरासाठी खुला ठेवावा लागेल. त्यास फाटक लावुन बंद करता येणार नाही. आरक्षण क्र.४८ (कॅम्पींग ग्राउड) विकसीत करतेवेळी रस्ता ठिकाण बदलल्यास रस्ता बांधकाम काढून घ्यावे लागेल.

आता अर्जदार यांनी दि.१७/०१/२०१७ रोजीचे अर्जान्वये कळविले आहे की, सदर रस्ता ६ मी. ऐवजी ९ मीटर करण्यात यावा त्यामध्ये ६ मी. रस्ता व दोन्ही बाजूस प्रत्येकी १.५ मी. रुंदीचे फुटपाथ साईभक्तांना जाणे येणे साठी करण्यात यावे तसेच नाल्यावर जाणे- येण्याकरीता पुल बांधण्यात यावा. सदर रस्ता हा साई संस्थानच्या बसेस व संस्थानच्या वाहनांकरीता खुला राहील. तसेच सदर रस्त्याचा वापर हा नविन प्रसादालया समोरील नविन रस्ता होईपर्यंत वापरात येईल.

प्रस्ताव:- अर्जदार यांनी विषयांकीत रस्ता ६ मी. ऐवजी ९ मी. करणेबाबत सुधारीत प्रस्ताव सादर केलेला आहे. शिर्डी नगरपंचायत यांनी कळविलेल्या वर नमूद अटींबाबत अर्जदार यांची सहमती असलेबाबत त्यांचे हमीपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू रस्ता संस्थानचे निधीतून विकसीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ अन्वये राज्य शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागेल. तरी याप्रमाणे कार्यवाहीबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सर्व्हे नं.१६४ मधून सार्वजनिक रस्ता व संस्थानच्या बसेसकरीता बस थांबा विकसीत करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतु त्याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.३५ **ॲनेस्थेसियालॉजीस्ट या पदावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३– "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट-शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

डॉ. अमोल डॅनियल भालेराव, डॉ. सतिष पवार, डॉ. राजेंद्र गवात्रे व डॉ. विजयकुमार कर्डिले यांनी ॲनेस्थेसियालॉजिस्ट या पदावर पुर्णवेळ काम करणेसाठी परवानगी मिळणेकामी अर्ज केलेले आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	अर्जदारांचे नाव	शिक्षण	शेरा
०१.	डॉ. अमोल डॅनियल भालेराव बाभळेश्वर रोड, पार्वती नगर, मु.पो. लोणी (खु.) ता. राहाता, मो. ९६२३५८६०६६	एमबीबीएस – २००७ एमडी – २०१६	
०२.	डॉ. सतिष हरीकिसन पवार मु.पो. दहेगाव-ने, ता. शेवगाव, मो. ९१४६३२६२९६	एमबीबीएस – २००८ एमडी – २०१६	
०३.	डॉ. राजेंद्र सदाशिव गवात्रे सी-२/१०, डॉक्टर्स क्वाटर्स, प्रमुखस्वामी मेडीकल कॉलेज ॲण्ड श्रीकृष्ण हॉस्पिटल, करमसद, आनंद, गुजरात मो. ९४२२१६३९०३	एमबीबीएस – १९७९ डीए – १९८३ एमडी – १९८४	शासनाकडील दि. २३/०१/२०१३ च्या पत्रानुसार श्री. गवात्रे यांना नेमणूक देता येणार नाही असे मत आहे.
०४.	डॉ. विजयकुमार दादाराव कर्डिले शिर्डी, ता. राहाता, मो. ८३९०२२८६३५	एमबीबीएस – २००९ डीए – २०१४	

रुग्णालय	आकृतीबंधात नमुद पदनाम	आकृतीबंधात नमुद असलेली			आकृतीबंधातील वेतनश्रेणीनुसार सुरुवातीचे वेतन	भरलेली पदे	
		पदसंख्या	शैक्षणिक अर्हता	वेतनश्रेणी		स्थायी	व्हिजीटींग
१	२	३	४	५	६	७	८
साईबाबा	सिनीअर ॲनेस्थेसिआलॉजिस्ट	६	एमडी / डीएनबी	१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००	६५,९११	१	२
	ज्युनिअर ॲनेस्थेसिआलॉजिस्ट	९	एमडी / डीएनबी / डीए	१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००	५४,६००	१	०

(अ.नं. ६ मध्ये सिनी. ॲनेस्थेसियासाठीचे वेतन – बेसिक १८७५० + डीए ६६०० + महागाई भत्ता ३१६८८ + एनपीए ८८७३ = ६५,९११, ज्यु. ॲनेस्थेसियासाठीचे वेतन बेसिक १५६०० + डीए ५४०० + महागाई भत्ता २६२५० + एनपीए ७३५० = ५४६००).

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सिनी. ॲनेस्थेसिआलॉजिस्ट पदावरील २ व्हिजीटींग डॉक्टरांपैकी १ येत नाहीत.

तरी, संस्थान रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरची संख्या व रुग्णांची संख्या विचारात घेता त्याप्रमाणात ॲनेस्थेसियालॉजीस्ट उपलब्ध नसल्याने तातडीची गरज म्हणून उपरोक्त तक्त्यास अनुसरुन रिक्त पदांवर संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत उपरोक्त अर्जदार यांना तसेच ते कामावर हजर न झाल्यास कार्यालयात नोकरी मिळणेसाठी येणा-या अर्जदारांना कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात १ वर्ष कालावधीसाठी डीए/ डीएनबी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारास सिनीयर ॲनेस्थेसियालॉजिस्ट व डीए शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारास ज्यु.ॲनेस्थेसियालॉजिस्ट पदावर नेमणूक करणेस व त्यांना अनुक्रमे

मानधन रु. ६५,०००/- व ५४,०००/- तसेच संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता व स्थायी कर्मचा-याप्रमाणेच कामाच्या प्रमाणात फक्त अर्जित रजा देणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३५ **दरम्यानचे कालावधीमध्ये आणखी काही डॉक्टर्सचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. या सर्व अर्जांचा आयत्यावेळेच्या विषयांमध्ये एकत्रित प्रस्ताव सादर केलेला असल्यामुळे सदरहू विषय रद्द करणेत आला.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.३६ **श्री साईबाबा रुग्णालयातील नव्याने सुरु करण्यात आलेल्या न्युरो आयसीयु व एसआयसीयुचे कामकाज सुरळीत राहणेकरीता आऊटसोर्स ठेकेदार नेमणेऐवजी सध्याचे लेबर कंत्राटदारामार्फत कर्मचारी घेणे.**

प्रस्ताव- तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२ जुन, २०१४ रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील आयसीसीयु वार्डकरीता बेडसंख्या वाढविणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल येथील न्युरो ओटीतील Recovery रुम, तसेच आर्थो ओटीमधील आर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन, तेथे १० ते १२ बेडसचा आयसीसीयु वॉर्ड तयार करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ३,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार न्युरो आयसीयु व सर्जिकल आयसीयु वॉर्ड तयार करणेस मान्यता मिळाल्याने सदर विभागासाठी आकृतीबंधातील शैक्षणिक पात्रतेनुसार निवासी वैद्यकीय अधिकारी – ८, परीचारीका – ३०, वॉर्डबॉय- ८, आया- ८ , स्विपर – ८ मनुष्यबळ मिळणेबाबतचा प्रस्ताव तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता.

उक्त प्रस्तावावर, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Neuro ICU व SICU विभाग सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी (आऊटसोर्स) पद्धतीने घेणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदांची मागणी करणेत येऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेत यावी. मात्र तत्पुर्वी याबाबत संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीच्या निर्णयानुसार संस्थान वकीलामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३७०७/२०१६ मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सादर करणेत आले होते त्यातील प्रेअर क्लॉज मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"The applicant may please be permitted to carry out E-Tender process for supply of manpower / staff required for proposed Neuro ICU & SICU in Shri Saibaba Hospital and further permit the applicant to spend the amount required for carrying the above work."

त्यावर दि. २३ मार्च, २०१६ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

"For the reasons stated in the applicant, the application is allowed in terms of prayer clause B and accordingly stands disposed of."

मा.मुंबई उच्च न्यायलयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचा दि. २३ मार्च, २०१६ रोजीचा आदेश व तत्कालीन मा.त्रिसदस्य समितीचे दि. २८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करणेकामी कालावधी लागणार असल्याने व नियोजित Neuro ICU व SICU विभाग तातडीने सुरु करणे गरजेचे आहे. सध्या संस्थानला कुशल-अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत Neuro ICU व SICU विभागासाठी लागणारे कर्मचारी घेतल्यास जाहिरातीद्वारे ई-निविदा मागविणेसाठी लागणारा खर्च तसेच वेळही वाचणार आहे व रुग्णांनाही या सुविधेचा फायदा लवकर देता येईल असा प्रस्ताव तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६ मे, २०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, प्रस्ताव अमान्य करण्यात येऊन दि. २८ डिसेंबर,२०१५ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करणेत यावी असे ठरले.

उपरोक्त नमुद, Neuro ICU व SICU विभागात सर्व बेड्स तथा रुग्णांस आवश्यक असलेल्या सर्व सुविधांची तयारी पूर्ण झालेली आहे मात्र कर्मचारी अभावी सदर विभाग अद्याप चालु करणेत आलेला नाही. याकरीता दि.२८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार ई-निविदा तयार करणेची कार्यवाही चालु आहे. तथापि, मा.न्यायालयाचे आदेशानुसार विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी अगोदर मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. मान्यता मिळालेनंतर जाहिरात प्रसिद्ध करावी लागेल व जाहिरातीनुसार आलेल्या निविदा मा. व्यवस्थापन समिती समोर उघडाव्या लागतील याकामी कमीत कमी तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

त्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी खर्चही होणार आहे. तसेच रुग्णालयात इतर सर्व विभागात एकाच कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येत असल्याने फक्त Neuro ICU व SICU विभागसाठी नवीन कंत्राटदारास टेंडर मिळाल्यास सदर विभागातील कर्मचारी रजेवर अथवा काही कारणास्तव न आल्यास

त्यांचे जागेवर दुसरे कंत्राटदाराचा कर्मचा-यास ड्युटी देता येणार नाही. रुग्णालयात सर्व विभागात एकाच कंत्राटदार असल्यास कर्मचा-यांची इतर विभागात बदली करणे, सदर कर्मचा-यांचे पीएफ नंबर एकच राहतील, असे नम्र मत आहे.

विभागाचा अभिप्राय– दि. ३१/१२/२०१६ रोजी न्युरो आयसीयु व एसआयसीयुचे उद्घाटन मा. सुधीर प्रभु देणगीदार यांचे हस्ते करणेत आलेले आहे. उपरोक्त येणारे अडचणीचा विचार करता सध्या संस्थानला कुशल– अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत न्युरो आयसीयु व एसआयसीयु विभागासाठी लागणारे कर्मचारी घेतल्यास जाहिरातीद्वारे ई-निविदा मागविणेसाठी लागणारा खर्च तसेच वेळही वाचणार आहे व रुग्णांनाही या सुविधेचा फायदा लवकर देता येईल तसेच रुग्णालयासाठी एकाच कंत्राटदार असल्यास प्रशासनाचे नियंत्रणाचे दृष्टीने योग्य होऊ शकेल, असे नम्र मत आहे.

तरी, मा.उच्च न्यायालयातील सिव्हील ॲप्लीकेशनवरील दि.२३/०३/२०१६ रोजीचे आदेश व तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीच्या दि. २८ डिसेंबर, २०१५ रोजीच्या सभेतील निर्णय फेरचर्चा होऊन तातडीची गरज म्हणून नियोजित न्युरो आयसीयु व एसआयसीयुसाठी आवश्यक असलेले (निवासी वैद्यकीय अधिकारी – ८, परीचारीका– ३०, वॉर्डबॉय - ८, आया – ८, स्विपर – ८) मनुष्यबळ आकृतीबंधातील शैक्षणिक पात्रतेनुसार संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने घेणेस मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांच्या मनुष्यबळ अहवालामध्ये अतिरिक्त कर्मचारी दर्शविणेत आलेले आहेत, यामुळे श्री साईबाबा रुग्णालयातील नव्याने सुरु करण्यात आलेल्या न्युरो आयसीयु व एसआयसीयुचे कामकाज रुग्णालयातील आहे त्याच कर्मचाऱ्यांमधून करणेत यावे. फक्त ८ निवासी वैद्यकीय अधिकारी व ३० परीचारीका ही तांत्रिक पदे सध्याचे लेबर कंत्राटदारामार्फत तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी अथवा आकृतीबंधातील मंजूर पदांवर कायम नियुक्त्या होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत भरणेत यावे.**

तसेच स्थानिक विश्वस्तांनी कर्मचारी संख्या व प्रत्यक्ष काम याची पाहणी करावी, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.३७ **संस्थानमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या विविध बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्टचरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनलची स्थापना करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- संस्थानमार्फत साईभक्तांचे सुविधेकरीता विविध बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात येतात. विविध प्रकारचे विकास प्रकल्पांसाठी (उदा.भक्तनिवास, शैक्षणिक इमारती, रुग्णालये, प्रसादालय, थीमपार्क, लॅण्डस्केपींग, इंटेरियर इ.) वेगवेगळे आर्किटेक्ट, कन्सल्टंट यांची आवश्यकता असते. या सर्व प्रकल्पांकरीता अहवाल तयार करणे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करणे याकरीता संस्थानमार्फत यापुर्वी नामांकित आर्किटेक्ट यांचा अनुभव व त्या क्षेत्रातील विशेष प्राविण्य यांचे आधारे नेमणूक करण्यात येत होती.

आता प्रस्तावित करण्यात येत असलेल्या विकास प्रकल्पांकरीता आर्किटेक्ट नेमणुकीसाठी RFP (Request for proposal) मागविणेत येतात. त्यामुळे प्रत्येक प्रकल्पासाठी आर्किटेक्ट नेमणुकीकरीता वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे व इतर कार्यवाहीसाठी अधिक कालावधी लागतो. त्यासाठी संस्थान मार्फत आर्किटेक्ट पॅनल तयार करुन विकास प्रकल्पाचे स्वरुपानुसार त्या-त्या क्षेत्रात काम करणा-या आर्किटेक्ट/कन्सल्टंट यांची नेमणूक केल्यास प्रकल्प तातडीने हाती घेता येईल. संस्थानचे भविष्यातील प्रकल्पांसाठी पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन मा व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सत्वर सादर करता येतील. विशेष स्वरुपाच्या प्रकल्पांचे कामांसाठी स्वतंत्ररित्या नामांकित आर्किटेक्ट यांचेकडून Request for proposal मागवून त्यावेळी होणा-या निर्णयानुसार आर्किटेक्टची नेमणूक करता येईल.

संस्थानमार्फत नियोजित प्रकल्पांसाठी खालील टप्प्यांप्रमाणे आर्किटेक्ट पॅनल तयार करुन घेता येईल. आर्किटेक्ट/ कन्सल्टंट यांचेकडून त्यांनी यापुर्वी केलेल्या कामांचा अनुभव, टर्न ओव्हर इ. बाबत सविस्तर माहीती मागवून प्राप्त प्रस्तांवाची खालीलप्रमाणे वर्गवारी करता येईल.

१) रु.५० लक्ष पर्यंत अपेक्षीत खर्चाचे प्रकल्प.
२) रु.५० लक्ष ते ५ कोटी पर्यंत अपेक्षीत खर्चाचा प्रकल्प.
३) रु.५ कोटी ते ५० कोटी पर्यंत अपेक्षीत खर्चाचा प्रकल्प.
४) रु.५० कोटी पेक्षा जास्त अपेक्षीत खर्चाचा प्रकल्प.

तसेच यामध्ये सिव्हील कामे, इंटेरीअर, लॅण्डस्केपींग या क्षेत्रांसाठी प्रत्येकी स्वतंत्र वर्गवारी करता येईल. तरी संस्थानमार्फत हाती घेण्यात येणा-या विविध बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल नेमणेकरीता RFP (Request for proposal) मागविणेस तसेच याकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.३८ **साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकामासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस व सदरहूकामी ई-निविदा मागविणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय: मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे बाधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्सल्टंट श्री. बाल्टे, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांनी केलेले आहेत. याकरीता या रुग्णालयाच्या दोन्हीही इमारतींवर बांधकाम करणेकामी बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्सल्टंट श्री. बाल्टे, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांचेकडून करून घेण्यात यावे, असे ठरले."

प्रस्तावना : सर्व्हे नं.१४८ पैकी मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतींमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करणेत आलेले आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांची दिवसेंदिवस संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे त्यामुळे मुलभुत सोयी -सुविधा फारच कमी पडत आहेत. याकरीता श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव मजल्याचे बांधकाम करणेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर यांनी तयार केलेल्या आराखड्याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षीका, उपकार्यकारी अभियंता, निकम पाटील असोशिएटस्, श्री. बाल्टे, स्ट्रक्चरल सल्लागार यांचे समवेत चर्चा होऊन आराखड्यात योग्य त्या सुधारणा करण्यात आल्या. तसेच वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षीका यांच्या सुचनांनुसार स्पेशिफीकेशनचा समावेश करुन खालील तपशिलानुसार आराखडा तयार करणेत आला आहे.

(अ) इमारत क्रमांक ०१.

अ.नं.	तपशिल	संख्या	साईज (मिटरमध्ये)	बेडची संख्या
०१.	वॉर्ड	०३	१३.२१X१२.३६	७२
	प्रिप्रेशन रुम	०३	४.३८X५.०३	
	नर्सिंग स्टेशन	०३	४.३०X५.०३	
	स्टोअर्स	०२	४.३८X५.०३	
	कॉन्फरंस हॉल	०१	८.७३X१२.३६	
	वेटींग एरिया	०१	९.३१X४.९०	
०२.	लिफ्ट		१.९५X४.०५	
०३.	१. बाथरुम २. संडास	२० ३७	१.५०X१.२० ०.९०X१.२०	

(ब) इमारत क्रमांक ०२.

अ.नं.	तपशिल	संख्या	साईज (मिटरमध्ये)	बेडची संख्या
०१.	वॉर्ड	०२	१३.२१X१२.३६	४८
	प्रिप्रेशन रुम	०३	४.३०X५.०३	
	नर्सिंग स्टेशन	०३	४.२५X५.०३	
	स्टोअर्स	०१	४.३०X५.०३	
	स्टोअर	०१	२.७४X४.९०	
०२.	आय. सी. सी. यु. वॉर्ड	०१	८.७०X७.१५	१०
	नर्सिंग स्टेशन	०१	३.६७X५.०५	
	डॉक्टर रुम	०१	४.२५X४.९५	
	वेटींग एरिया	०१	९.३१X४.९०	

०३.	लिफ्ट		१.९५X४.०५	
०४.	१. बाथरुम २. संडास	२० ३७	१.५०X१.२० ०.९०X१.२०	

वरीलप्रमाणे एकुण २६९२ चौरस मिटर बांधकाम प्रस्तावित करणेत आले आहे. एकुण वॉर्डसमध्ये १२० बेड, व आय. सी. यु. मध्ये १० बेड इतकी क्षमता आहे.

आर्किटेक्ट यांनी याकामी अंदाजपत्रकात आर. सी. सी. फ्रेम्ड स्ट्रक्चरमध्ये बांधकाम, प्लास्टर, व्हेट्रीफाईड टाईल फ्लोरींग व डॅडो (उंची ७'), ॲल्युमिनिअम खिडक्या, ग्रेनाईट फ्रेमसह ॲल्युमिनिअम शटर, टॉयलेटमध्ये ग्रेनाईट फ्रेमसह पी. व्ही. सी. दरवाजे, जिप्सम प्लास्टर, आय. सी. यु. व कॉन्फरन्स हॉलसाठी फॉल्स सिलींग, जिन्याचे नुतनिकरण, आतिल भिंतीला लस्टर पेन्ट, बाहेरील बाजूने ॲपेक्स / रिनोव्हो पेन्ट इत्यादी बाबींचा समावेश करुन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहेत.

१. इमारत बांधकाम खर्च : रु.४,५४,३५,७६७/-
२. इलेक्ट्रीकल वर्क : रु.४५,४३,५७७/-
३. सोलर सिस्टम स्थलांतरीत करणे. : रु.२,५०,०००/-

वरील प्रमाणे एकुण रु.५,०२,२९,३४४/ इतक्या रकमेचे अंदाजपत्रक आर्किटेक्ट निकम पाटील असोशिएटस, श्रीरामपूर यांनी सादर केले आहे. जा.नं. ३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार अंदाजपत्रकिय रक्कम २०% कमी करुन रु.४,०१,८३,४७५/- इतकी रक्कम येते. तसेच दोन्ही इमारतींना जोडणारा फुटब्रिज, वातानुकुलीत यंत्रणा, लिफ्ट, आर.ओ. सिस्टम, फर्निचर आदी कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक सादर करणेत येत आहेत.

प्रस्ताव: तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्हीही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.३९ **जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१(१) मधील पोट कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

प्रस्तावना:- जुने प्रसादालय परिसरातील साईप्रसाद नं.०१ व साईप्रसाद न.०२ इमारतीचे बाहेरील मोकळ्या भागात कॉक्रीटीकरण करण्यात आलेले आहे. तसेच साईप्रसाद नं.०२ इमारतीचे उत्तर भागातील मोकळ्या जागेत डांबरीकरण करणेत आलेले आहेत. कॉक्रीटीकरणाचे काम होवून ३५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी झालेला असून, सदरचे कॉक्रीटीकरणाचा पृष्ठभाग सततच्या वापरामुळे खराब झालेले असून ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहे.

मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी परिसर पहाणी दरम्यान जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत फ्लोरिंग करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तथापी, सदर परिसरात दर्शनरांग प्रकल्प नियोजीत आहे, त्यामुळे तेथे फ्लोरींग करणे उचित होणार नाही. परंतु सदर परिसरात साईभक्तांचा वावर मोठया प्रमाणात असुन परिसर सुशोभित व स्वच्छतेच्या दृष्टीने पेव्हींग ब्लॉक बसविणे योग्य राहिल असे मत आहे. जुने प्रसादालय परिसरातील इमारती व्यतिरिक्त मोठया प्रमाणात मोकळया जागा आहे. संस्थानची आवश्यक मटेरिअलची वाहतूक वाहनाव्दारे या भागातून केली जात असुन जुने प्रसादालय परिसरातील मध्यवर्ती भांडारगृहामध्ये पुरवठाधारकांकडुन पुरवठा करणेत येणारे मटेरीयलची वाहतुक साईप्रसाद नं.२ चे उत्तरेकडील भागातुन करणेत येते.

जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत तसेच वाहनाचे जाण्या येण्याचे मार्गावर पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी व रोडचे कडेने कर्बस्टोन बसविणे, परिसरातील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी आर.सी.सी. पाईप लाईन टाकणेकामी खर्चाचा प्रस्ताव इकडील दि.२३/०१/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये खालील योग्य त्या पर्यायानुसार कामास व त्यासाठी येणारे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता घेण्यात आली होती.

पर्याय क्रमांक	तपशिल	अपेक्षित खर्च
पर्याय क्र. १	जुने प्रसादालय परिसरात डांबरीकरणाचे व कॉक्रीटीकरणाचे भागात ६० एमएम व ८० एमएम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर दुरुस्तीची कामे करणे.	रू.७०,०१,५१५/-

पर्याय क्र. २	जुने प्रसादालय परिसरात डांबरीकरणाचे भागात डांबरीकरणाचा एक थर देणे व कॉक्रीटी करणाचे भागात ६० एमएम व ८० एमएम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे.	रु. ४५,१६,३१६/-

दि.२५/०१/२०१७ रोजी मा.अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचे समवेत मुंबई येथे संस्थानचे नियोजित बांधकाम प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात येऊन, माहिती सादर करण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेदरम्यान जुने प्रसादालय परिसरात बसविण्याचे पेव्हींग ब्लॉक हे संपूर्ण ८० एम एम जाडीचे व आकर्षक डीझाईनमध्ये बसविणेत यावेत. त्यामुळे पेव्हींग ब्लॉक एकाच लेव्हलमध्ये तसेच वाहनांचे वर्दळसाठी टिकाऊ राहतील असे निर्देश मा. अध्यक्ष महोदय यांनी दिले आहेत.

त्यानुसार जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत ८० एम एम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर दुरुस्तीची कामे करणेकामी खालील खर्च अपेक्षित आहे.

अ.न.	कामाचा तपशिल	परिमाण	एकक	दर	रक्कम
१	जुने प्रसादालय परिसरातील डांबरीकरणाचा थर काढणे.	४३७८.६५	चौ.मी.	१०/-	४३,७८६.५०
२	जुने प्रसादालय परिसरात मोकळया जोगत ८० एमएम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे.	९३६६.७०	चौ. मी.	७५०/-	७०,२५,०२५/-
३	परिसरातील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकणे.	२४०	रनिंग मी.	८१६/-	१,९५,८४०/-
४	स्टॉर्म वॉटर लाईन ६०X४५ साईजचे चेंबर बांधकाम करणे.	१६	नग	२८६०/-	४५,७६०/-
५	सध्याचे ड्रेनेज लाईनवरील चेंबरचे फ्रेमसह कव्हर टाकणे. (साईज- .८५ मी. व्यास)	१५	नग	१५००/-	२२,५००/-
६	सध्याचे ड्रेनेज लाईनवरील चेंबरचे फ्रेमसह कव्हर टाकणे. (साईज-२'X३')	१४	नग	२६००/-	३६,४००/-
				एकुण अपेक्षित खर्च-	**७३,६९,३११.५०**
				पुर्णांकित रक्कम रु.	**७३,६९,३१२/-**

उपरोक्तप्रमाणे जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत ८० एमएम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे व परिसरातील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी व्यवस्था करणे याकामी अहमदनगर जिल्हा दरसुची २०१६-१७ नुसार तसेच अ.नं. ५ व ६ चे काम मार्केट दरानुसार अंदाजे रक्कम रू.७३,६९,३१२/- मात्र खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार याकामी २०% कपात करुन रु.५८,९५,४५०/- मात्र इतकी रक्कम येते.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे रक्कम रु.५८,९५,४५०/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू निविदा प्रसिध्द करतेवेळी अंदाजपत्रकीय रक्कम रु.५०,००,०००/- मात्र दाखविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.४० **संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा शताब्दी उत्सव-२०१८ मध्ये मध्ये साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभ होण्यासाठी मोठया साईजचे LED Wall Screen मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात कार्यान्वित करणे आवश्यक आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष महोदय व मा. व्यवस्थापन समिती सदस्य यांनीही निर्देश दिलेले आहेत.

अ) **LED Wall Screen खरेदी करणे-**

मंदिर परिसरात तसेच संस्थानचे विविध परिसरात श्री साईभक्तांना श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen कार्यान्वित करणे आवश्यक आहे. सदर LED Wall Screen मध्ये अनेक वेगवेगळे Pixels (P1 ते P10, P-Pixels, 1-10 दिसण्याचे फुटावरील अंतर) प्रकार आहेत. तसेच Indoor व Outdoor अशा प्रकारचे युनिट आहेत. खालील तपशीलातील विविध ठिकाणी कार्यान्वित करावयाचे Wall Screen हे बाहेरील असल्यामुळे सदर युनिट हे Outdoor प्रकारचे आवश्यक आहेत. त्यास अनुसरुन, काही पुरवठाधारकांनी ई-मेल द्वारे प्रति स्केअर फुटास सरासरी रक्कम रु. १३,०००/- मात्र असे कळविलेला आहे.

Sr. No.	Location	Screen	Size In Ft.	Type	Sq Ft.	Rate
1	Chawadi	1	8 X 10	P6	80	1040000
2	Program Area Mandir Premises	1	10 X 20	P6	200	2600000
3	Museum Wall	1	10 X 14	P6	140	1820000
4	Saibaba Bhaktniwas (500Rooms)	1	10 X 20	P6	200	2600000
5	Dwarawati Bhaktniwas	1	10 X 20	P6	200	2600000
6	Sai Dharmshala	1	10 X 20	P6	200	2600000
7	Prasadalya	1	10 X 20	P6	200	2600000
8	16 Gunthe	1	10 X 20	P6	200	2600000
9	Old Prasadalya	1	10 X 20	P6	200	2600000
10	Saiashram 1	1	10 X 20	P6	200	2600000
	Total-	10				23660000

काही पुरवठाधारकांचे ई-मेलनुसार LED Wall Screen चे दर प्राप्त झालेले आहे. उपरोक्त तपशीलातील एकत्रित रक्कमेवरील २०% रक्कम वजा करता अंदाजे रक्कम रु. १,८९,२८,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणनव्व्द लाख आठ्ठावीस हजार मात्र) + Taxes इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सदर LED Wall Screen कार्यान्वित करुन देणेकामी आवश्यकतेप्रमाणे बांधकाम विभाग, विद्युत विभाग व मेकॅनिकल विभागास येणा-या अनुषंगीक खर्चाचे मान्यतेस्तव व सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

ब) कमर्शिअल जाहिरात व श्रीं चे लाईव्ह आरती व माहिती प्रक्षेपणासाठी LED Wall Screen बसविणे-

श्रीं चे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांकरीता श्रीं चे लाईव्ह दर्शन तसेच टी.व्ही. चॅनेलवर टाटास्कायद्वारे लाईव्ह दर्शन प्रक्षेपण करण्यात येते. टाटास्काय लाईव्ह दर्शनासाठी टाटास्काय चॅनेल हे संस्थानला वर्षाकाठी सव्वा ते दिड कोटी रुपये मोबदला देत आहे.

सदर लाईव्ह दर्शनामध्ये टाटास्काय कंपनी त्यांची टाटास्काय या नावाची जाहिरात प्रसिद्ध करीत असते. त्याप्रमाणे काही एलईडी स्क्रिनधारकांनी मंदिर परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन व्यतिरीक्त कमर्शिअल जाहिरात प्रक्षेपण करणेकामी LED Wall Screen बसविणेबाबत प्रस्ताव सादर केलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

०१) शिवसाई मिडिया, शिर्डी:- सदर कंपनीची १५० sq.ft. व्हीडीओ स्क्रीनही १६ गुंठे जवळील साईकॉम्प्लेक्स येथे लावण्यात आलेली आहे. सदर कंपनीने श्रीं च्या आरती व माहिती प्रेक्षेपण करण्यात येईल असे पत्रात नमुद केलेले आहे. परंतु सदर स्क्रीनवर ते संस्थानची माहिती व आरती कितीवेळा प्रक्षेपण करणार याबाबत पत्रात नमुद केलेले नाही. सदर कंपनी सध्या स्क्रीनवर कमर्शिअल जाहिरात करत आहे. परंतु सदर कंपनीने LED Wall Screen वर संस्थानची माहिती व आरती प्रक्षेपणाकरीता संस्थानला मोबादला देणेबाबत पत्रात उल्लेख केलेला नाही.

०२) सुर्या एंटरप्राईजेस, नाशिक:- या कंपनीव्दारे लेंडीगार्डनच्या भिंती लगत व गेट नं.०३ विखेपाटील संकुला समोरील जागेत (१६ गुंठे) अशा दोन्ही ठिकाणी युनिकपोलवर साईज १०' X २०' फुटी एल.ई.डी. स्क्रीन लावण्यास परवानगी मागितली आहे. सदर स्क्रिनवर ३० टक्के जागेत श्री साईबाबांची तीन वेळची आरती विना शुल्क दाखविणे, समाज उपयोगी माध्यम प्रसारीत करणे व उर्वरीत ७० टक्के जागेत कमर्शिअल जाहिरात दाखविणेचे नमुद केलेले आहे. सदर प्रस्तावात संस्थानकडे २' X २' फुटाची जागेची मागणी आहे. तसेच कंपनी लाईट, येणा-या युनिटचा खर्च ते स्वतः करणार आहे. सदरचा प्रस्ताव कंपनीने २० वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर राहील व २० वर्षानंतर सदर एलईडी स्क्रीन व युनिक पोल हे संस्थानला देणार असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु, LED Wall Screen हे २० वर्षानंतर कालबाहय झालेले असेल त्यावेळेस सदर युनिट संस्थानचे ताब्यात मिळणार आहे. तसेच सदर कालावधीत संस्थानला कोणताही मोबादला देणेबाबतचा उल्लेख केलेला नाही.

०३) मे. ईझी ॲण्ड कम्फर्ट चेअर्स प्रा.लि., मुंबई:- सदर कंपनी कडुन दोन प्रस्ताव देण्यात आलेले आहेत. यामध्ये सदर कंपनीने ०३ नग १०' X १२' फुट साईजचे व ३ नग ८' X १०' फुट असे एकुण ०६ नग LED Wall Screen बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

A) दि.२३/०१/२०१७ रोजीचे पत्रात ०६ नग LED Wall Screen हया ५ ते ७ वर्षाकरीता देणार असुन यामध्ये प्रत्येक तासामध्ये ५ मिनीटांकरीता कमर्शिअल जाहिरात दाखविणार आहे. तसेच सदर LED Wall Screen चे दुरुस्ती व देखभालीचा खर्च कंपनी स्वतः करणार असुन सदर पत्रात कंपनीडुन संस्थानला कोणताही मोबादला देणेचा उल्लेख केलेला नाही.

B) सदर कंपनीने दि.२३/०१/२०१७ रोजीचे दुस-या प्रस्तावात वरील सर्व बाबीं व्यतिरीक्त संस्थानला काही रक्कम देणगी देणेबाबतचा नमुद केलेले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

* पहिल्या वर्षाकरीता रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख मात्र) प्रती महिना देणगी.

* दुस-या वर्षाकरीता रु.१,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) प्रती महिना देणगी.

* तिस-या वर्षाकरीता रु.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख मात्र) प्रती महिना देणगी.

तसेच याप्रमाणे यापुढील वर्षांकरीता अशाच प्रकारची देणगी रक्कमेत वाढ करुन ५ ते ७ वर्षा करीता करार करणार असल्याचे सदर प्रस्तावात नमुद केलेले आहे. परंतु सदरचा मोबादला हा एका स्क्रीनकरीता की ०६ स्क्रीनकरीता असेल याबाबत उल्लेख केलेला नाही.

सबब, सदर LED Wall Screen बसविणेकामी अ.नं.१ व २ या कंपन्यांनी उपरोक्तप्रमाणे दिलेल्या प्रस्तावात संस्थानला मोबादला देणेबाबत उल्लेख केलेला नसुन श्रीं चे लाईव्ह आरती, दर्शन व्यतिरीक्त कमर्शियल जाहिराती सदर LED Wall Screen वर दाखविणार आहे. यामुळे सदर कंपनी हे कमर्शियल व्यवसाय करणार आहे.

तसेच अ.नं.०३ यांनी दोन प्रस्ताव पाठविलेले असुन त्यांचे दुस-या प्रस्तावामध्ये मोबादला देणार असल्याचे नमुद केलेले आहे व प्रत्येक ०१ तासामध्ये ०५ मिनिटे कमर्शिअल जाहिरात दाखविणार आहे.

तरी, सदर LED Wall Screen बाबत उपरोक्त अ.नं. १ ते ३ चे प्रस्तावाबाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर.

मागणी- उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे LED Wall Screen बाबत उपरोक्त प्रस्तावातील **" अ " अगर " ब"** चे निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान - तांत्रिक व आर्थिक.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे LED Wall Screen बाबत उपरोक्त प्रस्तावातील **"अ" अगर "ब"** चे निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी साईभक्तांना श्रींचे लाईव्ह दर्शनाचा सुलभतेने लाभ होणेकरीता प्रस्तावातील अ मध्ये नमुद केलेप्रमाणे नवीन LED Wall Screen विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच प्रस्तावातील १० ठिकाणांव्यतिरिक्त शिर्डी बसस्थानक, साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर अशा ०३ ठिकाणीही सदरहू LED Wall Screen बसविणेत याव्यात, असे ठरले.

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

विषय नं.४१ **LED TV खरेदी करणेबाबत व जुने/ खराब झालेले TV/ LCD TV Buyback/ Scrap करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६ - १७(१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- निरंक

प्रास्ताविक- श्री साईभक्तांना मंदिर परिसरात, दर्शनरांगेत तसेच संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता २४", ३२", ४२", ५५" TV बसविण्यात आलेले आहे. सदरचे टिव्ही हे LCD, PLAZMA, CRT TV अशाप्रकारचे असुन अशा टिव्हींचा MAINTENANCE वेळोवेळी करण्यात आलेला आहे. परंतु यामध्ये बरेचसे TV कालबाहय, खराब व निकामी झालेले आहेत.

सध्या संस्थानमध्ये CRT TV-32 नग व LED/LCD/PLAZMA-194 नग असे एकुण २२६ नग TV आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

तपशील	एकुण	कार्यान्वित	दुरुस्त करुन बसविलेले	नादुरुस्त
CRT TV	32	06	03	23
PLAZMA	02	--	--	02
LCD	187	135	**15**	**37**
LED	05	05	--	--

सध्या असलेल्या २२६ नग TV पैकी ६२ नग TV निकामी झालेले आहेत व १८ नग TV दुरुस्त करुन वापरण्यात येत आहेत. तसेच बरेचसे TV सततच्या वापरामुळे वारंवार बंद पडत आहे. सध्या एकुण १६४ नग TV कार्यान्वित असुन त्याचा वापर १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

सध्या बाजारात चांगल्या प्रकारचे LED TV उपलब्ध आहेत. संस्थानचे विविध ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे वेगवेगळया साईजचे ३२", ४३", ५०", ६०" ७५", ८६", ९५" LED TV लावणे आवश्यक आहे. सोबतचे परिशिष्ट **"अ"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण २३३ नग LED TV खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे –

S. No	Perticular	Qty	LG	Sony	Samsung	Average Rate	Total Rate	20% Less Rates
			Rate Per unit					
1	LED TV – 32”	105	23,000	27,900	27,500	26,133	27,44,000	21,95,200
2	LED TV – 43”	46	64,000	65,600	67,977	65,859	30,29,514	24,23,611
3	LED TV – 50”	10	--	75,000	75,499	50,166	5,01,663	4,01,331
4	LED TV – 60”	41	1,78,399	-	1,99,900	1,26,100	51,70,086	41,36,069
5	LED TV – 75”	14	4,08,399	-	-	1,36,133	19,05,862	15,24,690
6	LED TV – 86”	15	7,42,899	-	-	2,47,633	37,14,495	29,71,596
7	LED TV – 95”	2	7,90,000			2,63,333	5,26,667	4,21,333
	Total:	**233**						**1,40,73,830**

अ) उपरोक्त तपशीलात नमुद केल्याप्रमाणे इंटरनेट व बाजारातुन घेतलेल्या माहितीनुसार एकुण २३३ नग LED TV खरेदीकरीता येणारे अंदाजे रक्कम रु.१,४०,७३,८३०/- + All TAXES मात्र खर्च अपेक्षित आहे.

तसेच सदर LED TV कार्यान्वित करुन देणेकामी बांधकाम विभाग, विद्युत विभाग व मेकॅनिकल विभागास येणा-या अनुषंगीक खर्चास व सदर LED TV खरेदी करणेकामी मान्यता असावी.

ब) तसेच जुने व खराब झालेले CRT TV व LED/LCD/PLAZMA अशा प्रकारचे TV Buyback करण्यास किंवा Buyback न झाल्यास Scrap करुन लिलावाद्वारे विकण्यास मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे **“अ”** व **“ब”** मध्ये नमुद केल्याप्रमाणे मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

मागणी- उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे **“अ”** व **“ब”** प्रमाणे मान्यता मिळणेस्तव व सदर LED TV खरेदी करणेकामी ई-निवीदा मागविणेस, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान- तांत्रिक व आर्थिक.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे **“अ”** व **“ब”** प्रमाणे मान्यता मिळणेस्तव व सदर LED TV खरेदी करणेकामी ई-निवीदा मागविणेकरीता, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांना मंदिर परिसरात, दर्शनरांगेत तसेच संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे LED TV विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच, जुने खराब झालेले CRT TV व LED/ LCD/ PLAZMA टी.व्हीं. बायबँक करणेत यावेत. बायबॅक होत नसतील तर त्यांची स्क्रॅप म्हणून विहीत पध्दतीने लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

विषय नं.४२ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जमीन कायम स्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीनी खरेदी व किमतीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

प्रस्ताव– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना जमीन कायमस्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीनी खरेदी व किंमतीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे..

प्रस्तावना– यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जमीन कायमस्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या अर्जांबाबत दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं.३० मा.विश्वस्तांच्या सूचनाबाबत निर्णय क्रं.६८७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांसाठी सोयी-सुविधा करणेसाठी जमीनीची आवश्यकता असून जे लोक संस्थानला जमीन विकत देणेस तयार असतील त्यांची यादी बनविणेत यावी व महसूल खात्याच्या अधिका-यांसह सदरहू जमीन मालकांना अंतिम चर्चेसाठी स्थानिक उपसमिती सभेमध्ये निमंत्रित करणेत यावे.”

तद्नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांसह श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना जमीन कायमस्वरुपी खरेदी देणेकामी सोबत जोडलेल्या प्रपत्र **अ** व **ब** च्या यादीतील जमीन मालकांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या जमीनी खरेदी देणेबाबतचे प्रस्ताव अनुक्रमे ९ व २९ इकडेस सादर केलेले आहेत.

सोबतच्या प्रपत्र **अ** मधील जमीनी संस्थानसाठी पार्कींग,मनोरंजन पार्क,शैक्षणिक हेतू इ.कारणासाठी आरक्षित आहेत. सदर जमीनींची, जमीन मालक यांची किंमतीबाबतची अपेक्षा व शासकीय मुल्यांकन दरपत्रकाप्रमाणेचे दर व सदर प्रकरणांची सध्यस्थितीबाबतची माहीती प्रस्तुत प्रपत्र **अ** मध्ये नमूद केलेली आहे.

तसेच आरक्षणाव्यतिरिक्त इतर जमीन खरेदी देणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबतची माहीती प्रपत्र **ब** मध्ये नमूद केलेली असून त्यातील काही जमीनी शिर्डी येथील तर काही जमीनी कनकुरी,को-हाळे,रुई,निमगाव-को-हाळे इ.गावातील आहेत. प्रस्तुत जमीनींच्या दराबाबतची जमीन मालक यांची अपेक्षा व शासकीय मुल्य दर पत्रकाप्रमाणेचे दर इ.बाबतची माहीती सदर प्रपत्रात नमूद केलेली आहे.

तसेच जमीन देणगी देणेकामी प्राप्त झालेल्या एक प्रस्तावाची माहीती प्रपत्र **क** मध्ये सादर केलेली आहे. प्रपत्र क मधील जमीन देणगी स्वरुपात देणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करता अर्जदार यांनी उक्त जमीनीच्या दि.१८/०१/२०११ रोजीच्या फक्त ७/१२ उता-याची छायांकित प्रत सादर केलेली होती. इतर कोणतेही कागदपत्रे अथवा लोकेशन प्लॅन अर्जासोबत सादर केलेले नसल्याने मालमत्ता विभागाचे प्र.अधिक्षक श्री.बर्गे,कं.सल्लागार श्री.वालझाडे, कं.मोजणीदार श्री.जाधव यांनी दि.२१/१०/२०१६ रोजी मढी बु.,ता.कोपरगाव येथे तलाठी कार्यालयात समक्ष जावून उक्त जमीनीचा व अर्जदाराच्या नावावर इतर असलेल्या जमीनीचे ७/१२ उतारे प्राप्त करुन घेवून अर्जातील प्रस्तावित क्षेत्राचे प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण केलेले आहे. त्या स्थळनिरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) उक्त जमीन गट नं.१५६ चा ७/१२ उतारा अवलोकन करता त्याचे एकूण क्षेत्र २ हे.३५ आर व पोटखराबा ०.५६ आर इतके असून त्यापैकी अर्जदार श्री.दिपक नारायणराव फाळके व त्यांची पत्नी सौ.जया दिपक फाळके यांचे हिश्श्यात क्षेत्र १.१७.५ व खराबा ०.२८ आर असे दर्शविलेले असून उर्वरित क्षेत्र १.१७.५ आर व खराबा ०.२८ आर हे श्री.शिवाजी,मच्छिंद्र व विश्वंभर नाना गवळी यांचे समाईकात दर्शविलेले आहे. म्हणजेच अर्जात नमूद केलेले क्षेत्र हे अर्जदार श्री.दिपक नारायणराव फाळके व त्यांची पत्नी सौ.जया दिपक फाळके यांचे समाईकात आहे. मात्र अर्जदार यांनी फक्त त्यांच्याच स्वाक्षरीने उक्त जमीनीपैकी ०.४० आर क्षेत्र संस्थानला अर्पित करणेचे नमूद केलेले आहे. सदर अर्जावर समाईक खातेदार अर्जदार यांची पत्नी सौ.जया दिपक फाळके यांची संमतीदर्शक स्वाक्षरी दिसून येत नाही.तसेच

२) संस्थानला अर्पित करावयाचे प्रस्तावित क्षेत्र हे शिर्डीपासून सुमारे २१ किमी अंतरावर असून सदर क्षेत्र मढी खु. च्या गावठाणाचे पश्चिमेस सुमारे १ किमी अंतरावर असून नाशिक-शिर्डी हायवेच्या उत्तरेस सुमारे २ किमी अंतरावर आतमध्ये अडचणीत कच्च्या रस्त्यालगत आहे. आज मितीस सदर क्षेत्रात संपूर्णत: विलायत बाभळींचे काटवन आहे आणि

३) अर्जदार व त्यांच्या पत्नी यांचे नावावर समाईक असलेल्या एकूण १.१७.५ या क्षेत्रापैकी अर्जदार यांनी फक्त ०.४० आर क्षेत्र अर्पित करण्याचे नमूद केलेले आहे. ते अत्यल्प असून त्यालगत संस्थानचे इतर कुठलेही क्षेत्र नाही. संस्थानने सदरचे क्षेत्र स्विकारल्यास त्यात एखादा प्रकल्प उभारता येईल व सदर क्षेत्राचा संस्थानला भविष्यात उपयोग होईल,असे वाटत नाही. शिवाय सदर क्षेत्राचे संरक्षण करणे व देखभाल करणे संस्थानला भविष्यात परवडणार नाही.

विभागाचा अभिप्राय– १) सध्यस्थितीत शिर्डी परिसरातील जमीनीचे दर शासकीय मुल्यांकन पत्रकातील दरापेक्षा कमी झालेले असलेने उपरोक्त प्रपत्र अ व ब मधील जमीनी संस्थानला कायम खरेदी करावयाच्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीन खरेदी व किंमतीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे उचित होईल.

२) तसेच प्रपत्र क मधील ०.४० आर हे क्षेत्र अत्यल्प असून संस्थानसाठी सदर क्षेत्र देणगी स्वरुपात स्विकारल्यास संस्थानला भविष्यात उपयुक्त ठरेल असे वाटत नाही. शिवाय सदर क्षेत्राचे संरक्षण व देखभाल करणे संस्थानला परवडणार नाही.

तरी उपरोक्त प्रपत्र **अ** व **ब** मधील जमीनी खरेदी व किंमतीबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामीच्या निर्णयार्थ व प्रपत्र **क** मधील क्षेत्र स्विकारणे अथवा नाकारणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शेती महामंडळाची जमीन संस्थानसाठी मिळणार आहे याचा विचार करता, या व्यतिरिक्त प्रस्तावित जमीनींचा वापर कशासाठी होऊ शकतो, संस्थान मिळकतीशेजारी यापैकी कोणत्या जमिनी आहेत, रेडीरेकनरच्या दरांपेक्षा कमी दराने मिळणार आहे का याप्रमाणे प्राधान्यक्रम करणेत येऊन, प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

विषय नं.४३ **सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल कार्यालयातील व्हिडीओ रेकॉर्डींग रुमला ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– श्री साई शताब्दी वर्ष २०१७ -२०१८ निमित्त आयोजित जागतिक साईमंदिर परिषदेसाठी जास्ती जास्त संस्थांचा दि.११/१२/२०१६ रोजीचे चर्चासत्रास प्रतिसाद मिळावा याकरीता मा. अध्यक्ष महोदय यांनी दि.०२/१२/२०१६ रोजी लाईव्ह प्रक्षेपणाव्दारे जगातील विविध साईमंदिर संस्थांना आवाहन करण्यात आले होते. सदचे लाईव्ह प्रक्षेपण हे सीसीटीव्ही कक्षाकडील मध्यवर्ती रुममध्ये करण्यात आलेले आहे. सदरची रुम आवाज विरहीत करुन घेणेकामी मा. अध्यक्ष सो., यांनी निर्देश दिले असल्यांचे सीसीटीव्ही कंट्रोल सेल यांनी दि.२०/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्ताव– संस्थानमार्फत जिल्हा परिषद शाळेत ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करणेकामी सल्लागार श्री. विजय पुरंदरे, यांचेकडून सेवा घेणेत आली होती. सीसीटीव्ही कंट्रोल सेल कक्षाकडील मध्यवर्ती रुम (Video Recording Room) size 5mx3m ॲकॉस्टीक करणेकामी त्यांनी प्राथमिक अंदाजपत्रक दिले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No	Description	Qty	Unit	Rate	Amount
01	Ceiling using Ecophon Advantage T grid tiles with 50mm synthetic wool above	15	SQM	2000/-	30,000/-
02	Wall paneling using Ecophon 20mm fabric wrapped paneling	50	SQM	3200/-	1,60,000/-
03	Acoustical door 36 dB STC	01	Nos	60,000/-	60,000/-
				Total Amount	**2,50,000/-**

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरहुकामी रु.२,५०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी श्री. विजय पुरंदरे यांचेकडून विस्तृत नकाशा व अंदाजपत्रक तयार करुन घेणेस व येणा-या खर्चास तसेच सदरचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल कार्यालयातील व्हिडीओ रेकॉर्डींग रुमला ॲकॉस्टीक ट्रिटमेंट करणेसाठी श्री. विजय पुरंदरे यांचेकडून विस्तृत नकाशा/ अंदाजपत्रक तयार करुन घेणेत येऊन, याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.४४ **मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा सस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी ॲडव्होकेटच्या मुलाखती घेणेकामी उपसमितीची नेमणूक करणे.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०८/२०१६, रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२१ अन्वये असे ठरले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, येथे, श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती होणेसाठी फारच कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत, त्यामुळे, सदरहूकामी जास्तीत जास्त व्यापक प्रमाणात फेर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन अर्जाची मागणी करणेत यावी, असे ठरले आहे.

प्रास्तविक– मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे ॲडव्होकेटची मुलाखत घेवून संस्थानचे औरंगाबाद येथील पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव, मा. व्यवस्थापन समितीचे, दि.१६/०८/२०१६, रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता, त्यावर, उपरोक्त प्रमाणे निर्णय झालेला आहे, प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टातील संस्थानचे कामकाज करणेकामी ॲडव्होकेटची / कायदा सल्लागाराची नेमणूक करणे कामी दि. ०७/१०/१६ रोजीच्या दै. सामाना, औरंगाबाद व दै. सार्वमत, अहमदनगर वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती, त्याप्रमाणे २६ ॲडव्होकेटचे अर्ज प्राप्त झाले आहे, तसेच वृत्तपत्रात जाहिरात देणे पुर्वी व जाहिरातीत दिलेला कालावधी संपल्यानंतर ९ ॲडव्होकेटचे अर्ज प्राप्त झाले आहे, त्याची माहिती सोबतचे **"परिशिष्ट अ"** मध्ये नमुद केलेली आहे. एकुण ३५ अर्ज केलेल्या ॲडव्होकेटची मुलाखत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे घेणेकामी, तारीख व वेळ इ. ठरविणेकामी दि. १०/११/२०१६ रोजी टिपणी सादर केली होती, सदरचे टिपणीवर दि. १२/०२/२०१७ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी, विश्वस्तांच्या समितीची नियुक्ती करुन मुलाखती घेण्यात याव्यात अशा सुचना दिल्या आहेत, त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी, साहेब यांनी दि. १४/०२/२०१७ रोजी मा. व्यवस्थापन समितीचा विषय सादर करणेबाबत सुचीत केले आहे.

मागणी– मा. अध्यक्ष, साहेब यांचे निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टातील संस्थानचे कामकाज करणेकामी ॲडव्होकेटची/ कायदा सल्लागाराची नेमणूक करणे कामी अर्ज केलेल्या ॲडव्होकेटची मुलाखत घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, विश्वस्तांच्या समितीची नेमणूक करता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार अनुमान- निरंक

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– मा. अध्यक्ष, साहेब यांचे निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टातील संस्थानचे कामकाज करणेकामी ॲडव्होकेटची/ कायदा सल्लागाराची नेमणूक करणे कामी अर्ज केलेल्या ॲडव्होकेटची मुलाखत घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, विश्वस्तांच्या समितीची नेमणूक करुन त्यांचे मार्फत ॲडव्होकेटच्या मुलाखती घेता येईल.

निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा सस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी ॲडव्होकेटच्या मुलाखती घेणेसाठी समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ ॲड॰ मोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.सचिन तांबे यांची विधी उपसमिती गठीत करणेत आली. या उपसमितीने उपरोक्तकामी प्राप्त अर्जदारांच्या अर्जांची छाननी करुन, लेखी/तोंडी परिक्षा घ्यावी व त्यानुसार उमेदवारांची निवड करुन अंतीम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.४५ **सन २०१७ मधील उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेसाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना: उन्हाळा सुट्टीच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते, त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर श्री साईप्रसादालय परिसर, भक्तनिवास (५०० रुम) परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

सन २०१७ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाची मंडप व्यवस्था.

१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. (कालावधी- दि.०१/०३/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ अखेर १०७ दिवस)

अ.नं.	मंडपाचे ठिकाण	मंडप साईज	चौ. फुट
१	समाधी मंदिर दक्षिण बाजू मुख्यगेट ते द्वारकामाई १८' उंचीचा	१५२'X१८' १५'X८' १५०'X८'-९''	२७३६.०० १२०.०० १३१२.५०
२	गुरुस्थान मंदिर पश्चिम बाजू(दक्षिण उत्तर) १८' उंच	३७'-४''X४५'-५''	१६९५.५३
३	श्रींचे चावडी समोर १८' उंच	५०'X ३०'	१५००.००
४	दर्शनद्वार ते शनिमंदिर गेट	१०६'X२०'	२१२०.००
५	शनी, महादेव व गणेश मंदिर समोर १४' उंच	६१'X३९'-६''	२४०९.५०
६	समाधी मंदिर उत्तर बाजू ते कॅलेंडर विक्री स्टॉलपर्यंत म्युझियम हॉल समोर - १४' उंच	१००'X१०'	१०००.००
७	मारुती मंदिर ते श्यामसुंदर हॉल पर्यंत १४' उंचीचा	३९'-९'' X२१' ५७' X२७'-५''	८३४.७५ १५६२.९४
८	गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर.	५४' X१९'	१०२६.००
९	गेट नं.३ समोर	४५'X२०'	९००.००
१०	गेट नं.४ चे बाहेरील बाजूने	६०'X२५'	१५००.००
११	मंदिर परिसरामध्ये उदी काऊंटर समोर	४५' X२०'	९००
१२	जुने प्रसादालय प्रवेशद्वार (नगर मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर्स पर्यंत.)	४५'-६''X३०'-६''	१३८७.७५
१३	दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर	२०'X१५'	३००
१४	दर्शन रांग प्रवेशद्वार व पुर्व बाजूस दक्षिण उत्तर. १४' उंच	७७' X२९'	२२३३
१५	दर्शन रांग प्रवेशद्वार पश्चिम बाजूस दक्षिण उत्तर. १४' उंच	४५'X१५'	६७५
१६	श्री साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर बुकस्टॉल समोर.	६०'X१५'	९००
१७	श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालयासमोर	६०'X१५' ३२'X८'	९०० २५६

१८	जनसंपर्क कार्यालया समोर	४०' X१५'	६००
१९	दिक्षितवाडा प्रथमोपचार केंद्रासमोर	३०'X१२'	३६०
२०	श्री दत्त मंदिर समोर	१०१' X३०'-३''	३०५५.२५
२१	५०० रुम कॅन्टीन समोर तिकीट रिलींग	४५'X१२' ४०' X१२' ३०'X१२'	५४० ४८० ३६०
२२	श्री साई प्रसादालय येथे श्री साईबाबांचे शिल्पासमोर.	९०'X२०'	१८००
२३	श्री साई प्रसादालय गेटपासून बुकींग काऊंटर पर्यंत.	१५०'X२०'	३०००
२४	पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजूस फुटपाथवर	३९४'X७'	२७५८
२५	नगर – मनमाड रस्ता पुर्व बाजूकडील फुटपाथावर	३९८'X८'	३१८४
२६	पिंपळवाडी रोडवर साईकॉम्प्लेक्स समोर	२८६'X१८'-६''	५२९१
	एकूण चौ. फुट		**४७,६९७.२२**
	अंदाजे रु.०.२५ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अपेक्षित खर्च -		**१२,७५,९०१.००**

२) **एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप उभारणे.**
(कालावधी दि.०१/०३/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ अखेर १०७ दिवस)

अ.नं.	मंडपाचे ठिकाण	मंडप साईज	चौ. फुट
१.	समाधि मंदिर उत्तर बाजू चावडीगेट ते नगरद्वार गेटपर्यंत १८' उंचीचा.	२८५'X१८'-६''	५२७२
२.	सभाकुंड येथे १८' उंचीचा.	६१'X६१'	३७२१
		एकूण चौरस फुट	**८९९३**
	अंदाजे रु.०.३५ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -		**३,३६,७८८/-**

३) **शामियाना मंडप कनात व बिछायतीसह उभारणे.**
(कालावधी दि.०१/०३/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ अखेर १०७ दिवस)

अ.नं.	मंडपाचे ठिकाण	मंडप साईज	चौ. फुट
१.	जुने प्रसादालय परिसरातील तिकीट रेलींग समोर	१२०'X४४'	५२८०
२.	सुलभ शौचालयासमोर.	७५'X४३'	३२२०
		एकूण चौरस फुट	**८५००**
	अंदाजे रु. ०.१५ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -		**१,३६,४२५/-**
	उन्हाळयाचे कालावधीत करावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारा अपेक्षीत अंदाजे खर्च- (ब-१+२+३)		**रु.१७,४९,११४.००**

प्रस्ताव:- उपरोक्तप्रमाणे सन– २०१७ मधील उन्हाळयाच्या कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेसाठी मार्केट दरानुसार एकूण रक्कम रु.१७,४९,११४/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. जा.नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार याकामी २०% कपात करुन रु.१३,९९,२९१/- मात्र इतकी रक्कम येते. करीता ॲटम रेट पध्दतीने ई – निविदा मागविता येतील.

तरी वरील प्रमाणे मंडप व्यवस्था करुन घेणेकामी येणारे एकूण अंदाजे रक्कम रु.१३,९९,२९१/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेस तसेच याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई – निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७ मधील उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व्यवस्था करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.४६ **श्री साईआश्रम भक्तनिवास इमारतीतील काही रुमचे बाथरुम/ टॉयलेटला बसविणेकामी फ्लश डोअर्स व हार्डवेअर मटेरीअल खरेदी करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- साई आश्रम भक्तनिवास येथे एकूण– १२ इमारती असून प्रत्येक इमारतीमध्ये १२८ खोल्या आहे. अशा एकूण १५३६ रुम्स आहे. प्रत्येक खोल्यांमध्ये स्वतंत्र टॉयलेट व बाथरुमची व्यवस्था करण्यात आली असून दैनंदिन वापरामुळे काही रुमचे टॉयलेट/ बाथरुमचे दरवाजे खराब झालेले आहेत. साई

आश्रम विभागाचे दि.२१/१२/२०१६ रोजीचे पत्रानुसार टॉयलेट बाथरुमचे एकूण १२३ दरवाजे खराब झाले आहेत.

प्रस्तावः- उपरोक्त विषयांकीत कामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

अ.नं.	मटेरियल तपशिल	परिमाण / एकक	दर	रक्कम
०१	वॉटरप्रुफ फ्लश डोअर (जाडी – ३० mm) (पाईनवूड) साईज – २८''X८०'' (कं.- अॅंकर, सेंच्युरी, ग्रीन)	१२३ नग	२१००/- प्र. नग	२,५८,३००/-
०२	बिजागिरी (एस.एस.) – ४''	३७० नग	५०/- प्र. नग	१८,५००/-
०३	ताडी पट्टी (एस.एस)	१२५ नग	६०/- प्र.नग	७५००/-
०४	हॅन्डल – ४'' (एस.एस.)	१२५ नग	४०/- प्र.नग	५,०००/-
			एकूण रक्कम रु.	**२,८९,३००/-**

उपरोक्त तपशिलानुसार सदरहू दरवाजे व हार्डवेअर मटेरियल खरेदी करणेकामी रक्कम रु.२,८९,३००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणा-या खर्चास व याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून सदरचे काम विभागामार्फत करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम भक्तनिवास इमारतीतील काही रुमचे बाथरुम/ टॉयलेटला बसविणेचे काम विभागांतर्गत करुन घेणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.४७ **शिर्डी बसस्थानकामधील संस्थानचे हॉल व रुमचे सेवा आकार निश्चित करणे.**

प्रस्ताव- **०१. अधिनियम २००४ मधील तरतूद -** २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा पुरविण्यात येते.

०२. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – निरंक

०३. प्रस्तावीक – शिर्डी बसस्थानकात संस्थानचे तळमजल्यावर ०३ गाळे असून पहिल्या व दुस-या मजल्यावर खालील तपशीलाप्रमाणे साईभक्तांकरीता रुम्स व हॉल्सची निवासव्यवस्था आहे. तसेच गरमपाण्यासाठी सोलर सिस्टीमची व्यवस्था करणेत आली आहे.

अ नं	मजला	तपशील	बांधकाम क्षेत्र	संख्या
१	पहिला मजला	निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन)	११९६ चौ.मी	०५
		निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन)		०२
		निवास रुम मोठी (संडास-बाथरुम अटयॅच)		०१
		निवास रुम लहान (संडास-बाथरुम अटयॅच)		०६
२	दुसरा मजला	निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन)	११९६ चौ.मी	०५
		निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन)		०२
		निवासी रुम मोठी (संडास-बाथरुम अटयॅच)		०१
		निवास रुम लहान (संडास-बाथरुम अटयॅच)		०६
	एकूण – मोठे हॉल्स १०, लहान हॉल्स ०४, मोठया रुम ०२ व लहान रुम्स १२			

बसस्थानकावरील हॉल व रुम करीता आवश्यक असणारे साहित्य खरेदीच्या प्रस्तावास मान्यता मिळालेली असून बांधकाम विभागामार्फत कॉट्स व खरेदी विभागामार्फत क्वायर फोम मॅट्रेस, क्वायर फोम मॅट्रेस प्रोटेक्टर, फायबर उशा, उशीकव्हर खरेदीची प्रक्रिया सुरु आहे.

बसस्थानकावरील हॉल्स व रुम्स मध्ये खालील प्रमाणे कॉट्सचे नियोजन करणेत आले असून त्यामध्ये साधारण प्रतिदिनी ३४० साईभक्तांची निवासव्यवस्था करणेत येणार आहे.

अ.नं.	तपशील	प्रति हॉल /रुम कॉट संख्या	एकूण कॉटची संख्या	प्रति हॉल /रुम निवासव्यवस्था	एकूण निवासव्यवस्था
०१	निवासी मोठे हॉल्स – १०	१५	१५०	१५+०५ = २०	२००
०२	निवासी लहान हॉल्स -०४	०९	३६	०९+०३ = १२	४८
०३	निवासी खोल्या – १२	०३	३६	०३+०३ = ०६	७२
०४	निवासी सुट खोल्या - ०२	०६	१२	०६+०४= १०	२०
		एकूण	२३४		३४०

०४. मागणी– संस्थानने बसस्थानक उभारणी करीता झालेल्या खर्चानुसार प्रस्तावीत सेवाआकार, साधारण २९ वर्षाच्या कराराच्या मुदतीत वसुल होणेकामी खालील प्रमाणे आकारता येईल.

A) भांडवली खर्च

अ.नं.	तपशील	खर्च
०१	इमारत बांधकाम खर्च	रु. ७,६६,००,०००/-
०२	संस्थान निवासस्थानात लागणारे फर्निचर खर्च (अपेक्षीत खर्च)	रु.२५,७२,०००/-
	एकूण	रु.७,९१,७२,०००/-
०३	२९ वर्षे करार (३४८ महिने)	रु.२,२७,५०५ प्रति महिना वसुली

B) चालू खर्च

अ.नं.	तपशील	प्रति महिना खर्च
०१	इमारत बांधकाम / फर्निचर खर्च वसुली	रु.२,२७,५०५/-
०२	विद्युत खर्च (सध्याचे दरानुसार)	रु.१,३०,३३८/-
०३	पाणी खर्च (सध्याचे दरानुसार)	रु.२२,२६०/-
०४	कर्मचारी खर्च (सध्याचे किमान वेतन दरानुसार)	रु.१,७१,६००/-
	महिना (३० दिवस) एकूण	रु.५,५१,७०३/-
	प्रतिदिनी	**रु.१८,३९०/-**
	३४० व्यक्तींसाठी प्रतिदिनी निवासव्यवस्था	**रु. ५५ प्रति व्यक्ती**

वरील खर्चानुसार सदर हॉल व रुमचा खालील प्रमाणे सेवाआकार आकारता येईल.

अ.नं.	खोली/हॉलचा प्रकार	एकूण संख्या	प्रति रुम/हॉल्स कॉट संख्या	प्रति रुम / हॉल व्यक्तींची मर्यादा	प्रति रुम / हॉल २४ तासांसाठी सेवाआकार	प्रतिदिनी मिळणारे एकूण उत्पन्न
०१	साधे मोठे हॉल्स, संडास-बाथरुम कॉमन	१०	१५	१५+५ = २०	२०X ५५= ११००/- गरमपाण्यासह	रु. ११,०००/-
०२	साधे लहान हॉल, संडास-बाथरुम कॉमन	०४	०९	०९+३ = १२	१२X ५५= ६६०/- गरमपाण्यासह	रु. २६४०/-
०३	साधी रुम, संडास बाथरुम ॲटयॅच	१२	०३	३+३ = ०६	०६X ५५= ३३०/- गरमपाण्यासह	रु. ३९६०/-
०४	साधी सुट रुम, संडास बाथरुम ॲटयॅच	०२	०६	६+४ = १०	१०X ५५= ५५०/- गरमपाण्यासह	रु. ११००/-
					एकूण-	रु. १८,७००/-

वरील परिशिष्ठाप्रमाणे सेवाआकार आकारणी केल्यास मोठया हॉलचा दर एक हजाराच्या पुढे जात असल्याने दि.१४/०७/२०१२ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभा विषय नं.८१ व निर्णय क्र.५२७ नुसार संस्थानला सर्व्हीस टॅक्स भरावा लागेल. त्याकरीता मोठे हॉल्ससाठी २४ तासांकरीता २० व्यक्ती करीता रु.९००/- सेवाआकार + रु.२००/- पाणी व लाईट बील चार्ज आकारुन रु.११००/- ची पावती भक्तांना देता येईल म्हणजे सर्व्हीस टॅक्स लागणार नाही व हॉलचा सेवाआकार परिशिष्ठात नमुद केल्याप्रमाणे रु. ११००/- प्रमाणे वसुल होईल. तसेच सदरच्या सेवाआकारात महागाईनुसार कालांतराने बदल करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ स्पष्ट मत– तरी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बसस्थानकावरील संस्थानचे रुम व हॉलचा सेवाआकार आकारणेस मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

निर्णय क्र.४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी बसस्थानकामधील संस्थान मालकीच्या दोन मजल्यांचा वापर कशासाठी करता येईल, हे प्रत्यक्ष पहाणी करुन निश्चित करावयाचे आहे. त्यामुळे सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

विषय नं.४८ **ऑनलाईन वेबसाईटसाठी असलेल्या Primary 10 Mbps Link ची फेरनिविदा व Secondary 10 Mbps Internet Link ला ०१ वर्ष मुदतवाढ मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. : 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 163. 02) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 14/07/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 04. 3) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 28/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 520-1.

प्रास्ताविक: साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी इत्यादी सेवा-सुविधा https://online.sai.org.in या संकेतस्थळावर सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या

सर्व्हरसाठी Primary व Secondary 10 Mbps Internet च्या 02 Lease Lines वापरण्यात येत आहेत. त्यासाठी M/s. Limras Eronet Broadband Services Pvt.Ltd., व Gazon Communication India Ltd. यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

अ] Primary Internet Link बाबत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 163 अन्वये Primary 10 Mbps Internet Link, पुरविणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. 9,95,000/- यास मान्यता देण्यात आलेली होती.

उपरोक्त निर्देशान्वये संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. ई-निविदेअंतर्गत प्राप्त झालेल्या पात्र निविदाधारकांच्या निवेदेचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे होता.

अ.न.	कंपनीचे नाव	निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.
1	IDEA Cellular Ltd., Ahmednagar	5,85,000/-
2	Vodafone Mobile services Limited, Pune	5,63,000/-
3	Limras Eronet Broadband Services Pvt.Ltd., Chennai	3,41,200/-
4	Ishan Netsol Pvt. Ltd., Rajkot (Gujrat)	5,76,600/-
5	Bharat Sanchar Nigam Limited, Ahmednagar	6,83,100/-

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 14/07/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 04 अन्वये प्राप्त पात्र निविदाधारकांपैकी Limras Eronet Broadband Services Pvt.Ltd., Chennai यांचे न्युन्नत्तम दर 3,41,200/- मान्य करण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांना पुढील दोन वर्षाकरीता Primary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी दि. 28/07/2016 रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतु, Limras Eronet Broadband Services Pvt.Ltd., Chennai यांना वारंवार सुचित करुनही आजपावेतो त्यांनी Primary 10 Mbps Internet Link कार्यान्वीत केलेली नाही. Limras Eronet Broadband Services Pvt.Ltd., Chennai यांना वारंवार सुचित करुनही त्यांनी10 Mbps Internet Link कार्यान्वीत न केल्याने, ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत प्राप्त पात्र निविदाधारकांपैकी द्वीतीय न्युनतम दरधारकVodafone Mobile services Limited, Pune यांना कार्यादेश द्यावयाचे झाल्यास त्यांनी देऊ केलेले दर रु 5,63,000/- हे बाजारमुल्यापेक्षा जास्त आहे.

सबब, सदरची निविदा प्रक्रिया रद्द करुन, पुढील दोन वर्षाकरीता Primary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

ब] Secondary Internet Link बाबत.

Primary Internet Link सेवा काही तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास उपरोक्त ऑनलाईन सेवा सुविधा अहोरात्र कार्यान्वीत राहणेकामी Secondary Internet Link घेण्यात येते. सदर Secondary Internet Link घेणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. ई-निविदेअंतर्गत प्राप्त झालेल्या पात्र निविदाधारकांच्या निवेदेचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे होता.

अ. नं.	निविदाधारक कंपनीचे नाव	One Installation Charges	Annual Recurring Charges	Service Taxes	Total
1.	Gozon communication India Ltd.	25,000/-	1,51,000/-	64,200/-	2,40,200/-
2.	JPR Digital Pvt. Ltd. Mumbai	1,00,000/-	12,00,000/-	1,82,000/-	14,82,000/-
3.	Tata Teleservices (Maharastra) Limited	000/-	5,45,000/-	76,300/-	6,21,300/-
4.	Railtel Corporation of India Ltd.	45,000/-	5,14,500/-	78,330/-	6,37,830/-

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 28/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 520-1 प्राप्त पात्र निविदाधारकांपैकी Gazon Communication India Ltd. यांचे न्युन्नत्तम दर रक्कम रु. 2,40,200/- मान्य करण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांना दि 01/01/2016 ते दि. 31/12/2016 पर्यंत 01 वर्षाकरीता Secondary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी दि. 10/12/2016 रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

Gazon Communication India Ltd. यांची मुदत दि. 31/12/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने, ई-निविदा प्रक्रिया राबवुन नविन पुरवठाधारकाची नेमणुक करावी लागणार आहे. दरम्यानच्या काळात ऑनलाईन सर्व्हिसेस् सुरळीत सुरु राहणेकामी Gazon Communication India Ltd. यांची लिंक चालु ठेवणेबाबत

त्यांचेशी पत्रव्यवहार केला असता त्यांनी दि 06/01/2017 रोजीचे ई-मेलने पुर्वीच्या कार्यादेशातील मान्य रक्कम रुपये 1,76,000/- + टॅक्स मात्रचे दराप्रमाणे सदरची लिंक कार्यान्वीत ठेवणेबाबत तयारी दर्शविलेली आहे.

Gazon Communication India Ltd. यांनी त्यांचे दि 06/01/2017 रोजीचे ई-मेलमध्ये नमुद केलेप्रमाणे पुढील 01 वर्षासाठी (दि. 01/01/2017 ते दि. 31/12/2017) कार्यादेशातील अटी-शर्ती व दराप्रमाणे त्यांची सेवा सुरु ठेवणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी: प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे.

अ] Primary Internet Link- M/s. Limras Eronet Broadband Services Pvt. Ltd., यांना त्यांची लिंक वारंवार ईमेलने कळवुनही डाटा सेंटरमध्ये कार्यान्वीत करता न आल्याने आत्यावश्यक सेवेचा विचार करता त्यांचा कार्यादेश रद्द करणेस, त्यांची अनामत रक्कम रुपये 9,950/- मात्र जप्त करणेस तसेच त्यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यास व Primary 10 Mbps Internet Link पुढील दोन वर्षाकरीता फेर ई-निविदा पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी रक्कम रुपये 5,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

ब] Secondary Internet Link- Gazon Communication India Ltd. यांनी दि.06/01/2017 रोजीचे ई-मेलने पुर्वीच्या कार्यादेशातील मान्य रक्कम रु. 1,76,000/- + टॅक्स मात्रचे दराप्रमाणे 01 वर्षाकरीता कार्यान्वीत ठेवणेबाबत तयारी दर्शविलेली आहे.

सबब, त्यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांची सेवा पुढील एक वर्षासाठी (दि. 01/01/2017 ते दि. 31/12/2017) सुरु ठेवणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : आर्थिक व तांत्रिक

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: प्रास्ताविकेत "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे Primary 10 Mbps Internet Link पुढील दोन वर्षाकरीता फेर ई-निविदा पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी रक्कम रुपये 5,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता तसेच Secondary Internet Link साठी Gazon Communication India Ltd. यांना पुर्वीच्या कार्यादेशातील मान्य रक्कम रु. 1,76,000/- + टॅक्स मात्रचे दराप्रमाणे 01 वर्षाकरीता कार्यान्वीत ठेवणेकामी खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.४९ **सन २०१६- २०१७ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनाकडून लेखापरिक्षकांची नेमणूक होणेकामी शासनास पत्र देण्यास व शासनाने निर्देशित केलेले मानधन आदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल कलम १७ (०२) (ग) विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, "राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील ". तसेच,

कलम २९ (०१) "समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशील दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च, रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षकाचा अहवाल, "तसेच ज्यांना या विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणा-या संस्थांची (संपूर्ण पत्यासह) तपशीलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम यांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्तांला त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील." अशी तरतुद अधिनियमात असुन,

यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी शासनामार्फत मे.शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड.कं.लातुर, यांची रु.१,००,०००/-(अक्षरी रुपये एक लाख मात्र) व त्यावरील अनूज्ञेय असणारा सेवाकर इतक्या फी वर वैधानिक लेखापरिक्षणासाठी संदर्भ क्र.२ अन्वये नेमणुक करण्यात आलेली होती.

प्रस्ताव:- संस्थानचे चालू आर्थिक वर्ष माहे एप्रिल २०१६ ते माहे मार्च २०१७ असे आहे.

१. सन २०१६-१७ या चालू आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल माहे ३० जून, २०१७ पूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे.

२. त्यासाठी संस्थानचे लेखे लेखापरिक्षणासाठी तयार करणे.

३. वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरिक्षण करून त्यांचा अहवाल सादर करणे.

४. सदरचा लेखा परिक्षण अहवाल मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपूढे ठेवून त्याची नोंद घेणे.

५. त्यानंतर तो राज्य शासनास व मा.धर्मादाय आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे.

त्यामुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक शासनाकडून वेळेत होणे गरजेचे आहे. यासाठी चालू आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता वैधानिक लेखापरिक्षणाकरिता संस्थान दप्तरी खालील लेखापरिक्षण संस्थांची संमतीपत्रे उपलब्ध झालेले आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे

अ.नं	फर्मचे नांव व पुर्ण पत्ता	फर्म रजि.नं.
१	मुकुंद एम.चितळे & कं. चार्टर्ड अकौटंट, मुंबई	१०६६५५W
२	अभ्यंकर ॲन्ड कं. कं. चार्टर्ड अकौटंट, सांगली	१०००२४W
३	शिंदे चव्हाण गांधी ऍण्ड कं. चार्टर्ड अकौटंट, लातुर	१२९९८० W
४	शरद एस.गायकवाड ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, मुंबई	११४९७१ W
५	कोचर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंट, मुंबई	१०५२५६W
६	एस.एन.कुलकर्णी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, नाशिक	१०५४४१W

विभागाचे स्पष्ट मत व अभिप्रायः- उपरोक्त लेखापरिक्षकांपैकी एका लेखापरिक्षकांची अथवा संस्थानच्या आर्थिक व्यवहाराची व्याप्ती गृहीत धरुन, योग्य त्या लेखापरिक्षण संस्थेची उचित मानधनावर आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे. यासाठी,

१. सदरच्या प्रस्तावातील लेखापरिक्षकांची नावे शासनासकडे कळविण्यास व मानधानासह वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणुकीबाबतचा आदेश मिळणेकामी तसे पत्र देण्यास,

२. शासनाने नेमणुक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकास शासनाने निर्देशित केलेले मानधन आदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या आर्थिक व्यवहाराची व्याप्ती गृहीत धरुन, आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता शासनामार्फत योग्य त्या लेखापरिक्षण संस्थेची, उचित मानधनावर वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक होणेकामी, प्रस्तावात नमुद केलेल्या लेखापरिक्षकांची नावे शासनास कळविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.५० **आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ साठी पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूकीकरीता संस्थानच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुदः** १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

प्रस्तावनाः- संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो.

वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व कर सल्लागार म्हणुन बाहेरील सक्षम संस्थेच्या नेमणुका करण्यात येतात.

त्या अनुषंगाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता संस्थान व संस्थान रुग्णालये विभागांकरीता पुर्व लेखापरिक्षक म्हणुन मे.के.के.एस.एस.ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची प्रत्येकी रु.१,००,०००/-(अक्षरी रुपये एक लाख) एकत्रीत इतक्या मानधनावर/ फी वर जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१३०२/२०१६ दि.१६ जून,२०१६ अन्वये नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांची मुदत ३१ मार्च,२०१७ रोजी पुर्ण होत आहे.

प्रस्तावः-उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पुढील आर्थिक वर्ष सन २०१७-१८ करिता पुर्व लेखापरिक्षकांची (Pre Auditor) नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यासाठी नामांकित संस्थांकडून (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या) पुर्व लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी बंद पाकिटामध्ये त्यांचे मानधन/फि सह अर्ज मागविता येतील.

मुदतीत आलेल्या अर्जांची मा.उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन त्यामधील संस्थान नियमानुसार पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फिचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ सादर करुन झालेला निर्णय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः तरी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) कामकाजासाठी लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) कामकाजासाठी लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.५१ **श्री साईभक्तांच्या चोरीला जाणाऱ्या वस्तुंचा/ रोख रकमेचा विमा उतरवणे.**

प्रस्ताव- संस्थानच्या सर्व निवासस्थानावर भक्तांची मोठया प्रमाणावर वर्दळ असते. या वर्दळीचा काही समाजकंटक गैरफायदा घेऊन भक्तांनी घेतलेल्या खोलीतुन अथवा दर्शन रांगेतुन दागिने, रोख रक्कम इ.वस्तू लुटण्याचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. त्याअनुषंगाने दि.३० नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवसापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ७९७ नुसार श्रीसाई भक्तास त्याचे चोरी गेलेले सामान, दागिने अथवा रोख रक्कम याबाबत रुपये २५,०००/- पर्यंत संरक्षण दिल्यास (प्रत्येक दिवशी २५ साईभक्त) सदर भक्तांचा मानसिक तनाव काही अंशी कमी होण्यास मदत होईल याकरीता राष्ट्रीयीकृत विमा कंपन्याच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलवावे असे ठरले. त्यास अनुसरुन दि.१/१२/२०१६ रोजी खालील राष्ट्रीयीकृत विमा कंपनीचे प्रतिनिधी चर्चेसाठी उपस्थीत होते.

अ.क्र.	विमा कंपनीचे नांव
१	युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी, लि., शाखा-शिर्डी
२	दि ओरीयंटल इन्शुरन्स कंपनी, लि., शाखा-शिर्डी
३	नॅशनल इन्शुरन्स कंपनी, लि., शाखा-कोपरगांव
४	दि न्यु इंडीया एश्योरन्स कंपनी लि., शाखा नाशिक

सदर बैठकीमध्ये संस्थान परिसरामध्ये म्हणजे दर्शन रांग, मंदिर, भक्तनिवासस्थान इ.परिसरात भक्तांची रोख रक्कमेची चोरी झाल्यास श्रीसाई भक्तांना रक्कम रु.२५,०००/- ही जास्त होत असुन एवढी रक्कम विमा संरक्षण देणेबाबत संस्थानला किंवा विमा कंपनींना सोईस्कर वाटत नाही. त्याऐवजी रक्कम रु.५,०००/- एवढी विमा संरक्षण म्हणून दिल्यास सदर भक्ताचा मानसिक तणाव कमी होईल तसेच या रकमेत सदर भक्ताचे परतीचे प्रवास सोईस्कर होईल अशी चर्चा झाली.

साईभक्तांना रक्कम रु.५,०००/- किंवा चोरी झालेली प्रत्यक्ष रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम भक्तांना विमा संरक्षणाद्वारे मिळणे आवश्यक आहे. त्यासाठीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

१. साईभक्तांच्या चोरी गेलेल्या रक्कमेसाठी रु.५,०००/-किंवा चोरी झालेली प्रत्यक्ष रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम भक्तांना विमा संरक्षण म्हणून दिली जाईल.
२. विमा रक्कमेची वार्षिक मर्यादा रु.२.०० कोटी एवढी असेल.
३. साईभक्तांची रक्कम अथवा दागिने चोरीला गेल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी संस्थानचे संरक्षण विभागात २४ तासाच्या आत तक्रार नोदंवावी. संरक्षण विभागाने रितसर पंचनामा करुन साईभक्तांकडुन साध्या कागदावर एक प्रतिज्ञापत्र घ्यावे. त्या आधारे रक्कम आदायगीसाठीचा प्रस्ताव प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मंजुरीने लेखा विभागाकडे पाठवावा. लेखा विभाग त्याआधारे रक्कमचे प्रदान संबंधीतसाईभक्ताला करील.
४. त्यांनतर लेखा विभाग संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेला पंचनामा, साईभक्ताची लेखी तक्रार व प्रतिज्ञापत्र यासह प्रस्ताव मंजुरीसाठी निवड झालेल्या राष्ट्रीयीकृत विमा कंपनीकडे पाठविल. विमा कंपनी उपरोक्त कागदपत्रांच्या आधारे साईभक्ताला संस्थानने आगाऊ केलेल्या रक्कमेइतकी रक्कम विमा संरक्षण म्हणून संस्थानला देईल.
५. विमा कंपनी पोलिस विभागाचा प्रथम खबरी अहवाल (FIR) ची मागणी करणार नाही. तसेच उपरोक्त नमुद कागदपत्रांशिवाय कोणत्याही जादा कागदपत्रांचा/प्रतिज्ञापत्रांचा आग्रह धरणार नाही.
६. विमा कंपनी विम्याची रक्कम ८ दिवसात संस्थान खात्यात जमा करेल.

सद्य स्थितीमध्ये साईभक्तांची रोख रक्कम चोरीला गेल्यांनतर त्यांना प्रवास भाडयाइतकी रक्कम संस्थानमार्फत आदा करण्यात येते.

उपरोक्त विमा संरक्षणाची योजना सुरु झाल्यानंतर सदर प्रवास भाडयापोटी देण्यात येणारी मदत बंद करण्यात येऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

श्री साईभक्तास मंदिर परिसर/इमारतीमध्ये त्याचे चोरी गेलेले सामान/दागिने अथवा रोख रक्कमेसाठी रक्कम रु.५,०००/- किंवा चोरी झालेली प्रत्यक्ष रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रक्कमेपर्यंत विमा संरक्षण म्हणुन देणेकामी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडे प्रस्ताव पाठवून त्यांचेकडून दरपत्रके घेऊन त्यात वार्षिक विमा मर्यादा रुपये २.०० कोटी अशा स्वरुपाची विमा पॉलिसी घेऊन कारवाई करता येईल.

विभागाचा अभिप्राय:- सदर योजनेमध्ये खालीलप्रमाणे आक्षेप येण्याची शक्यता आहे.

१. सदर योजनेत चोरीच्या खोटया तक्रारी नोंदवण्याची शक्यता नाकारता येत नाही.
२. पोलिस स्टेशनला FIR न नोंदविल्यामुळे वैधतेबाबत कायदेशीर प्रश्न निर्माण होईल.
३. पोलिस स्टेनशनला FIR न नोंदविल्यामुळे पोलिस दप्तरी गुन्ह्याची नोंद होणार नसल्यामुळे प्रत्यक्षात गुन्ह्याचे प्रमाण कमी दिसेल. त्यामुळे याबाबतीतही कायदेशीर प्रश्न निर्माण होईल.

तरी उपरोक्त योजना सुरु करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन सामितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांच्या चोरीला जाणाऱ्या वस्तुंचा/ रोख रकमेचा विमा उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दर मागविणेत यावे.**

याचबरोबर अशीही चर्चा करणेत आली की, चोरीला जाणाऱ्या वस्तु/ रोख रकमेचा विमा मिळतो, यामुळे अनेक चोरीच्या खोटया तक्रारी येतील. परंतु ज्या भक्तांची खरोखरच चोरी झालेली आहे, त्यांना सहानुभूती द्यायलाच हवी. याकरीता शिर्डी पोलिस स्टेशनमार्फत मंदिर परिसरात किंवा १६ गुंठे जागेमध्ये पोलिस चौकी उभारणेबाबत कळविणेत यावे व विम्याची रक्कम संबंधीतांना परत करणेकामी या ठिकाणी चोरीच्या तक्रारींची नोंद घेण्यात यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

विषय नं.५२ **अन्नपाकिट (नाष्टापाकिट) मध्ये चपाती, भाजी व पुरी भाजी देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग -४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे अणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयामार्फत सकाळी ६ ते १० या वेळेत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे (५ चपाती/पुरी, कडधान्य भाजी, बर्फी वडी) ही उक्ती ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिगं द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचा कार्यादेश दि.यशोधरा महीला सहकारी संस्था, नाशिक यांना देण्यात आलेला आहे.

दि.११/१०/२०१६ रोजी वार-मंगळवार या दिवशी साईभक्त श्री शैलेश कुमार पटेल, बँगलोर यांनी ताशी २०,४०० चपाती तयार होणारे ॲटोमॅटीक चपाती मशिन श्री साई प्रसादालयास देणगी स्वरुपात दिले. प्रसादालय विभागाचे मंजूर टिपणीअन्वये माहे दि.१५ ऑक्टोबरपासून नाष्टापाकीटामध्ये पुरी ऐवजी चपाती देणेत येत आहे.

संदर्भियनूसार श्री नामदेव शंकर मलिक, सेक्रेटरी, यंग बॉईज स्पोर्टस क्लब, मुंबई-३७ यांनी दि.०६/१२/२०१६ रोजी इकडील विभागाकडे नाष्टापाकीटामध्ये चपाती ऐवजी पुरी देणेबाबतचे विनंती पत्र दिलेले आहे. त्यांनी त्यांचे पत्रात "पूर्वी नाष्टा पाकीटात पुरी व भाजी दिली जायची. त्या ऐवजी आता चपाती आणि भाजी दिली जाते. साई प्रसादालयात प्रसादाबरोबर वाढलेली गरम चपातीही चीवट असते. तीच चपाती थंड झाल्यावर किती चीवट होत असेल याची कल्पना करावी. संस्थानतर्फे नाष्टा पाकीटात पुरी भाजी ऐवजी चपाती भाजी पुरविली जात असल्याबद्दल नाराजी अनेक साई भक्तांनी व्यक्त केल्याचे आमच्या निदर्शनास आले. साईच्या चरणी गरीबापासून श्रीमतापर्यंत सर्व प्रकारचे भाविक येतात. परंतू नाष्टापाकीट मात्र गरीब सर्वसामान्यच खातात हे आपणास ठाऊक असेल, पुरीही म्हणावी तेवढी गरम नसते. परंतु चपातीपेक्षा निसंशय नरम असते. चपाती ऐवजी नाष्टापाकीटात पूर्वीप्रमाणेच पूरी व भाजी दिली गेल्यास हजारो/लाखो साईभक्त आपणास धन्यवाद देतील "अशी सुचना वजा विनंती केलेली आहे. त्यावर मा.अध्यक्ष सो .यांनी "प्लीज चेक " असे सुचित केले आहे.

चपातीबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

नाष्टापाकीटमध्ये देण्यात येणारी चपाती ही पहाटे ४.०० ते ५.०० चे दरम्यान मशिनवर तयार करण्यात येते . तद्नंतर चपाती + भाजी + बर्फी हे सर्व पदार्थ एका पाकीटामध्ये भरुन भक्तांसाठी विक्रीकरीता सकाळी ७.०० वाजेपासून ते १०.०० वाजेपर्यंत देण्याची पध्दती आहे. सदर नाष्टापाकीटे सकाळपासून १०.०० वाजेपर्यंत कॅन्टीनचे विविध स्टॉलवर विक्रीसाठी ठेवण्यात येतात. त्यामुळे चपाती कडक व चीवट होणे यासारखे तक्रारी वारंवार तोंडी स्वरुपात येत आहेत. शिवाय सकाळचे नाष्टयाचा मेनू म्हणून सुकी भाजी + पुरी अशी प्रचलित पध्दती आहे.काही वेळेस सुकी भाजी संपल्यानंतरही पुरी ही चहाबरोबर अथवा तशीही खाल्ली जाऊ शकते . मात्र चपाती (मशिनची) कडक व चीवट झाल्यामुळे खाणे शक्य होत नाही.

तसेच श्री शेगांव देवस्थान येथील स्वयंसेवकाची एक टीम कामगार अधिकारी यांचे समवेत प्रसादालयात आली असता त्यावेळेस त्यांना प्रसादालयातील चपाती मशिन दाखविणेत आले. त्यावेळेस त्यांना उपरोक्त तक्रारी बाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा त्यांनीही आमचेकडे (श्री गजानन महाराज देवस्थान शेगाव) देखील असेच मशिन कार्यान्वीत आहे. "आमच्या येथेही मशिनचे चपातीबाबत अशा तक्रारी वारंवार होत आहेत. आम्हीही याबाबत बरेच प्रयत्न केलेले असून त्यात अजून यश आलेले नाही. हा मशिनमधील चपातीचा तात्रिंक दोष असून सदर चपाती ही इन्सुलेटेड बॉक्समध्ये ठेवल्यानंतरच मऊ राहते व बाहेर काढल्यानंतर काही वेळातच थंड होऊन कडक व चिवट होते" असे सांगितले आहे.

उपरोक्त तक्रार व शेगाव देवस्थान मधील सेवेकरी यांचे सुचनेचा विचार करता, पहाटे ४.०० ते ५.००चे दरम्यान तयार होणा-या अन्नपाकीटातील चपाती जेव्हां भक्तांपर्यंत पोहोच होते. तेव्हा बराच कालावधी गेलेला असतो त्यामुळे अन्नपाकीटातील चपाती कडक व चीवट होणे नैसर्गिक आहे.

त्याकरीता प्रायोगीक तत्वावर चपाती+भाजी तसेच पुरी +भाजी अशा दोन्ही प्रकारची नाष्टापाकीटे भक्तांना पुरविता येईल. त्यानंतर दोन्हींचे विक्रीमधील तफावत याचा विचार करुन जास्त विक्री झालेली नाष्टापाकीटे भक्तांना सुरु ठेवणेबाबत निर्णय घेणे सोईचे होईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविक नुसार तसेच ई-निविदेतील अटी/शर्तीनुसार अन्नपाकीटामध्ये चपाती देणे चपाती देणे झाल्यास प्रती अन्नपाकीटामध्ये प्रत्येक ४० ग्रॅम वजनाच्या ३ नग चपाती, १२५ ग्रॅम सुकी भाजी व २५ ग्रॅम बर्फी वडी तसेच पुरी द्यावयाची झाल्यास प्रती अन्नपाकीटामध्ये प्रत्येकी २५ ग्रॅम वजनाच्या ५ नग पुरी ,१२५ ग्रॅम सुकी भाजी व २५ ग्रॅम बर्फी वडी अशाप्रकारे पदार्थ देता येईल.

याप्रमाणे अन्नपाकीटामध्ये प्रायोगीक तत्वावर चपाती व भाजी तसेच पुरी व भाजी अशा दोन्ही प्रकारची नाष्टापाकीटे पुरविता येईल. त्यास मान्यता मिळणे गरजचे आहे.

मागील पानावर ..

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत:- तरी श्री साई प्रसादालयामार्फत पुरविणेत येणा-या अन्नपाकीटाबाबतचे संदर्भिय तक्रार वजा विनंती पत्राचा विचार करता व शेगाव देवस्थाने येथील सेवेक-यांचा अनुभव विचारात घेता, अन्नपाकीटामध्ये प्रायोगीक तत्वावर चपाती + भाजी+ बर्फी तसेच पुरी+भाजी+बर्फी अशा दोन्ही प्रकारची नाष्टापाकीटे पुरविणेस मान्यता असावी. त्यानंतर दोन्हींचे विक्रीमधील तफावत याचा विचार करुन जास्त विक्री झालेली नाष्टा पाकीटे भक्तांना सुरु ठेवेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना अल्पोपहार म्हणून देण्यात येणाऱ्या अन्नपाकिट (नाष्टापाकिट) मध्ये देण्यात येत असलेल्या चपात्या बनविलेपासून भक्तांच्या हातात पोहोचेपर्यंत ४ ते ५ तासांचा अवधी लागतो व तोपर्यंत अन्नपाकिटामधील चपात्या वातट होतात. यामुळे साईभक्तांना देण्यात येणाऱ्या अन्नपाकिटांमध्ये पुर्वीप्रमाणेच पुऱ्यांचावापर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

विषय नं.५३ **दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत देण्यात येत असलेल्या ५० ग्रॅम सुटी बुंदी पाकिटाऐवजी ५० ग्रॅम वजनाचा १ लाडू असलेले पाकिट उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रास्ताविक- श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०००० ते ३५००० लाडु पाकीटे कॅन्टीन विभागामार्फत विक्रि करणेसाठी सदर विभागाकडे तयार करुन पाठविली जातात तसेच दैनंदिन ४५००० ते ५०००० सुटी बुदी प्रसाद पाकीटे भक्तांना दर्शन लाईनमध्ये मोफत वाटप करणेसाठी पाठविली जातात.

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मंदिर दर्शन रांगेत साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी येणा-या दर्शनासाठी रांगेत उभे राहावे लागते व पुन्हा रांग लावुनच लाडु प्रसाद घ्यावा लागतो. यामध्ये भक्तांचा त्रास कमी व्हावा व त्यांना मोफत लाडु प्रसाद मिळावा याहेतुने दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन मोफत लाडु प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली होती.

परंतु दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याने व गर्दीचे प्रमाणात मोतीचुर लाडु तयार करण्याची प्रक्रीया सुमारे ०६-०७ तासांची असल्याने व साईभक्तांची संख्या वाढेल अथवा कमी होईल हे निश्चित नसल्याने याप्रमाणात लाडु साठा करुन ठेवणे शक्य होत नाही. यामुळे संदर्भ क्र.२ अन्वये, दर्शन रांगेत भक्तांना १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडुंचे पाकीटांऐवजी त्याच वजनाच्या सुटी (लुज) बुंदीचे पाकीट प्रसाद रुपाने देणेस मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत मान्यता देण्यात आली होती व त्यानुसार आजपावेतो सुटी बुंदीचे पाकीट प्रसाद म्हणुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

परंतु संदर्भ क्र.०३ अन्वये, सदरहु १०० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसादाचे पाकीट उघडल्यानंतर साईभक्तांकडून पुर्ण प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पडुन पायाखाली येतो, याकरीता 'मंदिर दर्शन रांगेत साईभक्तांना १०० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे पाकीटांऐवजी ५० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे पाकीटे मोफत वाटप करण्यात यावीत' असा निर्णय संमत झालेला असुन, त्याची अंमलबजावणी दि.०३/०९/२०१६ रोजीपासुन सुरु करणेत आलेली आहे.

आता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत संदर्भ क्र.०४ अन्वये, ५० ग्रॅम सुटी बुंदी पाकीटाऐवजी ५० ग्रॅम वजनाचा १ लाडु असलेले पाकीट साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले आहे दि.३०.११.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.२९, निर्णयक्र.७८३ अन्वये, कार्यवाही करावयाची झाल्यास त्यामध्ये साधारणतः पुढीलप्रमाणे अडचणी येणार आहेत.

१. मोतीचुर लाडु तयार करण्याचे काम पुर्णतः मनुष्यबळावर चालत असल्याने बुंदी तळणे, हाताने लाडु वळविणे याकामी बाजारामध्ये मशिनरी उपलब्ध नाहीत.त्यामुळे लाडु तयार करण्याची प्रक्रीया ही मनुष्य बळावर अवलंबुन राहावे लागते. लाडु वळविणे हे कुशल कामगाराचे व त्रासाचे काम असल्याने या कामासाठी कुशल कारागीरांची आवश्यकता असते, असे कामगार सहजासहजी उपलब्ध होत नाहीत.

२. मोतीचुर लाडु मनुष्यबळाव्दारे तयार करणेसाठीची प्रक्रीया सुमारे ०६-०७ तासांची आहे. त्यामध्ये हरभरा दाळ वाळविणेपासुन ते लाडु वळवुन, सुकवुन ते पॅकींग करेपर्यंत बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे दर्शन रांगेतील भक्तांना वेळेत मोफत लाडु प्रसाद पुरविणेसाठी कसरत करावी लागणार आहे.

३. दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे, तसेच सन २०१७-१८ या काळात श्री साईबाबा संस्थान शताब्दी वर्ष साजरे करत असल्याने भक्तांच्या संख्येत होणारी संभाव्य वाढ व

लाडु निर्मिती विभागाकडील असलेल्या जागेचा अभाव यांचा ताळमेळ घालता इतक्या मोठ्या प्रमाणात लाडु तयार करणेसाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे लाडु वळविणा-या कर्मचा-यांवरील कामाचा ताण वाढणार आहे.

४. लाडु निर्मिती कक्ष व पॅकींग साई प्रसादालयाचे शेजारी असल्याने लाडु निर्मिती करीता आवश्यक असणारी नैसर्गिक व खेळती हवा उपलब्ध होत नाही. सदरचे कक्षात वायुविजनची व्यवस्था नसल्याने लाडु सुकविण्यास फार जास्त प्रमाणात वेळ खर्च होतो. कृत्रिमरित्या लाडु सुकविणेसाठी सिलींग फॅन व स्टॅण्ड फॅनच्या साहय्याने लाडु सुकविण्याचे कार्य चालते.

५. लाडु बनविणेकामी लाडु निर्मिती विभागाकडे सर्व सोयी-सुविधांनी युक्त असे किचन व साधन सामग्रीही उपलब्ध नाही.

उपरोक्त अडी-अडचणींचा विचार करता, लाडु प्रक्रीया ही ०६-०७ तासांची असल्यामुळे आणि साईभक्तांकडुन लाडु प्रसाद पाकीटांची वाढती मागणी या सर्व गोष्टींचा विचार करुन ५० ग्रॅमची सुटी बुंदी मोफत प्रसाद म्हणुन वाटप करणेसाठी सुरु ठेवल्यास खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत.

१. बुंदी तयार करण्याचे प्रक्रीयेस वेळ कमी लागणार असल्यामुळे साईभक्तांना दर्शन लाईनमध्ये मोफत वाटप करण्यास अडचण येणार नाही व आवश्यक तेवढी बुंदी पाकीटे लवकरात लवकर उपलब्ध करुन देता येईल.

२. साईभक्तांची गर्दी अचानक कमी झाल्यास तयार करुन सुकविलेली बुंदी लाडु पेक्षा जास्त काळ टिकुन राहील, खराब होणार नाही व नुकसानही होणार नाही.

३. साईभक्तांची गर्दी कमी झाल्यास तयार केलेली मोतीचुर लाडू लवकर खराब होण्याची शक्यता असते, याउलट लाडु निर्मिती कमी केल्यास, आणि अचानक गर्दीचे प्रमाण वाढले तर, विक्रीसाठी व मोफत वाटपासाठी मोतीचुर लाडु कमी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. मोतीचुर लाडु वळण्याचे काम काही प्रमाणात कुशाग्रतेचे काम असल्यामुळे ज्या कामगारांना सदरचे काम येते, त्यांच्या अडवणुकीच्या भुमिकेमुळे ठेकेदार, प्रशासन व भक्त यांना वेठीस धरण्याचा प्रकार टाळता येईल.

विभागाची मागणी- उपरोक्त सर्व वस्तुस्थितीचा विचार करता साईभक्तांना दर्शन लाईनला प्रसाद म्हणुन ५० ग्रॅमच्या मोतीचुर लाडु ऐवजी ५० ग्रॅम सुटी बुंदीचे पाकीट तयार करुन प्रसाद म्हणुन मंदिर दर्शन लाईनला वाटपाकरीता उपलब्ध करुन दिल्यास गर्दीचे काळात व भक्तांच्या दृष्टीनेही सोयीचे होईल. त्यामुळे बुंदी भिजविणे, लाडु वळविणे व सुकविणेकामी खर्च होणारा वेळ वाचेल. भक्तांच्या गर्दीचे प्रमाणानुसार पाहीजे तेवढी ५० गॅम वजनाची बुंदी पाकीटे तयार करण्यास अडचण येणार नाही. तसेच सुटी बूंदी साधारणतः १०-१२ दिवसांपर्यंत चांगल्यास्थितीत खाण्यायोग्य राहत असल्यामुळे गर्दीचे काळात साठा करुन ठेवता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- सध्या जेथे सुटी (लुज) बुंदी तयार होते, त्याठिकाणी नैसर्गिक खेळती हवा नसल्यामुळे मोतीचुर लाडु निर्मिती करता येत नाही. मोतीचुर प्रसाद लाडु तयार केले तरीही नैसर्गिक खेळती हवा नसल्याने लाडु सुकविण्यास विलंब लागतो किंवा वातावरण अतिशय उष्ण असल्याने सुकले जात नाहीत. दर्शन लाईनमधील भक्तांची संख्या गर्दीचे प्रमाणावर अवलंबुन असते, त्यामुळे लाडू निर्मिती कमी प्रमाणात होईल. लाडु हा खाद्यपदार्थ असल्याने दिर्घकाळ साठवुन ठेवता येत नाही. त्यासाठी हवेशिर व मोकळी व खेळती हवा असलेली जागा उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी आपणास जास्त प्रमाणावर लाडु निर्मिती करुन सदर सेवा सुरु करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे हवेशिर व मोकळी व खेळती हवा असलेली जागेचा अभाव, मोतीचुर लाडु बनविणेकामी खर्च होणारा वेळ व कुशल कामगारांची उपलब्धता यांचा विचार करता साईभक्तांना दर्शन लाईनला मोतीचुर लाडु ऐवजी आहे त्याच धर्तीवर मोफत ५० ग्रॅम सुटी बुंदीचे पाकीट वाटप करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मोतीचुर लाडु बनविणेकामी मोकळी व खेळती हवा असलेल्या जागेचा अभाव, त्यासाठी येणारा खर्च, लाडू सुकविणेसाठी लागणारा वेळ व कुशल कामगारांची उपलब्धता यांचा विचार करता दर्शन रांगेमधील साईभक्तांना प्रसाद म्हणून, आहे त्याच धर्तीवर ५० ग्रॅम सुटी बुंदीच्या पाकीटाचे मोफत वाटप करण्यात यावे.**

तसेच Time base प्रमाणे दर्शनार्थींची संख्या व वाटप होत असलेल्या मोफत बुदी प्रसाद पाकिटांची संख्या याची संबंधीत प्रशासकीय अधिकारी व विभागप्रमुख यांनी वेळोवेळी पडताळणी करावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.५४ **सेवाधाम इमारतीचे नुतणीकरण करुन साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम– २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व

विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

प्रस्तावना: संस्थानचे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं. ११९ मध्ये साईभक्तांचे निवासासाठी सेवाधाम इमारतीचे आर.सी.सी. मध्ये तळमजला, पहीला व दुस-या मजल्याचे बांधकाम सन १९५६ मध्ये पूर्ण करणेत आलेले आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम क्षेत्र १५१२.६४ चौ. मी. आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम होवून ६० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून इमारत जुनी झालेली आहे.

संस्थानचे मा.अध्यक्ष, त्रिसदस्य समिती तथा जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी रविवार दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थानच्या संपूर्ण मालमत्तेची तसेच आस्थापनेवर कार्यरत असणा-या सर्व विभागांची समक्ष स्थळपहाणी केली आहे. सदरहू स्थळपाहणीचे वेळेस सेवाधाम इमारतीचे बांधकामास ५० वर्षापेक्षा जास्त वर्षे झालेली असल्यामुळे त्या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात यावे. या ठिकाणी नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा अशी सुचना केलेली असल्याचे दि.१५/०३/२०१६ रोजीचे परिपत्रका अन्वये कळविणेत आले होते. याबाबत नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर, यांचेकडून कोटेशन्स मागविणेत येवून, निम्नतम दरात स्ट्रक्चरल इंजिनिअर बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांचेकडून सेवाधाम इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला होता.

दि.१२/१०/२०१६ रोजी मा. विश्वस्त श्री. सचिन तांबे, यांनी प्रशासकीय अधिकारी श्री, उगले सो., श्री, गमे सो., व प्र. अधिक्षक, साई प्रसाद निवासस्थान यांचे समवेत सेवाधाम इमारतीची पाहणी केली. त्यावेळी सेवाधाम इमारतीतील मेन्टेनंन्सची कामे तात्काळ पूर्ण करुन सदर इमारत साईभक्तांच्या निवासाकरीता पूर्ववत सुरु करावी अशी सुचना दिलेली असल्याचे संदर्भिय टिपणीद्वारे कळविले आहे. सदर इमारत राहण्यासाठी योग्य असल्याबाबत स्ट्रक्चरल ऑडीट करणेची आवश्यकता आहे काय? याबाबत बांधकाम विभागाचे मत घ्यावे असे सदरहू टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले आहे.

त्यानुसार बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांनी दि२७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात नमूद केलेल्या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर : - इमारतीचे कॉलम, बीम, स्लॅब, व स्टील चांगल्या स्थीतीत असून, काही ठिकाणी कॉक्रीटला क्रॅक गेलेले असून, ते दुरुस्त करणे आवश्यक आहे.

वीट बांधकाम :- इमारतीचे वीट बांधकाम सुस्थीतीत आहे.

बाहेरील प्लास्टर:- बाहेरील प्लास्टर चांगल्या स्थीतीत आहे. लिकेजच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार प्लास्टर करुन घेणेत यावे.

टेरेस वॉटर प्रुफींग:- टेरेस स्लॅबचे काही ठिकाणी लिकेज असून, चायना मोझ्याक वॉटर प्रुफींग करणेबाबत सुचविले आहे.

इमारतीचे अंतर्गत बाबींबाबत:- आर.सी.सी. कॉलम, बीम, स्लॅबला असलेले किरकोळ क्रेक दुरुस्ती करणेबाबत सुचविले आहे.

ड्रेनेज लाईन व पिण्याचे पाण्याची पाईप लाईन:- ड्रेनेजसाठी व पिण्याचे पाण्यासाठी वापरणेत आलेले पाईप खराब झालेले असून, बदलणे आवश्यक आहे.

अ) स्ट्रक्चरल इंजिनिअर, बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांनी सेवाधाम इमारतीचे स्ट्रक्चरल रिपेअर्स व इतर मेंन्टनन्स करणेकामी अपेक्षीत खर्च खालीलप्रमाणे कळविला आहे.

Sr.No.	Description of Item	Estimated Amount
1.	Structural repairs	15,68,750/-
2.	Waterproofing of Terraces	7,95,000/-
3.	Plumbing Works	6,20,750/-
4.	Special Water – Proof coating / Painting work.	4,85,000/-
	Total (A+B+C+D)	34,69,500/-
	Add: Service Tax +VAT: Approx 20.3%	7,04,309/-
	Grand Total with Taxes:	**41,73,809/-**
	Add: Provision for Variation in Qty. (5%)	**2,08,690/-**
	Provision for Extra Items (5%)	**2,08,690/-**
	Budgetary Total:	**45,91,189/-**
	Budgetary Total (Say) (A):	**46,00,000/-**

ब) सेवाधाम इमारतीमधील जनरल टॉयलेटचे नुतनीकरण करणे.

Sr. no	Description	Estimated Amount
01.	Renovation of toilet block	342593.08
	Contingencies 5%	17129.65
	Total Amount:- (B)	**359723.00**
	Total (A+B)	**45,59,723.00**

उपरोक्त प्रमाणे सेवाधाम इमारतीचे दुरुस्तीकामी बर्वे कंन्सलटंट, मुंबई यांनी रक्कम रु.४६,००,०००/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक दिले आहे. बर्वे कंन्सलटंट, स्ट्रक्चरल ऑडीटर, मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार सेवाधाम इमारतीची दुरुस्ती करुन इमारत निवास व्यवस्थेसाठी वापणेस योग्य असलेबाबत कळविले आहे. याव्यतिरिक्त टॉयलेटच्या टाईल्स व दरवाजांची दुरुस्ती करणे इ. किरकोळ कामे करणे आवश्यक आहे. याकामी जनरल टॉयलेटचे जुन्या टाईल्स, संडास भांडे व दरवाजे बदलणे व इतर दुरुस्तीकामी रक्कम रु.३,५९,७२३/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. अशा प्रकारे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व जनरल टॉयलेट दुरुस्ती कामांसाठी एकूण रु.४९,५९,७२३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

वरील अंदाजपत्रकातील Variation in quantity (5%), Extra item(5%), Contingencies (5%) वगळून उर्वरित एकूण रक्कम ४५,१६,४०२/- मात्र इतकी होते. मा.अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व मा. विश्वस्त यांचे दि.०४/०१/२०१७ रोजीचे चर्चे दरम्यान दिलेल्या सूचने अन्वये या रक्कमेतून २०% कमी करून रक्कम रू.३६,१३,१२२/-मात्र करीता आयटेम रेट ई-निविदा मागविता येतिल. तरी सदर प्रकल्पासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास व त्यासाठी आयटेम रेट पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, ठिकठिकाणांहून पालखीसोबत येणाऱ्या पदयात्रींना साईसेवक म्हणून संस्थानमध्ये सेवा करणेस देण्याचे प्रस्तावित असून या सेवेकऱ्यांच्या निवासासाठी सेवाधाम या इमारतीचा वापर होऊ शकतो, यादृष्टीने सेवाधाम इमारतीचे नुतणीकरण व इतर अनुशंगीक व्यवस्था करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.५५ **साई भक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणालीसाठी वाढीव काऊंटर करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी Time base दर्शन कार्यप्रणाली संस्थानमार्फत दि.१२/१२/२०१६ रोजी मोफत दर्शन बायोमेट्रीक (Time Slot) काऊंटर्स जुने प्रसादालय, साई आश्रम भक्तनिवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान व धर्मशाळा येथे सुरु करणेत करणेत आलेले आहे.

दि.१७/१२/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो, उप कार्यकारी अधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी व संरक्षण अधिकारी यांनी दर्शन रांग व्यवस्थापन कार्यप्रणालीची पाहाणी केली असता, खालील ठिकाणी दर्शन रांग व्यवस्थापन कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेबाबत निर्देश दिले असल्याचे संस्थानचे आय टी विभागाने जा.नं.११०/२०१६, दि.१९/१२/२०१६ अन्वये कळविले आहेत.

1. साई कॉम्प्लेक्स (सध्याचे सिक्युरिटी ऑफीस)
2. सेवाधाम इमारत रुम नं. ५७
3. बसस्टॅण्ड
4. रेल्वे स्टेशन

तसेच मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी जुने प्रसादालय येथे सध्याचे काऊंटरचे पुर्व बाजूस आणखी दोन काऊंटर सुरु करणेकामी आवश्यक ती कामे करणेबाबत निर्देश दिले आहे.

प्रस्ताव:- वर नमूद स्थळ निरिक्षणमध्ये देण्यात आलेल्या निर्देशान्वये कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.नं	कामाचा तपशिल	अपेक्षीत खर्च
०१	विविध ठिकाणी काऊंटरर्ससाठी १० नग टेबल्स खरेदी करणे.	१,४८,०५०/-
०२	काऊंटरवरील कर्मचा-याचे बैठक व्यवस्थेसाठी १० नग रिव्हालवींग चेअर खरेदी करणे.	८५,३३७/-
०३	जुने प्रसादालय व साई कॉम्प्लेक्स येथे ॲल्यु. पार्टीशनमध्ये केबीन तयार करणे.	३६,६०४/-
०४	जुने प्रसादालय येथील खिडीकीचे बाजूने मार्बलचे क्लॅडींग करणे.	७,५६०/-

०५	जुने प्रसादालय येथे काऊंटर समोर ओटा तयार करणे.	३७,४६१/-
०६	जुने प्रसादालय येथे काऊंटर समोर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणे.	६७,२१२/-
	एकूण -	**३,८२,२२४**

वर नमूद केलेल्या ठिकाणी वाढीव काऊंटर तयार करणे व इतर सुविधा करणेकामी रक्कम रु.३,८२,२२४/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त कामापैकी ऑफीस टेबल व चेअर्स दि. संरचना मेकर्स, नवी मुंबई यांचेकडून अनुक्रमे इकडील जा. नं. ४२५६/२०१६ व जा. नं. ४२५७/२०१६ दि.१४/११/२०१६ रोजीचे कार्यादेशातील मंजूर दरात खरेदी करता येईल. ॲल्यु. पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेचे काम मारुती ग्लास इंचिंग ॲण्ड ॲल्यु, श्रीरामपूर यांचेकडून इकडील जा.नं. ४२४८/२०१६ दि.१२/११/२०१६ चे कार्यदेशातील मंजूर दरानुसार करुन घेता येईल.

तसेच जुने प्रसादालय येथील शेड उभारणीचे काम एस.जी. गायकवाड, राहाता यांचेकडून इकडील जा.नं. ४२४७/२०१६ दि.१२/११/२०१६ चे कार्यादेशातील मंजूर दरात करुन घेता येईल. तसचे जुने प्रसादालय येथील काऊंटर समोरील ओटयाचे बांधकाम इकडील विभागामार्फत करुन घेता येईल.

तरी वर नमूद केलेल्या ठिकाणी वाढीव काऊंटर तयार करणेसाठी वरीलप्रमाणे पुरवठादार यांचेकडून मंजूर दरात कामे करुन घेणेसाठी व ओटयाचे बांधकाम विभागामार्फत करणेसाठी येणारे रक्कम रु.३,८२,२२४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना दर्शनासाठीची वेळ (Time Slot) मिळणेकरीता बनविणेत आलेल्या काऊंटर्सवरील गर्दी कमी होणेकरीता प्रस्तावित केलेल्या ठिकाणांव्यतिरिक्त निघोज येथील पालखी निवारा व साईउद्यान इमारत येथेही दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणालीचे वाढीव काऊंटर करणेत यावे, असे ठरले. तसेच त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.५६ **साई भक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणालीचे माहिती/सूचना बोर्ड तयार करणेसाठी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय क्र.७४६ समंत करण्यात आलेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी दर्शनरांग व्यवस्थापन time base दर्शन कार्यप्रणालीसाठी संस्थानमार्फत दि.१२/१२/२०१६ रोजी मोफत दर्शन बायोमेट्रीक (टाइम स्लॉट) काऊंटर्स कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदर कार्य प्रणालीची माहिती साईभक्तांना होणेसाठी बोर्ड तयार करणेकामी मा. अध्यक्ष महोदय, मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार माहिती / सुचना यांचे बोर्ड तयार करुन ठिकठिकाणी बसविण्यात आले. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.नं.	बोर्डाचा तपशिल	परिमाण / एकक	दर	रक्कम
०१	**साईभक्तांनां विनम्र आवाहन -** साई भक्तांसाठी बायोमेट्रीक अधारीत मोफत दर्शन प्रवेशपत्र (टाईम स्लॉट) देण्याची सुविधा संस्थानचे जुने प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास व साई धर्मशाळा या ठिकाणी असलेल्या काऊंटर्सवर पूर्णवेळ (24x7) उपलब्ध आहे. साईभक्तांनी फ्री दर्शन प्रवेशपत्र (टाईम स्लॉट) घेऊन, कार्डवर नमूद केलेल्या वेळी दर्शन रांग प्रवेशद्वार नं. १ किंवा २ या ठिकाणी साई दर्शनासाठी यावे, हि विनंती. **Appeal to Sai Devotees** :- The Biometric based Free Darshan Access Cards (Time Slot) issuance facility is available 24x7 for Sai Devotees through Conuters at Old Prasadalay, Sai Ashram Bhaktiniwas, Saibaba Bhaktiniwasthan, Dwarawati Bhaktiniwas and Sai Dharmashala. Sai Devotees are	११२०चौ.फुट ११२ चौ. फुट ७२० चौ. फुट	१०/- ३३/- ३३/-	११,२००/- ३,६९६/- २३,७६०/-

	requested to report for Sai Darshan at Gate No. 1 or Gate No. 2 of Darshan 'Q' in the mentioned time slot only. **साईज – १)** ७X४ – ४० नग = ११२० चौ. फुट (मराठी व इंग्रजी) २) ७X४ – ०४ नग = ११२ चौ. फुट (मराठी व इंग्रजी) **३)** १०X६ – १२ नग = ७२० चौ. फुट (मराठी व इंग्रजी)			
०२	**जुने प्रसादालय काऊंटर येथे मराठी व इंग्रजी मजकुरामध्ये फ्लेक्स बोर्ड तयार करणे.** मोफत दर्शन बायोमेट्रीक प्रवेश कार्ड (टाईम स्लॉट) काऊंटर Free Darshan Biometric Access Card (Time Slot) Counter. साईज ३०X६ – ०१ नग	१८० चौ. फुट	१०/-	१८००/-
०३	**दिशादर्शक फ्लेक्स बोर्ड:-** मोफत दर्शन बायोमेट्रीक प्रवेशकार्ड (टाइम स्लॉट) व तपासणी कार्ड केंद्राकडे. (मराठी व इंग्रजी) साईज ४X३ – १६ नग	१९२ चौ. फुट	१०/-	१,९२०/-
०४	**गेट नं. १ कडे** **Towards Gate No. – 1** (मराठी व इंग्रजी) साईज ३X२ – १२ नग	७२ चौ. फुट	१०/-	७२०/-
०५	**गेट नं. २ कडे** **Towards Gate No. – 2** (मराठी व इंग्रजी) साईज ३X२ – २० नग	१२० चौ. फुट	१०/-	१२००/-
०६	**प्रवेशद्वार क्र. १ / Entrance Gate No. 1** (मराठी व इंग्रजी) साईज 2x1-6 – 1 नग	०३ चौ. फुट	१०/-	३०/-
०७	**प्रवेशद्वार क्र. २ / Entrance Gate No. 2** (मराठी व इंग्रजी) साईज 2x1-6 – 1 नग	०३ चौ. फुट	१०/-	३०/-
०८	**गेट नं. १ / Gate No.1** (मराठी व इंग्रजी) साईज 4x2 – 1 नग	०८ चौ. फुट	१०/-	८०/-
०९	**मोफत दर्शन प्रवेशपत्र तपासणी केंद्र** **Free Darshan Access card Verification Counter** (मराठी व इंग्रजी) साईज 4x1-6 – 4 नग	२४ चौ. फुट	१०/-	२४०/-
१०	**साईभक्तांना नम्र विंनंती, प्रवेश पत्रावर नमूद केलेल्या प्रवेशद्वार क्रमांक मधुनच श्री साईंचे दर्शनासाठी जावे.** **All Devotees are requested to report at Gate Number Mentioned on Access card for Shri Sai Darshan.** (मराठी व इंग्रजी) साईज 8x1-6 – 2 नग	२४ चौ. फुट	१०/-	२४०/-
११	Time Slot 2'x3' = 46 नग	२७६ चौ. फुट	१०/-	२७६०/-
१२	साईभक्तांचे पंसतीनुसार टाईम दर्शन साईज- 6x1.5x 2 नग	१८ नग	१०/-	१८०/-
१३	गेट नं. २ करीता प्रवेश 4x3 = 1 नग 3x2 = 4 नग	३६ चौ. फुट	१०/-	३६०/-
१४	गेट नं. १ करीता प्रवेश Entry to Gate No. 1 4x3 = 1 नग 3x2 = 4 नग	३६ चौ. फुट	१०/-	३६०/-
१५	व्ही आय पी आरती व दर्शन पास धारकांसाठी प्रवेश. 4x3 = 1 नग	१२ चौ. फुट	१०/-	१२०/-
१६	अपंग साईभक्तांसाठी व गरोदर महिलांसाठी प्रवेश 4x3 = २ नग	२४ चौ. फुट	१०/-	२४०/-
१७	जेष्ठ नागरीक व १ वर्ष वयापर्यंत मुलांचे पालकांसाठी प्रवेश 4x3 = 1 नग	१२ चौ. फुट	१०/-	१२०/-
१८	जेष्ठ नागरी व १ वर्ष वयापर्यंत मुलांचे पालकांसाठी मोफत दर्शन बायोमेट्रीक प्रवेश कार्ड काऊंटर. 10x2-6 x 2 नग	५० चौ. फुट	१०/-	५००/-
			एकूण रक्कम रु.	**४९,५५६/-**

उपरोक्त प्रमाणे बोर्ड तयार करणेकामी रु.४९,५५६/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे बोर्ड तातडीने तयार करुन बसविणे आवश्यक असल्याने, सदरहू फ्लेक्स बोर्ड जनसंपर्क विभागाकडील जा.नं.१५१६/२०१६ दि.३०/०६/२०१६ रोजीचे सन २०१६ -२०१७ चे वार्षिक कार्यादेशातील मंजूर दरात आर.डी. आर्टस, शिर्डी यांचेकडून तयार करुन घेण्यात आले आहेत व इकडील विभागामार्फत शिर्डी परिसरात व संस्थान परिसरात साईभक्तांना सुलभ रित्या दिसेल अशा ठिकाणी बसविण्यात आलेले आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे बोर्ड तयार करणेकामी आलेल्या रक्कम रु.४९,५५६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साई भक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणालीचे माहिती/ सूचना बोर्ड तयार करणेसाठी आलेल्या रु.४९,५५६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.५७ **मंदिर व मंदिर परिसर, द्वारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे दिनांक ०१.०२.२०१७ ते दि.३१.०१.२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. सदर यत्रणा सतत कार्यरत असणे आवश्यक आहे. यदा कदाचित यंत्रणा बंद पडल्यास, ती तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावे लागतात. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. या दुरुस्ती कार्यवाहीसाठी बराच अवधी लागेल व पर्यायाने साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होतो. याकरीता प्रत्येक वर्षी तातडीने जागेवरच दुरुस्ती करणेकामी सदर ठिकाणातील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे CAMC देण्यात येते. सध्या संस्थानकडे पुढील प्रकारच्या ए.सी. यंत्रणा कार्यरत आहेत :

अ.नं.	ठिकाण	यंत्रणेचा तशील	संख्या
१.	मंदिर व परिसर	ए.सी. – १ टन	२५
		ए.सी. – १.५ टन	४३
		ए.सी. – २ टन	६९
		ए.सी. – ५ टन	३
		कुलर आणि फ्रिज	१६
२.	व्दारावती इमारत	ए.सी. – १ टन	४१
		ए.सी. – १.५ टन	१४
		ए.सी. – २ टन	२५
३.	साईबाबा भक्तनिवास व परिसर	ए.सी. – १ व १.५ टन	२६
		ए.सी. – २ टन	९
		कुलर आणि फ्रिज	७
४.	साई प्रसादालय व्ही.आय.पी. भोजन हॉल	ए.सी. – १, १.५ टन व २ टन	१५
		डिप फ्रिज	१०
		कोल्ड स्टोरेज – ५ टन	१
		कोल्ड स्टोरेज – ३ टन	१
		एकूण :	**३०५**

उपरोक्तप्रमाणे श्री साई भक्तांकरीता ए.सी. यंत्रणा संस्थानमध्ये कार्यरत आहे. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१९(४) अन्वये मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०२/२०१६ ते ३१/०१/२०१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता रुपये ६,८९,९८०/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०१/२०१७ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

आता, मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्ष कालावधी साठी CAMC देणेकरीता येणा-या अपेक्षित खर्चाचे इस्टीमेंट तयार करते वेळी CAMC चे कामाचे स्वरूप, करावयाच्या इतर दुरूस्ती यानुसार तीन कॉन्ट्रॅक्टर यांना मेल पाठवुन दर मागविण्यात आले. त्यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

अ.नं.	**कंत्राटदाराचे नांव**	**एक वर्षाची AMC रक्कम रुपये**
१.	मे. क्लासिक कुल एअर कंडीशनिंग., मुंबई	७,९०,०००-/
२.	मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स., मुबई	७,७०,०००-/
३.	**श्री वेकंटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि ., पुणे**	**७,४५,९५१-/**

उपरोक्तप्रमाणे दर प्राप्त झाले असून, त्यातील निम्नतम दर रुपये ७,४५,९५१/- मात्रचे निम्नतम दरातील रकमेतून २०% दर कमी करुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

अ.नं.	तपशील	२०१६-२०१७ या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये	२०१७-२०१८ या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये
०१	AMC of Air Conditioning Units Installed Temple & Campus, Dwaravati, Saibaba Bhaktaniwassthan for year 2017-2018	६,८९,९८०/-	५,९६,७६०/-

उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,९६,७६०/- (अक्षरी रुपये पाच लाख, शहान्नव हजार, सातशे साठ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रक २०१६-२०१७ मध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखाली शिल्लक असणारे रुपये ३४,८५,१६९/- मात्रचे रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवून CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाचे (कार्यादेश दिलेपासून पुढील एक वर्ष) या कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसर, द्वारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे दिनांक ०१.०२.२०१७ ते दि.३१.०१.२०१८ या एक वर्षासाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.५८ **श्री साई प्रसादालायातील वायुवीजन यंत्रणेचे दिनांक ०१.०२.२०१७ ते दि.३१.०१.२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साई प्रसादालय येथील मुख्य् किचन, बुंदी किचन, लाडू किचन, पुरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचाऱ्यांना उन्हाळ्यात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या-त्या किचनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प् आणि इतर घाण एक्झॉस्टव्दारे बाहेर जावी याकरीता ८ नग डक्टेबल वायुविजन यंत्रणा व १० नग सेंट्रीफ्युगल डक्टेबल एक्झॉस्ट यंत्रणा डिसेंबर, २००८ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदरची वायुविजन यंत्रणा सतत कार्यान्वित असते. सततच्या वापरामुळे वायुविजन यंत्रणेत बिघाड झाल्यास तेथील किचनमध्ये तापमान वाढून आर्द्रता कमी होऊन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वसनाचा त्रास होऊ शकतो. प्रसंगी सदरचा कर्मचारी बेशुध्दसुध्दा पडू शकतो. त्याकरीता वायुविजन यंत्रणा तातडीने दुरुस्त् करुन चालू करणे गरजेचे असते. अशावेळेस वायुविजन यंत्रणा दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअरपार्ट त्वरीत उपलब्ध् असणे गरजेचे आहे. जर स्पेअर्स उपलब्ध् नसतील तर वायुविजन यंत्रणेचे दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होते व कर्मचाऱ्यांच्या प्रकृतीला त्रास होऊन कामकाजात खंड पडू शकतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१९(५) अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट्

(CAMC) देणेकामी मे.श्री.वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांना दिनांक ०१/०२/२०१६ ते ३१/०१/२०१७ या कालावधीकरीता रुपये ५,८८,९८८/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०१/२०१७ रोजी संपत आहे. वायुवीजन यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

आता, श्री साई प्रसादालयात वायुवीजन यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी येणा-या अपेक्षित खर्चाचे इस्टीमेंट तयार करते वेळी CAMC चे कामाचे स्वरूप, करावयाच्या इतर दुरूस्ती यानुसार तीन कॉन्ट्रॅक्टर यांना मेल पाठवुन दर मागविण्यात आले. त्यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

अ.नं.	**कंत्राटदाराचे नांव**	**एक वर्षाची AMC रक्कम रुपये**
१.	मे. क्लासिक कुल एअर कंडीशनिंग., मुंबई	६,९५,०००-/
२.	मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स., मुबई	६,८०,०००-/
३.	**श्री वेकंटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि ., पुणे**	**६,६५,३८१/-**

उपरोक्तप्रमाणे दर प्राप्त झाले असून, त्यातील रुपये ६,६५,३८१/- मात्रचे निम्नतम दरातील रकमेतून २०% दर कमी करुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकामी येणा-या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे :

अ.नं.	तपशील	वायुविजन यंत्रणा खरेदी किमंत रुपये	२०१६-२०१७ या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये	सन २०१७-२०१८ वर्षाकरीता अपेक्षित खर्च रुपये
०१	AMC of Air Ventilation System & Exhaust System Installed in Shri Sai Prasadalaya for year 2017-2018	२,३९,०४,७०७/- (वर्ष- २००८)	५,९८,९८८/-	५,३२,३०४/-

उपरोक्तप्रमाणे श्री साईप्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,३२,३०४/- (अक्षरी रुपये पाच लाख, बत्तीस हजार, तीनशे चार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रक २०१६-२०१७ मध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखाली शिल्लक असणारे रुपये ३४,८५,१६९/- मात्रचे रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई निविदा मागवून-CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाचे (कार्यादेश दिलेपासून पुढील एक वर्ष) करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालायातील वायुवीजन यंत्रणेचे दिनांक ०१.०२.२०१७ ते दि.३१.०१.२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.५९ **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी. यंत्रणेचे दिनांक १/४/२०१७ ते ३१/३/२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन शिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकूण 13 यंत्रणा तसेच स्पिलट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. यासाठी प्रत्येक वर्षी सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात येते.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१९(५) अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीकरीता रुपये १२,१५,२००/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

आता, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी येणा-या अपेक्षित खर्चाचे इस्टीमेंट तयार करते वेळी CAMC चे कामाचे स्वरूप, करावयाच्या इतर दुरूस्ती यानुसार तीन कॉन्ट्रॅक्टर यांना मेल पाठवुन दर मागविण्यात आले. त्यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

अ.नं.	**कंत्राटदाराचे नांव**	**एक वर्षाची AMC रक्कम रुपये**
१.	मे. क्लासिक कुल एअर कंडीशनिंग., मुंबई	१४,३६,०००/-
२.	**मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स., मुबई**	**१३,८५,०००/-**
३.	श्री वेकंटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि ., पुणे	१४,६३,५५५/-

उपरोक्तप्रमाणे दर प्राप्त झाले असून, त्यातील रुपये १३,८५,०००/- मात्रचे निम्नतम दरातील रकमेतून २०% दर कमी करुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

अ.नं.	तपशील	२०१६-२०१७ या वर्षातील कार्यादेशातील रक्कम रुपये	सन २०१७-२०१८ वर्षाकरीता अपेक्षित खर्च रुपये
०१	AMC of Central AHU with condensing units & other air conditioning units insatalled Installed in Shri Saibaba Hospital & Shri Sainath Hospital as per attached list.	१२,१५,२००/-	११,०८,०००/-

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ११,०८,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख, आठ हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे मंजूर अंदाजपत्रक २०१६-२०१७ मध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखाली शिल्लक असणारे रुपये ३४,८५,१६९/- मात्रचे रकमेतून करता येईल. याकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ईनिविदा मागवाव्या लागतील. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे एक वर्षाचे (कार्यादेश दिलेपासून पुढील एक वर्ष) करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी. यंत्रणेचे दिनांक १/४/२०१७ ते ३१/३/२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.६० **सन २०१७-१८ या करीता साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामासाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी दरपत्रक मागविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ – २१ (१) (ग) **"**भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.**"** व (२) पोट कलम (१) (ख) **"**भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे **"**

व्यवस्थापन समितीचा ठराव:- संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. त्यामध्ये संस्थानमार्फत प्रस्तावित कपडे धुणेसाठी किती खर्च येईल व आऊटसोर्स पध्दतीने किती खर्च येईल, याबाबतच्या तुलनात्मक तक्त्याचा समावेश करणेत यावा. तसेच श्री क्षेत्र शेगाव येथील लॉण्ड्रीच्या कार्यपध्दतीविषयी माहिती घेण्यात यावी, असे ठरले.

प्रस्ताविक :- दि. १८/०७/२०१३ रोजीपासुन साईधर्मशाळा विभाग कार्यान्वित झालेला असुन, एकुण ६ इमारती असुन १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे.

निवासासाठी एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे ५ इमारतीमध्ये एकुण १६० हॉलमध्ये असल्याने, सदरील हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येते.

साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट , उशिकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणचे वार्षिक काम करणे बाबत श्री साई श्रध्दा लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहर यांना दि.१७/०२/२०१६ ते दि.१६/०२/२०१७ अखेर एक वर्षासाठी कपडे धुण्याचे काम देण्यात आले होते. त्यावेळी त्यांचे खालील प्रमाणे दर मंजुर करण्यात आले होते –

अ.नं.		तपशिल		
१	**कामाचे स्वरुप**	साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट,उशीकव्हर, व चादर धणे / इस्त्री करणे बाबत.		
२	**कंत्राटदाराचा पत्ता**	मे. साई श्रध्दा लॉण्ड्री आणि सर्व्हिसेस, जि आर. बी.वाडी, सावळिविहीर खर्द, ता. राहाता.		
३	**कार्यादेश**	जा.नं.एसएसएस/ वशी– साईधर्मशाळा/ ६४९२/ दि.२५/०२/२०१६ रोजीचा कार्यादेश		
४	**कंत्राट कालावधी**	दि. १७/०२/२०१६ ते दि.१६/०२/२०१७ अखेर		
५	**वार्षिक मंजुर बजेट**	रु. ३,००,०००/-		
६	**दिलेले दर**	**अ.नं.**	**तपशिल**	**दर**
		१	बेडशिट	रु.३.०० + सर्व्हीस टॅक्स
		२	उशीकव्हर	रु. २.०० + सर्व्हीस टॅक्स
		३	चादर	रु. ६.०० + सर्व्हीस टॅक्स

साई धर्मशाळा येथिल बेडशिड, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणे कामी सन २०१५-१६ साठी एकुण रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तिन लाख मात्र) खर्चाची दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २०४(१६) नुसार खर्चास मंजुरी घेण्यात आली होती. त्यानुसार साई धर्मशाळा विभागाकडील कपडे धुण्यासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.नं	दिनांक	बेडशिट	उशीकव्हर	चादर	एकुण रुपये
१	१६/०२/२०१६ ते २९/०२/२०१६	२४९७	७५४	००	१०,३०३/-
२	०१/०३/२०१६ ते ३१/०३/२०१६	२०५१	११५५	००	९,६९०/-
३	०१/०४/२०१६ ते ३०/०४/२०१६	३९९८	१२११	००	१६,५२९/-
४	०१/०५/२०१६ ते ३१/०५/२०१६	३०९०	४९१	००	११,७८९/-
५	०१/०६/२०१६ ते ३०/०६/२०१६	२३९०	६३१	००	९,६९६/-
६	०१/०७/२०१६ ते ३०/०७/२०१६	१६९२	३४८	००	६,६३७/-
७	०१/०८/२०१६ ते ३०/०८/२०१६	१६८३	७५७	००	७,५४७/-
८	०१/०९/२०१६ ते ३०/०९/२०१६	१२४१	६४७	००	५,७६९/-
९	०१/१०/२०१६ ते ३०/१०/२०१६	३४१७	१२८२	००	१४,७३७/-
	एकुण -	**२२०५९**	**७२७६**	**००**	**९२,६९७/-**

साई धर्मशाळा कडे माहे फेब्रुवारी -२०१६ ते ऑक्टोबर २०१६ अखेर बेडशिट २२०५९ नग व पिलोकव्हर ७२७६ नग धुण्यास आले असुन , त्यासाठी एकुण रुपये ९२,६९७/- (अक्षरी रु. ब्यान्नव हजार सहाशे सत्त्यानव हजार मात्र) खर्च झालेला आहे. तसेच माहे नोहेंबर ते फेब्रुवारी २०१७ अखेर ४ महिन्यासाठी साधारणपणे प्रतीमहा रु.१५,०००/- प्रमाणे रु.६०,०००/- खर्च अपेक्षित आहे. असा एकत्रिक खर्च रु. १,५३,०००/- (अक्षरी रु. एक लाख त्रेप्पन हजार मात्र) होत आहे.

शिर्डी परिसरातील लॉण्ड्री धारकांचे दराबाबत सध्याचे बाजार भावाचे दर खालील प्रमाणे आहेत-

अ.नं.	**लॉण्ड्री कपडयांचा तपशील**	**यश विजया वॉशिग कं. बिरेगांव रोडे, शिर्डी.**	**घरोंदा ड्रायक्लिनर्स कोर्ट रोड, कोपरगांव**	**साई श्रध्दा लॉण्ड्री आणि सर्व्हिसेस सावळिविहीर**	**साई सोहम लॉण्ड्री चारी नं.११, शिर्डी.**	**साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री ऑण्ड आदेश ड्रायक्लीनर्स**
१	**बेडशिट**	रु. ५.०० प्रति नग	रु. ५.०० प्रति नग	रु. ३.०० प्रति नग	रु. ५.०० प्रति नग	रु. २.५० प्रति नग
२	**उशी कव्हर**	रु.३.५० प्रति नग	रु.२.०० प्रति नग	रु.२.०० प्रति नग	रु.३.५० प्रति नग	रु.१.२५ प्रति नग
३	**चादर**	रु. १०.०० प्रति नग	रु. ०५.०० प्रति नग	रु. ०६.०० प्रति नग	रु. १०.०० प्रति नग	रु. ०५.०० प्रति नग
						घेतलेले दरपत्रके अवलोकनार्थ सोबत जोडलेले आहेत.

वरील प्रमाणे तक्त्याचा अवलोकन केले असता, संस्थानला सेवा देतांना ठेकेदार हे सेवाभाव या वृत्तीने दर अत्यल्प देत असतात असे दिसुन येते.

दि. १६/०२/२०१७ रोजी एक वर्षासाठी कपडे धुण्याचे काम संपुष्टात येत असुन पुढील वर्षासाठी दि १७/०२/२०१७ ते दि.१६/०२/२०१८ नविन ठेकेदारास नियुक्ती करणे कामी दरपत्रक प्रक्रीया करावी लागणार आहे. सदर प्रक्रीयेसाठी साधारणपणे १ ते २ महिन्याचा कालावधी लागणार आहे.

साई धर्मशाळा विभागामध्ये पालखी पदयात्री तसेच ग्रुपने येणारे साईभक्त तसेच सहलीसाठी आलेले मुले यांचे चालु वर्षी गर्दीचे प्रमाण हे मागील वर्षीपेक्षा वाढत चालले आहे त्यामुळे धुण्यासाठी बेडशिट व उशीकव्हर जास्त प्रमाणात निघत आहे. सरासरी दर महिन्यासाठी बेडशिट ५,००० नग व उशीकव्हर ३,००० नग तसेच १००० चादर धुण्यासाठी निघणार आहे. त्यानुसार प्रति महिना कपडे धुन्यासाठी रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचविस हजार मात्र) अंदाजे खर्च येण्याची शक्यता आहे. त्यानुसार पुढील वर्षासाठी रु.३,००,०००/-(अक्षरी रु.तिन लाख हजार मात्र) अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

मागणी:- सन २०१७ -१८ करीता अखेर साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामासाठी नविन ठेकेदारची नेमणुक करणेकामी दरपत्रक मागविण्यास व येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबत.

संस्थान अधिनियम / ठराव नुसार अनुमान:- प्रशासकीय मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-

अ) साई धर्मशाळा विभागासाठी २०१७-१८ या सालासाठी साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणचे कामी अदांजे रु. ३,००,०००/- (अक्षरी रु.तिन लाख मात्र) चे खर्च येण्याची शक्यता आहे त्यास मान्यता असावी.

ब) साईआश्रम भक्तनिवासस्थान कडील लॉण्ड्री कामाबाबतचे वार्षिक कामाचे नविन ठेकेदाराची निवड करतांना साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर, व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाबाबत ई – निविदा प्रक्रीया एकत्रित राबविण्यात येवून कार्यादेश देण्यात यावा जेणे करुन एकसुत्रता येऊन काम चांगल्या पध्दतीने करुन घेता येईल असे नम्र मत आहे. तथापी दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. ७८५ नुसार संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री प्रस्ताव सादर करुन त्यावर निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे.

श्री साई श्रध्दा लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहर यांना दि.१७/०२/२०१६ ते दि.१६/०२/२०१७ अखेर एक वर्षासाठी कपडे धुण्याचे काम देण्यात आले आहे यांची मुदत दि. १६/०२/२०१७ अखेर संपुष्टात येत असुन नविन ठेकेदाराची नेमणुक करणेकामी (कालावधी दि. १७/०२/२०१७ ते दि.१६/०२/२०१८ अखेर पर्यंत) दरपत्रके मागविण्यास व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.३,००,०००/- (अक्षरी रु. तिन लाख मात्र) येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या वर्षाकरीता साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामासाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा विभाग)

विषय नं.६१ **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून, नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपावेतो आहे त्याच मागील वर्षाचे दरात मुदतवाढ देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४:-** २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे"

प्रस्तावना:- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील लॉन्ड्री कामासाठी दोन लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांना मा.त्रिसदस्य व्यवस्थापन समिती दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७ व मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८५ अन्वये मान्यता घेऊन, जा.नं.एसएसएस/ वशी-साईआश्रम भक्तनिवास/६७१३/२०१६ दि.०५/०३/२०१६ रोजी मे.साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, प्रोप्रा.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर व जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ६७१४/२०१६ दि.०५/०३/२०१६ रोजी मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, प्रोप्रा.अमोल अशोक जमधडे, सावळीविहीर यांना कार्यादेश देण्यात आले आहे.

या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धूणे/इस्त्री करणे तसेच निवासी भक्तांचे कपडे शुल्क आकरुन धुणे/इस्त्री करणे कामाचा कालावधी दि.२८/०२/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी ई-निविदा राबविणेबाबत दि.०१/०१/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता घेवून, सदर विषय मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयास्तव सादर करणेकामी सभाकामकाज विभागाकडे पाठविणेत आला आहे.

सदर कामासंदर्भात संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांनी सन २०१७-१८ या पुढील वर्षासाठी आहे त्याच दरात काम करण्याची तयारी दर्शविली असून सदरचे काम करण्याची संधी द्यावी, असे विनंती पत्र दिलेले आहे.

प्रस्ताव:- सन २०१६-१७ या वर्षामध्ये काम करत असलेल्या लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ अखेर असून, सदर कालावधी दि.२८/०२/२०१७ रोजी संपुष्टात येणार असल्याने, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेसाठी समाकामकाज विभागाकडे दि.१२/१/१७ रोजी सादर करण्यात आला आहे.

सदर ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी कालावधी लागणार असल्याने, मागील वर्षातील आहे त्याच मंजूर दरात व करारनाम्यातील अटी/शर्तीस अधीन राहून मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर व मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस. सावळीविहीर यांना माहे- ०१ मार्च २०१७ पासून नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ कार्यादेश द्यावा लागणार आहे.

त्यासाठी माहे मार्च २०१६ ते नोव्हेबर २०१६ अखेर नऊ महिन्यांमध्ये रु.१७,६३,५९८/- एवढा खर्च झालेला आहे. म्हणजेच दरमहा सरासरी अंदाजे रु.१,९५,९५५/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:- सन २०१७-१८ साठी नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस कालावधी लागणार असल्याने, मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर व मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर यांना आहे त्याच दरात व अटी/शर्तीस अधीन राहून माहे- ०१ मार्च २०१७ पासून नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ कार्यादेश देणेस.

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांना माहे ०१ मार्च २०१७ पासून मुदतवाढ कार्यादेश देणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

विषय नं.६२ **सन २०१७-१८ या वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील लॉण्ड्री कामाची ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी एकूण १५३६ खोल्या कार्यरत असून, या ठिकाणी साईभक्तांना चांगल्या दर्जाची निवासव्यवस्था मिळावी यासाठी मा.त्रीसदस्य व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार येथील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे ही कामे लॉण्ड्री ठेकेदारांकडून आऊटसोर्स पध्दतीने करुन घेतली जात आहे. मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७ व दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८५ अन्वये वेगवेगळ्या कपड्यांसाठी दोन लॉण्ड्री ठेकेदारांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/६७१३/२०१६ दि.०५/०३/२०१६ ने मे.साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांना खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

अ) संस्थाननचे कपडे

अ.नं.	कपड्यांचा तपशील	प्रती नग दर रुपये सर्व करांसह
०१	बेडशीट धुवून इस्त्री करणे	३.४२
०२	चादर धुणे	७.९८

ब) भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे.

पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे.			पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे.		
अ.नं	कपड्यांचा तपशील	प्रती नग दर रुपये	अ.नं	कपड्यांचा तपशील	प्रती नग दर रुपये
१	सफारी सुट	१६.००	१	सफारी सुट	८.००
२	शर्ट/टी शर्ट	८.००	२	शर्ट/टी शर्ट	४.००
३	पॅन्ट/जीन्स पॅन्ट	८.००	३	पॅन्ट/जीन्स पॅन्ट	४.००
४	जाकेट/स्वेटर	८.००	४	जाकेट/स्वेटर	४.००
महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे.			महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे.		
अ.नं	कपड्यांचा तपशील	प्रती नग दर रुपये	अ.नं	कपड्यांचा तपशील	प्रती नग दर रुपये
१	साडी	२०.००	१	साडी	१२.००

२	ब्लाऊज	६.००	२	ब्लाऊज	३.००
३	टी-शर्ट	८.००	३	टी-शर्ट	५.००
४	स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट	८.००	४	स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट	५.००
५	पॅन्ट/जीन्स	८.००	५	पॅन्ट/जीन्स	५.००
६	नाईट सुट	१३.००	६	नाईट सुट	६.००
७	जाकेट/स्वेटर	८.००	७	जाकेट/स्वेटर	५.००
८	पेटीकोट/गाऊन	१०.००	८	पेटीकोट/गाऊन	६.००
मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे.			**मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे.**		
अ.नं	**कपड्यांचा तपशील**	**प्रती नग दर रुपये**	**अ.नं**	**कपड्यांचा तपशील**	**प्रती नग दर रुपये**
१	सफारी सुट	१५.००	१	सफारी सुट	८.००
२	शर्ट/टी शर्ट	८.००	२	शर्ट/टी शर्ट	४.००
३	पॅन्ट/जीन्स पॅन्ट	८.००	३	पॅन्ट/जीन्स पॅन्ट	४.००
४	जाकेट/स्वेटर	८.००	४	जाकेट/स्वेटर	४.००
५	शॉर्ट पॅन्ट	८.००	५	शॉर्ट पॅन्ट	४.००

तसेच जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/६७१४/२०१६ दि.०५/०३/२०१६ ने मे.साईराज लॉन्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर यांना खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

अ.नं.	**कपड्यांचा तपशील**	**प्रती नग दर रुपये सर्व करांसह**
१.	उशी कव्हर धुवून इस्त्री करणे.	२.०१
२.	टॉवेल धुवून ड्रायर करणे.	२.५८

उपरोक्त सन २०१५-१६ वर्षासाठी मिळालेल्या मान्यतेनुसार निर्णय क्र.७७ ला अधिन राहून माहे मार्च २०१६ ते माहे फेब्रुवारी २०१७ या एक वर्ष कालावधीसाठी दिलेल्या लॉण्ड्री कार्यादेशास संदर्भ क्र.०३ मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८५ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. त्यामध्ये संस्थानमार्फत प्रस्तावीत कपडे धुणसाठी किती खर्च येईल व आऊटसोर्स पध्दतीने किती खर्च येईल. या बाबतच्या तुलनात्मक तक्त्याचा समावेश करणेत यावा. असे ठरले आहे.

प्रस्ताव:- संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या ठिकाणी संस्थानमार्फत लॉण्ड्रीचे काम करण्यात येते. तेथील कपडे धुणेचे मशिनची कपडे धुणेची क्षमता कमी असल्याने त्या ठिकाणी व्दारावती, साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान या तीन निवासस्थानांमधील कपडे धुण्याचे काम करण्यात येत आहे.

साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा निवासस्थान, येथील कपडे लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून आऊटसोर्स पध्दतीने धुवून घेतले जात असून, साईआश्रम भक्तनिवास विभागातील २०१६-१७ मध्ये धुणेसाठी दिलेल्या कपड्यांची संख्या व कपडे धुणेसाठी झालेला खर्च परिशिष्ट " अ " प्रमाणे आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार एकत्रित युनिट तयार करणेसाठी काही कालावधी लागणार आहे. तसेच उपरोक्त दोन्ही लॉण्ड्री कामाचा कार्यादेश दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ अखेर पर्यंत असल्याने, नव्याने ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे.

अ) स्थानिक लॉण्ड्री दरधारकांकडून सध्याच्या बाजारभावाची चौकशी केली असता, त्यांनी दिलेल्या सर्व करांसह दरांचा तपशील खालील प्रमाणे.

अ.नं.	तपशील	मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी दिलेले दर रु.	मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी दिलेले दर रु.	मे.घरोंदा ड्रायक्लिनर्स, कोपरगाव यांनी दिलेले दर रु.	**संस्थानचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले सर्व करासह सध्याचे दर**
१.	बेडशीट	०६:००	०६:००	०५:००	**०३:४२**
२.	उशी कव्हर	०४:००	०३:००	०२:००	**०२:०१**
३.	चादर	१०:००	०९:००	०५:००	**०७:९८**
४.	टॉवेल	०५:००	०४:००	०५:००	०२:५८

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, संस्थानचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले दर हे आजच्या बाजार भावापेक्षा कमी आहेत.

ब) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये माहे मार्च २०१६ ते माहे नोव्हेबर २०१६ अखेर नऊ महिन्यांमध्ये रु.१७,६३,५९८/- एवढा खर्च झालेला असून, डिसेंबर ते फेब्रुवारी २०१७ अखेर या तीन महिन्यांचा संभाव्य खर्च रु.११,३९,१९९/- इतका होईल. असे एकूण या आर्थिक वर्षात रु.२९,०२,७९७/- खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील पुढील प्रमाणे

अ.नं	माहे	बेडशीट व चादर धुणे साईश्रध्दा लॉण्ड्री,सा.विहीर	उशी कव्हर व टॉवेल धुणे साईराज लॉण्ड्री,सा.विहीर	एकूण
१	मार्च २०१६	५५,२६१/-	१८,५१५/-	७३,७७६/-
२	एप्रिल २०१६	७१,४६६/-	२२,७५१/-	९४,२१७/-
३	मे २०१६	१,०१,९६१/-	२८,५३५/-	१,३०,४९६/-
४	जून २०१६	१,००,४६७/-	२२,६२४/-	१,२३,०९१/-
५	जूलै २०१६	१,३०,३०८/-	२६,५५५/-	१,५६,८६३/-
६	ऑगस्ट २०१६	१,३६,३६०/-	२९,१६२/-	१,६५,५२२/-
७	सप्टेंबर २०१६	२,३३,११८/-	४९,७१२/-	२,८२,९००/-
८	ऑक्टोबर २०१६	२,९४,८१५/-	६२,१८५/-	३,५७,०००/-
९	नोव्हेंबर २०१६	३,१२,६७१/-	६७,०६२/-	३,७९,७३३/-
			एकूण झालेला खर्च	**१७,६३,५९८/-**
या चालू वर्षातील माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ अखेर होणारा संभाव्य खर्च (माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये झालेला खर्च रु.३,७९,७३३/- दरमहा गृहीत धरुन ३ महीन्यांचा अंदाजे संभाव्यखर्च)				११,३९,१९९/-
			एकूण खर्च	**२९,०२,७९७/-**

म्हणजेच सन २०१५-१६ या वर्षामध्ये संभाव्य झालेला खर्च रु.२९,०२,७९७/- यावर पुढील वर्षासाठी होणारा वाढीव खर्च १० % गृहित धरुन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी एकूण अंदाजे खर्च रु.३१,९३,०७६/- पुर्णांकित रु.३२,००,०००/-(अक्षरी रु.बतीस लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा कालावधी दि.२८/०२/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. साईभक्तांना देण्यात येत असलेल्या सेवा-सुविधांमध्ये अडचण निर्माण होऊ नये, यासाठी दरम्यानच्या कालावधीत खालील प्रमाणे आऊटसोर्स पध्दतीने कपडे लॉण्ड्री करुन घेणेकामी सन २०१७-१८ या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

१) त्याकामी दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

२) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे कामाकरीता रु.३२,००,०००/- (अक्षरी रु.बतीस लाख मात्र) चे खर्चास,

उपरोक्त १ व २ बाबींवर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील लॉण्ड्री कामासाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

विषय नं.६३ **(अ) संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलांचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी–

अ. नं.	**कर्मचा-याचे नाव**	**कर्मचा-याशी नाते**	**आजाराचे नाव**	**डॉक्टरांचे नाव**	**रुग्णालयाचे नाव**	**एकूण मागणी रक्कम**	**एकूण देय रक्कम**
	संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते						
1	श्री.सुभाष चिंधा निकम विभाग-संरक्षण हुद्दा-पहारेकरी	मुलगा	Fracture	डॉ.खुराणा	संचेती हॉस्पीटल, पुणे	१४३७११/-	१३८५४२/-

2	श्री.परसराम सोमाजी भालेराव विभाग-सरंक्षण हुद्दा –पहारेकरी	पत्नी	Dengue NS 1 Reactive	डॉ.काटे	रुबी हॉल क्लीनीक,पुणे	१०३७६०४/-	९७१४३५/-
				एकुण रक्कम रु.		**११८१३१५**	**११०९९७७**

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.११०९९७७**/-** इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतली. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती

विषय नं.६३ (ब) संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलांचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी –

अ. नं.	कर्मचा-याचे नाव	कर्मचा-याशी नाते	आजाराचे नाव	डॉक्टरांचे नाव	रुग्णालयाचे नाव	एकूण मागणी रक्कम	एकूण देय रक्कम
	अ – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते						
१	श्री.सुभाष मल्हारी बंदावणे विभाग-ध्वनिक्षेपण हुद्दा-विद्युत पर्यवेक्षक	मुला	Kidney Transplant	डॉ.देसाई	साईबाबा हॉस्पिटल	३५९१७.००	३५९१७.००
२	श्री.अनिल गंगाधर थोरात विभाग-सभाकामकाज हुद्दा-लिपीक टंकलेकखक	वडिल	Ca	डॉ.बो-हाडे	क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक	३४७२९.००	३४५४४.००
३	श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे विभाग-द्वारावती हुद्दा-मदतनीस	स्वंतः	Ca	डॉ.देवरे	रुबी हॉल क्लीनीक,पुणे	१७४४२२.००	१३८८६४.००
४	श्री.पोपट लव्हाजी राक्षे विभाग-श्री साई प्रसादालय हुद्दा-मदतनीस	स्वंतः	Celial Trunk & thrombosis with splenic Infatcts	डॉकांदळकर	सहयाद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, नाशिक	१८३१२२.००	१७९४६२.००
					एकुण	**४२८१९०/-**	**३८८७८७/-**

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३८८७८७**/-** इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी

करुन घेतली. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ व ब प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कमत्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.६४ **डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, त्वचारोग तज्ञ यांनी मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान विरुध्द दाखल केलेल्या रिट पिटीशन (10708/ 2014) मध्ये कंटेम्प्ट पिटीशन नं.722/ 2016 दाखल केलेबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेमध्ये डॉ.शामकुवर, आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने फरक अदा करणेपुर्वी शासनाचे विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणेबाबतचा खालील प्रस्ताव सादर करणेत आला होता.

तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/११/२०१४ निर्णय क्र. ९६८ तसेच दि. २९/०२/२०१६ रोजीचे निर्णय क्र. १८५ नुसार अनुक्रमे डॉ. सुभाष श्रीराम शामकुवर आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच डॉ. कांबळे यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयानुसार त्यांना साधारणतः रक्कम रु. २७,४५,०००/- चे आसपास फरक अदा करावा लागणार आहे.

संबंधीत डॉक्टरांची नावे, हजर तारीख व दिलेले सुरवातीचे मानधन खालीलप्रमाणे आहे.

अ. नं.	डॉक्टरांचे नाव	कामावर हजर तारीख	कामावर हजर होते वेळी दिलेले मानधन
१	डॉ सुर्यकांत पाटील आरएमओ बीटीओ	 ०७/१०/२००५ ०१/०९/२००८	 १७०००
२	डॉ सुभाष शामकुवर, आरएमओ	१७/१०/२००५	१७०००
३	डॉ उल्हास पवार, आरएमओ	०१/०६/२००६	१७०००
४	डॉ दिपक कांदळकर, आरएमओ	०७/०९/२००६	१७०००
५	डॉ दादासाहेब कांबळे वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग)	१४/१०/२००५	२१०००

सदरहु विषयाचा पूर्व इतिहास व वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलची स्थापना सन २००५ मध्ये झालेली आहे त्यावेळी हॉस्पिटलसाठी आकृतीबंध मंजुर नसल्यामे वैद्यकीय अधिकारी, टेक्निशियन, स्टाफनर्स, मॅनेजर्स इत्यादी पदांवर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरती करणेत आली होती.

उपरोक्त श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचारी वर्गांना ठरावीक मानधन देणेबाबतचाप्रस्ताव दि. ०५/०१/२००५ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ६६७ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधितांच्या हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणार फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशी१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ अन्वये आदेश पारीत करणेत आलेला होता.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थानकडून दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी करणेत आलेली नाही.

डॉ.दादासाहेब कांबळे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन ८९११/२०१३ दाखल केले होते त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

In that view of the matter, writ petition is disposed off with direction to respondent to decide the representations dated 09.09.2012 and 23.02.2013 made by the petitioner, if already not decided, as expeditiously as possible, however, within two months from today.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार डॉ. कांबळे यांचे वेतनश्रेणीबाबत निर्णय घेणेसाठी दि ०३/०८/२०१४ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

दि. १३/०६/२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधात त्वचारोग तज्ञ पदास मंजुरी नसलेने डॉ कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती. ती त्यांनी त्यांवेळेस स्विकारलेलीआहे दि. ०७/०८/२००९ रोजीच्या आकृतीबंधात पदाचा समावेश असल्याने त्यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत आलेली आहे त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना सुरवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी व वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही .

यावर मा त्रिसदस्य समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६५१ खालीलप्रमाणे झाला होता.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो कन्सल्टंट (त्वचारोग) श्री साईनाथ रूग्णालय यांनी दि. ०९/०९/२०१२ व दि. २३/०२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ. सुभाष श्रीराम शामकुवर, आरएमओ व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करणेबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल केले होते त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. ३०/०६/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

Respondent No 2 shall decide the representation given by the petitioners with regard to pay scale, expeditiously and on its own merits, within a period of 4 months from today.

मा न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि. ०६/११/२०१४ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे सभेत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजुरी नसल्याने अर्जदार यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरवातीस मानधन अदा करणेत आलेले आहे. ते आदेश त्यांनी विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आल्यानंतर मा व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्येवेतन अदा करणेत आलेले आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारांस वार्षिक वेतनवाढी अदा करणेत आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरवातीचे रूजू तारखेपासून वेतनश्रेणीमध्ये वेतन देता येणार नाही अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही तसेच अशाच प्रकारे डॉ दादासाहेब लुमा कांबळे यांनी विनंतीअर्ज व रिट पिटीशन नं. ८९११/२०१३ दाखल केले होते. मा त्रिसदस्य समितीने दि.०३/०८/२१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५१ अन्वये त्यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र ९६८ खालीलप्रमाणे झाला होता.

"प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले".

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुद्धा उपरोक्त निर्णय झालेला आहे असे दिसते.

समान मागण्या व समान मुद्दा असताना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुस-या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आल्याने डॉ. कांबळे यांनी पुनःश्च मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ दाखल केले होते. सदर पिटीशनमध्ये मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे निर्णय क्र. ६५१ नुसार संस्थानने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यामुळे दि. ०६/११/२०१४ च्या सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केली होती.

त्यानंतर डॉ. कांबळे यांनी पुन्हाविनंती अर्ज सादर केल्याने तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासुनच सर्वांना लागु करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही अन्य डॉक्टरांना देखील याच नियमाने वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी, व्यवस्थापन समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही."

दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी न करणेत आल्याने डॉ. शामकुवर व इतर ०३ यांनी पुन्हा मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी विनंती अर्ज केला होता. सदरहू अर्जावर निर्णय घेणेसाठी मा. अध्यक्ष साहेब यांनी याबाबतचा प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेबाबत निर्देश दिल्याने दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र. ९६८ निरस्त करणेबाबत दि. ११/१०/२०१५ व दि. १८/१२/२०१५ रोजी टिपण्या सादर करणेत आल्या होत्या. त्यानंतर मात्र मा. उपकार्यकारी अधिकारी व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ ला अनुसरुन काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/ वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ ची अंमलबजावणी करणेबाबत समक्ष निर्देश दिले. सदर निर्देशास अनुसरुन, दि. ०६/०१/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दि. ०६/०१/०१६ रोजी डॉ. शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेबाबतचा आदेश पारित करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ. कांबळे यांनाही दि २९/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. १८५ नुसार दि. १४/१०/२००५ पासून सन २००९ चे मंजुर आकृतीबंधात वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) पदासाठी असलेली मंजूर वेतनश्रेणी दि. २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये लागु करणेत आलेली आहे.

डॉ.कांबळे यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रीट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ११/०४/२०१६ रोजी डॉ. कांबळे यांना ८ आठवड्याच्या आत म्हणजेच दि. ०६/०६/२०१६ पर्यंत त्यांना मॉनेटरी बेनिफिट्स (Monetary Benefits) देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

त्याप्रमाणे डॉ. कांबळे यांना दि. २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये वेतनश्रेणी लागु करुन व एप्रिल २०१६ चे पगारपत्रकापासून सुधारित वेतन अदा करणेत येत आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केलेले आहे असे नम्र मत आहे.

तथापि, रूग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने दि. ०५/११/२००५ रोजी त्यावेळच्या मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय क्र. ६६७ योग्य आहे किंवा कसे याबाबत संभ्रमावस्था असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी सन २००४ साली लागु झालेल्या अधिनियमातील खालील तरतुदींचा तसेच संस्थानचे मंजूर २००७ व २००९ सालचे मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्तीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

अधिनियमातील तरतुद नं. २८/१ –

कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचुकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास तसेच करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यांवर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास त्याप्रमाणे आदेश काढता येईल.

अधिनियमातील तरतुद नं. २८/२ –

जेव्हा एखाद्या प्रकरणी पोटकलम (1) खाली राज्य शासनाने कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा अभिलेख मागवला असेल तेव्हा, राज्य शासनास, त्या संबंधात पोटकलम (1) खाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्याचा येईपर्यंत, कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, राज्य शासन, पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

अधिनियमातील तरतुद नं. ३०/१ –

समितीचा कोणताही ठराव, निर्णय अथवा आदेशांची अंमलबजावणी किंवा समितीकडून किंवा समितीच्या वतीने करण्यात यावयाची असेल किंवा करण्यात येत असेल, अशी कोणतीही कृती जनहिताच्या विरोधात व या अधिनियमाद्वारे वा अधिनियमान्वये किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा त्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरुन करण्यात येणारी कृती आहे अथवा त्यामुळे व्यवस्थापन निधीचा दुरुपयोग वा गैरवापर होण्याची किंवा अपव्यवय होण्याची शक्यता आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी, अशा ठरावाची वा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करता येईल किंवा अशी कोणतीही कृती प्रतिषिध्द करता येईल अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाकडून समितीला आणि कार्यकारी अधिका-याला तात्काळ पाठविण्यात येईल.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकडील आकृतीबंध २००७ व २००९ साली मंजुर झाला असल्याकारणाने अर्जदार डॉक्टरांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी द्यावी किंवा कसे व फरक द्यावा किंवा कसे याबाबत वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचेकडे संस्थानमार्फत विचारणा केली असता त्यांनीही "जर आकृतीबंध २००७ व २००९ मध्ये मंजूर झालेला असेल तर आकृतीबंध मंजूर झालेल्या दिनांकापासून पदांचे मंजुरीप्रमाणे डॉक्टर्स यांना फरक देणे योग्य होईल" असे सुचविले आहे.

सबब, उपरोक्त अधिनियमातील तरतुदी, सन २००७ व २००९ च्या मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्ती व वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचे अभिप्राय तसेच मा. मुख्यलेखाधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १३ (५) मधील तरतुदीनुसार आकृतीबंध मंजूर होईपर्यंत कोणत्याही अधिकारी / कर्मचा-यांची नेमणूक करता येत नाही याचाच अर्थ आकृतीबंध मंजुरीच्या दिनांकापासून किवा तदनंतर नियमित नेमणूक करता येतील त्यामुळे नियमित वेतनश्रेणी सुद्धा त्याच दिनांकापासून देय होईल, असे दिलेले अभिप्राय विचारात घेता, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणेस तसेच अर्जदारांनी याकामी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन मध्ये दिलेल्या आदेशाबाबत वस्तुस्थिती मांडण्यासाठी म्हणणे दाखल करणेस मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र ८०७ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमुद केलेल्या अटी शर्ती व अभिप्रायांचा विचार करता डॉ शामकुवर आरमएओ व इतर 3 आरएमओ तसेच वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) यांना आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासून वेतनरेणी लागु करण्यात यावी, असे समितीचे मत झाले. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेत येऊन मा उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी. असे ठरले.

त्यास अनुसरून जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३३२२०१७ दि. १२/०१/२०१७ चे पत्रान्वये मा प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागु करणेकामी मार्गदर्शन मिळणेबाबत सविस्तर वस्तुस्थिती मांडणेत आली आहे.

आता, दि. १२/०१/२०१६ रोजी डॉ दादासाहेब लुमा कांबळे (त्वचारोग तज्ञ) यांनी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानविरूध्द दाखल केलेल्या रिट पिटीशन नं १०७०८/२०१४ या केससंबंधीत संस्थानचे वतीने कामकाज पहाणारे संस्थान ॲड संजय चौकीदार यांनी या रिट पिटीशनमध्येकंन्टेंम्ट पिटीशन नं ७११/२०१६ दाखल केले असल्याचे खालीलप्रमाणे ईमेल द्वारे कळविले आहे.

IN THIS REGARD I HAVE TO INFORM YOU THAT AFORESAID EMPLOYEE HAD APPROACHED HIGH COURT ALLEGING CONTEMPT OF HIGH COURT ORDER DATED 11/04/2016 WHICH IS REGISTERED AS CONTEMPT PETITION NO 722/2016.

THE SAID MATTER WAS LISTED FOR THE FIRST HEARING BEFORE HIGH COURT ON 05/01/2017 WHICH WAS INFORMED TO YOUR OFFICE ON 11/01/2017 SHRI NAWLE ATTENDED HIGH COURT ON 12/01/2017 HOWEVER, MATTER DID NOT REACH ON THAT DATE AND WILL BE TAKEN UP ON ANY DAY AS PER THE CONVENIENCE OF THE COURT.

RECORD SHOWN TO ME REVEALS THAT ORDER OF HIGH COURT IS PARTIALLY COMPLIED AND REASON FOR REMAINDER COMPLIANCE IS WHOLLY UNSATISFACTORY. THE REFERENCE TO THE GOVERNMENT FOR GUIDANCE. WE HAD A CONVERSATION ON MOBILE PHONE ON 12/01/2017 ON THIS ISSUE.

IN MY OPINION NO ONE IS ABOVE HIGH COURT ORDER. IN ORDER TO AVOID ACTION OF CONTEMPT PLEASE LOOK INTO MATTER SERIOUSLY AND ENSURE THAT HIGH COURT IS COMPLIED WITH PUNCTUALLY.

तरी, ॲड चौकीदार यांनी दिलेल्या पत्राबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये सदरहू विषयाबाबत समिती सदस्य मा.ॲडमोहन जयकर यांनी मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारेॲडव्होकेट यांचेबरोबर चर्चा करुन विषय समजून घ्यावा व सविस्तर वस्तुस्थिती अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

विषय नं.६५ **शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरीत रु.५ कोटी इतके सहाय्यक अनुदान देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम** 2004 **मधील तरतुद**: (2004 चा महा. 14) याच्या कलम 21 च्या पोट-कलम (1क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

01. निर्णय क्रमांक 130, दिनांक 17 फेब्रुवारी, 2007.
02. निर्णय क्रमांक 23, दिनांक 03 जानेवारी, 2009.
03. निर्णय क्रमांक 309, दिनांक 23 मे, 2014.
04. निर्णय क्रमांक 828, दिनांक 30 नोव्हेंबर, 2016.

प्रस्ताविक: उपरोक्त प्रमाणे दि.17/02/20007 व दि.03/01/2009 रोजी झालेले निर्णयानुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने उपरोक्त अधिनियम 2004 चे तरतुदी नुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील No.SSV-011/C.R.44/ Desk- XVI . दि.24 जून, 2011 रोजीचे आदेशान्वये, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना पुढील अटी व शर्तीच्या अधिनतेने रु.50 कोटी (रु.50 कोटी) इतक्या मर्यादेपर्यंत सहाय्यक अनुदान देण्यास, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेला प्राधिकार व परवानगी दिली आहे.

1. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित मंजूर रकमेचा विनियोग केवळ शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्यासाठी करील.
2. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित अशा अनुदानाचा स्वतंत्र हिशोब ठेवील आणि त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करणार नाही.
3. उक्त कंपनी, सहाय्यक अनुदानाचा विनियोग केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला, विनियोग प्रमाणपत्र तीन प्रतीत सादर करील.
4. शासनमान्य लेखापरिक्षकांचा, अनुदानाच्या विनियोगाबाबतचा लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला सादर करण्यात येईल.

5. विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान 1,000 चौरस फुट इतकी जागा माहितीकेंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल.
6. राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर अटी व शर्ती, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांना व विश्वस्तव्यवस्थेला बंधनकारक असतील.

उपरोक्त शासन आदेशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना आजअखेर एकुण रुपये 45 कोटी इतके सहाय्यक अनुदान खालीलप्रमाणे देण्यात आले आहे.

01. टप्पा क्रमांक 01 : रुपये 15 कोटी (दि.05/07/2011 रोजी)
02. टप्पा क्रमांक 02 : रुपये 20 कोटी (दि.25/07/2011 रोजी)
03. टप्पा क्रमांक 03 : रुपये 10 कोटी (दि.09/09/2011 रोजी)

शासनाचे उपरोक्त अट क्र.5 मध्ये नमूद केलेनुसार संस्थानला माहिती केंद्र, प्रसिध्द केंद्र इत्यादी उभारण्यासाठी 1000 चौरस फुट जागा मिळणार आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठकीचेवेळी व्हि. आय. पी. पास वितरण व्यवस्था व इतर सुविधा उपलब्ध करणेबाबत संस्थानकडे मागणी केली आहे. सदर सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शासनाने देऊ केलेली 1000 चौरस फुट जागा अपुरी पडणार असल्याने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे 2000 चौरस फुट जागेची मागणी करणेबाबतचे प्रस्तावावर दि.30/11/2016 रोजीचे सभेत झालेले निर्णयानुसार 2000 चौ. फुट जागेच्या मागणीबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना दि05/01/2017 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

प्रस्ताव: तरी शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरीत रु.5 कोटी इतके सहाय्यक अनुदान देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.30/11/2016 रोजीचे सभेत तुर्त स्थगित ठेवेणेत यावे असे ठरले आहे. मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी (विधी व न्याय विभाग) यांचेशी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत 02/01/2017 रोजी चर्चा झाली. सदरहू चर्चेत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना रक्कम रु.5 कोटी संस्थानकडून द्यावयाची आहे. सदरहू रक्कम देणेत यावी. त्यामुळे शासन निर्णयानुसार कार्यवाही पूर्ण होईल तसेच विमानतळाचे काम अंतीम टप्प्यात असल्याने त्यासाठी उपयोग होईल. तरी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना रु5 कोटी इतकी देय असलेली रक्कम अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.प्रधान सचिव व विधी परामर्शी (विधी व न्याय विभाग) यांचा अभिप्राय तसेच शिर्डी विमानतळाचे काम अंतीम टप्प्यामध्ये असल्याने या निधीचा त्यांना उपयोग होईल याचा विचार करता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरीत रु५ कोटी इतके सहाय्यक अनुदान देणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू रक्कम देणेपुर्वी संस्थानला विविध सेवा पुरविणेकामी त्यांचेकडून २००० चौ.फुट जागा कायमस्वरुपी घेण्यात यावी, असे ठरले.**

तसेच यापुर्वी दिलेल्या अर्थसहाय्याचा काय वापर केला याबाबत चर्चा करणेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना सभेसमोर बोलविणेत यावे व काकडी विमानतळाला साई शिर्डी विमानतळ हे नाव देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.६६ **श्री साईनाथ रुग्णालयातील ओपीडी केबीनचे दरवाजे इमारतीच्या बाहेरील बाजूस उघडते करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- साईभक्तांच्या निवासासाठी बनवलेल्या साईबाबा धर्मशाळा इमारतीत अंतर्गत फेरबदल करुन साईनाथ रुग्णालय तयार करणेत आले आहे. रुग्णालय इमारतीच्या तळमजल्यावर ओपीडी मध्ये रुग्णांची मोठया प्रमाणात गर्दी असते यासाठी काही ओपीडीचे दरवाजे बाहेरील बाजूस करावे जेणे करुन रुग्णालयाच्या आतील पॅसेजमध्ये गर्दी होणार नाही असा प्रस्ताव वैद्यकीय अक्षिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी सादर केला होता. त्यानुसार याकामी वैद्यकीय अधिक्षीका, श्रीमती पितांबरे, उप कार्यकारी अभियंता, श्री. आहेर, उप अभियंता, श्री देसाई यांनी रुग्णालय इमारतीची दि.११/०१/२०१७ रोजी पहाणी केली असून त्यानुसार पाच ओपीडी केबीनचे दरवाजे बाहेरील बाजूने करणेचे ठरले आहे.

प्रस्ताव:- याकामी रुग्णालय इमारतीच्या पाच ओपीडी केबीनच्या खिडक्या काढून त्याठिकाणी RCC डोअर फ्रेम व वॉटर प्रुफ फ्लश डोअर बसवावे लागतील. याकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.नं.	तपशिल	परिमाण / एकक	दर	रक्कम
०१	कॉक्रीट (M 40 ग्रेड) डोअर फ्रेम साईज – 60 mm x 100 mm	८५ र. फुट	१७२/-	१४,३२०/-

०२	वॉटर प्रुफ फ्लश डोअर (३० mm जाड) साईज – ७'X३' = ०५ नग	१०५ चौ. फुट	१२०/-	१२,६००/-
०३	लॅमीनेट (1 mm जाड) साईज – ८'X४' = ०५ नग	१६० चौ. फुट	३८/-	६,०८०/-
०४	ॲल्युमिनीअम स्लायडींग खिडकी व ग्रिल काढणे व दरवाजा बसविणेसाठी खिडकीचे खालील बांधकाम तोडणे.	०५ नग	५००/- प्र. नग	२५००/-
			एकूण रक्कम रु.	**३५,८००/-**

उपरोक्त कामासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रु.३५,८००/- मात्र खर्च येईल. तरी विषयांकीत कामी येणारे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ओपीडी केबीनचे दरवाजे इमारतीच्या बाहेरील बाजूस उघडते करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.६७ **एस.एल.पी.नं. ३५८४६/२०१६ सौ.संजीवनी दशरथ महांबरे व इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर मध्ये वकील फी अदा करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील कलम १७. (१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्त व्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील .

(च) (२) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील.

प्रस्ताव- मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे कोर्टात एस.एल.पी.नं. ३५८४६/२०१६ सौ. संजीवनी दशरथ महांबरे व इतर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर यांचे विरुध्द दाखल केले आहे. प्रस्तुतचे एस.एल.पी. हे मौजे शिर्डी येथील स.नं. १४८/१ मधील क्षेत्र ४ हे. ५९ आर. संस्थानकरीता भूसंपादनाची कार्यवाही मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे मार्फत चालू आहे. मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी सदर जागेचा एकतर्फी ताबा घेतला आहे, त्यासंदर्भात पिटीशनरने सदरचा एस.एल.पी. अर्ज दाखल केला आहे. यापुर्वी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीट औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं ३९०/२००२ व रिट पिटीशन नं. १९४३/२०१६ दाखल करण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाने दोन्ही रिट पिटीशन अनुक्रमे दि. २५/०४/२०१४ व दि. ०३/०३/२०१६ रोजी आदेश करुन निकली काढले आहे.

प्रस्तुत निर्णयाचे नाराजीने अर्जदाराने एस.एल.पी.नं. ३५८४६/२०१६ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केले आहे, प्रकरणी संस्थानचे वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे वकीलाची नेमणूक करावी लागणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे पॅनलवर वकीलाची नेमणूक केलेली नाही. यापुर्वी एस.एल. पी. नं. २९८७५/२०१५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांना वकीलपत्र देण्यात आले आहे, त्यामध्ये त्यांना admission stage व affidavit filing कामी रु. १,१०,०००/- व जर सदर केस ॲडमीट झाली तर फायनल हियरींग पर्यंतची वकील फी रु. २,२०,०००/- अशी एकुण रु. ३,३०,०००/- वकील फी बाबत मा. व्यवस्थापन समितीचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३२ अन्वये मंजूरी घेवून वकीलपत्र दिले आहे.

ॲडव्होकेट श्री.संजय खर्डे, यांना एस.एल.पी.नं. ३५८४६/२०१६ चे संदर्भात वकील फी कळविण्याबाबत दि.२८/१२/२०१६ रोजी ई मेल केला होता, त्यावर त्यांनी दि.५/१/२०१७ रोजी खालील प्रमाणे कळविले आहे.

With reference to aforesaid subject it is to inform you that I am already appearing in another matter arising from the land acquisition proceedings. My fees for filing vakalatnama, affidavit and appearance in the court till the admission stage would be Rs.1,10,000/- If this SLP is admitted, I would not charge for separate fees for final hearing in this matter as in earlier matter I have already quoted my fees for final hearing.You are requested to send necessary documents along with vakalatnama, for filing in the hon'ble Suprem Court.

विभागाचा अभिप्राय- प्रकरणी, मा.सर्वोच्च न्यायालयात, दि.२३/०१/२०१७, रोजी, तारीख नेमलेली असल्याने ॲड., श्री संजय खर्डे, यांचे ई-मेलचा विचार करता, त्यांना, एस.एल.पी.नं.३५८४६/२०१६, मध्ये, श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डी, च्या वतीने, मा. सर्वोच्च न्यायालयात कामकाज पहाणेकामी, जा.क्र.एसएसएस वशी/विधी/५३९५/२०१७, दि.२०/०१/२०१७, रोजीचे पत्राने विनंती करुन त्यांना वकीलपत्र दिलेले आहे, प्रस्तुत केस मध्ये त्यांना admission stage कामी द्यावयाची वकील फी, रु.१,१०,०००/-, चे खर्चास, मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून अदा करता येईल.

तरी, एस.एल.पी.नं.३५८४६/२०१६, मध्ये, श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डी, च्या वतीने, मा. सर्वोच्च न्यायालयात, कामकाज पहाणेकामी ॲड., श्री संजय खर्डे, यांना admission stage कामी द्यावयाची वकील फी, रु.१,१०,०००/- चे खर्चास, मान्यता मिळणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, एस.एल.पी.नं.३५८४६/२०१६, मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डीच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात कामकाज पहाणेकामी ॲड.श्री संजय खर्डे, यांना admission stage कामी रु.१,१०,०००/- मात्र वकील फी अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

तसेच मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये संस्थानच्या प्रलंबीत प्रकरणांसंदर्भात तेथे संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडश्री.संजय खर्डे यांचेशी समिती सदस्य मा.ॲडमोहन जयकर यांनी चर्चा करुन सद्य:स्थिती जाणून घ्यावी, असे ठरले. (कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.६८ **जनहित याचीका क्र. २५/२०१२, मधील, चौकशी अधिकारी, ॲड श्री पी.एस. परांजपे, यांचे चौकशीचे कामकाजाचे उर्वरीत बील अदा करणे.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. -१)** सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे, दि.५/५/२०१५, रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता, त्यावर, **निर्णय क्र.१४४,** अन्वये, प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, "जनहित याचीका क्र.२५/२०१२, मधील चौकशीचे कामकाजाकामी चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांना, त्यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु.९०,०००/- मात्र फी सध्या अदा करण्यात यावी, तसेच, चौकशी अधिकारी, यांना प्रत्येक तारखेस किती फी द्यावी, याबाबत विधीज्ञा कडून मार्गदर्शन घेण्यात येवून फी निश्चीत करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली असल्याचा निर्णय झालेला आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे, दि.२८/११/२०१५, रोजीचे सभेपुढे विषय नं.२८ सादर करण्यात आला होता, त्यावर, **निर्णय क्र.५४६,** अन्वये "सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, ॲड., श्री परांजपे, रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती, तसेच, त्यांनी काय काम केलेले आहे, चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालयामध्ये अहवाल सादर केलेला आहे काय, यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा". असा निर्णय झालेला आहे.

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेत जनहित याचीका क्र. २५/२०१२ मधील चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे, साहेब यांचे चौकशीचे कामकाजाचे बीला संदर्भात ॲडव्होकेट आर.एन.धोर्डे, यांचे मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने उर्वरीत बील अदा करणेबाबतचा विषय फेरसादर करण्यात आला होता, त्यावर, **निर्णय क्र.१२४,** अन्वये सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांनी चौकशीचा अहवाल, मा. उच्च नयायालयामध्ये सादर केल्यानंतर त्यांना अदा करणेच्या फी बाबत निर्णय घेण्यात यावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव तहकूब ठेवणेत यावा, असे ठरले आहे.

४) मा.त्रिसदस्य समितीचे, दि.१४/६/२०१६, रोजीचे सभेत विषय सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.३३७, अन्वये, सविस्तर चर्चा होवून, जनहित याचीका क्र.२५/२०१२, मधील, चौकशी अधिकारी, ॲड., श्री. परांजपे, यांनी अहवाल सादर केलेला आहे, सदरचा विषय, मा.उच्च न्यायालयासमोर प्रलंबीत आहे व मा.उच्च न्यायालयाचे त्याबाबत कोणतेही निर्देश नाहीत, तेव्हा, हा अहवाल, मा. उच्च न्यायालयाने स्वीकारला किंवा कसे याबाबत संबंधीत संस्थानचे वकिलाचा स्पष्ट अहवाल मागविणेत यावा, असे ठरले.

प्रास्तवीक- मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टात श्री संजय भा. काळे, यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.२५/२०१२, मध्ये, मा.उच्च न्यायालयाने, दि.१०/१२/२०१४, रोजी दिलेल्या आदेशा नुसार चौकशी अधिकारी, ॲड., श्री पी.एस. परांजपे, रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक करण्यात आली होती.

श्री ॲड. परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी, दि.२४/१/२०१५, पासून चौकशीचे कामकाजास सुरुवात केली, व त्यांनी सादर केलेल्या चौकशी कामकाजाचे बीलाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	चौकशीकामी हजर दिनांक	बील / दिनांक	रक्कम रुपये
१)	दि. २४/०१/२०१५	पीएसपी /१४-१५/५५, दि. १०/०३/२०१५	२५,०००/-
२)	दि. १४/०२/२०१५	पीएसपी /१४-१५/५७, दि. १०/०३/२०१५	२५,०००/-
३)	दि. ०८/०३/२०१५	पीएसपी /१४-१५/६०, दि. १०/०३/२०१५	२५,०००/-
४)	इतर खर्च बील	पीएसपी /१४-१५/६२, दि. १०/०३/२०१५	१५,०००/-
५)	१२/०४/२०१५	पीएसपी /१५-१६/००१, दि.०१/०६/२०१५	२५,०००/-

६)	१३/०५/२०१५	पीएसपी /१५-१६/००२, दि.०४/०६/२०१५	२५,०००/-
७)	१४/०५/२०१५	पीएसपी /१५-१६/००३, दि.०४/०६/२०१५	२५,०००/-
८)	१४/०६/२०१५	पीएसपी /१५-१६/००४, दि.१५/०६/२०१५	२५,०००/-
९)	इतर खर्च बील	पीएसपी /१५-१६/००५, दि.१५/०६/२०१५	२०,०००/-
१०)	१२/०७/२०१५	पीएसपी /१५-१६/००७, दि.१५/०३/२०१६	२५,०००/-
११)	०२/०८/२०१५	पीएसपी /१५-१६/००८, दि.१५/०३/२०१६	२५,०००/-
१२)	इतर खर्च बील	पीएसपी /१५-१६/००९, दि.१५/०३/२०१६	१०,०००/-
		एकुण रक्कम रुपये	२,७०,०००/-

चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांनी एकुण रु. २,७०,०००/- ची मागणी केल्या प्रमाणे त्यांना रक्कम रु.९०,०००/-, मा.व्यवस्थापन समितीची, दि.५/५/२०१५, रोजी कार्यात्तर मंजूरी घेवून अदा केले आहे, तसेच दि. १५/०६/२०१५, रोजीचे बीलानुसार त्यांनी रु. १,२०,०००/- ची मागणी केली होती, त्यानुसार त्यांना दि.३०/७/२०१५, रोजीचे मंजुर टिपणीने, ॲड., श्रीपरांजपे यांना निम्मीरक्कम रु.६०,०००/-अदा करणेत आलेली आहे, उर्वरीत रक्कम रु.६०,०००/-, अदा करणेबाकी आहे, आतापर्यंत ॲड., श्री.परांजपे, यांना रक्कम रु.९०,०००/- + ६०,०००/- = रु.१,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र) रक्कम अदा केलेली आहे. सदरची रक्कम अदा केल्यानंतर ॲड., श्री परांजपे, यांनी दि.१/४/२०१६, रोजी आणखी दोन बीले सादर करुन रु. ६०,०००/- ची मागणी केलेली आहे.

मागणी– चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांनी पुर्वी मागणी केलेल्या रक्कमे पैकी रक्कम रु.६०,०००/- बाकी आहे, तसेच दि.१/४/२०१६, रोजी दिलेल्या बीलांची रक्कम रु.६०,०००/- असे एकुण रु.१,२०,०००/- रक्कमे पैकी इतर खर्चाचे रु.५,०००/- (दि.१३/५/२०१५ व दि. १४/५/२०१५, रोजी, शिर्डी, येथे मुक्काम केल्याने) कपात करुन रु.१,१५,०००/- चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांना अदा करावयाचे आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार अनुमान- मा. त्रिसदस्य समितीचे, दि.१६/२/२०१६, रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२४, प्रमाणे व दि.१८/२/२०१६, रोजी चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांनी मा.कोर्टात रिपोर्ट सादर केला असल्याने, चौकशी अधिकारी, ॲड., श्री परांजपे, यांनी मागणी केलेली रक्कम रु.१,१५,०००/- अदा करणेचे निर्णयार्थ, मा.त्रिसदस्य समितीचे, दि.१४/६/२०१६, रोजीचे सभेत विषय सादर करण्यात आला होता, त्यावरील निर्णय क्र.३३७, अन्वये, जा.क्र.एसएसएस वशी-विधी/२९०८/१६, दि.८/९/२०१६, रोजीचे पत्राने श्री पी.एस. परांजपे, चौकशी अधिकारी यांना कळविला होता, तसेच जा.क्र.एसएसएस वशी-विधी/२९१०/१६, दि.८/९/२०१६, रोजीचे पत्राने, ॲड. श्री आर.एन.धोर्डे, यांचा अहवाल मागविला होता, त्यांचा अहवाल न आल्याने, दि.८/११/२०१६, रोजी त्यांचेशी समक्ष केलेली चर्चा केली असता त्यांनी असे सांगीतले की, मी, कोणत्याही प्रकरचे लेखी अहवाल / मार्गदर्शन करणार नाही, जनहित याचीका क्र.२५/२०१२, हि, मा.उच्च न्यायालयाने डिस्पोज केले आहे, त्यामध्ये, अर्जदाराने फक्त चौकशी होणेबाबत, मा.कोर्टास विनंती केली होती, त्यानुसार, चौकशी झालेली असून, त्याचा अहवाल, ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी, मा. उच्च न्यायालयात सादर केला आहे, सदरचा अहवाल, मा.उच्च न्यायालयाने स्विकारणे / न स्विकारणे हा प्रश्नच उद्भवत नाही, असे तोंडी सांगीतले आहे, लेखी अहवाल दिलेला नाही.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत –ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी, दि. २३/०१/२०१७ रोजी खालील प्रमाणे पत्र पाठविले आहे.

" You are aware that the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench appointed me to inquire into the accusation leveled against the Trustees of Sai Baba Sansthan Shirdi, as made in one PIL bearing No. 25 of 2012. You are also aware that the said inquiry was completed and the inquiry report is already submitted before the Hon'ble Division Bench.

As the said Inquiry was not under the Commission of Inquiry Act but within the discretion of the Hon'ble High Court, after submission of such report, there is no need to maintain secrecy about the said report. That is precisely the reson why I have already made available the copy of the said report to Sai Baba Sansthan, Shirdi.

On that background I have already submitted a letter requesting you to make payment of the remaining expenses etc. to me that is still outstanding.

I have received one letter dated 22.08.2016 from your office in which the note put up before the Trustees is annexed. It seems that inadvertently it has been submitted in the said note that such report is yet to be submitted. Please take note that such report has already been submitted and the copy of it is already provided to your office.

On that background there is no reason not to make the remaining payment to me. May I therefore request you to kindly release the balance payment at your earliest. Thanking you in advance."

मा. उच्च न्यायालयात, इतर प्रकरणात तारीख हजर करणेकामी प्र. विधि अधिकारी, वेळोवेळी गेले असता, ज्या ज्या वेळी, ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांच्या भेटी झाल्या, त्या त्या वेळी, त्यांनी फी बाबत विचारणा केलेली आहे, ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांना, मा. त्रिसदस्य समितीचा निर्णय सांगण्यात आला, ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी, त्यांनी केलेल्या चौकशी कामकाजाची उर्वरीत फी रक्कम रु.१,१५,०००/-, न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली आहे, तसेच, उर्वरीत फी मिळणेसाठी, मा. उच्च न्यायालयापुढे अर्ज सादर करणे, हे त्यांना पटत नसल्याचेही त्यांनी बोलून दाखवले आहे.

तरी, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, ॲड., श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांना अदा करावयाची फी रक्कम रु.१,१५,०००/-, अदा करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित बाबींचा विचार करता, जनहित याचीका क्र. २५/२०१२, मधील, चौकशी अधिकारी ॲड श्री.पी.एस. परांजपे यांचे चौकशी कामकाजाचे उर्वरीत बील रु.१,१५,०००/- मात्र अदा करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.६९ **ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचे जनहित याचिका क्र.११३/ २०१५ श्री.संभाजी चौघुले विरुध्द श्री साईबाबा संस्थान व इतर ची वकील फी आदा करणे.**

प्रस्ताव- मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टात, जनहित याचीका क्र. ११३/२०१५ श्री संभाजी चौगुले यांनी, श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे विरुध्द दाखल केली होती. प्रस्तुत जनहित याचीका मध्ये, संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी, ॲडव्होकेट, श्री संजय आर. चौकीदार यांना, जा.क्र. एसएसएस वशी-विधी/६३४५/२०१६, दि.१८/०२/२०१६ चे पत्राने वकीलपत्र देण्यात आले होते.

सदरची जनहित याचीका, संस्थानला सी.सी.टी.व्ही. कॅमेरा खरेदी करणेचे संदर्भात, केलेली निविदा प्रक्रीया रद्द करणेकामी मा. त्रिसदस्य समतीचे दि. २२/०६/२०१५ चे सभेतील निर्णय क्र. १६० रद्द होणेबाबत दाखल झाली होती. रिट पिटीशन नं. ७९३८/२०१५ मध्ये संस्थानचे वतीने सी.सी.टी.व्ही. सर्व्हीलीअन्स सिस्टीम बसविणेकामी व कन्सलटंट नेमणूक करणेकामी काही त्रुटी राहील्या आहेत, शासनाने सी.सी.टी.व्ही. सर्व्हीलीअन्स, बसविणेकामी जे नियम घालून दिले आहेत, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही, शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे, जी.आर. प्रमाणे कंन्सलटंट नेमणूक झालेली नाही, टेंडर डॉक्युमेंट मध्ये किती कॅमेरा बसवायचे आहेत व कोणत्या ठिकाणी बसवायचे आहेत, त्याचे नेटवर्क याबाबत नमुद नाही, अशा आशयाचे मुद्दे नमुद करुन, संस्थानचे शपथपत्र दाखल केले होते, सदर शपथपत्राचे आधारे मा. कोर्टाने सदरची जनहित याचीका दि. २०/०६/२०१६ रोजी निकाली काढली आहे.

ॲडव्होकेट, श्री संजय आर. चौकीदार, यांनी दि. ०२/०८/२०१६ रोजीचे बीलाने, प्रस्तुत रिट पिटीशन चे संदर्भात, खलील प्रमाणे वकील फी ची, मागणी केली आहे.

शपथपत्र तयार करुन दाखल करणे	रु. ५०००/-
हेअरिंग कामी वकील फी, इतर खर्च उदा. टायपींग, कोर्टा फी, स्टेनो चार्जेस इ.	रु. १५,०००/-
	एकुण रु. २०,०००/-

मा. त्रिसदस्य समितीचे, दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेतील, निर्णय क्र. २५७ प्रमाणे, ॲडव्होकेट, श्री संजय आर. चौकीदार, यांना ॲडव्होकेट, श्री धोर्डे, यांचे प्रमाणे, मानधन देणेबाबत निर्णय झालेला आहे. ॲडव्होकेट, श्री धोर्डे यांना, सिव्हील अर्जा करीता रु. १०,०००/-, रिट पिटीशन करीता रु. १५,०००/- व पी.आय.एल. करीता रु. २०,०००/- वकिल फी अदा केलेली आहे.

जनहित याचीका क्र. ११३/२०१५ मध्ये, ॲडव्होकेट, चौकीदार यांनी संस्थानचे वतीने कामकाज पाहिले आहे, वेळोवेळी सदर जनहित याचीके मध्ये, सल्ला व मत दिलेले आहे, करीता ॲडव्होकेट, संजय आर. चौकीदार, यांना सदर जनहित याचीका मध्ये, हेअरिंग कामी वकील फी, इतर खर्च उदाटायपींग ., कोर्टा फी, स्टेनो चार्जेस इ. कामासाठी रक्कम रु. २०,०००/- वकील फी, देता येईल असे मत आहे.

तरी ॲडव्होकेट, श्री संजय आर. चौकीदार, यांना जनहित याचीका क्र. ११३/२०१५ मध्ये हेअरिंग कामी वकील फी, इतर खर्च उदा. टायपींग, कोर्टा फी, स्टेनो चार्जेस इ. कामासाठी रक्कम रु. २०,०००/- वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲडव्होकेट श्री.संजय आर.चौकीदार यांचे जनहित याचिका क्र.११३/ २०१५ श्री.संभाजी चौघुले विरुध्द श्री साईबाबा संस्थान व इतर ची प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रु.२०,०००/- मात्र वकील फी अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.७० **रे.मु.नं.३२/ २०१४ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुध्द मे.गढीया सोलर सिस्टीम, वलसाड प्रकरणी वृत्तपत्रात जाहीर समन्स प्रसिध्द करणेकामी आलेल्या खर्चाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील कलम १७. (१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्त व्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) (च) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक. – नविन प्रस्ताव.

प्रास्तवीक- संस्थानचे प्रसादालयातील स्वयंपाकाचे कामासाठी सोलर, स्टिम जनरेशन सिस्टीम डिझाईन, मॅन्युफॅक्चर, सल्पाय, इन्स्टॉलेशन ॲण्ड कमिशनिंग याकामसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०५/२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. वलसाड, यांना रक्कम रु. १,३३,००,०००/- व इतर टॅक्स धरुन प्रस्तुत सोलर सिस्टीमचे काम देण्यात आले होते, मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. यांनी टेंडर व करारातील अटी शर्तीचा भंग केला व बॉयलर ॲक्टनुसार प्रकल्पाची करावयाची तपासणी, तसेच प्रकल्पाचा मेंटनन्स व परफॉरमन्स सुधारणे तसेच, प्रसतुत कंपनीने निर्धारीत केलेल्या क्षमतेनुसार प्रकल्प कार्यान्वित न राहील्यामुळे, संस्थानची झालेली नुकसान भरपाई वसुल करणे करीता, मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. वलसाड, यांना संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट एस.डी.कुलकर्णी, यांचे मार्फत दि. ७/२/२०१२, रोजी नोटीस पाठविली, त्यानंतर मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन, कोपरगाव यांचे कोर्टात, रे.मु.नं. ३२/२०१४ दाखल केलेला आहे.

मागणी- मे. कोर्टाने, दि. २३/०९/२०१५, रोजी, मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. वलसाड, यांना मे.कोर्टामार्फत समन्स पाठविले होते, त्याबाबत समन्स रिपोर्टवर, मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. कंपनी, त्या पत्त्यावर नाही, असा बेलीफचा रिपोर्ट आला होता, त्यामुळे ॲडव्होकेट एस.डी.कुलकर्णी यांनी मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि. यांचा अचुक पत्ता नसल्याने, मा. कोर्टात प्रस्तुत प्रकरणी मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स यांना मुंबई येथील दै महाराष्ट्र टाईम्स व गुजरात येथील दै. संदेश वलसाड नवसारी आवृत्ती येथे जाहीर नोटीस प्रसिध्द करणेची परवानगी मिळणेकामी अर्ज दाखल केला होता, सदरचा अर्ज मा. कोर्टाने मंजूर केला, त्यानुसार ॲडव्होकेट एस.डी.कुलकर्णी यांनी दि. ०६/०८/२०१६ रोजीचे पत्राने अंदाजे खर्चाची माहिती दिली होती, त्यानुसार त्यांना दि. १३/०८/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी ने रु. २५,०००/- व दि. १९/०९/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीने रु. १५,०००/- असे एकुण रु. ४०,०००/- ॲडव्हांन्स म्हणून अदा केलेले आहे.

ॲड. एस.डी.कुलकर्णी यांनी वैभव ॲडव्हर्टायजींग एजन्सी, कोपरगांव यांचे मार्फत दै. महाराष्ट्र टाईम्स मुंबई आवृत्ती दि. २४/११/२०१६ व दै. संदेश वलसाड नवसारी गुजरात आवृत्ती दि. १४/१२/२०१६ रोजी जाहिर समन्स प्रसिध्द केले आहे, त्याबाबतचे वैभव ॲडव्हर्टायजींग एजन्सी, कोपरगांव यांचे बील नं १५६ दि. १९/१२/२०१६ रु. ४०,०२४/- इकडील कार्यालयास पाठविले आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान- अधिनियमातील कलम १७ (२) (च) नुसार विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित दाव्या मध्ये कायदेशीर कार्यवाही, व बचाव करण्याची तरतुद असल्याने त्या अनुशंगाने वृत्तपत्रात जाहिर समन्स प्रसिध्द करणेकामी सदरचा खर्च केलेला आहे.

विभागाचा अभिप्राय– ॲड. एस.डी.कुलकर्णी यांनी वैभव ॲडव्हर्टायजींग एजन्सी, कोपरगांव यांचे मार्फत दै. महाराष्ट्र टाईम्स मुंबई आवृत्ती दि. २४/११/२०१६ व दै. संदेश वलसाड नवसारी गुजरात आवृत्ती दि. १४/१२/२०१६ रोजी जाहिर समन्स प्रसिध्द केले आहे, त्याकामी रु. ४०,०२४/- खर्च आलेला आहे, सदरचा खर्च रु. २५,०००/- पेक्षा जास्त असल्याने त्यास मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने, सदरचे खर्चास कार्यात्तर मंजूरी देता येईल.

तरी रे.मु.नं. ३२/२०१४ चे संदर्भातील जाहीर नोटीस दै. महाराष्ट्र टाईम्स मुंबई आवृत्ती व दै. संदेश वलसाड नवसारी गुजरात आवृत्तीत प्रसिध्द करणेकामी आलेला खर्च रु.४०,०२४/- ला कार्यात्तर मंजूरी मिळणेचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

तसेच संस्थानमधील कायदेविषयक बाबींवर निर्णय घेणेसाठी उपरोक्त निर्णय क्र.४४ अन्वये या क्षेत्रातील तज्ञ समिती सदस्य ॲडमोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.सचिन तांबे या सदस्यांची विधी उपसमिती गठीत करणेत आलेली आहे. यापुढे कायदेविषयक बाबींचे सर्व प्रस्ताव या उपसमिती समोर सादर करणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- विधी अधिकारी)

विषय नं.७१ **वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रक मागविणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (२) (झ)** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

प्रस्ताविक:- संस्थानचे ८८ वाहनांचा दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ या कालावधीतील विमा ई-निविदा प्रक्रीया राबवून निम्नतम दरधारक युनायटेड इंडिया इश्युरन्स कं. लि., शाखा- शिर्डी यांचेकडून उतरविण्यात आलेला असुन या कामी एकुण रक्कम रु.१६,५८,११२/- (अक्षरी रक्कम रु.सोळा लाख अठ्ठावन्न हजार एकशे बारा मात्र) खर्च आलेला आहे. तसेच उर्वरित १९ नवीन वाहनांचा विमा वेगवेगळया तारखेचा असल्याने विमा मुदत संपलेनंतर संबंधीत वाहनांचा विमा विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन दि.३१/०३/२०१७ अखेर घेण्यात आलेला असुन त्याकामी रक्कम रु.८६,८२५/- मात्र खर्च आलेला आहे. अशा प्रकारे दि.३१/०३/२०१७ अखेर १०५ वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी एकुण रक्कम रु.१७,४४,९३७/- (अक्षरी रक्कम रु.सतरा लाख चव्वेचाळीस हजार नऊशे सदवतीस) मात्र खर्च झालेला आहे.

सध्या वाहन विभागाकडील खालील तपशिला प्रमाणे विविध वाहनांचे विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

अ.नं.	वाहन प्रकार	संख्या
०१	कार्यालयीन वाहने	१३
०२	रुग्णवाहीका वाहने	१३
०३	सर्व बसेस	२४
०४	आपत्कालीन वाहने	०३
०५	मालवाहतुक वाहने	३१
०६	दुचाकी वाहने	०८
०७	बॅटरी कार वाहने	०४
०८	मोबाईल टॉयलेट	१०
	एकुण वाहने	**१०६**

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर एक वर्ष कालावधी करीता वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा विमा उतरविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्यामध्ये स्पर्धा ही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा मागील वर्षी म्हणजे दि.०१ एप्रील, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ या कालावधीतील विमा नुतनीकरण करतेवेळी आलेला आहे. संस्थान फक्त सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेचे आवश्यकता नाही.

उपरोक्त १०६ वाहनांचे विमा नुतनीकरण करणे कामी अंदाजे रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. वीस लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. वाहन विभागाचे सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्राकामध्ये विमा खर्चा करीता रक्कम रु.२२,००,०००/- मात्र खर्चाची तरतुद असुन सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

मागणी:- वाहन विभागातील विविध प्रकारचे १०६ वाहनांचा सन-२०१७-१८ करीता विमा नुतनीकरण करणे कामी सर्व राष्ट्रीयकृत कंपन्याकडूनच बंद लिफाफयातुन दरपत्रके मागविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख) पर्यंतचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.७१ **प्रस्तावित कामाची तातडी पहाता, दरम्यानचे कालावधीमध्ये वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून प्रशासकीय मान्यतेने दरपत्रके मागविणेत आलेली आहेत, यामुळे सदरहू विषय रद्द करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.७२ **संस्थानचे ३ स्कुलबस व २ प्रवासी बसचा दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीतील आर.टी.ओ. टॅक्स भरणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतुद आहे.

प्रस्ताविक:- वाहन विभागाकडील स्कुलबस क्र. एमएच-१७-टी-८५०१, टी-८५०२ व टी-८५०३ या ३ बसेसचा वापर श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कुलमधील विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणे कामी तसेच प्रवासी बस क्र.एमएच-१७-टी-८५०४ व टी-८५०५ या २ प्रवासी बसेसचा वापर साईआश्रम व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे घेवुन जाणे व घेवुन येणे कामी होत आहे. या बसचा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार, टॅक्स दरवर्षी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरण्यात येतो.

सदर पाच बसेसच्या टॅक्सची मुदत दि.३१.०३.२०१७ रोजी संपुष्टात येत असलेने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडून पुढील कालावधी करीता भरावयाचे टॅक्स बाबत माहिती घेतली असता, त्यांनी पुढील एक वर्षाचा म्हणजे दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ अखेर या कालावधी करीता AT फॉर्मवर खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरणेचे कळविले आहे.

अ.नं.	बस क्रमांक	वाहन प्रकार	आसन क्षमता	रक्कम (रु.)
०१	एमएच-१७-टी-८५०१	स्कुलबस	५२+१+१ सिटर	५,२००.००
०२	एमएच-१७-टी-८५०२	स्कुलबस	५२+१+१ सिटर	५,२००.००
०३	एमएच-१७-टी-८५०३	स्कुलबस	५२+१+१ सिटर	५,२००.००
०४	एमएच-१७-टी-८५०४	प्रवासी बस	५४+१+१ सिटर	५४,०००.००
०५	एमएच-१७-टी-८५०५	प्रवासी बस	५४+१+१ सिटर	५४,०००.००
			एकुण रक्कम (रु.)	**१,२३,६००.००**

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- उपरोक्त तपशिला प्रमाणे पाच बसेस वाहनांचा वार्षिक टॅक्स उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणे कामी रु.१,२३,६००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख तेवीस हजार सहाशे मात्र) खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

मागणी:- तरी संस्थानच्या ३ स्कुलबस व २ प्रवासीबस अशा एकुण ५ बसेसचा दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीचा वार्षिक टॅक्सची रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,२३,६००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख तेवीस हजार सहाशे मात्र) खर्चास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडील प्रस्तावित ५ वाहनांची दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीतील वार्षिक टॅक्सची रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडे भरणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,२३,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.७३ **महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी तर्फे संस्थानला देणगी आलेल्या महिंद्रा TUV300 या वाहनाकरीता आर.टी.ओ. कार्यालयात टॅक्स व पासींगकरीता आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतुद आहे.

प्रास्ताविक:- दि.१०/०९/२०१६ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी संस्थानला एक महिंद्रा TUV300 हे कार्यालयीन वाहन देणगी दिलेले आहे. सदर वाहनाचा वापर संस्थानचे विविध विभागाचे कार्यालयीन कामाकरीता करणेत येईल. या वाहनाचे आर.टी.ओ. कार्यालयात रजिस्ट्रेशन व पासींग करणे कामी आवश्यक कागदपत्रे महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून दि.२६/१२/२०१६ रोजी प्राप्त झालेली होती. सदर वाहनाचे रजिस्ट्रेशन, टॅक्स, पासींग फीची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात रोखीने भरणे कामी दि.२७/१०/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये, श्री अमृत गंगाधर जगताप, स.अभियंता, वाहन विभाग यांचे नांवे रक्कम रु.७५,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंच्याहत्तर हजार मात्रचा) अग्रीम घेण्यात आला होता. याकामी झालेल्या खर्चाची तपशिलवार माहीती खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	तपशिल	पावती नं.	दिनांक	रक्कम (रु.)
01	RTO Tax (O.T.T.)	6158091	05.01.2017	72,658.00
02	Cess	6158144	06.01.2017	1,453.00
03	रजिस्ट्रेशन फी	9646091	03.01.2017	250.00
	एकुण रक्कम (रु.)			**74,361.00**

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- उपरोक्त प्रमाणे महिंद्रा TUV300 या वाहनाची रजिस्ट्रेशन फी व टॅक्सची एकुण रक्कम रु.७४,३६१/- आर.टी.ओ. कार्यालय, श्रीरामपुर येथे घेतलेल्या अग्रीम रक्कमेतुन रोखीने भरलेली असुन शिल्लक रक्कम रु.६३९/- लेखाशाखा पावती नं.८१६ दि.०७.०१.२०१७ ने जमा केलेली आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- सदर बाब आर्थिक असुन महाराष्ट्र शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार फी भरणे आवश्यक आहे.

मागणी:- तरी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी कडुन संस्थानला देणगी आलेले महिंद्रा TUV300 वाहनाचे आर.टी.ओ. कामाकरीता झालेल्या एकुण रु.७४,३६१/- (अक्षरी रु. चौ-याहत्तर हजार तिनशे एकसष्ट मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.७३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी तर्फे संस्थानला देणगी आलेल्या महिंद्रा TUV300 या वाहनाकरीता आर.टी.ओ. कार्यालयात टॅक्स व पासींगकरीता आलेल्या रु.७४,३६१/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.७४ **संस्थान कायम कर्मचाऱ्यांना गणवेश देणे.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे व उच्च न्यायालयाचे मान्यतेने संस्थानचे स्थायी पदावरील वर्ग-१,२,३,४ चे अधिकारी व कर्मचारी यांना सन २०१३-२०१४ मध्ये सफारी गणवेश संस्थानमार्फत पुरविण्यात आलेला आहे. याकामी पदावरील प्रत्येकी दोन सफारी गणवेश देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये त्यांस दोन वर्षे पूर्ण होत आहेत. सध्या सर्वच कर्मचा-यांचे गणवेश नेहमी वापरामुळे खराब झाले आहे. सन २०१३-१४ या सालात शिवलेल्या संस्थान कर्मचा-यांचे गणवेशासाठी साधारणपणे रु.२६,९३,२१४/- व गणवेश शिलाईसाठी रु.८,७२,२८४/-असा दोन्ही मिळून एकूण रु.३५,६५,४९८/- (पस्तीस लाख पासष्ठ हजार चारशे अठ्यान्नव) मात्र इतका खर्च आलेला आहे.

संस्थान कर्मचा-यांना यावर्षी गणवेश द्यावे लागतील. पगारपत्रकानुसार कर्मचारी संख्या एकूण २१०९ अशी आहे. तसेच मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संरक्षण अधिकारी यांची नावे पगारपत्रकात नाहीत. सदरच्या गणवेशामध्ये रुग्णालय आया, वॉर्डबॉय, इं.मि.स्कुल, क.वि.मंदिर व औ.प्र.संस्था-शिक्षक ,शिक्षिका यांचे गणवेश हे वेगळे असतात. मंदिरातील –चोपदार, पुजारी, सहा.पुजारी यांना दरवर्षी दसरा उत्सवाला नविन गणवेश दिला जातो. त्यामुळे त्यांचा समावेश ह्या गणवेशात केलेला नाही. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल , शिर्डी (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल) व श्रीसाईनाथ हॉस्पीटल शिर्डी मधील डॉक्टर, मेट्रन, नर्स, फार्मासिस्ट , टेक्निशियन्स, मॅनेजर्स इ.चे. गणवेश हे संबंधीत विभाग प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करुन मान्यता घेऊन स्वतंत्रपणे कार्यवाही करीत असतात.

नेव्ही ब्ल्यु (NEAVY BLUE) रंगाचे आवश्यक असणारे कापड देणगीदार साईभक्त श्री. साई दत्त / बसवाराजप्पा / बाल सुब्रामनी, मुंबई या साई भक्तांनी सियाराम कपंनीचे शर्टसाठी (स्काय ब्ल्यु कलर) ७२५ मीटर कापड व पॅन्ट साठी (डार्क ब्ल्यु कलर) ४५० मीटर कापड देणगी स्वरुपात देणगी पावती नं ४०२६४ दि.२४/०२/२०१६ ने संस्थानला दिलेले आहे.सदरचे कापड संरक्षण विभागाचे ताब्यात आहे. सदरच्या कापडातून वाहन विभागातील २९ वाहनचालकांना ५८ गणेवश शिवण्यात आलेले आहेत.

मा. उपसमितीचे दि.१६.०९.२०१६ चे सभेत मान्यता मिळाल्यानुसार देणगी स्वरुपात मिळालेल्या संरक्षण विभागाकडील शर्टचे कापड ५७० मीटर व पॅन्टचे कापड ३७६ मीटर शिल्लक असलेल्या कापडातून १) फायर ॲण्ड सेफ्टी (१४ कर्मचारी) २) मॅकेनिकल विभाग -एसी मेकॅनिकल, टर्नर,फिटर, वेल्डर, (१५ कर्मचारी) ३) ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभागातील – तारतंत्र,दुरध्वनी चालक (९ कर्मचारी) ४) बगीचा विभाग – माळी (१ कर्मचारी) ५) विद्युत विभाग – तारतंत्री (५१ कर्मचारी) ६) सी.सी.टीव्ही ऑप्रेटर (१ कर्मचारी) ७) बांधकाम विभाग – गवंडी, सुतार (४ कर्मचारी) ८) पाणीपुरवठा –प्लंबर,तारतंत्री, फिल्टर ऑपरेटर (१९ कर्मचारी) ९) माहिती तंत्रज्ञान- तांत्रीक सहाय्यक हार्डवेअर/सॉफ्टवेअर (३ कर्मचारी) १०) झेरॉक्स ऑपरेटर (२ कर्मचारी) ११) वाहन विभाग मोटार मॅकेनिक (३ कर्मचारी) अशा एकूण १२२ कर्मचा-यांचे कपडे शिवण्याची कार्यवाही आर.के.कलेक्शन, नाशिक यांचेकडून मागिल न्युतम दराने चालू करण्यात आली आहे.

संस्थानचे स्थायी पदावरील कर्मचा-यांना गणवेश शिवणेबाबत तपशिल खालीलप्रमाणे...

वर्ग ४ स्त्री कर्मचारी यांचा विभागवार तपशील खालीलप्रमाणे..

अ.नं.	विभाग	स्त्री कर्मचारी संख्या	सहावार साडी	ब्लाऊजपीस	परकर	नऊवार साडी	ब्लाऊज पीस	प्रकार
अ)	श्री साईबाबा कन्या मंदिर	०१	०२	०२	२	०	०	नमुन्याप्रमाणे जी पसंत होईल तशी साडी
	बगीचा विभाग	११	१४	१४	१४	८	८	
	आरोग्य विभाग	१३	२२	२२	२२	४	४	
	मंदिर विभाग	०१	०२	०२	०२	००	००	
	श्री साई प्रसादालय	६१	८८	८८	८८	३४	३४	
	कॅन्टीन विभाग	०३	०४	०४	०४	०२	०२	
	श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम	०४	०८	०८	०८	००	००	
		प्रत्येकी दोन प्रमाणे एकूण	**१४०**	**१४०**	**१४०**	**४८**	**४८**	

	स्त्री कर्मचारी एकूण संख्या	९४						
ब)	श्री साईनाथ रुग्णालय	३५	६०	६०	६०	१०	१०	पांढरीसाडी निळे काठ
	श्री साईबाबा हॉस्पीटल	०३	०४	०४	०४	०२	०२	
क)	संरक्षण पहारेकरी	१०	२०	२०	२०	००	००	खाकी साडी काळे काठ
		प्रत्येकी दोन प्रमाणे एकूण	**८४**	**८४**	**८४**	**१२**	**१२**	
	एकूण स्त्री कर्मचारी ब+क प्रमाणे	४८						

"अ", "ब" व "क" मिळूण एकूण **१४२** (वर्ग४) स्त्री कर्मचा-यांसाठी उपरोक्त प्रमाणे ६ वार २२४ साड्या व २२४ परकर, नऊवार ६० साड्या व २२४+६० =२८४ एकूण ब्लाउजपीसची आवश्यकता आहे.

स्त्री कर्मचारी (लिपीक- टंकलेखक) वर्ग -३ यांची विभागवार तपशील खालीलप्रमाणे

अ.नं.	विभाग	स्त्री कर्मचारी संख्या	सहावार साडी	ब्लाऊजपीस	परकर	प्रकार
ड)	१) साईबाबा कन्या विद्या मंदिर	०१	२	२	२	नमुन्याप्रमाणे जी पसंत होईल तशी साडी
	२) श्री साईनाथ रुग्णालय	०२	४	४	४	
	३) श्री साईबाबा हॉस्पीटल	०२	४	४	४	
	४) मालमत्ता विभाग	०१	२	२	२	
	५) कॅन्टीन विभाग	०२	४	४	४	
		प्रत्येकी दोन प्रमाणे	१६	१६	१६	
	स्त्री कर्मचारी (लिपीक- टंकलेखक)	**०८**				

एकूण ०८ (लिपीक-टंकलेखक) स्त्री कर्मचा-यांसाठी उपरोक्तप्रमाणे ६ वार १६ साड्या, परकर, ब्लाउजपीसची आवश्यकता आहे.

वर्ग ४ पुरुष कर्मचारी संख्या

अ.नं.	तपशिल	कर्मचारी संख्या	कापडाचा प्रकार
ई)	१) मदतनीस	७४३	नमुन्याप्रमाणे पसंत होईल तसे कापड
	२) सफाई कर्मचारी	१३५	नमुन्याप्रमाणे पसंत होईल तसे कापड
	३) पहारेकरी/मदतनीस	१२६	खाकी कापड
	४) वॉर्डबाय/मदतनीस	७२	पांढरे कपडे
	एकूण	**१०७६**	

वर्ग १,२,३ पुरुष कर्मचारी संख्या

अ.नं.	तपशिल	कर्मचारी संख्या	कापडाचा प्रकार
ऊ)	१)प्रशासकीय अधिकारी	०४	नमुन्याप्रमाणे पसंत होईल तसे कापड
	०१) उपकार्यकारी अभियंता (विद्युत)	०१	नमुन्याप्रमाणे पसंत होईल तसे कापड
	०२) विद्युत पर्यवेक्षक	०५	
	०३) उपकार्यकारी अभियंता (बांधकाम)	०१	
	०४) मॅकेनिक सहाय्यक अभियंता	०१	
	०५) कनिष्ठ अभियंता	०४	
	०६) सहाय्यक अभियंता (वाहन विभाग)	०१	
	०७) जनसंपर्क अधिकारी	०१	
	०८) कृषी अधिकारी	०१	
	०९) प्र.अधीक्षक	३३	
	१०) प्र.लेखाधिकारी	**०१**	
	११) साईलीला सहाय्यक संपादक	०१	
	१२) वरिष्ठ लिपीक	०९	

	१३) लिपीक टंकलेखक	१८५	नमुन्याप्रमाणे पसंत होईल तसे कापड
	१४) सुरक्षा निरक्षक	०२	खाकी कापड
	एकूण कर्मचारी संख्या	**२५०**	

संस्थानचे स्थायी पदावरील १) **"अ", "ब" "क" प्रमाणे** एकूण **१४२** (वर्ग-४) स्त्री कर्मचारी
२) **"ड" प्रमाणे** ०८ (लिपीक-टंकलेखक) स्त्री कर्मचारी

एकूण स्त्री कर्मचारी – १५०

१) **"ई" प्रमाणे १०७६ वर्ग ४ पुरुष कर्मचारी संख्या**

२) **"ऊ" प्रमाणे २५० वर्ग १,२,३** अधिकारी व कर्मचारी संख्या

१) १३२६ पुरुष कर्मचारी यांना २ शर्ट शिवावयाचे असल्यास शर्टसाठी ५ मीटरप्रमाणे ६,६३० मीटर शर्टचे कापड व २ पॅन्ट शिवायचे असल्यास २.४० मीटरप्रमाणे ३१८२.४० मीटर कापड खरेदी करावे लागेल.

२) १५० स्त्री कर्मचारी यांना प्रत्येकी २ साड्या प्रमाणे ३०० साड्या २४० परकर ३०० ब्लाऊज पीसची आवश्यकता आहे.

साडी, परकर गणवेशाचे दिलेले दर.

अ.नं.	कपड्याचा प्रकार	संख्या	मागिल दर	आर.के कलेक्शन, नाशिक प्रती दर	नितीन गारमेंटस, येवला प्रती दर	राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी प्रती दर	सरासरी दर	सरासरी दराने होणारी रक्कम
०१	सहावार साडी	२४०	४४०/-	६००.००	४५०.००	४५०.००	६००/-	१४,४,०००.००
०२	नऊवार साडी	६०	४९०/-	८००.००	६००.००	५१०.००	८००/-	४८,०००.००
०३	परकर	२४०	९८/-	२००.००	१२०.००	९८.००	२००/-	४८,०००.००
०४	१३२६ कर्मचा-यासाठी शर्टासाठी कापड	६६३० मीटर	-	३००.०० प्रती मीटर	१४०.००	४५०.००	४५०/-	२९,८३,५००.००
०५	१३२६ कर्मचा-यासाठी पॅन्टसाठी कापड	३१८२.४० मीटर	-	४१५.०० प्रती मीटर	३६३.००	१२०.००	४१५/-	१३,२०,६९६.००
०६	शिलाई	२६५२	-	४५०.००	४५०.००	४४०.००	४५०/-	११,९३,४००.००
							एकूण रु.	**५७,३७,५९६.००**

सफारी कापडाचे अंदाजे दर

अ. नं.	कपड्याचा प्रकार	संख्या	मागिल प्रती मीटर दर	आर.के कलेक्शन, नाशिक प्रती दर	नितीन गारमेंटस, येवला प्रती दर	राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी प्रती दर	सरासरी दर	सरासरी दराने होणारी रक्कम
०१	१३२६ कर्मचा-यासाठी सफारी शर्ट व पॅन्टसाठी कापड	९८१२.४० मीटर	४००/- प्रती मीटर	८००/- प्रती मीटर	८०७.०० प्रती मीटर	५२५.०० प्रती मीटर	८०७/- प्रती मीटर	७९,१८,६०६.८०
०२	शिलाई	२६५२	५३८/- प्रती गणवेश	५५०.०० प्रती गणवेश	५४०.०० प्रती गणवेश	५४५.०० प्रती गणवेश	५५०.०० प्रती गणवेश	१४,५८,६००.००
							एकूण रु.	९३,७७,२०६.८०

शुर्टींग व शर्टींगचे चे कापड /सफारी कापड अनेक प्रकारात असल्याने व कापडांची क्वॉलिटी (दर्जानुसार) दर ठरवले जात असतात त्यामुळे जेंव्हा दरपत्रक व नमुने मागविण्यात येतील, त्यावेळी प्रत्यक्षात कापडाची क्वॉलिटी लक्षात येईल. वरील दर हे दुकानदारांनी अंदाजे दिलेले आहेत. **(मागिल वेळेस कर्मचा-यांना सफारी कपडे देण्यात आले होते.)**

सन २०१३-१४ या सालात संस्थान कर्मचा-यांचे गणवेशासाठी साधारणपणे रु.२६,९३,२१४/- व गणवेश शिलाईसाठी रु.८,७२,२८४/-मात्र इतका खर्च झाला असून दोन्ही मिळून एकूण रु.३५,६५,४९८/- (पस्तीस लाख पासष्ठ हजार चारशे अठ्यान्नव) मात्र इतका खर्च आलेला आहे.

क) सहावार साडी, नऊवार साडी व परकर खरेदी करणेकामी रु.२,४०,०००.००

ख) पुरुष कर्मचा-यांसाठी सुटींग-शर्टींगसाठी शिलाईसह खर्च रु.५४,९७,५९६.००

किंवा

ग) पुरुष कर्मचाऱ्यांसाठी सफारी कापड शिलाईसह खर्च रु.९३,७७,२०६.८०

तरी उपरोक्तप्रमाणे **"क", "ख्" "ग" बाबत योग्य निर्णय होणेस विनंती.**

खर्चास मान्यता मिळाल्यानंतर गणवेश खरेदीची प्रक्रीया खरेदी विभागामार्फत करता येईल.

निर्णय क्र.७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांना गणवेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहू गणवेशाचा प्रकार, कापड व रंग निश्चित करणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

विषय नं.७५ **गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबांचे समाधी मंदिराचे जवळ श्री गुरुस्थान मंदिरालगतच पुरातन निंबवृक्ष आहे सदर निंबवृक्ष बाबांच्या काळापासुन असल्याने त्याची महती सर्वदुर पसरलेली आहे. श्री साई सच्चचरित्रात या वृक्षाचे महत्व सांगितलेले असल्याने व वृक्षाची पाने गोड असल्याने या वृक्षास धार्मिक दृष्टीने महत्व प्राप्त झालेले आहे.

आवक नं.18645 दि.20/12/2016 रोजीच्या पत्रान्वये, साईभक्त डॉ.भारती (Director Growmore Biotech Ltd.) यांनी गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी कळविलेले आहे. डॉ. भारती हे टिश्युकल्चर शास्त्रज्ञ असुन त्यांना 35 वर्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करण्याचा अनुभव आहे. तसेच त्यांची बेंगलोर येथे टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबतची प्रयोगशाळा असुन अद्याप पर्यंत त्यांनी एकुण 85 विविध झाडांपासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार केलेली आहे.

सध्या गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत के. एफ. बायोप्लॅन्ट, पुणे यांना गुरुस्थान निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या पुरविण्यात आलेल्या असुन त्यांचेमार्फत सदर निंबवृक्षाची टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत कार्यवाही चालु आहे.

श्रीमती श्रीलक्ष्मी, फॉरेस्ट ऑफिसर- अहमदनगर ह्या शिर्डी येथे आल्या असता त्यांनी गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत मा. विश्वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे व श्री सचिन तांबे यांच्यामध्ये हेलिपॅडवर चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी डॉ. भारती यांना टिश्युकल्चरबाबत 35 वर्षाच अनुभव असल्याने त्यांचेकडुन गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करता येईल असे सुचविले त्यासाठी गुरुस्थान निंबवृक्षाची 10 इंच लांबीच्या व पेन्सील आकाराच्या जाडीच्या कोवळ्या फांद्यांची आवश्यकता असलेबाबत सुचविलेले आहे.

डॉ.भारती (Director Growmore Biotech Ltd.) यांचे आवक नं. 18645 दि.20/12/2016 रोजीच्या पत्रानुसार त्यांना मागणीप्रमाणे गुरुस्थान निंबवृक्षाच्या 10 इंच लांबीच्या व पेन्सील आकाराच्या जाडीच्या कोवळ्या फांद्या उपलब्ध करुन देता येईल. तसेच त्यांचेकडुन गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी डॉ.भारती (Director Growmore Biotech Ltd.) यांना गुरुस्थान निंबवृक्षाच्या १० इंच लांबीच्या व पेन्सील आकाराच्या जाडीच्या कोवळ्या फांद्या उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.७६ **गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबांचे समाधी मंदिराचे जवळ श्री गुरुस्थान मंदिरालगतच पुरातन निंबवृक्ष आहे सदर निंबवृक्ष बाबांच्या काळापासुन असल्याने त्याची महती सर्वदुर पसरलेली आहे. श्री साई सच्चचरित्रात या वृक्षाचे महत्व सांगितलेले असल्याने व वृक्षाची पाने गोड असल्याने या वृक्षास धार्मिक दृष्टीने महत्व प्राप्त झालेले आहे.

मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी डॉ.सुधीर शेट्टी, (Labland Biotech) म्हैसुर यांना निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या देऊन त्यांचेकडुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी निर्देश दिलेले आहेत.

सध्या गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत के. एफ. बायोप्लॅन्ट, पुणे यांना गुरुस्थान निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या पुरविण्यात आलेल्या असुन त्यांचेमार्फत सदर निंबवृक्षाची टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत कार्यवाही चालु आहे. के.एफ.बायोप्लॅन्ट, पुणे यांना यामध्ये चांगल्या प्रकारचे यश आलेले आहे.

मागणी- गुरुस्थान निंबवृक्षाच्या एका फांदीची पाने गोड असल्याने त्यापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन साईभक्तांना वाटप करता येईल. दि.11/02/2017 रोजी डॉ. सुधीर शेट्टी, (Labland Biotech) म्हैसुर यांनी गुरुस्थान निंबवृक्षाची पाहणी केली असता त्यांना टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी सदर निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या पुरविण्यात आलेल्या आहेत. तरी डॉ.सुधीर शेट्टी यांचेकडुन टिश्युकल्चरसाठी

येणाऱ्या खर्चाबाबत माहिती घेऊन व त्यांचा करारनामा करुन त्यांचेकडुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन घेता येईल. तसेच टिश्युकल्चरसाठी आवश्यकतेनुसार त्यांना3 ते 4 वेळेस झाडाची पाने देता येईल.

विभागाचा अभिप्राय/- डॉ.सुधीर शेट्टी यांना टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी गुरुस्थान निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या पुरविण्यात आलेल्या आहेत. तरी डॉ.सुधीर शेट्टी यांचेकडुन गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी येणार खर्च व करारनामा तयार करुन त्यांचेकडुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी डॉ.सुधीर शेट्टी यांचेबरोबरकरारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.७७ **Devotee E-Solution Pvt.Ltd., Mumbai (i bhakti) यांचेकडून चादर, उदीप्रसाद व आरती या सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१६.

प्रास्ताविक:- उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांनी शिर्डीला येऊ न शकणा-या साईभक्तांसाठी त्यांचेमार्फत चादर, उदीप्रसाद व आरती या सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे. पत्रामध्ये नमुद केलेला प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहे.

Services-

a. Online ShriSai Baba Chaddar & UdiPrasad : Similar To a Devotee buying Chaddar Outside the temple and offering at the Samadhi for blessings, we facilitate the same process online.

b. Aarti- Devotees especially NRIs can watch the daily four Aartis from the mandir on the ibhakti app.

Online Shri Sai Baba Chaddar :

- Devotee can select date for the chaddar offering on ibhakti website and app.
- A SMS will be sent to the devotee informing them of the time and day when their chaddar will be offered at the temple to enable to see a live video of the offering.
- On the specific day and time (e.g. Every Thursday 1 pm), our company person will offer all the chaddars at the Shree Sai Samadhi. This offering video is recorded and send via SMS/email to the devotees. In the video the names of the devotees that have booked the chaddar for that day are flashed across the screen and at the same time they can offer their prayers without being physically present at the temple.
- This blessed Chaddar, Udi Prasad, Prasad-sugar pieces and a small Sai Baba Idol is then couriered by us to the devotees across the world.
- The Video clip of the offering is available for devotee to view on their phone/ibhakti app/website for up to a week from the time of offering so they can see and pray as per their convenience.

Aarti :

- The clips of the four daily Aartis will be given to the ibhakti executive immediately after each Aarti.
- These clips will be sent to only the devotees that have booked the Aarti viewing for that day on the ibhakti app.
- The Aartis can be seen by the devotee for 24 hours and then automatically deleted.
- The Aarti video is coded in such a way that it cannot be downloaded or shared by the devotee.

Permissions from Temple :

- To provide a fixed time daily (15 mins duration) for offering of all the devotees chaddars at the holy Samadhi.

- To record the chaddar offering in the temple cameras and provide us with the video clip or allow our person to record the video with a small hand held camera.
- To record the four dally Aartis and provide ibhakti executive with the video clips immediately after the Aarti is performed.
- To allow space for a computer and DVR in the temple precinct and permission to install a new Wi-Fi connection.
- To provide Authenticity certificate with stamp & signature of Head poojari/CEO a copy of which is to be sent to the devotees along with the Chaddar & Udi Prasad for authenticity of the Prasad delivered by the Company under this Agreement.
- To allow ibhakti executive access to the Gabhara/poojari and temple premises by issuing a pass for entry.
- Exclusive 5 years contract.

उपरोक्त प्रस्तावानुसार Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) हे त्यांचे वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनवर साईभक्तांसाठी साईबाबांना वस्त्र अर्पण करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहेत. सदर सुविधेचा लाभ घेतलेल्या साईभक्तांना त्यांचेमार्फत वस्त्र अर्पण करावयाची तारीख व वार एसएमएसद्वारे कळविली जाणार आहे. जेणेकरुन साईभक्त त्यावेळेचा लाईव्ह व्हिडीओ पाहू शकतील. याकरीता त्यांनी आठवड्यातील एक दिवस ठराविक वेळेची मागणी केलेली आहे. सदरवेळी त्यांचे प्रतिनिधी स्वत: साईबाबांचे मंदिरात समाधीवर वस्त्र अर्पण करणार आहेत, व त्याची शुटींग घेऊन ते संबंधीत साईभक्तांना एसएमएस व ई-मेलद्वारे पाठविणार आहेत. सदरची व्हिडीओ क्लिप त्यांचे वेबसाईट व मोबाईल ॲपवर एका आठवड्यासाठी उपलब्ध असणार आहे. तद्नंतर अर्पण करणेत आलेले वस्त्र, उदीप्रसाद व बाबांची मुर्ती त्यांचेमार्फत संबंधीत साईभक्तांना कुरीअरद्वारे पाठविण्यात येईल, असे प्रस्तावात नमुद केलेले आहे. सदर सुविधेकरीता ते साईभक्तांकडून एकूण रक्कम रुपये ४००/- मात्र आकारणार आहेत. त्याचा तपशिल प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

01. Cost Breakup: Chaddar & Udi Prasad

Sr.No.	Description	Amount
01	Cost of Chaddar & packing	150
02	Donation to Temple (20 %)	80
03	Operational Cost (Payment Gateway/ Warehouse/ Streaming/ Marketing/ SMS Gateway)	110
04	Administration Cost (Manpower & Internet Charges)	20
05	ibhakti Service Charge 10%	40
	Total Charges	**400**

- Courier charges as per actual depending on location paid additionally by devotees
- Taxes and custom charges if any extra at actuals

तसेच सदर प्रस्तावामध्ये साईबाबा मंदिरात होणा-या चारही आरत्यांचे रेकॉर्डींगची संस्थानकडून त्यांनी मागणी केलेली आहे. सदरचे रेकॉर्डींग त्यांचेकडे मागणी केलेल्या साईभक्तांना ते उपलब्ध करुन देणार आहेत. सदर सुविधेपोटी ते साईभक्तांकडून एकूण रक्कम रुपये १००/- मात्र आकार घेणार आहेत. त्याचा तपशिल प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

02. Cost Breakup Aarti

Sr.No.	Description	Amount
01	Service Tax 15%	15
02	Donation to Temple (20%)	20
03	Operational Cost (Payment Gateway/ Warehouse/ Streaming/ Marketing/ SMS Gateway)	45
04	Administration Cost (Manpower & Internet Charges)	10
05	ibhakti Service Charge 10%	10
	Total Charges	**100**

उपरोक्त प्रस्तावामध्ये Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांनी संस्थान कडून पुढील बाबींची मागणी केलेली आहे.

01. प्रत्येक दिवशी साईबाबांना वस्त्र अर्पण करणेसाठी त्यांचेकरीता १५ मिनीटांचा वेळ राखीव ठेवावा.
02. सदर दृष्यांचे संस्थानचे कॅमे-यातील रेकॉर्डींग क्लिप त्यांना देणे, अथवा त्यांचे प्रतिनिधींना शुटींग घेण्याची परवानगी देणे.
03. सर्व आरत्यांचे रेकॉर्डींग आरती झालेनंतर त्यांना त्वरीत देणे.
04. मंदिर परीसरामध्ये सदर कार्यवाहीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक साहित्य उदा.संगणक इ. कार्यान्वीत करणेकामी जागा उपलब्ध करुन देणे व वाय-फाय सुविधा सुरू करणेकामी परवानगी देणे.
05. मंदिर व संरक्षण विभाग यांना Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) त्यांचे प्रतिनिधींना ठरवून दिलेल्या वेळी मंदिरात प्रवेश देणेबाबत सुचना देणेत याव्यात.
06. साईभक्तांना देण्याकरीता मंदिरातील पुजारी अथवा कार्यकारी अधिकारी सो. यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र देणेत यावे.
07. Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांचे प्रतिनिधींना मंदिरात प्रवेशासाठी संसथानमार्फत ओळखपत्र देण्यात यावे.
08. सदर सुविधेचा कालावधी हा ५ वर्षाचा राहिल.

उपरोक्त प्रस्तावाप्रमाणेच यापुर्वीही सदर कंपनीने देऊ केलेला श्रींचा प्रसाद ऑनलाईन विक्री बाबतचा प्रस्ताव तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र. ४१६ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आले होते."श्री साईबाबांचा प्रसाद संस्थानमार्फत साईभक्तांना पुरविणेत येत आहे व तो संस्थानकडून पुरविला गेला पाहिजे त्यामध्ये मध्यस्थीची आवश्यकता नाही. मध्यस्थीला याकामी परवानगी दिल्यास 3rd Party Interest निर्माण होऊन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ शकतो. तसेच मध्यस्थीकडून दिल्या गेलेल्या प्रसादापासून साईभक्तांना विषबाधेसारखा अपाय होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.या सर्व बाबीचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत यावा."

Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांनी प्रस्तावित केलेल्या सुविधा, त्यांना सुरु करणेस परवानगी द्यावयाची झाल्यास, पुढील बाबींबाबत विचार व्हावा,असे नम्र मत आहे.

01. साईबाबा संस्थानमार्फत याअगोदरच साईबाबांना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची कार्यप्रणाली कार्यान्वीत असलेमुळे Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांनी देऊ केलेल्या सुविधेबाबत साईभक्तांची द्विधा मनस्थिती होऊ शकते.
02. Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांचे मागणीनुसार समाधी मंदिरात दररोज १५ मिनीटे राखीव वेळ त्यांना दिल्यास गर्दीचे वेळी साईभक्तांची गैरसोय होईल व अशाप्रकारेच इतर साईभक्त साईबाबांना स्वहस्ते वस्त्र अर्पण करण्याचा आग्रह धरण्याची शक्यता नाकारता येत नाही.
03. सुविधेअंतर्गत साईभक्तांच्या नावे घेण्यात येणा-या वस्तू (चादर) यांचे दर्जेबाबत प्रस्तावामध्ये काहीही उल्लेख नाही. सबब हलक्या प्रतीची चादर खरेदी करुन साईभक्तांना पाठविल्यास संस्थानला नाहक साईभक्तांच्या रोषास सामोरे जावे लागेल, असे वाटते.
04. संस्थानमार्फत डिश टिव्ही व टिव्ही चॅनेल यावर लाईव्ह दर्शन व आरती यांची सुविधा Royalty Basis वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सबब Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांना लाईव्ह दर्शन अथवा आरतीचे प्रक्षेपण त्यांचे वेबसाईट व मोबाईल ॲपवर करणेस परवानगी दिल्यास या क्षेत्रातील इतरही संस्था याबाबत मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.
05. उपरोक्त सुविधेपोटी भक्तांकडून आकारण्यात येणा-या रक्कमेपैकी २० % रक्कम संस्थानला देणगीपोटी मिळणार आहे, असे नमुद केलेले आहे. परंतू उर्वरित ८० % रक्कमेबाबत त्यांनी दिलेला तपशिल व प्रत्यक्षात होणारा खर्च याबाबत कोणताही खुलासा नाही.
06. Eros International, New Delhiयांनीही मोबाईल ॲप बाबत मागणी केलेली आहे.
07. Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti)यांना याबाबत परवानगी दिल्यास या क्षेत्रातील इतरही संस्था (उदा.Eros International, New Delhi) याबाबत मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.
08. श्री साईभक्तांना अश्या प्रकारे सुविधा उपलब्ध करुन दयावयाची झाल्यास त्यास नियमाप्रमाणे प्रसिध्दी देवून निकोप स्पर्धा होण्यासाठी प्रस्ताव मागवावे लागतील.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांचा प्रस्ताव.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांनी शिर्डीला येऊ न शकणा-या साईभक्तांसाठी त्यांचेमार्फत चादर, उदीप्रसाद व आरती या सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Devotee E-Solution Pvt. Ltd., Mumbai (i bhakti) यांना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.७८ **मे.उगले पेस्ट कंट्रोल, नाशिक यांचे इकडील विभागातील औषध फवारणी कामाच्या बिलाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निणर्य क्र.७८६ व निर्णय क्र.८६२

प्रस्तावना:- साईभक्तांना किटकांचा त्रास होऊ नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निणर्य क्र.१६५ निर्णयानुसार मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांना जानं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/११८९/२०१४ दि.०९/०६/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे हे करत असलेल्या असमाधानकारक कामामुळे किटकांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून, वारंवार फेर औषध फवारणी करुनही किटकांचा बंदोबस्त न झाल्याने तसेच याबाबत अनेक साईभक्तांच्या तक्रारी येत असल्याने, वेळोवेळी पर्यवेक्षक व पदाधिकारी यांनी केलेल्या समक्ष पाहाणी तथा सूचनेनुसार मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८६ नुसार मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे काम बंद करुन साईधर्मशाळा विभागाकडील निम्नतम दरधारक मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचे कडून पेस्ट कंट्रोलचे कामे करुन घेणेस मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८६२ नुसार कायोत्तर मान्यता घेऊन कार्यादेश देण्यात आला.

दि.११/१२/२०१६ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधींचे चर्चासत्र साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजित केले होते. इकडील खोल्यांमध्ये असणा-या किटकांचे प्रादुर्भावावर दि.१६/११/२०१६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षेमध्ये चर्चा झाली त्यामध्ये..

१. साईआश्रम भक्तनिवास इमारतीमधील ८० % खोल्यांमध्ये किटकांचा मोठ्याप्रमाणात प्रादुर्भाव असलेबाबत,
२. प्रचलित पेस्ट कंट्रोल ठेकेदार मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे असमाधानकारक कामाबाबत,
३. मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे काम तुर्त बंद करणे व निम्नतम ठेकेदार यांना काम देणेबाबत,
४. साई धर्मशाळा विभागाकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि, ठाणे यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागातील खोल्यांमधील काम सुरु केल्याने तसेच त्यांना उर्वरित निवासस्थानांच्या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करुन देणे असलेबाबत,
५. वेळ कमी असल्याने व काम करणे अगत्याचे असल्याने तातडीने साईधर्मशाळा विभागाकडील निम्नतम दरधारक ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांचे मंजूर दराने व आहे त्याच अटी/शर्ती कायम ठेऊन काम करुन घ्यावे किंवा कसे याबाबत चर्चा झाली.

सदर चर्चेमध्ये कामाची तातडी, कमी असलेली वेळ, येणारे मान्यवर, संस्थानचे नाव लौकीक यांचा विचार करता. उपलब्ध पेस्ट कंट्रोल ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांचेकडून त्यांचे साईधर्मशाळा विभागाकडील कार्यादेश दि.१८/०४/२०१६ रोजीचे मंजूर दराने व आहे त्याच अटी/शर्ती कायम ठेऊन प्रभावी किटकनाशक औषध फवारणी करुन घ्यावी व येणा-या प्रतिनिधींना किटकांचा त्रास होणार नाही याची दक्षता/ खबरदारी घेणेबाबत निर्देश देण्यात आले.

त्यानुसार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांनी साईआश्रम भक्तनिवास विभाग येथे किटकनाशक औषध फवारणी रु.०.६३ पैसे प्रति चौ.फुट या मंजूर दराने आहे त्याच अटी/शर्तीस अनुसरुन काम करुन देण्याचे मान्य केले व काम स्विकारलेबाबत संमती पत्र सादर केलेनंतर दि.११/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येतील सर्व खोल्या देश विदेशातील साई मंदिर प्रतिनिधीं/ मान्यवरांना किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी प्रस्तावीत टिपणीमधील ०१ ते ०५ बाबींचा विचार करता खास बाब म्हणून साईधर्मशाळेकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर दर रु. ०.६३ /- प्रति चौ.फुट या निम्नतम दराने आहे त्याच अटी/शर्तीस आधिन ठेवुन काम करुन घेणे कामी जा.नं एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/४३९३/२०१६ दि.२१/११/२०१६ ने कार्यादेश पारीत करणेत आला व येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/११/२०१६ निर्णय क्र.८६२ नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आली.

कामाचे स्वरुप व त्यासाठी येणा-या खर्चाचे तपशीलवार विवरण खालील प्रमाणे.

१२ इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ **३,४९,७३५ चौ.फुट** एका इमारतीचे क्षेत्रफळ		इमारती संख्या	पेस्ट कंट्रोल करणे इमारतीनिहाय विशेष बाब म्हणून एक फवारणी (सर्व समावेशक करासह) **रु.०.६३** पैसे प्रमाणे करणे
एका इमारतीसाठी I.W.C.	२८,९०८.७२ चौ.फुट	०५	**१५,१७७.०७**
एका इमारतीसाठी E.W.C.	२९,२७९.९२ चौ.फुट	०७	**२१,५२०.७४**

R-Block मधील टॉयलेट	२३२.३२ चौ.फुट	०१	२४.३९
			एकूण= **३६,७२२.२०**
			पुर्णांकित रक्कम **३६,७२२**

विभागाची मागणी:- इकडील खोल्यांमध्ये किटकांचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव वाढलेला असल्याने मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचे कडून खास बाब म्हणून दि.२२/११/२०१६ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणेत आली आहे. दि.२९/११/२०१६ अखेर १० इतक्या इमारतीमध्ये किटकनाशक औषध फवारणी करणेत आली. परंतू प्रत्यक्ष केलेली पाहणी व साईभक्तांनी केलेल्या तक्रारी वरुन सुमारे ६० % खोल्यामध्ये किटकांचा प्रादुर्भाव आढळून आल्याने, फेर फवारणी करुनही त्याचा १०० % परिणाम दिसून आलेला नाही. सदर बाब दि.११/१२/२०१६ रोजीचे चर्चा सत्राचे दृष्टीने गंभीर होती. म्हणून उपरोक्त नमुद १२ निवासी इमारतीचे व R ब्लॉकचे एकूण क्षेत्रफळ ३,४९,७३५ चौ.फुटापैकी ०६ इमारतींची (एकूण क्षेत्रफळ १,७४,८६७.५० चौ.फुट) ची पुन्हा फवारणी दुस-या उपलब्ध पेस्ट कंट्रोल ठेकेदाराकडून करुन घेतल्यास, चर्चासत्रासाठी येणा-या प्रतिनिधींना किटकांचा त्रास होणार नाही यासाठी..

पर्याय तथा तातडीची आवशक्ता म्हणून नाशिक येथील **मे.उगले पेस्ट कंट्रोल** चे प्रतिनिधी श्री.विशाल उगले यांना दि.१६/११/२०१६ रोजी समक्ष पाचारण करुन कामाबाबत संपूर्ण माहिती देण्यात आली तसेच अटी/शर्तीबाबत अवगत केले आहे. त्यांनी आपणास आवश्यक किटकनाशक औषध फवारणी प्रति चौ.फुट रु.०.६३ पैसे मात्र या मंजूर दराने आहे त्याच अटी/शर्तीस अनुसरुन काम करुन देण्याचे मान्य केले व तसे संमती पत्र ई-मेलव्दारे दि.१६/११/२०१६ रोजी सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी "साईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली आहे."

त्यानुसार दि.११/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येथे देश विदेशातील साई मंदिर प्रतिनिधीं चर्चासत्र आयोजित केले होते त्यासाठी येणा-या मान्यवरांना किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी खास बाब म्हणून साईधर्मशाळेकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर दर रु. ०.६३/- प्रति चौ.फुट या निम्नतम दराने आहे त्याच अटी/शर्तीस आधिन ठेवुन काम करुन घेणेत आले. परंतू औषध फवारणी करुन देखील ढेकूण व झुरळांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने, दि.२९/११/२०१६ रोजीचा ०६ इमारतीमध्ये औषध फवारणी करणेकामी प्रशासकीय मान्यता घेऊन जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ४६३४/२०१६ ने कार्यादेश देण्यात आला होता. त्यासाठी येणारा खर्च खालीप्रमाणे कळविला होता.

१) ०६ इमारतींसाठी

०६ इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ	पेस्ट कंट्रोल करणे **इमारतीनिहाय विशेष** बाब म्हणून एक फवारणी (सर्व समावेशक करासह) प्रती चौरस फुटाप्रमाणे **रु.०.६३** पैसे प्रमाणे करणे
१,७४,८६७.५०	**१८,३६१/-**
अक्षरी रु. अठरा हजार तीनशे एकसष्ठ रुपये मात्र	

तसेच दि.०३/१२/२०१६ चे प्रशासकीय मान्यतेने उर्वरित ०६ इमारतींचे पेस्ट कंट्रोल करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/४६३४/२०१६ दि.०२/१२/२०१६ रोजी कार्यादेश पारीत करुन त्यांचेकडून काम करुन घेण्यात आले आहे त्याचे तपशीलवार विवरण पुढील प्रमाणे.

२) उर्वरित ०६ इमारतींसाठी

उर्वरित ०६ इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ	पेस्ट कंट्रोल करणे **इमारतीनिहाय विशेष** बाब म्हणून एक फवारणी (सर्व समावेशक करासह) प्रती चौरस फुटाप्रमाणे **रु.०.६३** पैसे प्रमाणे करणे
१,७४,८६७.५०	**१८,३६१/-**
अक्षरी रु. अठरा हजार तीनशे एकसष्ठ रुपये मात्र	

उपरोक्त प्रमाणे ०६+०६ = १२ इमारतींसाठी एकूण क्षेत्रफळ ३,४९,७३५ चौ.फुट फवारणी करणेसाठी रक्कम **रु.३६,७२२/- (अक्षरी रु. छत्तीस हजार सातशे बावीस मात्र)** होते.

मे.उगले पेस्ट कंट्रोल नाशिक यांनी सदर साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यांमध्ये कळविलेल्या कामाचे क्षेत्रफळ ३४९७३५ चौ.फुट साठी ०.६३/- पैसे प्रमाणे औषध फवारणी करुन दिलेली आहे. तरी आपले विनंती नुसार दि.११/१२/२०१६ रोजी आयोजित केलेल्या साईमंदिर विश्वस्त परिषदेच्या पार्श्वभूमी लक्षात घेऊन रात्र दिवस काम करुन वेळेत व कोणत्याही तक्रारी विना केले आहे.

तरी आपण दिलेल्या दरामध्ये माझे प्रत्यक्ष कामासाठी झालेला खर्चही वसूल होत नाही. त्यामुळे माझे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. तरी विनंती करतो की, हे काम ना नफा व तोटा तत्वावर केले असून, प्रत्यक्ष कामासाठी व औषध फवारणीसाठी केमिकल खर्च तरी मिळावा अशी विनंती दि.११/०१/२०१७ रोजी पत्राव्दारे केली आहे. त्यांनी कळविलेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

अ.नं.	केमिकलचे नाव	नग	प्रति बॉक्स	एकूण रक्कम
१.	टेंप्रीड बायर	०४ बॉक्स	४१,५००/-	१,६६,०००/-

२.	क्लोरोगार्ड गर्डा	२५ लिटर	२१०/- प्रति लि.	५,२५०/-
३.	रिसस्पोनसर	१८ लिटर	१०५०/- प्रति लि.	१८,९००/-
			एकूण रक्कम	१,९०,१५०/-
			अक्षरी रु.एक लाख नव्वद हजार एकशे पन्नास मात्र.	

छानणीनुसार अनुमान:- महाराष्ट्र शासनाने संमत केलेला अधिनियम २००४ तथा मा.व्यवस्थापन समितीचा मान्य निर्णय व निर्णयार्थ सादर प्रस्तावानुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-दि.११/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येथे देश विदेशातील साई मंदिर प्रतिनिधीं चर्चासत्र आयोजित केले होते त्याठी येणा-या मान्यवरांना किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी खास बाब म्हणून साईधर्मशाळेकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर दर प्रति चौ.फुट रु. ०.६३ /- प्रमाणे या निम्नतम दराने आहे त्याच अटी/शर्तीस आधिन ठेवुन काम करुन घेणेत आले परंतू ढेकुण व झुरळांचा प्रादुर्भाव कमी न मिळाल्याने मे.उगले पेस्ट कंट्रोल, नाशिक यांचेकडून सर्व खोल्यांमध्ये औषध फवारणी करुन घेण्यात आली असून त्यांनी केलेले कामाबाबत साईभक्तांची कुढलीही तक्रार नसून काम समाधानकारक केले आहे. तातडीची गरज म्हणून इकडील १२ इमारतीचे सर्व खोल्यांमध्ये मे.उगले पेस्ट कंट्रोल, नाशिक यांना कार्यादेशात नमुद केलेप्रमाणे

१) मंजूर प्रस्तावानुसार ०६ इमारतीसाठी रु.१८३६१/- + उर्वरित ०६ इमारतीसाठी रु.१८३६१/- प्रमाणे १२ इमारतींसाठी एकूण रक्कम **रु.३६,७२२/- (अक्षरी रु. छत्तीस हजार सातशे बावीस मात्र)** रक्कम देय आहे.

२) सदर मे.उगले पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी दि.११/०१/२०१७ रोजीचे पत्रानुसार रक्कम **रु.१,९०,१५०/- (अक्षरी रु.एक लाख नव्वद हजार एकशे पन्नास मात्र)** मागणी केली आहे.

सबब, उपरोक्त १ व २ बाबींवर निर्णय होणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उगले पेस्ट कंट्रोल नाशिक यांनी साईमंदिर विश्वस्त परिषदेची पार्श्वभूमी लक्षात घेऊन दिवस- रात्र काम करुन वेळेत व कोणत्याही तक्रारी विना साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यांमध्ये औषध फवारणीचे काम करुन दिलेले आहे. तसेच त्यानंतर साईभक्तांची कोणतीही तक्रार आलेली नाही, या बाबींचा विचार करता मे.उगले पेस्ट कंट्रोल, नाशिक यानी मागणी केलेली रु.१,९०,१५०/- मात्र रक्कम त्यांना अदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

विषय नं.७९ **श्री साईबाबा संस्थानकडील निरुपयोगी भंगार/ सादिल साहित्याचे विक्रीकामी ई-निविदा मागविणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे इतर विभागाकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाच्या भंगार साहित्याची सन-२०१६-२०१७ या आर्थिक वर्षात ई-निविदा पध्दतीने तसेच वर्तमान पत्रात जाहीरात देवून उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे मान्यतेने दर मागविण्यात आलेले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या उच्चतम दराने जमा झालेल्या निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेत आलेली आहे. माहे डिसेंबर-२०१६ अखेर अशा प्रकारच्या भंगार साहित्याचे विक्रीतून एकूण रू.२१,७५,७१२.००(अक्षरी एकवीस लाख पंच्याहत्तर हजार सातशे बारा रू.मात्र) संस्थान फंडात जमा करणेत आलेले आहे.

दरवर्षीचे प्रचलित पध्दतीनुसार महाराष्ट्र अधिनियम २००५ मधील कलम १७(४) व कलम १४(२)(ग) ला अधिन राहून रू.रू.५०,००० चे आतील दैनंदीन वापराने जमा होणारे निरूपयोगी सादील स्वरूपाचे भंगार साहित्य जसे दुध पिशवी, प्लॉस्टिक भंगार, नारळाच्या शेंडया, काळे ऑईल, रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान गोण्या वगैरे दर वर्षीचे प्रचलीत पध्दतीने विक्री करणेसाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ ने मा.शासनाची मान्यता घेतलेली आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७६ नुसार अशा प्रकारच्या दैनंदिन वापराने तयार होणा-या निरूपयोगी भंगार / डेडस्टॉक साहीत्याची विक्री करण्याचे अधिकार समितीने मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहे.

चालू आर्थिक वर्ष सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षात नेमून दिलेल्या व्यापा-यांना भंगार साहित्य विक्रीची मुदत **दि.३१.०३.२०१७** रोजी पुर्ण होत आहे. करिता **सन २०१७-१८** या आर्थिक वर्षात संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणारे भंगार साहित्य विक्रीकामी ई-निविदा मागविणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

मागणी-

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केलेनुसार खालील दाखल प्रस्तावांस मान्यता मिळावी

१) निरूपयोगी भंगार/सादिल साहित्याचे विक्रीबाबतच्या अटी व शर्तीचा मसुदा.

२) आयटी विभागामार्फत Online व शासकीय संकेतस्थळावर ई-निविदा मागविणे/अपलोड करणे, तसेच जनसंपर्क विभागामार्फत दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी करावयाचा जाहीरात मसूदा.

३) निरूपयोगी भंगार/सादिल स्वरूपाचे साहित्य तपशिलाचे दरपत्रक.

४) लेखापरिक्षणाचे दृष्टीने पुर्णांकीत (रूपयाचे पटीत) दर मागविणेबाबत.

५) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात नारळाच्या शेंडया, लोखंडी कीस या वस्तू जमा होत नसलेने मागील वर्षीचे भंगार यादीत समावेश नव्हता. परंतू साहित्य मंजूर झालेनंतर सदरील साहित्य विक्रीकामी संबंधीत विभागांनी कळविलेने त्यांचा चालू वर्षीचे (सन-२०१७-१८ चे) यादीत समावेश करणेस मान्यता असावी.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

अभिप्राय:- सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षामधील भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१७ रोजी पुर्ण होत असल्याने असे साहित्य पुढे साठवू नये, त्याचे साठवणूकीतून साईभक्तांचे तसेच सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचू नये, करिता अशाप्रकारचे निरूपयोगी / टाकाऊ भंगार साहित्य वेळीच विक्री/विल्हेवाट करणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करून तसेच Online ई-निविदा मागविणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

विषय नं.८० **बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडे दाखल झालेले स्निफर डॉग व कर्मचारी यांचेकरीता साईप्रसाद इमारतीमधील रुम नं.३० व ३१ विनामुल्य उपलब्ध करुन देणे.**

प्रस्ताव- मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशान्वये साईमंदिर व परिसराचे सुरक्षिततेसाठी शिर्डी येथे सन २००९ मध्ये बॉम्ब शोधक व नाशक पथकाची स्थापना करणेत आलेली आहे. सदरचे पथक संस्थानचे सुरक्षिततेशी संबधीत असल्याने सदर पथक व पथकातील कर्मचारी, स्निफर डॉग,डॉग हॅडलर व साधन सामुग्री एकाच ठिकाणी राहावी व भविष्यात कुठल्याही घटनेला तातडीने सामोरे जाण्यासाठी सर्वजन एकत्रित राहावे या उद्देशाने सदर पथकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११४ अन्वये साईप्रसाद नं.०१ इमारतीमध्ये चार खोल्या मोफत उपलबध करुन देण्यात आलेल्या आहेत.

आता, सहा. पोलीस निरिक्षक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, शिर्डी यांनी दि.०४/०१/२०१७ रोजीचे पत्राने, आमचे पथकाती कर्मचारी व स्निफर डॉग यांचेकरीता यापुर्वी साईप्रसाद नं.०१ मध्ये चार खोल्या मोफत देण्यात आलेल्या आहेत. सध्या मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने नव्याने दुसरा स्निफर डॉग पथकामध्ये दाखल झालेला आहे. त्यामुळे सध्या आपण उपलब्ध करुन दिलेल्या खोल्या आपु-या पडत आहेत. सबब, पथकात नव्याने दाखल झालेला स्निफर डॉग व डॉग हॅन्डलर यांचेकरीता नव्याने दोन खोल्या मिळणेची विनंती केलेली होती.

सहा.पोलीस निरिक्षक, बॉम्ब शोधक व नाशक पथक यांचे विनंती अर्जानुसार तातडीची बाब म्हणुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा-आस्था/५४७०/२०१७ दि.२३ जानेवारी, २०१७ रोजीचे आदेशाने साईप्रसाद नं.०१, खोली क्र.३० व ३१ मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेची अटीवर पुढील आदेश होईपर्यंत निशुल्क दराने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

तरी बॉम्ब शोधक व नाशक पथकासाठी साईप्रसाद नं.०१ मध्ये खोली क्र.३० व ३१ उपलब्ध करुन देण्याचे केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

विषय नं.८१ **ऑल इंडीया रेडिओ यांनी शिर्डी येथे सुरु केलेल्या एफएम रेडीओ केंद्राच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

प्रास्ताविक: श्री साईबाबांचे जिवनकार्य व शिकवण याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतुने उपरोक्त संदर्भ क्रं. 01 चे पत्रान्वये प्रसार भारती बोर्ड नवी दिल्ली यांना शिरडी येथे आकाशवाणी (एफ एम केंद्र) तिरुपती बालाजी मंदिराचे धरतीवर सुरु करण्याची तसेच भविष्यात स्वंतत्र आकाशवाणी केंद्र सुरु करण्यासाठी कळविण्यात आले होते.

जनसंपर्क विभागाचे उपरोक्त दि. 11/01/2017 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये सदरची कार्यवाही आयटी विभागामार्फत करुन घेण्यात मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन इकडील विभागाने आकाशवाणी अहमदनगर यांचे प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चेर्चेअंती व ईमेलव्दारे त्यांना सदरकामी संस्थानकडुन अपेक्षित बांबीबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याची विनंती केली होती.

उपरोक्त दि. 21/01/2017 रोजीचे ई-मेलव्दारे आकाशवाणी अहमदनगर यांनी आवश्यक कार्यवाहीबाबत प्रस्ताव पाठविलेला होता. तसेच त्यांनी (एफ एम केंद्र) चे उद्घाटन दि. 01/02/2017 रोजी सकाळी 09.30 वा नियोजित केलेले आहे. असेही ई-मेलमध्ये नमुद केलेले होते. सदर प्रस्तावामध्ये त्यांनी मागणी केलेल्या सुविधा पुढीलप्रमाणे.

1. मंदिरापासुन प्रसारण कक्षापर्यंत अखंडीत ऑडीओ सिग्नल.
2. दि. 01/02/2017 रोजीचे उद्घाटन समारंभासाठी मंदिर परिसरात फुलांनी सजावट असलेले व्यासपीठ

3. व्यासपीठावरती कलाकार व आमत्रिंतासाठी बैठक व्यवस्था व 200 पेक्षकांसाठी (खुर्च्या) बैठक व्यवस्था.
4. कलाकार व साथ-संगत यांचेसाठी दि. 31/01/2017 रोजी एक दिवसासाठी तीन रुमची व्यवस्था.
5. प्रसारण कक्षाकरीता नेमलेल्या कर्मचाऱ्यासाठी साईनाथ हॉस्पिटल येथे एक रुम उपलब्ध करुन देणे.
6. साईनाथ रुग्णालय येथे प्रसारण कक्षाकरीता नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकरीता एक रुम.

उपरोक्त प्रमाणे सुविधा त्यांना संदर्भ क्रं. 04 चे परिपत्रकान्वये विविध विभागांकडुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या.

सदरच्या सुविधेसाठी आवश्यक असलेले तांत्रिक उपकरणे, सद्यस्थितीत साईनाथ रुग्णालय येथे असलेल्या दुरदर्शन प्रक्षेपण केंद्राच्या ठिकाणी कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत.

दि. 01/02/2017 रोजी सकाळी 9.30 वा. ऑल इंडीया रेडीओ यांचे शिर्डी एफएम केंद्राचे उद्घाटन मा श्री सुरेश चंद्र पंडा (मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रसार भारती), मा. सुरेश हावरे (अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान), एफ शहरीयार (महानिर्देशक आकाशवाणी), तसेच संस्थानचे मा. उप-अध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत पार पडले आहे.

सदर आकाशवाणी एफएम केंद्रावरती साईबाबाच्या मंदिरात होणाऱ्या चारही आरत्या तसेच सकाळी 05 ते 06 व रात्री 09 ते 10.30 वा या दरम्यान मंदिरात होणारे धार्मीक कार्यक्रम प्रसारीत करण्यात येणार आहेत.

मागणी: साईबाबा संस्थानने संदर्भीय पत्राव्दारे आकाशवाणी अहमदनगर (ऑल इंडीया रेडीओ) यांना केलेल्या मागणीनुसार दि. 01/02/2017 रोजी त्यांनी सुरु केलेल्या आकाशवाणी शिर्डी एफ.एम. केंद्राच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान: तांत्रिक व प्रशासकीय.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: साईबाबा संस्थानने संदर्भीय पत्राव्दारे आकाशवाणी अहमदनगर (ऑल इंडीया रेडीओ) यांना केलेल्या मागणीनुसार दि. 01/02/2017 रोजी त्यांनी सुरु केलेल्या आकाशवाणी शिर्डी एफ.एम. केंद्राच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर सविनय सादर.

निर्णय क्र.८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑल इंडीया रेडिओ यांनी शिर्डी येथे सुरु केलेल्या एफएम रेडीओ केंद्राच्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

तसेच शिर्डी येथे ५ के.डब्ल्यु. क्षमतेचे एफ.एम. केंद्र स्टुडीओसहीत सुरु करणेसंदर्भात त्यांचेशी पत्रव्यवहार करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.८२ **शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील असलेल्या कर्मचाऱ्यांना ०२ नॉन ए.सी. खोल्यांमध्ये विनामुल्य निवासव्यवस्था करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद :- १७ (१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा – अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवायचा आहे, ती उदिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा अनुषंगिक पुरविण्यात येते. त्या अनुषंगाने व्दारावती भक्तनिवास इमारत दि.१५/०८/२००९ पासुन साईभक्तांच्या निवासासाठी सुरु करण्यात आलेली आहे. ८० ए.सी.व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांच्या निवासासाठी वापरात आहे.

व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये भक्तांची गर्दी वर्षभर कायम असते. व्दारावती विभागातील खोल्या ९० % ऑनलाईन बुकींगव्दारे साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहे. तसेच १० % खोल्या जनसंपर्क कार्यालयामार्फत व्ही. आय. पी. तसेच देणगीदार साईभक्तांना देण्यात येत असतात. तसेच शिल्लक असलेल्या खोल्या प्रत्यक्ष काऊंटरवर आलेल्या साईभक्तांना देण्यात येतात. व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील खोल्या १०० % (पुर्ण क्षमतेने) दररोज साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात.

विभागाची मागणी- शिर्डी येथे दि.०१/०२/२०१७ रोजी आकाशवाणी केद्रांचे एफ एम प्रेक्षपणाचे उदघाटन झाले. सदर प्रक्षेपण हे शिर्डी येथुन सकाळी ०४.०० ते रात्री ११.१० पर्यत कायम स्वरुपी चालु राहणार असुन सदर कार्यक्रमा मध्ये श्रींच्या सर्व ०४ हि आरत्या व दैनदिन कार्यक्रम प्रक्षेपण करणार आहे. सदर कार्यक्रमासाठी आकाशवाणी केद्रांचे दोन शिफ्ट मध्ये कामकाज चालणार आहे. सदर कर्मचा-याच्या

निवासस्थानासाठी व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये दोन नॉन एसी रुम विनामुल्य मिळणेबाबतची मागणी आकाशवाणी केंद्र यांनी विनंती केली आहे मा.अध्यक्ष सो यांचे सुचनेनुसार दि.०२/०२/२०१७ पासुन दोन नॉन एसी खोल्या विनामुल्य देण्यात आलेल्या आहेत.

संस्थान आधिनियम/ ठराव यानुसार अनुमान:- मा व्यवस्थापन समितीच्या निर्णया नुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-

०१) व्दारावती भक्तनिवास विभागामधील ऑनलाईन बुकींग व पी आर ओ तसेच देणगीदार साईभक्तांना देण्यात येत असल्याने खोल्या पुर्ण क्षमतेने १०० **%** भरलेल्या असतात. व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये आजतागायत कोणत्याही प्रकारे कायमस्वरुपी विनामुल्य खोली देण्यात आलेली नाही. निवासस्थान विभागामार्फत तात्पुरते स्वरुपात साईभक्तांना निवासासाठी संस्थान नियमानुसार दोन/ तीन दिवसांपर्यंतच निवासस्थान उपलब्ध करुन दिला जातो. व नियमानुसार सेवाआकार आकारण्यात येतो.

०२) आजपर्यंत कोणत्याही शासकिय कामासाठी शासकिय कर्मचा-यांना विनामुल्य रुम दिले गेलेले नाहीत. तशी तरतूद संस्थानच्या अधिनियमात नमुद नाही. तसे केल्यास पुढे शासकिय कामासाठी विनामुल्य रुमची मागणी केली जाऊ शकते याची शक्यता नाकारता येत नाही.

०३) मागणीदार यांचे मागणीनुसार त्यांना निशुल्क स्वरुपात दिर्घ काळासाठी निवासस्थान उपलब्ध करुन दयावयाचे असल्याने सदर निवासस्थानाचा संस्थान आस्थापनेमार्फत कार्यादेश पारित होऊन, मालमत्ता विभागामार्फत सदर दोन विनामुल्य नॉन एसी खोल्यांचा करारनामा करुन घेणे आवश्यक आहे.

०४) मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२६/०३/२०११ रोजीचे सभेतील विषय नं.३१, निर्णय क्र.२३१ अन्वये देणगीदार साईभक्तांची विनाशुल्क निवासव्यवस्था केली जाते. त्यानुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीचे देणगीदार साईभक्त संख्या २६७७ (दोन हजार सहाशे सत्ताहत्तर) असुन प्रत्येक देणगीदारास १ (एका) वर्षामध्ये १० (दहा) दिवस विनामुल्य रुम दिली जाते. देणगीदार साईभक्त वर्षाभरात कायम व्दारावती भक्तनिवास मध्ये राहण्यास येत असतात. त्यांना प्राधान्याने खोली देऊन उर्वरित खोल्या नियमानुसांर कांऊटर वरुन वाटप करता येतील.

०५) व्दारावती भक्तनिवास इमारती मधील नॉन एसी रुमचा सेवा आकार २४ तासासाठी ३ (तीन) व्यक्ति करीता ५००/- (पाचशे रुपये मात्र) घेतला जातो व दोन रुमचा २४ तासांसाठी १,०००/- (एक हजार रुपये मात्र) सेवाआकार घेतला जातो. तर एका वर्षासाठी दोन नॉन एसी रुमचा सेवाआकार (३६५ दिवसासाठी) ३,६५,०००/- (तीन लाख, पासष्ट हजार, रुपये मात्र) वार्षिक खर्च येईल. शिर्डी आकाशवाणी केद्रांतील कर्तव्यावर असलेल्या कर्मचा-यानां दोन नॉन एसी खोल्या विनामुल्य दि.०२/०२/२०१७ पासुन देणेस व येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

विषय नं.८३ **मराठी श्री साईसच्चरित ग्रंथ हा सामुदायिक पारायणाचे वाचनासाठी उपलब्ध करुन देणे.**

प्रस्ताव- **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७.पोट कलम २ मधील " ठ "मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प्रस्ताविक:- श्री साईसच्चरित मराठी ग्रंथाचे शिर्डी व शिर्डीचे जवळील गावांमध्ये दरवर्षी पारायण करीत असतात. त्याकामी संस्थानकडे २०० ग्रंथ उपलब्ध आहेत. पारायणर्थीचे मागणीनुसार पारायण करणेसाठी देत असतो व पारायण झालेनंतर सदर ग्रंथ इकडील विभागाकडे जमा करुन घेतले जातात.

प्रस्ताव:- सध्या दिवसेंदिवस पारायणार्थी वाचकांचे संख्येत वाढ होत असल्याने, उपलब्ध ग्रंथांचे संख्येत वाढ करावी व ती १००० नगापर्यंत असावी असे मा. विश्वस्त श्री. सचिन तांबे यांनी दुरध्वनीवरुन निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे श्री साईसच्चरित मराठी ग्रंथ १००० नग हे संस्थानकडे कायम स्वरुपी ठेवता येतील व पारायण झालेवर ते परत जमा करुन घेता येतील. पारायणार्थींची संख्या विचारात घेता व आवश्यकतेनुसार त्या त्या गावांतील ग्रामस्थांना मागणीनुसार देता येतील व शताब्दी वर्षा निमित्त बाबांचा प्रचार-प्रसार होणेस मदत होईल.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- श्री साईसच्चरित मराठी ग्रंथ १००० नग प्रकाशने विभागाचे खाती ठेवणेस व त्यासाठी येणारे (प्रती नग सवलतीच्या दरातील विक्री किंमत रु. १००/- प्रमाणे) रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये. एक लाख मात्रचे) खर्चास मान्यता असावी, व सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मराठी श्री साईसच्चरित ग्रंथ सामुदायिक पारायणाचे वाचनासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

विषय नं.८४ **शिर्डी शहरातील भिकारी, भिक्षेकरी गृहात हलविणेकामी सुरक्षा रक्षक पुरविणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीचे कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्या करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक :- निरंक

प्रास्तविक:- सौ.सोगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपालिका तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दि.११/०१/२०१७ चे पत्र प्राप्त झाले असुन पत्रामध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी शहर विकासाच्या विविध विषयांवर विचार होऊन या विकासकामांना आपल्या कार्यालयाने अनुमती द्यावी. यामध्ये संरक्षण विभागाचे संबंधीत शिर्डी शहरातील भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेसंदर्भात साईबाबा संस्थानकडून हॉस्पीटलचे डॉक्टर्स, नर्स, वॉर्डबॉय व सुरक्षा रक्षकाची मदत मिळावी, अशी मागणी केलेली आहे.

मागणी:- शिर्डी शहरातील भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेकामी संस्थानमार्फत सुरक्षा रक्षक पुरविणे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- शिर्डी शहारामध्ये भिक्षेकऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली असुन मंदिराकडे येणारे-जाणारे रस्त्यांवर भिकारी उभे राहुन श्रींचे दर्शनासाठी येणारे भक्तांना पैसे मागत असतात. पैसे दिले नाही तर, साईभक्तांचा पाठलाग करुन त्यांना पैसे देण्यास परावृत्त करतात. नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा विश्वस्त यांनी शिर्डी शहरातील भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेकामी सुरक्षा रक्षकांची मदत मिळणेबाबत मागणी केलेली आहे. भिकारी भिक्षेकरी गृहात हलविल्यास श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना होणारा भिकाऱ्यांचा त्रास नक्कीच कमी होण्यास मदत होईल, असे नम्र मत आहे. याकरीता भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेचे वेळी शिर्डी नगरपंचायत यांचे मागणीनुसार वेळोवेळी संस्थानमार्फत सुरक्षा रक्षक पुरवीता येतील.

तरी सौ.सोगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपालिका तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे शिर्डी शहरातील भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेकामी सुरक्षा रक्षक पुरविणेबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे मागणीनुसार स्थानिक व साईभक्तांना त्रास होऊ नये याकरीता शिर्डी शहरातील भिकारी भिक्षेकरी गृहात हलविणेकामी आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षक पुरविणेस मान्यता देण्यात आली.**

तसेच, शिर्डी नगरपंचायतीच्या ताब्यात असलेल्या नवीन पिंपळवाडी रस्त्यावरुन साईभक्तांच्या सोयीचे दृष्टीने दर्शन रांगेचे नियोजन केले जाते. हा रस्ता संस्थान वापराकरीता घेणेसाठी नगरपंचायतीसोबत करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

विषय नं.८५ **छत्रपती युवा संघटना, सातपुर, नाशिक यांचेकडील व्ही.आय.पी. पास बंद करुन सर्व भक्तांना समान वागणूक देणे संदर्भातील पत्र.**

निर्णय क्र.८५ **सदरहू विषय रद्द करणेत आला.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

विषय नं.८६ **शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे माहिती केंद्र व किऑक्स मशिन बसविण्यासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत मा. वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, नासिक यांचेकडील पत्र क्र. मपविम/ प्राकाना/ शिर्डी संस्थान/ ७०४/२०१७ दि. ०४/०१/२०१७.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- शिर्डी येथे संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील उपलब्ध गाळयांपैकी एक गाळा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे माहिती केंद्र व किऑक्स मशिन बसविण्यासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत..

प्रस्तावना - श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात शिर्डी येथे मोठया प्रमाणावर भाविक/पर्यटक येण्याची शक्यता आहे. या पर्यटकांना शिर्डी शहर व परिसर आणि महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळांची माहिती एकाच

ठिकाणी मिळण्यासाठी साईबाबा संस्थानची १००० रुम परिसरामध्ये किंवा साई कॉम्प्लेक्समध्ये उपलब्ध असलेल्या गाळयापैकी एक गाळा विनामुल्य पर्यटन केंद्रासाठी उपलब्ध करुन देणेकामी मा.वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, मपविम/ प्राका, नासिक यांनी त्यांचेकडील उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, मपविम/ प्राका, नासिक यांनी संस्थानचे साईआश्रम १ (१००० रुम) येथे एक गाळा विनामुल्य मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तथापि,सध्यस्थितीत उक्त ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास देणेसाठी गाळा उपलब्ध नाही. तथापि, संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे उपलब्ध असलेल्या दक्षिण बाजुकडील गाळयांपैकी एक गाळा उपलब्ध करुन देता येईल. मात्र महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विनंतीनुसार त्यांना सदर गाळा विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यास इतरही संस्था, महामंडळे, शासकीय कार्यालये जागेची विनामुल्य मागणी करतील. तेंव्हा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सदरचा गाळा विनामोबदला उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही.

तरी वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, मपविम/प्राका, नासिक यांना साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) याठिकाणी अकरा महिन्यांचे कराराने सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडे दराप्रमाणे भाडेतत्वावर एक गाळा देणेबाबतच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या निर्धारित अटी/ शर्तीवर ११ महिन्याचे कराराने लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर संस्थान परिसरातील एक गाळा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे माहिती केंद्र व किऑक्स मशिन बसविण्यासाठी सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

विषय नं.८७ **स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेस दरवाढीसह मुदतवाढ देणे.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- स्टेट बॅक ऑफ इंडीया,शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेस दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत व मासिक भाडे निश्चित करणेबाबत.

प्रस्तावना- स्टेट बॅक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी.जागा वापरास देण्यात आलेली असून सदरची मुदत दि.२७/०७/२०१६ अखेर संपुष्टात आलेली आहे.

शाखाधिकारी, स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांनी सिटी सर्वे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील ए.टी.एम.केंद्रासाठी देण्यात आलेल्या जागेस दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ या १२ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने स्टेट बॅक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थानचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील ९ स्क्वे.मी.जागा ए.टी.एम.साठी दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन म्हणजेच रु.४७९२/- + ४७९/- (१० टक्के) = रु.५२७१/- (अक्षरी रु.पाच हजार दोनशे एकाहत्तर मात्र) भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देता येईल. याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.४७९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बॅक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी दिलेली संस्थानचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावर दिलेल्या ९ स्क्वे.मी.जागा मध्यवर्ती ठिकाणी असून त्या जागेचे भाडे खूपच कमी आहे. याकरीता व्यवस्थापक,स्टेट बॅक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेशी भाडेवाढ करणेबाबत चर्चा करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा, असे ठरले."

दरम्यानचे काळात उक्त जागेचे भाडे दर प्रमाणपत्र मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून मागविणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील जा.क्रं.रेषा/१०१४७/२०१६ दि.२०/१२/२०१६ अन्वये भाडे प्रमाणपत्र इकडेस खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

"प्रमाणित करणेत येते की,कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील एकूण जोत्याचे क्षेत्रफळ ९ चौ.मी.असलेली इमारत (एक खोली) शाखाधिकारी,स्टेट बॅक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांच्या कार्यालयासाठी घेतलेल्या इमारतीचे मासिक

भाडे रु.१०५३/- (रु.एक हजार त्रेपन्न मात्र) दरमहा स्थानिक कर वगळून ठरविण्यात आलेले आहे. सदरचे प्रमाणपत्र सदर इमारत ताब्यात घेतल्यापासून ते इमारत रिक्त करेपर्यंत ग्राहय राहील."

उक्त निर्णयात नमूद केलेप्रमाणे मा.शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेशी उक्त मासिक भाडेबाबत दि.२४/०१/२०१७ रोजी समक्ष चर्चा केली असून त्यात शाखाधिकारी यांनी उक्त जागेचे भाडे दरमहा रु.६,०००/- (रु.सहा हजार मात्र) इतके देणेचे कबूल केले असून त्यात यापुढे दरवर्षी १० टक्के वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन करारनामा करुन देणेबाबत मान्य केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौ.मी.जागा (एक गाळा) ए.टी.एम.साठी दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.६,०००/- (रु.सहा हजार मात्र) इतके आकारणेत येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देता येईल व त्यात त्यापुढील प्रत्येक वर्षी १० टक्के वाढ करुन भाडे आकारणेबाबतचा करारनामा करुन घेता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीमध्ये ए.टी.एम.चे वापरासाठी दिलेल्या ९ चौ.मी. जागेस दरमहा मासिक रक्कम रु.६,०००/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

विषय नं.८८ **स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीच्या पहील्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागेस दरवाढीसह मुदतवाढ देणे.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाचे लेखी पुर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहील्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत व मासिक भाडे निश्चित करणेबाबत..

प्रस्तावना- शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२७/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये त्यांना सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथछाया इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ चौ.मी. जागेस दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या एक वर्षे कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२१६ अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील जागा १६२.८८ चौ.मी. इतक्या जागेस मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे होणारा विदयुत आकार वेगळा याप्रमाणे मासिक भाडे आकारणेत येवून दि.११/११/२०१५ ते दि.१०/११/२०१६ अखेर एक वर्षे कालावधीसाठीची मुदतवाढ देणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे सध्यस्थितीत स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना मासिक भाडे रक्कम रु.७८,४६९/- इतके असून सदर मासिक परवाना फीमध्ये १० टक्के वाढ केल्यास मासिक भाडे रु.७८,४६९ + ७,८४७ (१०टक्के) = रु.८६,३१६/-इतके मासिक भाडे होत आहे तसेच मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा होईल. मात्र उक्त मासिक भाडयाबाबत दि.०३/०२/२०१७ रोजी मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा शिर्डी यांचेशी समक्ष चर्चा केली असून, सदर चर्चेत शाखाधिकारी यांनी उक्त जागेचे भाडे दरमहा रक्कम रु.९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार) इतके देणेचे कबूल केले असून त्यात यापूढे दरवर्षी १० टक्के वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन करारनामा करुन देणेबाबत मान्य केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय - शाखाधिकारी स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीमधील पहील्या मजल्यावरील १६२.८८ चौ.मी.जागा दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.९०,०००/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देणेकामीच्या व त्यात त्यापुढील दरवर्षी १० टक्के वाढ करुन भाडे आकारणीबाबतचा करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीच्या पहील्या मजल्यावरील वापरास दिलेल्या १६२.८८ चौ.मी. जागेस दरमहा रक्कम रु.९०,०००/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

विषय नं.८९ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल. अशी तरतुद आहे.

प्रस्तावना: श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये (MSW) नर्सेस स्टेशनकरीता रुम तयार करणेत आलेली आहे. सदर रुम वापरासाठी कमी पडत असल्याने, तेथे सध्या असलेले पार्टीशन स्थलांतरीत करुन मोठ्या आकाराची रुम तयार करुन मिळणेबाबत वैद्यकिय प्रशासक यांनी दि.२४/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. करीता सदरहू रुमची इकडील विभागामार्फत पाहणी करणेत आली असून, सदर ठिकाणी खालील तपशिलानुसार ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करुन घेता येईल. त्यासाठी जिल्हा दरसूची (DSR) नुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Sr. No.	Description	Qty. / Unit	Rate	Amount
01.	Providing and fixing in position powder coating extruded alluminium partition having frame made out of alluminium extruded tubular section of size 65mm *40mm. with 12 mm. thk. three layered flat pressed T.W. particle board bonded with BWP type exterior grade phenol formaldehyde synthetic resin confirming to IS 12823-1990, laminated on both sides, novateak or equivalent. With aluminum glazing chips of size 12mm x12mm. as per drawings etc. complete. (Ahmednagar DSR-2016-17) Size : 01. 6'-3"x5'-3" = 32.81 02. 9'-3"x5'-3" = 48.56 03. 10'-9"x9' = 96.75 Total : =178.12 Less Door 21 sq.ft. = **157.12 Sq.ft.**	157.12Sq.ft.	239/- Per Sq. ft.	37,552/-
02.	Providing and fixing in position single Shuttered alluminium extruded powder coating door with alluminium door frame of powder coated section 101.6mm x 44.75 mm, 3.18mm tk. and shutter comprising of powder coated section having bottom and lock rail of size 150mm x 44.45 mm, 2.9mm tk., top rail 47.62mm x 44.45mm, 3.18mm tk. vertical styles 47.62 x 44.45 mm , 3.0mm tk. and 12mm tk. both side laminated phenol bonded particle board panels for shutter, tubular door closer of heavy duty having I.S.I mark, heavy duty concealed lock, necessary beading glazing clips, pvc gaskets, tower bolts etc. complete as per design & drawing. (Nashik PWD DSR 2014-15) (Size : 3'x7' = **21 sq.ft**.)	21 Sq.ft.	507/- Per Sq.ft.	10,647/-
			R/o.Amount Rs.	**48,199/-**

प्रस्ताव: तरी विषयांकीत कामासाठी उपरोक्तप्रमाणे येणारे अंदाजे रु.४८,१९९/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.४८,१९९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९० **श्री साईप्रसादालयातील मुख्य किचन व उपभांडारमध्ये नवीन ॲल्युमिनिअम केबीन तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास व सदर कामासाठी कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावना: प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांनी त्यांचे दि.२४/०१/२०१७ रोजीचे टिपणीमध्ये मागणी केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयाचे उपभांडारमध्ये व मुख्य किचनमध्येॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेसाठी दि.०१/०२/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली आहे. याकामी जिल्हादरसूची सन २०१६-१७ नुसार ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करणे व कॉन्क्रीट ओटा तयार करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Sr. No.	Description	Size	Unit	Rate (Rs)	Amount (Rs)
1	Providing supplying and fixing in position powder coated extruded aluminium partitions,	23.34	Sqm	2490	58116.6
2	Providing and fixing in position, Single shuttered aluminium extruded powder coated openable door of overall size 0.90 m x 2.40 m	4.32	Sqm	7210	31147.2
3	Providing and casting in situ cement concrete M-15	1.49	Cum	4270	6362.3
	Total Estimated Cost Rs.:				**95626.00**

प्रस्ताव: तरी वरीलप्रमाणे ॲल्युमिनिअम केबीन्स व कॉन्क्रीट ओटा तयार करणेचे काम विभागाकडील उपलब्ध मटेरीअल मधून करणेस व त्यासाठी येणारे रु.९५,६२६/- मात्रचे खर्चास, तसेचॲल्युमिनिअम पार्टीशनचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९१ **संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना: संस्थान कायम कर्मचा-यांचे निवासासाठी साईनगर, समर्पण, साईध्यान नं. ०१ व ०२ या व इतर इमारती बांधणेत आलेल्या आहेत. सदर इमारतींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	इमारतींचे नांव	सदनिकांची संख्या
०१.	साईध्यान नं. ०१.	४८
०२.	साईध्यान नं. ०२.	४०
०३.	साईनगर इमारत	३०
०४.	समर्पण इमारत	३६
	एकुण सदनिका	१५४

सदरचे निवासस्थान इमारतींना सन २००९ मध्ये आतिल भागास रंगकाम करणेत आले आहे. सदर इमारतींचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम ब-याच ठिकाणी खराब झालेले आहे. त्यामुळे निवासस्थानमध्ये राहणारे अधिकारी / कर्मचारी निवासस्थान रंगकाम करुन मिळणेबाबत वेळोवेळी विनंती करत असतात. त्यांचे विनंतीनुसार प्रशासकिय मान्यता घेऊन, वेळोवेळी रंगकाम करुन देणेत येत असते.

सदरचे रंगकाम करणेसाठी वेळोवेळी प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे, मटेरिअल व मजूरी दराची कोटेशन मागविणे इत्यादी कार्यवाही कार्यवाही करावी लागते. तसेच आता, विद्युत विभागामार्फत साईध्यान नं. ०१ व ०२ इमारतींचे अंतर्गत विद्युतीकरण (लाईट फिटींग) करण्यात येत असल्याने जुनी लाईट फिटींग काढलयानंतर त्या ठिकाणी खराब दिसणार आहे. त्यामुळे सदर इमारतींचे आतिल बाहेरील रंगकाम करणे आवश्यक आहे. तसेच साईचिंतन बी-१, २, ३, ४ व साईसहवास-१,२,३,४ या इमारतींचे रंगकामासाठी देखील स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

प्रस्ताव: उपरोक्त बाबींचा विचार करता मा. प्रशासकिय अधिकारी यांनी साईनगर, समर्पण, साईध्यान नं. ०१ व ०२ या इमारतींचे आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम करणेसाठी एकत्रित प्रस्ताव सादर करणेबाबत

निर्देशित केले आहे. त्यानुसार सदरचे इमारतींचे रंगकाम करणेसाठी इकडील विभागामार्फत सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु४१,७६,२२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु४१,७६,२२०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९२ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो व आर्थो. ओ.टी.च्या पश्चिम बाजूने असलेल्या मोकळया जागेत पी.सी.सी. करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

प्रस्तावना:- श्री साईबाबा हॉस्पीटलमधील न्युरो व अर्थो ओ. टी. च्या पश्चिम बाजूस मोकळी जागा असून, तेथे उंदीर, घुशी मोठी बिळे तयार केलेली आहेत. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. सदर बाजूने श्री साईनाथ माध्यमिक विद्यलायाचे टॉयलेटची व्यवस्था आहे. याकरीता सदरहू परिसरामध्ये पाहणी करुन काम करुन देणेबाबत वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी कळविले आहे. करीता सदरहू जागेमध्ये पी. सी. सी. (कॉक्रीट) करुन घेता येईल.

उपरोक्त कामांसाठी इकडील विभागामार्फत सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु१,५८,१२७/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानूसार याकामी २०% कपात करुन रु.१,२६,५०२/- इतकी रक्कम येते. करीता आयटमरेट पध्दतीने निविदा मागविता येतील.

प्रस्ताव: तरी याकामी येणारे खर्चास व सदरहू कामी विहीत पध्दतीने आयटमरेट कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९३ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीच्या बाजूचे फेंसिंग करणे व संरक्षक ग्रील बसविणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.:– दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" ..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे बाजूचे फॅसिंग व संरक्षण भिंतीचे बांधकामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३१,२५,५९८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदरहू खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

प्रस्तावना:- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे दक्षिण बाजूने साईश्रध्दा हौसींग सोसायटीकडे जाणारा सार्वजनिक वाहतूकीचा रस्ता असून, सदहू रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. त्यामुळे साईबाबा भक्तनिवास्थान इमारतीचे रस्त्यांवर व पार्किंगमध्ये बरेच अनधिकृत वाहने उभी राहत असलेने वाहतुक नियंत्रण व सरंक्षणाचे दृष्टीने पूर्व-पश्चिम (लांबी-२१८ मी.) व दक्षिणोत्तर (लांबी-१४९ मी.) बाजूने १.२० मी. उंचीचे विटबांधकाम व त्यावर १.१० मी. उंचीचे एमएस ग्रीलसह संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे, उत्तरेकडील सध्याचे बार्बेड वायर फेन्सिंग (लांबी-३७८ मी.) ची दुरुस्ती करणे व पश्चिमेकडील पार्कींगचे उत्तर बाजू कंपाउंड (लांबी-९० मी.) वर ०.९० मी. उंचीचे चेनलिंक फेन्सिंग बसविणे इ. कामांसाठी इकडील विभागामार्फत सन २०१४-१५ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.३२,८०,२८२/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर वरीलप्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरहू येणारे खर्चास मा. खंडपीठाची मान्यता घेणेसाठी विधी विभागास दि.०७/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यावर विधी अधिकारी यांनी त्यांचेकडील दि.३०/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, मा.अध्यक्ष साहेब यांनी सदर निर्णयान्वये

कार्यवाही बाबत Keep it pending असे निर्देश दि.१२/०४/२०१६ रोजी दिलेले आहे. उपरोक्त निर्देशानुसार सदरहू कार्यवाही स्थगित ठेवणेत आलेली आहे. तथापि, संरक्षणाचे दृष्टीने इमारतीचे परिसर बंदिस्त करणे आवश्यक असल्याने संरक्षक ग्रील बसविता येतील.

प्रस्ताव: तरी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे दक्षिण बाजूने संरक्षक ग्रील बसविणेसाठी जिल्हादरसूची सन २०१६-१७ नुसार रु.९,११,१७३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/ २०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार याकामी २०% कपात करुन रु.७,२८,९३८/- इतकी रक्कम येते. करीता आयटमरेट पध्दतीने बांधकाम व मेकॅनिकल विभागामार्फत एकत्रित निविदा मागविता येतील मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीच्या बाजूचे फेंसिंग करणे व संरक्षक ग्रील बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९४ **द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

प्रस्तावना:- द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण बाजूने श्री साईनाथ रुग्णालयाकडे जाणारा रस्ता आहे. तसेच सदर इमारतीचे पश्चिम बाजूने दक्षिण उत्तर असा १८ मीटर रुंदीचा वळण रस्ता असून, सदहू रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. त्यामुळे द्वारावती भक्तनिवास्थान इमारतीचे रस्त्यांवर व पार्किंगमध्ये बेरेच अनधिकृत वाहने उभी राहत असलेने वाहतुक नियंत्रण व संरक्षणाचे दृष्टीने कंपाउंड ग्रील बसविणे आवश्यक आहे.

प्रस्ताव : सदर इमारतीचे पुर्व-पश्चिम (लांबी-२००मी.) बाजूने १.२४५ मी. उंचीचे एमएस ग्रील बसविणे, सरकते गेट बसविणे तसेच व दक्षिणोत्तर (लांबी-४९.२० मी.) भिंतीवर चेनलिंक फेन्सिंगमध्ये संरक्षक ग्रील बसविणे याकामांसाठी इकडील विभागामार्फत सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.५,७९,४१९/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानूसार याकामी २०% कपात करुन रु.४,६३,५३५/- इतकी रक्कम येते. करीता आयटमरेट पध्दतीने बांधकाम व मेकॅनिकल विभागामार्फत एकत्रित निविदा मागविता येतील मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.९५ **स्टीम बॉयलरकरीता क्वॉईल खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** 14 (भाग 4) मध्ये 14 (2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान कडे लॉन्ड्रीतील कॅलेंडर व ड्रायर मशिनला लागणारी स्टीम तयार करणेसाठी 200 किलो क्षमतेचा थरमॅक्स कंपनीचा RXA-२ स्टीम बॉयलर सन २००१ पासून कार्यान्वित आहे. दिनांक २३.१२.२०१६ रोजी RXA-२ स्टीम बॉयलरची क्वॉईल चोक अप झालेमुळे झालेमुळे सदरचा बॉयलर बंद झाला होता. त्यामुळे सदरची क्वॉईल पंचरकरुन चोकअप काढून केमिकल सर्क्युलेशन करुन बॉयलर चालू केला. सदरची क्वॉईल सन २०१३ मध्ये खरेदी केलेली असून वारंवार केमिकल सर्क्युलेशन करावे लागलेने पातळ झालेली आहे. क्वॉईल पातळ झालेमुळे कधीही क्वॉईल लिकेज होऊन बॉयलर बंद पडु शकतो. सदर बॉयलरची क्वॉईल थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर यांचे व्यतिरिक्त मार्केटमध्ये इतरत्र मिळत नाही. त्यामुळे मॅक्झाथर्म वर्क्स, औरगाबाद यांचेकडून उपरोक्त् संदर्भिय दरपत्रक मागविण्यात आलेले असून खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ नं	मालाचा तपशिल	संख्या	दर	रक्कम
1.	क्वॉईल	1	४८००२.००	४८००२.००
			व्हॅट १३.५%	६४८०.३०
			पॅकींग व फॉरवडींग ३%	१४४०.१०
			एकुण	५५९२२.४०
			एकुण पुर्णांकित रक्कम	**५५,९२२.००**

अक्षरी रक्कम **रुपये पंच्चावन्न हजार नऊशे बावीस + वाहतुक** मात्र.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थानकडे लॉन्ड्री युनिट करीता असलेला स्टीम बॉयलर कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक असलेने क्वॉईल तातडीने खरेदी करावे लागणार आहे. क्वॉईल खरेदीकामी रक्कम रु ५५९२२/- मात्र खर्च लागणार असुन सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचा खर्च मेकॅनिकल विभागाकडील सन २०१६-१७ या वर्षाचे अंदाजपत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल कामी रक्कम रु.७५,००,०००/- मंजूर असून त्यापैकी रक्कम रु.२९,३४,८७०/- शिल्लक असलेल्या रक्कमेतून करता येईल.

विभागाचे स्पष्ट मत: तरी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे RXA-२ स्टीम बॉयलर करीता मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून क्वॅईल खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. ५५९२२/- + वाहतुक मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील RXA-२ स्टीम बॉयलर करीता मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून क्वॅईल खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५५९२२/- + वाहतुक मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.९६ **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईप्रसादालयातील अन्न शिजविणेकामी येणा-या इंधन खर्चात बचत होणेसाठी श्री साईप्रसादालय इमरतीचे टेरेसवर दिनांक ३० जुलै २००९ रोजी सोलर स्टीम कुकींग प्रकल्प कार्यान्वित करणेत आलेला आहे. सोलर स्टीम कुकींग प्रकल्प मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा लि. वलसाड यांनी कार्यान्वित केलेला असून प्रकल्पाचे मेन्टेनंन्स मेकॅनिकल विभागामार्फत इन हाऊस करणेत येत आहे. सदर प्रकल्पामध्ये १६ M^2 क्षेत्रफळ असलेल्या एकुण ७३ डिश असून प्रत्येक डिशला ७" X ९" या साईजचे ३८० नग मिरर आहेत. प्रकल्पापासून तयार होणा-या वाफेवर दररोज सरासरी दोन टन अन्न शिजविले जात असून त्यापासुन अंदाजे २०० किलो एल.पी. गॅसची बचत होत आहे.

मागणी:- सोलर स्टीम कुकींग प्रकल्पामधील ७३ डिशपैकी ४३ डिशचे मिरर खराब झालेले असल्याने रिफ्लेक्शन चांगले पद्धतीने होत नाही. मिरर खराब प्रकल्पाची कार्यक्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे सदरच्या ४३ डिशचे मिरर बदलणे आवश्यक आहे . याकामी MNRE (अपारंपारीक उर्जा मंत्रालय) नवी दिल्ली, भारत सरकार चे चॅनल पार्टनर कंपनीकडून जुने मिरर काढून त्याऐवजी नविन मिरर बसविणेकामी येणा-या खर्चाचे ईमेलद्वारे दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.नं.	कंपनीचे नाव	प्रति डिशकरीता दर रु.	४३ नगाकरीता दर रुपये
१	Taylormade Solar Solution Pvt Ltd Ahmedabad	६५५००/-	२८,१६,५००/-
२	ARS Glass Tech Pvt Ltd Vadodara	६१६४४/-	**२६,५०,६९२/-**
३	LeverageNet Solution Pvt Ltd, Koregaon, Pune	७५३४२/-	३२,३९,७२६/-

जुने मिरर काढून त्यात नविन मिरर फिटींग करणे कामी उपरोक्त तक्तानुसार ARS Glass Tech Pvt Ltd Vadodara यांचे दर निम्नत्तम असुन त्यात २०% रक्कम कमी केलेस अंदाजे रक्कम रु. २१,२०,५५४/- मात्र खर्च अपिक्षत आहे. सदरचे काम सोलर स्टीम कुकींग सिस्टीमचे काम करणा-या व MNRE Channel Partner एजन्सीकडून ई निविदा मागावून करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचा खर्च मेकॅनिकल विभागाकडील सन २०१७-१८ या वर्षाचे अंदाजपत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल कामी मंजूर रक्कमेतून करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत:- सोलर रिप्लेक्शन करीता सोलर डिशचे मिरर चांगले असणे अत्यंत आवश्यक आहे. मिरर खराब झालेमुळे रेडीएशन चांगले असूनही सोलर रिप्लेक्शन चांगले होत नाही. याकरीता डिशचे मिरर बदलणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे ४३ डिशचे नविन मिरर बसविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.nic या संकेत स्थळावर ई निविदा नोटीस प्रसिध्द करुन ई निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पामधील ४३ डिशचे मिरर (आरशे) बदलविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

विषय नं.९७ **संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेसाठी वार्षिक दर निश्चित करणेकामी दरपत्रके मागविणे.**

प्रस्ताव- **अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतुद आहे.

प्रास्ताविक:- दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३७७ (४) नुसार, निश्चित केलेल्या दरानुसार, दि.१५/१२/२०१५ ते दि.१४/१२/२०१६ या एक वर्ष कालावधी करीता संस्थानला बॅटरीज पुरविणे कामी जा.क्र.एसएसएस/ वाहन/ ५११५ व ५११६/२०१५ दि.१५/१२/२०१५ अन्वये, अनुक्रमे (०१) वर्धमान ॲटो पार्टस, श्रीरामपुर व (०२) साई ॲटो बॅटरी सर्व्हिस, शिर्डी यांना कार्यादेश देण्यात आले होते. सदर कार्यादेशाची मुदत दि.१४.१२.२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. दि.१५/१२/२०१५ ते दि.१४/१२/२०१६ या कालावधीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी मंजुर दराने २३ नग बॅटरी खरेदी करण्यात आलेल्या असुन या कामी एकुण रु.१,३८,१०७/- मात्र खर्च आलेला आहे.

वाहन विभागाकडील खालील तपशिला प्रमाणे वाहनांना बॅटरीची आवश्यकता लागते.

अ.नं.	वाहन प्रकार	संख्या
०१	कार्यालयीन वाहने	१४
०२	रुग्णालयीन वाहने	१३
०३	स्कुल व प्रवासी बसेस	२४
०४	मालवाहतुक वाहने	२०

अ.नं.	प्रकार	संख्या
०५	आपतकालीन व इतर वाहने	०६
०६	टुव्हिलर	०३
०७	बॅटरी कार	०४
एकुण संख्या		**८४**

उपरोक्त विविध प्रकारच्या वाहनांकरीता खालील प्रमाणे बॅटरीजची आवश्यकता आहे.

अ.क्र.	बॅटरी प्रकार	वाहन प्रकार
01	150 AH	बसेस
02	130 /120 AH	बसेस
03	88 AH	टाटा-११०९, टाटा-४०७, स्वराज ट्रॅक्टर, अर्जुन नोव्हो ट्रॅक्टर.
04	80 AH	टाटा सुमो, टाटा विंगर, कार्डीयाक रुग्णवाहीका, महिंद्रा XUV.
05	75/ 65 AH	इनोव्हा, महिंद्रा TUV, स्कॉर्पिओ, बोलेरो, मॅक्स, टाटा ACE महिंद्रा युवराज ट्रॅक्टर
06	Din 65 AH	स्विफ्ट डिझायर
07	55 AH	मारुती इको रुग्णवाहीका
08	40 / 35 AH	टाटा नॅनो
09	2.5 LC	मोटार सायकल हिरो स्प्लेंडर
10	7 L.B.	स्कुटर TVS Zest
11	SQT-4 / SQT-5	महिद्रा सेंच्युरो

विभागाचा अभिप्राय:-

अ) पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणे कामी दर निश्चित करणे करीता परिसरातील एक्साईड, एस.एफ. सोनीक, ॲमरॉन, प्रेस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी देणे बाबत दरपत्रके मागवावे लागतील. या कामी जादा प्रसिध्दी मिळणे करीता दर मागणी पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करता येईल. ज्या ज्या वेळी संस्थान वाहनांना आवश्यकते नुसार लागणा-या बॅट-या खरेदी करणेपुर्वी मंजुर दराने येणारे खर्चास त्या त्या वेळी मान्यता घेण्यात येईल.

ब) साईआश्रम निवासस्थान मध्ये निवास करणा-या वृध्द व अपंग साईभक्तांना इमारतींपर्यंत (बुकिंग काऊंटर ते रुम पर्यंत) ने-आण करणे कामी मैनी इंडस्ट्रीज प्रा.लि. बैंगलोर कंपनीच्या ४ बॅटरीवर चालणा-या कारचा वापर होत असुन एका कारला 8V-150AH या साईजच्या ८ बॅट-या आहेत. सदर बॅटरी फक्त बॅटरीकारचे उत्पादक कंपनीकडेच उपलब्ध होत असलेने भविष्यात ज्यावेळी नवीन बॅटरी खरेदीची आवश्यकता असेल त्यावेळी थेट बॅटरीकार उत्पादक कंपनीकडून खरेदी कराव्या लागतील.

मागणी:- तरी संस्थान वाहनांकरीता पुढील एक वर्षा करीता आवश्यकतेनुसार बॅटरी पुरविणे कामी वार्षिक दर निश्चित करणेसाठी एक्साईड, एस.एफ. सोनीक, ॲमरॉन, प्रेस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी

देणेबाबत दरपत्रके मागविणेस व बॅटरीकार करीता आवश्यकतेनुसार थेट बॅटरीकार उत्पादक कंपनीकडून बॅटरी खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.९८ **मशिनिस्ट ग्राईंडर या व्यवसायाचे मशिनसाठी Rectangular Magnatic Chuck खरेदी करणे.**

प्रस्ताव- **सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेत मशिनिस्ट ग्राईंडर हा व्यवसाय ऑगस्ट १९९३ या सत्रापासुन सुरु केलेला आहे.सदर व्यवसरायाकरीता आवश्यक असलेली Praga Precession Surface Grinding Mashine = 04 Nos. ही सन १९९८ मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे.मशिनचे असेसरीज सोबत Rectangular Magnetic Chuck प्राप्त झाला होता, त्याची किंमत रु.१२९८०/- इतकी होती.सदरील मशिनवर या व्यवसायाचे प्रशिक्षणार्थ्यांचे नियमित प्रात्यक्षिक सुरु असते.मशिनचे असेसरीज सोबत प्राप्त झालेला Rectangular Magnetic Chuck चा उपयोग हा मशिनमध्ये जॉब पकडणेकामी केला जातो. मशिनचे असेसरीज सोबत प्राप्त झालेला Rectangular Magnetic Chuck हा खराब झालेला असल्याने मशिनवरुन जॉब न पकडला गेल्यामुळे जॉब हवेत उडुन दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. Rectangular Magnetic Chuck हा नियमित प्रात्यक्षिकात मशिनवर जॉब पकडणेकामी आवश्यक असल्याने तो नविन खरेदी करणे आवश्यक आहे.याबाबत इंटरनेटवर पाहुन त्याची प्रत काढण्यात आलेली आहे तसेच पुरवठादाराकडे चौकशी केली असता टॅक्ससह रु.२०४२५/- सांगितलेली आहे. Rectangular Magnetic Chuck चा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No.	Description	Qty.Req.	Appx.Rate	Total Amount
1	Rectangular Permanent Magnetic chuck Size 450x 150 mm. Appex make	06 Nos.	20450/-	122700.00
				122700.00

मागणी:- सदरील Rectangular Permanent Magnetic Chuck खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.१,२२,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी विहीत पध्दतीने पुरवठीदारांकडून दरपत्रके मागवुन सदरील Magnetic Chuck खरेदी करता येईल.

अनुमान:- वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- तरी Rectangular Permanent Magnetic chuck खरेदी करणेस, याकामी अंदाजे येणारा खर्च रक्कम रु.१,२२,७००/- व याकामी निविदाधारकाकडुन दरपत्रके मागवुन विहित पध्दतीने खरेदीकामी निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर.

निर्णय क्र.९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मशिनिस्ट ग्राईंडर या व्यवसायाचे मशिनसाठी Rectangular Permanent Magnetic chuck विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२२,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र)

विषय नं.९९ **संस्थानचे शैक्षणिक संकुलासाठी उत्तरपत्रिका छपाई करणे.**

प्रस्ताव- **संदर्भ–** शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५

अधिनियम २००४ मधील तरतुद:- क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- मा. व्यवस्थापन समिती दि. ०९/१०/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. ६८९ (०९)

प्रास्तविक:- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे इ. ११ वी व इ.१२ वी कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात चाचणी व वार्षिक परीक्षेसाठी विदयार्थ्यांना घेण्यात येणा-या परीक्षासाठी उत्तरपत्रिका छपाई करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समिती दि.०९/१०/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. ६८९ (९) अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. कनिष्ठ महाविद्यालयाकरीता उत्तरपत्रिका छपाईबाबतचा उपरोक्त विषय रद्द करणेत येऊन, सर्व शैक्षणिक संकुलासाठी एकत्रित उत्तरपत्रिकांची छपाई करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.९/१०/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. ६८९(०९) नुसार शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित उत्तरपत्रिका छपाई करावयाची आहे.

अ.नं.	छपाई तपशिल	कनिष्ठ महाविद्यालय छपाई संख्या	कन्या विद्या मंदिर छपाई संख्या	इंग्लिश मि. स्कूल छपाई संख्या	औ. प्र. संस्था छपाई संख्या	एकूण छपाई संख्या	अंदाजे छपाई दर	रक्कम
०१	उत्तर पत्रिका ८ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 **हाफ** साईज	------	३०००	३०००	------	६०००	१.५०	९०००/-
०२	उत्तर पत्रिका ४ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 **हाफ** साईज	-----	-----	३०००	-----	३०००	१.००	३०००/-
०३	उत्तर पत्रिका २ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 **हाफ** साईज	-----	-----	५०००	-----	५०००	००.७५	३७५०/-
०४	उत्तर पत्रिका (पुरवणी) ०२ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर-A 4 साईज	-----	२०००	१००००	------	१२०००	००.५०	६०००/-
०५	उत्तर पत्रिका (पुरवणी) ४ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर-A 4 साईज	५०००	३०००	७०००	३०००	१८०००	१.००	१८०००/-
०६	उत्तर पत्रिका ८ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 साईज	१५,०००	२००००	७०००	------	४२०००	२.००	८४०००/-
०७	उत्तर पत्रिका १२ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 साईज	२० ,०००	३०००	७०००	१०००	३१०००	२.५०	७७५००/-
०८	उत्तर पत्रिका १६ पेजेस ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर- A 4 साईज	१०,०००	------	-----	------	१००००	३.५०	३५०००/-
							एकूण रक्कम-	**२,३६,२५०/-**

वरील दर अंदाजे असून, यापूर्वी छपाई करणेकामी मागविलेल्या दरपत्रकानुसार घेतलेले आहेत. उपरोक्त उत्तरपत्रिकांची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,३६२५०/- (अक्षरी रुपये– दोन लाख,छत्तीस हजार,दोनशे,पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे.

मागणी:- वर नमुद केलेप्रमाणे उत्तरपत्रिका छपाई करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,३६२५०/- (अक्षरी रुपये– दोन लाख, छत्तीस हजार, दोनशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान:- उत्तरपत्रिका छपाईचा विषय आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- सर्व शैक्षणिक संकुलासाठी एकत्रित उत्तरपत्रिकांची छपाई करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रक मागवून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,३६२५०/- (अक्षरी रुपये – दोन लाख,छत्तीस हजार,दोनशे,पन्नास) मात्र खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे शैक्षणिक संकुलासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकत्रित उत्तरपत्रिकांची छपाई करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,३६,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कनिष्ठ महाविद्यालय)

विषय नं.१०० **संस्थानमार्फत रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रीया/ उपचार करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबतचा पडताळणी अहवाल फेरसादर.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- निर्णय क्र.९४५ यांवर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मार्फत रुग्णांना इतर रुग्णालयांमधे शस्त्रक्रिया,उपचार करण्यासाठी देण्यात येणा-या अनुदानबाबतचा पडताळणी अहवाल वेळेवर उपलब्ध होऊ शकला नाही यांकरिता या अहवालासह सदरहु प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा असे ठरले.

तसेच वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये, डॉ. हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद, स्वामी विवेकानंद रुग्णालय, लातुर व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक यां रुग्णालयांचा समावेश करणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, अशा सुचना केल्या.

प्रास्तविक :- अ) श्री साईबाबा संस्थान मार्फत जे रुग्ण संस्थानचे रुग्णालयात येऊन, वैद्यकिय उपचार घेऊ शकत नाही व ज्या आजारांवर संस्थान रुग्णालयात उपचार होत नाही. अशा रुग्णांना, रुग्णाचा अनुदान मागणी अर्ज, रेशनकार्ड प्रत, मा. तहसिलदार साहेब यांचा उत्पन्नांचा दाखला (रू. १,००,०००/- चे आतील), रुग्णालयाचा खर्चाबाबतचा दाखला (Estimated Certificate) व सदर माहिती खरी असलेबाबतचे रुग्णाचे स्टॅंप पेपरवर प्रतीज्ञापत्र, या कागदपत्रांच्या आधारे एकूण खर्च दाखल्याच्या १५% व जास्तीत जास्त रू. २५,०००/- इतके आर्थिक अनुदान रुग्णास वरील सर्व कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर व प्रशासकिय मान्यता घेऊन त्यासंबंधीत रुग्णालयांचे नावे चेक-डीडी / आर.टी.जी.एस. व्दारे पाठविण्यात येते.

त्यानुसार संस्थान पॅनलवर असलेले एकूण ८६ रुग्णालयांपैकी, रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिक मदत पाठविली जाते. वैद्यकिय मदत मिळणेसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसत असलेले आजार संस्थानचे Web Site वर प्रदर्शीत करण्यात आली आहेत. अनुदान देण्यासाठी स्वतंत्र अनुदान विभाग कार्यरत आहे व पाठविलेली आर्थिक मदत रुग्णांना, रुग्णालयांना प्रत्यक्षात प्राप्त झाली आहे अथवा नाही. तसेच विनियोग न झालेली रक्कम परत संस्थानला पाठविण्यात येते अथवा नाही, याबाबत २४ / २५ ऑक्टोबर २०१६ रोजी पुणे येथिल खालील पाच रुग्णालयांना व काही अनुदान लाभार्थींना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या आहेत.

१) ग्रॅन्ट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनीक, पुणे
२) इनलॅक्स ॲन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे
३) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे
४) सह्याद्री स्पेसिलीटी हॉस्पिटल, पुणे
५) के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे

वरील पाचही रुग्णालयांना व काही रुग्णांच्या घरी जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन,काही रुग्णांना दुरध्वनीद्वारे संपर्क करुन,त्यांचे उपचाराबाबत चौकशी केली. त्यांना संस्थानने दिलेल्या आर्थिक अनुदानबाबत त्यांनी अभार मानले, कृतज्ञता व्यक्त केली.

पाठविणेत येत असलेल्या अनुदानाबाबत खालील प्रमाणे पडताळणी केली आहे.

१) संस्थान मार्फत पाठविलेली आर्थिक मदत रुग्णास व रुग्णालयास प्राप्त झाले बाबत.
२) विनीयोग न झालेली रक्कम संस्थान खाती परत पाठविण्यात येत असले बाबत.
३) अनुदान लाभार्थींना रक्कम वापरलेबाबत उपयोगीता प्रमाणपत्र, Stamped Receipt, रुग्णांचे Detail Bill इत्यादी बाबत
४) अनुदानाची आर्थिक मदत प्राप्त झालेबाबत रुग्ण व रुग्णालयांचे अभीप्राय बाबत.

ब) वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये, स्वामी विवेकानंद रुग्णालय, लातुर यां रुग्णालयांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त डॉ.हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद, व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक यां रुग्णालयांचे नावांचा समावेश करणेकामी वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली प्रमाणे संबंधीत रुग्णालयांकडुन खालीलप्रमाणे कागदपत्रे मागविण्यात आली होती.

१) मा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असलेबाबतचा नोंदणी प्रमाण पत्राची झेरॉक्सप्रत.
२) ट्रस्ट नियमावली (Trust Byelaws)
३) आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत.
४) मागील तीन वर्षाचे ऑडिट रिपोर्ट.
५) रुग्णालयात कोणकोणत्या अजारावरील शस्त्रक्रिया/ उपचार केले जातात याबाबतची माहिती (दरपत्रकासह)
६) रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमीपत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)
७) रुग्णालयास शासनाचे राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजनेची मान्याता आहे किंवा कसे? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.
८) रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे, याबातचा खुलासा.

तसेच रुग्णालयाबाबतचीइतर अनुषंगीक माहिती सादर करणे.

उपरोक्त कागदपत्रे डॉ.हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद, व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक यांचेकडुन प्राप्त झाली असुन वित्त व्यवस्थापक, रुग्णालये यांचेकडे पडताळणी करणेकामी देणेत आली होती. सदर कागदपत्रे वित्तव्यवस्थापक यांनी तपासली असुन जा.क्र.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त-२११/२०१७ दि.२३/०१/२०१७ अन्वये, डॉ.हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक यांनी नियमावलीप्रमाणे १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत व रुग्णालयास शासनाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर केलेली नसल्याने याबाबत त्यांना दुरध्वनीवरुन कल्पना देण्यात

आलेली होती, त्यास अनुसरुन या दोन्ही रुग्णालयांनी दि.२४/१/२०१७ रोजी उपरोक्त कागदपत्र दाखल केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान:- अ) दि. ०९/१०/२०१६ रोजी चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्देषानुसार पडताळणी करण्यात आली असुन वरील प्रमाणे प्रत्यक्ष भेटी अंती खातरजमा करून घेण्यात आली आहे. रुग्णालय भेटीचा अहवाल परीशिष्ट ब सोबत जोडलेला आहे.

ब) वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये रुग्णालयांचा समावेश करणेकामी संबंधीत रुगणालयांनी दाखल केलेली कागदपत्रे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे बरोबर आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-

अ) निर्णय क्र.९४५ अनुसरुन दि.२४/ २५ ऑक्टोबर २०१६ रोजीचा रुग्णालय भेटीचा अहवाल सोंबत परिशिष्ट ब म्हणुन जोडलेला असुन फेर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करता येईल.

ब) डॉ.हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक या दोन्ही रुग्णालयांनी वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे कागदपत्र दाखल केलेली असुन, या रुग्णालयांचा वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली मध्ये समावेश करणेस हरकत नाही.

उपरोक्त अ) फेर व ब) मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.१०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रीया/ उपचार करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबतचा पडताळणी अहवाल व वैद्यकिय अनुदान नियमावली सर्व सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविणेत यावे व त्यानंतर सदरहू प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा.**

तसेच विभागाच्या अभिप्रायामधील ब मुद्दयामध्ये नमुद केलेप्रमाणे डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक या दोन्ही रुग्णालयांचा वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेकामीच्या नियमावलीमध्ये समावेश करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

विषय नं.१०१ **लाडू प्रसाद निर्मिती करीता प्लास्टीक ट्रे (नं.JBC64080T) खरेदी करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रास्ताविक- श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०००० ते ३५००० लाडु पाकीटे कॅन्टीन विभागाकडे विक्री करणेसाठी तयार करुन पाठविली जातात.

श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. मोतीचूर लाडू व सुटी बुंदी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे किराणा मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) इ. संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्र देऊन त्यांचेकडुन सदरचे मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येत आहे.

दिवसेंदिवस साईभक्तांच्या संख्येत होणारी वाढ व शताब्दी वर्ष या निमित्ताने साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीमध्ये प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकरीता साईभक्तांना मोतीचुर लाडु प्रसाद उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे जास्त प्रमाणावर मोतीचुर लाडु तयार करणेसाठी त्याप्रमाणात साधनसामग्री असणे गरजेचे आहे. मोतीचुर लाडू तयार करणेसाठी प्रथम हरभरा दाळ सुकवुन त्यांचे बेसनपीठ तयार केले जाते. नंतर त्या बेसन पिठाव्दारे मोतीचुर बुंदी तयार करुन साखरेच्या पाकामध्ये भिजवुन हाताने लाडु वळविले जातात. हाताने वळविलेले लाडु सुकविणेसाठी ते प्रथमतः प्लास्टीकच्या ट्रेमध्ये सुकविणेसाठी ठेवले जातात व लाडु व्यवस्थित सुकल्यानंतर ते प्लास्टीक कागदावर टाकुन त्यांची पॅकींग केली जाते.

सध्या लाडु सुकविणेसाठी लाडु निर्मिती विभागाकडे एकुण ४५० नग प्लास्टीक ट्रे आहेत. त्यांची सन २००७ मध्ये रु. २४०/- प्रती नग येणेप्रमाणे खरेदी करण्यात आली होती. परंतु २०१६ च्या नाताळ सुट्ट्या व नववर्षारंभ काळात जास्तीचे प्लास्टीक ट्रे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे उपलब्ध नसल्याने लाडु प्रसाद निर्मिती करतांना आहे त्याच उपलब्ध साधनांत गर्दीचे नियोजन करावे लागले आहे. त्यामुळे जास्त प्रमाणात लाडु निर्मिती करता आलेली नाही. परंतु येणा-या शताब्दी वर्षाची संभाव्य गर्दीचे नियोजन करणेसाठी उपलब्ध असलेली प्लास्टीक ट्रे पुरेशी नाहीत. भक्तांना विहीत वेळेत लाडु प्रसादाचा पुरवठा करणेसाठी व गर्दीचे वेळी लाडु प्रसादाचे साठा उपलब्ध करुन ठेवणेसाठी आणखी ५०० नग प्लास्टीक ट्रे खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे लाडु प्रसाद निर्मितीचे प्रमाण वाढुन साठा करुन ठेवण्यास मदत होणार आहे.

सदर प्लास्टीक ट्रे खरेदीबाबत खालील पुरवठाधारक यांचेकडुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास दरांबाबत ई-मेल प्राप्त झालेले असून पुरवठा धारकांनी प्लास्टीक ट्रे नं. JBC64080T करीता ई-मेलव्दारे पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

अ.नं.	पुरवठाधारकाचे नाव	०१ नग प्लास्टीक ट्रे साठी दर
१	निलकमल लिमिटेड, नाशिक रोड, नाशिक	रु.३००/-
२	महेश इंजीनियरींग, नाशिक	रु.३४५/-
३	विजय नॉव्हेल्टीज, शालीमार, नाशिक	रु.३७४/-

उपरोक्तप्रमाणे प्लास्टीक ट्रे खरेदीबाबतचे दर पुरवठादारांनी कळविलेले असुन, ०१ प्लास्टीक ट्रे खरेदीसाठी सरासरी किंमत रु.३३० × ५०० = **१,६५,०००/-** मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात नवीन भांडी खरेदीकरीता **रक्कम रु.१०,००,०००/- आर्थिक तरतुद** करणेत आलेली आहे.

मागणी– उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे, वर नमुद केलेले प्लास्टीक ट्रे श्रीं चा प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणार असुन, येणा-या शताब्दी वर्षाची संभाव्य गर्दीचे नियोजन करणेसाठी उपलब्ध असलेली प्लास्टीक ट्रे पुरेशी नाहीत. सदर साहीत्याअभावी भक्तांना लाडु व बुंदी प्रसाद पुरविणेकामी अडचणी येवु नयेत यासाठी उपरोक्त नमुद केले प्रमाणे विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

अनुमान– आर्थिक, धोरणात्मक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– मोतीचुर लाडु प्रसाद तयार करुन वितरीत करणे, साठवण करणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्लास्टीक ट्रे नं. JBC64080T विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे अडचणी व संभाव्य गर्दी लक्षात घेता सदरचे प्लास्टीक ट्रे नं. JBC64080T विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करण्यास व येणा-या अंदाजे रक्कम रु.१,६५,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद निर्मिती करीता प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे प्लास्टीक ट्रे (नं.JBC64080T) विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फीप्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.१०२ **डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खरेदी करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटल करीता पुरवठा आदेश क्र. 8373/2005 दि. 08/08/2005 अन्वये कार्डीयाक ऑपरेशन थिएटर करीता एक Heart start XL डिफीब्रीलेटर एकुण रु. 2,83,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर डिफीब्रीलेटरकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 14/11/2006 रोजी संपलेला आहे. डिफीब्रीलेटरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2017 या कालावधीकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीत कन्झ्युमेंबल स्पेअर पार्ट (उदा. Internal / External Paddles, ECG Cable etc) वगळता मशिनचे दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे.

सध्या कार्डीयाक ओ. टी. डिफीब्रीलेटर मशिनचे Adult Internal Paddles व्यवस्थीत काम देत नसल्याचे विभागाने त्यांचे पत्र क्र. 1279 दि. 08/04/2015अन्वये कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता येउन Paddles ची तपासणी केली असता सदर Internal Paddles खराब झाले असल्यामुळे नवीन खरेदी करणे आवश्यक असल्याचे सर्व्हीस रिपोर्ट दि. 24/09/2016 अन्वये कळविले आहे. सदर डिफीब्रीलेटर मशिन कार्डीयाक ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे.

त्यानुसार डिफीब्रीलेटरचे पुरवठाधारक मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा. ली. मुंबई यांचे विविध अधिकृत सर्व्हीस डीलर्सकडे Internal Paddles करीता विचारणा केली असता कंपन्यांनी खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे. Internal Paddles करीता खालीलप्रमाणे सरासरी दर आहेत.

Sr. No.	Name of Company	Description	Model No.	Qty	Quoted Total Amount (Incl. all taxes)
01	M/s.Medical Engineering Company, Aurangabad	Adult Switched Internal Paddles	M4742A	01	56,750.00
02	M/s. Biosonic Medical Equipments, Nasik			01	68,100.00
03	M/s.Micronics Instrument Company ,Nasik			01	68,000.00
	Average Price of Internal Paddles R/O (Incl. all taxes) in Rs.				**64,283.00**

वरीलप्रमाणे डिफीब्रीलेटर करीता Internal Paddles खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रू. 64,283/- (अक्षरी रू. चौसष्ट हजार दोनशे त्र्याऐंशी मात्र) इतका इतका खर्च येणार आहे. सदर Internal Paddles करीता कंपनी तीन महिन्यांची वॉरंटी देत आहे

सदर डिफीब्रीलेटर नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच कार्डीयाक ऑपरेशन विभागात विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया होत असतात त्यामुळे Internal Paddles खरेदी करणे आवश्यक आहे. सदर डिफीब्रीलेटर करीता मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा. ली. मुंबई यांचे विविध अधिकृत सर्व्हीस डीलर्सकडून कोटेशन मागवून निम्नतम दराने डिफीब्रीलेटर करीता Internal Paddles खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा. ली., मुंबई यांचे विविध अधिकृत सर्व्हीस डीलर्सकडून कोटेशन मागवून निम्नतम दराने डिफीब्रीलेटर करीता Internal Paddles विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डिफीब्रीलेटरचे Internal Paddles विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.१०३ **मे.मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा.लि., मुंबई यांचेकडून ओ.टी. टेबलचे रिमोट- २ नग खरेदी करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी 02 विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 6013, दि. 06/01/2011 अन्वये मे.मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा. लि. मुंबई या कंपनीचा एक ओ.टी. टेबल एकुण रु 19,32,916/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आला आहे. सदर ओ.टी. टेबल कार्डीयाक ओ.टी विभागात कार्यान्वीत करण्यात आला ओ.टी. टेबल करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपला आहे.सदर ओ.टी. टेबलची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे.परंतू दुरूस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केली जातात.

सध्या कार्डीयाक ओ.टी.-II विभागातील ओ.टी. टेबल व्यवस्थित काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र.967 दि. 23/01/2017 अन्वये कळविले आहे. त्यानुसार ओ.टी. टेबलची तपासणी केली असता सदर ओ.टी. टेबलचे रिमोट (cable connected hand control) खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ओ.टी. टेबल कार्डीयाक ओ.टी. विभागात नियमीत वापरात असुन रिमोट तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारचे एकुण 04 ओ.टी. टेबल विविध ऑपरेशन थिएटर विभागात नियमीत वापरात आहे. त्यामुळे अशा प्रकारचे रिमोट (cable connected hand control) खराब झाल्यास तातडीच्या वेळी बदलणे करीता आणखी एक रिमोट बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात स्टॉकमध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे.

त्यासाठी कंपनीने त्याचे पत्र क्र.MSW-WR-124/17, दि. 02/02/2017 अन्वये सर्व करांसहीत प्रती नग रू. 71,334.75/- दराने दोन नग रिमोट करीता एकुण रु.1,42,669/- (अक्षरी रु.एक लाख बेचाळीस हजार सहाशे एकोणसत्तर मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे.परंतु कंपनी प्रतिनीधीशी झालेल्या चर्चेअंती वरील रिमोट श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झालेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे.सदर रिमोट (cable connected hand control) हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात.त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. तसेच ओ.टी. टेबलचे स्पेअर पार्ट करीता मे. मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा. लि. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत.उपरोक्त रिमोट करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे

तरी मे.मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा. लि., मुंबई यांचेकडुन ओटी. टेबलचे रिमोट (cable connected hand control) 02 नग खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा. लि., मुंबई यांचेकडून श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ओ.टी. टेबलचे ०२ नग रिमोट (cable connected hand control) खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.१०४ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद –** १७ (२) ण

प्रास्ताविक– श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व वार्ड/ विभागांसाठी लागणारे Liquid Medical Oxygen Gas Plant साठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० रोजीचे सभेत मान्यता मिळालेली होती. त्यानूसार विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/१०/२०१५ निर्णय क्र.७५६ अन्वये चर्चा / वाटाघाटी होऊन M/s. Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांचेकडून 6KL क्षमतेचा गॅस प्लॅन्ट भाडेतत्वावर ठेवण्यास व त्याकामी त्यांना दरमहा भाडे रु.१६८७५/- देण्यास तसेच ऑक्सीजन गॅस रु.१३.४९ / sm3 व्हॅटसह व पॉवरचे दरात वाढ झाली तर १.५० पैसे/

sm3 व डिझेलचे दरात वाढ झाली तर ०.२० पैसे /sm3 दर वाढवून देण्यास मान्यता मिळालेली होती. त्यानूसार M/s.Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५२९२ दि.०३/१२/२०१० रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता.

दरम्यानच्या काळात श्री साईबाबा हॉस्पिटलमधील गॅसचा खप पाहता मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२०१२ निर्णय क्र.३० अन्वये सदर प्लॅन्टची क्षमता वाढवून 13KL करण्यात येऊन त्यांचे दरमहा भाडे रक्कम रु.३४८७५/- सर्व करांसह असे ठरवून सदर प्लॅन्ट ०५ वर्षाकरीता रुग्णालयात बसिवण्यात यावे असे ठरले होते त्यानूसार M/s.Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५७०८ दि.०१/०२/२०१२ रोजी नविन कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानूसार दि.३१/०८/२०१२ पासून सदर Liquid Medical Oxygen Gas Plant श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

सदर कार्यादेशानुसार ऑक्सीजन गॅस रु.१३.४९ / sm3 व्हॅटसह व पॉवरचे दरात वाढ झाली तर १.५० पैसे/ sm3 व डिझेलचे दरात वाढ झाली तर ०.२० पैसे /sm3 दर वाढवून देण्यास मान्यता मिळालेली होती. त्यानूसार अद्याप पावेतो दोन वेळेस पॉवरचे दरात व डिझेलचे दरात वाढ झाल्यामुळे दि.१०/१०/२०१२ रोजीचे पत्रान्वये रक्कम रु.१५.४१ / sm3 व्हॅटसह तर दि.१२/०६/२०१३ चे पत्रान्वये रक्कम रु.१८.२२ / sm3 व्हॅटसह इतके दर वाढवून दिलेले आहे.

सदर Liquid Medical Oxygen Gas Plant कार्यान्वित झाल्यापासून प्रती महिना साधारणतः २५०००/-या प्रमाणे श्रीसाईबाबा रुग्णालयात रक्कम रु.१,३२,२७,६११/- इतक्या रक्कमेचा गॅस खरेदी करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

अ.नं.	वर्ष	झालेला खर्च रक्कम रु.
१	२०१२-१३	२३,०६,४३१.००
२	२०१३-१४	३५,४५,४२२.००
३	२०१४-१५	३५,६२,६४७.००
४	२०१५-१६	३२,९०,९१८.००
५	दि.०१/०४/२०१६ ते १७/०५/२०१६	५,२२,१९३.००
	एकूण रक्कम रु.	**१,३२,२७,६११.००**

मागणी– दि.३०/०८/२०१७ रोजी सदर Liquid Medical Oxygen Gas Plant चा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्यामुळे सदर Liquid Medical Oxygen Gas Plant नव्याने बसवावा लागणार आहे.

सदर Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी खालील ०3 अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानूसार त्यांनी खालील प्रमाणे दर कळविलेले आहे.

M/s. Inox Air Products Pvt. Ltd., Navi Mumbai	**M/s. Linde India Ltd.,**	**Balaji Trading Com., Sangamner**
1. Basic Price of the Product - Liquid Medical Oxygen:13.50 (INR/SM3) Ex-INOX AP works Patalganga/ Navi Mumbai/Mangaon	1. Basic Price – Rs.13.70 per Cum	1. Basic Price of the Product - Liquid Medical Oxygen:11.70 (INR/SM3)
2. Basic Price of the Product - Liquid Medical Oxygen:13.50 (INR/SM3) Ex-INOX AP works Patalganga/Navi Mumbai/Mangaon 3. Transportation Charge - Rs.2.50persm3. 4. ExciseDuty - @12.50%extra on basic price & transportation charge (Presently Nil on use of Medical Oxygen.) 5. Sales Tax - MVAT@5%will be applicable 6. Fixed Facility Charge(FFC) for Storage tank & Allied equipments installed by INOXAP - 13KL-	2. Basic Price – Rs.13.70 per Cum 3. Delivery Charges – Rs. 4.00 Per Cum 4. Facility Charges for 10 KL Tank per Month – Rs – 23000.00 5. One Time Installation Charges – Rs 1.50 Lacs 6. The above Prises are exclusive of any taxes & leies – VAT / GST / OCTORI / Excise etc 7. Currently for	2. Basic Price of the Product - Liquid Medical Oxygen:11.70 (INR/SM3) 3. Transportation Charge - Inclusive in the above. 4. ExciseDuty – Presently Nil on use of medical oxygen 5. Sales Tax - MVAT@6%will be applicable 6. Fixed Facility Charge(FFC) for Storage tank & Allied equipments installed by Balaji - 13KL-@Rs.12000.00 (INR/Month) 7. Excise Duty on FFC -

@Rs.30000.00 (INR/Month) 7. Excise Duty on FFC - @12.50% extra (Presently Nil on use of Medical Oxygen) 8. MVA Ton FFC - @ 5% extra 9. Octroi charges - Extra if and as applicable in your area. 10. MTOP (Minimum take or pay) - Nil as a special case. 11. Contract Period - 5years 12. Diesel – For every 10 paise increase in the cost of diesel, the transport charge will be increased by 1 paise per sm3. 13. Power - For every 1 paise increase in the cost of electricity, the price of Liquid Medical Oxygen will be increased by 1.0 paise per sm3.	Medical Oxygen the Excise Duty is Nil. 8. At the time of supply if any other taxes / excise Duty will be applicable accordingly as per the Govt. Statuory norms 9. License fee three years for 10000 LIVE – As per Actuals	Presently Nil on use of Medical Oxygen 8. MVA Ton FFC - @ 13.5% extra 9. Octroi charges – At Actual 10. Diesel – The above transportation charge is based on the cost of Diesal @57.20 per Litter. For every 10 paise increase in the cost of diesel, the transport charge will be increased / decreased by 1 paise per sm3 . 11. Power - The above basis prices are fixed on the MSEB electricity tariff for the month of November 2015 @ Rs.8.68 per KWH. For every 1 paise increase / decrease in the cost of electricity, the price of Liquid Medical Oxygen will be increased by 1.0 paise per sm3.

Description	**Inox Air, Mumbai**	**Linde (I) Ltd.,**	**Balaji, Sangamner**	**Total**	**Avg. Rate**	**Less 20%**	**Per Month Rs.**
Oxygen Gas	16.80 / sm3	18.76 / sm3	12.40 / sm3	47.960	15.987	12.78	192365.00
Rental	31500.00 Per Month	26105.00 Per Month	13620.00 Per Month	71225.00	23741.67	18993.00	18993.00
Installation Charge	Nil	1.5 Lakh					

उपरोक्त प्रमाणे Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी Fixed Facility Charge प्रती महिना रक्कम रु.१८,९९३/- याप्रमाणे भाडे कळविलेले आहे. त्यांचे दरानूसार पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.११,३९,५८०/- (अक्षरी रु. – अकरा लाख एकोणचाळीस हजार पाचशे ऐंशी मात्र) इतका खर्च भाडेकरीता अपेक्षित आहे. तसेच गॅस सिलेंडरसह खरेदीकामी Per Cubic करीता १२.७८/ sm3 इतके रुपये दर असून सध्याच्या वापरानूसार प्रती महिना रक्कम रु.१,९२,३६५/- या प्रमाणे एकूण पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.१,१५,४१,९००/- (अक्षरी रु. – एक कोटी पंधरा लाख एक्केचाळीस हजार नऊशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे त्यानूसार Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी भाडे व Oxygen Gas याकरीता एकत्रित रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐशी मात्र) इतका खर्च येऊ शकतो.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– दि.३०/०८/२०१७ रोजी सदर Liquid Medical Oxygen Gas Plant चा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्यामुळे सदर Liquid Medical Oxygen Gas Plant नव्याने बसवावा लागणार आहे. सदर Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेपूर्वी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये sm3 क्षमतेचे दररोज १०० नग सिलेंडर्सद्वारे पुरवठा केला जात होता. सदर प्रकारचे सिलेंडर्समध्ये ९२% -९६% पर्यंत शुध्द ऑक्सीजन गॅस मिळतो परंतु Liquid Medical Oxygen Gas हा ९९.५०% - ९९.९% पर्यंत शुध्द स्वरुपात मिळतो. तसेच दररोज १०० पेक्षा अधिक सिलेंडर्सची वाहतूक / चढउतार केल्यामुळे सिलेंडर्सचे व्हाल्व लिक होऊन अपघाताची शक्यता अधिक असते तसेच वाहतूकीचे / वाहनाच्या प्रक्रियेमुळे ब-याच वेळा पुवठाधारकास वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा वेळेवर गॅसचा पुरवठा होत नाही.

सिलेंडर्समध्ये ९२% -९६% पर्यंत शुध्द असून त्याचा दर रु.२०/SM3 असतो व Liquid Medical Oxygen Gas हा ९९.५०% - ९९.९% पर्यंत शुध्द असून नियमित वेळेपूर्वी पुरवठा होऊन त्याचा दर रु.१५.९८/SM3 असतो. तसेच Liquid Medical Oxygen Gas Plant ची नियमित तपासणी पुरवठाधारक कंपनी करीत असल्यामुळे व सिलेंडर महिन्यातून जास्तीत जास्त दोन वेळा कंपनीमार्फत भरला जात असल्यामुळे

अधिक असुरक्षित असतो. त्यामुळे सध्या बहुतेक सर्व मोठ्या रुग्णालयामध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant कार्यान्वित आहे.

सदर Liquid Medical Oxygen Gas Plant विहित पध्दतीने ई निविदा मागवून निम्नतम दराने बसविणेकामी प्रती महिना रक्कम रु.१८,९९३/- याप्रमाणे भाडे कळविलेले आहे. त्यांचे दरानूसार पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.११,३९,५८०/- (अक्षरी रु. – अकरा लाख एकोणचाळीस हजार पाचशे ऐंशी मात्र) इतका खर्च भाडेकरीता अपेक्षित आहे.

तसेच गॅस सिलेंडरसह खरेदीकामी Per Cubic करीता १२.७८/ sm3 इतके रुपये दर असून सध्याच्या वापरानूसार प्रती महिना रक्कम रु.१,९२,३६५/- या प्रमाणे एकूण पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.१,१५,४१,९००/- (अक्षरी रु. – एक कोटी पंधरा लाख एक्केचाळीस हजार नऊशे मात्र) असे एकूण रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐशी मात्र) इतका खर्च येऊ शकतो.

तरी उपरोक्त Liquid Medical Oxygen Gas Plant विहित पध्दतीने ई - निविदा मागवून बसविणेस व त्याकरीता येणा-या प्रस्तावित प्रती महिना रक्कम रु. .१८,९९३/- याप्रमाणे भाडे कळविलेले आहे. त्यांचे दरानूसार पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.११,३९,५८०/- (अक्षरी रु. – अकरा लाख एकोणचाळीस हजार पाचशे ऐंशी मात्र) इतका खर्च भाडेकरीता अपेक्षित आहे. तसेच गॅस सिलेंडरसह खरेदीकामी Per Cubic करीता १२.७८/ sm3 इतके रुपये दर असून सध्याच्या वापरानूसार प्रती महिना रक्कम रु.१,९२,३६५/- या प्रमाणे एकूण पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.१,१५,४१,९००/- (अक्षरी रु. – एक कोटी पंधरा लाख एक्केचाळीस हजार नऊशे मात्र) असे एकूण रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐशी मात्र) चे खर्चास तसेच ई - निविदा मागवून खरेदीस मान्यता असावी.

निर्णय क्र.१०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.१०५ **श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालयात जीवनदायी योजनेतंर्गत रु.६४ कोटी रकमेची बिले शासनाकडे विलंबाने सादर झालेबाबत.**

प्रस्ताव- मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील क्र.सासंवि-१०१६/१६००/ प्र.क्र.२०५/ का.१६, दि.१९.११.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगांव जि.अहमदनगर यांच्या दि.१२.१०.२०१६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे, सदर पत्रातील मुदयांचे अनुशंगाने आपला स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी दि१२.१०.२०१६ रोजीचे पत्रामध्ये श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील जीवनदायी योजने अंतर्गत रु.६४ कोटी रकमेची बिले शासनाकडे विलंबाने सादर केलेली आहेत, त्याबाबत मा.व्य.समितीचे दि.०३.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५२ नुसार देखील कार्यवाही झालेली नाही. तरी सदर बेजबाबदार अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय – मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०३/०८/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.६५२ नूसार जीवनदायी योजने अंतर्गत रु.६४ कोटी मात्र रकमेच्या बिलांचे प्रस्ताव शासनाकडे विहित वेळेमध्ये पाठविणेसाठी संबंधीतांनी जाणीवपुर्वक विलंब केला का, याची पडताळणी मुख्यलेखाधिकारी यांनी करावी व उशिराने बिले सादर करण्याच्या कारणासह झालेल्या आर्थिक नुकसानीचा अहवाल मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करावा," असा निर्णय झाला होता. मात्र सदर निर्णयानंतर तत्कालीन मुख्यलेखाधिकारी श्री झिरपे साहेब यांनी उपरोक्त चौकशीचा अहवाल सादर केलेला नाही.

सध्याचे मुख्यलेखाधिकारी श्री घोरपडे साहेब यांनी लेखाशाखेकडे तज्ञ मनुश्यबळाची कमतरता लक्षात घेवून सदरची चौकशी सनदी लेखापालामार्फत करणे सयुक्तीक राहील असे सुचविले आहे.

सध्यस्थिती– आज अखेर जीवनदायी योजनेकडून प्राथमीक मंजुरी आदेशानूसार रक्कम रु.२२,६९,८६,८२३/- येणे बाकी आहे. सदर रक्कमेमध्ये जीवनदायी प्राधिकरणांकडून बिलांतील त्रुटी पुर्तता करणेस परत आलेली १००९ बिलांची रक्कम समाविष्ठ आहे. (सदरची बिले फेर सादर करण्यास विलंब झाल्याने जीवनदायी प्राधिकरणाने ती स्विकारलेली नाहीत. याबाबत शासन स्तरावर बिले स्विकारणे संदर्भात दि.२७ नोव्हेंबर, २०१४ची केलेली विनंती त्यांनी दि.०३ जानेवारी, २०१५ च्या पत्रान्वये अमान्य केली आहे. दि.३० जानेवारी, २०१५ चे पत्रान्वये उपसचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सदरचे बिले स्विकारण्यास मंजुरी मिळणेकामी पुन्हा एकदा विनंती करण्यात आलेली आहे. त्यावर जीवनदायी प्राधिकारणाकडून कसल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही.) तसेच शालेय आरोग्य तपासणी योजनेचे मंजुरी आदेशानूसार रक्कम रु.१,८४,८१५/- येणे बाकी आहे. वर्षनिहाय तपशिल खालीलप्रमाणे –

अ.न.	वर्ष	लाभार्थीची संख्या (जीवनदायी योजना)	लाभार्थीची संख्या (शालेय आरोग्य तपासणी)	जीवनदायी योजना प्राथमीक मंजुरी आदेशापोटी येणे असलेली रक्कम	शालेय आरोग्य तपासणी मंजुरी आदेशापोटी येणे असलेली रक्कम
१	२००७-०८	१७	४	९,११,५००/-	१,६५,७७८/-

२	२००८-०९	२१	-	१३,२५,४४०/-	--
३	२००९-१०	१३	१	९,६४,०००/-	१९,०३७/-
४	२०१०-११	०७	-	५,१०,३२५/-	--
५	२०११-१२	१५	-	१३,७६,५८७/-	--
६	२०१२-१३	६११	-	१,८०,४३,०६७/-	--
७	२०१३-१४	२,६७५	-	२०,३८,५५,९०४/-	--
	एकुण	**३,३५९**	**५**	**२२,६९,८६,८२३/-**	**१,८४,८१५/-**

तसेच आज अखेर पर्यंतच्या कालावधीत जीवनदायी आरोग्य योजनेच्या सादर केलेल्या फाईल्सच्या प्राथमीक मंजुरी आदेशापोटी एकुण ३,१६५ लाभार्थींच्या बिलाची रु.६,२४,९९,५३४/- इतकी रक्कम कमी आलेली आहे. एकुण कमी आलेल्या रकमेचा वषनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे –

अ.नं	वष	कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थींची संख्या	प्राथमीक मंजुरी आदेशापोटी येणे असलेली रक्कम	शालेय आरोग्य तपासणी मंजुरी आदेशापोटी येणे असलेली रक्कम	प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम	एकुण कमी आलेली रक्कम
१	२००७-०८	१६५	९५,३८,६८५/-	--	७९,६६,३४४/-	१५,७२,३४१/-
२	२००८-०९	१६४	१,५०,०७,०७८/-	२,३०,०६७/-	१,३२,४४,८४८/-	१९,९२,२९७/-
३	२००९-१०	१७४	१,२६,९९,३३१/-	१४,७३,८११/-	१,१४,८४,३९६/-	२६,८८,७४६/-
४	२०१०-११	३११	३,०१,४४,२६१/-	--	२,३३,२७,६२२/-	६८,१६,६३९/-
५	२०११-१२	५१३	२,८६,८८,९५३/-	--	२,३५,४५,८९२/-	५०,४७,०६१/-
६	२०१२-१३	२,६०२	२४,४४,५१,२८६/-	--	२०,४१,१५,९४४/-	४,०३,३५,३४२/-
७	२०१३-१४	२३६	२,६०,६१,८००/-	--	२,२०,१४,६९२/-	४०,४७,१०८/-
	एकुण	**४,१६५**	**३६,६५,९१,३९४/-**	**१७,०३,८७८/-**	**३०,५६,९९,७३८/-**	**६,२४,९९,५३४/-**

<u>विभागाचा अभिप्राय</u>– सदरची प्रलंबित रक्कम मिळणेबाबत तसेच त्रुटींची पुर्तता करणेकामी आलेली बिले फेरसादर करणेस मान्यता मिळणेबाबत शासनस्तरावर पाठपुरावा चालु आहे.

सबब सदरच्या चौकशीकरीता स्वतंत्र त्रयस्त पक्षाची नव्याने नेमणूक होणेकामी विहित मार्गाने अथवा सध्या कार्यरत असलेल्या सनदी लेखापालांची नेमणूक करून त्यांचेकडून प्राप्त होणारा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करता येईल.

मागणी- तरी सदर चौकशीकामी विहित मार्गाने अथवा सध्या कार्यरत असलेल्या सनदी लेखापालांची नेमणूक होणेकामी व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालयात जीवनदायी योजनेतंर्गत रु.६४ कोटी मात्र रकमेच्या बिलांबाबत सध्या कार्यरत असलेल्या सनदी लेखापालांची नेमणूक करून त्यांचेकडून प्राप्त होणारा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.**

त्याचबरोबर अशीही चर्चा झाली की, उपरोक्त रु.६४ कोटी मात्र रकमेमधून काही रक्कम संस्थानला प्राप्त झालेली असून उर्वरित रक्कमही संस्थानला लवकरात लवकर मिळावी याकरीता, मा.कार्यकारी अधिकारी यांनी आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठपुरावा करावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.१०६ **मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांना गावरान तूपाबाबत दिलेल्या नोटीसीचा खुलासा.**

प्रस्ताव- माहे जुलै-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीत ९०२५ क्विंटल गाईचे गावरान तूप संस्थानला पुरविणेकामी मे. गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांना रूपये ३५,४००/- प्रती क्विंटल दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे त्यांचेकडून पुरवठा चालू आहे.

तथापि भांडार विभागाकडून मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३०.११.२०१६ सभेमध्ये गावरान तूपाचे लॅब रिपोर्ट बाबतचा विषय सादर केला असता, त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं.८५७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला होता.

निर्णय क्रं.८५७- यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणा-या गावरान तुपाचे वेगवेगळया प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करण्यात आले. प्रयोगशाळांनी गावरान तुप वापरण्यायोग्य असलेबाबत अहवालामध्ये नमुद केले आहे. परंतु तरीही लाडू प्रसादाचा उग्र वास येतो, अशा तक्रारी येत आहेत, याकरीता गावरान तुप पुरवठा करणा-या ठेकेदारास या आशयाची नोटीस देण्यात यावी, असे ठरले.

वरील निर्णयास अनुसरून भांडार विभागाने दिनांक१६.१२.२०१६ चे पत्राने सदर निर्णयाची पुढील कारवाई खरेदी विभागामार्फत करणेबाबत कळविले होते.

त्यास अनुसरुन खरेदी विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-५०२५/२०१६ दि.२८.१२.२०१६ अन्वये मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क.प्रॉ.प्रा.लि, फलटण यांना नोटीस देण्यात आली होती.

सदर नोटीसीस अनुसरून दि.०३.०१.२०१७ रोजी मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि, फलटण यांचे खालील अधिका-यांनी शिर्डी येथे भेट दिली.

१. श्री.अजित आटोळे- क्वालिटी ॲश्योरेन्स मॅनेजर
२. श्री.देवेंद्र घनवट- प्रॉडक्शन मॅनेजर
३. श्री.श्रीरत्न खडे- प्रॉडक्शन मॅनेजर

या भेटीमध्ये त्यांनी लाडू निर्मिती विभागाला भेट देऊन लाडू निर्मिती विभागातील संबंधितांशी संपर्क साधला. आचारी व इतर कर्मचारी यांचेशी चर्चा केली. चर्चेमध्ये लाडू निर्मिती विभागाकडून तूपाबाबत काहीही तक्रार नसल्याचे सांगण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर प्रशासकीय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी व मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे समवेत त्यांनी चर्चा केली. त्यांना लाडूचा उग्र वास येत असल्याचे सांगण्यात आले.

त्यावर त्यांनी ज्या लाडूचा वास येत असेल तो तपासणीसाठी त्यांचेकडे देण्याची विनंती केली. तसेच दिलेल्या नोटीसचा लेखी खुलासा त्यांनी ईमेलव्दारे अथवा पोस्टाद्वारे देऊ असे सांगितले होते.

वरील नमुद नोटीसीस अनुसरून मे.गोविंद मिल्क ॲण्ड प्रॉ.प्रा.लि., फलटण यांनी दि. ०८.०१.२०१७ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

१. संस्थानचे लाडू निर्मिती विभागातील कर्मचा-यांशी संपर्क साधला असता त्यांनी गोविंद तूपाची Quality बद्दल तक्रार नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी काही लाडूची Taste घेतली असता त्यात त्यांना उग्र वास आढळून आला नाही. त्यांचे तूपाचे Lab Report ही व्यवस्थित असल्याचे कळविले आहे.
२. तूप तयार करण्यासाठी सर्व प्रोसेस SOPs व QA पॅरामीटरप्रमाणे करण्यात येतात. तसेच प्रत्येक बॅचचे सर्व पॅरामीटर्स त्यांचे In House Lab मध्ये तपासले जातात.
३. संस्थानला पुरविणेत येणारे तूपाचे प्रत्येक बॅचचे NABL मान्यता प्राप्त Lab चे रिपोर्टस सादर केले जातात. तसेच त्यांचे प्रत्येक बॅचचे तूपाचे सॅंपल त्यांचे Lab मध्ये तूपाचे Shelf Life पर्यंत जपून ठेवले जातात. सदर सॅंपलही त्यांनी तपासले त्यामध्ये काही Abnormal आढळले नाही. तसेच संस्थानला त्यांनी अशी विनंती केली आहे की, यापुढे लाडूचा उग्र वास येत असेल तर कळविणेस व त्या लाडूचा नमुना देणेची विनंती केली आहे.
४. त्यांचे सदर खुलासा पत्रही सोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

येणेप्रमाणे मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांचा खुलासा त्यांचे पत्रासह मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांनी गावरान तूपाबाबत दिलेल्या खुलाशाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

विषय नं.१०७ **श्रींचे पालखी, रथ मिरवणुक बंदोबस्तकामी नियुक्त सुरक्षा रक्षकांना मानधन मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव निमीत्त दि.०८/१०/२०१६ रोजी विश्वस्त मा.श्री सचिन तांबे, साहेब यांचे अध्यक्षतेखाली मिटींग आयोजीत करण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये श्रींचे साप्ताहिक पालखी तसेच उत्सव व सनाचे दिवशी गावातून निघणाऱ्या पालखी व रथाकरीता बंदोबस्त करणारे कायम व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी (फक्त १२ ते २० डयुटीवरील) कर्मचारी यांना त्यांचे डयुटी व्यतिरीक्त साप्ताहीक पालखी अथवा गावातून रथ पालखी मिरवणूकीचे वेळेस रथ पालखी निघाले पासुन रथ पालखी संपेपर्यंत जास्तवेळ थांबावे लागते. करीता सदर कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत मोफत प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येऊन त्यांना रु.१००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले होते.

त्यानुसार असे की, ज्याप्रमाणे दक्षिणापेटी मोजणी व बंदोबस्तकामी नियुक्त केलेल्या कर्मचारी यांना प्रत्येकी रु.१००/- मात्र मानधन व प्रसाद भोजन देण्यात येते. त्याप्रमाणे साप्ताहीक पालखी व उत्सवाचे वेळेस व सणाचे वेळेस निघणाऱ्या रथ पालखी बंदोबस्तकामी येणाऱ्या संरक्षण विभागातील कायम व कंत्राटी कर्मचारी असे १२५ ते १५० कर्मचारी यांची नियुक्त करण्यात येतात. नियुक्त कर्मचारी यांचे बंदोबस्तकामी हजर असलेबाबत स्वाक्षरी घेऊन सदर कर्मचारी यांची यादी लेखाशाखा विभागाकडे सादर करुन सदर कर्मचारी यांचे मानधन लेखाशाखेमार्फत देता येईल.

करीता श्रींचे रथ पालखी बंदोबस्तकामी नियुक्त संरक्षण विभागातील कायम व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना प्रत्येकी रु.१००/- मानधन व मोफत प्रसाद भोजन देणेकामीच्या विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींचे पालखी/ रथ मिरवणुकीच्या बंदोबस्तकामी नियुक्त असलेल्या कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून प्रत्येकी रु.१००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

विषय नं.१०८ **फायर ॲण्ड सेफ्टी व वाहन विभागातील कायम कर्मचाऱ्यांना व्दितीय टप्प्यात प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षणासाठी पाठविणेबाबत.**

प्रस्ताव- फायर ॲण्ड सेफ्टी विभागातील २२ स्थायी कर्मचाऱ्यांपैकी ०७ स्थायी कर्मचारी यांनी महाराष्ट्र राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे मार्फत आयोजीत केले जाणारे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कामी माव्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार बॅच नं.५५ करीता पाठविण्यात आलेले होते . सदरचे कर्मचारी दि.११.०२.२०१५ ते दि.१५.०५.२०१५ असे ०३ महिने कालावधीमध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण पुर्ण करुन कामावर रुजु झालेले आहे. श्रीचे शताब्दी वर्ष २०१८ साली असलेने शिर्डीत प्रंचड गर्दी होईल त्यासाठी फायर विभागाकडे कायमस्वरुपी प्रशिक्षीत टिम असणे आवश्यक आहे. तसेच संस्थानचे सेवेत फोम टेंडर व मिनी टेंडर असे दोन अग्निशमन वाहने कार्यरत आहे. तसेच संस्थानचे फोम टेंडर अग्निशमन वाहन संस्थानचे कर्मचा-यांसह शिर्डी विमानतळावर सशुल्क दयावयाचे असल्याने फायर विभागामार्फत नवीन अग्निशमन वाहन खरेदी प्रस्तावीत आहे. अग्निशमन सेवा ही आपत्कालीन सेवा असलेने सर्व कर्मचारी हे प्रशिक्षीत असणे गरजेचे आहे.

प्रथम प्रशिक्षणाकरीता फायर विभागाचे ०७ कर्मचारी यांना पाठविण्यात आलेले होते उर्वरीत फायर विभागाकडे हजर सिनीयरटीनुसार कर्मचारी यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे मार्फत आयोजित केले जाणारे पुढील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षणास पाठविणेसाठी जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/ ४७/ २०१६ दि.०२.०५.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीने जा.नं.एसएसएस/ फायर ॲण्ड सेफ्टी/ १०९०/ २०१६ दि.०७.०६.२०१६ रोजी मा.अग्निशमन सल्लागार, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला होता.

त्यानुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांचे दि.०५.०१.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.०३.०२.२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.सदरचे प्राप्त पत्र सोबत जोडण्यात आले असुन त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे. त्याचा संक्षिप्त तपशिल खालील प्रमाणे आहे.

राज्य अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पुढील होणारे प्रशिक्षण सत्रकामी खालील प्रमाणे खर्चाबाबत माहिती दिलेली आहे.

प्रशिक्षणासाठी प्रती कर्मचारी खर्च खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	**प्रशिक्षनार्थ्यांचा खर्चाचा तपशिल**	**प्रति कर्मचारी**	**१० कर्मचारी एकूण खर्च**	**एकूण खर्च**
०१	प्रवेशअर्ज फी	प्रती कर्मचाऱ्यासाठी १५०/- प्रमाणे डी.डी.	१५० X १०	१,५००/-
०२	प्रशिक्षण शुल्क प्रति कर्मचारी १५० X १४ आठवडे	प्रती कर्मचाऱ्यासाठी १५० X १४आठवडे	२१०० X १०	२१,०००/-
०३	शासकिय उपक्रमे प्रति कर्मचारी २०० X १४ आठवडे	प्रती कर्मचाऱ्यासाठी २००X १४ आठवडे	२८०० X १०	२८,०००/-
०४	प्रमाणपत्र व गुणपत्रिका शुल्क प्रती कर्म.	प्रती कर्मचाऱ्यासाठी ३००/- रु.	३०० X १०	३,०००/-
०५	अनामत रक्कम प्रति कर्मचारी	प्रती कर्मचाऱ्यासाठी १०००/- रु.	१००० X १०	१०,०००/-
०६	सेवा शुल्क १४० X१४ आठवडे	प्रती कर्मचाऱ्यासाठी १४० X १४ आठवडे	१९६० X १०	१९,६००/-
०७	भोजन खर्च द.म. अंदाजे ४०००/- ते ४५००/- प्रती कर्मचारी (७ कर्मचारी)	प्रती कर्मचाऱ्यासाठी ४०००/- ते ४५००/-रु. प्रती म. या प्रमाणे.	४५०० X ०३ महिने १३५०० X १०	१,३५,०००/-
०८	प्रशिक्षण साहीत्य अंदाजे प्रती कर्मचारी रु. ६०००/- ते रु. ७०००/-	प्रती कर्मचाऱ्यासाठी ६०००/- ते ७०००/-रु. प्रती महीना या प्रमाणे.	७००० X १०	७०,०००/-
०९	प्रवास खर्च जाणे येणे कामी	अंदाजे रु.३,०००/-		३,०००/-
	१० प्रशिक्षनार्थ्यांसाठी तिन महिने कालावधीसाठी अंदाजे खर्च			**२,९१,१००/-**

तरी मा.अग्निशमन सल्लागार, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचे यांचे कडे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे ०६ कायम कर्मचारी व वाहन विभागाचे हेवी वाहन परवानाधारक ०४ वाहन चालक असे एकुण १० कायम कर्मचारी यांना संस्थान खर्चाने ऑन डयुटी तिन महीने कालावधीकरीता पाठविणेकामी रु.२,९१,१००/- (अक्षरी रुपये दोन लाख एक्यान्नव हजार शंभर रु मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रशिक्षण कालावधी दि.१३.०२.२०१७ ते दि. १२.०५.२०१७ या कालावधीत असल्याचे कळविणेत आले होते. परंतु काही अपरिहार्य कारणाने सदर प्रशिक्षण कालावधी हा दि.१३.०२.२०१७ ऐवजी ०१.०३.२०१७ रोजी पासुन सुरु होणार असलेबाबत मा.संचालक सो यांचे कार्यालयाशी चर्चा झालेली आहे.

अ) महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई येथे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे ६ व वाहन विभागाचे ०४ वाहन चालक असे एकुण १० स्थायी कर्मचारी तिन महीने कालावधीकरीता ऑन डयुटी पाठविणेस, संबधित प्रशिक्षणार्थी पाठविणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

ब) प्रशिक्षण खर्चाची रक्कम रु. २,९१,१००/- संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत फायर विभागाचे नावे मिळणेबाबत कळविणेस मान्यता असावी.

क) सदर प्रशिक्षणार्थी यांचे ऐवजी इतर विभागातील फायर प्रशिक्षण झालेले ०६ कायम कर्मचारी यांना फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे तात्पुरते स्वरुपात वर्ग करणेबाबत संस्थानचे आस्थापना विभागास कळविणेस तसेच वाहन विभागामार्फत प्रशिक्षण कालावधीत अन्य वाहन चालक तात्पुरते स्वरुपात मिळणेबाबत कळविणेस मान्यता असावी.

ड) संस्थानचे प्रशिक्षणार्थी यांना महाराष्ट्र फायर संचालनालय आयोजीत बॅच नं. ५७ मध्ये वेळेअभावी पाठविणे शक्य न झाल्यास पुढील जुन/ जुलै २०१७ मधील बॅच नं. ५८ करीता पाठविणेस मान्यता असावी.

उपरोक्त नमुद अ , ब , क व ड बाबत मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार फायर ॲण्ड सेफ्टी व वाहन विभागातील कायम कर्मचाऱ्यांना व्दितीय टप्प्यात प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षणासाठी पाठविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.१०९ **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१६ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१६ दि.१८.०७.२०१६ ते दि.२०.०७.२०१६ या कालावधी मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि १४/६/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.३६४ अन्वये एकुण रुपये ४४,४१०००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१६ साठी प्रत्यक्षात खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.नं	तपशील	अंदाजपत्रका-तील मंजुर रक्कम	प्रत्यक्ष खर्च	तरतुदीपेक्षा जादा खर्च	तरतुदीपेक्षा कमी खर्च
१	मंडप, कमानी, स्टेज व इतर	६,९०,०००.००	४,९१,८९३.००	०.००	१,९८,१०७.००
२	कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रमासह)	३,१२,०००.००	१८,७९८.००	०.००	२,९३,२०२.००
३	भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह)	८,४९,०००.००	६,१६,४७२.००	०.००	२,३२,५२८.००
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	१,२५,०००.००	७३,१७२.००	०.००	५१,८२८.००
५	निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	१४,९०,०००.००	१२,८४,१०४.००	०.००	२,०५,८९६.००
६	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	३,५०,०००.००	३,५२,८२२.००	**२,८२२.००**	--
७	पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह)	३,२५,०००.००	२६,२९७.००	०.००	२,९८,७०३.००
८	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	२,००,०००.००	०.००	०.००	२,००,०००.००
९	इतर खर्च	१,००,०००.००	४,०००.००	०.००	९६,०००.००
	एकूण खर्च रु.	**४४,४१,०००.००**	**२८,६७,५५८.००**	**२,८२२.००**	**१५,७६,२६४.००**

उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे श्री.गुरुपौर्णिमा उत्सव-२०१६ करीता रक्कम रु.४४,४१,०००/- अक्षरी रुपये (चौरेचाळीस लाख एकेचाळीस हजार) मात्र मंजूर करण्यात आले होते या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये २८,६७,५५८/- (अठ्ठावीस लाख, सदुष्ठ हजार, पाचशे अठ्ठावन्न) मात्र इतका खर्च झालेला आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा पेक्षा रु.१५,७3,४४२/- इतका खर्च कमी झाला आहे.

तरी प्रत्यक्षात एकुण रु.२८,६७,५५८/- चे झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१६ साजरा करणेसाठी प्रत्यक्ष झालेल्या रु.२८,६७,५५८/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५)

विषय नं.११० श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा, व श्री पुण्यतिथी हे मुख्य उत्सव साजरे करण्यात येतात.

पुण्यतिथी उत्सव-२०१६ दि.१०.१०.२०१६ ते दि.१३.१०.२०१६ या कालावधी मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि १६/८/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५६९ अन्वये एकुण रुपये ४९,७५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात श्री पुण्यतिथी उत्सव -२०१६ साठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ. न.	तपशिल	अंदाजपत्रकातील मंजूर रक्कम	प्रत्यक्ष खर्च	तरतूदी पेक्षा जादा खर्च	तरतूदी पेक्षा कमी खर्च
१	मंडप, कमानी व स्टेज खर्च (बॅरिकेटींगसह)	७,००,०००.००	६,२४,६३०.००		७५,३७०.००
२	कलाकार बिदागी–कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रमासह)	२,५०,०००.००	१,४४,१६८.००		१,०५,८३२.००
३	भक्तांना मिष्टान्न (गावजेवण व मजूरी)	९,००,०००.००	७,७२,१४९.००		१,२७,८५१.००
४	विद्युत रोषणाई खर्च (भाडोत्री जनरेटर, डिझेल बिलांसह)	१०,००,०००.००	९,०३,९६५.००		९६,०३५.००
५	निमंत्रण पत्रिका, जाहिरात, बोर्ड,पोष्टेज – उदीप्रसादासह	१४,८०,०००.००	१२,६६,९५६.००		२,१३,०४४.००
६	जादा कामगार	३,००,०००.००	१,४२,७६४.००		१,५७,२३६.००
७	पालख्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च.	१,००,०००.००	२३,०५२.००		७६,९४८.००
८	इतर खर्च (फर्निचर भाडे)	४५,०००.००	३१,३१५.००		१३,६८५.००
९	मंदीर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च	२,००,०००.००	-		२,००,०००.००
	एकुण रु.	**४९,७५,०००.००**	**३९,०८,९९९.००**		**१०,६६,००१.००**

उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ करिता रक्कम रु.४९,७५,०००/- (रु. एकोणपन्नास लाख पंच्याहत्तर हजार) मात्र मंजूर करण्यात आलेले होते, या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये रु.३९,०८,९९९/-(रु.एकोणचाळीस लाख आठ हजार नऊशे नव्यान्नव) मात्र इतका खर्च झालेला आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा पेक्षा रु.१०,६६,००१/-इतका खर्च कमी झाला आहे.

तरी प्रत्यक्षात एकुण रु.३९,०८,९९९/- चे झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.११० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ साजरा करणेसाठी प्रत्यक्ष झालेल्या रु.३९,०८,९९९/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५)

विषय नं.१११ श्री रामनवमी उत्सव- २०१७ कार्यक्रमाचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम ,२००४ मध्ये कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखाली उपकलम (१) मध्ये खालील तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा –अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी/ विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील."

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

श्री साईबाबांनी हयातीत,श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यास अनुसरुन मंदिर विभागाकडील

दि.०७/०१/२०१७ रोजीचे मंजूर टिपणीनुसार श्री रामनवमी उत्सव सोमवार, दिनांक ०३/०४/२०१७ ते बुधवार, दिनांक ०५/०४/२०१७. (चैत्र शु.८ शके १९३९ ते चैत्र शु.१० शके १९३९) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सन-२०१७ मध्ये साजरा करावयाचे श्री रामनवमी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

अ.नं	तपशील	रामनवमी -२०१७ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन/कामे
०१	उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद	भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १८२००० पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल.
०२	**अ) उत्सव व्यवस्था**	**कलाकार कार्यक्रम**
	प्रारंभ दिवस,सोमवार दि.०३/०४/२०१७ चैत्र शु ८ शके १९३९	सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर आयोजित करणे.
	मुख्य दिवस मंगळवार दि.०४/०४/२०१७ चैत्र शु ९ शके १९३९	१) सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम(साईनगर मैदान स्टेजवर) आयोजित करणे. २) रात्रौ. १०.०० ते सकाळी ५.०० पर्यत (दि.०४/०४/२०१७) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल.
	सांगता दिवस बुधवार दि.०५/०४/२०१७. चैत्र शु.१० शके १९३९	सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निश्चीत करावयाचे आहेत. इच्छुक कलाकारांची पत्रे प्राप्त झालेनंतर कलाकार / कार्यक्रम निश्चीती बाबत सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेपुढे सादर केला जाईल.
	ब) कीर्तन कार्यक्रम	श्री रामनवमी उत्सवात कीर्तन व कलाकार कार्यक्रमासाठी प्राप्त होणा-या अर्जदारातून योग्य किर्तन व कलाकारांची निवड करणे निमंत्रित कीर्तनकार व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रित कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. उत्सवाची सांगता गोपाळ काल्याचे कीर्तनाने होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील
०३	श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा	गर्दीच्या काळात व्यवस्थापनाच्या दृष्टीने उत्सवकाळात श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा बंद ठेवण्यात येतात. उत्सवकाळात दिनांक-०३/०४/२०१७ ते दि.०५/०४/२०१७ अखेर श्रीसाईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा बंद ठेवता येतील.
४	अखंड पारायण व्यवस्था	उत्सव काळात दि.०३/०४/२०१७ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०४/०४/२०१७ सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.०२/०४/२०१७ रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल.श्री रामनवमी उत्सवात पोथी,वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक,पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे ठरविणे आहे.
०५	पालखी व रथ मिरवणूक	उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दि.०३/०४/२०१७ रोजी सकाळी ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी मंगळवार दि.०४/०४/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रथाची गावातून मिरवणूक निघेल.
०६	कावडी व निशाणाची मिरवणूक	उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक ०४/०४/२०१७ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहील. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्या समोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडी धारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल.
७	विद्युत रोषणाई	श्री रामनवमी उत्सवात श्री व्दारकामाई मडळ, मुंबई हे समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास,भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च त्यांना देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत त्यांना या उत्सवात रोषणाई करणेचे पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल.
०८	संरक्षण व्यवस्था	उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारामार्फत नेहमीप्रमाणे जादा सुरक्षारक्षक नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक , अहमदनगर यांना संरक्षण विभागामार्फत विनंती करण्यात येईल.
०९	प्रसाद-भोजन व्यवस्था	उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी

		अन्नपाकिटे,चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करणेस येईल. सन २०१६ चे पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टान्न पदार्थ म्हणून बुंदी (नुक्ती) देण्यात आली होती. याही उत्सवात मागील उत्सवाप्रमाणे मिष्टान्न देता येईल.
१०	लिलाव	श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तुंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने उत्सवाचे तिनही दिवशी विक्री करण्यात येईल.
११	देणगी काऊंटर्स	उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सवाचे इतर दिवशी देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ४ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यंत करण्यात येईल.
१२	जादा कंत्राटी कर्मचारी	उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल.
१३	भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था	संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साईनगर,धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व उन्हाळी मंडपही टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील.
१४	प्रथमोपचार केंद्र	मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीतवाडा येथे तीनही दिवशी तीन शिफ्ट मध्ये प्रसादालय परिसरात व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तीन शिफ्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात आली होती.त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल.
१५	पालखी व्यवस्था	श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवसथा करण्यात येईल.येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांनसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिर्डी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील.गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी,लतीफवाडी,घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नाशिक, शिंदे, सिन्नर (एम.आय.डी.सी), खोपडी, दत्तमंदीर,पांगरी,वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा,सायाळे ,जवळके, डो-हाळे,इ.ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवसस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल.तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानतर्फे एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येईल.
१६	कुस्त्या हंगामा	श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गावक-यांमार्फत भरविण्यात येतो. सन २०१६ चे उत्सवात कुस्त्यांचे हंगामासाठी मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.७,००,०००/- मात्र मंजूर होती. त्यापैकी रुपये रु.६,९४,८८०/-मात्र खर्च झालेला आहे. कुस्त्या हंगामासाठी या वर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षाप्रमाणे रु.७,००,०००/- तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी/जास्त करता येईल.
१७	पाणीपुरवठा	पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल.नियमित पाणीपुरवठा राहिल याची व्यवस्था करण्यात येईल.
१८	खर्चाचे अंदाजपत्रक	श्री रामनवमी उत्सव-२०१६ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७७,००,०००/- (रु. सत्याहत्तर लाख) मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ५१,१७,७४९/- (एकुण एकावन्न लाख सतरा हजार सातशे एकोणपन्नास) मात्र इतका खर्च झाला होता. श्री रामनवमी २०१७ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६२,००,०००/- (रु.बासष्ट लाख) मात्र मंजूरीसाठी सादर केलेले आहे.

श्री रामनवमी उत्सव -२०१७ अंदाजपत्रक-

अ. नं.	तपशील	विभाग	श्री रामनवमी उत्सव-२०१६		श्री रामनवमी उत्सव-२०१७
			अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	तरतूद
०१	मंडप कमानी स्टेज	बांधकाम विभाग	११,५१,५२९.००	९२७८९७.००	१०,००,०००.००
०२	कलाकार,कीर्तनकाराची बिदागी	मंदिर विभाग	४,४०,०००.००	१४७८१.००	३,००,०००.००
०३	भक्तांना मिष्टान्न मजुरीसह	प्रसादालय विभाग	७,९३,५८८.००	७८५२८८.००	८,००,०००.००
०४	विद्युत रोषणाई	विद्युत विभाग	१०,००,०००.००	९२६६७२.००	१०,००,०००.००
०५	निमत्रंण पत्रिका छपाई, उदीप्रसादासह व जाहिरात	वशी-५/८	४,००,०००.००	३१३५४०.००	४,००,०००.००
०६	पोस्टेज खर्च	जावक	१०,००,०००.००	९५२१५७.००	१०,००,०००.००
०७	एल.ई.डी पडदा	सी.सी.टी.व्ही	६,००,०००.००	०	५०,०००.००
०८	फुल सजावट	बगीचा	२,००,०००.००	०	२,००,०००.००
०९	जादा कामगार	कामगार	३,००,०००.००	३१३४८२.००	४,००,०००.००
१०	पदयात्री,पालख्या,पिण्याचे पाणी.व्यवस्था	पाणी पुरवठा	४,३५,०००.००	१८९०५२.००	२,००,०००.००
११	आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास)		६,००,०००.००	०	१,००,०००.००
१२	कुस्ती हंगामा		७,००,०००.००	६९४८८०.००	७,००,०००.००
१३	इतर खर्च (वाहन भाडे,सभा नास्ता,कॅमेरा/ टी.व्ही.ई.दुरुस्ती.)	जनसंपर्क,वाहन साईप्रसाद, प्रसादालय, सी.सी.टी.व्ही	७९८८३.००	०	५०,०००.००
		एकूण रुपये	**७७,००,०००.००**	**५१,१७,७४९.००**	**६२,००,०००.००**

उपरोक्त अ.नं ८ मध्ये बगीचा विभागामार्फत मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी अंदाजीत खर्चासाठी नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.

तरी श्री.रामनवमी उत्सव-२०१७ साजरा करणेस,याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ६२,००,०००/-(रुपये बासष्ट लाख) मात्रचे खर्चास मान्यतेसाठील सादर.

निर्णय क्र.१११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री रामनवमी उत्सव- २०१७ साजरा करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहू उत्सव साजरा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५)

विषय नं.११२ **श्रीव्दारकामाईचे धुनीसमोरील जुने चांदीचे मखर काढणेस व नविन चांदीचे मखर देणगी स्विकारणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

अ.क्र	कलम/ तरतूद क्रमांक	कलम/ तरतूदीचे शीर्षक	पोटकल/ उपकलम क्रमांक	तरतूद
०१	२१	विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग	१ (ग)	भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

प्रस्तावना- श्रींचे द्वारकामाई येथे श्रीसाईबाबा ज्या ठिकाणी बसत असत त्या जागेवर पुर्वीपासुन श्रींचा एक फोटो ठेवण्यात आलेला आहे. सदर फोटो एका मखरामध्ये ठेवण्यात आलेला आहे. श्रींचे धुनीचे समोर लाकडी मखरावर चांदीचे आवरण करुन त्यामध्ये हा फोटो दर्शनाकरीता ठेवण्यात आलेला आहे. श्रींचे द्वारकामाईतील मखर हे अतिशय जुने झाले आहे.

प्रस्ताव- साईभक्त श्री अजय गुप्ता, रा.आग्रा यांनी आपले विनंती अर्जान्वये श्रींचे द्वारकामाईतील धुनीचे समोरील फोटोकरीता मजबुत असे चांदीचे सिंहासन (मखर) देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. यासाठी लागणारा सर्व खर्च ते देणेस तयार आहेत. तसेच श्रींचे सिंहासन (मखर) श्रीरामनवमी उत्सव-२०१७ चे पुर्वी देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. श्री.अजय गुप्ता हे शिर्डी येथे अनेक वर्षांपासुन येत आहेत. तरी त्याबाबत संस्थानची परवानगी मिळाल्यास त्यांना काम सुरु करता येईल असेही पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

विभागाचे मत/ अभिप्राय- श्रीद्वारकामाईचे मखर हे अत्यंत जुन्या काळातील मखर असून अनेक ठिकाणी लाकडाचा भाग दिसत आहे. त्याचप्रमाणे मखरावरील चांदी सफाई करुन-करुन पातळ झाली असून काही ठिकाणी निघुन आल्याचे अढळुन आले आहे. श्रींचे द्वारकामाईचे धुनीसमोरील मखराबाबतची कोणतीही माहिती मंदिर विभागाकडे उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे सदर मखराचे चांदीचे वजन अथवा इतर कोणत्याही गोष्टींची माहिती संस्थानकडे उपलब्ध नाही. याबाबत यापुर्वीही ऑडीटर यांनी सदरचे मखराबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे नियोजन करणे योग्य राहील असे नम्र मत आहे.

१. जुने मखराला बसविलेली चांदी व्यवस्थीत पुर्णपणे काढतांना लाकडी मखर खराब होऊ शकते. बांधकाम विभागचे देखरेखेखाली चांदी काढुन घेण्यात यावी तसेच सदर मखरचे आतील लाकूड खराब असल्यास त्याची दुरुस्ती करुन संस्थानचे म्युझियम हॉल येथे ठेवणेत यावे . तसेच उर्वरित चांदी काढुन घेतल्यानंतर ती पुन्हा वापरण्याचे योग्य राहणार नाही. त्यामुळे सदर चांदीचे एकत्रीत वजन करुन लेखाशाखेकडे जमा करणेस मान्यता असावी.

२. तसेच देणगीदार साईभक्त श्री.अजय गुप्ता यांचेकडुन नवीन चांदीचे मखर तयार करुन घेणेस मान्यता असावी, ही विनंती. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी विनंती केल्यानुसार श्रीरामनवमी उत्सव-२०१७चे पुर्वी नवीन मखर तयार होणेकामी सूचना करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्रींचे द्वारकामाईचे धुनीसमोरील फोटोचे सध्याचे जुने चांदीचे सिंहासन (मखर) पुर्णपणे काढुन त्याचे आतील लाकूड खराब असल्यास दुरुस्त करुन श्रींचे वस्तूसंग्रहालय येथे ठेवणेस मान्यता असावी. त्याचप्रमाणे निघालेली चांदी एकत्रीत करुन लेखाशाखा विभागाकडे जमा करणेस, तसेच देणगीदार साईभक्त श्री.अजय गुप्ता यांचेकडुन नवीन मजबुत चांदीचे सिंहासन (मखर) तयार करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.११२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

याचवेळी अशीही चर्चा झाली की, विविध उत्सवाचे वेळी श्रींचे समाधी मंदिर, चावडी, द्वारकामाई, गुरुस्थान व इतर ठिकाणी फुल सजावट केली जाते. त्यानुशंगाने फुल सजावट करणारे कारागीर त्यांचे सोयीप्रमाणे सजावटीसाठी खिळे ठोकत असतात. या सर्व पुरातन वास्तु असल्यामुळे यापुढे खिळे ठोकणे वगैरे यासाठी त्यांना मनाई करणेत यावी.

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.११३ **माहे एप्रिल, २०१६ ते जुन, २०१६ जमा- खर्च तक्त्याची नोंद घेणे.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे एप्रिल २०१६ ते जून २०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात येत आहेत.

माहे एप्रिल २०१६ ते जून २०१६ या महिन्यांचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः-

महिना	जमा	खर्च
एप्रिल २०१६	४२,१२,९४,१५६/-	३,६३,०७,८०९/-
मे २०१६	४२,४१,७१,३५४/-	१३,२९,३७,०२६/-
जून २०१६	४१,५७,४२,६७४/-	१४,२७,०८,९९१/-

निर्णय क्र.११३ **माहे एप्रिल, २०१६ ते जुन, २०१६ चे विवरणासहीत जमा- खर्च तक्ते मा.सदस्यांना पुरविणेत आले होते.**

त्यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल, २०१६ ते जुन, २०१६ या जमा- खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.११४ **माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीतील गावरान तुप, वनस्पती तुप व खाद्यतेलाचे प्रयोगशाळा तपासणी अहवाल अवलोकनार्थ सादर.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० नुसार "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस को.सो.लि., नासिक या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी, असे ठरलेले आहे."

त्यानुसार भांडार विभागास प्राप्त होणा-या प्रत्येक नविन बॅचचे गावरान तुपाचे नमुन्यांची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस को.सो.लि. नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करणेत येत आहे. याशिवाय संस्थानची श्री साई प्रसादालयातील प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेपासुन किराणा माल, गावरान तुप व खाद्यतेलाचे प्रत्येक बॅचचे नमुन्यांची तपासणी त्यांचेकडुनही केली जात आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ नुसार "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

त्यानुसार माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१६ मध्ये भांडार विभागामार्फत करणेत आलेल्या मालाचे तपासणी अहवालाचे परिशिष्ठ यासोबत सादर केले आहे.

उपरोक्त सर्व तपासणी अहवालात सदरचे सर्व नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११, नुसार प्रमाणीत (मानवी खाण्यास योग्य) आहे, असे शेरे मारलेले आहेत. उपरोक्त तपासणी अहवालाचे आधारे सदरचे गावरान तुप, वनस्पती तुप व किराणा मालाचा पुरवठा वेळोवेळी संस्थानचे विविध विभागांना त्यांचे आवश्यकतेनुसार करणेत आलेला आहे.

सोबतचे परिशिष्ठाप्रमाणे प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.११४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीतील गावरान तुप, वनस्पती तुप व खाद्यतेलाचे प्रयोगशाळा तपासणी अहवालांचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

विषय नं.११५ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षा निमित्त दि.११.१२.२०१६ रोजीच्या आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी वाढीव गुलाब फुले खरेदी व फुल सजावट कामाची रक्कम आदा करणे.**

प्रस्ताव- दि.07/11/2016 रोजीच्या मा. उपसमिती सभेत श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षा निमित्त दि.11 डिसेंबर 2016 रोजीच्या आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे, आलेल्या मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके व स्वागतासाठी फुले खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. 2,00,000/- (दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.11 डिसेंबर 2016 रोजीच्या आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे, आलेल्या मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके व स्वागतासाठी फुले उपलब्ध करुन देणेकामी परिसरातील फुलसजावट करणारे कारागीर यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आलेले असुन प्राप्त झालेले दरपत्रके दि.18/11/2016 रोजी स्थानिक विश्वस्त यांचेसमोर उघडण्यात आलेली आहे. उघडण्यात आलेल्या दरपत्रकात श्री साई फलॉवर डेकोरेटर्स, पुणे यांचा दर रु.65,000/- (पासष्ठ हजार) मात्र न्युनत्तम प्राप्त झालेला असल्याने त्यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/4472/2016 दि.23/11/2016 अन्वये, कार्यादेश देऊन त्यांचेकडुन दि11 डिसेंबर 2016 रोजीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलसजावटीचे काम पुर्ण करुन रु.65,000/- मात्र रक्कमेचे बिल आदा करणेत आलेले आहे.

मागणी- सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी मा. कार्यकारी अधिकारी यांनी राऊंड घेऊन पाहणी केली असता ऐनवेळेस फुलांची सजावट व साईभक्तांची संख्या वाढल्याने स्वागतासाठी गुलाब फुलांची आवश्यकता असल्याने श्री साई फलॉवर डेकोरेटर्स, पुणे यांचे मंजुर दरपत्रकानुसार न्युनत्तम दराने सदरचे गुलाब फुले व सजावटीचे काम करुन घेण्यात आलेले आहे. सदर कामाची एकुण रक्कम रु.13,000/- (तेरा हजार) मात्र झालेली असुन आवक नं. 17958 दि.13/12/2016 अन्वये, श्री साई फलॉवर डेकोरेटर्स, पुणे यांनी आपल्या कामाचे बिल रक्कम रु.13,000/- मात्रची मागणी केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षा निमित्त दि.11/12/2016 रोजीच्या आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी ऐनवेळी तातडीने वाढलेली फुल सजावट व गुलाब फुले खरेदीचे झालेली एकुण रक्कमेचे बिल रु.13,000/- मात्र श्री साई फलॉवर डेकोरेटर्स, पुणे यांना अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.११६ **जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या सत्काराकरीता सन्मानचिन्ह खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ (विजयादशमी) अखेर साजरा करण्यात येणार आहे. त्या दृष्टीकोणातून शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. जेणेकरुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील व शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत. त्यानिमित्त समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देशविदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या मंदिरांच्या व्यवस्थापनांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम / उपक्रम याबाबत व्यापक चर्चासत्र दि.११/१२/२०१६ रोजी शिर्डी येथे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" आयोजित करण्यात आलेले आहे.

संस्थानमार्फत आयोजित केलेल्या "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता देशातुन तसेच विदेशातील मंदिरांचे प्रतिनीधींना बोलविण्यात आलेले आहे. त्याकामी अंदाजे २०००-२५०० मंदिरांचे प्रतिनीधी साईभक्त सहभाग घेणार आहेत. त्याचप्रमाणे परिषदेकरीता विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे. सदर निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता "जागतिक साई मंदिर परिषद" अशा नावाची शॉल खरेदी करणेत यावी अशी सूचना केल्या होत्या.

त्यानुसार संदर्भीय मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ चे सभेतील विषय नं.५९, निर्णय क्र.९०२ नुसार सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साई मंदिर परिषदेसाठी निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सन्मानचिन्ह खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच तातडीची गरज असल्यामुळे प्रस्तावित सन्मानचिन्ह खरेदीकामी मागविणेत आलेली कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेत यावा व या कार्यवाहीचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त ठरावानुसार स्थानिक दुकानदार यांचेकडुन दि.११/१२/२०१६ रोजीचे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणा-या सन्मानचिन्ह खरेदी करणेकामी तीन कोटेशन्स मागविण्यात आले होते. तसेच सदर कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आले असून, त्यातील न्युनतम दरधारकास तातडीने सन्मानचिन्ह तयार करणेकामी जा.क्र.एसएसएस/मंदिर/४९७४/२०१६, दि.२६/१२/२०१६नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच सदर पुरवठादार यांनी वेळेमध्ये सन्मानचिन्हाचा पुरवठा केला असून त्याकामी २१००नग सन्मानचिन्हाचे खालील लाकडी बॉक्स तयार करणेकामी रु.२,९४,०००/- इतका खर्च झालेला आहे. त्याबाबतचे बील लेखाशाखेत सादर करण्यात आलेले आहे. तसेच "जागतिक साई मंदिर परिषदेसाठी" निमंत्रीत केलेल्या भक्तांच्या संख्येमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे सुचनेनुसार आणखी ४००नग सन्मानचिन्ह तयार करणेबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. त्याकामी एकूण रु.५६,०००/- इतका खर्च झालेला आहे. याकामी वार्षिक मुर्ती पुरवठादार यांचेकडुन याकामी मुर्ती घेण्यात आलेल्या आहेत.

तरी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६"करीता खरेदी केलेल्या सन्मानचिन्ह २१०० नग रु.२,९४,०००/- व ऐनवेळी तातडीचे खरेदी केलेल्या ४००नग रु.५६,०००/- असे एकूण रु.३,५०,०००/-एवढा खर्च झालेला आहे. तसेच वार्षिक मुर्ती पुरवठादार यांचेकडुन मुर्ती खरेदी केल्या आहेत. तरी परिषदेसाठी निमंत्रीत केलेल्या विश्वस्तांचे सत्काराकामी खरेदी केलेल्या सन्मानचिन्ह खरेदीकामी झालेल्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती आहे.

निर्णय क्र.११६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

विषय नं.११७ **जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या सत्काराकरीता छापील शॉल खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरा करण्यात येणार आहे. त्या दृष्टीकोणातून शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. जेणेकरुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील व शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत. त्यानिमित्त समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या मंदिरांच्या व्यवस्थापनांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम / उपक्रम याबाबत व्यापक चर्चासत्र दि.११/१२/२०१६ रोजी शिर्डी येथे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" आयोजित करण्यात आलेले आहे.

संस्थानमार्फत आयोजित केलेल्या "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता देशातुन तसेच विदेशातील मंदिरांचे प्रतिनीधींना बोलविण्यात आलेले आहे त्याकामी अंदाजे २०००-२५०० मंदिरांचे प्रतिनीधी साईभक्त सहभाग घेणार आहेत. त्याचप्रमाणे परिषदेकरीता विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे. सदर निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता "जागतिक साई मंदिर परिषद" अशा नावाची शॉल खरेदी करणेत यावी अशी सूचना केल्या होत्या.

त्यानुसार संदर्भीय मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ चे सभेतील विषय नं.५९, निर्णय क्र.९०२ नुसार सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साई मंदिर परिषदेसाठी निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता "जागतिक साई मंदिर परिषद" अशा नावाची शॉल खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच तातडीची गरज असल्यामुळे प्रस्तावित शॉल्स खरेदीकामी मागविणेत आलेले कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेत यावा व या कार्यवाहीचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

दि.११/१२/२०१६ रोजीचे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणा-या शॉल खरेदी करणेचे कार्यवाही करणेकामी कालावधी कमी असल्याने तसेच सदर शॉल छपाईकरीता कमी वेळ असल्याने व खरेदीकरीता रु.७०,०००/-चे आत असल्याने यापुर्वी संस्थानला पुरविण्यात आलेल्या छापील शॉल पुरवठादार मे.सुपर डायईंग ॲण्ड कॉटन, सातारा यांचेकडुन शॉलचा नमूना मागवुन सदरचा नमूना मा.श्री.सचिन तांबे साहेब, विश्वस्त यांचेकडुन तपासुन शॉलची खरेदी करण्यात यावी असे मा.अध्यक्ष महोदय यांनी सभेचेवेळी तोंडी सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार मा.विश्वस्त यांचेकडुन नमूना निश्चित करुन शॉलची छपाई करुन घेणेत आलेली आहे. तरी त्याकामी ५००नग शॉल रु.१३०/- प्रति नग नमुन्याप्रमाणे खरेदी केल्या असून त्यासाठी एकूण रु.६५,०००/- (अक्षरी रुपये पासष्ट हजार मात्र) खर्च झालेला आहे.

तरी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणा-या छापील शॉल खरेदीकामी वेळ कमी असल्याने मा.अध्यक्ष महोदय यांचे सूचनेनुसार व रु.६५,०००/-चे तातडीचे शॉल छपाई करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

निर्णय क्र.११७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच स्क्रीन प्रिंटींगसह संस्थानचा लोगो छापलेल्या नवीन शॉली खरेदी करणेचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

विषय नं.११८ **कलाकार हजेरीचे माहे डिसेंबर- २०१६, जानेवारी व फेब्रुवारी- २०१७ चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम किर्तन, प्रवचन इत्यादी आयोजित करुन तो कार्यक्रम अगोदरच वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार त्याबाबतची व्यवस्था सुरु करणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ चे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१५, निर्णय क्र.६७२ नुसार खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे- प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) आयोजन करणे व तसे संस्थानचे संकेस्थळावर प्रसिध्द करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेचे काम मंदिर विभागाने आहे त्याच कर्मचा-यांकडून करुन घ्यावे व श्री.सुधांशु प. लोकेगांवकर, संगीत व कला मार्गदर्शक यांनी त्यांचे काम संभाळून याकामी मंदिर विभागाने सुचविलेले काम करावे, त्यासाठी श्री.लोकेगांवकर यांना वेगळा भत्ता देण्यात यावा, असे ठरले. तसेच सदरहू ठिकाणी सादर होणारे कार्यक्रम श्रीसाईबाबांच्या विचारांशी सुसंगत असावेत, आक्षेपाहर्य नसावेत, याकरीता कार्यक्रम सादर करणा-या कलाकरांना तसे कळविणेत यावे, अशा सुचना दिल्या.

<u>प्रस्ताव-</u> सदर निर्णयानुसार माहे-ऑक्टोबर-२०१६ पासुन दररोज दुपारी ४ ते सायं.६ असे ०२ तास (धुपारतीचे नियोजनानुसार त्या अगोदर) व सायं.७.३० ते रात्रौ १०.०० असे २.३० तास समाधी मंदिराचे उत्तरेकडील सारंजम बाग याठिकाणी धार्मिक कार्यक्रम (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) असे विविध प्रकारचे कार्यक्रम सुरु करण्यात आलेले आहेत. त्याकामी विविध कलाकारांना दुरध्वनी, ई-मेल व पत्राव्दारे त्यांची उपलब्ध तारीख, वेळ व मानधन इत्यादी माहिती घेण्यात आली आहे व त्यानुसार यादी माहे-डिसेंबर-२०१६ करीता एकूण रु.१,५७,०००/-, माहे-जानेवारी-२०१७ करीता एकूण रु.७७,०००/- खर्च झालेला आहे. तसेच माहे-फेब्रुवारी-२०१७ करीता एकूण रु.११,०००/- असे एकूण माहे-डिसेंबर-१६ ते फेब्रुवारी-२०१७ अखेर रु.२,४५,०००/- (रुपये दोन लाख पंचेचाळीस हजार मात्र) इतका खर्च झाला आहे. तरी त्यास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती आहे.

<u>विभागचा अभिप्राय-</u> तरी माहे-डिसेंबर -२०१६ ते माहे-फेब्रुवारी-२०१७ अखेर साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन असे विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणेकामी आलेल्या कालकारांचे मानधन आदा करणेकामी एकूण रु.२,४५,०००/- (रुपये दोन लाख पंचेचाळीस हजार मात्र) खर्च झाला आहे. तरी दैनंदिन होणा-या कलाकार हजेरीच्या कार्यक्रमाकरीता निमंत्रीत केलेल्या कलाकारांचे खर्चाचे रक्कमेस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती आहे.

निर्णय क्र.११८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

सदरहू कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. या कार्यक्रमाची आयोजनाची संपुर्ण जबाबदारी मंदिर विभागाची आहे. त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन योग्य रितीने करावे, त्याची जाहिरात करावी, भक्तांची बैठक व्यवस्था चांगली करावी, कार्यक्रमांची यादी ई-मेलद्वारे सर्व सदस्यांना पाठवावी. तसेच कार्यक्रम झाल्यानंतर उपस्थितांसह त्यांचे फोटोही सर्व सदस्यांना ई-मेलद्वारे पाठवावेत, अशा सुचना केल्या. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

विषय नं.११९ **श्रींच्या मुर्ती खरेदी करुन यु.एस.ए. येथे पाठविणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- दिनांक १८/११/२०१६ रोजी ई-मेलनुसार मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, विश्वस्त यांनी पुन्हा श्रींचे ०३ नंबर मुर्ती १५ नग व ०४ नंबर ०५ नग असे एकुण २० नग मुर्ती पाठविणेबाबत कळविले आहे

याअगोदर मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०७/११/२०१६ व दि.०९/११/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये श्रींच्या ४० नग मुर्ती व ४० नग शॉल यु.एस.ए. (अमेरिका) येथे पाठविणेत आलेल्या आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणेत आला आहे.

त्यानुसार पुन्हा दि.२१/११/२०१६ रोजी श्रींचे ०३ नंबर मुर्ती १५ नग व ०४ नंबर ०५ नग असे एकुण २० नग मुर्ती पाठविणेकामी मुर्ती मंदिर विभागाकडील पुरवठाधारकाकडून मंजुर दराने खरेदी करणेस खालील प्रमाणे खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	तपशील	संख्या	दर प्रती नग	एकुण रु.
०१	०३ नंबर मुर्ती (७.५ इंच)	१५	९०/-	१३५०.००
०२	०४ नंबर मुर्ती (९ इंच)	०५	१४०/-	७००.००
			एकुण रु.	**२०५०.००**

तरी उपरोक्त प्रमाणे कळविलेनुसार श्रींच्या २० नग मुर्त्या खरेदी करुन यु.एस.ए. येथे पाठविणेकारीता पॅकींग व फॉरवर्डींग करणेकामी (UNIQUE AIR EXPRESS, PUNE यांचे मार्फत) येणा-या अंदाजे खर्चास रु.२०,०००/- मात्र (अक्षरी रु.वीस हजार मात्र) आगाऊ म्हणून घेण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे साहित्य पुणे येथे पाठवून तेथून (UNIQUE AIR EXPRESS, PUNE यांचे मार्फत) यु.एस.ए. पाठविणेत आलेले आहे.

त्यानुसार सदरील साहित्य दिनांक २१/११/२०१६ रोजी यु.एस.ए. येथे पाठविणेकारीता पॅकींग व फॉरवर्डींग करणेकामी (UNIQUE AIR EXPRESS, PUNE यांचे मार्फत) रु.१८,३६०/- व मुर्ती खरेदी कामी रु.२,०५०/- असा एकुण रु.२०,४१०/- खर्च आलेला असून ॲडव्हान्स रक्कमेतील उर्वरित रक्कम रु.१,६४०/- मात्र लेखाशाखेत जमा पावती नं.CSH-16-657 दि.२३/११/२०१६ जमा करणेत आलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्रींच्या ०३ नंबर मुर्ती १५ नग व ०४ नंबर मुर्ती ०५ नग खरेदी करणेस तसेच सदर मुर्ती व इतर साहित्य पॅकींग करुन यु.एस.ए. येथे फॉरवर्डींग करणेकामी (UNIQUE AIR EXPRESS,PUNE यांचे मार्फत) आलेल्या एकुण खर्च रु.२०,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.११९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींच्या मुर्त्या खरेदी करुन यु.एस.ए. येथे पाठविणेकामी आलेल्या रु.२०,४१०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

विषय नं.१२० **आर्थिक वर्ष २०१५-१६ चे लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल पुस्तिका छपाई व सिडी तयार करणेकामी झालेल्या खर्चाचे बील आदा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील समिती वार्षिक अहवालाबाबतची तरतुद:-** २९ (१) समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशील दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारण्या-या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशीलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्यांची रक्कम यांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्तांला, त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील. तसेच,

२९ (२) राज्य शासन, पोट कलम (१) खाली प्राप्त झालेली अहवालाची प्रत, ती प्राप्त झाल्यानंतर. शक्य तितक्या लवकर. राज्यविधान मंडळासमोर ठेवील आणि त्याची एक प्रत किंवा त्यामधील कोणतेही उतारे, त्यांची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला, समिती निर्धारित करील अशी वाजवी फी किंवा आकार प्रदान केल्यावर, विश्वस्तव्यवथेकडून दिले जातील. अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:- उपरोक्त तरतुदीनुसार संस्था नमार्फत दरवर्षी वैधानिक लेखापरिक्षक यांनी सादर केलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) नागपुर येथे होणा-या दरवर्षीच्या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात येतो.

याकामी सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रशासकीय अहवाल तयार करण्यात येतो. लेखापरिक्षण अहवालाबरोबरच संस्थानचा प्रशासकीय अहवाल ही एकत्रित पुस्तिका करुन सादर करावा लागतो. सदर अहवालास प्रशासकीय मान्यता मिळून दि.१९.११.२०१६ रोजी अंतर्गत लेखापरिक्षणकडे प्राप्त झाला होता.

तत्पुर्वीच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेत निर्णय क्र.७३३ अन्वये वैधानिक

लेखापरिक्षण व वार्षिक अहवाल छपाई करुन घेणेसाठी व त्याच्या सी.डी. तयार करुन घेणेसाठी रक्कम रु. ९०,०००- चे खर्चास मान्यता घेण्यात आली होती.

यानंतर याकामी दरपत्रके पुरवठाधारकाकडे मागणी करुन, आलेली दरपत्रके मा. उपसमिती सभेमध्ये उघडून, मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर न्युनतम दरधारकास कार्यादेश दिला जातो.

परंतु अहवाल छपाई करण्याचे प्रक्रिया दरम्यान अहमदनगर जिल्ह्यामध्ये नगरपालिका निवडणुका जाहिर झाल्यामुळे दि.५.११.२०१६ पासुन ते दि.२७.१२.२०१६ या कालावधीमध्ये मा.उपसमितीची सभाच झाली नसल्यामुळे लगेचच यानंतर नागपुर हिवाळी अधिवेशन दि.०५.१२.२०१६ पासुन ते दि.१७.१२.२०१६ या कालावधीसाठी निश्चित झाले होते. अहवालाच्या तातडीने पुस्तिका तयार करुन घेणे क्रमप्राप्त होते.मात्र याकामी हाताशी वेळ कमी होता त्यामुळे सदर अहवाल छपाई करुन पुस्तिका तयार करुन घेणे व त्याच्या सि.डी. तयार करुन घेणे याकामी वेळे अभावी दरपत्रके मागविणेचे प्रक्रीया राबविणे केवळ अशक्य होते.

वरील परिस्थिती लक्षात घेऊन विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात वेळेत अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने सदर लेखापरिक्षण अहवाल व प्रशासकीय अहवालाच्या पुस्तिका व सि.डी. तयार करुन घेणेकामी खालील नमुद बीलाप्रमाणे मे.ओम साई डिजी प्रिंन्टटेक प्रा.लि. कोपरगाव यांचेकडून तातडीने वरील अपवादात्मक परिस्थीतीत मागील सन २०१४-१५ वर्षाचे अहवाल करुन घेतलेल्या मंजूर दराने करुन घेण्यात आले हाते. व त्यामुळे सदर अहवाल व सि.डी. दि.१४.१२.२०१६ रोजी मा.विधीमंडळ सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात येऊन त्यास मान्यता मिळालेली आहे.

बील क्र.	छपाई तपशिल	एकुण नग	सर्व करांसह प्रती नग दर	एकुण किंमत
६८ दि.२३.१२.१६	वार्षिक अहवाल छपाई	५७५	१०१.७६	५८,५१२/-
	सि.डी. तयार करणे	२५०	३७.१०	९,२७५/-
			एकुण देय बील	**६७,७८७/-**

विभागाचे स्पष्ट मत व अभिप्राय:- तरी संस्थानच्या सन २०१५-१६ चे वैधानिक लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल छपाई आणि सी.डी. मागील वर्षाचे मंजूर दराने मे.ओम साई डिजी प्रिंन्टटेक प्रा.लि. कोपरगाव यांचेकडून तयार करुन घेतलेले आहे त्यांनी सादर केलेले वरील बील सर्व करासह रक्कम रु.६७,७८७/- चे खर्चास एक विशेष अपवादात्मक बाब म्हणुन मान्यता मिळून ही रक्कम RTGS व्दारे त्यांना आदा करणेकामी कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१५-१६ चे लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल पुस्तिका छपाई व सिडी तयार करणेकामी झालेल्या रु.६७,७८७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.१२१ **शासन निर्णयानुसार प्रयोगशाळा सहाय्यक या पदास नेमणूक दिनांकापासुन वेतनश्रेणी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.मिनिनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी खालीलप्रमाणे विनंती अर्ज केलेला आहे

आम्ही उपरोक्त अर्जदार कारणे विनंती अर्ज करतो की, आम्ही दि.०४.०९.२००८ पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर कार्यरत आहोत. आम्हाला सन २००८ मध्ये नेमणूक देतांना शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९९/(३४०/९९)/ माशि-२, दि.२७ एप्रिल,२००० रोजीचे निर्णयानुसार (शिक्षणसेवक योजना) प्रतिमाह रु.२,५००/- मात्र एकत्रित मानधनावर तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून नेमणूक दिलेली होती. मुळात सदरचा शासन निर्णय हा शिक्षक कर्मचारी यांचेसाठी होता. प्रयोगशाळा सहाय्यक हे पद शिक्षकेतर कर्मचारीमध्ये येते. मात्र आम्हाला नेमणूक देतांना या बाबीचा विचार केला गेला नाही. त्यामुळे आमच्यावर फार मोठा मानसिक व आर्थिक अन्याय झालेला आहे.

तसेच शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१)/माशि-२, दि.२६ जुलै, २००१ रोजीचे शासन निर्णयानुसार शिक्षणसेवक योजना विनाअनुदानित शाळेंना लागू नसलेबाबत निर्णय झालेला आहे. संस्थानच्या सर्व शाळा या विनाअनुदानित तत्तवर कार्यरत आहे, त्यामुळे शिक्षणसेवक ही योजना संस्थानचे शैक्षणिक संकुलास लागू होत नाही. त्याबाबत संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१९.०८.२००१ चे सभेतील निर्णय क्र.४०३ अन्वये सदरची योजना संस्थानचे शाळेंना लागू नसलेबाबत निर्णय होऊन, त्या वेळेच्या शिक्षकांना नेमणूक दिनांकापासून सहा.शिक्षकाची वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. असे असतांनाही संस्थान प्रशासन व शैक्षणिक संकुलाकडील प्रशासनाने सन २००१ नंतर केलेल्या शिक्षक भरतीचे वेळी शिक्षणसेवक योजनेनुसार शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचा-यांना नेमणूक आदेश दिलेले आहे. सदरची बाब ही सर्वांवर जाणीवपुर्वक अन्याय केल्यासारखी आहे.

सन २००१ नंतरही महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी वेगवेगळ्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित शाळेंना, महाविद्यालयांना शिक्षणसेवक योजना लागू नसलेबाबत स्पष्ट केलेले आहे. त्यानुसार आम्ही व इतर

सहा.शिक्षक यांनी आमचा परिविक्षाधीन कालावधी संपण्याचे आत सन २००९ (दि.२८.०८.२००९ रोजी) मध्येच विनंती अर्ज करुन सदर अन्यायाबाबत दाद मागितली होती. मात्र संस्थान प्रशासनाने व शैक्षणिक संकुलाकडील प्रशासनाने त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. तसेच शासनाने त्यांचे कोणत्याही शासन निर्णयामध्ये शिक्षकेतर पदांबाबत (ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, लिपीक वर्गीय कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचारी) वेगळी योजना राबविणेबाबत नमुद केलेले नाही. असे असतांनाही संस्थानने मात्र आमच्यावर फार मोठा अन्याय केलेला आहे.

शासन निर्णय क्र.एसएसएन/१००८/(२००/०८)/माशि-२, दि.२३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी सुधारीत आकृतीबंध लागू करण्यात आलेला असून, त्यामध्ये माध्यमिक शाळा संहितेतील शिक्षकेतर कर्मचा-यांचे निकष, चिपळूणकर समिती व शासन निर्णय दि.२५ नोव्हेंबर, २००५ प्रमाणे निश्चित करण्यात आलेले व आतापर्यंत वापरात असलेले निकष अधिक्रमित करण्यात येत असून, ते येथूनपुढे कोणत्याही परिस्थितीत लागू राहणार नाहीत, असे नमुद केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५१६ नुसार शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपाल यांना नेमणूक दिनांकपासूनच पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागू करुन संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले आहे. ग्रंथपाल हे पद ज्याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये येते, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक हे पद देखील शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये येते याबाबत शासन निर्णय क्र.एसएसएन/१००८/(२००/०८)/माशि-२, दि.२३ ऑक्टोबर, २०१३ मध्ये सर्व बाबी नमुद आहेत.

ज्या न्यायाने व शासन निर्णयांच्या आधारे ग्रंथपाल यांना नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे, त्याच न्यायाने व शासन निर्णयांच्या आधारे प्रयोगशाळा सहाय्यक या पदासही नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. कारण दोन्ही पदे (ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक) हे शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये आहे. याबाबत आम्ही यापुर्वीही वेळोवेळी स्वतंत्रपणे तसेच शिक्षक कर्मचारी यांचे समवेत एकत्रित अर्ज केलेले आहेत. तरी आमच्या अर्जाचे शासन निर्णयांनुसार अवलोकन करुन आम्हाला शासन नियमाप्रमाणे नेमणूक दिनांकापासून पुर्वलक्षी प्रभावाने प्रयोगशाळा सहाय्यक या पदाची वेतनश्रेणी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

(अ) श्री.मिनिनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे संस्थान सेवेचा तपशिल खालीलप्रमाणे –

१. दि.०२.०६.२००८ रोजीचे दैनिक लोकसत्ता या वर्तमापनत्रात शैक्षणिक संकुलाकडील शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेकामी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान या विषयांकरिता प्रत्येकी ०१ या प्रमाणे ०४ प्रयोगशाळा सहाय्यक या पदासांठी अर्ज मागविणेत आलेले होते. जाहिरातीमध्ये वेतनश्रेणी अथवा मानधनाबाबत तपशिल नमुद नाही.

२. सदर जाहिरातीस अनुसरुन अर्जदार श्री.कोते व श्री.आंबेकर यांनी संस्थाकडे अनुक्रमे रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयांकरिता प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता अर्ज केलेले होते.

३. सदर पदासाठी दि.०३.०८.२००८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व विषय तज्ञ यांचे समोर प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येऊन, मुलाखातीमध्ये पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात आले. त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.७६० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयामध्ये वेतनश्रेणी अथवा मानधनाबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच प्रस्तावामध्ये अथवा ठरावामध्ये कोणत्याही शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला नाही.

४. त्यानुसार अर्जदार श्री.आंबेकर व श्री.कोते यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१३-३६/२००८ दि.०४ सप्टेंबर, २००८ अन्वये प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर दरमहा रु.२५००/- मात्र माधनधावर, हजर झालेच्या तारखेपासून दि.३०.०४.२०११ या तीन शैक्षणिक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. सदरचे नेमणूक आदेश त्यांनी अटी व शर्तीसह स्विकारलेले आहेत.

५. मात्र दरम्यानचे काळात त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाकडील इतर ०९ शिक्षणसेवक यांचे समवेत दि.२८.०८.२००९ रोजीचे अर्जान्वये शासन निर्णयानुसार विनाअनुदानित शाळेंना शिक्षणसेवक योजना लागू नाही, त्यामुळे नेमणूक दिनांकापासून सहाय्यक शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून नेमणूक देऊन वेतनश्रेणी लागू करणेबाबत अर्ज केलेला होता. सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला होता, त्यावर त्यांनी काय कार्यवाही केली याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही.

६. त्यानतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०११ चे सभेतील निर्णय क्र.४५० नुसार श्री.आंबेकर व श्री.कोते यांना जा.क्र.एसएसएस/कमवि/१६८१-१६८२/२०११ दि.०२.०७.२०११ अन्वये प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२००० /- या वेतनश्रेणीत दि.०१.०५.२०११ पासून कायम करण्यात आलेले आहे.

७. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०११ चे सभेतील प्रस्तावामध्ये शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन पूरकपत्र एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२, दि.१०.०६.२००५ अन्वये ३ शैक्षणिक वर्ष अथवा ३० महिन्यांच्या समाधानकारक कालावधीनंतर नियमित वेतनश्रेणी देय होते, असा उल्लेख केलेला आहे. मात्र सदरचा शासन निर्णयामध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांचे बाबतीत उल्लेख नाही.

८. शिक्षकेतर कर्मचा-यांचेबाबतीत शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक – एसएसएन/ २६०३/ (४१/०३)/ माशि-२, दि.२५ नोव्हेंबर, २००५ चे प्रपत्रानुसार प्रयोगशाळा सहाय्यकाचे पद नव्याने भरावयाचे झाल्यास सुरुवातीची ३ वर्ष रु.२,५००/- मानधन देऊन त्यानंतर नियमित पुर्णवेळ प्रयोगशाळा सहायकाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल, असे नमुद केलेले आहे.

९. मात्र शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसएन-२६०३/(४१/०३)/माशि-२, दि.३० डिसेंबर, २००५ अन्वये शासन निर्णय क्रमांक – एसएसएन/२६०३/(४१/०३)/ माशि-२, दि.२५ नोव्हेंबर, २००५ चा शासन निर्णय रद्द करण्यात आलेला आहे. तसेच सुधारीत निकष निर्गमित होईपर्यंत दि.०९.१०.२००० चे सहपत्र व दि.०६.०२.२००४ चा शासन निर्णय पुनःस्थापित करण्यात आलेला आहे.

१०. दि.०९.१०.२००० चे सहपत्रामध्ये दि.०१ मार्च, २००० व दि.३० मार्च, २००० चे आदेश अशासकीय मान्यता प्राप्त अनुदानित/ स्थानिक स्वराज्य संस्था/प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यास लागू होणार नाही. अशी धारणा वित्त विभागाकडे करण्यात आली होती. वित्त विभागाने त्यांच्या दि.२९ जून, २००० च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे अभिप्राय दिलेले आहेत. तसेच दि.२९ जून, २००० च्या शासन निर्णयामध्ये सेवानिवृत्ती/ स्वेच्छानिवृत्ती/ राजीनामा/मृत्युमुळे रिक्त होणारी पदे भरणेबाबत नियमावली दिलेली आहे.

११. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१७०२/(१६०/०२)/माशि-२, दि.०६ फेब्रुवारी, २००४ मध्ये शिक्षकेतर कर्मचा-यापैकी लिपीक व चतुर्थश्रेणी कर्मचारी या संवर्गातील मंजुर असलेले सर्व पदे रिक्त असल्यास या दोन संवर्गातील प्रत्येकी एक पद नवीन सुधारीत आकृतीबंधाच्या अधीन राहुन केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास अटी व शर्तींच्या अधीन राहुन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर निर्णयामध्ये शिक्षकेतर कर्मचा-याचे लिपीक व चतुर्थश्रेणी कर्मचारी हे दोन संवर्ग वगळता अन्य उदा. ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पद भरण्यास तुर्त मंजुरी नाही, असे नमुद केलेले आहे.

१२. त्यानंतर शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२, दि.२३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पुर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सुधारीत आकृतीबंध लागू करण्यात आलेला आहे. तसेच सदर निर्णयामध्ये दि.२५ नोव्हेंबर, २००५ च्या शासन निर्णयाविरुद्ध शासनाकडे अनेक संस्थाचालकांकडून प्रात झालेल्यातक्रारी लक्षात घेता दि.२५ नोव्हेंबर, २००५ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही, असे नमुद केलेले आहे.

१३. सदर शासन निर्णयास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५१६ नुसार शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपाल यांना नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी देऊन, कायम करण्यात आलेले आहे.

मात्र श्री.मिनिनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर प्रयोगशाळा सहाय्यक यांना संस्थान सेवेत नेमणूक देताना ते शिक्षकेतर कर्मचारी असूनही त्यांना शिक्षकांप्रमाणे शिक्षणसेवक म्हणून नेमणूका दिलेल्या आहेत.

(ब) शिक्षणसेवक योजनेबाबत माहिती खालीलप्रमाणे -

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संचालित सर्व शाळा (श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल) या विना अनुदानीत तत्त्वावर चालविण्यात येतात.

२. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९९ (३४०/९९)/माशि-२, दि.२७, एप्रिल, २००० अन्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांत/कनिष्ठ महाविद्यालयात आणि अध्यापक विद्यालयात शिक्षणसेवक योजना कार्यान्वित करुन, मंजुर असलेल्या शिक्षकांच्या पदांवर शिक्षणसेवक नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२ ,दि.१३ ऑक्टोबर, २००० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षणसेवक योजना सुरु करण्यासंदर्भात शासन निर्णय समक्रमांक दि.२७ एप्रिल, २००० अन्वये दिलेला आदेश रद्द करण्यात येत असून, राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळात/कनिष्ठ महाविद्यालयात आणि अध्यापक विद्यालयात तसेच विद्यानिकेतन व सैनिक शाळांत सुधारीत शिक्षणसेवक योजना कार्यान्वित करुन, शिक्षणसेवक नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. .

४. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१)/माशि-२,दि.२६ जुलै, २००१ अन्वये सुधारीत शिक्षणसेवक योजना विनाअनुदानित शाळांना लागु नाही. विनाअनुदानित शाळांनी शिक्षकांची भरती शिक्षणसेवक म्हणून करु नये. जर विनाअनुदानित शाळांनी शिक्षणसेवकांचीनियुक्ती केल्यास तो या योजनेतील तरतुदींचा भंग होईल व अशा शाळां विरुद्ध शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेकडून कारवाई करण्यात येईल, असे नमुद केलेले आहे.

५. मा.व्य.समितीचे दि.१८-१९.०८.२००१ चे सभेतील निर्णय क्र.४०६ मधील (२) "शिक्षण सेवक योजना विना अनुदानित शाळांना लागू नसलेबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१) /माशि-२, दि.२६ जुलै, २००१ अन्वये निर्णय झालेला आहे. सदरहू निर्णय हा माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवरील शिक्षण सेवकांबाबत आहे सबब शासन निर्णयानुसार माध्यामिक व उच्च माध्यामिक स्तरांवरील शिक्षण सेवकांना सहाय्यक शिक्षक या पदाची वेतनश्रेणी लागू करणेत यावी. तसेच (४) शासन निर्णयात जरी माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण सेवकांचा उल्लेख असला तरी संस्थानकडील प्राथमिक/पुर्व प्राथमिक विभागाकडील शिक्षण सेवकांनाही अनुज्ञये वेतनश्रेणीत दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणे न्यायोचित होईल. एकाच शाळेतील पुर्व प्राथमिक/प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण सेवकांना देय वेतनश्रेणी देण्याचे बाबतीत भेदभाव न करता एकाच तत्त्वानुसार वागणूक देण्यात यावी. परिणामत: प्राथमिक विभागातील शिक्षण सेवकांनाही त्यांचे पदनाम बदलून अनुज्ञेय वेतनश्रेणी देणेत यावी" असा निर्णय झालेला आहे.

६. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन पूरकपत्र एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२, दि.१०.०६.२००५ अन्वये शिक्षणसवेक ही योजना मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, सैनिकी शाळा यामधून सुरु करण्यात आलेली आहे. म्हणजेच जी शाळा ज्या शैक्षणिक वर्षी अनुदानाच्या ज्या टप्प्यावर पात्र ठरते त्या शैक्षणिक वर्षापासून त्या शाळेस शिक्षणसेवक योजना लागू होईल. विना अनुदान तत्वावरील शाळेत करण्यात आलेली सेवा शिक्षणसेवक म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही, असे नमुद आहे.

७. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०९९/(३४०/९९)/माशि-२, दि.२६ एप्रिल, २००६ अन्वये शिक्षणसेवक ही योजना मान्यताप्राप्त १०० टक्के अनुदानित शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळा यामध्ये सुरु करण्यात आली आहे. विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आलेल्या किंवा अशंत: अनुदानित शाळांना ही योजना लागू नाही. या शाळांमधील सहशिक्षण पदावरील नियुक्त्या नियमित स्वरुपातील राहतील.

८. उपरोक्त शासन निर्णयांच्या आधारे श्री.मिनिनाथ कोते व श्री.विलास आंबेकर यांनी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील इतर सहा.शिक्षक यांचे समवेत वेळोवेळी अर्ज करुन, नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. त्यांचे अर्जानुसार संस्थानचे मा.उच्च न्यायालयाचे कायदेशीर सल्लगार ॲड.चौकीदार यांचा अभिप्राय घेतला असून, ॲड.चौकीदार यांनी, त्यांचेकडील दि.२६.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये शैक्षणिक संकुलाकडील शिक्षणसेवकांना शासन निर्णयानुसार पुर्वलक्षी प्रभावाने नेमणूक दिनांकापासून नियमित सहा.शिक्षक/प्रयोगशाळा सहाय्यकांची वेतनश्रेणी लागू करणेस कोणताही कायदेशीर अडथळा नाही, असा अभिप्राय दिलेला आहे.

९. त्यानंतर दि.२८.०६.२०१६ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार सदरचे प्रकरण पुढील अभिप्रायासाठी इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/२०१६ दि.२४.०८.२०१६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता प्रयोगशाळा सहाय्यक हे पद शिक्षकेतर पदांमध्ये येते. त्यामुळे त्यांना नेमणूक दिनांकपासून सदर पदाची वेतनश्रेणी लागू करुन दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी देणे अपेक्षित होते.

सबब अर्जदार श्री.मिनिनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे दि.१७.०९.२०१६ रोजीचे अर्जातील मागणीप्रमाणे शासन निर्णयानुसार प्रयोगशाळा सहाय्यक या पदास नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी द्यावी अगर कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर संस्थान नियमानुसार प्रशासकीय स्तरावर निर्णय होणे अपेक्षीत आहे. याकरीता सदरहू विषय रद्द करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

विषय नं.१२२ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आकृतीबंधामध्ये सहाय्यक शिक्षकांची १० वाढीव पदे निर्माण करणेबाबत.

प्रस्ताव- **(अ) विषयाची पुर्वपिठीका-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९.०७.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५४ नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागाकडे खालीलप्रमाणे ०५ शिक्षक/शिक्षिकांची सहाय्यक शिक्षक - परिविक्षाधीन (प्राथमिक विभाग) म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

अ.नं.	उमेदवाराचे नांव	जात प्रवर्ग	शैक्षणिक पात्रता	सेवेत रुजू दिनांक	वेतन/ मानधन
०१.	कु.भांगारे रेश्मा दशरथ	महादेव कोळी (एस.टी.)	एच.एस.सी., डी.एड.	दि.०६.०८.२०१२	रु.६,०००/- दरमहा
०२.	कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र	मराठा (खुला)	एच.एस.सी., डी.एड.	दि.०७.०८.२०१२	रु.६,०००/- दरमहा
०३.	श्रीमती कुमावत कविता राजू (बेलदार कविता प्रभू)	बेलदार (एन.टी.)	एच.एस.सी., डी.एड.	दि.०६.०८.२०१२	रु.६,०००/- दरमहा
०४.	कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ	मराठा (खुला)	एच.एस.सी., डी.एड.	दि.०७.०८.२०१२	रु.६,०००/- दरमहा
०५.	कु.खरमाळे शुभांगी सुदाम	मराठा (खुला)	बी.ए., डी.एड.	दि.०६.०८.२०१२	रु.६,०००/- दरमहा

संदर्भीय नेमणुक आदेशान्वये उपरोक्त ५ उमेदवारांची शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून कामावर हजर झालेच्या तारखेपासून पुढे सलग ०३ वर्षांसाठी नवीन पदनामानुसार सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) नेमणूक देण्यात येऊन, शाळा संहिता नियमानुसार त्यांना दरमहा रु.६,०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यात आलेले आहे.

सदर शिक्षिकांचा तीन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी अ.क्र.१,३, व ५ यांचा दि.०५.०८.२०१५ रोजी व अ.क्र.२ व ४ यांचा दि.०६.०८.२०१५ रोजी संपुष्ठात येत असल्याने सदरचे शिक्षकांना "दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन ऑफ रेग्युलेशन ऍक्ट १९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५" मधील तरतुदीनुसार परिविक्षाधीन कालावधी संपलेच्या तारखेपासून वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २८०० नुसार वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्य.समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्य.समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार "श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राथमिक विभागाकडील प्रस्तावात नमुद केलेल्या ०५ सहाय्यक शिक्षक/शिक्षिका यांना त्यांच्या परिविक्षाधीन कालावधी संपलेचे तारखेपासून संस्थान सेवेत कायम करणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी तपासून नियमास अनुसरुन निर्णय घ्यावा" असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार पाचही परिविक्षाधीन सहा.शिक्षिका यांचे मागील तीन वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	सहा.शिक्षिकेचे नांव	गोपनीय अहवालाची प्रतवारी			३ वर्षांची सरासरी प्रतवारी
		सन २०१२-१३	सन २०१३-१४	सन २०१४-१५	
०१.	कु.भांगारे रेश्मा दशरथ	B+	B+	B+	**B+**
०२.	कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र	B+	B+	A	**B+**
०३.	श्रीमती कुमावत कविता राजू	B+	B+	B+	**B+**
०४.	कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ	B+	B+	B+	**B+**
०५.	कु.खरमाळे शुभांगी सुदाम	B+	B+	A	**B+**

उपरोक्त पाचही परिविक्षाधीन सहा.शिक्षिका यांचे तीन वर्षांचे गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी B+ अशी आहे. तसेच ०५ ही शिक्षिकांचे काम समाधानकारक असलेबाबत प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, यांनी अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून दि.०७.०८.२००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राथमिक विभागाकरिता (प्राथमिक व उच्च प्राथमिक विभाग) आकृतीबंधामध्ये सहा. शिक्षक यांची मंजुर पदसंख्या १२ असून, प्रत्यक्षात १७ सहा.शिक्षक कार्यरत असून, त्यांना विहित वेतनश्रेणी देण्यात येत आहेत. म्हणजेच मंजुर आकृतीबंधानुसार प्राथमिक विभागासाठी ०५ सहा.शिक्षकांची पदे अतिरिक्त भरलेली आहेत. तसेच सदरच्या प्रस्तावानुसार आणखी ०५ सहा.शिक्षकांची पदे कायम करावयाची आहेत, त्यामुळे प्राथमिक विभागाकडील आकृतीबंधात मंजुर पदांपेक्षा १० पदे अतिरिक्त होत आहेत. (पैकी ०५ पदांना विहित वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडून नैसर्गिक तुकडीवाढी नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता वाढीव तुकडयांचे अध्यापन करणेकामी मा.व्य.समितीचे मान्यतेने, शाळा संहितेनुसार शिक्षकभरती करण्यात आलेली आहे.

गटशिक्षणाधिकारी राहाता पंचायत समिती यांनी प्राथमिक विभागाकडे शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ मध्ये शिक्षक निश्चिती करतांना विद्यार्थी पटसंख्या विचारात घेऊन, इ.०१ ली ते ०५ वी करिता ०१ मुख्याध्यापक व २८ शिक्षक असे एकुण २९ शिक्षक तसेच इ.६ वी ते ७ वी करिता ०६ पदवीधर शिक्षक असे एकुण ३४ (२८+०६) शिक्षक व ०१ मुख्याध्यापक यांना प्रमाणपत्र (संच मान्यता) दिलेली आहे. मा.गटशिक्षणाधिकारी, राहाता पंचायत समिती यांनी सन २०१३-१४ मध्ये दिलेल्या संच मान्यतेनुसार सध्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधील प्राथमिक विभागाकडील १६ पदे रिक्त आहेत. तसेच सन २०१४-१५ व २०१५-१६ ची शिक्षक संच मान्यता मिळणे बाकी आहे.

गट शिक्षणाधिकारी, राहाता पंचायत समिती यांना इकडील जाक्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ १४७४/२०१६ दि.२९.०६.२०१६ अन्वये पत्र देऊन, उपरोक्त ०५ सहा.शिक्षिका यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत मार्गदर्शन मागविलेले होते. तसेच त्याबाबत प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी समक्ष जाऊन चर्चा केली असता, त्यांनी शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/ (३४०/९९)/ माशि-२, दि.१३ ऑक्टोबर, २००० चे सहपत्रातील अ.क्र.८ तसेच शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/ (३४०/९९) माशि-२, दि.१० जून, २००५ प्रमाणे कार्यवाही करावी, तसेच विद्यार्थी संख्येनुसार मंजुर असलेल्या संच मान्यतेप्रमाणे शिक्षकांची संख्या असावी, असे सांगितले.

मा.गट शिक्षणाधिकारी, राहाता पंचायत समिती यांचेकडील मंजुर शिक्षक संच मान्यता व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाडील विद्यार्थी संख्या, नैसर्गिक तुकडी वाढ या सर्व बाबींचे अवलोकन करुन, इकडील जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/३००६/२०१६ दि.१२.०९.२०१६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता वाढीव शिक्षक पदांसह आकृतीबंध मंजुर करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर पत्रास अनुसरुन मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१६/१५२४/प्र.क्र१९१/का.१६ दि.१० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

"आस्थापना विषयक बाबी आणि वेतनावर होणा-या खर्चाचा भार विचारात घेऊन नवीन पदे निर्माण न करता आवश्यक सेवा बाह्ययंत्रणेद्वारे करवून घेण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर धोरणानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये आवश्यक असणा-या २२ शिक्षकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे करवून घेण्याबाबत व्यवस्थापन समितीचे अभिप्राय तसेच २२ पदे नव्याने निर्माण करावयाची झाल्यास होणारा आवर्ती आणि अनावर्ती खर्चाबाबतचा तपशील या विभागास उपलब्ध करुन देण्यात यावा"

(ब) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार त्यांनी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये आवश्यक असणा-या २२ शिक्षकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे करवून घेणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत. मात्र इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सद्यस्थितीत मंजुर आकृतीबंधापेक्षा ०५ अतिरिक्त सहा.शिक्षकांची विहित वेतनश्रेणी देऊन नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच आणखी ०५ सहा.शिक्षिक यांना शासन निर्णयानुसार तीन वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूका दिलेल्या असून त्यांचा परिविक्षाधीन कालावधी ऑगस्ट-२०१५ मध्येच संपलेला असून, ते आजपावेतो त्याच मानधनावर (रु.६,०००/- दरमहा एकत्रित वेतन) कार्यरत आहेत.

त्यामुळे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी किमान १० सहा.शिक्षक पदांचा वाढीव पदे निर्माण करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. सदरचा प्रस्ताव सादर करतांना त्यांचे दि.१० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पुर्तता करुन देता येईल.

श्री साईबाबाब इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राथमिक विभागासाठी १० पदे नव्याने तयार करावयाची झाल्यास होणारा आवर्ती आणि अनावर्ती खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

१० पदांसाठी आवर्ती वार्षिक खर्च (स्थायी पदाच्या वेतनश्रेणीनुसार प्रथम वेतनाप्रमाणे) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २८००	**१० पदांसाठी अनावर्ती वार्षिक खर्च (कुशल कंत्राटी कर्मचारी वेतनानुसार)**
प्रथम वेतन रु.२५,५६०/- **X** १० पदे **=** रु.२,५५,६००/- मासिक खर्च रु.२,५५,६००/- **X** १२ महिने **= <u>रु.३०,६७,२००/- वार्षिक खर्च</u>**	प्रति महिना रु.८,२५७/- **X** १० पदे **=** रु.८२,५७०/- मासिक खर्च रु.८२,५७०/- **X** १२ महिने **= <u>रु.९,९०,८४०/- वार्षिक खर्च</u>**

तरी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील दि.१० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रातील मसुद्याप्रमाणे पुर्तता करुन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी १० सहा.शिक्षकांच्या वाढीव पदास मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आकृतीबंधामध्ये प्राथमिक विभागासाठी सहाय्यक शिक्षकांची १० वाढीव पदे निर्माण करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या पत्रात नमुद केलेप्रमाणे पुर्तता करुन शासनास पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

विषय नं.१२३ **श्री.त्र्यं.अं. खैरे, सल्लागार, नाशिक यांना आस्थापना व बिंदूनामावली विषयक मार्गदर्शनकामी आवश्यकतेनुसार व्हिजीटींग पध्दतीने बोलाविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.त्र्यंबक अंबादास खैरे, सेवानिवृत्त लेखाधिकारी विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांची मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे आस्थापना विषयक व बिंदू नामावली कामकाजासाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०३/०९/२०१६ रोजी कामावर हजर झाले आहेत. त्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे आस्थापनेवरील (शैक्षणिक संकूल, रुग्णालये) यांचेकडील सेवाजेष्ठतेनुसार व उपलब्ध माहीतीनुसार बिंदूनामावलीचे प्रारुप तयार करुन घेण्यात आलेले आहे. सदरचे काम त्यांनी माहे डिसेंबर (एकूण ०९ भेटीमध्ये) अखेर करुन दिले आहे. त्यानंतर त्यांची मुदतवाढ संपुष्ठात आलेली होती.

श्री खैरे यांनी सदर कालावधी मध्ये बिंदूनामावलीचे कामकाज पूर्ण करणेकामी आवश्यक असलेल्या एकूण १२ मुद्दे पूर्ण करुन घेणेबाबत दि.१३/१०/२०१६ रोजी पत्र दिलेले आहे. सदर पत्रातील पूर्तता करुन घेणेकामी त्यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ चे निर्णय क्र.८१७ नुसार जा.नं.एसएसएस वशी मावक -३४८०/२०१६ दि.२७/१२/२०१६ अन्वये त्यांना तीन महिने मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढीच्या कालावधीमध्ये त्यांनी ०३ वेळा भेटी देऊन १२ मुद्दयांची पूर्तता करणेकामी मार्गदर्शन केलेले आहे. त्यांची मुदतवाढ दि.०२/०२/२०१७ अखेर संपुष्ठात आलेली आहे.

श्री.खैरे यांनी त्यांचे दि.१३/१०/२०१६ रोजीच्या पत्रातील मुद्दयांच्या पूर्तता करणेकामी (सदरचे कामकाज शासकीय पातळीवरील असल्याने) आणखी कालावधी लागणार आहे त्यादृष्टीने सदर कामासाठी श्री खैरे यांच्या मार्गदर्शनाची / सल्ल्याची आवश्यकता भासणार आहे.

सबब श्री खैरे यांना आस्थापना व बिंदूनामावली विषयक कामाची पूर्तता होईपावेतो आवश्यकतेनुसार व्हीजीटिंग पध्दतीने बोलावून त्यांचे मार्गदर्शन घेता येईल व त्यांना भेटीच्या वेळी प्रति व्हीजीट प्रतिदिन मानधन रु.३०००/- व प्रवास भाडे (नाशिक-शिर्डी-नाशिक) अदा करता येईल तसेच संस्थान मार्फत मोफत प्रसाद भोजन, दर्शन व संस्थान कामानिमीत्त शिर्डी येथे मुक्काम झाल्यास संस्थानचे निवासस्थानामध्ये मोफत निवास व्यवस्था करता येईल.

श्री. खैरे यांना आस्थापना व बिंदूनामावली विषयक कामाची पुर्तता होईपावेतो आवश्यकतेनुसार व्हीजीटिंग पध्दतीने बोलावून त्यांचेकडून मार्गदर्शन घेणे व त्यांना प्रतिव्हिजीट प्रतिदिन मानधन रु.३०००/- व प्रवासभाडे (नाशिक– शिर्डी– नाशिक) अदा करणे तसेच संस्थानमार्फत मोफत प्रसादभोजन, दर्शन व संस्थान कामानिमीत्त शिर्डी येथे मुक्काम झाल्यास संस्थानचे निवासस्थानामध्ये मोफत निवासव्यवस्था करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मागासवर्ग कक्ष)

विषय नं.१२४ **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता इयत्ता १ ली वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबत.**

प्रस्ताव- **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेल्या अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक – शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५ % प्रवेश देणे, यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत प्रवेश दिला जातो. वंचित गटातील बालक याचा अर्थ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बालके व दुर्बल घटकांतील बालके याचा अर्थ ज्या बालकांच्या माता पित्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मीक अल्पसंख्याकसह इतर बालके असा होय. अशा इयत्ता १ ली ते ८ वी प्राथमिक विभागातील बालकांना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे चालू ठेवणेत यावे असे अधिनियमात नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रं. आरटीई – २०१६/प्र.क्र. ४१५/ एसडी -१ दि. १०/०१/२०१७ रोजीचा अध्यादेश मुद्दा क्रं. ०३ नुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचीत घटकातील बालकांना विना

अनुदानीत व कायम विना अनुदानीत शाळांमध्ये (Non-minority schools-Unaided, Permanent Unaided) किमान २५ % ठेवण्याची तरतुद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद आहे.

उपरोक्त शासन नियामानुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता १ ली या वर्गासाठी २५ % प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करावे लागणार आहे. सद्यस्थितीत शाळेमध्ये इयता १ ली च्या ३ मान्यता प्राप्त तुकडी आहेत. प्रती तुकडी ५२ विद्यार्थी प्रमाणे एकुण १५६ विद्यार्थी पैकी ३९ विद्यार्थ्यांना ऑनलाईन सोडतीव्दारे प्रवेश द्यावा लागणार आहे. शासनाच्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रवेश प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

सन २०१५-१६ व २०१६-१७ पासून आर.टी. ई. नियमानुसार शाळेत मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया राबविण्यात आली आहे. याबाबतचा तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

शैक्षणिक वर्ष	इयत्ता	3 तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण प्रवेश	२५ % प्रमाणे पात्र ठरलेले मोफत एकूण प्रवेश	२५ % प्रति विद्यार्थी घेतलेले शालेय शुल्क	पालकांकडून घेण्यात आलेले शालेय शुल्क	शासनाकडून शाळेला येणे असलेले शालेय शुल्क
1		2	3	4	5	6
२०१५-१६	1 ली	१५६	३९	१२७५३०	१२७५३०	१,२७,५३०
२०१६-१७	1 ली	१५६	३९	-------	-------	१,४०,४००
२०१६-१७	2 री	१५६	३९	------	-----	१,४०,४००
एकूण रुपये	------	------	------	------	------	**४,०८,३३०**

उपरोक्त तक्त्यात नमूद केले प्रमाणे शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमा नुसार सन २०१५-१६ या कालावधीत एकूण ३९ विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यात आलेला असून त्यांचे कडून रु.1,27,530/- इतके शालेय शुल्क घेऊन संस्थानचे लेखाशाखेत रोखीने जमा करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१६-१७ शैक्षणिक वर्षात मोफत प्रवेश दिलेले इयत्ता 1 लीचे 39 विद्यार्थी एकूण शालेय शुल्क रु. 1,40,400/- व इयत्ता 2 री चे 39 विद्यार्थी एकूण शालेय शुल्क रु. 1,40,400/- अशी एकूण रक्कम रु. 4,08,330/- (१,२७,५३० + १,४०,४०० + १,४०,४००) इतकी शासनाकडून येणेबाकी आहे.

परंतू सदरची रक्कम आपल्या शाळेला शासनाकडून मिळालेनंतर पालकांना परत करावी लागणार आहे. परंतू अद्याप शासनाकडून कुठलीही कार्यवाही झालेली नाही व रक्कमही परत मिळालेली नाही. सदरच्या परताव्या संदर्भात श्री गाडेकर जिल्हा परिषद अहमदनगर यांचेशी चर्चा झालेली आहे.

अ] महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –अ, मे २५, २०१२/ जेष्ठ 4 शके १९३४ अधिनियम पत्रामधील (छ) मुद्यानुसार मोफत जागेवर प्रवेश दिल्यावर, माहिती पत्रकाचे मुल्य, कोणतीही नोंदणी फी, शिकवणी फी किंवा कोणतेही इतर आकार किंवा निधी , पालक किंवा बालक यांचेकडून घेता येणार नाही असे नमूद करण्यात आलेले असल्याने सदर पालकांकडून शालेय फी घेता येणार नाही.

ब] महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रं. आरटीई –२०१६/प्र.क्र. ४१५/ एसडी-१ दि. १०/०१/२०१७ रोजीचा अध्यादेश मधील मुद्दा क्रं. १८ नुसार आरटीई कायदा २००९ अन्वये २५ % प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्याची शैक्षणीक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार शाळांना करण्यात येणार आहे.

क] महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रं. आरटीई –२०१६/प्र.क्र. ४१५/एसडी -१ दि. १०/०१/२०१७ रोजीचा अध्यादेश मधील ब(६) नुसार, ज्या शाळा २५ % प्रवेशाकरीता पात्र आहेत परंतु नोदंणी करत नाहीत किंवा Entry Level स्तरावरील एकुण प्रवेश क्षमतेच्या २५ % जागा उपलब्ध करुन देणार नाहीत अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी तात्काळ मान्यता काढण्याबाबत तसेच नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करणेबाबत तरतुद आहे.

मागणी – प्रास्ताविकेमध्ये 'अ', 'ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे व शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमा नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता इयत्ता १ ली. या वर्गासाठी २५% प्रवेश शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेव्दारे (मोफत) करण्यास मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान – आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय:- प्रास्ताविकेमध्ये 'अ', 'ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमा नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता इयत्ता १ ली या वर्गासाठी २५% प्रवेश शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेव्दारे (मोफत) करणेच्या मान्यतेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता इयत्ता १ ली वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

विषय नं.१२५ **संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनीत्र तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदीकामी स्थानिक पुरवठाधारकांकडूनसुधारीत दरपत्रके मागविणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कार्तव्य असतील." असे नमुद केलेले आहे.

प्रस्तावना- दि.१९/०५/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३०७ (१२) नुसार, संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी मा.आमदार श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरीशिव, शिर्डी यांचे प्रचलीत इंधन दरामध्ये रु.०.५० मात्र सवलत व मागणीतील अटी-शर्तीनुसार बीलास ३० दिवसाचे क्रेडीट हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी होईपावेतो मागील मंजुर दराने, मंजुर पंपधारकांकडून संस्थानचे विविध विभागांकरीता खरेदी करण्यात आलेल्या इंधनाची बीले पुर्वीप्रमाणेच अदा करण्यात यावी, असे ठरले.

यानुसार, जा.नं.एसएसएस/वाहन /१२९७/२०१६ दि.१६/०६/२०१६ ने मा.आमदार श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरीशिव, शिर्डी यांना पुरवठा आदेश देण्यात असुन त्यानुसार त्यांचेकडून आजतागायत संस्थान करीता इंधन खरेदी करण्यात येत आहे.

सध्या वाहन विभागाकडे विविध विभागाचे दैनंदिन कामकाजाकरीता इंधनावर चालणारी खालील प्रमाणे वाहने वापरात आहेत.

अ.नं.	वाहन प्रकार	इंधन	संख्या
०१	कार्यालयीन वाहने	डिझेल	१४
०२	रुग्णवाहीक वाहने	डिझेल	११
०३	मालवाहतुक व इतर वाहने	डिझेल	२६
०४	बसेस वाहने	डिझेल	२३
०५	रुग्णवाहीक वाहने	पेट्रोल	०४
०६	टुव्हिलर	पेट्रोल	०३
	एकुण वाहने		**८१**

संस्थानचे वाहन विभाग व इतर विभागांकरीता खालील तपशिला प्रमाणे डिझेलची आवश्यकता आहे.

अ.नं.	विभाग	तपशिल	मासिक (लिटर)	वार्षिक (लिटर)
०१	वाहन विभाग	डिझेल वाहने	१२,१७२	१,४६,०६४
०२	विद्युत विभाग	विद्युत जनीत्रे	५,२००	६२,४००
०३	पाणी पुरवठा विभग	विद्युत जनीत्रे	१७५	२,१००
०४	श्री साईनाथ हॉस्पिटल	लॉन्ड्री	९००	१०,८००
०५	भक्तनिवास स्थान	लॉन्ड्री	६००	७,२००
०६	आरोग्य विभाग	फॉगिंग मशिन	९०	१,०८०
	एकुण (लिटर)		**१९,१३७**	**२,२९,६४४**

या शिवाय वाहन विभागाकडील पेट्रोलवर चालणारी वाहने व संस्थानचे विविध विभागाकडील टुव्हिलर वाहनांकरीता वार्षिक अंदाजे२,००० लिटर पेट्रोलची आवश्यकता आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- वाहनांकरीता खरेदी करण्यात येणारे इंधन ही बाब पुर्णपणे वाहनाचे वापराचे प्रमाणावर तसेच विद्युत जनित्रांला खरेदी करावे लागणारे इंधन ही बाब भारनियमनावर अवलंबुन असल्याने इंधन खरेदी करता होणारा खर्च कमी-जास्त प्रमाणात लागतो.

संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीस्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी शिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीतदरपत्रके मागविणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- सदर बाब आर्थिक आहे.

मागणी:- तरी संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीशिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन

दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीतदरपत्रक घेणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनीत्र तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे स्थानिक पुरवठाधारकांकडूनविहीत पध्दतीने सुधारीत दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

विषय नं.१२६ **कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेसाठी नवीन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणे.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-** 17 (2) (झ) मधील सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे अशी तरतुद आहे.

प्रस्ताविक- कनकुरी येथील साठवण तलावाच्या शेजारी महिंद्रा कंपनीने नविन साठवण तलाव संस्थानला करुन दिलेला आहे. महिंद्रा कंपनीने सदर साठवण तलावाच्या भराव्यावर नविन झाडे लावुन परिसर सुशोभीत केलेला आहे. सध्या बगीचा विभागामार्फत नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना टँकरद्वारे पाणी देण्यात येत आहे. परंतु सदर तलावाच्या भराव्यावर मुरुम टाकलेला असल्याने त्या ठिकाणच्या झाडांना टँकरद्वारे पाणी देताना भराव्यावरील मुरुम ढासळत असल्याने भराव्याचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. झाडांना पाणी न दिल्यास झाडे दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कनकुरी नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप करणे गरजेचे आहे. जेणेकरुन भराव्यावरील झाडांना पाणी देणे सोयीचे होईल व दुष्काळ जन्य परिस्थीतीतही झाडे जगवता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

मागणी- कनकुरी नविन साठवण तलावाच्या ठिकाणी विज नसल्याने जुने साठवण तलाव परिसरातुन पाईप लाईन करुन नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना नविन पाईप लाईन व ड्रिप नळया टाकता येईल. याकामी अंदाजे रु.1,30,000/- (एक लाख तिस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी विविध ठिबक सिंचन कंपनी/ एजन्सी यांचे कडुन दरपत्रके घेऊन न्युनत्तम दराने काम करुन घेता येईल.

विभागाचा अभिप्राय- तरी कनकुरी नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईप लाईन व ड्रिपच्या नळया टाकणेसाठी विविध ठिबक सिंचन कंपनी/ एजन्सी यांचेकडुन दरपत्रके मागवुन न्युनत्तम दराने काम करुन घेणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,30,000/- (एक लाख तिस हजार) मात्र खर्चास मान्यता मिळावी

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी येथील नवीन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईप लाईन व ड्रिपच्या नळया टाकणेसाठी विविध ठिबक सिंचन कंपनी/ एजन्सी यांचेकडुन विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

तसेच संस्थान तलाव लॅण्ड स्केपींगद्वारे सुशोभित करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.१२७ **नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी दरपत्रके मागविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-** 14 (2) (घ) मधील भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे अशी तरतुद आहे.

प्रस्ताविक- शिर्डी शहरातून अहमदनगर-मनमाड राज्यमार्ग क्र 10.जात आहे. शिर्डी शहरातील वाहतुक व्यवस्थित होणेकरीता या महामार्गावर रोड दुभाजक तयार करण्यात आलेला आहे. रोड दुभाजकामध्ये संस्थान मार्फत वेळो-वेळी झाडे, रोपे लावुन दुभाजकाचे सुशोभिकरण करण्यात आलेले आहे . त्यामुळे शिर्डीत येणाऱ्या-जाणाऱ्या साईभक्तांसाठी प्रसन्न व चांगले वातावरण तयार होऊन निर्सगाचा समतोल राखण्यास मदत होते.

मागील वर्षी उन्हाळ्यात दुष्काळजन्य परिस्थीतीमुळे नगर-मनमाड रोड दुभाजकातील झाडांना पाणी कमी मिळाल्याने तसेच गर्दीच्या काळात श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची संख्या वाढली असता साईभक्त रोड दुभाजकामधुन ये-जा करतात परिणामी दुभाजकात लावण्यात आलेली झाडे खराब झाल्याने त्या ठिकाणी नविन झाडे लावून नगर-मनमाड रोड दुभाजक सुशोभित करणेबाबत दि.08/02/2017 रोजी मा. कार्यकारी अधिकारी कक्षात मा. कार्यकारी अधिकारी सो व श्री अभय शेळके यांचे समवेत चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावुन रस्त्याचे सुशोभीक रण करणेकामी कळविलेले आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे

मागणी- दि.08/02/2017 रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात झालेल्या चर्चेनुसार नगर-मनमाड रोड दुभाजकात विविध प्रकारची फुले असणारी व दुष्काळजन्य परिस्थीतीत तग धरणारी साधारणत : 2.5 ते 3 फुट ऊंचीची बोगन वेलची झाडे लावता येईल. सदर रोड दुभाजकामध्ये साधारणत: एकुण 4,000 बोगन वेलची झाडे बसतील. याकामी अंदाजे रु. 45 प्रती झाड याप्रमाणे 4,000 झाडांसाठी रु.1,80,000/- (एक लाख ऐंशी हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी यासाठी विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागवुन न्युनत्तम दराने सदरची झाडे खरेदी करुन नगर-मनमाड रोड दुभाजकामध्ये लावता येईल.

विभागाचा अभिप्राय- तरी नगर-मनमाड रोड दुभाजकामध्ये बोगन वेलची झाडे लावणेकामी विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,80,000/- (एक लाख ऐंशी हजार) मात्र खर्चास मिळावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.१२८ **संस्थान व साईबाबांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या वेबसाईटवर कारवाई करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** :- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-

०१) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.१८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८३९.

०२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.११.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७७६.

प्रास्ताविक:- श्री साईबाबांचे जिवनकार्य व संस्थानमार्फत साईभक्तांसाठी राबविण्यात येणा-या विविध सोयी-सुविधा यांची माहिती जगभरातील साईभक्तांना व्हावी या हेतूने श्री साईबाबा संस्थानची अधिकृत वेबसाईट www.saibaba@sai.org.in दि. १९ नोव्हेंबर, १९९८ पासून कार्यान्वीत करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे या वेबसाईटवर संस्थान प्रकाशीत विविध भाषेतील सर्व प्रकाशने, ऑनलाईन डोनेशन, ऑनलाईन रुम बुकींग, नेट बॅकींग इत्यादी सुविधा श्री साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान ह्या नावाचा इतरांकडून गैरवापर होऊ नये याकरीता डोमेन नावाचे रजिस्ट्रेशनबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२७ नुसार पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत."प्रस्तावात नमुद केलेल्या डोमेन नावांच्या रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून पुढील ५ वर्ष कालावधीसाठी सदरच्या डोमेन नावांचे रजिस्ट्रेशन Hostindia.net,Pune यांचेमार्फत करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या नावाशी साधर्म्य असलेल्या नावांचा उपयोग करत असलेल्या इतर वेबसाईटची माहिती संकलीत करुन पुढील कायदेशिर कारवाई करणेसाठी सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्देशानुसार डोमेन रजिस्ट्रेशनची कार्यवाही पुर्ण करणेत आलेली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाने संकलीत केलेल्या उपलब्ध माहितीनुसार श्री साईबाबांच्या व श्री साईबाबा संस्थान ह्या नावाशी साधर्म्य असलेल्या एकूण १९३ वेबसाईट सध्या कार्यरत आहेत. सदर वेबसाईटची माहिती सोबत जोडलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदर वेबसाईटवर कारवाई करणेसाठी Cyber Crime क्षेत्रातील नामवंत ॲड.प्रशांत माळी (Cyber Crime/Law, Cyber Security, Privacy Law, Financial Crime & IPR Specialist) मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत संबंधीतांना नोटीस पाठविता येईल असे नम्र मत आहे. ॲड.प्रशांत माळी, उच्च न्यायालय, मुंबई यांनी अशा प्रकारची सेवा यापुर्वी संस्थानला विनामोबदला दिलेली होती.

मागणी :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२७ नुसार साईबाबांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या वेबसाईटवर कारवाई करणेसाठी ॲड.प्रशांत माळी, उच्च न्यायालय मुंबई, यांचेमार्फत संबंधीतांना नोटीस पाठविणेस मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक इ. छानणी करुन अनुमान :- प्रशासकीय व तांत्रिक

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२७ नुसार साईबाबांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या वेबसाईटवर कारवाई करणेसाठी ॲड.प्रशांत माळी, उच्च न्यायालय मुंबई, यांचेमार्फत संबंधीतांना नोटीस पाठविणेस मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ, सविनय सादर.

निर्णय क्र.१२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान व साईबाबांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या वेबसाईटवर कारवाई करणेसाठी ॲड.प्रशांत माळी, उच्च न्यायालय मुंबई, यांचेमार्फत संबंधीतांना नोटीस पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

विषय नं.१२९ **कुंडयांमधील रोपे खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-** 17 (2) (ट) मधील विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्टे व प्रयोजने पार पाडणे अशी तरतुद आहे.

प्रस्ताविक- बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरात शोभेची रोपे/ झाडे लावून परिसर सुशोभित करण्यात आलेला आहे. तसेच विभागामार्फत संस्थान परीसरात, ऑफीस तसेच वेळोवळी कार्यक्रमासाठी व उत्सवा निमीत्ताने शोभेच्या कुंडया ठेवल्या जातात.

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने समाधी मंदिर परिसरात ठिक-ठिकाणी शोभेच्या कुंड्या ठेवुन परिसर सुशोभीत करावयाचा आहे. तसेच प्रत्येक भक्तनिवास ISO मानांकन करावयाचा असल्याने त्या ठिकाणी शोभेच्या कुंड्या ठेवाव्या लागणार आहे. सध्या संस्थान परिसर, ऑफीस, उत्सवासाठी तसेच वेळोवेळी कार्यक्रमांना देण्यासाठी विभागाकडे कुंड्या उपलब्ध नसल्याने कुंड्यातील रोपे खरेदी करणे आवश्यक आहे

संस्थान अधिनियम ठरावांया नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

मागणी- बगीचा विभागाकडे असणाऱ्या कुंड्यामधील रोपांना 5 ते 6 वर्ष झालेले असल्याने सदर कुंड्यातील रोपे पुर्णत: खराब झालेले असल्याने सदर रोपे बदलणे आवश्यक आहे. सध्या विभागाकडील एकुण 600 प्लास्टिकच्या कुंडया रिकाम्या आहेत. साधारणत अंदाजे प्रति झाड रु. 250 याप्रमाणे एकुण 600 कुंडयातील रोपांना साधारणता रु.1,50,000/- (एक लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी परिसरातील विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागवुन न्युनत्तम दराने रोपे खरेदी करता येईल.

कुंड्यामधील शोभेची रोपे खरेदी करणेचा तपशिल खालीलप्रमाणे-

अं.नं.	रोपाचे नाव	रोपाची ऊंची	बॅग साईज	एकुण नग
01	बोगन वेल	2 फुट उंच (भरगच्च)	15 x 16 किंवा 18 x 18	40
02	सिंगापुरी चाफा	2.5 फुट	15 x 16	60
03	सायप्रस – 2	4 फुट	कुंडी	40
04	फायकस पंडा	2.5 फुट	18 x 18	35
05	फायकस स्टार	3 फुट	15 x 16	35
06	आरेका पॉम	4 फुट	15 x 16	80
07	सायकस	1 फुट	15 x 16	30
08	टेबलपाम	2.5 फुट	15 x 16	60
09	क्रोटॉन	2.5 फुट	15 x 16	60
10	डिफेन बॅकिया	2.5 फुट	13 x 13	40
11	अरेलीया	2.5 फुट	13 x 13	50
12	ड्रेसीना महात्मा	2.5 फुट	13 x 13	30
13	सॅपलोरा	2.5 फुट	13 x 13	40

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत- तरी उपरोक्त 13 प्रकारची रोपे खरेदी करणेकामी परिसरातील विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,50,000/- (एक लाख पन्नास हजार) मात्र खर्चास मान्यता मिळावी

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कुंडयांमधील १३ प्रकारची रोपे खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

विषय नं.१३० **श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू प्रकाशित करणे.**

प्रस्ताव- श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू प्रकाशित करणे बाबत श्रीमती. टि.शैलेजा, हैद्राबाद यांचे पत्र संस्थानला मिळालेले होते. सदर पत्रात श्री साईनाथ स्तवनमंजीरी मराठीचा तेलगू भाषेत भाष्यनुवाद केलेला आहे. सदर पुस्तक संस्थानव्दारे प्रकाशित करणेस विनंती केलेली होती.

श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांचे मातृसाई- तेलगू व श्री साईनाथ सगुणोपासना तेलगू- आरती (पॉकेट साईज) पुस्तके संस्थानव्दारे प्रकाशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तावः- श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांच्याकडील नमुना पुस्तक व सी.डी. (Soft/Hard) व अनुवाद बरोबर असल्याचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र घेऊन संस्थानव्दारे श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू भाषेत प्रकाशित करणेस परवानगी देता येईल असे विभागाचा अभिप्रायासह विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय निर्णयार्थ सादर करणेस आलेला होता.

ठरावः- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.३०.११.२०१६ रोजीचा निर्णय क्र. ७६० अन्वये श्रीमती टि. शैलेजा, हैद्राबाद यांनी श्री साईनाथ स्तवनमंजीरी मराठीचा तेलगू भाषेत केलेला भाष्यनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित करणेपूर्वी त्यांचेकडील पुस्तक व सी.डी. (Soft/Hard) व तेलगू भाषेत केलेला अनुवाद हा बरोबर असल्याचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविणेत यावे, असा ठराव झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः- श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांचे इकडील कार्यालय आवक क्र. १७६११ दि. ०८.१२.२०१६ रोजीचे पत्रानुसार नमुना पुस्तक, सीडी व प्रोफेसर व चेअरमन श्री. निलकंथम, ओमानिया विद्यापीठ, हैद्राबाद यांच्याकडील अनुवाद बरोबर असल्याचे प्रमाणपत्र इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे.

सबब संस्थान नियमानुसार विद्यापीठाचे प्रमाणपत्र व नमुना पुस्तक व सीडी (Soft/Hard) जमा केलेने श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद अनुवादीत श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू भाषेत भाष्यनुवाद पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करणेस मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान नियमानुसार सदरहू अनुवाद बरोबर असेलेचे विद्यापीठाचे प्रमाणपत्र व नमुना पुस्तक, सीडी (Soft/Hard) जमा केले असल्यामुळे श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद अनुवादीत श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू भाषेत भाष्यनुवाद पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

विषय नं.१३१ **संस्थान प्रकाशित इंग्रजी भाषेचे श्री साईसचरित्रानुसार जर्मन, जपानीज, फ्रेंच व स्पॅनिश या भाषेत भाषांतर अनुवाद प्रकाशित करणे.**

प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

प्रस्ताविकः- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने सन-१९३१ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साईसच्चरित– मराठी पोथी प्रकाशित करण्यात आली असून आज अखेर त्यात वाढ होऊन १६ भाषेमध्ये साई सत् चरित्र भक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

डॉ.जितेंद्र शेळके पा., शिर्डी I Love Sai संघटनचे आजीवन सभासद असून, त्यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना पत्र सादर करुन त्यात संस्थान प्रकाशित श्री साईचरित्र- इंग्रजी अनुवादक कै. नागेश वासूदेव गुणाजी लिखीत साईचरित्राचे आम्ही वेगवेगळया भाषेत भाषांतर करुन देणेस तयार आहोत. त्यासाठी भाषांतरांचा एका शब्दास रुपये. २/- प्रमाणे आकार राहील व एकूण बिलावर १४.५ % सेवाकर आकारणी केली जाईल. असे पत्रात नमुद आहे.

प्रस्तावः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे दि.३० सप्टेंबर २०१७ ते दि.३१ आक्टोबर २०१८ अखेर श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा होणार असल्याने, सदर कालावधीत देशविदेशातील एकूण २० ते २५ लाख श्री साईभक्तांचा बाबांच्या साई समाधी दर्शनासाठी ओघ वाढणार आहे.

दि.१२.०२.२०१७ रोजीचे शिर्डी येथील कामकाज आढावा बैठकीत, मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री साईबाबांच्या चरित्राचे वेगवेगळया विदेशी भाषेत रुपांतर/ अनुवाद करुन भक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत याबाबत सूचना केलेल्या आहेत.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः- खालील प्रमाणे निर्णय घेता येईल.

१) सध्या श्री साईचरित्र इंग्रजी भाषेचे जर्मन, जपानीज, फ्रेंच व स्पॅनिश या चार भाषांमध्ये अनुवाद करुन घेण्याचे काम डॉ.जितेंद्र शेळके पा., शिर्डी I Love Sai संघटनचे आजीवन सभासद यांचेकडून त्यांचे पत्रात नमूद केले प्रमाणे प्रति शब्द रुपये २/- (अक्षरी रु.दोन मात्र) + सेवाकर रु.१४.५% नुसार करुन घेता येईल किंवा आणखी काही अनुवादक संस्था असल्यास त्यासाठी ई निविदा प्रक्रिया राबविता येईल.

२) सदर चरीत्रांचा अनुवाद संस्थानकडे प्राप्त झालेनंतर भारतातील ज्या विद्यापीठांमध्ये उपरोक्त भाषेचे अध्ययन केले जाते. अशा विद्यापीठांकडून सदर अनुवाद साईचरित्र इंग्रजी प्रमाणे नमुनाबर हुकूम असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबतची कार्यवाही प्रकाशने विभागामार्फत पुर्ण झालेनंतर संबंधीत अनुवादक संघटनेस बिल आदायगी प्रक्रिया पार पाडता येईल.

करिता उपरोक्त विषयांकित प्रस्ताव मा.व्यवस्थान समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रकाशित इंग्रजी भाषेचे श्री साईसचरित्रानुसार जर्मन, जपानीज, फ्रेंच व स्पॅनिश या भाषेत भाषांतर अनुवाद प्रकाशित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

विषय नं.१३२ **शिर्डी रोजनिशी लेखक कै.दादासाहेब खापर्डे या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा तेलगू अनुवाद प्रकाशित करणे.**

प्रस्ताव- श्रीमती.टी.शैलेजा,हैद्राबाद यांचे आवक क्र. १७६०९ दि.०८.१२.२०१६ चे पत्रान्वये संस्थानला मिळालेले आहे. शिरडी रोजनिशी लेखक कै. दादासाहेब खापर्डे या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा तेलगू अनुवाद संस्था नव्दारे प्रकाशित करणेस विनंती केलेली आहे.

श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांचे मातृसाई-तेलगू व श्री साईनाथ सगुणोपासना तेलगू-आरती (पॉकेट साईज), श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू पुस्तके संस्थानव्दारे यापुर्वी प्रकाशित करण्यात आलेले आहे.

पुस्तक विशेषः- लेखक कै.गणेश श्रीकृष्ण खापर्डे/ दादासाहेब खापर्डे हे साईबाबा देहावतारात असतांना, एकूण पाच वेळा शिरडीत आले. शिरडीतील वास्तव्यातील प्रत्येक दिवसाचा दिनक्रम दादासाहेबांनी छोटया वाक्यांत एखादी कथा सांगावी तसा काही तपशिलवार वर्णन केलेला आहे की, तो सर्व दिनक्रम जणूकाही आपल्यासमोरच घडत आहे असा भास पुस्तक वाचकास होतो. सन १९१०, १९११, १९१२, १९१५ व १९१७ मध्ये श्री साईबाबांच्या सानिध्यात राहीले. सदर कालवधीत श्री साईबाबांशी जो संवाद, आज्ञा व शिकवण व बाबांचा नित्यक्रम कसा होता याबाबत जे प्रत्यक्ष घडले ते सर्व लिखाण इंग्रजी भाषेत साक्षीभूत दस्ताऐवज तयार केला आहे. त्यांच्या शिरडीतील वास्तव्याच्या रोजनिशीला साईभक्तांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. सदर इंग्रजी भाषेतील लिखाणास रोजनिशी (खापर्डे डायरी) असे नाव देण्यात आलेले आहे.

सदर दस्ताऐवज मुळ इंग्रजी भाषेत असल्याने त्याचा वेगवेगळया भाषेत अनुवाद झालेला आहे. सर्वात प्रथम मराठी भाषेत अनुवाद सन-२००२ मध्ये संगणक विभाग, श्री साईबाबा संस्थान शिडी यांनी केलेला आहे. त्यानंतर हिंदी भाषेत अनुवाद श्रीमती. कल्पना भाकूनी, नवी दिल्ली व तामिळ भाषेत अनुवाद श्री. चोकोलिंगम सुब्रहमण्यम, कुंभाकोणम्, तामिळनाडू असे ०३ भाषेत संस्थानव्दारे प्रकाशित करुन साईभक्तांसाठी पुस्तकालयात विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रस्तावः- श्रीमती टी. शैलेजा, हैद्राबाद यांनी सदर पुस्तकाचे तेलगू भाषेत अनुवाद करण्यास अनुमतीची मागणी केलेली आहे. त्यास तेलगू भाषिक साईभक्तांचा प्रतिसादही चांगला मिळेल व तेलगू भाषिक साईभक्तांनामध्ये बाबांच्या शिकवण प्रचार- प्रसार होणेकामी तेलगू भाषेत अनुवाद करणेबाबत विनंती पत्र दिलेले आहे.

विभागाची मागणी/ स्पष्ट अभिप्रायः- श्रीमती.टी.शैलेजा,हैद्राबाद यांना सदर पुस्तकाचे तेलगू भाषेत अनुवाद नमुनाबरहुकूम आहे की नाही यासाठी संस्था नमार्फत पुस्तके प्रकाशित करणेपूर्वी मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या लेटरहेडवर प्रमाणपत्रानुसार अनुवाद बरोबर आहे अशा आशयाचे पत्र सोबत जोडून मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने प्रकाशित करण्याची पध्दत आहे.

श्रीमती. टी. शैलेजा, हैद्राबाद यांच्याकडील नमुना पुस्तक व सी.डी. (Soft/Hard) व अनुवाद बरोबर असल्याचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र घेऊन संस्थानव्दारे शिरडी रोजनिशी लेखक कै. दादासाहेब खापर्डे या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा तेलगू भाषेत अनुवाद प्रकाशित करणेस परवानगी देता येईल असे नम्र मत आहे.

सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, लेखक कै.दादासाहेब खापर्डे लिखीत शिरडी रोजनिशी या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा तेलगू भाषेत केलेला अनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित करणेसाठी सदरहू अनुवाद बरोबर असलेचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत संबंधीतांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

विषय नं.१३३ **श्री.विकास मेहता, नवी दिल्ली अनुवादीत साठा संपत आलेल्या ०४ पुस्तकांचे पुनर्मुद्रण न करता संस्थान प्रकाशित प्रकाशनांच्या यादीतुन वगळणे.**

प्रस्ताव- **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं. ठ मध्ये खालील तरतुद प्रमाणे आहे.

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प्रस्ताविकः- मा.अध्यक्ष महोदय यांचे दि. २३.१२.२०१६ रोजीचे जनसंपर्क अधिकारी यांना दुध्वनी वरील निर्देश.

मागिल वृत्तांतः- श्री.विकास मेहता, नवी दिल्ली यांनी ०४ पुस्तके सन- २००४ मध्ये संस्थानला पत्र पाठवून प्रकाशनांबाबत विनंती केलेली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

ठराव:- १) मा.व्यवस्थापन मंडळ दि. २९- ३१.०३.२००४ रोजीची सभा विषय क्र.२८ निर्णय क्र. १४० अन्वये सदर विषयावरील चर्चा पुढे ढकण्यात आली. असा निर्णय झालेला होता.

२) मा. व्यवस्थापन मंडळ दि.२७.१२.२००४ रोजीचा सभा विषय क्र. ०८ आयत्या वेळेचा निर्णय क्र. १७९ अन्वये श्री. विकास मेहता,दिल्ली यांनी त्यांच्या दि.०२.०३.२००४ चे पत्राने स्वत: लिहिलेले "चिल्ड्रेन साईबाबा" हे पुस्तक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत प्रकाशित करणेबाबत कळविले आहे. सदरचे पुस्तकाचे सर्व हक्क विनामूल्य संस्थानला देण्यास तयार आहेत.

सदरचे पुस्तक लहान मुलांसाठी उपयोगी असून लहान मुलांना श्री साईबाबांविषयी ज्ञान श्री साईबाबांचे चित्रे गिरविण्याची सवय होणेसाठी उपयुक्त असल्याने ते संस्थानमार्फत प्रकाशित करण्यात यावे. असें ठरलें. (ठराव आहे तसा वाक्यरचनेसह सादर केलेला आहे.)

प्रस्ताव:- "चिल्ड्रेन साईबाबा" या पुस्तकातील मजकूर पुस्तकातील वाक्य रचना किंवा शब्द प्रयोग यामुळे श्री साईभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. तशी साईभक्तांनी सदर सूचना वजा तक्रार मा. अध्यक्ष महोदय यांना केलेली आहे. सदर बाबत संस्थानचे जनसंपर्क अधिकारी यांनी पुस्तकांचा अभ्यास करुन प्रकाशने विभागाला ०४ ही पुस्तके बंद करणेबाबत मैखिक कळविले होते.

विभागाची मागणी/ स्पष्ट अभिप्राय:- "चिल्ड्रेन साईबाबा" हे पुस्तक प्रकाशनांच्या मंजूर प्रस्ताव फाईलचे वाचन केले असता संस्थानचे माजी प्रशासकीय अधिकारी यांनी स्वाक्षरीसह अभिप्राय वजा शेरामध्ये दि.०६.०३.२००४ रोजी "बाबांचे जीवनावरील बरीच पुस्तके संस्थान प्रकाशीत आहेत. श्री. मेहता यांचे पुस्तकात नवीन काय आहे हे बघणे आवश्यक आहे. पुस्तक परिक्षण करणारी यंत्रणा आपणाकडे नाही. पुस्तकातील सत्यता वस्तूस्थिती पाहून मगच ते संस्थान प्रकाशन म्हणून प्रसिध्द करावे लागेल मान्यतेसाठी विषय ठेवाव लागेल त्यास मान्यता असावी" तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांचा लिखीत अभिप्राय/शेरा अत्यंत निरपेक्ष आहे. सदर शेरा अभ्यासचा विषय आहे.

सदर ०४ पुस्तकांबाबत श्री साईबाबांचे मुळ ग्रंथावरील अभ्यासक यांचेकडून तपासणी करुन निरीक्षण झाल्याचे सन-२००४ च्या फाईलमधील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

करिता मा. अध्यक्ष महोदय यांच्याकडे साईभक्तांनी केलेली तक्रार रास्त असून, श्री. विकास मेहता अनुवादीत चिल्ड्रेन साईबाबा- इंग्रजी व हिंदी, एक फकिर की पाठशाला व साई की और मेरा पहला कदम ही साठा संपत आलेली ०४ पुस्तके श्री साईबाबांच्या जीवनचरित्रातील शिकवण व तत्वज्ञानाशी सुसंगत वाटत नाहीत.

सबब साठा संपलेली ०४ पुस्तके पुनर्मुद्रण न करता संस्था न प्रकाशित प्रकाशनांच्या यादीतुन वगळणेस मान्यता मिळणेकामी सदर विषयांकित प्रस्ताव मा. व्यवस्थान समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विकास मेहता, नवी दिल्ली अनुवादीत प्रस्तावित ०४ पुस्तकांमधील मजकुराबाबत साईभक्तांच्या तक्रारी आलेल्या आहेत, याकरीता सदरहू पुस्तकांमधील मजकुराची तज्ञांमार्फत तपासणी करणेत येऊन त्यांचे पुर्नमुद्रणकरणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

विषय नं.१३४ **लगेज ट्रॉली खरेदी करणेकामी संमत झालेला निर्णय क्र.७१९ निरस्त करणे.**

प्रस्ताव- **प्रास्ताविक:-** लगेज ट्रॉली खरेदी करणेकामी प्रशासकीय मान्यता घेऊन सदरचा विषय दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करण्यात करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय क्र.७१९ पारीत करण्यात आलेला आहे. "यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमध्ये निवास करणा-या साईभक्तांच्या सोयीसाठी प्रस्तावास नमुद केलेप्रमाणे १२० नग लगेज ट्रॉली विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. "

दि.१४/१०/२०१६ रोजीचे परिपत्रकातील अ.नं.२९ मध्ये "आर्थिक खर्च कमी करणेसाठी नविन खरेदी प्रस्ताव सादर करणेपुर्वी इतर विभागातील उपलब्ध वस्तु/साधन सामुग्रीचा आढावा घेऊन त्याचा वापर करणे. हा पर्याय नसेल तरच नविन खरेदी प्रस्ताव सादर करणे" असे नमुद केलेले आहे.

यानुसार साई धर्मशाळा विभागाकडे लगेज ट्रॉली विषयी माहिती विचारली असता, त्यांनी दि.०८/११/२०१६ रोजी त्यांचेकडे १०० नग ट्रॉल्या, ७०० नग स्टील ग्लास व ७०० नग पाण्याचे जग शिल्लक असुन साईआश्रम भक्तनिवास विभागाला देता येईल असे ई-मेलव्दारे कळविले होते.

मागणी:- साई धर्मशाळा विभागाकडे ट्रॉल्या शिल्लक असल्याने त्यांचेकडील १०० नग ट्रॉल्या साई धर्मशाळा विभागाचे डेडस्टॉकमधुन एकुण रक्कमेसह कमी करुन कायमस्वरुपी साईआश्रम भक्तनिवास विभागाच्या डेडस्टॉकला वर्ग करण्यात आल्या असल्याने तुर्त नवीन ट्रॉल्या खरेदी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे नवीन ट्रॉल्या खरेदीबाबत संमत निर्णय क्र.७१९ निरस्त करता येईल असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ठराव नुसार अनुमान:- मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:- साई धर्मशाळा विभागाकडुन १०० नग लगेज ट्रॉली कायस्वरुपी साईआश्रम भक्तनिवास विभागाचे डेडस्टॉकला वर्ग करण्यात आलेल्या असल्याने तुर्त नवीन लगेज ट्रॉली खरेदी करण्याची आवश्यकता नाही. यासाठी दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील संमत निर्णय क्र.७१९ नवीन लगेज ट्रॉली खरेदी करणेबाबत झालेला निर्णय मा.व्यवस्थापन समितीसमोर निरस्त करणेकामी सादर.

निर्णय क्र.१३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकडुन १०० नग लगेज ट्रॉली कायस्वरुपी साईआश्रम भक्तनिवास विभागाचे डेडस्टॉकला वर्ग करण्यात आलेल्या असल्याने तुर्त नवीन लगेज ट्रॉली खरेदी करण्याची आवश्यकता नाही. यामुळे लगेज ट्रॉली खरेदी करणेकामी दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला निर्णय क्र.७१९ निरस्त करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

विषय नं.१३५ **नवीन निविदा प्रक्रिया होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अ.नं.	कलम/ तरतुद क्र.	कलम/ तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपकलम क्र.	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

प्रस्तावना:-

१) पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-१० नुसार रक्कम रु.६,२३,०००/- (अक्षरी रु.सहा लाख तेवीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्रं.०३(११) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ३५ मेट्रीक टन ब्लीचिंग पावडर खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील यश केमिकल्स, नाशिक यांचे एकत्रीत रु.५,२५,०००/- (रु.१५,०००/- प्रती मे.टन, व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/खरेदी-पापु/६७७५/२०१६, दि.०९/०३/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

२) पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक फेरीक ॲलम खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-०९ नुसार रक्कम रु.३,५०,०००/- (अक्षरी रु.तीन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पाणी पुरवठा विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्रं.०३(०९) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ५० मेट्रीक टन फेरीक ॲलम खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांचे एकत्रीत रु.३,३२,५००/- (रु.६,६५०/- प्रती मे.टन, व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/पाणी पुरवठा/६५९०/२०१६, दि.०२/०३/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

३) पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिंलेडर खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-११ नुसार

रक्कम रु.१,६०,०००/- (अक्षरी रु.एक लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पाणी पुरवठा विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०२, निर्णय क्रं.५२०(०३) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ४० नग क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील जी.एस कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई यांचे रु४,०००/- प्रती सिलेंडर, व्हॅटसह मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/पाणी पुरवठा/६१५७/२०१६, दि.०८/०२/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

सदरहू साहित्य खरेदी करणेसाठी ई-निविदा व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निम्नतम दरधारकांना माहे फेब्रुवारी व मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश देण्यात आले. सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकरीता संबंधीतांना पुरवठा आदेश देतेवेळी मार्च २०१६ पर्यंत कालावधी गृहीत न धरता माहे डिसेंबर-२०१६ पर्यंत कालावधी गृहीत धरणेत येवून पुरवठा आदेश देण्यात आलेले होते.

याबाबत लेखाशाखा विभागाकडुन आर्थिक वर्ष एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ करीता सदरची खरेदी प्रक्रिया गृहीत धरणेत यावी असे तोंडी सांगितलेवरुन पाणी पुरवठा विभागाकडुन माहे डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत संबंधीत निम्नतम दरधारकांकडुन ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.७०८ अन्वये सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

संबंधीत पुरवठाधारकांकडुन माहे डिसेंबर-२०१६ अखेर खालीलप्रमाणे ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅसची खरेदी करण्यात आलेली आहे.

अ.नं.	मटेरियल व संबंधीत पुरवठाधारकाचे नांव	पुरवठा आदेशातील मागणी व मागणीचा कालावधी	पुरवठाधारकाडुन माहे डिसेंबर-२०१६ अखेर करण्यात आलेली खरेदी.
०१	**ब्लीचिंग पावडर** यश केमिकल्स, नाशिक	पुरवठा आदेश मागणी-३५ मे.टन. मागणी कालावधी-डिसेंबर-२०१६ अखेर	२४ मे.टन.
०२	**फेरीक ॲलम** सार्क केमिकल्स, औरंगाबाद	पुरवठा आदेश मागणी-५० मे.टन. मागणी कालावधी-डिसेंबर-२०१६ अखेर	४० मे.टन.
०३	**क्लोरीन गॅस सिलेंडर** जी.एस कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई	पुरवठा आदेश मागणी-४० सिलेंडर (प्रत्येकी १०० किलोचे) मागणी कालावधी-डिसेंबर-२०१६ अखेर	२४ नग सिलेंडर (प्रत्येकी १०० किलोचे)

प्रस्ताव:- सन २०१७-१८ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस, मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१२,१६,५००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.७९० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरहू मटेरियल खरेदी करणेसाठी खरेदी विभागाकडुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येत आहे. याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यापुढील निविदा अपलोड करणे, प्राप्त ई-निविदांबाबतची पुढील कार्यवाही होवुन एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीसाठी नव्याने कार्यादेश देणे ही प्रक्रिया पुर्ण होणेस अंदाजे माहे मार्च २०१७ अखेर पर्यंत कालावधी जाईल.

परंतू दरम्यानचे कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडरची आवश्यकता भासणार आहे. यापुर्वीचे सन २०१६ मधील पुरवठाधारक यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील नमुद मागणीपेक्षा कमी मटेरियलची खरेदी करण्यात आलेली असल्याने त्यातून पुढील कालावधीसाठी नविन निविदा प्रक्रिया होईपर्यंत पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियलची खरेदी पुर्वीचेच दराने करता येईल. त्यांना देण्यात आलेल्या आदेशात अटी-शर्तीमध्ये पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत मान्य (मागील) दराने मटेरियलचा पुरवठा करणे बंधनकारक राहील असे नमुद करण्यात आलेले आहे.

यापुर्वीचे ब्लिचिंग पावडर पुरविणेचे पुरवठादार यश केमिकल्स, फेरीक ॲलम पुरविणेचे पुरवठादार सार्क केमिकल्स, औरंगाबाद व क्लोरीन गॅस पुरविणेचे पुरवठादार जी.एस.कमर्सियल, मुंबई यांचेकडील प्राप्त ई-

मेलनुसार त्यांनी सध्या सदरहू मटेरियलचे बाजारभावात वाढ झालेली असून, संस्थानकरीता नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पुर्वीचेच दराने मटेरियलचा पुरवठा करणेची तयारी दर्शविलेली आहे.

तरी उपरोक्त पुरवठाधारकांकडुन नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर पुर्वीचेच मान्य (मागील) दराने खरेदी करणेसाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.१३५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी नवीन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदरहू साहित्य प्रस्तावित पुरवठाधारकांकडून मागील मंजूर दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **दिनांक १७.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.१३६ दिनांक १७.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१. संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत नविन ठेकेदारांची नेमणूक करणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०८.२०१६ निर्णय क्र.५१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-२०१७ करीता संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नोंदणीकृत, लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविणेकामी वर्तमान पत्रातून व संस्थानचे संकेतस्थळावरुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेसंबधी कागदपत्रे डाउनलोडींगसाठी दि.२०.१२.२०१६ पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच तांत्रिक निविदेचे (टेक्नीकल बीड) ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०९.०१.२०१७ सांयकाळ ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तसेच स्कॅन करुन जोडलेली तांत्रीक निविदेसोबतची टेक्नीकल बीड लिफाफा नं.०१ मध्ये शिर्डी किंवा मुंबई कार्यालयात दि.११.०१.२०१७ रोजी सांय. ०५.०० वा.पर्यंत सादर करणेची अंतीम मुदत ठेवण्यात आलेली होती व तांत्रिक निविदा उघडेची दि.१६.०१.२०१७ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

त्यानुसार मुदतीअखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालयाकडे तांत्रीक निविदा प्राप्त झाल्या असून, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.नं.	निविदाधारकाचे नांव/गांव	प्राप्त दिनांक
१.	मे. मॉर्डन व्ही. आर. सिक्युरिटी फोर्स, पुणे.	०९-०१-२०१७
२.	मे.ओरिन सिक्युरिटी सोलुशन प्रा. लि., मुंबई	०९-०१-२०१७
३.	मे. रक्षक ग्रुप ऑफ कंपनीज, पुणे	०९-०१-२०१७
४.	मे. एन फॉरर्सस सिक्युरिटी, पुणे	०९-०१-२०१७
५.	मे. एन. पी. एस. फॅसिलिटी, मुंबई	०९-०१-२०१७
६.	मे. ओम सिक्युरिटी ॲण्ड क्लेनिंग सर्व्हीसेस, मुंबई	१०-०१-२०१७
७.	मे. मिसा सर्व्हीसेस प्रा.लि., सुरत	१०-०१-२०१७
८.	मे. एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे.	१०-०१-२०१७
९.	मे. बक्शी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई	१०-०१-२०१७
१०.	मे. स्पीक एन स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई	१०-०१-२०१७
११.	मे. युनीक्यु डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.पुणे	१०-०१-२०१७
१२.	मे. श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे	११-०१-२०१७
१३.	मे. बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि. पुणे	११-०१-२०१७
१४.	मे. औरंगाबाद मल्टी सर्व्हीसेस, औरंगाबाद	११-०१-२०१७
१५.	मे. सुपर प्रोटेक्शन सर्व्हीसेस प्रा. लि. मुंबई	१२-०१-२०१७
१६.	मे. सुमित सेफ सिक्युरिटी प्रा. लि. मुंबई	१२-०१-२०१७
१७.	मे. सेंन्टल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी, मुंबई	१२-०१-२०१७
१८.	मे. शुभम एच.पी. सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि. मुंबई	१२-०१-२०१७

१९.	मे. श्रीराम एंन्टरप्रायजेस , मुंबई	१२-०१-२०१७

उपरोक्त नमूद प्राप्त झालेल्या ई- तांत्रीक व हार्ड कॉपी निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

०२. सन- २०१७ मध्ये संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई कामाच्या तांत्रिक निविदांचा लिफाफा व ऑनलाईन (Technical Bid) उघडून पात्र निविदाधारकांचा तक्ता तयार करणेबाबत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४९ नुसार सन-२०१७ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणा-या तीनही उत्सवासाठी आवश्यक असलेल्या निमंत्रण पत्रिका व त्यासाठीची पाकीटे छपाई करणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ई-निविदा दि.३०.०१.२०१७ ते दि.०९.०२.२०१७ अखेर ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या तांत्रिक निविदांचे सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडणेबाबत तसेच सर्व कागदपत्रे तांत्रिक निविदा लिफाफामध्ये सिलबंद करुन शिर्डी कार्यालयात दि.१०.०२.१७ रोजी जमा करणेबाबत कळविण्यात आले होते

खालीलप्रमाणे ६ तांत्रिक (Technical Bid) सिलबंद निविदा व नमुने शिर्डी कार्यालयात प्राप्त झाल्या आहेत. ऑनलाईन तांत्रिक निविदा पण ६ छपाई धारकांच्या आलेल्या आहेत. याबाबत तपशिल खालील प्रमाणे.

अ.नं.	निविदा धारकाचे नांव	आवक नं/दिनांक
०१	निट प्रिंटस्, अहमदनगर	२२३९४/०८.०२.१७
०२	रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद	२२४७०/०८.०२.१७
०३	टॅको व्हीजनस् प्रा.लि. मुंबई	२२४७१/१०.०२.१७
०४	अभियंकित प्रिंटर्स , नाशिक	२२५१८/१०.०२.१७
०५	मधुरा प्रिंट सोल्युशन, नाशिक	२२५१९/१०.०२.१७
०६	प्रवरा ऑफसेट, लोणी	२२५२०/१०.०२.१७

सबब उपरोक्त ६ तांत्रिक (Technical Bid) सिलबंद निविदा व ऑनलाईन तांत्रिक निविदा मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे उघडणेस मान्यतेसाठी सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ मध्ये संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई कामाच्या तांत्रिक निविदांचा लिफाफा व ऑनलाईन ई-निविदा (Technical Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच निमंत्रण पत्रिकेवर यापुढे प्रेषक म्हणून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची नावे छापणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५)

---

०३. फायर कन्सल्टंटची नेमणुक करणेकामी प्राप्त निविदांचे टेक्नीकल बीड उघडणेबाबत.

श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन वारी व सी.आय.एस.एफ यांचेमार्फत करण्यात आलेले असुन सदर ऑडीट रिपोर्ट फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे प्राप्त झालेला आहे. फायर ऑडीटमधील सुचविलेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी मा.व्य.समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.०१ वरील निर्णय क्रं.६३८-४ नुसार फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर सल्लागार नेमणुक करणेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार मा.का.अ.सो यांचे मंजुर टिपणीने फायर ऑडीटमधील निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर सल्लागार नेमणुक करणेसाठी ई – निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ई – निविदा अपलोड करण्याची मुदत दिनांक १६.११.२०१६ ते दि.३०.११.२०१६ पर्यत देण्यात आली होती परंतु तीन निविदा प्राप्त न झालेमुळे खालीलप्रमाणे वांरवार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

अ.नं.	निविदा अपलोड करण्याची मुदत	प्राप्त निविदा	शेरा
०१	दि.०१.१२.२०१६ ते दि.०८.१२.२०१६	०२	मुदतवाढ देण्यात आली
०२	दि.१३.१२.२०१६ ते दि.२०.१२.२०१६	०२	मुदतवाढ देण्यात आली
०३	दि.२१.१२.२०१६ ते दि.२७.१२.२०१६	०२	मुदतवाढ देण्यात आली

०४	दि.२९.१२.२०१६ ते दि.०५.०१.२०१७	०२	मुदतवाढ देण्यात आली
०५	दि.०६.०१.२०१७ ते दि.१३.०१.२०१७	०३	मुदतवाढ देण्यात आली

दि.०५.०१.२०१७ रोजी www.mahatenders.gov.in या शासनाचे वेबसाईटला तांत्रीक अडचण निर्माण झाल्यामुळे फायर सल्लागार निविदा भरणेकामी निविदाधारकांचे मुदतवाढ विनंतीनुसार पाचव्यांदा दि.०६.०१.२०१७ ते दि. १३.०१.२०१७ अखेर अशी एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती त्यानुसार खालीलप्रमाणे तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहे.

अ.नं.	सा. प्र.आवक क्रं.	निविदाधारकांचे नाव	प्राप्त कालावधी
०१	१६९३२	ग्लोटेक फायर इंजिनिअर्स, पुणे	दि.०३.१२.२०१६ बंद पाकिट
०२	१६९३३	ग्राफीक इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि. , औरंगाबाद	दि.०३.१२.२०१६ बंद पाकिट
०३	२०२७०	रिलायन्स फायर प्रोटेक्शन सिस्टीम , मुंबई	दि.१३.०१.२०१७ बंद पाकिट

तरी उपरोक्त फायर सल्लागार नेमणुक करणेकामी उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे टेक्नीकल बीड उघडणेकामी मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर कन्सल्टंटची नेमणुक करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतच्या निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

०४. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या खर्चाने सेप्टी शुज पुरविणेकामी प्राप्त ई-निविदांमधील टेक्नीकल बीड उघडणेबाबत.

सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०४/२०१६ च्या सभेतील निर्णय क्र.२२७

प्रस्तावित:- श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये निविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट 2015 या सत्रामध्ये प्रवेश घेतलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याकडून नियमती गणवेष,शुज व केंद्र शासनाच्या चेन्नई येथील नॅशनल इन्स्ट्रक्शन मिडीया इन्स्टिटुट (NIMI) पुस्तंकासाठी रु.३०००/- जमा घेतली आहे. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रमानुसार दररोज पांच तास प्रात्यक्षिक प्रशिक्षणामध्ये असतात, यात कार्यशाळेतील सुरक्षेसाठी चांगला दर्जा असलेले सुरक्षा बुट (सेप्टी शुज) असणे अत्यावश्यक ठरते.

सेप्टी शुज खरेदी करणेकामी टेंडर पार्ट **"बी"** संस्थानचे विषयाकींत कामासाठी संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सूचना दि. २०/०१/२०१७ स.११.०० वा. पासून ते दि.२७/०१/२०१७ साय.५.०० वा प्रसिध्द करुन ऑनलाईन ई-निविदांची मागणी करण्यात आलेली आहे. दि. २८/०१/२०१७ रोजी ई.डी.यु. विभागाने ई-मेल व्दारा कळविले आहे की, सेप्टी शुज करीता पांच निविदाधारकांनी ऑन लाईन निविदा पाठविलेल्या आहेत. सदरील ई-निविदाचे Technical Bid पाकिट नं.१ हे खालील निविदाधारकांची दि.४/२/२०१७ अखेर प्राप्त झालेली आहेत.

१ युनियन ट्रेडींग,नाशिक सिलबंद पाकिट
२ आर.के.झेड. प्लास्टो, अहमदनगर सिलबंद पाकिट
३ जी.के. एंटरप्रायजेस सिलबंद पाकिट
४ मुबंई कार्यालय सिलबंद पाकिट

सदरील सेप्टी शुजचे प्राप्त झालेले चार निविदाधारकांचे पाकिट नं.१ Technical Bid हे मा.स्थानीक उपसमितीचे सभेपुढे उघडणेस मान्यतेसाठी सविनय सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या खर्चाने सेप्टी शुज पुरविणेकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता, सदरहू सेफ्टी शुज खरेदी करणेसाठी फारच विलंब झाल्याचे निदर्शनास येत आहे. यापुढे कोणत्याही खरेदीकामी विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित करणेत येऊन, प्रशासकीय स्तरावरुन कडक कारवाई करणेत यावी, अशा सुचना दिल्या.

(कार्यवाही- प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ कामगार अधिकारी)

---

०५ **आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Auditor) कामकाजाकरीता संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन आलेली सिलबंद दरपत्रके मा.उपसमितीचे सभेत उघडणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतुद:- १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

प्रस्तावना:- "सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी विहीत पध्दतीने अंतर्गत लेखापरिक्षकांच्या नेमणुका करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत यावी" असा निर्णय क्र.७९४ दि.३०.११.२०१६ रोजी संमत झाला आहे.

प्रस्ताव:- मा.व्य.समिती सभा निर्णय क्र.७९४ अन्वये संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजाकरीता, अंतर्गत लेखापरिक्षकाची (Internal Auditor) नेमणुक करणेकामी दि.९/०१/२०१७ ते दि.१४/०१/२०१७ याकालावधीत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये नामांकित (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षण संस्थांना बंद पाकिटामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुस-या बंद पाकिटामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुन:-

१. दि.१४.०१.२०१७ या मुदतीत खालील प्रमाणे एकुण २२ सिलबंद पाकिटे संस्थानचे कार्यालयात प्राप्त झालेली आहेत.

अ.क्र.	लेखापरिक्षण संस्थेचे नाव	आवक क्र.	दिनांक
१	माहेश्वरी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०१७३	११.०१.२०१७
२	मे.तुषार पगार ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	२०२७१	१३.०१.२०१७
३	एस.एस.ए.ए.एम ॲन्ड कं.(साम). चार्टर्ड अकौटंटस, राहुरी	२०२८६/ २०२८७	१३.०१.२०१७
४	जितेंद्र चंदुलाल मेहता ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३०१	१३.०१.२०१७
५	जयेश देसले ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	२०३०३	१३.०१.२०१७
६	उल्हास बोर्से ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	२०३०४	१३.०१.२०१७
७	खानवलकर कर्वे ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३०५	१४.०१.२०१७
८	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३५१	१४.०१.२०१७
९	कोलते ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, भुसावळ	२०३५२	१४.०१.२०१७
१०	आर.सुंदरेशन अय्यर ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३५४	१४.०१.२०१७
११	सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३५६	१४.०१.२०१७
१२	कृष्णमुर्ती जैन ॲन्ड सुर्यवंशी चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	२०३५८	१४.०१.२०१७
१३	ए.डी.अंजीकर ॲन्ड कं. मुंबई	२०३६०	१४.०१.२०१७
१४	स्पार्क ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३६३	१४.०१.२०१७
१५	आर.जे.सोनी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३६४	१४.०१.२०१७
१६	मे.ए.आर.सुलाखे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३६५	१४.०१.२०१७
१७	रतन राठी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, खामगाव	२०३६६	१४.०१.२०१७
१८	लक्ष्मीनिवास ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, हैद्राबाद	२०३६९/ २०३७०	१४.०१.२०१७
१९	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३७५	१४.०१.२०१७
२०	रोहित.व्ही.पारख ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी.	२०३७९	१४.०१.२०१७
२१	ए.एन.जे.ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३८०	१४.०१.२०१७
२२	गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर	२०३८२	१४.०१.२०१७

२. दि.१४.०१.२०१७ या मुदतीनंतर खालील एकुण ९ लेखापरिक्षण संस्थांची बंद लिफाफे प्राप्त झालेली आहेत.

अ.क्र.	लेखापरिक्षण संस्थेचे नाव	आवक क्र.	दिनांक
१	जिग्ना शहा चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०४७२	१६.०१.२०१७
२	अग्रवाल नरेडी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०४७३/ २०४७४	१६.०१.२०१७
३	आर.बी. जैन ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०५२८	१६.०१.२०१७
४	मे.कनकिया मेहता असो.चार्टर्ड अकौटंटस अहमदनगर	२०५२९	१६.०१.२०१७
५	सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०५७४	१६.०१.२०१७
६	पत्की ॲन्ड सोमन ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०६६६/ २०६६७	१७.०१.२०१७
७	सुंदरेशन अय्यर ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०६६८	१७.०१.२०१७
८	आर.सी. जैन ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०६६९	१७.०१.२०१७
९	मे.पी.एच. शहा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०६७०	१७.०१.२०१७

अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी मुदतीत आलेले २२ सिलबंद लिफाफे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडण्यात येऊन, त्यामधील पात्र- अपात्र लेखापरिक्षक तसेच त्यांच्या फी चा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	लेखापरिक्षण संस्थेचे नाव	अपेक्षित वार्षिक लेखापरिक्षण फी सेवाकरासह		पात्र/ अपात्र
		संस्थान कामकाजासाठी रुपये	रुग्णालये कामकाजासाठी रुपये	
१	माहेश्वरी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	१५,००००००/- + सेवाकर	५,००,०००/- + सेवाकर	पात्र
२	मे.तुषार पगार ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	**७५,०००/- + सेवाकर**	**२५,०००/- + सेवाकर**	पात्र
३	एस.एस.ए.ए.एम ॲन्ड कं.(साम) चार्टर्ड अकौटंटस, राहुरी	१५,००,०००/-	१५,००,०००/-	पात्र
४	जितेंद्र चंदुलाल मेहता ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	३६,००,०००/- सेवाकर	९,००,०००/- + सेवाकर	पात्र
५	जयेश देसले ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	१,३२,०००/-	५७,०००/-	पात्र
६	उल्हास बोर्से ॲन्ड कं. .चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	१,३२,०००/-	५७,०००/-	पात्र
७	खानवलकर कर्वे ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१४,००,०००/-	१४,००,०००/-	अपात्र
८	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	अपात्र
९	कोलते ॲन्ड असो. .चार्टर्ड अकौटंटस, भुसावळ	८,११,०००/- + सेवाकर	८,११,०००/- + सेवाकर	पात्र
१०	आर.सुंदरेशन अय्यर ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	३,४५,०००/-	३,४५,०००/-	पात्र
११	सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	पात्र
१२	कृष्णमुर्ती जैन ॲन्ड सुर्यवंशी चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	३,८५,०००/- + सेवाकर	२,२५,०००/- + सेवाकर	पात्र
१३	ए.डी.अंजीकर ॲन्ड कं. मुंबई	२,७०,०००/-	१,८०,०००/-	पात्र
१४	स्पार्क ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१४.००.०००/-	१४,००,०००/-	पात्र
१५	आर.जे.सोनी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	७,००,०००/-	४,००,०००/-	पात्र
१६	मे.ए.आर.सुलाखे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१२,००,०००/- + सेवाकर	१२,००,०००/- + सेवाकर	पात्र
१७	रतन राठी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, खामगाव	३,४८,०००/-	२,३६,०००/-	पात्र
१८	लक्ष्मीनिवास ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, हैद्राबाद	१२,००,०००/-	१२,००,०००/-	पात्र
१९	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	अपात्र
२०	रोहित.व्ही.पारख ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी.	-	-	अपात्र
२१	ए.एन.जे.ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१,११,२५०/-	५०,०००/- + सेवाकर	पात्र
२२	गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर	११,००,०००/-	३,००,०००/-	पात्र

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Auditor) कामकाज करुन घेणेसाठी मे.तुषार पगार ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नाशिक यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना अशी चर्चा झाली की, अंतर्गत लेखापरिक्षणाचा मुळ उद्देश लेखाविषयक त्रुटी/ अनियमितता वेळीच निदर्शनास आणून देऊन, संस्थानच्या संपुर्ण आर्थिक व्यवहारांवर सक्षम नियंत्रण ठेवणे इ आहे. त्यामुळे वैधानिक लेखापरिक्षणात येणाऱ्या आक्षेपांचे प्रमाण कमी होईल. तसेच वैधानिक लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळ या सर्वोच्च सभागृहापुढे सादर करण्यात येतो, त्यामुळे लेखापरिक्षण कामकाज करुन घेण्यासाठी उपरोक्त निम्नतम दरांचा विचार न करता संस्थानच्या मोठ्या प्रमाणावरील आर्थिक व्यवहारांची संख्या व कामाचा व्याप, त्यासाठी लागणारे आवश्यक तेवढे तज्ञ मनुष्यबळ, संस्थानमध्ये विकासीकरणाच्या टप्प्यात असलेल्या ERP संगणक प्रणाली करीता स्वतः सनदी लेखापाल श्री. सुनिल अभ्यंकर यांनी मार्गदर्शन करण्याची दर्शविलेली तयारी, याबाबींचा विचार करता, मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांचे नाव प्रस्तावित केले गेले. त्यांनी या कामाकरीता नमुद केलेल्या रु.१२,००,०००/- फी मध्ये ५०% कपात करुन संपुर्ण संस्थानचे सर्व विभाग, रुग्णालय, माहिती सुविधा केंद्रे, परकीय चलन व्यवहार इ.सह सर्व आर्थिक व्यवहारांचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता वार्षिक रु.६,००,०००/- अधिक त्यावर लागु असलेला सेवाकर व फक्त शिर्डी येथे लेखापरिक्षण कालावधीत संस्थानचे व्दारावती भक्तनिवासस्थान येथे निवास, श्री साईप्रसादालय येथे भोजन ही विनामुल्य व्यवस्था या अटींवर कामकाज करणेस तयारी दर्शविली. याकरीता मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्तीकरण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

०६. **आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता संस्थानचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण (Special Internal Auditor) कामकाजाकरीता संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन आलेली सिलबंद दरपत्रके मा.उपसमितीचे सभेत उघडणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतुद:- १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

प्रस्तावना:- दि.२२.१२.२०१६ रोजी झालेल्या मा.व्य.समितीच्या सभेत निर्णय आयत्या वेळेचा विषय क्र.२१ निर्णय क्र. ९६६ खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

"सध्याच्या व्यवस्थापन समितीचे कार्यकालामध्ये दि.०१ एप्रिल, २०१६ पासुन विशेष अंतर्गत लेखापरिक्षण सुरु करणेत यावे." असा निर्णय संमत झाला आहे.

प्रस्ताव:- मा.व्य.समितीच्या सभेत निर्णय क्र.९६६ अन्वये संस्थानचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजाकरीता, विशेष अंतर्गत लेखापरिक्षकाची (Special Internal Auditor) नेमणुक करणेकामी दि.९/०१/२०१७ ते दि.१४/०१/२०१७ याकालावधीत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये नामांकित (साधारणतःरु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या) लेखापरिक्षण संस्थांना बंद लिफाफ्यामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुसऱ्या बंद लिफाफ्यामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुनः-

१. दि.१४.०१.१७ या मुदतीत खालील प्रमाणे एकुण १६ सिलबंद लिफाफे संस्थानचे कार्यालयात प्राप्त झालेली आहेत.

अ.क्र.	लेखापरिक्षण संस्थेचे नाव	आवक क्र.	दिनांक
१	मे.तुषार पगार ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नासिक	२०२७४	१२.०१.२०१७
२	जितेंद्र चंदुलाल मेहता ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३०२	१३.०१.२०१७
३	खानवलकर कर्वे ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३०५	१४.०१.२०१७
४	कोलते ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, भुसावळ	२०३५२	१४.०१.२०१७
५	साबद्रा ॲन्ड साबद्रा. चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	२०३५३	१४.०१.२०१७
६	रतन राठी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, खामगाव	२०३५५	१४.०१.२०१७
७	बाटलीबॉय ॲन्ड पुरोहित.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३५७	१४.०१.२०१७
८	ए.डी.अंजीकर ॲन्ड कं. मुंबई	२०३५९	१४.०१.२०१७
९	आर.जे.सोनी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	२०३६१	१४.०१.२०१७
१०	स्पार्क ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३६२	१४.०१.२०१७
११	लक्ष्मीनिवास ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, हैद्राबाद	२०३६७/ २०३६८	१४.०१.२०१७

१२	ए.एन.जे.ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३७३/ २०३८४	१४.०१.२०१७
१३	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३७४	१४.०१.२०१७
१४	रोहित.व्ही.पारख ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी.	२०३७६/२०३८१	१४.०१.२०१७
१५	सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	२०३७७	१४.०१.२०१७
१६	गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर	२०३८३	१४.०१.२०१७

विशेष अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी मुदतीत आलेले १६ सिलबंद लिफाफे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडण्यात येऊन, त्यामधील पात्र- अपात्र लेखापरिक्षक तसेच त्यांच्या फी चा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	**लेखापरिक्षण संस्थेचे नाव**	**अपेक्षित वार्षिक लेखापरिक्षण फी सेवाकरासह**		**पात्र/ अपात्र**
		संस्थान रुपये	**रुग्णालये रुपये**	
१	मे.तुषार पगार ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नासिक	४,८०,०००/- + सेवाकर	२,४०,०००/- + सेवाकर	पात्र
२	जितेंद्र चंदुलाल मेहता ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	९,००,०००/-	३,६०,०००/-	पात्र
३	खानवलकर कर्वे ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	११,००,०००/- +सेवाकर	११,००,०००/- + सेवाकर	अपात्र
४	कोलते ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, भुसावळ	४,११,०००/-	२,४०,०००/-	पात्र
५	साबद्रा ॲन्ड साबद्रा. चार्टर्ड अकौटंटस, नाशिक	१५,००,०००/-	१५,००,०००/-	पात्र
६	रतन राठी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, खामगाव	२,३६,०००/-	२,३६,०००/-	पात्र
७	बाटलीबॉय ॲन्ड पुरोहित.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	५,४०,०००/- + सेवाकर	२,७०,०००/- + सेवाकर	पात्र
८	ए.डी.अंजीकर ॲन्ड कं. मुंबई	१,८०,०००/-	१,८०,०००/-	पात्र
९	आर.जे.सोनी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई	५,००,०००/-	५,००,०००/-	पात्र
१०	स्पार्क ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१०,००,०००/- + सेवाकर	१०,००,०००/- + सेवाकर	पात्र
११	लक्ष्मीनिवास ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, हैद्राबाद	९,००,०००/- + सेवाकर	९,००,०००/- + सेवाकर	पात्र
१२	ए.एन.जे.ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	**१,००,०००/- + सेवाकर**	**५०,०००/-**	पात्र
१३	ए.ई.जगदाळे ॲन्ड .असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१०,५०,०००/- + सेवाकर	१०,५०,०००/- + सेवाकर	अपात्र
१४	रोहित व्ही पारख ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी	-	-	अपात्र
१५	सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे	१२,००,०००/- + सेवाकर + out of pocket exp.	१२,००,०००/-+ सेवाकर + out of pocket exp.	पात्र
१६	गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर	११,००,०००/-	२,००,०००/-	पात्र
१७	एस.एस.ए.एम.ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, राहूरी	१५,००,०००/-	१५,००,०००/-	पात्र

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता संस्थानचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण (Special Internal Auditor) कामकाज करुन घेणेसाठी ए.एन.जे.ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना अशी चर्चा झाली की, आर्थिक वर्ष २०१६-१७ चे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेण्याचा मुळ उद्देश लेखाविषयक त्रुटी/अनियमितता निदर्शनास आणून, वैधानिक लेखापरिक्षणात येणाऱ्या आक्षेपांचे प्रमाण कमी करणे हा आहे. तसेच वैधानिक लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळ या सर्वोच्च सभागृहापुढे सादर करण्यात येतो, सदर कामकाज इतर चार्टर्ड अकौटंटस संस्थेमार्फत चालू आहे. तथापी संपुर्ण आर्थिक वर्षातील व्यवहारांचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता उपरोक्त नुमूद केलेल्या निम्नतम दरांचा विचार न करता आर्थिक व्यवहारांची संख्या, कामाचा व्याप, आवश्यक तज्ञ मनुष्यबळ व संस्थानमध्ये विकासीकरणाच्या टप्प्यात असलेल्या ERP संगणक प्रणालीतील आर्थिक व्यवहार तपासणी याकरीता स्वतः सनदी लेखापाल श्री. सुनिल अभ्यंकर यांनी मार्गदर्शन करण्याची दर्शविलेली तयारी, याबाबींचा विचार करता, मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांचे नाव प्रस्तावित केले गेले. त्यांनी या कामाकरीता नमुद केलेल्या रु.१२,००,०००/- फी मध्ये ५०% कपात करुन संपुर्ण संस्थानचे सर्व विभाग, रुग्णालय इ.सह सर्व आर्थिक व्यवहारांचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता वार्षिक रु.६,००,०००/- अधिक त्यावर लागु असलेला सेवाकर व फक्त शिर्डी येथे लेखापरिक्षण कालावधीत संस्थानचे व्दारावती भक्तनिवासस्थान येथे निवास, श्री साईप्रसादालय येथे भोजन ही विनामुल्य व्यवस्था या अटींवर सदरहू कामकाज करणेस तयारी दर्शविली. याकरीता मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता विशेष अंतर्गत लेखापरिक्षण (Special Internal Audit) करण्याकरीता विशेष अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

०७. दर्शनरांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आर.ओ.प्लॅन्ट Inlet व Qutlet पाईपलाईन करणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त दरपत्रके (कोटेशन) उघडणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-

अ.नं.	कलम/ तरतुद क्र.	कलम/तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपकलम क्रमांक	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.८६६ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. **"..**यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता वॉटर कुलर खरेदी करणे व आर.ओ.प्लॅन्टची उभारणी करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आर.ओ.प्लॅन्टची उभारणी केल्यानंतर आर.ओ.प्लॅन्ट ते वॉटर कुलर्स पर्यंतची पाईपलाईन करणेकामी आवश्यक मटेरियल खरेदीकरीता अंदाजे रु.२,२५,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून

खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी मेकॅनिकल विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आलेले होते.

प्रस्ताव:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८६६ नुसार दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आर.ओ.प्लॅन्ट Inlet व Outlet पाईपलाईन करणेसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी दरपत्रके (कोटेशन) मागविणेस दि.२३/१२/२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	नांव	प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक	शेरा
०१	यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता)	२०२९९, दि.२१/०१/२०१७.	बंद कोटेशन
०२	अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु.	२१०००, दि.२१/०१/२०१७.	बंद कोटेशन
०३	अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता)	२१००१, दि.२१/०१/२०१७.	बंद कोटेशन
०४	न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता)	२१००२, दि.२१/०१/२०१७.	बंद कोटेशन

दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आर.ओ.प्लॅन्ट Inlet व Outlet पाईपलाईन करणेसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके (कोटेशन) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता)	१,०५,२९५/-
०२	अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु.	१,११,०७१/-
०३	अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता)	१,०६,९१७/-
०४	न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता)	**१,०४,४३४/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता आवश्यक असलेले पाणी पुरवठयाचे साहित्य खरेदी करणेसाठी न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.१,०४,४३४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

०८. वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी प्राप्त दरपत्रके (कोटेशन) उघडणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-

अ.नं.	कलम/ तरतुद क्र.	कलम/ तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपकलम क्र.	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.७८९ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. ".. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ठिकाणी वॉटर फ्लो मिटर खरेदी करुन

बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलाव येथे पाण्याचे मोजमाप करणेकरीता व श्री साईप्रसादालय येथे दैनंदिन वापरासाठी खर्च होणा-या पाण्यावर नियंत्रणाकरीता फ्लो मिटर खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,९०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले होते.

प्रस्ताव:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७८९ नुसार याकामी दरपत्रके (कोटेशन) मागविणेस दि.१३/१२/२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	नांव	प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक	शेरा
०१	ॲडप्ट फ्युडाईन प्रा.लि., पुणे.	१९९८८, दि.०७/०१/२०१७.	बंद कोटेशन
०२	स्टीम इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे.	२१०२०, दि.२१/०१/२०१७.	बंद कोटेशन
०३	खागा एनर्जी प्रा.लि., पुणे.	२१७७७, दि.३१/०१/२०१७.	बंद कोटेशन
०४	डी.जी.एन्टरप्रायजेस, चंद्रपुर.	२१७७८, दि.३१/०१/२०१७.	बंद कोटेशन

वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके (कोटेशन) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	**अल्ट्रासोनिक ओपन चॅनल टाईप वॉटर फ्लो मिटर साईज- ओपन चॅनल टाईप**	**इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर फ्लो मिटर साईज- 8"**
		कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.	
०१	ॲडप्ट फ्युडाईन प्रा.लि., पुणे	**१,१७,५०६/-**	**१,१६,६०४/-**
०२	स्टीम इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे	१,६५,६००/-	२,३०,४००/-
०३	खागा एनर्जी प्रा.लि., पुणे	३,९०,६००/-	३,७८,०००/-
०४	डी.जी.एन्टरप्रायजेस, चंद्रपुर	२,८९,८००/-	३,५२,८००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी ॲडप्ट फ्युडाईन प्रा.लि., पुणे यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

०९. संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकरीता प्राप्त दरपत्रके (कोटेशन) उघडणेबाबत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-

अ.नं	कलम/ तरतुद क्रं.	कलम/तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपकलम क्रं.	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.
०४	२१	विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग	१ (क)	मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.९२९ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. "..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी चार नमुने सुरवातीचे पंधरा दिवसात उर्वरीत चार नमुने नंतरचे पंधरा दिवसात याप्रमाणे दरमहा एकुण ०८ नमुन्यांची तपासणी करणेसाठी प्रती नमुना अंदाजे रु.१,४००/- सर्व करसमावेशक व व्हीजिट चार्जसह वार्षिक अंदाजे एकुण रु.१,३४,४००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ प्रस्तावित करण्यात आलेले होते.

प्रस्ताव:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९२९ नुसार, माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीजची नेमणूक करणेसाठी दरपत्रके (कोटेशन) मागविणेस दि.०६/०१/२०१७ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	नांव	प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक	शेरा
०१	अश्वमेध इंजिनिअर्स & कन्सलटंट, नाशिक.	२१६२५, दि.२८/०१/२०१७.	बंद कोटेशन
०२	ई-सोल्युशन सर्विसेस, नाशिक.	२१६२६, दि.२८/०१/२०१७.	बंद कोटेशन
०३	महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स, ठाणे वेस्ट.	२१६२७, दि.२८/०१/२०१७.	बंद कोटेशन
०४	एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., ठाणे.	२१६२८, दि.२८/०१/२०१७.	बंद कोटेशन

माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेकामी एजन्सीजची नेमणूक करणेसाठी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके (कोटेशन) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशनमधील प्रती नमुना पाणी तपासणीकामीचा एकत्रित मुळ दर रु.
०१	अश्वमेध इंजिनिअर्स & कन्सलटंट, नाशिक.	९२०/-
०२	ई-सोल्युशन सर्विसेस, नाशिक.	१५५०/-
०३	महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स, ठाणे वेस्ट.	१३५०/-
०४	एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., ठाणे.	१०६५/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील पाण्याच्या नमुन्यांची शासकीय एजन्सीकडून तपासणी करुन घेण्यात यावी, असे उपसमितीचे मत झाले. याकरीता उपसमिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांचे मार्गदर्शनाखाली पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करणेकामी पुढील कार्यवाही करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

१०. श्री साईप्रसादालयातील चाळण कोंडा विक्रीचे वार्षिक दरपत्रके (कोटेशन्स) उपसमिती सभेपुढे उघडणेबाबत.

अधिनियम २००४ मधील तरतूद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक:- श्री साई प्रसादालयात सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजन पुरविले जाते. दररोज अंदाजे ४० ते ४५ हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात व गर्दीमध्ये प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांची संख्या ८० ते ८५ हजारापर्यंत जाते. या सर्व साईभक्तांना प्रसादभोजनामध्ये चपाती व इतर पदार्थ दिले जाते. सदर चपाती बनविण्यासाठी लागणारा गहु मुख्य भांडार विभागातून मागणी करण्यात येऊन उप-भांडारमध्ये असलेल्या गिरण्यांव्दारे दळण्यात येतो. श्री साई प्रसादालयामध्ये एकुण ०३ गिरण्या असून त्या ०७/०३ व ०३/११ या दोन्ही शिप्टमध्ये चालू असतात. तसेच गर्दीच्या वेळी रात्रपाळीमध्ये सुध्दा सदर गिरण्या कार्यरत ठेवाव्या लागतात. गहु दळतांना काही प्रमाणात आटा गिरण्यांच्या आजूबाजूला उडतो त्याचप्रमाणे आटयामध्ये काही प्रमाणात चाळण (कोंडा) तसेच काही प्रमाणात धान्य, कडधान्याची बारीक कणी निघते.

संदर्भिय क्र.०१ अन्वये मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०९/२०१४ निर्णय क्र. ८४९ अन्वये सदर चाळण/ कोंडा अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे. सध्या श्री साई प्रसादालयामध्ये गहू वापरण्यात येत आहे. गहू दळल्यानंतर वेळोवेळी निघणारा चाळण/कोंडा विक्रीकामी देण्यात आलेल्या टेंडरची मुदत माहे डिसेंबर- २०१६ अखेर संपलेली आहे.

संदर्भिय क्र.०२ अन्वये दि.१८/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीन्वये दि. ०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ अखेर गहू दळल्यानंतर वेळोवेळी निघणारा चाळण/कोंडा विहीत पध्दतीने विक्री करणेकामी श्री

साई प्रसादालयामार्फत दरपत्रके मागविणेकरीता प्रचलित पध्दतीनुसार नगरपंचायत हद्दीतील विविध संघटनांचे नोटीस बोर्डावर तसेच संस्थानचे प्रत्येक विभागाचे नोटीस बोर्डावर जाहिर निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार विहीत वेळेत ०२ व विहित वेळेनंतर (उशीराने) ०१ असे एकूण ०३ दरपत्रके प्राप्त झालेली होती. संदर्भिय क्र.०३ दि.०९/१२/२०१६ अन्वये कोटेशन्स (दरपत्रके) उघडणेबाबतची टिपणी मा.उप-कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर केली असता, सदरील टिपणीवर उशिरा आलेले कोटेशन उघडता येणार नसल्याने व किमान ०३ कोटेशन्स आवश्यक असल्याने सदरील प्राप्त कोटेशन्स (दरपत्रके) दफ्तरी दाखल करणेत

येऊन फेर कोटेशन्स मागवून मा.उप-समिती सभेसमोर उघडणेबाबत निर्देश देणेत आलेले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय क्र.०४ अन्वये दि.१५/१२/२०१६ रोजीचे टिपणीनुसार चाळण/कोंडा विक्रीकामी फेर कोटेशन्स (दरपत्रके) मागविणेत आलेले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे फेरदरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	आवक नंबर व दिनांक
०१.	श्री.नंदकुमार संपत तुरकणे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	१९४२९/ दि.०२/०१/२०१७
०२.	श्री.रामदास बाळासाहेब ढगे, मु.पो.को-हाळे, ता.राहाता	१९४३०/ दि.०२/०१/२०१७
०३.	श्री.शंकर रामभाऊ वाघे, मु.पो.केलवड, ता.राहाता	१९४३१/ दि.०२/०१/२०१७
०४.	श्री.बंडू माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१९५२२/ दि.०३/०१/२०१७
०५.	श्री.सोमनाथ माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१९५२३/ दि.०३/०१/२०१७
०६.	श्री.बाजीराव माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१९५२४/ दि.०३/०१/२०१७
०७.	श्री.विक्रम बंडू गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१९५२५/ दि.०३/०१/२०१७
०८.	श्री.विजय मोहन गोर्डे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१९५२६/ दि.०३/०१/२०१७
०९.	श्री.प्रमोद भाऊसाहेब शिंदे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	१९५२७/ दि.०३/०१/२०१७
१०.	श्री.विशाल भाऊसाहेब शिंदे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	१९५२८/ दि.०३/०१/२०१७
११.	श्री.मनोज भा.पाडेकर, मु.पो.धोत्रे, ता.कोपरगांव	१९६९५/ दि.०५/०१/२०१७
१२.	श्री.व्हि.एन.पवार, मु.पो.कनकुरी, ता.राहाता	१९६९७/ दि.०५/०१/२०१७
१३.	श्री.ए.एन.गोत्रिक्ष, मु.पो.कनकुरी, ता.राहाता	१९६९८/ दि.०५/०१/२०१७

मागणी :- दि.०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ अखेर गहू दळल्यानंतर वेळोवेळी निघणारा चाळण/ कोंडा विहीत पध्दतीने विक्री करणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक

सन- २०१६ करीता चाळण/कोंडा उचलण्यासाठी देण्यात आलेली मुदत दि. ३१/१२/२०१६ अखेर संपुष्टात आल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी म्हणजेच दि. ०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ अखेर सदरचा चाळण/ कोंडा अभिलेख कक्षामार्फत विहीत पध्दतीने विक्री करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली फेरदरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशनमधील प्रती किलो मुळ दर रु.
०१.	श्री.नंदकुमार संपत तुरकणे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	५.५०
०२.	श्री.रामदास बाळासाहेब ढगे, मु.पो.को-हाळे, ता.राहाता	६.७५
०३.	श्री.शंकर रामभाऊ वाघे, मु.पो.केलवड, ता.राहाता	६.५०
०४.	श्री.बंडू माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	११.७५
०५.	श्री.सोमनाथ माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१२.२५
०६.	श्री.बाजीराव माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	**१२.५०**
०७.	श्री.विक्रम बंडू गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	१२.००
०८.	श्री.विजय मोहन गोर्डे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता	११.९०
०९.	श्री.प्रमोद भाऊसाहेब शिंदे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	१२.००
१०.	श्री.विशाल भाऊसाहेब शिंदे, मु.पो.पिंपळवाडी, ता.राहाता	११.५०
११.	श्री.मनोज भा.पाडेकर, मु.पो.धोत्रे, ता.कोपरगांव	९.५०
१२.	श्री.व्हि.एन.पवार, मु.पो.कनकुरी, ता.राहाता	९.३०
१३.	श्री.ए.एन.गोत्रिक्ष, मु.पो.कनकुरी, ता.राहाता	९.८०

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ अखेर कालावधीसाठी श्री साईप्रसादालयातील चाळण/ कोंडा विक्री करणेकामी श्री.बाजीराव माणिक गागरे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता यांचे प्रती किलो रु.१२.५० मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

११. संगणक प्रिंटेड रुम बुकींग पावती छपाई करणेकामी मागणी करण्यात आलेली दरपत्रके उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.

दि.३१/११/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८२५ अन्वये संगणक प्रिंटेड रुम बुकींग पावती ५,४०,००० नग छपाई करण्यास व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळालेली आहे.

दरपत्रक मागणी पत्रानुसार प्रेसधारकांना त्यांचे पत्यावर पोष्टव्दारे व ई-मेलव्दारे दरपत्रक मागणीपत्र पाठवुन त्यांचेकडुन सिलबंद पाकीटात दरपत्रकाची मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१२/०१/२०१७ वार गुरुवार वेळ सायं. ०५ वाजेपर्यंत होती.

त्यानुसार मुदतीअंती खालीलप्रमाणे प्रेसधारकांची दरपत्रके आलेली आहेत.

अ.नं.	प्रेसधारकांचे नाव व पत्ता	प्राप्त कोटेशन स्थिती	सा.प्र.शा. आवक नंबर	दिनांक
१	मे.सम्राट एंटरप्रायजेस, नाशिक	बंद पाकीट	१९९८२	०७/०१/२०१७
२	मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापुर	बंद पाकीट	१९९९८	०९/०१/२०१७
३	मे.श्री प्रसाद प्रिंटर्स, कोपरगाव	बंद पाकीट	२०१२६	११/०१/२०१७
४	मे.गुरुछाया एंटरप्रायजेस, मुंबई	बंद पाकीट	२०१२७	११/०१/२०१७
५	मे.क्लासीक स्टेशनर्स कं., मुंबई	बंद पाकीट	२०१२८	११/०१/२०१७
६	मे.मितल स्टेशनर्स ॲण्ड प्रिंटर्स, मुंबई	बंद पाकीट	२०१२९	११/०१/२०१७
७	मे.साईराकेश पेपर-टेक, नाशिक	बंद पाकीट	२०१३०	११/०१/२०१७
८	मे.रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद	बंद पाकीट	२०२७६	१२/०१/२०१७

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशनमधील मुळ दर रु.
०१.	मे.सम्राट एंटरप्रायजेस, नाशिक	०.४३
०२.	मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापुर	०.५२
०३.	मे.श्री प्रसाद प्रिंटर्स, कोपरगाव	०.६७
०४.	मे.गुरुछाया एंटरप्रायजेस, मुंबई	०.६९
०५.	मे.क्लासीक स्टेशनर्स कं., मुंबई	०.६२
०६.	मे.मितल स्टेशनर्स ॲण्ड प्रिंटर्स, मुंबई	०.७०
०७.	मे.साईराकेश पेपर-टेक, नाशिक	**०.४३**
०८.	मे.रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद	०.७१

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागासाठी संगणक प्रिंटेड रुम बुकींग पावती छपाई करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील अ.नं. ०१ व ०७ या दोन्ही कोटेशनधारकांचे समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. परंतु त्या दोन्ही कोटेशनधारकांचे लेटरहेड मे.साईराकेश पेपर-टेक, नाशिक या एकाच नावाचे असल्यामुळे तुलनात्मक तक्त्यामधील अ.नं.०७ चे मे.साईराकेश पेपर-टेक, नाशिक यांचे सर्व करांसह प्रती नग रु०.४३ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना छपाईचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

१२. पेस्ट/ रोडंन्ट कंट्रोल, फॅगिंग ट्रिटमेंन्ट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी कामाचे Bid Of Quotation (आर्थिक निविदा) उघडणेबाबत.

सन २०१७/२०१८ (दि.०२/०१/२०१७ ते दि.०१/०१/२०१८) या एक वर्षाचे कालावधीसाठी साईबाबा संस्थान अधिनस्त, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील खोल्यांमध्ये पेस्ट कंट्रोल व रोडंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेन्ट (धुरीकरण), डास आळी प्रतिबंधक फवारणी (Anti Larval) फवारणी करण्याचे कामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७२१ नुसार, जनसंपर्क विभागामार्फत दैनिक पुढारी या वर्तमानपत्रातुन दि.०२/१२/२०१६ रोजी व श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी. विभाग यांचे मार्फत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात व Document तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.ई-निविदा भरण्यापुर्वी निविदाधारकांसाठी दि.०६/१२/२०१६ रोजी प्री-बीड मिटींग, दि.१८/०२/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमधील विषय नं.१३ व निर्णय क्र.४१ अन्वये संस्थानचे परीसरात स्वच्छता व किटकनाशक तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमलेल्या श्री सुरेश ब्राम्हणकर, नासिक यांचे उपस्थीतीत व त्यांचे मार्गदर्शनाखाली मिटींग घेण्यात आली, काही सुचना करण्यात आल्या, उपस्थित निविदाकारांच्या शंकांचे निरसन करण्यात येवून त्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करण्यात आला. सदर मिटींगचे

इतिवृत्त मे.हुजुरांचे सेवेसी दि.०६/१२/२०१६ रोजी सादर करण्यात आले व सदर इतिवृत्त निविदेचा एक भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावरुन Upload करण्यात आले.

२५ **संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंज दुरुस्ती करणे व भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तांत्रीक लिफाफा उघडून त्यावर निर्णय घेणे.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-

२१ (१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे. "

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:-

१) मा.त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.३०० खालीलप्रमाणे आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची काम करणेसाठी येणा-या अंदाजे रु.१५,३८,८७०/- मात्रचे खर्चास, संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.

तसेच मा. खंडपीठाच्या आदेशास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१६ खालीलप्रमाणे आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅडजवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंजमधील दुरुस्तीची कामे करणेसाठी विविध पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली."

प्रस्तावना:- शिर्डी येथे श्री साईचे दर्शनासाठी येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ पै. मधे हेलीपॅड तयार करणेत आला आहे. तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू हेलीपॅडचे वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस सूचना दिल्या होत्या .

त्यानुसार संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज मधील खालील कामे करणेसाठी प्रस्ताव तयार करणेत आला होता.

०१. वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे
०२. वेटींग लाऊंज करीता ॲल्यु. स्लायडींग खिडक्या बसवणे
०३. अंतर्गत भिंतींना लस्टर पेंट करणे
०४. दरवाज्यांना आतिल व बाहेरील बाजुने लॅमीनेट लावणे
०५. जिप्सम बोर्ड फॉल्स सिलींग करणे.
०६. फ्लोरींग वर PVC मॅटीन टाकणे
०७. खिडक्यांना व्हिनीशिएन ब्लाईंडस् लावणे
०८. थ्रि सिटर सोफे खरेदी करणे
०९. ॲण्टी चेंबर बनविणे कामी एक्झिक्युटीव टेबल व खुर्ची खरेदी करणे .

मा. त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ५०७३/२०१५ दि.०५/०५/२०१५ अन्वये अर्ज सादर करण्यात आला होता. तथापी शासनाने दि.२८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समितीची सदस्याची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे, मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठित केलेल्या मा. त्रीसदस्य समितीचा कार्यकाल संपुष्टात आलेला असल्याने नव्याने गठीत झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा, विषय नं. ०२ निर्णय क्र. ५५६ अन्वये मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हिल अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत निर्णय समंत झाला. सदरहू निर्णयानुसार विधी विभाग यांनी त्यांचे

जा.क्र. एसएसएस/वशी-विधी/२१५८/२०१६, दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्राने सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालयातून मागे घेण्यात (Withdraw) आले असल्याचे कळविले आहे.

मौजे निमगांव को-हाळे गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज दुरुस्ती करणेसाठी जिल्हा दरसुची २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकानुसार रु.११,२८,१८१/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच वेटींग लाऊंज करीता वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२९,७५२/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार इकडील विभागाचे दि.२९/१०/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली. त्यानुसार ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली. दि. ०५/१२/२०१६ पर्यंतच्या ई-निविदा अपलोड करणेच्या मुदतीत फक्त एकच निविदा जमा झाल्याने सदरहु कामी ई-निविदा जमा करणेस दि.१५/१२/२०१६अखेर मुदतवाढ देणेत आली. तसेच टेक्नीकल बिड मधील कागदपत्र संस्थानकडे जमा करणेचे मुदतीत एकुण सहा ठेकेदारांनी ई-निविदा जमा केल्या आहेत. तसेच खालील पाच ठेकेदारांचे तांत्रीक माहितीचे लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

अ.न.	ठेकेदाराचे नाव	आवक नंबर	दिनांक
१	हेमंत जी. मुथा, राहुरी	१७३७९	०७/१२/२०१६
२	अनिल कुमार कन्सट्रक्शन, नाशिक	१८२४८	१७/१२/२०१६
३	आर. व्हि. कु-हाडे, नाशिक	१८२४७	१७/१२/२०१६
४	रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार बु.	१८२४६	१७/१२/२०१६
५	वामने विजय मच्छिंद्र, माळेवाडी	१८२१५	१६/१२/२०१६

तरी संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची कामे करणेसाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ई- निविदांचा तांत्रीक लिफाफा मा. स्थानीक उपसमिती सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंज दुरुस्ती करणे व भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तांत्रीक लिफाफा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आला. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२६ **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक येथे प्रतिक्षा हॉल मध्ये प्रवाशांकरीता आसन व्यवस्था करणेकामी स्टेनलेस स्टिल बॅचेंस खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा (Commerical Bid) उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमाचे कलम – १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता:- महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि. २००६/ ६०७/ (८७) का.सोळा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दि.१३/०१/२००९ अन्वये संस्थानतर्फे बस स्थानक बांधकामाकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे खर्चास शासन मान्यता देणेत आली आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.०२/०२/२०१६ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२९ अन्वये शिर्डी येथील सर्व्हे नं. १७१/१२ मधील बसस्थानकाच्या प्रतिक्षा हॉलमध्ये प्रवाशांकरीता स्टेनलेस स्टिलच्या आकर्षक बेंचेसची आसन व्यवस्था करणेत यावी, त्यासाठी विहित पध्दतीने ई निविदा मागविणेत यावे असे ठरले.

प्रस्ताव:- मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी येथील सर्व्हे नं. १७१/१२ मधील बसस्थानकाच्या प्रतिक्षा हॉलमध्ये प्रवाशांकरीता स्टेनलेस स्टिलच्या आकर्षक बेंचेसची आसन व्यवस्था करणेकामी (चतुर्थ मागणी) इकडील दि. १७/१०/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेणेत येवून दि.२४/११/२०१६ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी एकूण खालील ०९ पुरवठा धारकांनी निविदा अपलोड केल्या होत्या. व एका निविदाधारकाने फक्त हार्डकॉपी सादर केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

अ.नं.	निविदाधारकाचे नाव
०१	एस कम्फोर्ट सिटींग सिस्टीम, पुणे
०२	मे. खंडेलवाल ॲण्ड खंडेलवाल, जबलपूर

०३	पुजा आर्किटेक्चरल सिस्टीम प्रा. लि., मुंबई
०४	अरिहंत इंजिनिअरींग वर्क, औरंगाबाद
०५	कॉन-एअर इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे
०६	रिध्दी एन्टरप्रायजेस, नाशिक
०७	विपासा टेक्नो सिस्टीम्स प्रा. लि. औरंगाबाद
०८	आकाश फर्निटेक प्रा. लि. नागपूर
०९	प्रणव इंजिनिअर्स, चाकण
१०	रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर

उपरोक्त प्राप्त ई-निविदांचा तांत्रिक माहीतीचा लिफाफा क्र.१ दि.२८/११/२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेला आहेत. उघडण्यात आलेल्या ई - निविदांचे टेक्नीकल बीड मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली आहे तसेच मुख्य लेखाधिकारी यांनी सदरहू टेक्नीकल बीडचे पात्रता निकषाचे तुलनात्मक तक्त्यावर खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविला आहे.

" M/s. Khandelwal, Jabalpur यांनी NSIC चे Certificate जोडल्याने ते पात्र ठरतात. त्यामुळे एकूण तीन ठेकेदार पात्र ठरतील. मात्र M/s. Khandelwal, Jabalpur हे परराज्यातील ठेकेदार असल्याने त्यांचा L- 1आला तरी राज्यातील L- 2 ठेकेदार L – 1 दराने काम करण्यास तयार असल्यास त्याला ५०% काम दयावे लागेल. कामाचे स्वरुप व रक्कम विचारात घेता व स्पर्धा होण्यासाठी फेरनिविदा मागविण्यास हरकत नाही."

अ.न.	निविदाधारकाचे नाव	शेरा
०१	एस कम्फोर्ट सिटींग सिस्टीम, पुणे	ठेकेदार यांनी राष्ट्रीयीकृत बॅकेचा डी.डी. सादर न करता HDFC या बॅकेचा डी.डी. सादर केला आहे, त्यामुळे अपात्र आहे.
अ.न.	**निविदाधारकाचे नाव**	**शेरा**
०२	मे.खंडेलवाल ॲण्ड खंडेलवाल, जबलपूर	मा. मुख्य लेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार पात्र. मात्र हे परराज्यातील ठेकेदार असल्याने त्यांचा L- 1 आला तरी राज्यातील L – 2 ठेकेदार L- 1 दराने काम करण्यास तयार असल्यास त्याला ५०% काम द्यावे लागेल असे मा. मुख्य लेखाधिकारी यांनी नमूद केले आहे याबाबत इकडील विभागाचे मत असे आहे की, यापुर्वी बांधकाम विभागामार्फत इतर कामांसाठी करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या ठेकेदारांनी अशा प्रकारे EMD रक्कम न भरता इतर शासकीय विभाग अथवा सहयांचे प्रमाणपत्र सादर केले होते अशा ठेकेदारांच्या निविदा ग्राहय धरणेत आलेल्या नाहीत. सदर प्रचलीत कार्य पध्दतीनुसार मे. खंडेलवाल ॲण्ड खंडेलवाल,जबलपूर यांना अपात्र ठरविणे उचित होईल.
०३	पुजा आर्किटेक्चरल सिस्टीम प्रा. लि., मुंबई	ठेकेदार यांनी टेकनीकल बीड अपलोड केलेली नाही. त्यामुळे ते अपात्र आहे.
०४	अरिहंत इंजिनिअरींग वर्क, औरंगाबाद	पात्र
०५	कॉन-एअर इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे	ठेकेदार यांनी राष्ट्रीयीकृत बॅकेचा डी.डी. सादर न करता ICICI या बॅकेचा डी डी सादर केला आहे, त्यामुळे अपात्र आहे.
०६	रिध्दी एन्टरप्रायजेस, नाशिक	ठेकेदार यांनी पात्रता निकषानुसार ५.५० लक्ष रक्कमेचे दोन कामे पूर्ण केलेली नाही. फक्त एकच काम पूर्ण केलेले असल्याने, अपात्र आहे.
०७	विपासा टेक्नो सिस्टीम्स प्रा. लि. औरंगाबाद	पात्र
०८	आकाश फर्निटेक प्रा. लि. नागपूर	ठेकेदार यांनी राष्ट्रीयीकृत बॅकेचा डी.डी. तसेच पात्रता निकषातील अ.नं.४ व ५ चे प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे ते अपात्र आहे.
०९	प्रणव इंजिनिअर्स, चाकण	ठेकेदार यांनी बयाना रक्कमेचा डी.डी. तसेच पात्रता निकषातील अ.नं.४ प्रमाणपत्र सादर न केलेमुळे अपात्र आहे.
१०	रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर	ठेकेदार यांनी हार्डकॉपी सादर न केल्यामुळे अपात्र आहे.

उपरोक्त तपशिलानुसार अ.नं. ४ व ७ हे ठेकेदार पात्र आहेत. अ.नं. १ व ५ चे ठेकेदार यांनी निविदा किंमत व बयाना रक्कम यासाठी दिलेले खाजगी बॅकेचे डी डी स्विकारल्यास ते पात्र ठरतील. तसेच अ.नं. २ चे ठेकेदार यांचे पात्रतेबाबत पुढील आदेश होणेस विनंती. तसेच त्यानुसार पात्र ठेकेदारांचे Commercial Bid उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

सदरहू विषयावर चर्चा सुरु असताना उपसमिती सभेस अशी माहिती मिळाली की, काही बँका त्यांच्या नावासह शिर्डी बसस्थानकामधील प्रतिक्षा हॉलमध्ये आसन व्यवस्थेसाठी बँचेस देणगी स्वरुपात देणार आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बँकाकडून देणगी स्वरुपात मिळत असलेले बँचेसही इतरत्र वापरणेसाठी स्विकारणेत यावेत. तसेच शिर्डी बसस्थानक चालू झालेले असून प्रवाशांकरीता तेथील प्रतिक्षा हॉलमध्ये तातडीने आसन व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरीता प्रस्तावामध्ये खाजगी बॅकेचे डी.डी. दिल्यामुळे अपात्र करणेत आलेले ठेकेदारांचे खाजगी बँकांचे डी.डी. स्विकारणेत येऊन, त्यांना पात्र करणेत यावे व मा.व्यवस्थापन समितीची मान्यतेने सदरहू ई-निविदा उघडणेसाठी उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२७ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता करावयाच्या विकास कामाचे सादरीकरण Walk Through तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(१) मधील पोटकलम (ग) नुसार "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पूरविणे." अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- निर्णय क्र.८२७ दि.३०/११/२०१६

प्रस्तावना:- श्री क्षेत्र शिर्डी, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. समाधी शतक महोत्सवी वर्षानिमित्त शिर्डी मध्ये येणा-या साईभक्तांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली असून या समितीला सादर करावयाचा प्रारुप कृती आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर उपसमितीची द्वितीय बैठक दि.०६/१०/२०१६ रोजी मा.मुख्य सचिव, समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

सदरहू सभेत खालील निर्णय क्र.५ संमत झाला आहे.

" केंद्र शासनास सादर करावयाचा दिर्घ मुदतीचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान, राज्य शासन व केंद्र सरकार असा वेगवेगळा न करता एकत्रित स्वरुपात करण्यात यावा. कृती आराखडा तसेच शताब्दी महोत्सवाची माहिती सहज तथा सुलभतेने समजावी याकरीता दृकश्राव्य स्वरुपात दहा मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करण्यात यावी." असे ठरले.

याकामी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करतांना शिर्डी व श्री साईबाबा संस्थानबद्दल तसेच शताब्दी महोत्सव कालावधीत करावयाच्या विविध विकास कामे व नियोजनाबद्दल माहिती व्हावी यासाठी १० ते १२ मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) किंवा Walk Through बनविणेसाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.८२७ अन्वये याकामी येणा-या खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. संस्थानचे जावक क्रमांक ५२१६ दि.०६/०१/२०१७ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने अशाप्रकारचे काम करणा-या तीन कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेले कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No.	Name of Bidder	Inward No. & Date
01.	**ND's Art World Pvt. Ltd.,** 201-A, Ventura Central Avenue, Opp. D' Mart, Hiranandani Business Park, Powai, **Mumbai- 400076**	Received by email dtd.14/01/2017
02.	**Mr. Uday B. Kapre** Managing Director, Mathur & Kapre Associates Pvt. Ltd., A-14/9, Vasant Vihar, **New Delhi – 110067**	Received by email dtd.17/01/2017
03.	**IPLUS Media Solutions** 302, Shanti Kunj, S.No.41, Behind Jain Sthanak, Vadgaon Sheri, Pune - **411014**	Inward No.20371 dtd.16/01/2017

प्रस्तावित Walk Through बनविणेकामी प्राप्त झालेले अ.नं.०३ चे कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

Sr.No.	Name of Bidder	Quoted amount in Rs.
01.	**IPLUS Media Solutions** 302, Shanti Kunj, S.No.41, Behind Jain Sthanak, Vadgaon Sheri, Pune - **411014**	Rs 6,00,000/- + Taxes Extra (Extra- Rs 2500/- per second for animation film)
02.	**ND's Art World Pvt. Ltd.,** 201-A, Ventura Central Avenue, Opp. D' Mart, Hiranandani Business Park, Powai, **Mumbai- 400076**	**Rs 2,87,000/-** **(including all taxes)**
03.	**Mr. Uday B. Kapre** Managing Director, Mathur & Kapre Associates Pvt. Ltd., A-14/9, Vasant Vihar, **New Delhi – 110067**	Rs 4,50,000/- (Extra- Rs 3500/- per second for animation film)

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता करावयाच्या विकास कामाचे Walk Through सादरीकरण तयार करणेकामी ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांचे सर्व करांसहीत रु.२,८७,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२८ **संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२५ (पैकी) मधील साईनगर मैदानाचे उत्तर बाजुने चेनलिंक जाळीचे फेन्सिंग करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:- अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ मे, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १४४ (१) (३२) पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. "..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथिल स.नं.१२५ (पैकी) मधिल साईनगर मैदानाचे उत्तर बाजूने चेनलिंक फेन्सिंग करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,५९,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

प्रस्तावना:- उपरोक्त मान्यतेनुसार सदरहू कामासाठी खालील तपशिलाप्रमाणे निविदा/काटेशन मागविण्यात आले होते.

अ.क्र.	मागणी क्र. व मुदत	प्राप्त निविदांची संख्या
१	प्रथम निविदा मागणी – दि.२०/०७/२०१५ अखेर	००
२	द्वितीय निविदा मागणी – दि.०४/१२/२०१५ अखेर	००
३	प्रथम कोटेशन मागणी – दि.१२/०३/२०१६ अखेर	००
४	द्वितीय कोटेशन मागणी – दि.२७/०६/२०१६ अखेर	०१
५	तृतीय कोटेशन मागणी – दि.२४/११/२०१६ अखेर	००

या कामासाठी दोन वेळेस निविदा सूचना प्रसिध्द करुन एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यानंतर सदरचे काम हे रु.३ लक्षपेक्षा कमी रकमेचे असल्याने याकामी तीन वेळा कोटेशन मागविण्यात आले असता, तृतीय मागणीचे वेळेस एकुण ११ ठेकेदारांना कोटेशन पत्र पाठविणेत आले होते. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर कोटेशन मागणीबाबत प्रसिध्दी देणेत येऊन, दि.२४/११/२०१६ पर्यंत कोटेशन मागविणेत आले होते. परंतू सदरचे मुदतीत एकही कोटेशन प्राप्त झाले नसल्याने दि.०२/१२/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये एकुण १५ ठेकेदारांकडून तसेच संस्थानचे संकेतस्थावर कोटेशन मागणीपत्र प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेत आले असून, खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहे

१. जय डेव्हलपर्स, शिर्डी : १९३६३ / ३१.१२.२०१६
२. रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार : १९३६५ / ३१.१२.२०१६
३. सिध्देश्वर टी. मुरकुटे, शिर्डी : १९३६९ / ३१.१२.२०१६

विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
१	सिध्देश्वर टी. मुरकुटे, शिर्डी	२,३७,४९२/-
२	रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार	**२,३३,६२५/-**
३	जय डेव्हलपर्स, शिर्डी	२,५६,९५८/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२५ (पैकी) मधील साईनगर मैदानाचे उत्तर बाजुने चेनलिंक जाळीचे फेन्सिंग करणेकामी रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार यांचे एकत्रित रु.२,३३,६२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२९ **संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६(पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:- अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ मे, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १४४(१) (१०) खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथिल स.नं. १२४ (पैकी) व १२६ (पैकी)चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग व गेट बसविणेस व तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. २,५७,८२४/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तावनहजार आठशे चोवीस) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

प्रस्तावना:- उपरोक्त मान्यतेनुसार सदरहू कामासाठी खालील तपशिलाप्रमाणे निविदा/ कोटेशन मागविण्यात आले होते.

अ.क्र.	मागणी क्र. व मुदत	प्राप्त निविदांची संख्या
१	प्रथम निविदा मागणी – दि.२०/०७/२०१५ अखेर	००
२	द्वितीय निविदा मागणी – दि.०४/१२/२०१५ अखेर	००
३	प्रथम कोटेशन मागणी – दि.१२/०३/२०१६ अखेर	००
४	द्वितीय कोटेशन मागणी – दि.२७/०६/२०१६ अखेर	०१
५	तृतीय कोटेशन मागणी – दि.२४/११/२०१६ अखेर	००

या कामासाठी दोन वेळेस निविदा सूचना प्रसिध्द करुन एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यानंतर सदरचे काम हे रु.३ लक्षपेक्षा कमी रकमेचे असल्याने याकामी तीन वेळा कोटेशन मागविण्यात आले असता, तृतीय मागणीचे वेळेस एकुण ११ ठेकेदारांना कोटेशन पत्र पाठविणेत आले होते. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर कोटेशन मागणीबाबत प्रसिध्दी देणेत येऊन, दि.२४/११/२०१६ पर्यंत कोटेशन मागविणेत आले होते. परंतू सदरचे मुदतीत एकही कोटेशन प्राप्त झालेले नसल्याने दि.०२/१२/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये एकुण १५ ठेकेदरांकडून तसेच संस्थानचे संकेतस्थळावर कोटेशन मागणीपत्र प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेत आले असून, खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले अहेत.

१. जय डेव्हलपर्स, शिर्डी : १९३६४ / ३१.१२.२०१६
२. रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार : १९३६६ / ३१.१२.२०१६
३. सिध्देश्वर टी. मुरकुटे, शिर्डी : १९३६१ / ३१.१२.२०१६

विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	**कोटेशनधारकाचे नाव**	**कोटेशनमधील मुळ दर रु.**
१	सिध्देश्वर टी. मुरकुटे, शिर्डी	२,३७,८४३/-
२	रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार	२,३३,३३१/-
३	जय डेव्हलपर्स, शिर्डी	२,५३,९५७/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६(पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग करणेऐवजी तेथे चैनलींकची जाळी बसविणेत यावी, असे उपसमितीचे मत झाले. याकरीता सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन सुधारीत प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३० **संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा डेपो करीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी खरेदी कामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:- अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना :- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी व पोलचे मटेरीअल खरेदीकामी मा.त्रीसदस्य समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. २९८ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदणे, चैनलीक जाळीचे कंपाऊंड व गेटचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. १,३६,४६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".

वरीलप्रमाणेचे मान्यतेनुसार सप्लायर्स यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. सदरहू प्राप्त कोटेशन मा. उप समितीचे सभेत उघडण्यात आले असता दोनच सप्लायर्स यांनी कॉंक्रीट पोलचे दर दिल्याने सदरहु कोटेशन प्रक्रीया रद्द करुन फेर कोटेशन मागविण्यात यावे असे उपसमितीचे सभेत ठरले.

प्रस्ताव:- त्यानुसार सप्लायर्स यांचेकडून चेनलिंक जाळी खरेदीकामी जाक्र. ५२३९ दि.०९/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये फेर कोटेशन मागविणेत आले असून खालील सप्लायर्स यांनी कोटेशन सादर केले आहे.

अ.क्र.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	आवक नं. / दिनांक
०१	गौतम होर्डवेअर, कोपरगांव	२००७७ दि.११/०१/२०१७
०२	माहेश्वरी स्टील ट्रेडर्स,बाभळेश्वर	२००७६ दि. ११/०१/२०१७
०३	श्री साईबाबा ट्रेडर्स, कोपरगांव	२००७५ दि.११/०१/२०१७
०४	साई माऊली, निघोज	२००७८ दि. ११/०१/२०१७
०५	साई सार्थक ट्रेडर्स, साकुरी	२००७९ दि.११/०१/२०१७
०६	कृष्णा ट्रेडर्स, साकुरी	२०००८० दि. ११/०१/२०१७

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	कृष्णा ट्रेडर्स, साकुरी	२७,५००/-
०२	श्री साईबाबा ट्रेडर्स, कोपरगांव	२८,७५०/-
०३	साई सार्थक ट्रेडर्स, साकुरी	**२७,०००/-**
०४	साई माऊली, निघोज	२८,८७५/-
०५	गौतम होर्डवेअर, कोपरगांव	३१,२१२/-
०६	माहेश्वरी स्टील ट्रेडर्स,बाभळेश्वर	२८,३५५/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा डेपो करीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी खरेदी करणेसाठी साई सार्थक ट्रेडर्स, साकुरी यांचे एकत्रित रु.२७,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३१ **संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा डेपो करीता संरक्षण भिंत करणेकामी कॉंक्रीट पोल खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना :- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता संरक्षण भिंत करणेकामी चैनलिंक जाळी व पोलचे मटेरीअल खरेदीकामी मा.त्रीसदस्य समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. २९८ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ पै. मध्ये घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदणे, चैनलीक जाळीचे कंपाऊंड व गेटचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. १,३६,४६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".

वरीलप्रमाणेचे मान्यतेनुसार सप्लायर्स यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. सदरहू प्राप्त कोटेशन मा. उप समितीचे सभेत उघडण्यात आले असता दोनच सप्लायर्स यांनी कॉंक्रीट पोलचे दर दिल्याने सदरहु कोटेशन प्रक्रीया रद्द करुन फेर कोटेशन मागविण्यात यावे असे उपसमितीचे सभेत ठरले.

प्रस्ताव :- त्यानुसार सप्लायर्स यांचेकडून कॉंक्रीट पोल खरेदीकामी जाक्र. ५२३८ दि.०९/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये फेर कोटेशन मागविणेत आले असून खालील सप्लायर्स यांनी कोटेशन सादर केले आहे.

अ.क्र.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	आवक नं. / दिनांक
०१	कृष्णा टेडर्स, साकुरी ता. राहाता	२००७३/११/०१/२०१७
०२	श्री साईबाबा ट्रेडर्स, कोपरगांव	२००७१/११/०१/२०१७
०३	वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी ता. राहाता	२००७४/११/०१/२०१७
०४	साई माऊली, निघोज	२००७२/११/०१/२०१७

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	कृष्णा ट्रेडर्स, साकुरी	२०,८२५/-
०२	श्री साईबाबा ट्रेडर्स, कोपरगांव	१८,४४५/-
०३	वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी ता. राहाता	२२,५२५/-
०४	साई माऊली, निघोज	**१३,०९०/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौज निमगांव को-हाळे गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा डेपो करीता संरक्षण भिंत करणेकामी कॉंक्रीट पोल खरेदीकामी साई माऊली, निघोज यांचे एकत्रित रु.१३,०९०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

तसेच घनकचरा टाकणेची समस्या सुटावी, याकरीता सावळीविहीर फाटयाजवळील दगडाच्या खाणींचा वापर करता येईल का, याचा पुर्ण अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३२ **मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र.१ येथे ACP Sheet मध्ये बॅकलीट बोर्ड तयार बसविणेसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये "भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे."

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय: दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८३० खालील प्रमाणे समंत झालेला आहे.

"... मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र. १ येथे साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ACP Sheet मध्ये बॅकलीट बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.."

प्रस्तावना:- मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र. १ चे विस्तारीकरण व इंटेरियरचे काम पूर्ण करणेत आले असून, सदर कार्यालयाचे ठिकाणी साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी व इच्छुक देणगीदार भक्तांना देणगी कार्यालय लगेच दिसून येणेकामी तसेच बॅकलीट बोर्डमुळे रात्रीच्या वेळीही ठळकपणे दिसून येण्यासाठी सदर ठिकाणी देणगी कार्यालय (Donation Office) या मजकुराचा बोर्ड ACP Sheet मध्ये फ्रेमसह बॅकलीट स्वरुपाचा तयार लावणे गरजेचे आहे. याकामी रक्कम रु.७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे

प्रस्ताव:- विषयांकीत कामासाठी वर नमूद निर्णयानुसार इकडील जा.नं.४९५७/२०१६, दि.२३/१२/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	पुरवठादाराचे नांव	आवक क्र./ दिनांक
०१	आर डी आर्टस्, शिर्डी	१८८५५/२४-१२-२०१६
०२	सोमवंशी एम.जी., राहाता	१८८५७/२४-१२-२०१६
०३	Motif Graphics pvt.ltd., Mumbai	दि.२४/१२/२०१६ रोजीचा मेल.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	आर डी आर्टस्, शिर्डी	६७,९००/-
०२	सोमवंशी एम.जी., राहाता	**६७,०००/-**
०३	मोटीफ ग्राफिक्स प्रा.लि., मुंबई	७९,४५०/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र.१ येथे ACP Sheet मध्ये बॅकलीट बोर्ड तयार करुन बसविणेसाठी सोमवंशी एम.जी., राहाता यांचे एकत्रित रु.६७,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३३ **साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेसाठी डयुनियन कंपनीचे फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमाचे कलम– २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.''

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-

१) १९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६६० खालील प्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

" साईनिवास अतिथीगृह येथील मा. अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."

२) ०७/११/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.०९ खालील प्रमाणे संमत करण्यात आलेला *आहे.*

" साईनिवास अतिथीगृह येथे मा. अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्थेकामीचे फर्निचर आकर्षक असावे, असे समितीचे मत झाले. डयुरीयन कंपनीचे फर्निचर दिसायला आकर्षक आहेत, परंतु त्यासाठी फक्त दोनच कोटेशन्स आलेले आहेत. यामुळे सदरहू कोटेशन प्रक्रीया रद्द करणेत येऊन, डयुरीयन कंपनीचे फर्निचर खरेदी करणेकामी नव्याने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीचे शिफारस आहे."

प्रस्तावना:- उपरोक्त निर्णयानुसार साईनिवास अतिथीगृह येथे मा. अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेसाठी डयुरीयन कंपनीचे फर्निचर खरेदी करणेकामी फेर कोटेशन्स मागविणेत आले आले आहेत.

प्रस्ताव:- त्यानुसार डयुरीयन कंपनीचे एकूण १० पुरवठादार यांचेकडून इकडील जा.नं.४८४२/२०१६, दि.१४/१२/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी खालील प्रमाणे ०१ सिलबंद कोटेशन व ०२ पुरवठादार यांनी मेल पाठविले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	पुरवठादाराचे नांव	आवक क्र./ दिनांक
०१	Durian Industries Ltd., Surat	१८९४१/२६.१२.२०१६
०२	Durian Industries Ltd., pune (Wakad Showroom)	दि.१५/१२/२०१६ रोजीचा मेल.
०३	Durian Industries Ltd., pune (Hadapsar Showroom)	दि.१५/१२/२०१६ रोजीचा मेल.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	Durian Industries Ltd., Surat	**८१,०११/-**
०२	Durian Industries Ltd., pune (Wakad Showroom)	८६,१८५/-
०३	Durian Industries Ltd., pune (Hadapsar Showroom)	१,७९,३००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेसाठी डयुनियन कंपनीचे फर्निचर खरेदी करणेकामी Durian Industries Ltd., Surat यांचे एकत्रित रु.८१,०११/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३४ **साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर माहिती व दिशादर्शक फलक बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतुद:

अधिनियम कलम २१(१) च्या खंड (ग) अन्वये समितीकडून, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे", अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.३०३ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईचे दर्शनासाठी येणारे साई भक्तांच्या मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्याचे बाजुस विविध ठिकाणी संस्थान सुविधांबाबत माहितीचे दिशादर्शक बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.''

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८११ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, साई भक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर माहिती व दिशादर्शक फलक लावणेकामी श्री. एस. जी. गायकवाड, राहाता यांचे रु.१,००,०००/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

प्रस्तावना: मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात येऊन त्या मा. त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार निम्नतम दराचे ठेकेदार श्री. एस. जी. गायकवाड, राहाता यांना इकडील जा.क्र.३८३८/२०१४, दि.१४/११/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आला. तथापि, सदरचे काम करणेस ठेकेदार असमर्थ ठरल्याने त्यांची जमा असलेली सुरक्षा रक्कम जप्त करुन याकामी फेर निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी दि.११/०५/२०१५ ते दि.२१/०५/२०१५ अखेरपर्यंत निविदा विक्रीचा कालावधी देणेत आला होता. सदरचे विहीत मुदतीत तिन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेऊन, याकामी फक्त दोनच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहे. सदरहू कामी स्पर्धात्मक दर प्राप्त होणेचे दृष्टीचे किमान ०३ निविदांची आवश्यकता असल्याने, सदरच्या सिलबंद निविदा दि.१५/०६/२०१५ रोजीचे मंजुरीने संबंधितांना परत करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. भांखस-२०१४ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई दि.३०/१०/२०१५ मधिल अ. नं.१० नुसार सदरचे काम रु.३ लक्ष पेक्षा कमी रकमेचे असलेने सदरहू कामी इकडील दि.१०/०२/२०१६ रोजी मंजूर टिपणी अन्वये जा. नं.६४९८/२०१६ दि.२६/०२/२०१६ रोजीचे कोटेशन मागणी पत्रान्वये एकुण १८ ठेकेदारांकडून कोटेशन मागविणेत आले होते. परंतू एकही ठेकेदाराने कोटेशन सादर केलेले नाहीत. त्यानंतर दि.३१/०८/२०१६ रोजीचे मान्यतेनुसार याकामी फेर १९ ठेकेदारांकडून इकडील जा. नं.३२९०/२०१६ दि.२६/०९/२०१६ रोजीचे कोटेशन मागणी पत्रान्वये कोटेशन मागविणेत आले असून,खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

१.	रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर	: १२९४९ / १४.१०.२०१६
२.	श्रीनिवास श्री माणिकप्रभु एन्टरप्राईजेस्, नांदेड	: १५२४६ / १०.११.२०१६
३.	मोटीफ ग्राफीक्स प्रा. लि., मुंबई	:१५६९७/१६.११.२०१६
४.	सोमवंशी एम. जी., राहाता	: १८७६९ /२२.१२.२०१६

प्रस्ताव : तरी विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर माहिती/ दिशादर्शक फलक रेडीयमचे असावेत तसेच निळया रंगाचा फलक व त्यावर पांढऱ्या रंगाची अक्षरे असावीत, असे समितीचे मत झाले. त्यामुळे सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन सुधारित प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३५ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनिअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद: अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७५ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना: श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी येणारे अंदाजे रु.९९,३३७/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील मान्यतेनुसार याकामी इकडील जा.क्र.५३२६/ २०१७ दि.१६/०१/२०१७ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने एकुण ०९ ठेकेदारांना कोटेशन मागणीपत्र देऊन, कोटेशन मागविणेत आले होते. त्यानुसार खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

अ.नं.	कोटेशन सादरकर्त्यांचे नांव	आवक नंबर/दिनांक
०१.	विमल ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास, कोपरगांव	२०७८६ / १९.०१.२०१७
०२.	यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव	२०७८७ / १९.०१.२०१७
०३.	विशाल एन्टरप्राईजेस्, कोपरगांव	२०७९० / १९.०१.२०१७
०४.	श्री साईकरणी मॉ फर्निचर, शिर्डी	२१२१० / २४.०१.२०१७
०५.	रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फेब्रीकेशन, श्रीरामपूर	२१२११ / २४.०१.२०१७
०६.	ॲल्युमिना कन्सेप्ट, नाशिक	२१४०३ / २५.०१.२०१७
०७.	श्री दुर्गा ग्लास ॲण्ड हार्डवेअर, नाशिक	२१४२१ / २६.०१.२०१७

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०७ सिलबंद सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.
०१	यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव	८४,८१३/- (ॲल्युमिनीयम विंडोसाठी दर दिलेले नाही.)
०२	विमल ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास, कोपरगांव	८७,३९१/-
०३	रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फेब्रीकेशन, श्रीरामपूर	९१,०५२/- (ॲल्युमिनीयम विंडोसाठी दर दिलेले नाही.)
०४	श्री साईकरणी मॉ फर्निचर, शिर्डी	७२,९४५/- (ॲल्युमिनीयम विंडोसाठी दर दिलेले नाही.)
०५	श्री दुर्गा ग्लास ॲण्ड हार्डवेअर, नाशिक	**८१,०४०/-**
०६	ॲल्युमिना कन्सेप्ट, नाशिक	९४,४१२/-
०७	विशाल एन्टरप्राईजेस्, कोपरगांव	८५,४३२/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनिअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी श्री दुर्गा ग्लास ॲण्ड हार्डवेअर, नाशिक यांचे एकत्रित रु.८१,०४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३६ **झेरॉक्स मशिन खरेदीकामी प्राप्त निविदेमधील तांत्रिक लिफाफे (Technical Bid) उघडणेबाबत.**

(अ) संस्थानचे दैनंदिन झेरॉक्सच्या कामासाठी खालील वर्णनाचे/क्षमतेचे एक नग अद्यावत नामांकित कंपनीचे झेरॉक्स मशीन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

अ. क्र.	मशिनचा तपशिल	वर्णन/क्षमता	संख्या	अंदाजे दर प्रती नग (सर्व करांसह)
०१.	Digital Multifunctional Copier- Machines	**55PPM,** Print – **1200 X 1200dpi**, Copy/Print/Scan, DADF Duplex, 200 Sheet Single Pass Doc Handler,	०१ नग	रु.५,००,०००/-

		100 Sheet bypass, 400 Sheet OCT, 3 X 500 Sheet Trays, 3600 Sheet tandem Tray, Scan to Email/NW/USB, Text Searchable PDF/A, PS3, PCL6, Internet Fax, Standard Accounting, **Hard Disk-** Minimum 250GB, **Processor-** 1GHz-Dual Core, **Memory -** 2GB, High Speed USB 2.0 direct print, Optional Wi-Fi (with USB Wireless Adapter) Warranty – 1 years. 1 year free service (without Meterial)		

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६८ अन्वये *"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे दैनंदिन झेरॉक्स कामासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे ०१ नग अद्यावत झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".*

सदर खरेदीकामी अंदाजे रु.५,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने संदर्भीय शासन नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे असल्याने झेरॉक्स मशिन्स खरेदीकामी इकडील कार्यालयाकडील दि.०७.०९.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

अ.नं.	कार्यवाहीचा तपशिल	दिनांक/कालावधी
०१.	वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी	दि.२८-२९/०९/२०१६
०२.	वेबसाईटवर ई-निविदा प्रसिध्द करण्याची दिनांक व वेळ	दि.२९/०९/२०१६ सकाळी ११.०० वा.
०३.	ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ	दि.०८/१०/२०१६ सायं.०५.०० वा.
०४.	तांत्रिक निविदा प्रत्यक्ष स्विकारण्याची दिनांक व वेळ	दि.१०/१०/२०१६ सकाळी ११.०० वा. ते दि.१२/१०/२०१६ सायं.०५.००वा. पावेतो
०५.	तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक	दि.१५/१०/२०१६ सकाळी ११.०० वा.

संदर्भीय शासन नियमावलीनुसार प्रस्तावित को-या ई-निविदेची किमंत रु.२,०००/- मात्र व बयाणा रक्कम रु.१०,०००/- मात्र ठेवणेत आलेली होती.

(ब) मात्र मुदतीअंती फक्त एकाच निविदाधारकाकडून तांत्रिक लिफाफा सादर करण्यात आलेला होता. तसेच दि.१५.१०.२०१६ रोजी ऑनलाईन निविदांची पाहणी केली असता, त्यामध्येही फक्त एकाच निविदाधारकाची निविदा प्राप्त झालेली होती. संदर्भीय शासन नियमावलीनुसार एकाच निविदाधारकाची निविदा प्राप्त झाल्यास त्याबाबत काहीही निर्णय घेता येत नाही. त्यामुळे पुन्हा निविदा प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त आहे.

(क) मात्र ई-निविदा प्रसिद्ध केल्यानंतर काही वितरकांनी निविदेमध्ये नमुद वर्णन/क्षमतेबाबत (Specification) प्रश्न/शंका उपस्थित करुन, निविदेमध्ये नमुद वर्णनाप्रमाणे झेरॉक्स मशिन कोणत्याही कंपनीकडून उपलब्ध होऊ शकत नाही, सदर वर्णनाचे झेरॉक्स मशिन घेतल्यास त्याची किमंत खुप जास्त राहील, कारण ते assignable करावे लागेल, असे दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे.

(ड) त्यामुळे अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक येथील झेरॉक्स मशिनची विक्री अथवा उत्पादन करणा-या वेगवेगळ्या कंपन्यांचे अधिकृत वितरकांशी दुरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष चर्चा करुन, संस्थानची आवश्यकतेनुसार सर्व कंपन्याकडे उपलब्ध असणारे झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत चर्चा करुन, त्यांचेकडून सर्व संमतीने सर्वसमावेशक असे वर्णन घेण्यात आले. तसेच संस्थानचे झेरॉक्स ऑपरेटर यांनी सदरचे वर्णनाचे अवलोकन करुन, दैनंदिन कामकाजाचे सोईच्या दृष्टीने झेरॉक्स मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे वर्णन निश्चित केलेले आहे.

अ.क्र.	मशिनचा तपशिल	वर्णन/क्षमता	संख्या	अंदाजे दर प्रती नग (सर्व करांसह)
०१.	Xerox Machine	Copy Speed - **50PPM & above** Print Resolution– **600 X 600 dpi**, A3 Multifunction - **Copy/Print/Scan**, ARDF Duplex, 4 Trays (500 Sheet), 100 sheets by pass, Scan to Function – Email/NW/USB	०१ नग	रु.५,००,०००/-

		Warranty – 1 year. 1 year free service (without Material) Local service support		

सबब उपरोक्त **"अ" "ब" "क"** व **"ड"** चे अवलोकन करता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५६८ नुसार उपरोक्त परिच्छेद **"ड"** मध्ये नमुद केलेल्या वर्णनाचे झेरॉक्स मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस इकडील कार्यालयाकडील दि.१६.१२.२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे.

अ.नं.	**कार्यवाहीचा तपशिल**	**दिनांक/कालावधी**
०१.	वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी	दि.१८-१९/०१/२०१७
०२.	वेबसाईटवर ई-निविदा प्रसिध्द करण्याची दिनांक व वेळ	दि.१८/०१/२०१७ सकाळी ११.०० वा.
०३.	ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ	दि.२८/०१/२०१७ सायं.०५.०० वा.
०४.	तांत्रिक निविदा प्रत्यक्ष स्विकारण्याची दिनांक व वेळ	दि.३०/०१/२०१७ सकाळी ११.०० वा. ते दि.३१/०१/२०१७ सायं.०५.००वा. पावेतो
०५.	तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक	दि.०३/०२/२०१७ सकाळी ११.०० वा.
०६.	मुळ निविदा (Commercial) उघडणे दिनांक	पुढील मा.व्य.समितीचे सभेत

शासन नियमावलीनुसार प्रस्तावित को-या ई-निविदेची किमंत रु.२,०००/- मात्र व बयाणा रक्कम रु.१०,०००/- मात्र ठेवणेत आलेली तांत्रिक निविदेसोबत बयाणा रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार) मात्र व निविदा किमंत रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्रचे डी.डी. तसेच दुकान नोंदणी दाखला, सेल्स टॅक्स/सेंट्रल सेल्स टॅक्स नोंदणी दाखला, व्हॅट/टीन नंबर, पॅनकार्ड कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबत प्रमाणपत्र वगैरे कागदपत्रांची ऑनलाईन स्कॅन करुन Soft Copy व दि.३०/०१/२०१७ ते दि.३१/०१/२०१७ पर्यंत तांत्रिक कागदपत्रांची प्रत्यक्ष मागणी करण्यात आलेली आहे.

झेरॉक्स मशिन खरेदीकामी दि.१७.०१.२०१७ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करुन, उपरोक्त नमुद कालावधीमध्ये सदरची ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

मुदतीअंती खालील निविदाधारकांकडून प्रत्यक्ष Technical Bid प्राप्त झालेल्या आहेत.

अ.क्र.	**निविदाधारकांचे नांव**	**आवक क्रमांक व दिनांक**
०१.	Aspire Techno build, Pune	२१७७२/३०.०१.२०१७
०२.	ओम साई मार्केटींग, औरंगाबाद	२१७७३/३०.०१.२०१७
०३.	ASZ इन्फोटेक, नाशिक	२१७७४/३०.०१.२०१७
०४.	इंन्टीग्रेटड सिस्टीम, नाशिक	२१७७५/३१.०१.२०१७

मागणी- उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेमधील Online व प्रत्यक्ष प्राप्त झालेले तांत्रिक लिफाफे (Technical Bid) मा.व्यवस्थापन उप समितीचे सभेत उघडून, त्यातील कागदपत्रांची लेखाशाखेमार्फत तपासणी करुन, ज्या निविदाधारकांनी मागणीप्रमाणे कागदपत्रे सादर केलेले असतील त्यांच्या निविदा पात्र धरुन, अशा पात्र निविदेचे Commercial/Financial Bid मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून अंतिम निर्णय घेता येईल.

तरी उपरोक्त नमुद निविदाधारकांच्या निविदेतील Online व प्रत्यक्ष प्राप्त झालेल तांत्रिक लिफाफे (Technical Bid) उघडून निर्णय होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशिन खरेदीकामी प्राप्त निविदेमधील तांत्रिक लिफाफे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२)

---

३७ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(१) उपसमिती सभेसमोर वारंवार वेगवेगळे साहित्य खरेदी करणेबाबतचे प्रस्ताव येत असतात. परंतु पुर्वीचे साहित्य कधी खरेदी केलेले आहे, त्याची क्षमता किती आहे, याचा उल्लेख प्रस्तावामध्ये आढळून येत नाही. याकरीता ज्या विभागांना वेळोवेळी साहित्य खरेदी करणेची आवश्यकता असते, अशा विभागांनी History Book ठेवावे. (कार्यवाही- सर्व अधिक्षक/ विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **दिनांक १७.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.१३७ दिनांक १७.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

१. श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करताना रेडीएशन पासून संरक्षण होणेकामी Lead Appron, Gown व Thyriod Sheild वापरतात. श्री साईनाथ रुग्णालयाचे जनरल ओ.टी. विभागात ३ नग Lead Gown असून ते वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे जनरल ओ.टी. विभागाने दि.१३/१०/२०१४ रोजीचे मागणी पत्रान्वये Lead Gown व Thyriod Sheild ची मागणी केलेली आहे. तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात सध्या ४ नग असून ते वापरुन खराब झालेले आहे. तसेच सदरची संख्या देखील कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी दिनांक १९/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदरहू Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३,०३,४५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१८/०२/२०१५ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३०(२७) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरिता Lead Appron, Gown व Thyriod Sheild विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.३,०३,४५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.१५/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०२/०७/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Nature's Global Service,New Delhi	29/06/2015
2	M/s. Austin Healthcare, Pune	03/07/2015
3	M/s. Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai	04/07/2015

उपरोक्त पैकी अ.नं. २ व ३ यांच्या निविदा मुदतीनंतर प्राप्त झालेल्या होत्या, परंतु तुलनात्मक दृष्टया त्याचा फायदा होऊ शकेल. त्यामुळे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा दि.०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आल्या होत्या. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यांच्या कमर्शियल निविदा उघडण्यात आलेल्या नव्हत्या कारण रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने दि.१९/०९/२०१५ रोजी Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे दि.१०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी दि.०३/११/२०१५ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा फेर ई– निविदा मागविण्यास मान्यता घेऊन सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद– मुंबई या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरील प्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई- मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Austin Healthcare, Pune	29/01/2016

उपरोक्तप्रमाणे खरेदीस एकच निविदा प्राप्त झालेली होती, तसेच खरेदीकामी तुलनात्मक तक्ता मिळणेचे दृष्टीने कमीत कमी ३ निविदाची आवश्यकता असते. त्यामुळे दि.०९/०२/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये उपरोक्त Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी तिस-यांदा फेर ई - निविदा मागविण्यास मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. निविदा विक्रीची मुदत दि.११/०७/२०१६ ते २५/०७/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२८/०७/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन सदरचे खरेदीकामी ३ तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ई-निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२. **श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ४ बॉडीची क्षमता असलेले मॉरच्युरी कॅबीनेट सन २००४ साली रु.१,२८,०१८/- इतक्या रुपयात देणगी मिळालेले होते, परंतु सदर मॉरच्युरी कॅबीनेट हे जुने झालेले आहे. सध्या त्याची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.३७,९६८/- इतकी आहे. तसेच त्याची क्षमता कमी पडते. त्यामुळे जुने कॅबीनेट परत करुन (Buyback) नवीन कॅबीनेट खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. उपरोक्त मॉरच्युरी कॅबीनेट खरेदीकामी अंदाजे रु.५,६८,१२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं.३३ निर्णय क्र.३७६ अन्वये 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.५,६८,१२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सामना - औरंगाबाद, पुढारी – पुणे, लोकशाही वार्ता – नागपूर, Free Press या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.२२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे Open होऊ शकल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि २३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिपणीअन्वये औषध भांडार विभागास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत Free Press–Mumbai, प्रहार – मुंबई या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दि. २३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतू IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे वरील "अ" तक्त्यातील तारखेप्रमाणे सदर ई- निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध होऊ शकल्या नव्हत्या. त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि.०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि. ०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि०२/१०/२०१३ रोजीच संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे ब-याच निविदाधरकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई–निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर जाहिरात देण्यात येऊन दि.३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्या निविदाधारकांनी पहिल्या जाहिरातीस अनुसरुन निविदा सादर केल्या होत्या त्यांना पुन्हा फक्त कमर्शियल निविदा Online सादर करणेबाबत दि.१३/११/२०१३ रोजीचे ई-मेल पत्रान्वये कळविण्यात आले होते. कारण त्यांनी तांत्रिक निविदेचे बंद पाकिट सादर केलेले होते परंतू काही निविदा धारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन Online निविदा सादर केलेली नव्हती. सुरुवातीच्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा व नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि.०५/१२/२०१३ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. तसेच ज्या निविदाधारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन कमर्शियल निविदा सादर केल्या आहे किंवा कसे याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती, परंतु काही निविदाधारकांनी त्या Online सादर केल्या नाहीत.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या आहे, त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असा प्रस्ताव दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ४६९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई – निविदा मागील आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला

असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळ्या सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे.

त्यापैकी रु. १० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणा-या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन निविदा / ई – निविदांची मागणी करणेत यावी असे ठरले आहे. तसेच यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा / वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंदाजे दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले होते.

त्यानुसार 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर – मुंबई, सार्वमत – श्रीरामपुर, पुण्यनगरी – नाशिक, पुढारी– पुणे या वर्तमान पत्रात देऊन निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०२ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

Sr. No.	Name of Tenderer	Received Date
01.	M/s. J.K.Sales & Services, Aurangabad	23/09/2014
02.	M/s. Siddhi Medical, Aurangabad	23/09/2014

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे वरील खरेदीकामी पुन्हा फेरनिविदा मागविण्याच्या प्रस्तावास दि.०७/१०/२०१४ रोजीच्या मंजूर टिप्पणीन्वये मान्यता घेऊन आपला वार्ताहर मुंबई, पुढारी – पुणे, दिव्य मराठी - नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन – अहमदाबाद, हितवाद – नागपूर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात खालीलप्रमाणे ०१ सिलबंद निविदा प्राप्त झालेली होती.

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Austin Health Care, Pune	19/02/2015

परंतु तिस-यांदा दिलेल्या फेर जाहिरातीस अनुसरुन देखील एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या दोन निविदा अशा एकूण 0३ सिलबंद तांत्रिक निविदा मा. उप समिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडून निर्णय घेणेकामीचा प्रस्ताव दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.४०२ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी तिस-या वेळेस ई-निविदांची मागणी करुनही एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे ही निविदा उघडणेत येऊन, त्यामधील दर स्विकारणे क्रमप्राप्त आहे, परंतु स्पर्धात्मक दर मिळविणेकरीता मागील निविदांचा विचार करता येऊ शकतो का, याची खात्री करणेत येऊन, उपसमितीचे सभेसमोर सदरहू निविदा उघडणेत याव्यात, असे ठरले होते.

परंतु रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे कळविले होते. त्यामुळे सदर 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी दि.२३/१२/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११/०७/२०१६ ते २५/०७/२०१६ पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती, तर दि.२८/०७/२०१६ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण १३२ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०२ निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२६/०७/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०१/०८/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली तर दि.०२/०८/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०८/०८/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.
तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ई-निविदा खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी हि विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुगणालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज मे.बीव्हीजी इंडिया लि. पुणे यांना दि.२१/०१/२०१३ आदेशान्वये १ वष कालावधीसाठी देण्यात आले होते. सदर कामाची मुदत संपल्याने त्यांना २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील निविदा प्रक्रिया पुर्ण न झाल्याने दि.२८/०४/२०१४ चे मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने पुर्वीच्या अटी-शर्तीस अधिन राहून आहे त्याच मंजुर दरामध्ये सदर कामास नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यानच्या काळात दि.०३/०२/२०१४ ते १५/०२/२०१४ व १५/०५/२०१४ ते ३०/०५/२०१४ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. परंतु दोन्ही ई-निविदे प्रक्रियेत दोनच निविदा प्राप्त झाल्याने फेर निविदा करण्याचे ठरले.

दि.१०/१२/२०१४ रोजीच्या मंजुर टिपणीनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल करीता वाढीव २२ कर्मचारी व श्री साईनाथ रुग्णालया करीता वाढीव ६ कर्मचारी असे दोन्ही रुग्णालयाकरीता १२५+२८ असे एकुण १५३ कर्मचारी पॉईन्टची मान्यता मिळाली. सदर विषय मा.त्रिसदस्य समितीच्या दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर केला असता "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या स्वच्छतेचे काम यांत्रीकीकरणासह आऊटसोर्स पध्दतीने देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद, खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी." असा निर्णय झाला होता. परंतु नव्याने मा.व्यावस्थापन समिती गठीत झाल्याने सदरचा सिव्हील अर्ज मागे घेण्यात आला.

सध्या दोन्ही रुग्णालयाकरीता सन २०१३-१४ करीताचे कंत्राटदारच १२५ कर्मचारी पॉईन्टवर स्वच्छतेकामी आवश्यक असणारे केमीकल्स व आवश्यक साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१२,२२,८२०/- (अक्षरी रु. बारा लाख बावीस हजार आठशे वीस मात्र) प्रमाणे काम करत आहे. सदर कंत्राटदारने किमान वेतनात व केमीकल किंमतीत वाढ झाल्याने वाढीव रकमेची मागणी केलेली होती. त्यामुळे नविन निवदा प्रक्रियेसाठी सदर रकमेमध्ये २५ टक्के वाढ ग्राहय धरल्यास दोन्ही रुग्णालयाचे यांत्रीकीकरणासह स्वच्छते कामी एकुण १५३ कंत्राटी कर्मचारी व आवश्यक साहित्यासह/सामुग्रीसह एक वषासाठीचा ठेका दिल्यास प्रति महिना अंदाजे रक्कम रु.१८,७०,९१४/- पुर्णांकित १९,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. याप्रमाणे (वार्षिक रक्कम रु.२,२८,००,०००/-) अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०८ निर्णय क्र.६६५ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करून घेणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,२८,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरकामी अहमदनगर, औरंगाबाद, मुंबई, पुणे व नाशिक या शहरात शासकिय दराने जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर ई-निविदाबाबतची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदेचे ऑनलाईन कागदपत्रे दाखल करण्याची मुदत दि.१६/१२/२०१६ ते दि.०३/०१/२०१७ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. परंतु दि.०३/०१/२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in हे संकेतस्थळ काही काळ बंद पडल्याने अनेक निविदाधारकांना निविदा भरण्यास अडचण आल्याने त्यांनी दूध्वनीवरून कळविले. त्यामुळे निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने मा.प्रशासकीय अधिकारी यांच्या मान्यतेने एका आठवड-याची मुदत वाढ दि.११/०१/२०१७ पर्यंत देण्यात आली होती. त्यानुसार ऑनलाईन ०८ निविदा आलेल्या आहेत. परंतु श्री साईबाबा हॉस्पिटकडे प्रत्यक्षात खालील ०९ निविदाधारकांच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.नं	निविदाधारकाचे नावे	प्राप्त ठिकाण व दिनांक
१	एम.पी इंटरप्रायसेस अॅन्ड असोसिएटस लि. पुणे	श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०३/०१/२०१७
२	बी. व्ही.जी इंडिया लि. पुणे	सामान्य प्रशासन विभाग दि.०३/०१/२०१७
३	श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई	मुंबई कार्यालय दि.०४/०१/२०१७
४	अप-शॉट युटीलीटी सर्व्हीसेस, चेन्नई	श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०५/०१/२०१७
५	गोल्डन हॉस्पिटॅलीटी सर्व्हीसेस, मुंबई	मुंबई कार्यालय दि.०५/०१/२०१७
६	स्पिक-एन- स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई	श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०७/०१/२०१७
७	सीएलआर फॅसीलीटी सर्व्हीसेस, पुणे	श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०७/०१/२०१७
८	सिग्मा टेक. सोलुशन इंडिया लि. पुणे	सामान्य प्रशासन विभाग दि.०७/०१/२०१७
९	सुमित फॅसीलीटी, पुणे	सामान्य प्रशासन विभाग दि.१०/०१/२०१७

तरी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करून घेणेकामी प्राप्त ०९ निविदाधारकांच्या हार्ड कॉपी तांत्रिक ई-निविदा उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुगणालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

४. **श्री साईबाबा रुग्णालयातील पेडीयाट्रीक FGW व CRU-1 या विभागाकरीता Dressing Drum (Size Big) खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील FGW **या** विभागाने ०३ नग **व** CRU-1 या विभागाने ०१ नग Dressing Drum ची मागणी केली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Dressing Drum हे वापरून खराब झालेले असल्यामुळे त्यांनी नविन मागणी केली आहे.

दि.०२/०३/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे FGW **व** CRU-1 या विभागासाठी एकूण ०४ नग Dressing Drum विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू.१६,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार इकडील पत्र क्र.८३ दि.११/०४/२०१६ अन्वये एकूण ०५ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि.१८/०४/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.७४४ दि.११/०७/२०१६ अन्वये एकूण ०७ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/०७ /२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून फक्त ०२ सिलबंद कोटेशन प्राप्त झाले त्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १४२१ दि. ०५/१०/२०१६ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते/पुरवठाधारक यांचेकडून दि. २०/१०/२०१६अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले त्यास अनुसरून ०३ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

Sr.No.	Name of Supplier	Received Date
1	M/s. Purnima Surgical Enterprises,Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१९/१०/२०१६
2	M/s. Maureen Surgical Co., Aurangabad	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/१० /२०१६
3	M/s. Kaivalyam Medical, Shrirampur	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/१०/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Purnima Surgical Enterprises,Nashik	८,३००/-
2	M/s. Maureen Surgical Co., Aurangabad	**५,६००/-**
3	M/s. Kaivalyam Medical, Shrirampur	८,१७२/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील पेडीयाट्रीक FGW व CRU-1 या विभागाकरीता ०२ नग Dressing Drum (Size Big) खरेदी करणेकामी M/s. Maureen Surgical Co., Aurangabad यांचे एकत्रित रु.५,६००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

५. **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Electrolyte Analyser Machine खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात Electolyte Analyser Machine चा वापर रक्तातील सोडियम आयर्न, क्लोराईड आयर्न, पोटॅशियम आयर्न, या घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. परंतु,सदरचे मशिन त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी ०१ नग Electolyte Analyser Machine ची मागणी केली आहे.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईनाथ रूग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Electolyte Analyser Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू.२,००,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती त्यानुसार इकडील पत्र क्र ८५८ दि.२३/०७/२०१६ अन्वये एकूण ०८ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.१०/०८/२०१६ अखेर

कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १३०७ दि.२१/०९/२०१६ अन्वये एकूण १३ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/०९/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून फक्त ०२ कोटेशन प्राप्त झाले त्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २०५६ दि.०७/१२/२०१६ अन्वये एकूण १४ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि.३०/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Supplier	Received Date
१	M/s. Varun Enterprises, Malegaon	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२/२०१६
२	M/s. Surgilink, Shrirampur	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२ /२०१६
३	M/s. Transasia Bio Medical Ltd., Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Varun Enterprises, Malegaon	२,८३,७५०/-
2	M/s. Surgilink, Shrirampur	२,३०,४०५/-
3	M/s. Transasia Bio Medical Ltd., Pune	**२,२५,०००/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता ०१ नग Electrolyte Analyser Machine खरेदी करणेकामी M/s. Transasia Bio Medical Ltd., Pune यांचे एकत्रित रु.२,२५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

६. श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT या विभागाकरीता Reusable Autoclavable Cardio Plegia Chamber खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा रूग्णालयातील CVTS O.T. या विभागामध्ये लागोपाठ होणा-या ओपन हार्ट (व्हाल्व) सर्जरीकरीता Reusable Autoclavable Cardio Plegia Chamber ची गरज असल्यामुळे त्यांनी ०१ नग नवीन Reusable Autoclavable Cardio Plegia Chamber ची मागणी केली आहे.

दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील CVTS O.T. या विभागाकरीता ०१ नग नवीन Reusable Autoclavable Cardio Plegia Chamber विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. ८७,७५०/- (अक्षरी रू. सत्त्याऐंशी हजार सातशे पन्नास मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली होती.त्यानुसार इकडील पत्र क्र.३०७० दि.०३/०२/२०१६ अन्वये एकूण ०५ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.२०/०२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१०५८ दि. २२/०८/२०१६ अन्वये एकूण ०६ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि. १५/०९/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले तरीही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २०५१ दि.०६/१२/२०१६ अन्वये एकूण ०७ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०३ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Supplier	Received Date
1	M/s. Bombay Surgical & Scientific co, Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२६/१२/२०१६
2	M/s. Chamunda Surgical Works, Thane	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२६/१२ /२०१६
3	M/s. Bhatt Surgical, Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२६/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Bombay Surgical & Scientific co, Mumbai	१,१७,०००/-
2	M/s. Chamunda Surgical Works, Thane	१,११,३७५/-
3	M/s. Bhatt Surgical, Mumbai	**१,०१,२५०/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT या विभागाकरीता ०२ नग Reusable Autoclavable Cardio Plegia Chamber खरेदी करणेकामी M/s. Bhatt Surgical, Mumbai यांचे एकत्रित रु.१,०१,२५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

७. श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casulty विभागात अत्यवस्थ रूग्णांसाठी ३ पेशंट बेड आहेत व २ मॉनिटर आहेत, त्यामुळे त्यांनी ०१ नग नवीन Multiparameter Monitor ची मागणी केली आहे.

दि. १६/०९/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील Casulty विभागाकरीता Multiparameter Monitor विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रू. २,५०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १९७५ दि. ३०/११/२०१६ अन्वये एकूण २३ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि२५/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, तसेच ५३ पुरवठाधारकांना ई-मेलव्दारे कोटेशन भरण्यासाठी अवगत करण्यात आले होते त्यास अनुसरून ०४ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे

Sr.No.	Name of Supplier	Received Date
१	M/s. Micronics Instrument Company, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२/२०१६
२	M/s. Girish Surgical Works, Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२ /२०१६
३	M/s. Exel Corporation, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२/२०१६
४	M/s.Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Micronics Instrument Company, Nashik	३,६४,०००/-
2	M/s. Girish Surgical Works, Mumbai	५५,०००/-
3	M/s. Exel Corporation, Nashik	Star6- १,५०,०००/-
		Star10- २,१०,०००/-
4	M/s.Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai	१,३५,५००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामार्फत रुग्णांना कमी दरात रुग्णसेवा पुरविली जात आहे. याकरीता रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने Casualty विभागाकरीता खरेदी करावयाच्या Multiparameter Monitor च्या दर्जामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करणेत येऊ नये. नामांकित कंपनीचे Multiparameter Monitor खरेदी करणेत यावे, असे उपसमितीचे मत झाले. याकरीता सदरहू विषय रद्द करणेत येऊन, नामांकित कंपनीचे Multiparameter Monitor खरेदीकामीचा नवीन प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

८. श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT 1 या विभागाकरीता जुना 10 KVA UPS without Battery परत (Buyback) करुन नविन 10 KVA UPS खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा रूग्णालयातील CVTS OT 1 या विभागाने मागणीपत्रकान्वये मागणी केली आहे. सदर UPS चा उपयोग ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया चालु असताना विद्युत पुरवठा अचानाक बंद झाला तर मशिनरी बंद पडू नये म्हणून होतो. त्यामुळे CVTS OT 1 या विभागाने ०१ नग नवीन 10 KVA UPS ची मागणी केली आहे.

दि.१६/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे CVTS OT 1 या विभागासाठी०१ नग नवीन 10 KVA UPS विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. २,००,०००/-(अक्षरी रू. दोन लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली होती.त्यानुसार इकडील पत्र क्र.२०६४ दि.०८/१२/२०१६ अन्वये एकूण १३ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून ०६ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

Sr.No.	Name of Supplier	Received Date
1	M/s. Powertronix Corporation, Ahmednagar	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१२/२०१६
2	M/s. Tejas Electronics, Ahmednagar	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१२ /२०१६
3	M/s. The Himalaya Motvations, Ahmednagar	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/१२/२०१६
4	M/s. S.V. Electronics , Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२९./१२/२०१६
5	M/s.Prasa Infocom & Power Solutions P. Ltd., Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/१२/२०१६
6	M/s.Micronics Systens & services, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.३०/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०६ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Powertronix Corporation, Ahmednagar	१,३४,५००/-
2	M/s. Tejas Electronics, Ahmednagar	**१,२२,०००/- (buyback Rs ८,०००/-)**
3	M/s. The Himalaya Motvations, Ahmednagar	१,३०,५००/-
4	M/s. S.V. Electronics, Nashik	२,२४,७२०/- (buyback Rs २०,०००/-)
5	M/s. Prasa Infocom & Power Solutions P. Ltd., Pune	१,२६,७७१/- (buyback Rs ५,०००/-)
6	M/s. Micronics Systens & services, Nashik	२,४०,०००/- (buyback Rs ४,०००/-)

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT 1 या विभागाकरीता जुना 10 KVA UPS without Battery परत (Buyback) करुन नविन 10 KVA UPS खरेदी करणेकामी M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचे एकत्रित रु.१,२२,०००/- (buyback Rs ८,०००/-) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच त्यांचेकडून सदरहू यु.पी.एस. ची वॉरंटी ऐवजी गॅरंटी घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

९. **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Wireless Central Temprature Monioring System खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नवीन Wireless Central Temprature Montioring System मागणी केली आहे. Blood Bank विभागातील सर्व फ्रिजचे Temperature Noting करून त्यांचे Record FDA नियमानुसार व्यवस्थित ठेवणेसाठी त्यांनी नवीन मागणी केली आहे.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत श्री साईनाथ रक्तपेढी या विभागासाठी०१ नग नवीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. २,००,०००/-(अक्षरी रू. दोन लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली होती.त्यानुसार इकडील पत्र क्र.७४३ दि.०१/०७/२०१६ अन्वये एकूण ०८ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/०७/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१२६५ दि. १३/०९/२०१६ अन्वये एकूण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि. ०३/१०/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले तरीही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २०५२ दि.०६/१२/२०१६ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.२२/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०९ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

Sr.No.	Name of Supplier	Received Date
1	M/s. Renake Sates ande Services, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२/२०१६
2	M/s. Sunsui Process Systems, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२ /२०१६
3	M/s. SLC Engineers, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२/२०१६
4	M/s. Accel Systems, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२/२०१६
5	M/s. Suchet Systems, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/१२/२०१६
6	M/s. Testo India Pvt.Ltd., Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/१२/२०१६

7	M/s. Crystal Diagnovision, Pune	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/१२/२०१६
8	M/s. Siddhi Medical Disributors, Aurangabad	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/१२/२०१६
9	M/s. JK Sales & Sercices, Aurangabad	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०९ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Renake Sates ande Services, Pune	**२,५३,५४७/-**
2	M/s. Sunsui Process Systems, Pune	३,९४,६६४/-
3	M/s. SLC Engineers, Pune	७,७५,५४७/-
4	M/s. Accel Systems, Pune	४,३६,३३२/-
5	M/s. Suchet Systems, Pune	८,१२,४७८/-
6	M/s. Testo India Pvt.Ltd., Pune	७,३८,६०७/-
7	M/s. Crystal Diagnovision, Pune	२,७१,१९७.३०
8	M/s. Siddhi Medical Disributors, Aurangabad	२,१९,०५५/-
9	M/s. JK Sales & Sercices, Aurangabad	**१,९८,६२५/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Wireless Central Temprature Monioring System खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दरांमध्ये अ.नं.१ ते ६ या कोटेशनधारकांनी 5 Channel चे दर दिलेले असून उर्वरीत अ.नं.७ ते ९ या कोटेशनधारकांनी 10 Channel चे दर दिलेले आहेत. सध्या ब्लड बँकेमध्ये 10 Channel सिस्टीमची आवश्यकता आहे. याकरीता अ.नं.७ ते ९ या कोटेशनधारकांच्या दरांचा विचार करता, M/s. JK Sales & Sercices, Aurangabad यांचे एकत्रित रु.१,९८,६२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१०. श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. विभागाकरीता Pediatric Pulse Oxymeter खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.

श्री साईनाथ रूग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागात Pulse Rate & Spo_2 हे दोन्ही पॅरामिटर दिसतात.त्यामुळे त्यांनी ०१ नग Pediatric Pulse Oxymeter ची मागणी केली आहे.

दि. ०८/०४/२०१५ रोजीचे मा. उपसमिती सभेत श्री साईनाथ रूग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. विभागाकरीता ०१ नग Pediatric Pulse Oxymeter विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रू. ५०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार इकडील पत्र क्र.१६९२ दि.२४/०९/२०१५ अन्वये एकूण ३० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.१०/१०/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १२६१ दि.१३/०९/२०१६ अन्वये एकूण १५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि०३/१०/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून फक्त ०२ कोटेशन प्राप्त झाले त्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २१२५ दि.१४/१२/२०१६ अन्वये एकूण १५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/१२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून ०४ सिलबंद कोटेशन विहीत वेळेत प्राप्त झालेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Supplier	Received Date
१	M/s. Summit Healthcare Pvt.Ltd., Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/१२/२०१६
२	M/s. Girish Surgical Works, Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२३/१२ /२०१६
३	M/s. Exel Corporation, Nashik	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/१२/२०१६
४	M/s.Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai	सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/१२/२०१६

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नाव	कोटेशनमधील मुळ दर रु.
1	M/s. Summit Healthcare Pvt.Ltd., Mumbai	६५,०००/-
2	M/s. Girish Surgical Works, Mumbai	**२६,८००/-**
3	M/s. Exel Corporation, Nashik	५९,०००/-

4	M/s.Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai	Emco oxi sat 1020- Rs ३१,५००/-
		Emco oxi sat 2060- Rs ३७,०००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामार्फत रुग्णांना मोफत रुग्णसेवा पुरविली जात आहे. याकरीता रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. विभागाकरीता Pediatric Pulse Oxymeter च्या दर्जामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करणेत येऊ नये. नामांकित कंपनीचे Pediatric Pulse Oxymeter खरेदी करणेत यावे, असे उपसमितीचे मत झाले. याकरीता सदरहू विषय रद्द करणेत येऊन, नामांकित कंपनीचे Pediatric Pulse Oxymeter खरेदीकामीचा नवीन प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

११. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१६-२०१७) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त तांत्रिक फेर ई-कमर्शियल निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल करीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७.०७.२०१५ निर्णय क्र.२३३ अन्वये रु.६५३२७६५/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले होते. त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६५२४/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त छपाई/ स्टेशनरी खरेदी करणेकामी दि.३१.०८.२०१६ मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता.यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल करीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी सोबत परिशिष्ट अ म्हणुन सादर केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधुन दरधारकास निम्नतम दरधाकास पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच ज्या छपाई स्टेशनरीसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत अशा पुरवठाधारकांना सम प्रमाणात विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा व ज्यासाठी दर आलेले नाहीत किंवा तीन पेक्षा कमी पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत अशा छपाई / स्टेशनरीकरीता फेर-ई-निविदांची मागणी करणेत यावी, असा निर्णय झालेला होता.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात दि.११.१०.२०१६ रोजीचे दैनिक सामना-पुणे, आपला वार्ताहार-मुंबई, दै.पुण्यनगरी-औरंगाबाद, दै.दिव्य मराठी-नाशिक, दि.१२.११.२०१६ रोजीचे दै.पुढारी-अहमदनगर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.१५/१०/२०१६ ते ३१/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर हार्डकॉपी निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०३/११/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती.छपाई व स्टेशनरीचे जास्त ॲटम असल्यामुळे सदरचे विक्रीची मुदत दुस -यांचा दि.०७.११.२०१६ व तिस-यांदा दि.१४.११.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यानुसार निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. तसेच सदर खरेदीकामी तांत्रिक निविदांची Hard Copy संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०६ निविदा प्राप्त झालेली असून, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

प्राप्त ०६ तांत्रिक निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे–

Sr. No.	Name of Tenderer	Received Date	Received Place
1	M/s.Classic Stationers co., Mumbai	31/10/2016	Shirdi
2	M/s.Shri Ganesh Enterprises, Nashik	31/10/2016	Shirdi
3	M/s.Printwell Printers, Malegaon	31/10/2016	Shirdi
4	M/s. Krishna enterprise, Ahmedabad	04/11/2016	Shirdi
5	M/s. Rohan Printers & Stationary, Aurangabad	04/11/2016	Shirdi
6	M/s. Shri Gajanan offset, Kopargaon	07/11/2016	Shirdi

तरी उपरोक्त खरेदीकामी निविदाधारकांनी दिलेल्या ०६ तांत्रीक सिलबंद निविदा प्राप्तझालेल्या आहेत.

सामान्य प्रशासन शाखेकडील जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३९६६/ २०१६ दि.१९/०१/२०१६ अन्वये संस्थान अंतर्गत असणा-या विविध विभागांसाठी आवश्यक साहित्य/ कामासाठी शासन निर्णयानुसार खरेदी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. ऑनलाईन तांत्रिक निविदा उघडून तांत्रिक निविदेमध्येतीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारक प्राप्त ठरले, तर लगेचच मुळ निविदा उघडून घेता येतील.

सदर निविदा दि.२८-१२-२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या होत्या. प्राप्त तांत्रिक एकुण ०८ निविदाधारकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr. No.	Name of Tenderer	Qualify/ Rejected
1	M/s. Classic Stationers co., Mumbai	Qualify
2	M/s. Shri Ganesh Enterprises, Nashik	Qualify
3	M/s. Printwell Printers, Malegaon	Qualify
4	M/s. Krishna enterprise, Ahmedabad	Qualify
5	M/s. Rohan Printers & Stationary, Aurangabad	Qualify
6	M/s. Shri Gajanan offset, Kopargaon	Qualify

उपरोक्तप्रमाणे ०६ पात्र निविदाधारकांचे रि-ई-कमर्शियल Online निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला. त्यामधील स्टेशनरी खरेदीकामीचा तक्ता परिशिष्ट अ व छपाईकामीचा तक्ता परिशिष्ट ब म्हणून अवलोकनार्थ सादर करणेत आला.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१६-२०१७) कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामीचा परिशिष्ट अ व वार्षिक छपाईकामीचा परिशिष्ट ब म्हणून सादर करणेत आलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, यासाठी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा व ज्यासाठी ०३ पेक्षा कमी निविदाधारकांनी दर दिलेले आहेत, अशा स्टेशनरी/ छपाईसाठी फेर कोटेशन मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Imported Operation Table with Accessories खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागात मेंदूच्या व मणक्याच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर विभागात दोन Operation Table असून त्यापैकी ऑपरेशन थिएटरमध्ये एक Maquet (Imported) तर दुसरा Janak (Indian) कंपनीचा आहे. दोन्ही Operation Table हे सध्या व्यवस्थित कार्यान्वित आहेत. त्यापैकी Indian Operation Table वर जनरल शस्त्रक्रिया करण्यात येतात, परंतू मेंदूच्या व मणक्याच्या काही गुंतागुंतीच्या (Complicated) शस्त्रक्रिया असल्यास उपलब्ध एका Imported Operation Table वर शस्त्रक्रिया करण्यात येतात. परंतु, त्यांना Janak (Indian) टेबलच्या ऐवजी अजून एक Imported Table पाहिजे जेणेकरुन दोन्ही सर्जन यांना Imported Table वर मेंदूच्या व मणक्याच्या शस्त्रक्रिया करता येऊ शकेल. त्यामुळे अजून एक नग Imported Operation Table ची न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१३/०९/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.२९/१२/२०१४) चे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे

ज्यामध्ये रुग्णांची शस्त्रक्रिया करते वेळी Operation Table वर रुग्णांना वेगवेगळया बाजूने (Different Position During Surgery) करता येऊन सुलभ प्रकारे शस्त्रक्रिया करता येऊ शकतील. Janak (Indian) कंपनीचा Operation Table हा सदर Operation Theatre मध्ये Stand by म्हणून एकच वापरता येईल. नविन Operation Table with Accessories सह खरेदीकामी अंदाजे रु.३५,००,०००/- (अक्षरी रु – पस्तीस लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१८/०२/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.६४ अन्वये सदर Imported Operation with Accessories खरेदीकामी मा.उच्च न्यायलयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यास तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.३५,००,०००/- (अक्षरी रु – पस्तीस लाख मात्र) चे खर्चास व विहित पध्दतीने ई– निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार दि.१८/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये विधी विभागास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेबाबत कळविण्यात आलेले होते, त्यानूसार सिव्हील अर्ज क्र.८३३५ दि.२४/०७/२०१५ अन्वये सदर खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली असून, मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

Sr.No.	Name of Tenderer	Received Date	Received Place
1	M/s. Austin Health Care, Pune	29/01/2016	Shirdi Office
2	M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai	30/01/2016	Mumbai Office
3	M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai	29/01/2016	Mumbai Office
4	M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai	29/01/2016	Mumbai Office

वरीलप्रमाणे खरेदीकामी वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे. सदरहू प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Austin Health Care, Pune यांनी निविदेमध्ये Indian कंपनीचे Specification दिलेले आहे व आपणास Imported कंपनीचा ऑपरेशन टेबल पाहीजे असल्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरवावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.
१	M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai	**२३,९५,३५०/-**
२	M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai	२४,८०,०००/-
३	M/s. South India Surgical Co. Ltd., Chennai	३८,६०,०००/-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Imported Operation Table with Accessories खरेदी करणेकामी M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.२३,९५,३५०/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले असून, निम्नतम दरधारक M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१३. श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागामधील जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा उघडून मिळणेबाबत.

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.०६/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये नविन कॅथलॅब मशिनची मागणी केलेली आहे. सध्या कॅथलॅब विभागात सिमेन्स कंपनीचे मॉडेल AXIOM Artis dFC हे एक कॅथलॅब मशिन असून सदर मशिन सन २००५ मध्ये मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून रक्कम रु.२,९७,५७,००६/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे. सदर मशिनवर सध्या कॅथलॅब प्रोसीजर चालु आहेत, परंतु सध्या मशिनचे ब्रेकडाऊन वाढलेले आहेत, तसेच मशिन दुरुस्तीकामी येणारा वार्षिक खर्च हा घसारा किंमतीच्या दुप्पट होत आहे. त्यामुळे बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन अदयावत तंत्रज्ञान असलेले मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे, कारण बाजारात सध्या जुन्या मॉडेलच्या मशिनपेक्षा अधिक उच्च प्रकारच्या तपासणीच्या सुविधा असलेले मशिन उपलब्ध झालेले आहे, त्यामुळे अधिक अचुक निदान होते. तसेच मे. सिमेन्स लि., मुंबई यांनी देखील पत्राव्दारे कळविले आहे की, सन २०१७ पर्यंत सदर मशिनचे स्पेअर पार्टस पुरवठा व सर्व्हीस देणार आहे. जुन्या कॅथलॅब मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.१४,६६,२५६/- इतकी आहे.

कॅथलॅब विभागाकरीता नविन कॅथलॅब मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दि.१३/०१/२०१६ रोजीचे दरपत्रकानुसार रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित असून जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे मशिन बायबॅक करणेकामी शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

त्यास अनुसरुन जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नविन कॅथलॅब मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) चे खर्चास, तसेच जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता, त्यास निर्णय क्र.५५७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच १५ पुरवठाधारकांना ई-

मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते, निविदा विक्रीची मुदत दि.०२/०१/२०१७ ते दि.१६/०१/२०१७ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१९/०१/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ऑनलाईन ०१ निविदा प्राप्त झाली होती.

तथापि "शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.३० ऑक्टोबर २०१५ – प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ" अन्वये जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१७/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२३/०१/२०१७ पर्यंत प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दोन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत, म्हणजेच सदरचे खरेदीकामी एकुण तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Tenderer	Received Date
1	M/s. Shimadzu Medical (India) Pvt.Ltd., Mumbai	23/01/2017
2	M/s. Siemens Ltd., Mumbai	25/01/2017
3	M/s. Philips Electronics India Limited, Mumbai	28/01/2017

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या तीन तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी हि विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागामधील जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना, श्री साईबाबा रुग्णालयाच्या कॅथलॅब विभागामधील जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करणेऐवजी एखाद्या धर्मदाय रुग्णालयास आवश्यकता असल्यास, त्यांना देण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१४. श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ओ.टी.चे अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले आहेत. सदरचे लिनन रोजच्या वापरामुळे खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक ०७/०८/२०१६ नि.क्र.५०० अन्वये रु.५,५२,५०२/-(पाच लाख बावन्न हजार पाचशे दोन मात्र) इतक्या रकमेचे लिनन जाळुन नष्ट केलेले असुन, त्यानंतर दि.०१/०४/२०१६ ते ३१/१२/२०१६ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन निरुपयोगी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.४,१३,७८६ /- (अक्षरी रु.चार लाख तेरा हजार सातशे श्याऐंशी मात्र) इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्य परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैदयकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणे गरजेचे आहे.

तरी सोबतच्या तक्त्यातील लिनन हे साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करुन ते जाळून नष्ट करणेचा प्रस्ताव मा.रुग्णालय उपसमिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा जाळून नष्ट करणेस व तो रजिष्टरमधून निर्लेखित करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१५. श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Elisa System करीता लागणारे लॅब केमीकल्स मंजुरदराने खरेदीबाबत.

दि.२४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४९९ अन्वये झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.२५/०८/२०११ रोजीचे स्थानिक विश्वस्तांचे उपसमिती सभेत झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automatic Elisa System ही मुळ निविदाधारक M/s.Siddhi Medical Distibutors, Aurangabad यांचेऐवजी सदर सिस्टमची थेट उत्पादक कंपनी M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून रु२२,७८,५००/- रुपयात शिर्डी पोहोच (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणारे केमीकल्स तक्त्यात नमुद केलेल्या दराप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता खरेदी करण्यात यावे, असे ठरलेले आहे.

वरीलप्रमाणे ठरावास अनुसरुन M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/वशी/एसएसबीएच/स्टोअर(पी/एस)/३५६६/२०११ दि.११/१०/२०११ अन्वये पुरवठा आदेश

देण्यात आलेला आहे. त्यानुसार M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मागील पाच वर्षापासुन मशिन व्यवस्थित कार्यान्वित असून ठरावातील मंजुर दरानुसार त्यांनी आवश्यकतेनुसार केमीकल्सचा पुरवठा केलेला आहे. तथापि ठरावानुसार त्यांचेकडून केमीकल्स खरेदी करावयाचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये Fully Automatic Elisa System करीता लागणा-या लॅब केमीकल्सचा समावेश करण्यात आलेला असून सदरहू प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन केमीकल्स उपलब्ध होण्यास कमीत कमी ३-४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे प्रयोगशाळा विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून तुर्तास त्यांना आवश्यक असणारे लॅब केमीकल्स M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना जा.क्र.एसएसएस/ वशी/ एसएसबीएच/ स्टोअर (पी/एस)/ ३५६६/ २०११ दि.११/१०/२०११ अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Description	Pack Size	Req. Qty.	Rate per in Rs.	Total in Rs.
1	ARCHITECT RVS	2000T	5	2250.00	11250.00
2	CONS WASH BUFFER	10LTR	1	18000.00	18000.00
3	ARC HCV CALIBRATOR	SET	1	4500.00	4500.00
4	ARC HCV CONTROL	SET	1	2700.00	2700.00
5	ARC HCV KIT	400T	9	60508.80	544572.00
6	ARC HIV AG/AB COMBO CALIBRATOR	SET	2	4500.00	9000.00
7	ARC HIV AG/AB COMBO CONTROL	SET	1	2700.00	2700.00
8	ARC HIV AG/AB COMBO KIT	400T	12	43678.80	524145.60
9	ARC HBSAG CALIBRATOR	SET	1	4500.00	4500.00
10	ARC HBSAG CONTROL	SET	1	2700.00	2700.00
11	ARC HBSAG KIT	400T	9	20800.80	187200.00
12	PRE TRIGGER SOLUTION	4*1LT	2	22500.00	45000.00
13	PROBE CONDITIONING SOLUTION		1	2700.00	2700.00
14	SAMPLE CUPS		4	6840.00	27360.00
15	ARCHITECT SEPTUM CAPS		5	900.00	4500.00
16	TRIGGER SOLUTION	4*1LT	1	13500.00	13500.00
			Total Amt.in Rs.		**1404327.60**

वरीलप्रमाणे लॅब केमीकल्स मंजुर दराने खरेदीस पुर्णांकित रक्कम रु.१४,०४,३२८/- (अक्षरी रु.चौदा लाख चार हजार तीनशे अठ्ठावीस मात्र) इतका खर्च येईल. तसेच Abbott कंपनीच्या Fully Automatic Elisa System करीता त्याच कंपनीचे केमीकल्स वापरावे लागतात. तसेच M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांनी दि.०३/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad हे त्यांचे Authorised Distributor आहेत असे कळविलेले आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Elisa System करीता वरील तक्त्यात नमुद केलेले लॅब केमीकल्स मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.१४,०४,३२८/- (अक्षरी रु.चौदा लाख चार हजार तीनशे अठ्ठावीस मात्र) चे खर्चाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Elisa System करीता प्रस्तावित लॅब केमीकल्स M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१४,०४,३२८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१६. श्री साईनाथ रक्तपेढी विभागातील Blood Cell Separator– Apheresis Machine करीता लागणाऱ्या Apheresis Kit मंजुरदराने खरेदीबाबत.

दि.२४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४९९ अन्वये झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.२५/०८/२०११ रोजीचे स्थानिक विश्वस्तांचे उपसमिती सभेत झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Blood Cell Separator– Apheresis Machine हे M/s.Sterling Healthcare, Mumbai यांचेकडून Fenwal कंपनीचे Amicus Cell या मॉडेलचे रु.२४,४१,०३६/- इतक्या रक्कमेत शिर्डी पोहोच (सर्व करांसह) खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणा-या Apheresis Kit ठरावात नमुद केलेल्या दराप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता खरेदी करण्यात यावे, असे ठरलेले आहे.

वरीलप्रमाणे ठरावास अनुसरुन M/s.Sterling Healthcare, Mumbai यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ वशी/एसएसबीएच/स्टोअर(पी/एस)/३३१५/२०११ दि.०१/१०/२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार M/s.Sterling Healthcare, Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मागील पाच वर्षापासुन मशिन व्यवस्थित कार्यान्वित असून ठरावातील मंजुर दरानुसार त्यांनी आवश्यकतेनुसार केमीकल्सचा पुरवठा केलेला आहे. तथापि ठरावानुसार त्यांचेकडून Apheresis Kit खरेदी करावयाचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये Blood Cell Separator– Apheresis Machine करीता लागणा-या Apheresis Kit समावेश करण्यात आलेला असून सदरहू प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन केमीकल्स उपलब्ध होण्यास कमीत कमी ३-४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे रक्तपेढी विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून तुर्तास त्यांना आवश्यक असणारे Apheresis Kit हया M/s.Sterling Healthcare, Mumbai यांना जा.क्र. एसएसएस / वशी / एसएसबीएच / स्टोअर (पी/एस) / ३३१५/२०११ दि.०१/१०/२०११ अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील.

यापुर्वी Apheresis Machine हे बंद असल्यामुळे किट वापरण्याचे प्रमाण कमी होते. सध्या मशिन व्यवस्थित चालु असून रक्तपेढी विभागाकडे सध्या ०९ किट शिल्लक असून त्यांना पुढील महिन्यांकरीता आणखी १० किटची आवश्यकता आहे असे रक्तपेढी विभागातून सांगण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Description	Req. Qty.	Sanctioned Rate per in Rs.	Total in Rs.
1	Single Needle Closed System Amicus Kits For Fenwal Apheresis Machine	10	5500.00	55,000.00
		Total Amt.in Rs.		55,000.00

वरीलप्रमाणे Apheresis Kit मंजुर दराने खरेदीस पुर्णांकित रक्कम रु.५५,०००/- (अक्षरी रु.पंचावन्न हजार मात्र) इतका खर्च येईल. तसेच Fenwal कंपनीच्या Apheresis Machine करीता त्याच कंपनीच्या किट वापराव्या लागतात.

तरी श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Blood Cell Separator– Apheresis Machine करीता वरील तक्त्यात नमुद Apheresis Kit मंजुर दराने M/s.Sterling Healthcare, Mumbai यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.५५,०००/- (अक्षरी रु.पंचावन्न हजार मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Blood Cell Separator– Apheresis Machine करीता प्रस्तावित Apheresis Kit, M/s.Sterling Healthcare, Mumbai यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१७. श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU/GICU व साईनाथ रुग्णालयातील Opthal Ward/ General O.T. या विभागाकरीता Video Laryngoscope With Blade खरेदी करणेबाबत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU/ GICU या विभागाने ०२ नग व साईनाथ रूग्णालयातील Opthal Ward या विभागाने ०२ नग तसेच Genral O.T. या विभागाने ०२ नग मागणीपत्रकान्वये नवीन Video Laryngoscope With Blade(5 Pair) ची मागणी केलेली आहे.

सदर विभागामध्ये रुग्णांना कृत्रिम श्वास देण्याकरिता Ventilator मशीन वापरावे लागते. Ventilator लावताना कृत्रिम श्वास देणेकरीता E.T. Tube टाकणे आवश्यक असते. सदर Tube टाकणेपुर्वी Laryngoscope ने पेशंटचे तोंड व श्वासनलिका उघडून सदर E.T. Tube टाकली जाते. E.T. Tube टाकताना ब-याच वेळा रुग्णांच्या श्वासनलिकेस ईजा होते, त्यामुळे रुग्णांचे ICCU मधील वास्तव्य देखील वाढते. सदर

त्रास टाळण्यासाठी नवीन मागणी केलेल्या Video Laryngoscope मुळे कोणत्याही वयाच्या रुग्णांना सहजपणे E.T. Tube टाकणे शक्य होते तसेच पेशंटच्या घशाचे व श्वासनलिकेचे परिक्षण देखील करणे सोपे जाते त्यामुळे त्यांनी नवीन Video Laryngoscope With Blade ची मागणी केली आहे.

उपरोक्त विभागासाठी Video Laryngoscope With Blade खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी काही पुरवठाधारकांना मेल करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अंदाजे रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे **:-**

Sr. No.	Supplier Name	Qty.	Estimate cost (per unit)	Total Amt.	Waranty
1	M/s. Sanjeevani Enterprises, Pune	6	1,58,900.00	9,53,400.00	1Year
2	M/s. Amruta Surgical & Pharmaceutical Distributors, Pune	6	1,92,950.00	11,57,700.00	1Year
3	M/s. Shri Ganesh Enterprises, Pune	6	1,98,625.00	11,91,750.00	1Year
4	M/s. Attharava Health Tech India Pvt.Ltd., Mumbai	6	2,94,869.00	17,69,214.00	1Year
			Average Amt. in Rs.	**12,68,016.00**	

६ नग Video Laryngoscope With Blade(5 Pair) खरेदीकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांचे अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची सरासरी रक्कम रू. १२,६८,०१६.००(अक्षरी रू. बारा लाख अडुसष्ट हजार सोळा मात्र) इतकी येते.

मागणी– श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU/GICU या विभागाने ०२ नग व साईनाथ रूग्णालयातील Opthal Ward या विभागाने ०२ नग तसेच Genral O.T. या विभागाने ०२ नग असे एकूण ०६ नग मागणीपत्रकान्वये नवीन Video Laryngoscope With Blade(5 Pair) ची मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयातील सदर विभागांमध्ये रुग्णांना कृत्रिम श्वास देण्याकरिता Ventilator लावताना ET टाकावी लागते त्यामुळे ब-याच वेळा रुग्णांच्या श्वासनलिकेस ईजा होते व त्यामुळे रुग्णांचे ICCU मधील वास्तव्य देखील वाढते. सदर त्रास टाळण्यासाठी त्यांनी नवीन Video Laryngoscope ची मागणी केली आहे त्यामुळे पेशंटच्या घशाचे व श्वासनलिकेचे परिक्षण देखील करणे सोपे जाते त्यामुळे या विभागांनी मागणी केल्याप्रमाणे ०६ Set Video Laryngoscope With Blade विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयातील विभागांकरीता ०६ Set Video Laryngoscope With Blade विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. १२,६८,०१६.०० (अक्षरी रू. बारा लाख अडुसष्ट हजार सोळा मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयातील विविध विभागांकरीता ०६ Set Video Laryngoscope With Blade विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,६८,०१६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१८. श्री साईनाथ रुग्णालयातील Female Ward या विभागाकरीता Syring Pump खरेदी करणेबाबत.

श्री साईनाथ रुग्णालयातील Female Ward या विभागाने मागणीपत्रकान्वये Syringe Pump ०२ नगाची मागणी केलेली आहे.

Female Ward या विभागातील अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी Syringe Pump चा उपयोग होतो. Female Ward या विभागात शस्त्रक्रिया झाल्यानंतर तसेच ICCU मधून

पेशंट शिफ्ट केल्यानंतर रुग्णांना इंजेक्शन देणेकामी Syringe Pump ची गरज भासते परंतु Female Ward या विभागात सध्या एकही Syringe Pump उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नविन ०२ नगाची मागणी केली आहे.

उपरोक्त विभागासाठी Syringe Pump खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी काही पुरवठाधारकांना मेल करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अंदाजे रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे**:-**

Sr.No.	Supplier Name	Qty.	Estimate cost (per unit)	Waranty
1	M/s. Amruta Surgical & Pharmaceutical Distributors, Pune	2	79450.00	
2	M/s. Shri Ganesh Enterprises, Pune	2	83990.00	1 Year
3	M/s. Sanjeevani Enterprises, Pune	2	68100.00	1 Year
4	M/s. Attharava Health Tech India Pvt. Ltd., Mumbai	2	104176.00	1 Year
उ	Avarage Amt in Rs.		67143.00	

उपरोक्त ०२ नग Syringe Pump खरेदीकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांचे अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची सरासरी रक्कम रू. रू.६७,१४३.०० (अक्षरी रू. सदुसष्ठ हजार एकशे त्रेचाळीस मात्र) इतकी येते.

मागणी– श्री साईनाथ रुग्णालयातील Female Ward या विभागाने मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- Female Ward या विभागातील अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी Syringe Pump चा उपयोग होतो. Female Ward या विभागात सध्या एकही Syringe Pump उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ०२ नग नवीन Syringe Pump विहीत पध्दतीने खरेदी करुन देता येईल असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Female Ward या विभागाकरीता०२ नग Syringe Pump विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे ०२ नगासाठी रक्कम रू रू.६७,१४३.०० (अक्षरी रू. सदुसष्ठ हजार एकशे त्रेचाळीस मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Female Ward या विभागाकरीता ०२ नग Syringe Pump विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६७,१४३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१९ **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत**

आजचे रुग्णालय उपसमिती सभेमध्ये मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(१) संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असणारी औषधे/ साहित्य मॅन्युफॅक्चर कंपन्यांकडूनच खरेदी करावे. तसेच यापुढे विविध साहित्यांच्या खरेदीबाबतचा प्रस्ताव सादर करतेवेळेस, सदरहू प्रस्तावामध्ये ब्रँडेड कंपन्यांचा उल्लेख करावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयांवरील कार्यवाची सद्य:स्थिती.**

प्रस्ताव- विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे, दि.२८ जुलै, २०१६, रोजीचे अधिसूचनेनुसार, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली असून, या व्यवस्थापन समितीने अधिनियमातील तरतुदीनुसार आयोजित केलेल्या सभांमधील निर्णय पुढील कार्यवाहीसाठी संबधीत विभागांना वेळोवेळी देण्यात आलेले आहेत व सदर निर्णयांवर विभागांकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे, याचा आढावा वेळोवेळी संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत घेतला जात आहे.

दि.२१.०९.२०१६ रोजी मा.श्रीमती राखी चव्हाण, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सभाकामकाज विभागाचे कामकाज व रेकॉर्डची पाहणी केल्यानंतर त्यांच्या अहवालामध्ये 'व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार संबधीत विभागांशी समन्वय साधून निर्णयांच्या अमंलबजावणीसाठी केलेल्या कार्यवाहीचा विस्तृत अभिलेख एकत्रितरित्या जतन करण्यात यावा. समितीच्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही विहीत वेळेत पार पाडली जात नसल्यास यासंदर्भात कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर आढावा घेण्यात यावा.' अशी सुचना केलेली होती. त्यास अनुसरुन दि.०७/०८/२०१६, १६/०८/२०१६ व ३१/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीचा अहवाल दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत आला होता. सदर अहवालाची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेमध्ये विभागांनी केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती, सदरहु कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सभेसमोर सादर करणेत यावी, असा निर्णय संमत झालेला आहे. या निर्णयास अनुसरुन व्यवस्थापन समितीच्या वेळोवेळी झालेल्या सभेतील निर्णयांवरील कार्यवाहीची सद्य:स्थिती सभाकामकाज विभागाकडे संकलीत करुन कार्यवाही पुर्ण होणेकरीता कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पाठपुरावा केला जात आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनीही दि.१२/०२/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीच्या वेळोवेळी झालेल्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावर संबधीत विभागांनी दि.२०/०१/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीवरील सद्यस्थितीचा आढावा घेतलेला असून त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/ ४०४५/ २०१७, दि.१४/०२/२०१७ चे परिपत्रकान्वये संबधीत विभागांकडून निर्णयावरील कार्यवाहीबाबतचा दि.१५/०२/२०१७ अखेर सद्यस्थिती मागविणेत आलेली आहे. तो अहवाल सोबत सादर केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६, १६/०८/२०१६, ३१/०८/२०१६, १९/०९/२०१६, ०९/१०/२०१६, ३०/११/२०१६ व २२/१२/२०१६ रोजीचे सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीची आकडेवारीसहीत माहिती खालीलप्रमाणे–

अ. नं.	मा.व्य.स. सभा दिनांक	निर्णय क्रमांक	नोंद घेण्याचे विषय	विषय रद्द	अमान्य	स्थगित	कार्यवाही पुर्ण	कार्यवाही चालू	एकूण निर्णय
१	०७/०८/२०१६	४४६ ते ५०९	--	--	०१	०३	३४	२६	६४
२	१६/०८/२०१६	५१० ते ५८१	--	०१	--	०२	३८	३१	७२
३	३१/०८/२०१६	५८२ ते ६३७	०२	--	--	०३	४३	४६	९४
४	१९/०९/२०१६	६३८ ते ६८७	--	--	०१	०१	३०	४५	७७
५	०९/१०/२०१६	६८८ ते ७५४	०१	--	०३	०४	५८	६७	१३३
६	३०/११/२०१६	७५५ ते ९०४	--	०१	०७	०२	९०	१२०	२२१
७	२२/१२/२०१६	९०५ ते ९६६	--	--	०१	०१	३०	४४	७६

तरी सदरचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.१३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांवरील कार्यवाहीच्या सद्य:स्थितीचे अवलोकन करणेत आले व इतर निर्णय वगळता फक्त कार्यवाही चालू असलेल्या निर्णयांची सद्य:स्थिती यापुढे सादर करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेबाबत.**

प्रस्ताव- **अ)** मा.त्रिसदस्य समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२५ व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि०४ मार्च, २०१६ चे आदेशानुसार संस्थानचे विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन दि.३०/०४/२०१६ अखेर अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे –

अ.नं.	पदनाम	दि.३०/०४/२०१६ अखेर आलेले अर्ज	मुदतीनंतर आलेले अर्ज	एकूण अर्ज
०१	विधी अधिकारी	२५	०१	२६
०२	कामगार अधिकारी	४०	००	४०
०३	क.कामगार अधिकारी	४४	०२	४६

उपरोक्त अर्जांवर कार्यवाही करणेकामी प्रस्ताव सध्याचे मा.व्यवस्थापन समिती दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. समितीचे निर्णयानुसार सध्याचे शासन नियुक्त समितीला याबाबत कार्यवाही करता येईल काय, याबाबत शासनाचे अभिप्राय मागविणेत आले होते. परंतु शासनाने दि.२५ ऑक्टोबर, २०१६ रोजीचे पत्रानुसार सदरची कार्यवाही मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.०४ मार्च, २०१६ रोजीचे आदेशानुसार करणेबाबत कळविले आहे. त्यावर मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.८४७ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"दि.२५ ऑक्टोबर, २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अभिप्रायानुसार, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दि.०४ मार्च, २०१६ रोजीचे आदेशाप्रमाणे विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी न्यायालयीन आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४८३९/२०१६ दि.१४ डिसेंबर, २०१६ चे पत्रान्वये मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांना मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांवर आपले अध्यक्षतेखाली व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.०४ मार्च, २०१६ रोजीचे आदेशात नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करणेकामी पत्र देण्यात आलेले आहे.

ब) आता, मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांनी दि.१० जानेवारी, २०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

With reference to the captioned subject and on perusing the order passed in Civil Application No.118 of 2016 in Public Interest Litigation No.18 of 2011, by the Hon'ble Division Bench of the Bombay High Court, Bench at Aurangabad, dt.04.03.2016, I am to state that by that time Ad-hoc Committee constituted by the Hon'ble Bombay High Court was working. The affairs of the Ad-hoc Committee were monitored by the Hon'ble Bombay High Court. At that time the undersigned was the Chairman of Shri Saibaba Sansthan Trust and as such the directions were issued by the Hon'ble Bombay High Court to complete the selection process of the Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer.

As on today, the new Board has taken charge of Shri Saibaba Sansthan Trust and looking after the affairs of the Trust. The undersigned has no concern with the affairs of Shri Saibaba Sansthan Trust. As such, it is not desirable on my part to work as a Chairman of Selection Committee to complete the process of appointment of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer in Shri Saibaba Sansthan Trust.

You are, therefore, requested to take necessary clarification from the Hon'ble High Court. If the Hon'ble High Court directs to the undersigned to work as a Chairman of the Committee for the selection process of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer, I have no difficulty to complete the process.

You are, therefore, requested to do the needful and obtain necessary clarification from the Hon'ble Bombay High Court in this regard.

मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांचे निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे संस्थान पॅलनवरील वकील, ॲड.श्री.नितीन भवर यांचे जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/५४५९/२०१७ दि.२३ जानेवारी, २०१७ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविणेत आलेले आहेत.

क) आता, ॲड.नितीन भवर पाटील मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१५/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय संस्थानला कळविले आहेत.

With reference to the subject cited above, I have to state that, I have gone through the order 04.03.2016, passed by the Hon'ble Division Bench of High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad in Civil Application No.118/2016 in Public Interest Litigation No.18/2011, the order dated 02.05.2013 passed by the Hon'ble High Court in Public Interest Litigation No.27/2012 & other companion Public Interest Litigations, the

Resolution No.425, dated 27.10.2015 adopted by the then Three Members Committee, carefully and on understanding the same, I giving my legal opinion as follows-

1. As you know, the Hon'ble High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad vide order dated 13.03.2012 Hon'ble Hogh Court vided order dated 13.03.2012 passed in Public Interest Litigation constituted an ad-hoc committee consisting of (i) The Principal District Judge, Ahmednagar; (ii) The Collector, Ahmednagar; and (iii) The Chief Executive Officer of Shree Saibaba Sansthan Trust Shirdi to supervise, monitor and look after the affairs of Shree Saibaba Sansthan Trust until the State Government constitutes a new Committee. Furthermore, the Hon'ble High Court while disposing the Public Interest Litigation No.27/2012 and other companion Public Interest Litigations vide order dated 02.05.2013 permitted the State Government to constitute a new Managing Committee for governing the affairs of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. The Hon'ble High Court further directed that, the ad-hoc committee appointed by it shall continue to operate until the State Government constitutes a new Committee.

2. When the Three Members Committee was in charge and looking after the affairs of Shri Saibaba Sansthan Trust, the Resolution No.425 was adopted by the three members committee in its meeting held on 27.10.2015 accorded sanction to fill in the vacant posts of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer and to seek permission from the Hon'ble High Court to carry out the selection process for filling in the above referred to posts. Accordingly, Civil Application No.118/2016 was filed in Public Interest Litigation No.18/2011 before the Hon'ble High Court seeking permission to fill in the posts of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer. The Hon'ble High Court after hearing the parties, vide order dated 04.03.2016 disposed of the Civil Application No.118/2016 and permitted Shri Saibaba Sansthan to carry out the selection process. The Hon'ble High Court also constituted a Selection Committee consisting Chairmanship of the Principal district Judge and other experts.

3. Thereafter, in view of the directions given by the Hon'ble High Court vide order dated 13.03.2012 in Public Interest Litigation No.18/2011, the Government of Maharashtra issued a Notification on 28.07.2016 appointing new Managing Committee to administer, control, supervise and look after the day-to-day affairs of Shri Saibaba Sansthan. The new Managing Committee has taken the charge of the office of Shri Saibaba Sansthan Trust and its first meeting was held on 07/08/2016 and since then the new Managing Committee is holding the office of Shri Saibaba Sansthan. The ad-hoc committee ceases to operate since the date when the new Managing Committee taken the charge of the office of Shri Saibaba Sansthan Trust.

4. In view of the circumstances started herein above, as per may opinion, it is the new Managing Committee is empowered to take decision to carry out the selection process for filling in the vacant posts of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer by constituting a Selection Committee consisting of experts.

वरीलप्रमाणे ॲड.नितीन भवर पाटील यांचे अभिप्रायानुसार विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार ही पदे सरळसेवेने भरणेकामी या विषयातील तज्ञ यांची एक निवड समिती स्थापन करुन निवड प्रक्रिया आमलात आणणेचा अधिकार नव्याने नियुक्त केलेल्या समितीस असल्याचे कळविले आहे.

सबब, मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि०४ मार्च, २०१६ रोजीचा आदेश, शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि२५ ऑक्टोबर, २०१६ रोजीचा अभिप्राय तसेच मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांचेकडील दि.१० जानेवारी, २०१७ रोजीचे अभिप्राय इत्यादी सर्व बाबींवर मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील ॲड.नितीन भवर यांनी दि.१५/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या अभिप्रायानुसार संस्थानचे प्रशासकीय कामकाज पहाणेकामी शासनाने नव्याने नियुक्त केलेल्या व्यवस्थापन समितीने संबंधीत विषयातील तज्ञांची एक निवड समिती स्थापन करुन भरतीची निवड प्रक्रिया अमलात आणून पुढील कार्यवाही करणेच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निर्णय क्र.४४ मध्ये समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ मा.ॲड्मोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करणेत आलेल्या उपसमितीने विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेची कार्यवाही पुर्ण करावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **मंजुर आकृतीबंधानुसार वेतनबँण्ड ४४४०- ७४४० अधिक ग्रेड पे १३०० (गट-ड) मधील मंजुर पदांचे संवर्ग, सेवाज्येष्ठता व बिंदु नामावलीतयार करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आस्थापना विषयक कामे पूर्ण करुन घेणेकामी दि.२०/०१/२०१७ रोजी साईनिवास अतिथीगृह येथे दुपारी बैठकीचे आयोजन करणेत आलेले होते. सदर बैठकीचे इतिवृत्त कार्यवाहीसाठी जा.नं.एसएसएस/वशी-मावक/३८९७/२०१७ दि.०३/०२/२०१७ नुसार पारीत करणेत आलेले आहे.

श्री.खैरे, सल्लागार यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरून मंजुर आकृतीबंधातील गट -ड पदांचे कामाच्या जबाबदा-या व कर्तव्ये वेगवेगळी आहेत. मंजुर आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या गड-ड मधील पदांचे एकूण ०५ संवर्ग (सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई/मदतनीस) तयार करुन त्याची संवर्गनिहाय स्वतंत्र सेवाज्येष्ठता यादी तयार करावी. त्यानंतर आकृतीबंधातील मंजुर पदसंख्या व प्रत्यक्ष नेमणूक करण्यात आलेली संख्या याची पडताळणी करुन कमी/जास्त कर्मचा-यांकडून संमतीपत्र (विकल्प) भरुन घेऊन त्यांना रिक्त पदांवर दर्शविणेचे निर्देश दिलेले आहेत.

सदर निर्देशास अनुसरून मंजूर आकृतीबंधानुसार गट-ड संवर्गातील एकूण पदांची सेवाज्येष्ठता यादी तयार करणेत आलेली आहे. त्यानुसार संस्थान आस्थापनेवर माहे डिसेंबर, २०१६ अखेर गट-ड मध्ये विविध पदांवर एकूण १२१० कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचा-यांची संवर्गनिहाय कमी/ जास्त माहिती खालीलप्रमाणे –

(१) सफाई कर्मचारी –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
सफाई कामगार	१७३	५५	११८
सफाई कामगार / मदतनीस	०	१२९	-१२९
एकूण -	**१७३**	**१८४**	**-११ अतिरिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार सफाई कामगार या हुद्याची १७३ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार ५५ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच सफाई कामगार / मदतनीस या पदावर १२९ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. सफाई कामगार/मदतनीस असे पद आकृतीबंधात नाही. त्यामुळे १२९ कर्मचा-यांची नावे सफाई कामगार या संवर्गात घ्याव्ये लागतील. या सर्व कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी सोबत **परिशिष्ट "अ"** जोडली आहे. मंजुर पदे व नेमणूक आदेश दिलेली संख्या विचारात घेता ११ पदे अतिरिक्त होत आहेत. त्यामुळे सोबतच्या सेवाज्येष्ठतेनुसार सेवाज्येष्ठ कर्मचा-यांचे संमतीपत्र (विकल्प) घेऊन या कर्मचा-यांना मदतनीस/शिपाई या संवर्गात वर्ग करता येईल, त्यास मान्यता असावी.

(२) सुरक्षा रक्षक –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
सुरक्षा रक्षक	१६१	१०	१५१
सुरक्षा रक्षक / मदतनीस	०	१०२	-१०२
एकूण -	**१६१**	**११२**	**४९ रिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार सुरक्षा रक्षक या हुद्याची १६१ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार १० कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच सुरक्षा रक्षक / मदतनीस या पदावर १०२ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. सुरक्षा रक्षक/मदतनीस असे पद आकृतीबंधात नाही. या सर्व कर्मचा-यांची नांवे सुरक्षा रक्षक या संवर्गात घेणेस मान्यता असावी. (सोबत ११२ कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट "ब"** जोडली आहे.)

(३) वॉर्डबॉय –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
वॉर्डबॉय	५८	७	५१
वॉर्डबॉय / मदतनीस	०	४३	-४३
एकूण -	**५८**	**५०**	**८ रिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार वॉर्डबॉय या हुद्याची ५८ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार ७ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच वॉर्डबॉय / मदतनीस या पदावर ४३ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. वॉर्डबॉय/मदतनीस असे पद आकृतीबंधात नाही. या पदावरील सर्व कर्मचा-यांची नांवे वॉर्डबॉय या संवर्गात घेणेस मान्यता असावी. (सोबत ५० कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट "क"** जोडली आहे.)

(४) आया –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
आया	४५	९	३६
आया / मदतनीस	०	१३	-१३
एकूण -	**४५**	**२२**	**२३ रिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार आया या हुद्याची ४५ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार ९ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच आया / मदतनीस या पदावर १३ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. आया/मदतनीस असे पद आकृतीबंधात नाही. या पदावरील सर्व कर्मचा-यांची नांवे आया या संवर्गात घेणेस मान्यता असावी. (सोबत २२ कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट "ड"** जोडली आहे.)

(५) मदतनीस/ शिपाई –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
मदतनीस	७०७	६२०	८७
शिपाई	४५	१०	३५
शिपाई / मदतनीस	०	५	-५
एकूण -	**७५२**	**६३५**	**११७ रिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार मदतनीस या हुद्याची ७०७ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार ६२० कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. शिपाई या हुद्याची ४५ पदे मंजुर आहेत. त्यापैकी नेमणुक आदेशानुसार १० कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच शिपाई / मदतनीस या पदावर ५ कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. शिपाई/मदतनीस असे पद आकृतीबंधात नाही. या पदावरील सर्व कर्मचा-यांची नांवे मदतनीस/ शिपाई या संवर्गात घेणेस मान्यता असावी. (सोबत ६३५ कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट " इ "** जोडली आहे.)

(६) इतर मंजुरपदांवर कार्यरत कर्मचारी –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
आय.सी.सी.यु. मदतनीस	३	३	०
लॅब मदतनीस	१	१	०
ओपीडी मदतनीस	९	७	२
पंप ऑपरेटर / मदतनीस	११	७	४
क्ष-किरण मदतनीस	१	१	०
टेलर / मदतनीस	१	१	०
एकूण -	**२६**	**२०**	**६ रिक्त**

मंजुर आकृतीबंधानुसार आयसीसीयु मदतनीस, लॅब मदतनीस, ओपीडी मदतनीस, पंप ऑपरेटर/मदतनीस, क्ष-किरण मदतनीस, टेलर/मदतनीस या हुद्याची २६ पदे मंजुर आहेत. नेमणूक आदेशानुसार २० कर्मचा-यांची संबंधीत पदावर नेमणूक करणेत आलेली आहे (सोबत २० कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट " ई "** जोडली आहे.)

(७) मंजुर आकृतीबंधाव्यतिरिक्त इतर पदांवर कार्यरत कर्मचारी –

पदनाम	मंजुर पदसंख्या	संबंधीत पदावरील नेमणूक आदेशानुसार कर्मचारी संख्या	रिक्त / अतिरिक्त पदसंख्या
वर्ग-४ कर्मचारी	०	१६१	-१६१
चोपदार	०	२	-२
माळी	०	४	-४

स्टोअर मदतनीस / मदतनीस	०	१	-१
वाढपी	०	१८	-१८
वर्कशॉप / मदतनीस	०	१	-१
एकूण -	**०**	**१८७**	**-१८७ अतिरिक्त**

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. त्यापुर्वी संस्थान आस्थापनेवर चोपदार २, माळी ४, स्टोअर मदतनीस / मदतनीस १, वाढपी १८, वर्कशॉप / मदतनीस १ अशा एकूण २६ कर्मचा-यांना नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. त्यांना मदतनीस / शिपाई या संवर्गात दर्शविणेस मान्यता असावी.

तसेच संस्थान आस्थापनेवर १६१ कर्मचा-यांना वर्ग- ४ या पदावर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. सदरचे पद मंजुर आकृतीबंधात नाही. अशा कर्मचा-यांकडून संमतीपत्र (विकल्प) भरुन घेऊन सेवाज्येष्ठता व रिक्त पदसंख्येनुसार मदतनीस/शिपाई, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय व आया या संवर्गातील रिक्त पदांवर दाखविता येईल, त्यास मान्यता असावी. (सोबत १८७ कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी **परिशिष्ट " उ "** जोडली आहे.)

उपरोक्त अ.नं.१ ते ७ मध्ये नमुद केलेप्रमाणे गट-ड मधील कर्मचा-यांचे (सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई/ मदतनीस) संवर्ग तयार केल्यानंतर त्यांची संवर्गनिहाय सेवाज्येष्ठता यादी व बिंदुनामावली तयार करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.६ मध्ये नमुद मंजुर पदांवरील कार्यरत कर्मचारी शिपाई/ मदतनीस या संवर्गात दाखविणेत येऊन, मान्य आकृतीबंधानुसार वेतनबँण्ड ४४४०- ७४४० अधिक ग्रेड पे १३०० (गट-ड) मधील मंजुर पदांचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया व शिपाई/ मदतनीस असे संवर्ग तयार करुन त्यांची संवर्गनिहाय सेवाज्येष्ठता यादी व बिंदुनामावलीतयार करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

आयत्या वेळेचा विषय नं.०६ **श्री साईबाबा संस्थानमधील कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन वाढीबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समिती सभा, दि.१९.९.२०१६, निर्णय क्र.६८७ इकडील कार्यालयास प्राप्त झाला असून, त्यात विश्वस्तांचे सूचना- संस्थान मध्ये जवळ पास १६ वर्षाहून अधिक काळ कंत्राटी पध्दतीने कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून, त्यांना महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे. सध्याचे वाढत्या महागाईचा विचार करता, सहानुभूतीच्या दृष्टीकोणातून कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन वाढविणेबाबत तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा असा पारित झालेला आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे कंत्राट, मे. जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स लि., पुणे, या दोन एजन्सीला देण्यात आलेले असून, या दोन्ही एजन्सीकडून आज, माहे जानेवारी-२०१७, अखेर संस्थानला अकुशल- २०७१ व कुशल– ६३६ एकूण २७०७ कुशल,अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येत आहे,सदरचे अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२८ सप्टेंबर-२०१०, रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचेकडील, दि.४.२.२०१७,रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौंन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदरानुसार अकुशल कंत्राटी कामगार रूपये २९४.४७ प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार रूपये ३२५.२४ प्रतिदिनी वेतन देण्यात येत आहे. व वेळोवेळी स्पेशल अलौंन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेत येते.

०१. यापूर्वी, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी,यांचे समान काम समान वेतनाबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर,यांचेकडील पत्र जा.क्र.सकाआ/नगर/किवेब/२३०३, दि.६-४-२०१५, अन्वये इकडील कार्यालयास पत्र प्राप्त झालेले होते. त्यात, त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, येथील कंत्राटी कामगारांना कंत्राटी कामगार अधिन्यिम,१९७०, अन्वये वेतन व महागाई भत्ता मिळणेबाबत, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, येथील कंत्राटी कामगार संघटनेच्या प्रितनिधीत्व करणा-या कामगार संघटनेने कंत्राटी कामगार व नियमित कामगार हे समान स्वरूपाचे काम करीत असल्याने त्यांचे पगारामध्ये खुपच तफावत असल्याने कंत्राटी कामगार अधिनियमाच्या तरतुदीनुसार समान कामासाठी समान वेतन याचा अवलंब करण्यात येऊन त्यांना नियमित कामगाराप्रमाणे वेतन मिळवुन दयावे अशी मागणी करणेत आलेली होती.

०२) त्यावर, सदर प्रकरणी चर्चा करून, मार्ग काढण्यासाठी दि.१०-०४-२०१५, रोजी, सकाळी ११.३० वा,मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर,यांचे कार्यालयात बैठक आयोजित करणेत आलेली होती,सदर बैठकिस प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) व प्र.कामगार अधिकारी उपस्थित होते, बैठकी दरम्यान सदर संघटनेचे दि.२३-०२-२०१५, रोजीचे पत्र संस्थानला प्राप्त झाले नसले बाबत सांगितले,

मा.सहाय्यक कामगार आयुक्त, यांनी सदर पत्राची प्रत संस्थानला देणेबाबत संघटनेचे प्रतिनिधींना सांगितले, त्यांनतर,मा. सहाय्यक कामगार आयुक्त, यांनी संस्थान प्रतिनिधी यांना तुम्ही तुमचे लेखी म्हणने, दि.२४-४-२०१५, रोजी सादर करावे असे निर्देश दिले होते.

त्यानुसार संस्थान मार्फत, ॲड., श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर, यांचे सल्ल्याप्रमाणे, दि.२४-४-२०१५, रोजी,खालील नमूद प्रमाणे, मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर,यांना लेखी म्हणने समक्ष सादर करण्यात आले आहे.

०३) तदनंतर, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, यांनी पुन्हा, दि.२२.१०.२०१५, रोजी समान काम समान वेतन दयावे, अन्यथा, दि.२८.१०.२०१५, पासून शांततेच्या मार्गाने आमरण उपोषणास बसणार असलेबाबत पत्र सादर केले होते,तसेच,सदर उपोषणा बाबत महाराष्ट्र शासन, यांनी पत्रक्र. संकीर्ण-२०१५/७३७ /प्र.क्र. १४४/का .१६/ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.१९.१०.२०१५,चे, पत्राने कंत्राटी कर्मचारी उपोषणा बाबत आपल्या स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत सदयस्थिती बाबतचा अहवाल शासनास सादर करावा असे कळविलेले होते.

०४) तदनंतर, श्री साईबाबा संस्थान असघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, यांना इकडील पत्र क्र.जा.नं. एसएसएस/ वशी७ए/ ४१८०/२०१५, दि.२७.१०.२०१५, अन्वये समान काम समान वेतना बाबतचा विषय त्रिसदस्य समिती सभेसमोर देणे कामी सादर करणयात आलेला असून,आपणउपोषणास बसू नये बाबत संस्थानकडून कळविणेत आलेले होते.

०५) तरीही, दि.२८.१०.२०१५,पासून,श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांनी उपोषण सुरु केले होते.

०६) तदनंतर कंत्राटी कर्मचारी समान काम समान वेतना बाबत,दि.२७.१०.२०१५ ,रोजीचे, मा.त्रिसदस्य समिती सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता, मा.त्रिसदस्य समिती सभे मध्ये त्यावर चर्चा होऊन त्याबाबत प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणे बाबत निर्णय झाला होता, तसेच,विधी व न्याय विभागाचे पुढील आदेश प्राप्त झाले नंतर,मा.उच्चन्यायालय, खंडपीड औरंगाबाद ,यांचे मान्यते नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल बाबत लेखी निर्णय झालेने

इकडील जा.नं. एसएसएस/ वशी७ए/ ४१८८/ २०१५, दि.२८.१०.२०१५, अन्वये सदर संघटनेचे प्रतिनिधी यांना कळविणेत आलेले होते.

०७) त्यानंतर,मा.त्रिसदस्य समिती सभेच्या निर्णय क्र.४१२ नुसार महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील दि.१०.०६.२०१४,रोजीच्या परिपत्रकानुसार संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन देणे बाबत विधी व न्यायविभागयांचे अभिप्राय घेण्यात यावे असा ठराव मंजूर करण्यात आला होता, त्यानुसार, संस्थानकडून मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई,यांना जा.नं.एसएसएस/ वशी7 ए/ ४२५१/२०१५, रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविणेत आलेला असून, विधी व न्याय विभाग यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे, परंतु,अदयाप पावेतो विधी व न्याय विभागाकडून संस्थानला लेखी अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

०८) त्यानंतर, मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर, यांचे कडील जा.क्र.सकाआ/ अ.नगर/ किवेनि/ १८७७ /२०१६, दि.२२.०८.२०१६,रोजीचे पत्रइ कडील कार्यालयास प्राप्त झाले होते, सदर पत्रात असंघटीत कामगार संघटना, शिर्डी, यांचे समान काम समान वेतनाचे पत्र प्राप्त झालेने समान काम समान वेतन बाबत चर्चेतून तोडगा काढण्यासाठी, दि.२५.८.२०१६,रोजी,कामगार आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित केली असलेबाबत कळविलेने, सदर बैठकी कामी,उपकार्यकारीअधिकारी व प्र.कामगार अधिकारी, हे उपस्थित होते, सदर बैठकित कंत्राटी कामगार यांना समान काम समान वेतन देणे बाबतचा शासनास पाठविलेल्या प्रस्तावावर संस्थान तर्फे पाठपुरावा करणेत यावा असे त्यांनी सूचना दिलेल्या असल्याने, इकडील पत्रक्र.एसएसएस/ वशी7ए/ २८९०/ २०१६ दि.८.९.२०१६, अन्वये, मा.प्रधान सचिव,विधी व न्यायविभाग, मंत्रालय, मुंबई, यांना,समान काम समान वेतना बाबत अभिप्राय मिळणे बाबत विनंती पत्र पाठविणेत आलेली असून सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबीत आहे.

आज मितीस संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल-२०७१ व कुशल -६३६असे एकूण २७०७ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनावर प्रतीमहिना रक्कमरु.२,७६,८१,७७७/- इतका खर्च येत आहे.

सध्या, श्री साईबाबा हॉस्पीटल,मध्ये लेबर ठेकेदार यांचेमार्फत काम करणारे कंत्राटी परिचारक व परिचारीका, कंत्राटी डायलेसिस टेक्नीशियन, एम.आर.आय. व सिटीस्कॅन टेक्नीशियन यांना रू.११,०००/-, कंत्राटी परफ्युनिस्ट यांना, रू.२१,०००/- तसेच कंत्राटी आर.एम.ओ. वसी.एम.ओ. यांना,रू.४०,०००/- मात्र एकत्रित मानधन दिले जाते,तसेच,सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना सहा दिवसानंतर एक पगारी आठवडा सुट्टी देण्यात येते, तसेच, मालमत्ता विभागातील कंत्राटी सल्लागार यांना,रु.१५,०००/-,तसेच, कंत्राटी मोजणीदार यांना रू.१२,०००/- एकत्रित मानधन दिले जाते.

उपरोक्त, मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयाप्रमाणे वाढत्या महागाईचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र शासनाचे किमान दरा व्यतिरिक्त अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना सहा दिवसा नंतर एक

पगारी आठवडा सुट्टी देऊन त्यांचे प्रति महिन्यातील हजर दिवसाप्रमाणे किमान वेतनदरा व्यतिरीक्त कुशल कर्मचाऱ्यानां (२६ हजर दिवसांकरीता) रु.५०००/- व अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांना (२६हजरदिवसांकरीता) रु.४०००/- इतके प्रति महिना वेतनवाढ देता येईलबाबत तौलानिक प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता, परंतु, सदर प्रस्तावावर, मुख्यलेखाधिकारी, यांचे अभिप्रायासह व यापुर्वीच्या शासनाच्या/ व्यवस्थापन समितीच्या ठरावासह सादर करा, असा रिमार्क दिल्याने, मुख्यलेखाधिकारी, यांचेकडून सदर प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यात आज, दि.३१.१.२०१७,रोजी, मा.कार्यकारी अधिकारी, यांचेशी समक्ष चर्चा झाली, त्यानुसार, मा.अध्यक्ष सो, यांचेशी, दि.२५.१.२०१७, रोजी, मुंबई, येथील बैठकीतील चर्चेनुसार वेतनवाढ किमान वेतनावर % मध्येवाढ दर्शवून परिगठीत करुन सादर करावे असे ठरले, त्यानुसार, २०%, ३०%, ४०% वाढ याप्रमाणे पर्याय ठेवण्यात यावेत बाबत सूचित केलेले आहे.

त्यानुसार किमान वेतनावर २०%,३०%,४०% वाढ दिल्यास येणा-या जादा अतिरीक्त खर्चाची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे-

अ) २० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च

अ.नं.	अकुशल/कुशल कर्मचारी संख्या	सध्या वेतनावर येत असलेला खर्च रू.	२० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च रू.	अतिरीक्त होणारा खर्च रू.
१.	२७०७	२,७६,८१,७७७.००	३,३२,१७,८९५.००	**५५,३६,११८.००**

ब) ३० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च

अ.नं.	अकुशल/कुशल कर्मचारी संख्या	सध्या वेतनावर येत असलेला खर्च रू.	३० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च रू.	अतिरीक्त होणारा खर्च रू.
१.	२७०७	२,७६,८१,७७७.००	३,५९,८६,३१०.००	**८३,०४,५३३.००**

क) ४० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च

अ.नं.	अकुशल/कुशल कर्मचारी संख्या	सध्या वेतनावर येत असलेला खर्च रू.	४० % वेतन वाढ दिल्यास होणारा खर्च रू.	अतिरीक्त होणारा खर्च रू.
१.	२७०७	२,७६,८१,७७७.००	३,८७,५४,४८८.००	**१,१०,७२,७१०.००**

विभागाचा अभिप्राय- याबाबचे किमान वेतनानुसार तपशिलवार तौलानिक तक्ते सोबत परिशिष्ट **"ड"** म्हणून जोडलेले आहे.

उपरोक्त नमूद प्रमाणे टक्केवारी नुसार अतिरीक्त खर्च येणार असून, संस्थानचे अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांना महाराट्र शासनाचे किमान वेतनदरावर २०%, ३०%, ४०% प्रमाणे सोबतचे तक्त्यात नमूद प्रमाणे वाढीव वेतन देणे बाबत, तसेच, दर सहामहिन्यांनी किमान वेतनावर होणारे वाढीवरसुध्दा उपरोक्त प्रस्तावानुसार मंजूर होणाऱ्या वाढीनुसार, किमानवेतनावर वाढ देणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही, त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत यापुर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे, समान काम समान वेतन देणे, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणे या बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून त्याचाही पाठपुरावा चालू आहे. संस्थानचा प्रशासनावरील खर्च सुमारे ४५% पर्यंत होत आहे व कंत्राटी कामगारांना सध्या देत असलेल्या वेतनाव्यतिरिक्त प्रती व्यक्ती जवळपास २८% (सेवाकर १५% व पी.एफ.१३.३६%) रक्कम संस्थानला अदा करावी लागत आहे.**

सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा रु.१० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे महागाई निर्देशंकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुरकरणेत आली.

परंतु सदरहू वेतनवाढ देणेपुर्वी कंत्राटदारामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून संस्थान विरोधात यापुढे आंदोलन करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात यावे व या कंत्राटी कर्मचाऱ्यांची दरवर्षी गैरहजेरी तपासणेत यावी. यामध्ये आठवडा सुट्टया वगळता, आजारीपण/ सबळ कारणाशिवाय १०% पेक्षा जास्त दिवस गैरहजर असेल, किंवा जे कर्मचारी वारंवार गैरहजर रहात असतील, अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांना संबंधीत कंत्राटदाराने तात्काळ कामावरुन कमी करावे या बाबीचा समावेश नवीन कंत्राटदार नेमताना त्यांच्या बरोबरच्या करारनाम्यात करणेत यावा.

तसेच कंत्राटदारामार्फत नवीन रुजू झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना रुजू दिनांकाच्या एक वर्षानंतर, त्यांची हजेरी व काम समाधानकारक असेल तरच वेतनवाढ देण्यात यावी.

या कंत्राटी कर्मऱ्यांच्या कामाचे सर्वंकष मुल्यमापन दरवर्षी ०१ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान करणेत यावे व त्यांचे तांत्रिकज्ञान, कामाचा दर्जा, गुणवत्ता, उपस्थिती इ. मुद्यांच्या आधारे, अ, ब, क, ड असे वर्गीकरण करुन त्याचा अहवाल ३० एप्रिल पर्यंत संस्थानला सादर करावा. या मुल्यमापन अहवालाच्या आधारे दरवर्षी कोणत्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ सुरु ठेवायची याचा निर्णय संस्थानमार्फत घेतला जाईल. यासाठी संबंधीत कंत्राटदाराने त्रयस्थ यंत्रणेची नेमणूक करावी व आवश्यकतेनुसार विभागप्रमुख/ प्रशासकीय अधिकारी यांची मदत यावी, असे ठरले.

मनुष्यबळ व्यवस्थापन अहवालानुसार संस्थान विभागांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ असल्याचे निदर्शनास आले आहे. याकरीता यापुढे अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येऊ नये. तसेच, संस्थानमध्ये कार्यरत असलेले कायम कर्मचारी व कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले कुशल/ अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनावरील होणाऱ्या खर्चाबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवलोकनार्थ पाठविणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- कामगार अधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **जानेवारी- २०१६ ते माहे ऑक्टोबर- २०१६ या कालावधीत ३१% पुढील गैरहजरीमुळे कमी केलेल्या अकुशल, कुशल व सुरक्षा कामगारांना पुर्ववत कामावर घेणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर यांचे मार्फत पुरविण्यात येणारे अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी कोणतीही पुर्वसूचना न देता गैरहजर राहतात व त्यामुळे संस्थानच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडचण निर्माण होते. याकरीता आजारी किंवा गंभीर कारणाने गैरहजर राहीलेले कंत्राटी कर्मचारी वगळता माहे जानेवारी २०१६ ते माहे ऑक्टोंबर २०१६ या कालावधीतील ३१ % व त्यापेक्षा जास्त दिवस/ वारंवार गैरहजर अनुपस्थित असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना त्वरीत कामावरुन कमी करणेबाबत संबधित ठेकेदारांना कळविण्यात यावे. तसेच संस्थान कामाची गैरसोय होऊ नये याकरीता नवीन पात्र कंत्राटी कर्मचारी कामावर घेण्यात यावे बाबत मा.व्यवस्थाप समिती सभा दि.३०.११.२०१६ निर्णय क्रमांक ८५० निर्णय पारित झालेने संस्थानला लेबर व सिक्युरिटी कंत्राटी कर्मचारी पुरविणारे मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व मे. मॉडर्न व्ही. आर सिक्युरिटी फोर्स, पुणे या दोन एजन्सींना ३१ % व त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणारे कंत्राटी कर्मचा-यांना त्वरीत कामावरुन कमी करणेबाबत इकडील पत्र क्र.जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ३६९१/ २०१७, दि.१४/०१/२०१७ अन्वये कळविण्यात आले होते.

त्यानुसार दि.१७/०१/२०१७ रोजी पासुन ०१. मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे यांनी त्यांचेकडील सतत गैरहजर राहणारे एकूण ६४ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी व २) मे.मॉडर्न व्ही. आर सिक्युरिटी फोर्स, पुणे यांचे कडील सतत गैरहजर राहणारे एकूण १२१ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी कामावरुन कमी केलेले आहे. दोन्ही एजन्सी मिळून एकूण १८५ कंत्राटी कर्मचारी कामावरुन कमी केलेले आहे.

आता उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि. १५.०२.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्यात संस्थानचे मा. व्यवस्थापक समितीने दि.३०-११-२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५० नुसार संस्थानला ठेकेदारामार्फत पुरविण्यात येणारे कंत्राटी कर्मचा-यांपैकी वर्षभरामध्ये ३१% पेक्षा जास्त गैरहजर राहणारे कंत्राटी कर्मचा-यांना कामावरुन कमी करणेचा निर्णय झालेला असून त्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना कामावरुन् कमी करण्यात आलेले आहे. तरी कामावरुन कमी केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणे कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणे, कंत्राटी कर्मचा-यांना शासन परिपत्रक व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निकालाप्रमाणे समान काम समान वेतन देणे या मागण्या दि.२४-०२-२०१७ रोजी पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास नाईलाजास्तव संस्थानचे सर्व २६०२ कंत्राटी कर्मचारी शनिवार दि.२५.०२.२.०१७, रोजी पासुन काम बंद आंदोलन करतील व याची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील बाबत कळविलेले आहे.

तरी उपरोक्त मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार, सतत गैरहजर असणारे अकुशल, कुशल व सुरक्षारक्षक असे एकूण १८५ कंत्राटी कर्मचारी यांना, दि.१७.०१.२०१७, पासून कमी केलेल्या संबधित कर्मचाऱ्यांना पुर्ववत कामावर घ्यावयाचे झाल्यास संबधित एजन्सीकडून कमी केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांकडून, यापुढील कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहील्यास, मला कोणतेही कारण न देता कामावरुन कमी

करणेचा अधिकार संबधित एजन्सीस राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही अशा प्रकारे आशयाचे रु.१००/- चे स्टॅम्प पेपर प्रतिज्ञा पत्र लिहुन घेतलेले असून, मे.जय भवानी एंन्टरप्रायजेय यांचे ६४ पैकी ३४ व मे. मॉडर्न व्ही आर यांचे १२१ पैकी ५७ कामगारांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

तरी अशा कमी केलेल्या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत प्रस्तावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, जानेवारी- २०१६ ते माहे ऑक्टोबर- २०१६ या कालावधीत गैरहजरीचे प्रमाण जास्त असलेल्या कुशल/ अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांना शिस्त लागावी व संस्थानच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये, या कारणास्तव कामावरुन कमी केलेले होते.**

आता, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे विनंतीचा विचार करता, सदरहू कामावरुन कमी केलेल्या प्रस्तावित कुशल/ अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी आरोग्य विभागातील अकुशल कंत्राटी कर्मचारी आरोग्य विभागात व इतर सर्व कंत्राटी (कुशल/ अकुशल/ सुरक्षा) कर्मचारी श्री साईप्रसादालय विभागामध्ये हजर करुन घेण्यात यावे. परंतु त्यांचेकडून परत असे कृत्य घडू नये, याकरीता कामावर हजर करुन घेणेपुर्वी ठेकेदारामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून यापुढे विनापरवानगी गैरहजर राहणार नाही/ संस्थान नियमाविरोधात वर्तन करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र घेण्यात यावे.

तसेच या कर्मचाऱ्यांची सबळ कारणाअभावी भविष्यामध्ये १०% पेक्षा जास्त गैरहजेरी आढळून आल्यास त्यांना तात्काळ कामावरुन कमी करणेबाबत कंत्राटदारास कळविणेत यावे. दर ६ महिन्यांनी या कर्मचाऱ्यांच्या हजेरीचा आढावा घेऊन तो अवलोकनार्थ व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा. त्यांचे हजेरीच्या प्रमाणामध्ये सुधारणा झालेली असेल, तरच त्यांना इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे (६ महिन्यानंतर) सुधारीत वेतनवाढ लागू करावी, असे ठरले.

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

आयत्या वेळेचा विषय नं.०८ **श्रींचे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६- १७(१) संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे,

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- निरंक

प्रास्ताविक- साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभतेने व्हावे याकरीता मंदिर परिसरात Live Darshan यंत्रणा कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर यंत्रणा कार्यान्वित करुन २० वर्ष होवुन गेलेले आहे व सदरची यंत्रणा ही Analog System ची आहे. सदरचे Analog System द्वारे दर्शन लाईन, मंदिर परिसर, साईप्रसादालय, साईनिवास अतिथीगृह, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम-१, संस्थानचे रुग्णालये विभाग व इतर ठिकाणी श्रीं चे Live Darshan चे प्रक्षेपण करण्यात येत आहे. यामध्ये समाधी मंदिर, गुरुस्थान, द्वारकामाई, चावडी इ. या ठिकाणचे प्रक्षेपण होत आहे. सदर यंत्रणेत NVR, DVR, D.Modulator, Switches, Transmeter, Media Convertor, Control Panel, Optic Fiber Cable व इतर अनुषंगीक साहित्य बसविण्यात आलेले असुन त्यातील बरेचसे साहित्य हे कालबाहय झालेले आहे.

सदरची Live Darshan ची यंत्रणा Analog System असल्यामुळे त्याची Clearity, HD Quality साईभक्तांना स्पष्ट दिसुन येत नाही. त्यासाठी सध्या Live Darshan करीता Digitalized Technology मध्ये HD, VGA अशा नविन यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. सदर Digitalized Technology द्वारे Live Darshan प्रक्षेपणात Video Mixing, Name Scrolling, Photos इ. अशा सुविधेचा वापर करता येईल. तसेच त्याची Connectivity चॅनेलद्वारे प्रक्षेपण करता येईल. याकरीता इंटरनेटचे माध्यमातुन घेण्यात आलेल्या माहितीनुसार सध्या बाजारात HD System साठी उपलब्ध असणारे साहित्य व त्यांचे दराचा तपशील खालीलप्रमाणे –

अ)

Sr. No.	PARTICULARS	Image	Qty	Rate	Amount
Camera Systems					
1)	CMOS Image Sensor, Mega Pixel, P Resolution, mm Lens, Optical Zoom, Laser Light / Array LED above 300 Mtrs.,Lightning Protection, Support Onvif Preset Positing Systems, IP Housing, Outdoor Speed Dome Camera		**4**	87,996	3,51,984

2)	CMOS Image Sensor, Mega Pixel, P Resolution, mm Lens, Optical Zoom, Array LED 80 Mtrs. Lightning Protection, Support Onvif Preset Positing Systems, IP 66 Housing, Outdoor Speed Dome Camera		**1**	29,500	29,500
3)	High Performance Embedded Microprocessor, Mode 1: 16 OR 16 Digital Analog Mode 2: 8 8 Analog Digital / Mode 3 : 16 Mode : 3.0 MP (4 Camera) AV / VGA/ HDMI Simultaneously Output, Support Up to 4TB HDD 2 SATA. Full HD Resolution		**1**	32,750	32,750
Digtal long distance connectivity					
4)	HDMI Extender over IP • Compatible HDCP. • Supports 1080p and 720p video, plus 2-channel audio • Uses off-the-shelf gigabit IP switches for extension and distribution		4	35,995	1,43,980
5)	HDMI Extender over IP • Supports 1080p and 720p video, plus 2-channel audio • Uses off-the-shelf gigabit IP switches for extension and distribution		146	22,995	33,57,270
6)	**RING MEDIA CONVERTER 10 / 100 / 1000 MB WITH MANAGABLE** 4 PORT 10 / 100 /1000 INDUSTRIAL GRADE Ring Media Converter, 1Console Port Support Web Management 2 Fiber Port :1.25 Gbps FC / Connector SM - 20 Km		7	64,995	4,54,965
RF SYSTEMS ANALOG SYSTEMS					
7)	4 ch digital encoder		1	85000	85000
8)	Satup box		4	2500	10000
9)	Node amplifiere		1	4500	4500
10)	4 ch mixture		1	850	850
Accessories					
11)	42U 19" rack with tray		2	52,450	1,04,900
12)	6U 19" rack with tray		6	6,500	39,000
13)	8 Port Networking Switch 10/1000 mbps		32	5,500	1,76,000
14)	RJ 45 Patch cord 35 mtr.		160	1,200	1,92,000
15)	LIU 12 Port loaded Single Mode		9	6,500	58,500
16)	Fiber Pigtails SM		18	175	3,150
17)	Fiber Patch Cord SM (3Mtr.)		18	250	4,500
	Total				50,48,849
	Vat 13.5%	45,81,949			6,18,563
	Vat 6%	4,34,150			26,049
	Total				56,93,461

Sr. No.	PARTICULARS	Qty	Rate	Amount
1	splicing of fiber	35	950	33,250
2	SMI (Service, Maintenance & Installation)		7,38,157	7,38,157
	Total			7,71,407

	15% ST			1,15,711
	Total			8,87,118
	G.Total			**65,80,579**

तसेच व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफीकरीता देखील बाजारात नविन साफ्टवेअर, शुटींग कॅमेरे तसेच इतर अनुषंगीक साहित्य उपलब्ध आहेत. नविन सॉफ्टवेअरचा उपयोग Video Mixing, Video editing, Photo editing करण्यासाठी होवु शकेल. Titling (Scrolling Message) साफ्टवेअरद्वारे संस्थानचे विविध कार्यक्रमांची माहिती, उत्सव काळातील पालखी दर्शन, रथ, स्टेज कार्यक्रमांची माहिती Scrolling पद्धतीने प्रदर्शित करता येईल. सदर साफ्टवेअर अथवा इतर अनुषंगीक साहित्यांचा तपशील खालीलप्रमाणे –

ब)

Sn.		Particular	Qty	Price	Amount
1		Shooting Camera			
	A	Panasonic HC-PV100 New Semi-Pro Video Camera	1	1,12,500	1,12,500
	B	Sony Hxr-Nx5r NXCAM Professional Camcorder	1	2,50,000	2,50,000
2		Photography Camera			
	A	Nikon D810 DSLR Camera (with 24-120mm VR Lens)	1	2,64,745	2,64,745
	B	Flash 5000	1	9,000	9,000
	C	Nikon D610 Fx 36.3MP DSLR Camera	1	1,99,950	1,99,950
	E	Lens 24-120 Wide	1	66,100	66,100
	F	Flash 700	1	12,450	12,450
3		Tripod	2	16,289	32,578
4		Single Stand	2	3,900	7,800
5		Head Phone (Philips /Sony/Jbl/Bose)			
	A	Noise Canceling Headset	1	35,617	35,617
	B	HD 600 Open Dynamic Hi-Fi Professional Stereo Headphones (Black)	1	35,617	35,617
6		Umbrella (Stand And Wall Mount)	2	30,000	60,000
7		Port Light	2	8,000	16,000
8		Video Mixer 8 Chanel Roland Vr-3ex SD/HD A/V Mixer With USB Streaming	2	1,53,419	3,06,838
9		Audio Mixer 8 Chanel Yamaha Mg12xu 12-Input Stereo Mixer	2	24,890	49,780
10		Desktop Hp/Lenovo/Dell -2	2	50,622	1,01,244
	A	AMD /i7			
	B	16 Gb RAM,2TB HDD			
	C	8/16 Gb Graphics Card	1	50000	50,000
	D	Port- USB, HDMI, DV (FIREWIRE), LAN			
	E	Dvd Writer			
	F	Blue Ray Writer External	1	15,000	15,000
	G	Blue Ray Writer Cassette	20	300	6,000
	H	DVD Writer External	1	5,000	5,000
	I	Windows 7 Professional 64 Bit	1	12,000	12,000
11		Switch -2			
	A	Cisco / Hp	2	25,500	51,000
12		Software			
	A	Video Editing			
	i	Sony Vegas / Edius Pro /Pinacle	1	35,000	35,000
	ii	Coral Draw	1	48,000	48,000
	iii	Photoshop	1	65,000	65,000
	iv	Adobe Reader 11	1	28,000	28,000
	v	Video Convertor All	1	25,000	25,000
	vi	Adobe Premiere Pro	1	70,000	70,000
	vii	Shri Lipi	1	15,000	15,000
	viii	Titling (Scrolling) Software	1	38,000	38,000
13		Podium pd 900 Ahuja	1	40,000	40,000

14		Sound And Video Recorder			
	i	Handy Recoder Hn4nsp	1	22,000	22,000
15		Door Access control	1	25,000	25,000
16		Eloik ALK-88A FTTH splicing fiber machine	1	1,65,000	1,65,000
17		OTDR 32/30Dbm	1	1,45,000	1,45,000
18		casing caping(25 Mtr)	25	900	22,500
19		Laser Color Printer CANON IRC3200 FULL COLOUR LASER COPIER, PRINTER, SCANNER AND FAX MACHINE	1	65,000	65,000
20		Laser Printer Duplex	1	40,000	40,000
					2547719

तरी, मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणा नविन अद्यावत करणेकरीता उपरोक्त तपशीलातील **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केलेले साहित्य, सॉफ्टवेअर खरेदी करणेकामी एकत्रित रक्कम रु. ९१,२८,२९८/- + All Taxes मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

मागणी– उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणा नविन अद्यावत करणेकरीता उपरोक्त तपशीलातील **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केलेले साहित्य, सॉफ्टवेअर खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकत्रित रक्कम रु. ९१,२८,२९८/- + All Taxes मात्र अंदाजे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान - तांत्रिक व आर्थिक.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणा नविन अद्यावत करणेकरीता उपरोक्त तपशीलातील **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केलेले साहित्य, सॉफ्टवेअर खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकत्रित रक्कम रु.९१,२८,२९८/- + All Taxes मात्र अंदाजे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.१४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणा नविन अद्यावत करणेकरीता प्रस्तावात नमुद केलेले साहित्य/ सॉफ्टवेअर विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ **संस्थानची सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा Royalty basis वर उपलब्ध करुन देणेसाठी ई-निविदेचे तांत्रिक व व्यावसायीक निविदा उघडून पुढील निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- मा. व्यवस्थापन समितीचे दि. 19/09/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 675.

प्रास्ताविक:- शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना त्यांचे मोबाईव्दारे मोबाईलॲप वापरुन विविध सुविधांचा लाभ सुलभतेने घेता यावा यासाठी त्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शिरडी येथे विविध ठिकाणी Wi-Fi सुविधा (Royalty Donation basis) वर उपलब्ध करुन देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 19/09/2016 रोजी मधील ठराव क्रं. 675 नुसार संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयान्वये संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार Wi-Fi सुविधा (Royalty Basis) उपलब्ध करुन देणेकामी दि. 15/11/2016 ते दि. 29/11/2016 पर्यंत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्याबाबत इकडील विभागाने या क्षेत्रातील अनेक पुरवठाधारकांना ई-मेलव्दारे कळविलेले होते. नमुद कालावधीमध्ये एकही ई-निविदा प्राप्त न झाल्याने सदरचे ई-निविदा पुर्व मान्यतेने तीन वेळेस मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु हया कालावधीतही एकही ई-निविदा प्राप्त झाली नाही.

सबब, सदरकामी व्दितीय वेळेस ई-निविदा दि. 09/01/2017 ते दि. 21/01/2017 या कालावधीमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्येही पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रक्रियेस चार वेळेस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. चतुर्थ मुदतवाढीची शेवटची दि. 23/02/2017 हि होती. सदर कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदांचा तपशिल पुढिलप्रमाणे.

अ.नं.	पुरविठाधारकांचे नाव	आवक नंबर व दिनांक
1	Ozone Networks Pvt. Ltd, Haryana	आ.नं. 20819 दि.20/01/2017
2	Reliance Jio Infocomn Ltd, Pune	आ.नं. 22469 दि.10/02/2017
3	Inmac Computers Pvt Ltd,	आ.नं. 22869 दि.16/02/2017
4	R.K. Infratel Limited, Surat	आ.नं. 23062 दि.20/02/2017
5	Swift Mail Communications Ltd, Noida	आ.नं. 23256 दि.23/02/2017

उपरोक्त प्रमाणे संस्थानचे परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा (Royalty Basis) उपलब्ध करुन देणेसाठी विविध निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडुन प्राप्त झालेल्या ई-निविदांचे तांत्रिक व व्यावसायीक निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडुन, पुढिल कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी: प्रस्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा Royalty Basis वर उपलब्ध करुन देणेसाठी विविध निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडुन प्राप्त झालेल्या ई-निविदांचे तांत्रिक व व्यावसायीक निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडुन, पुढिल आदेश होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान: तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: संस्थानचे परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा Royalty Basis वर उपलब्ध करुन देणेसाठी विविध निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडुन प्राप्त झालेल्या ई-निविदांचे तांत्रिक व व्यावसायीक निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडुन, पुढिल आदेश होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.१४४ **संस्थानची सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा Royalty basis वर उपलब्ध करुन देणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील तांत्रिक व व्यावसायीक निविदा आजचे सभेसमोर उघडणेत आल्या.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांबाबतची ई-निविदा उघडणेकामी पुढील सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१० **वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेले दरपत्रक उघडून निम्नतम दर देणाऱ्या विमा कंपनीस कार्यादेश देणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (२)(झ) -** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

प्रस्ताविक:- संस्थानचे ८८ वाहनांचा दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ या कालावधीतील विमा ई-निविदा प्रक्रीया राबवून निम्नतम दरधारक युनायटेड इंडिया इश्युरन्स कं. लि., शाखा- शिर्डी यांचेकडून उतरविण्यात आलेला असुन या कामी एकुण रक्कम रु.१६,५८,११२/- (अक्षरी रक्कम रु.सोळा लाख अठ्ठावन्न हजार एकशे बारा मात्र) खर्च आलेला आहे. तसेच उर्वरित १९ नवीन वाहनांचा विमा वेगवेगळया तारखेचा असल्याने विमा मुदत संपलेनंतर संबंधीत वाहनांचा विमा विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन दि.३१/०३/२०१७ अखेर घेण्यात आलेला असुन त्याकामी रक्कम रु.८६,८२५/- मात्र खर्च आलेला आहे. अशा प्रकारे दि.३१/०३/२०१७ अखेर १०७ वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी एकुण रक्कम रु.१७,४४,९३७/- (अक्षरी रक्कम रु.सतरा लाख चव्वेचाळीस हजार नऊशे सदवतीस) मात्र खर्च झालेला आहे.

सध्या वाहन विभागाकडील खालील तपशिला प्रमाणे विविध वाहनांचे विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

अ.नं.	वाहन प्रकार	संख्या
०१	कार्यालयीन वाहने	१३
०२	रुग्णवाहीका वाहने	१३
०३	सर्व बसेस	२४
०४	आपत्कालीन वाहने	०३
०५	मालवाहतुक वाहने	३१
०६	दुचाकी वाहने	०८
०७	बॅटरी कार वाहने	०४
०८	मोबाईल टॉयलेट	१०
	एकुण वाहने	**१०६**

दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर एकवर्ष कालावधी करीता वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा विमा उतरविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्यामध्ये स्पर्धा ही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा मागील वर्षी म्हणजे दि.०१ एप्रील, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ या कालावधीतील विमा नुतनीकरण करतेवेळी आलेला आहे. संस्थान फक्त सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेचे आवश्यकता नाही.

वाहन विभागातील विविध प्रकारचे १०६ वाहनांचा सन-२०१७-१८ करीता विमा नुतनीकरण करणे कामी सर्व राष्ट्रीयकृत कंपन्याकडूनच बंद लिफाफयातुन दरपत्रके मागविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख) पर्यंतचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे मान्यता घेणे कामीचा प्रस्ताव सभाकामकाज विभागाकडे दि.२७.१२.२०१६ रोजी देण्यात आलेला होता.

वाहन विभागाकडील दि.०७.०२.२०१७ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये स्थानिक स्वराज संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांची आचार संहिता असलेने, याकाळात मा.व्यवस्थापन समितीची सभा होणार नाही. तसेच सर्व वाहनांचा विमा नुतनीकरण करणेची कार्यवाही दि.३१.०३.२०१७ पुर्वी करणे आवश्यक असलेने तातडीने चार राष्ट्रीयकृत कंपन्याकडून दरपत्रके मागविणे मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ वाहन/ ५८७५/ २०१७ दि.१०/०२/२०१७ अन्वये दरपत्रके दि.२१/०२/२०१७ अखेर मागविण्यात आलेली होती.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- त्यानुसार दि.२१.०२.२०१७ अखेर राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद लिफाप्यामध्ये दरपत्रके प्राप्त झालेली आहे.

अ.न.	विमा कंपनीचे नांव	आवक क्रमांक व दिनांक	दरपत्रके स्थिती
१.	नेशनल इन्श्युरन्स कं.लि. कोपरगांव	२३१०७-२१.०२.२०१७	सिलबंद पाकीट
२.	युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. तत्पर सेवा कार्यालय शिर्डी	२३११२-२१.०२.२०१७	सिलबंद पाकीट
३.	दि.न्यु.इंडिया ॲश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर	२३११३-२१.०२.२०१७	सिलबंद पाकीट
४.	दि.ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लि.कोपरगांव	२३११४-२१.०२.२०१७	सिलबंद पाकीट
५.	युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय राहुरी	२३११५-२१.०२.२०१६	सिलबंद पाकीट

मागणी:- संस्थानचे १०६ वाहनांचा दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीचा विमा नुतनीकरण करणेची कार्यवाही दि.३१.०३.२०१७ पुर्वी होणे आवश्यक आहे. संस्थान वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन वरील प्रमाणे ०५ (पाच) सिलबंद दरपत्रके इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेली दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडुन निम्नतम दर दिलेल्या विमा कंपनीस विमा नुतनीकरण करणे कामी कार्यादेश देणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेली दरपत्रके स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.११ **शासन नियमानुसार संस्थानचे २४ वाहनांकरीता स्पिड गव्हर्नर बसविणेकामी दरपत्रके मागविणे.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कार्तव्य असतील." असे नमुद केलेले आहे.

२) कलम २१ (१) (ज) मध्ये, त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याहीकायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

प्रस्तावना:- केंद्र शासनाचे सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.०१.१२.२०१६ रोजीची अधिसूचनामध्ये,"*राज्य सरकार द्वारा केन्द्रीय मोटार यान नियम १९८९ के नियम ११८ के उपनियम (२) के अधीन अधिसूचित परिवहन वाहनों को गति नियंत्रक (गति प्रतिबंधक युक्तियॉ या गति प्रतिबंधक कार्य) से सज्जित करने की आवश्यकता से ३१ जनवरी, २०१७ की अवधि तक छुट प्रदान करती है*" असे नमुद केलेले

आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाचे परिवहन विभागाने दि.०१/०२/२०१७ पासुन थ्रीव्हिलर, ॲम्ब्युलन्स, फायर फायटर वगळता सर्व वाहनांना वेग-नियंत्रक अनिवार्य केलेले आहे.

यापुर्वी प्रादेशिक परिवहन कार्यालय मान्यता प्राप्त एजन्सी महाराष्ट्र ऑटो टेक्नॉलॉजीस कं., औरंगाबाद यांचेकडून संस्थानचे १३ स्कुल बसेस करीता वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) बसविण्यात आलेले आहे. आता, प्रवासी बस-११, मालवाहतुक (चार-चाकी) वाहने-१३ अशा एकुण २४ वाहनांकरीता वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) बसवावे लागतील. याकामी प्रति स्पिड गर्व्हनर अंदाजे रु.१०,०००/- प्रमाणे एकुण २४ वाहनांकरीता एकुण रु.२,४०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. सन-२०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये मोटारकार दुरुस्ती खर्चा करीता रु.२७,००,०००/- मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

विभागाचा अभिप्राय:- प्रवासी बस-११, मालवाहतुक (चार-चाकी) वाहने-१३ अशा एकुण २४ वाहनांकरीता वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) तातडीने बसविणे आवश्यक आहे. २४ वाहनांकरीता स्पिड गर्व्हनर बसविणे कामी प्रादेशिक परिवहन कार्यालय मान्यता प्राप्त एजन्सीकडून दरपत्रके मागवावी लागतील. तसेच याकामी जास्त पुरवठादारांचा प्रतिसाद मिळणे करीता स्पिड गर्व्हनर बसविणे कामी दरपत्रक मागणीचे पत्र संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- महाराष्ट्र शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार, संस्थानचे प्रवासी बसेस व मालवाहतुक वाहनांना स्पिड गर्व्हनर बसविणे आवश्यक असुन सदरची बाब आर्थिक आहे.

मागणी:- तरी संस्थानचे २४ वाहनांकरीता स्पिड गर्व्हनर बसविणे कामी प्रादेशिक परिवहन कार्यालय मान्यता प्राप्त एजन्सीकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख चाळीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे २४ वाहनांकरीता स्पिड गर्व्हनर बसविणेकामी प्रादेशिक परिवहन कार्यालय मान्यता प्राप्त एजन्सींकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ **नगर-मनमाड रस्त्यावर स्कायवॉक (पादचारी पूल) उभारणेकामी डिझाईन व बिल्ड तत्वावर निविदा मागविणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

०१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व परंपरा प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये, भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधिल पोट कलम (१क) अन्वये, विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा या सारख्या पायाभुत सुविधा पुरविणेसाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना साहाय्यक अनुदान देता येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय: मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.८९३ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, नगर-मनमाड रस्त्यावर स्कायवॉक (पादचारी पुल) ची उभारणीचे काम कमी कालावधीमध्ये होईल, साईभक्तांना होणा-या अपघाताची शक्यता राहणार नाही, रस्त्यावरील ट्रॉफीकला अडचण येणार नाही तसेच चालताना श्रींचे मंदिराच्या कळसाचेही दर्शन होईल या सर्व बाबींचा विचार करता सदरहू ठिकाणी संस्थानमार्फत गेट नं.१ जवळ स्कायवॉकची उभारणी करणेत यावी, असे ठरले.

तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना: शिर्डी शहरातून जाणा-या नगर-मनमाड रस्ता आता सिन्नर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० झालेला असून त्याची शिर्डी शहरातील लांबी ही कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचे अखत्यारीत आहे. त्यामुळे विषयांकीत पादचारी पुलाचे कामासाठी संस्थानकडून निधी

उपलब्ध करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ पोट कलम १ (क) अन्वये राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराकडून तयार करून जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां.) विभाग, अहमदनगर यांचे मान्यतेने स्कायवॉकची उभारणी करता येईल असे मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेत सादर केलेल्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. त्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरहु स्कायवॉक उद्वाहक (Lift) चे कामांसह उभारणेसाठी सन २०१६-१७ चे जिल्हादरसुचीतील दराने केलल्या प्राथमिक अंदाजपत्रकानुसार रु१,२९,१९,९०२/- मात्र खर्च अपेक्षित आहे. उद्वाहक (Lift) चे काम वगळल्यास रु.१,०३,१९,९०२/- मात्र खर्च येईल. याकामी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचेकडे परवानगी मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेकामी या प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक आवश्यक असल्याने याकामी आर्कीटेक्ट नेमणूकीसाठी Request for proposal मागविणेकामी जाहिरात देणेस मान्यतेसाठी दि.२१/१२/२०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दरम्यान दि.२५/०१/२०१७ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांचे उपस्थितीत मुंबई येथे कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व उपकार्यकारी अभियंता(बांधकाम) यांचेसमवेत झालेल्या बैठकीत आर्कीटेक्टची नेमणूक करणे ऐवजी सदरहू स्कायवॉक "डिझाईन व बिल्ड" तत्वावर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार याकामी उद्वाहक(Lift)चे काम वगळून रु.१,०३,१९,९०२/- मात्र खर्चाचा सदरहू स्कायवॉक "डिझाईन व बिल्ड" तत्वावर बांधणेसाठी Request for proposal मागविता येईल.

प्रस्ताव: शिर्डी शहरातून जाणा-या नगर-मनमाड रस्त्यावर समाधी मंदिर- जुने प्रसादालय परिसरात जाणे-येणेसाठी गेट नं.०१ चे जवळ (प्रसादालय गेट) स्काय वॉक उभारणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरहू प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर Design and build या तत्वावर उद्वाहक (Lift)चे काम वगळून स्कायवॉक उभारणीसाठी निविदा मागविणेस मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.१४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी शहरातून जाणा-या नगर-मनमाड रस्त्यावर समाधी मंदिरापासून जुने प्रसादालय परिसरात जाणेयेणेसाठी गेट नं.०१ चे जवळ (प्रसादालय गेट) स्काय वॉक उभारणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता मिळालेनंतर Design and build या तत्वावर उद्वाहक (Lift) चे काम वगळून स्कायवॉक उभारणीसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ **मोफत राज्यस्तरीय अपंग वधु-वर परिचय मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणे व दिड हजार अपंग बांधवांना अन्नदानाकरीता मोफत शिधा मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अपंग सामाजिक विकास संस्था, उंदिरगांव, श्रीरामपूर यांनी दि.०३/०२/२०१७. रोजीचे पत्रान्वये अपंग सामाजिक विकास संस्था व निर्मिती चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.२६.०२.२०१७ रोजी मोफत राज्यस्तरीय अपंग वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर शहरात अपंगाकरीता विशेष उल्लेखनिय कार्य सन १९९७ पासून करत आहे. अपंगाना व्यवसाय मार्गदर्शन, कौटुंबिक समुपदेशन केंद्र, शासन निर्णय व त्याची अंमलबजावणी, अपंगाचे सामाजिक पुर्नवसन, कृत्रिम अवयव वाटप, तीन चाकी, व्हिलचेअर वाटप, प्रवास सवलत योजना, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, बीजभांडवलची सन २००९ मध्ये २५ हजारावरुन दिड लाख मर्यादा करण्यात यश, बीजभांडवल उत्पन्न मर्यादा ६ हजारावरुन १ लाखापर्यंत करण्यात संस्थेला यश आले.

सन २००३ पासून राज्यस्तरीय मोफत अपंग वधु-वर परिचय मेळावा आयोजित करुन सन २०१६ पर्यंत २६८ विवाह संपन्न् झाली आहेत. सर्व नवदाम्पत्यांना संसारोपयोगी साहित्य मोफत वितरीत करण्यात आले. ३ डिसेंबर २०१३ रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त पाहिले जिल्हास्तरीय विशेष साहित्य संमेलन पार पडले. शासनाकडे विशेष ठराव पाठविण्यात आले. ६ जुलै २०१६ रोजी १२६ अपंग व अपंगाच्या पाल्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व अपंग गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

संस्थेमार्फत ५ सप्टेंबर २०१६ रोजी सामाजिक सदभावना दिन साजरा करुन वेडसर, भिषेकरी, आत्ममग्न,मनोरुग्ण यांना दाढी, कटींग, अंघोळ घालून नवीन वस्त्रे प्रदान करण्यात आली. जागतिक अपंग दिन ३ डिसेंबर २०१६ रोजी ७१० अपंग व अपंगाच्या पाल्यांना मोफत वस्त्रदान व संस्थेच्या आसान मूकबधिर क्रिकेट असोसिएशनला टि शर्ट व शुज प्रदान करण्यात आली.

सदर संस्था आणि आसान अपंग संघटना अपंगाच्या सामाजिक पुर्नवसन व कल्याणाकरीता कटिबद्ध आहे. संस्थेचा अपंग पुर्नवसन प्रकल्प श्रीरामपूर शहरातील बोबले पाटील नगर, म्हाडाप्रकल्प शेजारी, बेलापूर

रोड, वॉर्ड न.७, श्रीरामपूर या ठिकाणी जुन २०१७ पासून सुरु होत आहे. सध्या इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. तरी सालाबाद प्रमाणे संपन्न होणा-या राज्यस्तरीय अपंग वधु-वर परिचय मेळाव्याचे निमंत्रण स्वीकारुन महाराष्ट्र व इतर राज्यातील अपंग बांधवांनामार्गदर्शन करावे. या करीता आपण आपली अनमोल वेळ आम्हांस द्यावी. तसेच संस्थान मार्फत दिड हजार अपंग बाधवांना अन्नदाना करीता शिधा मिळावा ही नम्र विनंती.

संस्थानचे अधिनियमात अशाप्रकारे खर्च करणेबाबत कुठलीही तरतुद नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५९६ नुसार श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांनी शिर्डी– पंढरपुर पायी दिंडी सोहळ्यास मदत करणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आलेली आहे.

अपंग सामाजिक विकास संस्था व निर्मिती चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीरामपूर यांचे संयुक्त विद्यमाने दि.२६.०२.१७ रोजी राज्यस्तरीय अपंग वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यांना संस्थानमार्फत दिड हजार अपंग बांधवांनाअन्नदानाकरीता शिध्याची आवश्यकता आहे. संस्थानचे अधिनियमात अशाप्रकारे खर्च करणेबाबत कुठलीही तरतुद नाही.

निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, अपंग सामाजिक विकास संस्था व निर्मिती चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीरामपूर यांचे संयुक्त विद्यमाने दि.२६.०२.२०१७ रोजी आयोजित करणेत आलेल्या राज्यस्तरीय अपंग वधु-वर परिचय मेळाव्यास उपस्थित रहाणाऱ्या दिड हजार अपंग बांधवांना अन्नदानाकरीता एक विशेष बाब म्हणून त्याच्या मागणीप्रमाणे संस्थानमार्फत कोरडा शिधा देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ प्रसादालय विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत सबका मालीक एक है या महानाटयाचे संस्थानने आयोजन करणेबाबत श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे दि.२८/११/२०१६ रोजीचे पत्र.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

प्रस्तावना:- श्री. प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या पत्रात "श्री साईबाबांच्या आर्शिवादाने साई क्रिएटिव्ह व्हीजनची नागपूर मध्ये स्थापना केलेली असून आदरणीय हेमांडपंथ यांचे तत्वज्ञानाने साई चरित्रावर आधारीत सबका मालिक एक है या प्रकाश आणि ध्वनी हिंदी महानाटयाचे दि.२९, ३० व ३१ ऑक्टोबर २०१० रोजी नागपूर मधील चिटणीस पार्क मध्ये आयोजन केलेले होते. या महानाटयामध्ये १७१ कलाकारांचा समावेश असून या महानाट्याव्दारे राष्ट्रीय एकात्मता, स्त्री भ्रूण हत्या, शिक्षणाची आवश्यकता, ग्राम स्वच्छता अभियान तसेच हिंदु मुस्लिम एकात्मतेची महती अशा प्रकारच्या अनेक घटकांमधून श्री साईबाबांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करत आहोत. या महानाटयासाठी सुमारे ६७२० स्क्वेअर फूटाचा भव्य रंगमंच बनविलेला असून या महानाटयास सर्व प्रेक्षकांनी व प्रसारमाध्यमांनी आपलेसे केलेले आहे. आजतागायत या महानाटयाचे देशभरात विविध ४५ ठिकाणी सादरीकरण झालेले आहे. सन २०१८ मध्ये श्री साईबाबा समाधीस १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे वतीने ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ हे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षात देशभरात व जगभरात वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी या शताब्दी वर्षात श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत सबका मालिक एक है या जगातील पहिल्या हिंदि महानाटयाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेने आयोजन करावे हि आमची इच्छा आहे", असे कळविलेले असून सदर पत्राबरोबर या महानाटयाच्या बजेटची प्रत जोडलेली आहे.

श्री. डांगे यांनी या महानाटयाचे पहिल्या शोसाठी रु.०९ लक्ष इतका खर्च असून त्यानंतरचे प्रत्येक शो साठी रु.०६ लक्ष मात्र इतका खर्च कळविलेला असून याशिवाय आयोजकांनी खालील जबाबदारी स्विकारणेबाबत नमूद केलेले आहे.

Organizer's Responsibility:

1. Ground / Stadium. (6 day before show)
2. Audience sitting arrangement & Bari gating.
3. Green Room's 15 ft X 30 ft - 6 Nos. (with Carpet, Chairs, Fan's, Heliozoan's & Mairror's)
4. Ground Light's (Suggicient Light for Audience)
5. Mobile urinal's 2 Nos. (on back side of Green Room's for Artist)
6. Generator's (with Diesel)
   a) 125 KVA for Light's (Before 1 day's of show & show day)
   b) 125 KVA for Sound (Before 1 day's of show & show day)
   c) 10 KVA for service lights (Before 6 day's of show & 2day's after show)
7) Residence for Artist & Back stage worker's
   a) Back stage warker's (Before 6 day's of show & 2day's after show)
   b) 30 Production Team Person's (2 day's before show & 1day's after show)
   c) 110 Artist (2 day's before show & 1day's after show)
8) Food for Artist & Back stage person's (2 time Nasta, 1 time Lunch, 1 time Dinner & 4 time Tea)
9) Permit ions for performance.
10) SecurityArrangment's
11) 2 Horse, 1 Tanga, 2 Bullock-cart, 21 Pigeons & 1 Kid (One Day before performance)
12) Advertisement
13) Printing Material (Hoardings/Banners/Tickets etc.)

प्रस्तावः- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात एकूण ७० दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे. शताब्दी वर्षात साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांच्या सबका मालिक एक है या हिंदी महानाटयाचे आयोजन करावयाचे झालेस यासाठी मोठया प्रमाणात जागेचा प्रबंध करावा लागेल. तसेच त्यांनी मागणी केलेल्या रकमेशिवाय संस्थानने मोठया प्रमाणावर प्राथमिक सुविधा उपलब्ध करणेबाबत नमूद केलेले आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांच्या सबका मालिक एक है या हिंदी महानाटयाचे आयोजन करणेबाबत श्री प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचा अर्ज निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे सबका मालिक एक है या हिंदी महानाटयाचे श्री रामनवमी उत्सव- २०१७ मध्ये आयोजन करणेसंदर्भात त्यासाठीच्या आवश्यक सर्व विषयांवर चर्चा होणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता ज्युनियर के.जी. वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबत.**

प्रस्ताव- **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक– श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वाढती विद्यार्थी संख्या व अपु-या वर्ग खोल्यामुळे शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. सकाळचे सत्रात ज्यु. केजी, सिनीयर केजी व इयत्ता ६ वी ते १० वी असे एकूण २४ वर्ग व दुपारचे सत्रात इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी चे एकूण २७ वर्ग चालविले जातात. ज्यु. केजी करीता प्रवेश देतांना मागील वर्षाप्रमाणे ५ तुकडया करुन अंदाजे २०० प्रवेश निश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी किमान २०० प्रवेश द्यावे लागतील. इयत्ता १ ली पासून शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम

कायदा) अन्वये 25 % प्रवेश देणे असल्याने मर्यादीत प्रवेश संख्या ठेवण्यात यावी. आर.टी.ई. प्रवेश प्रक्रीया इ. १ ली पासून राबविण्यात येते तरी मागील वर्षाचे प्रवेश प्रक्रीया प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे नम्र मत आहे.

मागणी – शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता खालीलप्रमाणे शालेय प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी.

सन २०१७-१८ ज्यु .के.जी. प्रवेश प्रक्रिया तपशिलवार तक्ता

अ.न.	प्रक्रिया सन २०१७ -१८	तपशिल	वेळ
१	दि.०६ एप्रिल २०१७ ते १५ एप्रिल २०१७ अखेर	प्रवेश अर्ज वाटप व अर्ज स्विकृती	वाटपाची वेळ स.१०.३० ते १.०० प्रवेश अर्ज स्विकृती दु. ३.०० ते ५.००
२	दि. १७ एप्रिल ते २२ एप्रिल २०१७ अखेर	प्राप्त अर्जाची छाननी, प्रवेश पात्र -अपात्र ठरविणे	-----
३	दि. २४ एप्रिल २०१७	प्रवेश पात्र विद्यार्थी यादी जाहिर	स.११.३०
४	दि.२५ एप्रिल २०१७ ते दि.२९ एप्रिल२०१७ अखेर	पालकांनी शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क भरुन पाल्यांचा प्रवेश निश्चित करणे.	स.१०.३० ते १.००

उपरोक्त प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींची विचार व्हावा.

१) सन २०१७ – २०१८ शैक्षणिक वर्षात २०० प्रवेश देवून फक्त ५ तुकडया करण्यात याव्यात. ज्यु. के.जी. साठी दि.०६ एप्रिल २०१७ ते १५ एप्रिल २०१७ पर्यत फॉर्मची विक्री करण्यात येईल. व्यवस्थापनात अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन दिलेल्या मुदतीत प्रवेश फॉर्मची विक्री करता येईल.

२) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार दि.३१ जुलै अखेर पाल्यांचे वय ३.८ ते ४.४ या वयोगटापर्यत असावे, म्हणजे जन्मतारीख (नोव्हेंबर २०१२ ते मार्च २०१२) असे लेखी पत्र पारीत करण्यात आले होते. तथापि शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी. १ दि.२५ जानेवारी,२०१७ अन्वये या पुढे शाळेत प्रवेश देतांना सर्व शाळांनी ३० सप्टेंबर हा मानिव दिनांक गृहीत धरुन मुलांचे वय निश्चित करण्यात यावे असे ठरले आहे. तरी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी त्यांचे किमान वय ४ वर्षे असावे प्रवेश संख्येवर नियंत्रण राहील व वर्ग खोल्यांची अडचण येणार नाही, करीता कमाल वयोमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. तरी वयोगट ४.०० ते ४.९ या पर्यत असावे म्हणजे जन्मतारीख (सप्टेंबर २०१३ ते डिसेंबर २०१२) या कालावधीतील असेल.

३) ज्या पालकांचे पाल्यांचे वय ४.०० ते ४.९ वयोगटात बसत असेल अशाच पाल्यांना प्रवेश देता येईल. इतरांना प्रवेश अर्ज विक्री करता येणार नाही, जेणेकरुन प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही.

४) ज्यु. के.जी. साठी प्रवेश देतांना अनुक्रमे प्राधान्य संस्थान कायम कर्मचारी पाल्य , कंत्राटी कर्मचारी पाल्य व त्या नंतर शिरडी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी (शाळेपासून ३ कि.मी. अंतरावर असलेले रहिवाशी) यांनाच प्रवेश देता येईल.

५) प्रवेश अर्ज देतेवेळी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका) यांनी प्रमाणित केलेला, तसेच शिरडी गावातील आधारकार्ड , मतदान कार्ड / रहिवासी दाखला / रेशनकार्ड / लाईटबील तपासून अशाच पालकांचा पाल्यांना प्रवेशासाठी प्रवेश अर्ज देता येईल .

६) प्रवेश निश्चित करतांना विदयार्थ्यांचे शैक्षणिक व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात येईल. जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

७) स्कुलबस सुविधा उपलब्धतेनुसार पुरविण्यात येईल. पुरेशा प्रमाणात सिट उपलब्ध नसतील तर पालकांना स्वतः पाल्यांची शाळेत ने-आण करण्याची सोय करावी लागेल.

८) प्रवेश यादी संस्थान कायम कर्मचारी , संस्थान कंत्राटी कर्मचारी व शिरडी गाव (३ कि.मी.) या क्रमांनुसार यादी जाहिर करण्यात येईल असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– ज्यु. के.जी व सि. के.जी. प्रवेशाबाबत फक्त अंतर व वयाची मर्यादा दिल्यास शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियम नुसार इ. १ ली करीता प्रवेश देताना अडचण येणार नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– इयत्ता १ लीत प्रवेश देतांना **RTE** नुसार प्रवेश द्यावे लागतात, त्यामुळे सदर प्रवेश प्रक्रियेत अडचण निर्माण होऊ नये यासाठी ज्यु. के.जी. साठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना **RTE** नियम अनुसरुन प्रवेश देता येतील. मर्यादीत २०० प्रवेश दिले तर आजमितीस तूर्त तरी वर्ग खोल्या अपुऱ्या पडणार नाहीत, तसेच उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहीती पालकांना माहीत व्हावी यासाठी शाळेच्या प्रवेशव्दारावर प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकाचा डिजिटल बोर्ड तयार करुन लावता येईल. तरी निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.१५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता ज्युनियर के.जी. वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **श्री साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी. यंत्रणेचे सन २०१७- २०१८ वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमामधील तरतूद २०१४:** (1) कलम २(१४) (घ)– भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

प्रस्तावना: शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी १२८ रुम नुसार एकूण ३८४ रुममध्ये डायकीन कंपनीचे VRV (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३८६ अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, ए.सी. वायुवीजन यंत्रणा वगैरे वार्षिक मेन्टेनन्स अथवा रिक्स प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या-त्या कंपनीला अथवा संबंधीत मशीनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

साईआश्रम भक्तनिवास येथील ए.सी. यंत्रणा दिनांक ११/०१/२०१३ रोजीपासून कार्यान्वित झालेली आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांचेत सदर यंत्रणा बसविणेकामी दिलेल्या कार्यादेशाच्यावेळी करण्यात आलेल्या करारनाम्यात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

"Cost of Annual Maintenance Charges (AMC) after the warranty period, will be Rs. 6,10,500/- per year. The AMC will be comprehensive and will include cost of labour and parts. Other Taxes on the AMC Charges will be paid at actuals. The AMC Price will remain fixed and confirmed as valid for 8 years after warranty, by Dalkin (i.e.) 10 years from the date of acceptance of the installation."

सदर यंत्रणेचा वारंटी कालावधी दिनांक १०/०१/२०१५ रोजी संपुष्टात आलेला असल्याने उपरोक्त नमूद करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८४ अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील VRV ए.सी. यंत्रणेचे एक वर्षे (दिनांक ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७) कालावधीसाठी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देण्यात आलेले आहे.

मागणी- मे.डायकीन एअर कडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना देण्यात आलेल्या AMC कार्यादेशाची ची मुदत दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपुष्टात येत असून, त्यापुढील एक वर्ष कालावधीकरीता त्यांना AMC देणे आवश्यक आहे. त्याकरीता शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार वारंटी कालावधी संपलेपासून पुढील 8 वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक ए.एम.सी. करीता प्रत्येक वर्षी रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे दर निश्चिती करण्यात आली आहे. या ८ वर्ष कालावधीपैकी २ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून, पुढील ६ वर्षाचा कालावधी बाकी आहे. प्रत्येक वर्षी ए.एम.सी. कामी अदा करावयाची रक्कम निश्चित करण्यात आलेली असल्याने, AMC करीता पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ पर्यत) कार्यादेश देणे आवश्यक आहे.

मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC करीता कार्यादेश देणेकामी तसेच AMC कामी वार्षिक रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे अदा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

मान्यता: प्रशासकीय मान्यता आवश्यक

विभागाचे स्पष्ट मत:- साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ पर्यत) उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व याकामी रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी. यंत्रणेचे सन २०१७- २०१८ या वर्षाकरीता उत्पादक कंपनी मे.डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व त्याकामी येणाऱ्या रु.६,१०,५००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१७ **चपाती गरम व मऊ रहाणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स (Fish Tubs) खरेदी करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2 घ) नूसार

भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच 21(1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयामध्ये श्रींचे पुण्यतिथी उत्सव सन-२०१६ निमित्त बेंगलोरचे साईभक्त श्री शैलेशकूमार पटेल, यांनी ताशी २०,००० चपाती तयार होणारे ऑटोमॅटीक चपाती मशिन देणगी स्वरुपात दिलेले आहे. उपरोक्त चपाती मशिनमुळे मुख्य प्रसादभोजन हॉल, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनाथ रुग्णालय व साईआश्रम भाग-१ या स्वयंसेवी प्रसादभोजनाचे ठिकाणी भक्तांना चपाती पुरविणेत येत आहे. तसेच सकाळी अन्नपाकीटे मध्ये दि.११/१०/२०१६ पासून पुरी ऐवजी चपाती देणेत येत आहे. सदरची चपाती सध्या प्लास्टीक क्रेटस् मध्ये ठेवण्यात येत असून प्लास्टीक क्रेटस्ला चारही बाजूने हवा लागल्यामुळे चपात्या गरम व मऊ रहात नाही. पर्यायाने थंड व काहीशा कडक चपात्या साईभक्तांना द्याव्या लागतात.

प्रसादालयामध्ये दररोज सरासरी ४0,000 साईभक्त प्रसादभोजन घेत असतात. प्रसादभोजनात देण्यात येणा-या चपाती तयार करण्याचे काम सकाळी ४.00 वाजता सुरु होते. सकाळी ४.00 वाजता तयार केलेली चपाती गरम व मऊ रहाणेसाठी नामांकित कंपनीचे इन्सुलेटेड बॉक्स (Fish Tubs) वापरणे गरजेचे आहे.

इन्सुलेटेड बॉक्सचे उत्पादक निलकमल लि, नाशिक यांचेकडून, एक १०० लिटर क्षमतेचा इन्सुलेटेड बॉक्स वापरुन पहाणेसाठी नमुना म्हणून आणलेला आहे. सदर बॉक्समध्ये मशिनमधून काढलेली चपाती ठेवण्यात आलेनंतर सदर चपाती सुमारे 5-6 तास गरम व मऊ रहात असल्याचे आढळून आलेले आहे. सदर बॉक्स मा.विश्वस्त श्री सचिन तांबे साहेब व मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांना प्रत्यक्ष चपातीसह दाखविणेत आलेला आहे. त्यानूसार संदर्भिय नूसार मा .विश्वस्त श्री तांबे साहेब व मा.का.अ.यांनी सदर बॉक्स खरेदी करणेबाबत सुचित केलेले आहे.

इन्सुलेटेड बॉक्स समाधानकारक वाटल्याने सदर वस्तूचे उत्पादक निलकमल लिमिटेड, नाशिक यांना किंमतीची माहीती मिळणेसाठी प्रसादालयाचे ई-मेलवर अंदाजे दरपत्रक पाठविणेस कळविणेत आलेले होते. त्यानूसार त्यांनी सोबत जोडलेल्या ई-मेलप्रमाणे अंदाजे दर दिलेले आहे.

इन्सुलेटेड बॉक्स (Fish Tubs) २५ लिटर क्षमतेच्या प्रती नगास एकत्रित अंदाजे रु.२, ०००/- व ५० लिटर क्षमतेच्या प्रती नगास एकत्रित अंदाजे रु.३,६००/- तसेच १०० लिटर क्षमतेच्या प्रती नगास अंदाजे रु.७,६००/- खर्च कळविलेला आहे.

मागणी:- प्रसादालयाकडील दैंनदिन गरज लक्षात घेता सध्या ५० लिटर क्षमतेचे ५० नग इन्सुलेटेड बॉक्स (Fish Tubs) खरेदी करता येतील. त्यासाठी अंदाजे एकूण खर्च रु.१,८०,०००/- (अक्षरी रक्कम रु एक लाख ऐंशी हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्तकामी प्रसादालय अंदाजपत्रकात रक्कम रुपये ७,०७,७८५/- शिल्लक आहेत.

मशिनची चपाती गरम व मऊ रहाणेसाठी नामांकित कंपनीकडून इन्सुलेटेड बॉक्सचे (Fish Tubs) कोटेशन मागवून विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,८०,०००/- (अक्षरी रक्कम रु एक लाख ऐंशी हजार मात्र) चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे गरजेचे आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- तरी मशिनची चपाती गरम व मऊ रहाणेसाठी नामांकित कंपनीकडून इन्सुलेटेड बॉक्सचे (Fish Tubs) कोटेशन मागवून विहीत पध्दतीने खरेदी करणे गरजेचे आहे. त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,८०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये मशिनद्वारे बनविणेत येणारी चपाती गरम व मऊ रहाणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स (Fish Tubs) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने नामांकित कंपन्यांकडून कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१८ **श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/ स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देऊन ई-निविदा मागविणे.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ **(**भाग-४**)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ **(**२ घ**)** नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ **(**१ घ**)** नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (७)

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम हे उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहेत. त्यानूसार प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (७) नूसार, जा.एसएसएस/वशी/११३९/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता दरमहा मजूरी रक्कम रु.१४,४९,९९९/- (अक्षरी रक्कम

रु.चौदा लाख एकोणपन्नास हजार नऊशे नौव्यान्व मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार दिनांक १६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम हे आऊटसोर्सींग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सींग पध्दतीने करुन घेणेकामी दररोज किमान १२० ते १३५ पर्यंत कर्मचारी तीनही शिफ्टमध्ये लावून सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती दरमहा रक्कम रु.१४,४९,९९९/- प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार वार्षिक मजुरीची रक्कम रु.१,७३,९९,९८८/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास दि.१६/०६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.२,०८,७९,९८५/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी आठ लाख एकोणऐंशी हजार नऊशे पंच्याऐंशी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सींग पध्दतीने करुन घेणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.०२,०८,७९,९८५/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी आठ लाख एकोणऐंशी हजार नऊशे पंच्याऐंशी मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/ स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामीची अंदाजपत्रकीय रक्कम खुपच जास्त आहे याकरीता सदरहू रक्कम तपासून गुणवत्ता व किंमत (७०%-३०%) या आधारे ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठीचा प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.१९ **श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/ पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देणे व ई-निविदा मागविणे.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३०७ (८)

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपातीपुरी ही उक्ते ठेकेदारी / पध्दतीनेआऊटसोर्सिंग द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे त्यानूसार .श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (८) नूसार, जा.एसएसएस/ वशी/११४०/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, दि.यशोधरा महिला सह.उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैद्यास रु.७६४/- (अक्षरी रक्कम रु. सातशे चौसष्ट मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार दिनांक १६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती/पुरी तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने

तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.७६४/- प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे जून-१६ ते माहे डिसेंबर-१६ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.१८,५०,८६५/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.३१,७२,९११/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास दि.१६/0६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३८,०७,४९३/- (अक्षरी रक्कम रुपये अडवतीस लाख सात हजार चारशे त्र्यानव मात्र इतका खर्च अपेक्षीतआहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपाती) व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३८,०७,४९३/- (अक्षरी रक्कम रुपये अडवतीस लाख सात हजार चारशे त्र्यानव मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेनंतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनासाठी आवश्यक असणाऱ्या चपात्या तयार करणेकामी चपाती मशिन कार्यरत असून अजूनही मशिन्स घ्यावयाचे प्रस्तावित आहे. याकरीता मनुष्यबळाद्वारे चपात्या/ पुरी तयार करुन घेणेची आवश्यकता वाटत नाही, यामुळे सदरहू प्रस्ताव रद्द करणेत यावा.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.२० **श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देणे व ई-निविदा मागविणे.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (९)

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयामध्ये दररोज गर्दीचे प्रमाणानूसार ४०,००० ते ८५,०००पर्यत साईभक्त प्रसादभोजन घेतात. गर्दीनूसार दररोज सुमारे ३५ क्विंटल ते ४० क्विंटल आटयाच्या चपाती/पुरी बनवावी लागते. संस्थानचे सध्या ०२ ॲटोमॅटीक चपाती मशिन्स देणगी आलेले आहेत. प्रत्येक चपाती मशिनवर तुंबवलेला (मळलेला) आटा टाकणे, भाजताना अडकलेली चपाती काढणे, तेल लावणे, चपाती थंड झाल्यावर कॅरेटमध्ये, हॉटकेसमध्ये ठेवणेकामी पुरेसे कर्मचारी पुरविणे इत्यादी कामे चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेचे काम हे उक्ते ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंग व्दारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार सध्या प्रसादालयामध्ये दि.यशोधरा महिला सह.औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक हे दि.१५ जून-२०१६ रोजीपासून श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम करत आहेत.

श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (९) नूसार, जा.एसएसएस/वशी/११४१/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, दि.यशोधरा महिला सह.उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ अखेर एक वर्ष या कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैद्यास रु.३२३.९० पै. (अक्षरी रक्कम रु. तीनशे तेवीस पैसे नव्व्द मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी मशिनवर चपाती तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार दिनांक १६/0६/२०१७ ते १५/०६/२०१८ अखेर या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम हे आऊटसोर्सिंग पध्दतीने देणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याचे वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ अखेर या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्सिंग पध्दतीने चपाती तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.३२३.९०/- प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे जून-१६ ते माहे डिसेंबर-१६ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.०७,५७,९९०/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.१२,९९,४११/- इतकी होते. परंतू ताशी २०,००० चपाती तयार करण्याचे मशिन हे माहे नोव्हेंबर-१६ मध्ये

आलेले असल्याने माहे नोंव्हेंबर व डिसेंबर-१६ या दोन महिन्याचे सरासरी मजुरी रकमेवर (२,३१,०००/- प्र.महीना) वार्षिक सरासरी धरुन सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास दि.१६/०६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३३,२६,४००/- (अक्षरी रक्कम रुपये तेहतीस लाख सहवीस हजार चारशे मात्र इतका खर्च अपेक्षीतआहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती तयार करणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ अखेर या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३३,२६,४००/- (अक्षरी रक्कम रुपये तेहतीस लाख सहवीस हजार चारशे मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम विभागांतर्गत करुन घेण्यात यावे. तसेच आवश्यकता भासल्यास कर्मचाऱ्यांना सदरहू मशिन चालविणेचे प्रशिक्षण देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.२१ **शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या पाणी पुरवठा योजनेसाठी लोकवर्गणीची भरण्यासाठी रुपये ६.५८७ कोटी रक्कम संस्थानकडून अनुदान म्हणून देणेबाबत.**

प्रस्ताव- शिर्डी नगरपंचायतीने केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या पाणी पुरवठा योजनेसाठी भरावयाची लोकवर्गणीची (नगरपंचायतीचा हिस्सा २५%) रक्कम रु. ९.१६२ कोटी संस्थानकडून अनुदान स्वरूपात मिळणेबाबत दि. १३.०२.२०१७ रोजीचे पत्राने अनुदान स्वरुपात मिळणेबाबत मागणी केली होती. महाराष्ट्र शासन निर्णय क्रः अमृत-२०१७/प्र.क्र.२७/नवि-३३/ दि.०८.०२.२०१७. (अ.न.४.१०) अन्वये "अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पासाठी स्वहिश्याचा निधी उभारताना नागरी स्थानिक स्वराज संस्थांनी त्यांना प्राप्त होणा-या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीशी एककेंद्राभिमुख (Convergence) करणे आवश्यक राहील. यासाठी त्यांनी १४ व्या वित्त आयोगातून मिळणारा निधी चिन्हांकित करून ठेवावा" असे नमुद केले आहे. त्यास अनुसरून त्यांना जा.क्र. एसएसएस/वशी/ लेखा- अनु/५९३३/ दि. १६.०२.२०१७ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि जा.क्र.नप. टेक्र८/४८७/दि.२३.०२.२०१७ अन्वये १४ व्या वित्त आयोगाचे अंतर्गत खालीलप्रमाणे निधी अमृत खात्यात नगरपंचायत हिस्सा किंवा सदर प्रकल्प पुर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली अधिक रक्कम (Gap funding) वळविण्याबाबत खालील प्रमाणे शासन निर्णय पारित झालेबाबत कळविले आहे.

अ.नं.	शासन निर्णय क्र.	रक्कम (लक्ष)
१	शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१६/प्रक्र३०३/नवि-३३ दि. ३०.०८ २०१६	७३.५० लक्ष
२	शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/प्रक्र४२/नवि-३३ दि. २१.०१ २०१७	७२.३० लक्ष
३	ऑनलाईन जमा दि. ०३.०२.२०१७	१११.७९ लक्ष
	एकूण रु.	२५७.५९ लक्ष

शासन निर्णयानुसार अमृत योजनेतील प्रकल्प राबविण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वहिस्सा भरण्यासाठी व प्रकल्प पूर्ण करावयासाठी लागणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीचा प्राधान्याने वापर करणे बंधनकारक केले आहे. मंजूर झालेले प्रकल्प अद्याप पुर्ण झाले नाहीत अशा प्रकल्पासांठी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा किंवा सदर प्रकल्प पुर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली अधिकची रक्कम (Gap funding) १४ व्या वित्त आयोगातून देय्य असलेल्या रकमेतून वळती करुन थेट बॅंक खात्यात शासन स्तरावरून जमा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. अशाप्रकारे एकूण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के हिस्सा रु.९.१६२ कोटी असून पैकी उपरोक्त २.५७५९ कोटी वजा जाता उर्वरीत रु. ६.५८७ नगरपंचायतीचा हिस्सा अनुदान म्हणून मागणी केलेली आहे.

संस्थानतर्फे अनुदान देणेबाबात अधिनियमातील तरतुद खालीलप्रमाणे आहे-

"श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे".

पत्रात १४ व्या वित्त आयोगांतर्गत दोन हप्ते प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. एकूण ९.१६२ कोटी पैकी शासननिर्णयाच्या दोन हप्त्यांत व नगरपंचायतीने ऑनलाइन जमा केलेली अशी एकूण रु.२.५७५९ कोटी वजा जाता उर्वरीत रु. ६.५८७ कोटी रक्कम नगरपंचायतीने स्वहिस्सा भरण्यासाठी मागणी केली आहे. १४ व्या वित्त आयोगातून नगरपंचायतीस किती हप्त्यांत अनुदान किती हप्त्यांत प्राप्त होणार आहे याबाबत शासन निर्णयात

स्पष्ट उल्लेख नाही. मात्र भविष्यात नगरपंचायतीला १४ व्या वित्त आयोगातून अमृत योजनेचा स्वहिस्सा भरण्यासाठी अनुदान प्राप्त झाल्यास नगरपंचायतीकडून संस्थानने दिलेले अनुदान परत घ्यावे लागेल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत नगरपंचायतीच्या २५ % हिस्सा रु. ९.१६२ कोटी पैकी रु. २.५७५९ वजा जाता उर्वरीत रक्कम रु. ६.५८७ कोटी संस्थानकडून विहीत पद्धतीने अनुदान म्हणून देणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.१५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत नगरपंचायतीच्या२५ % हिस्सा रु.९.१६२ कोटी पैकी रु.२.५७५९ वजा जाता उर्वरीत रक्कम रु.६.५८७ कोटी मात्र रक्कम संस्थानकडून विहीत पद्धतीने अनुदान म्हणून देण्यात यावे. परंतु भविष्यात शिर्डी नगरपंचायतीला १४ व्या वित्त आयोगातून अनुदान प्राप्त झाल्यास संस्थानने दिलेले अनुदान शिर्डी नगरपंचायतीकडून परत घेण्यात यावे या अटीवर मान्यता देण्यात आली.**

तसेच जुना पिंपळवाडी रस्ता हा नगरपंचायतीच्या मालकीचा असून तो सध्या तात्पुरत्या स्वरुपात दर्शनरांग म्हणून वापरणेस नगरपंचायतीने परवानगी दिलेली आहे सदर रस्ता कायमस्वरुपी संस्थानकडे वर्ग करणेच्या अटीवर प्रस्तावित अनुदान शिर्डी नगरपंचायतीकडे वर्गकरणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

आयत्या वेळेचा

विषय नं.२२ **शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी २५ लाख रुपये तसेच साधने, उपकरणे देणेबाबत मा.नगराध्यक्षा तथा विश्वस्त यांचे आ.नं.२०१४७ दि.११/०१/२०१७ रोजीचे पत्र.**

प्रस्ताव- सौ. योगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा तथा विश्वस्त यांनी दि. ११/०१/२०१७ पत्राने श्री साईबाबा समाधि शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी शहर विकासाच्या दृष्टीने आवश्यक वाटणारे महात्वाचे कामे संस्थानचे माध्यमातून करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचे पत्रात त्यांनी ४२ मुद्दे नमुद केले आहेत. त्यापैकी या विभागासंदर्भात असलेले पत्रातील मुद्दा क्र.८ – श्री साईबाबा संस्थान येथे स्वच्छता विभागात स्वच्छता कर्मचा-यांची नव्याने भरती करावी. पत्रातील मुद्दा क्र.१३ – श्री साईबाबा संस्थानने रस्ते साफसफाईसाठी डंपर, कचरा उचलणेसाठी रिक्षा (घंटागाडी), रोड स्वीपर मशिन, इत्यादी अशी साफसफाईसाठी लागणारी सर्व साधने, उपकरणे विकत घ्यावीत व शिर्डी नगरपालिकेस शिर्डी शिर्डी शहराच्या च्छतेच्या कामासाठी द्यावी. पत्रातील मुद्दा क्र.१९ – श्री साईबाबा संस्थानने पंचतारांकित अशा दर्जाच्या सुलभ शौचालयाची निर्मीत करुन "पे ॲंड युज" तत्वावर चालविण्यास द्यावे. पत्रातील मुद्दा क्र.३२– शिर्डी शहरात विविध ठिकाणी वेगवेगळया भागात सावर्जनिक शौचालयाची निर्मीती करणे.

याबाबत सविस्तर माहिती मिळणेकामी मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना जा. नं. एसएसएस/ वशी-आरोग्य/ ५८६५/ २०१७ दि.१०/०२/२०१७ ने पत्र देवून सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे खर्चासह सादर करण्यासाठी मशिनरी किती? घंटागाडी किती? रोड स्वीपर किती? डंपर किती? यांची संख्या व कॅपेसिटी तसेच शहरात कोणत्या ठिकाणी व किती स्त्री-पुरुष शौचालयाची निर्मीती करणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर माहिती माहिती मागविण्यात आली. त्यास अनुसरुन शिर्डी नगर पंचायत यांनी संदर्भ क्र.३ व ४ चे पत्राने घंटागाडया, डंपर, प्रतिदिनी २१४ कर्मचारी यासाठीचा खर्च तसेच शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रतिमाह रु.२५ लाख रुपये देणे आदि विविध विषयाबाबत कळविलेले आहे.

शिर्डी नगरपंचायत यांचे प्रत्येक वर्षीचे मागणीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून नगर– मनमाड रोड, मनोजकुमार पथ या रस्त्यांचे साफसफाईसाठी सन २००६ पासून कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमण्यात येत आहे. मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०४/२०१६ रोजीचे सभेपुढील आयत्या वेळचा विषय नं.१३ निर्णय क्र.२६० ने दि.०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी (नगर मनमाड रोड- लक्ष्मीनगर ते साईआश्रम भक्तनिवासपर्यंत व मनोजकुमार पथ- गेट नं.१ ते मंगल कार्यालयापर्यंत) साफसफाईकरिता प्रतिदिनी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमण्याबाबत मान्यता मिळालेली आहे. सदर कामावर संस्थानचे आरोग्य विभागाचे नियंत्रण आहे. याकामी नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०१६ ते जानेवारी २०१७ पर्यंतचे वेतनावर रुपये २४,०१,९१६/- (अक्षरी रु. चोविस लाख एक हजार नऊशे सोळा मात्र) इतका खर्च झालेला आहे. त्यांची मुदत ३१ मार्च २०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (२) (क) मध्ये सार्वजनिक रस्ते जागा आणि मलप्रणालय साफ करणे आणि खाजगी मालमत्ता नसलेल्या व सार्वजनिक उपभोगासाठी खुल्या असलेल्या सर्व जागा साफ करणे मग अशा मोकळया जागा नगरपालिकेकडे निहित असोत किंवा नसोत आणि अपायकारक झाडे-झुडपे काढून टाकणे आणि सर्व सार्वजनिक उपद्रव नाहीसे करणे असे नमुद केले आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम –२००४ मधिल कलम २१ (२) पोटकलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्या नंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस

टक्के पेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल, असे नमुद आहे व कलम २१ मधिल पोटकलम (२) च्या खंड (दोन) अन्वये स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी, असे नमुद आहे.

संदर्भिय पत्रातील बाब ही आर्थिक व धोरणात्मक असून अनुदान स्वरुप असलेने अधिनियम – २००४ मधिल तरतूदीस अधिन राहून खालील प्रमाणे संबंधित विभागाने माहिती घेवून मा. व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करता येईल.

१) धोरणात्मक असून शासनाची पुर्व परवानगी घ्यावी लागेल काय? किंवा कसे (कार्यवाही - विधी विभाग, सामान्य प्रशासन)

२) रस्ते साफसफाईसाठी डंपर, कचरा उचलणेसाठी रिक्षा (घंटागाडी), रोड स्वीपर मशिन, इत्यादी वाहने भाडोत्री तत्वावर घेणे आदिबाबत (कार्यवाही – वाहन विभाग)

३) शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रतिमाह रु. २५ लाख रुपये अनुदान देणेबाबत (कार्यवाही – लेखाशाखा, वशी ५)

४) संस्थानने पंचतारांकित अशा दर्जाच्या सुलभ शौचालयाची निर्मीत करुन "पे अॅंड युज" तत्वावर चालविण्यास द्यावे. (कार्यवाही- बांधकाम, मालमत्ता विभाग)

५) शिर्डी शहरात विविध ठिकाणी वेगवेगळया भागात सावर्जनिक शौचालयाची निर्मीती करणे. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

६) प्रतिदिनी २१४ कर्मचारी देणे व स्वच्छता साहित्य खर्चबाबत. (कार्यवाही - आरोग्य विभाग)

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये श्रींचे दर्शनासाठी देश-विदेशातून साईभक्त येत असतात, यामुळे शिर्डी शहर स्वच्छ असायला हवे, परंतु शिर्डी नगरपंचायतीकडे निधीची कमतरता असल्यामुळे ते संस्थानच्या मदतीशिवाय हे काम करु शकत नाही. याकरीता उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

परंतु शिर्डी शहराचे स्वच्छतेकरीता त्यांनी मागणी केलेल्या खर्चाची रक्कम खुपच जास्त आहे. याकरीता संस्थानचे कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व इतर अधिकारी यांची मिळून समिती गठीत करणेत यावी. या समितीने शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रत्यक्ष येणारा खर्च निश्चित करावा व त्याबाबतचा परिपुर्ण अभ्यास करुन फेरप्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

आयत्या वेळेचा विषय नं.२३ **पेस्ट कंट्रोलची कामे विभागामार्फत करणेसाठी आवश्यक किटकनाशक औषधे, यंत्रे तथा किरकोळ सामान खरेदी व तज्ञ मेहनताना इत्यादीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ – १ (ग) – भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) २१ चा (२) पोटकलम (ख) भक्तांना राहण्यासाठी व वापरण्यासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

प्रस्तावना- सन २०१७ ते २०१८ या वर्षामध्ये साईभक्तांना निवासस्थानांमध्ये किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन दि.०९/१०/२०१६ रोजीचे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं ३४ व निर्णय क्र.७२१ नुसार ई-टेंडर पध्दतीने दर मागणी करण्यात येऊन, तांत्रिक लिफाफा दि.२०/१२/२०१६ रोजी उघडून पात्र निविदाधारकांची यादी आर्थिक लिफाफे उघडणेकामी दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा.उप समितीचे सभे समोर सादर करण्यात आली, यावर सविस्तर चर्चा होऊन पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंन्ट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी कामासाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील अटी/शर्तीमध्ये विहित केलेल्या IPCA (Indian Pest Control Association) व तत्सम संस्था अगर संघटनेचे सभासद असलेबाबतचे अटीमुळे बहुतांशी ठेकेदार अपात्र ठरलेले आहेत असे उप समितीचे निदर्शनास आले याकरीता सदरची अट वगळून पुन्हा नव्याने ई-निविदा प्रक्रीया राबवुन सदरकामी नविन ठेकेदाराची नेमणुक करण्यात यावी.

दरम्यानचे काळात साईभक्तांना किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन प्रस्तावीत निवासस्थानांमध्ये सदरचे काम या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, व्यक्ती समुदाय यांचे मार्गदर्शनाखाली, निर्देशानुसार संस्थान मार्फत आवश्यक किटकनाशक औषधे तथा यंत्रे खरेदी करण्यात यावे त्यांना याकामाचा उचित मोबदला देण्यात यावा याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

त्यास अनुसरुन मे.एल.पी. पेस्ट कंट्रोल सर्व्हिस, वाकडी, ता-राहाता यांचे प्रो. श्री संजय लहारे यांना याकामी पाचारण करुन मार्गदर्शन घेण्यात आले. श्री लहारे यांनी त्यांचे दि.२२/०२/२०१७ रोजीचे पत्राने त्यांनी खालीलप्रमाणे किटकनाशक औषधांची आवश्यकता लागेल असे सांगितले.

तपशिलवार विवरण खालीलप्रमाणे –

अ. नं	विभाग	इमारतीचे नाव	खोल्या व हॉल	लॉकर्स	खोल्या वा हॉल मिळुण एकूण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये)	केमिकल मिली/ लिटर	आवश्यक कामगार संख्या
१	साईबाबा भक्तनिवासस्थान	साईबाबा भक्तनिवासस्थान	५०९/१५	---	१,७३,२६८.००	५००० मिली	०४
२	साईप्रसाद निवासस्थान	०१) साईप्रसाद नंबर १	८५	---	२४,५७०.००	५०० मिली	०४
		०२) साईप्रसाद नंबर २	७८	---	२०,२५७.००	५०० मिली	
		०३) समर्पण	०२	---	४९०.००	१० मिली	
		०४) साईनाथ छाया	--/०२	---	४४८.००	१० मिली	
		०५) साईनिवास अतिथीगृह	२४	--	१४,२२४.५०	३०० मिली	
		०६) साईउद्यान	३३/१२	९९	२३,३१४.००	५०० मिली	
		०७) शांतिनिकेतन	१५	---	२,५६८.७२	५० मिली	
		०८) सेवाधाम	६०	---	५,५०८.८९	१२० मिली	
३	द्वारावती निवासस्थान	द्वारावती निवासस्थान	३३०	---	२,०५,११७.००	४१०२ मिली	०४
४	साईआश्रम भक्तनिवास	साईआश्रम भक्तनिवास	१५३६	---	३,४९७३५.००	६९९४ मिली	०५
		एकुण -	**२६७२/२१**	**९९**	**८,१९,५०१.११**	**१७५८८ मिली**	**१७**

विभागाची मागणी– पुन ई-निविदा मागणीकामी तथा प्रत्यक्ष कामास सुरुवात होण्यास सुमारे ०३ ते ०४ महिन्याचा कालावधी लागणार आहे. मागील किटकनाशक औषध फवारणी कालखंड दि.१६/०१/२०१७ रोजी संपला आहे साईभक्तांना किटकांचा त्रास होऊन नये यासाठी विभागामार्फत तातडीने किटकनाशक फवारणी करुन घेणे आवश्यक आहे. आपणाकडे श्री लहारे यांचे शिफारशीप्रमाणे औषधे तथा यंत्रे व किरकोळ वस्तु उपलब्ध नाहीत त्यांची आपणास खरेदी करावी लागणार आहेत.

छाननी करुन अनुमान – महाराष्ट्र शासनाचे अधिनियम २००४ मधील तरतुद शासनाचे कार्यालयीन खरेदी कार्यपध्दती नियम पुस्तीका मधील प्र.क्र. ४.४.२ नुसार तथा साईभक्तांना किटकांचा होणारा त्रास व मा.उप समितीचे शिफारसीनुसार सदरकामी आवश्यक यंत्रे/किटकनाशके तथा मेहनताना याकामी येणारा खर्च करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता नव्याने पेस्ट कंट्रोल ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यन्त विभागामार्फत या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शनाखाली व शिफारसीनुसार ०२ किटकनाशक औषध फवारणी करणे आवश्यक आहे. सदर फवारणी १) माहे – मार्च २०१७ ते माहे - एप्रिल २०१७ अखेर. २) माहे– मे २०१७ ते माहे– जुन २०१७ अखेर या कालावधीमध्ये कराव्या लागतील याकामी आपणास खालीप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

अ.नं	**किटकनाशक**	**आवश्यक परीमान**	**अंदाजे दर रुपये/पैसे**	**एकूण रुपये/पैसे**
१	टेम्परीड (बायर इंडीया कंपनीचे उत्पादन)	३० लिटर	३,६००/-	१,०८,०००/-
२	क्लोरोपायरीफॉस	२० लिटर	३५०/-	७,०००/-
३	स्वयंचलित बॅटरी पंप	०४ नग	४,०००/-	१६,०००/-
४	सेफ्टी गॉगल्स	१० नग	१००/-	१,०००/-
५	हातमोजे	१० नग	५०/-	५००/-
६	मास्क	१० नग	१०/-	१००/-
७	मेहनताना चार्ज (प्रती फवारणी)	---	---	१५,०००/-
			एकूण रुपये -	१,४७,६००/-

वर नमुद अ.नं. १ चे किटकनाशक बायर इंडीया या कंपनीचे वापरणेबाबत शिफारसीनुसार प्रती फवारणी रु.१,४७,६००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तेचाळीस हजार सहाशे मात्र) इतका खर्च येणार आहे म्हणजे ०२ फवारण्यासाठी १,४७,६०० X २ = २,९५,२००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार दोनशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद विभागवाईज मंजुर अर्थ संकल्पीय रक्कमेतुन करता येईल. तसेच फवारणीचे काम संबंधीत विभागाचे कर्मचाऱ्यामार्फत याकामी नेमलेल्या तज्ञाचे देखरेखीखाली मार्गदर्शन तथा निर्देशानुसार करता येईल. तरी सदर खरेदी महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीतील प्रकरण क्र. ४.४.२. अन्वये येणारा खर्च रुपये ३,००,०००/- चे आत असल्याने दरपत्रके मागवून करता येईल.

१) प्रस्तुतकामी IPCA (Indian Pest Control Association) व तत्सम संस्था अगर संघटनेचे सभासद असलेबाबतची विहीत अट वगळुन नव्याने ई-निविदा प्रक्रीया राबवुन नविन ठेकेदाराची नियुक्ती करणेस.

२) दरम्यानचे काळात साईभक्तांना निवासस्थानांमध्ये किटकांचा त्रास होऊ नये यासाठी खास बाब म्हणुन तातडीने ०२ फवारण्या करणेकामी येणा-या अंदाजे खर्च रु.२,९५,२००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार दोनशे मात्र) चे खर्चास

३) सदरकामी आवश्यक किटकनाशक औषधे व यंत्रे आणि किरकोळ सामान खरेदीकामी दर पत्रके मागविण्यास

४) सदरकामी तज्ञ म्हणुन परीसरातील पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंन्टची कामे करणारे व्यक्तीस/ व्यक्ती समुदयास नेमणेस तथा करण्यात येणा-या सर्व ०२ फवारण्या त्यांचे मार्गदर्शनाखाली व निर्देशानुसार करणेस व त्यांना प्रती फवारणी अंदाजे रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) प्रमाणे ०२ फवारण्यांचा मेहनताना रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार मात्र) इतकी लमसम रक्कम अदा करणेस तथा त्यांचेकडून मेहनताना दरपत्रके मागविणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निवासस्थानांमधील पेस्ट कंट्रोलची कामे संस्थानमार्फत करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

आयत्या वेळेचा

विषय नं.२४ **श्री.ज्ञानदेव यादव खांदे, मु.पो. देवळाली प्रवरा, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांच्या वैद्यकिय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

प्रस्ताव- **संदर्भ:-** शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२, दि.५ मे २००६.

अधिनिय २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

प्रास्तविक:- श्री ज्ञानदेव यादव खांदे, मु.पो.देवळाली प्रवरा ता.राहुरी जि- अहमदनगर, यांनी वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक अनुदान मिळणेबाबत अर्ज केलेला होता. सदरचा अर्ज दि.०८/१२/२०१६ रोजी ईकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. खांदे हे कॅन्सर आजाराने आजारी असुन ते एकवीरा हॉस्पीटल, औरंगाबाद या रुग्णालयात उपचार घेत आहेत. श्री.खांदे यांनी सादर केलेले एकवीरा हॉस्पीटल, औरंगाबाद हे रुग्णालय संस्थानच्या वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेल्या रुग्णालयाच्या यादीत बसत नसल्याने त्यांना अनुदान देय होत नाही. याबाबत श्री खांदे यांना जानं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२१६२/२०१६ दि.२१/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

आता, श्री ज्ञानदेव यादव खांदे, यांनी दि.२८/१२/२०१६ रोजी अनुदान मिळणेबाबत पुन्हा अर्ज सादर केलेला असुन विशेष बाब म्हणुन आपले संस्थेकडुन एकवीरा हॉस्पिटल, औरंगाबाद यांच्या नावे वैद्यकिय खर्चापोटी अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे श्री खांदे यांचे अर्जावर मा. उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी व्यवस्थापन समितीसमोर सादर करावे, असा शेरा दिलेला आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान:- खर्चाचा विषय आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थानमार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकिय आर्थिक अनुदान देण्यात येते. वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली प्रमाणे जे रुग्णालय व आजार पात्र असतील त्यांची स्वतंत्र यादी तयार केलेली आहे. त्या यादीतीलच रुग्णालयांना व आजारांना रुग्णांचे नावे नियमावलीप्रमाणे अनुदान दिले जाते. श्री खांदे यांनी सादर केलेले एकवीरा हॉस्पीटल, औरंगाबाद हे रुग्णालय संस्थानच्या वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेल्या रुग्णालयाच्या यादीत बसत नसल्याने त्यांना अनुदान देय होत नाही.

तरी, सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ज्ञानदेव यादव खांदे, मु.पो. देवळाली प्रवरा, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांना त्यांच्या वैद्यकिय उपचारासाठी सहानुभूतीचे दृष्टीने एक विशेष बाब म्हणून संस्थान नियमानुसार वैदयकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

आयत्या वेळेचा

विषय नं.२५ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्याच्या ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शती क्र. ०३ – "सदर पदांवार नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट-शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी वेळोवेळी जाहिराती प्रसिद्ध करणेत आलेल्या आहेत. मात्र तज्ञ वैद्यकीय अधिकारी मिळत नाहीत. संस्थान रुग्णालयात राजीव गांधी योजनेअंतर्गत काही आजारांवर मोफत उपचार होत असल्याने तसेच अहमदनगर-मनमाड महामार्गावर दुसरे मोठे अद्यावत रुग्णालय नसल्याने संस्थान रुग्णालयात रुग्णांचा कायमच ओघ असतो. मात्र त्याप्रमाणात तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने सध्या कार्यरत वैद्यकीय अधिका-यांवर कामाचा बोजा वाढलेला आहे.

तसेच शासनाचे विधी व न्याय विभागामार्फत दि. २१-२३/०९/२०१६ या कालावधीत संस्थानचे विविध विभागांचे निरीक्षणामध्ये रुग्णालयाच्या आस्थापनेवरील सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशा सुचना केलेल्या आहेत.

दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८१ नुसार "मा. डीन, बी.जे.एम.सी., पुणे यांनी दिलेल्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार तसेच संस्थान आकृतीबंधातील मंजूर आकृतीबंधातील मंजूर वेतनश्रेणी एवढे एकत्रित मानधनावर श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने भरणेत यावी" असे ठरले आहे.

रुग्णालयाकडील रुग्णांवर उपचार करणेकामी कार्डीओलॉजिस्ट, न्युरोसर्जन, ॲनेस्थेसियालॉजिस्ट, वैद्यकीय अधिकारी (दंततज्ञ) व आरएमओ पदांवर वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता आहे. सदर पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	रुग्णालय	पदनाम	मा.डीन, बीजेएसी, पुणे यांनी प्रस्तावित केलेली पात्रता	वेतनश्रेणी व त्यानुसार होणारे सुरुवातीचे वेतन	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
०१.	साईबाबा	मेंदूशल्य विशारद (Neurosurgeon)	1) MBBS 2) MCH/DNB Neurosurgery 3) MS-CIT 4) MMC/MCI Registration with renewal is mandatory	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० रु. ६५,९११/-	२	१ (मानधनावर तात्पुरते स्वरुपात)	१
०२.	साईबाबा	तपासणी सहाय्यक (Clinical Assistant) कार्डीओलॉजी	1) MBBS 2) MD/MS/DNB/ MCH/DM with minimum clinical experience of 2 years Or University Diploma /CPS diploma with minimum clinical experience of 5 years 3) MS-CIT 4)MMC/MCI Registration with renewal is mandatory	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० रु. ६५,९११/-	१	०	१
०३.	साईबाबा	वरीष्ठ भुलतज्ञ Sr. Anesthesiologist	1) MBBS 2) MD/DNB Anesthesia with	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे	६	१ (डॉ. जोशी)	५
	साईनाथ				१	०	१

अ.नं.	रुग्णालय	पदनाम	मा.डीन, बीजेएसी, पुणे यांनी प्रस्तावित केलेली पात्रता	वेतनश्रेणी व त्यानुसार होणारे सुरुवातीचे वेतन	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
			minimum experience of 2 years in anesthesia Or FCPS Anesthesiology with minimum exp 3 yrs in anesthesia Or University Diploma / CPS diploma in anesthesialogy with minimum experience of 5 years in anaesthsia 3)MS-CIT 4) MMC/MCI Registration with renewal is mandatory	६६०० रु. ६५,९११/-			
०४.	साईबाबा	कनिष्ठ भुलतज्ञ Jr. Anesthesiologist	1) MBBS 2) MD/DNB Anesthesia Or FCPS Anesthesiology with minimum exp 1 yrs in Anesthesia. Or University diploma / CPS diploma in Anesthesiology with minimum experience of 2 years in anesthesia. 3) MS-CIT 4) MMC/MCI Registration with renewal is mandatory.	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० रु. ५४,६००/-	९	१ (डॉ. मराठे)	८
	साईनाथ				३	३ (डॉ. शिरसाठ, डॉ. कलाटे, डॉ. तांबे)	०
०५.	साईबाबा	वैद्यकीय अधिकारी (दंततज्ञ) (Dentist)	1) BDS Or Diploma in Dental Mechanics recognized by Dental Council of India. 2) MS-CIT 3) MDC/DCI Registration with renewal is mandatory 4) Minimum of 5 years Experience as a Dentist	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० रु. ५४,६००/-	२	१ (डॉ. उंडे)	१
	साईनाथ				२	१ (डॉ. विखे)	१
०६.	साईनाथ	निवासी वैद्यकीय अधिकारी RMO	1) MBBS 2) MMC/MCI Registration with renewal mandatory 3) MS-CIT	रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० रु. ५४,६००/-	१६	११ गायकवाड, सोनटक्के, गवांदे,धोका, एनगे, गाडेकर, कडू, तांबे, धुळगंड, (बीडगर, माने – ११ महिने)	५

आता, संस्थान रुग्णालयात कार्डीओलॉजिस्ट, न्युरोसर्जन व वैद्यकीय अधिकारी (दंततज्ञ) या पदावर नेमणूक मिळणेकामी सध्या अर्ज आलेले आहेत त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	अर्जदाराचे नाव	शैक्षणिक पात्रता
०१.	डॉ. संजालिया मिलनकुमार किशोरभाई मो.नं. ९९०९९९१३७८	एम.सी.एच (न्यूरो) – २०१६ (बी.जे.मेडीकल कॉलेज, अहमदाबाद)
०२.	डॉ. तनय अजित पाडगवकर साईप्रसाद, १२५/ए, सायन (प.), मुंबई मो.नं. ९८१९८४५०८९	डीएम- २०१६ (एमजीएम, नवी मुंबई)
०३.	डॉ. अमोल डॅनियल भालेराव बाभळेश्वर रोड, पार्वती नगर, मु.पो. लोणी (खु.) ता. राहाता, जि. अहमदनगर मो.नं. ९६२३५८६०६६	एमबीबीएस – २००७ एमडी – २०१६
०४.	डॉ. सतिष हरीकिसन पवार मु.पो. दहिगाव-ने, ता. शेवगाव, मो नं. ९१४६३२६२९६	एमबीबीएस – २००९ डीएनबी – २०१६
०५.	डॉ. विजयकुमार दादाराव कर्डीले शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर	एमबीबीएस – २००९ डीए – २०१४
०६.	डॉ. पौर्णिमा उर्फ अलियास उज्वला रामराव शेळके मु. पो. शिर्डी, ता. राहाता मो. नं. ८८०५१२२२३१	एमडीएम – २०१६ (श्री रामचंद्र युनिवर्सिटी, चेन्नई, तामिळनाडू)
०७.	डॉ. जाधव यशल विलास शिवबा, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर, मो.नं. ७७४६८४२२५५	बीडीएस – २०१६ (रुरल डेंटल कॉलेज, लोणी)
०८.	डॉ. प्रियंका प्रकाश दहिफळे, C/0. डॉ. जाधवर, फिजीशियन श्री साईबाबा हॉस्पिटल	एमबीबीएस – डीजीओ – एप्रिल २०१६

उपरोक्त अर्जदार यांना त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त असलेल्या पदांवर मंजूर वेतनश्रेणीएवढे एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी सदर पदांवर स्थायी स्वरुपात उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देता येईल. श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेकामी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.१६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी अथवा मंजुर आकृतीबंधातील पदे कायस्वरुपी भरेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतचे कालावधीसाठी नेमणूका करणेत याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेगवेगळया विषयानुरुप/ प्रसंगानुरुपसंस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने सदस्यांच्या सुचनांवरुनखालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

निर्णय क्र.१६१ सभेच्या सुरुवातीस संस्थानचे प्रशासकीय कामकाजाबद्दल चर्चा झाली. यामध्ये समितीने घेतलेल्या निर्णयांवर पुर्णपणे कार्यवाही झालेली नाही याबाबत अध्यक्ष महोदयांबरोबरच उपस्थित समिती सदस्यांनीही संस्थानच्या प्रशासकीय कामकाजाबद्दल नाराजी दर्शविली व संस्थानमध्ये जास्त विभाग व अधिकारी असल्यामुळे कामात सुसुत्रता राहीलेली नाही, असा निष्कर्ष काढला. संस्थान कामकाजामध्ये सुसुत्रता रहावी याकरीता समान काम असणारे विभाग एकत्र करावेत व या विभागांची संख्या २० पेक्षा जास्त नसावी. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांचीही काही पदे कमी करणेत येऊन, कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी विभागनिहाय आढावा घ्यावा, अशी चर्चा झाली व याबाबतचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

निर्णय क्र.१६२ संस्थान रुग्णालयांमध्ये विनामोबदला व्हिजीटींग पध्दतीने सेवा देणेसाठी अनेक नामांकित डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करीत असतात. सदरहू अर्ज एकत्रित करणेत येऊन, त्याची यादी उपसमिती सभेपुढे सादर करणेत यावी.

तसेच रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली औषधे/ यंत्रसामुग्री देणगी देणाऱ्या देणगीदारांची समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचेबरोबर बैठक आयोजित करणेत यावी.

संस्थान रुग्णालयांमध्ये रुग्ण आणणेसाठी नवीन रुग्णवाहिकांचा व रुग्ण सोडविणेसाठी जुन्या रुग्णवाहिकांचा वापर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

निर्णय क्र.१६३ संरक्षण विभाग, मंदिर विभाग व जनसंपर्क कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांबद्दल येणाऱ्या तक्रारींचा विचार करता, या विभागातील कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या त्वरीत इतरत्र बदल्या करणेत याव्यात. बदल्या रद्द करणेसाठी कोणाचा दबाव येत असेल तर समितीच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच जनसंपर्क कार्यालयामध्ये एक महिला कर्मचाऱ्याची नियुक्ती करणेत यावी.

याचप्रमाणे रुग्णालयांकडील कायम व कंत्राटी कर्मचारी अधिकाऱ्यांशी/ नागरीकांशी/ रुग्णांशी उध्दटपणे वागतात, अशा तक्रारी येत आहेत. याकरीता स्थानिक समिती सदस्य मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.सचिन तांबे यांनी वेळोवेळी रुग्णालयामध्ये राऊंड घ्यावा. जेणेकरुन तेथील कर्मचाऱ्यांवर वचक राहील. कर्मचारी गैरवर्तन करीत असेल तर त्याच ठिकाणी त्याला शिक्षा करणेत यावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी/ वैद्यकिय संचालक)

निर्णय क्र.१६४ शेगावचे धर्तीवर शिर्डी येथे सेवेकऱ्यांना सेवा करण्याची संधी द्यावयाची आहे. या सेवेकऱ्यांना साईसेवक असे नाव देण्यात यावे व पालखी सोबत येणाऱ्या पदयात्रींना यासाठी प्राधान्याने संधी देण्यात यावी. पालख्यांमधील पदयात्रींची संख्या १०० ते २००० पर्यंत असते. बरेचसे पदयात्रींना कष्टकरी कुंटुंबातील असतात व ते भावनिकही असतात. २० पदयात्री त्यावर १ प्रमुख याप्रकारे २१ पदयात्रींचे ग्रुप बनविणेत येऊन, एका ग्रुपला किमान १५ दिवस विनाशुल्क सेवा करण्याची संधी द्यावी. त्यांची निवास, भोजन व्यवस्था संस्थामार्फत मोफत् करणेत यावी. यासाठी श्री रामनवमी उत्सव झाल्यानंतर संस्थानकडे रजिष्टर्ड असलेल्या पालखी मंडळांच्या प्रमुखांसोबत बैठकीचे आयोजन करणेत येऊन, त्यांना याबाबतची माहिती देण्यात यावी. या साईसेवक योजनेची सुरुवात अहमदनगर जिल्हयापासून करणेत यावी.

तसेच पालखी घेऊन येणाऱ्या पदयात्रींच्या दर्शनासाठी स्वतंत्र गेटची व्यवस्था करणेऐवजी त्यांना Time Slot मधून सर्वांसाठी एक वेळ देण्यात यावी. यासाठी पालखी/ पदयात्रींसाठी स्वतंत्र काऊंटर राखीव ठेवणेत यावे.

(कार्यवाही- कामगार अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

निर्णय क्र.१६५ ऑक्टोबर, २०१७ पासून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष सुरु होत असून संस्थानने शताब्दीसाठी करावयाचे विकास कामाचा जवळपास रु.३२०० करोडचा आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखडयातील कामे विहीत वेळेत पुर्ण होणे अत्यावश्यक असून सध्या संस्थानमध्ये असलेल्या अधिकाऱ्यांकडे इतर विभागांची जबाबदारी असल्याने या कामासाठी पुर्णवेळ स्वतंत्र अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. याकरीता श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षातील कामाचे नियोजन व सनियंत्रणासाठी वित्त व लेखा विभागाकडील स्वतंत्र वर्ग-१ अधिकाऱ्यांची संस्थानकडे प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेसाठी महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करणेत यावा.

तसेच संस्थानकडे असलेले सोने सुवर्ण रोखे व चलनीकरण या योजनेमध्ये गुंतविणेकामी विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेस प्रस्ताव सादर करणेत यावा.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

निर्णय क्र.१६६ साईनगरच्या पाठीमागे संस्थान मालकीची ९ एकर जागा आहे, या जागेमध्ये सभागृह तयार करणेचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाची सुरुवात साई मॅरेथॉन स्पर्धेने करणेत यावी, यासाठीचा प्रस्तावही सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

निर्णय क्र.१६७ संस्थानने उभारलेल्या पवनचक्क्यांमधून निर्मिती होणारी वीज, विज वितरण कंपनीला देण्यात येऊन, त्याबदल्यात विज वितरण कंपनीकडून संस्थानसाठी आवश्यक असलेली विज घेणेबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

निर्णय क्र.१६८ संस्थान शैक्षणिक संकुलाकडील श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी एकच मुख्याध्यापक असून दोन्ही शाळा वेगवेगळया ठिकाणी बऱ्याच अंतरावर असल्यामुळे तसेच तेथील विद्यार्थी व शिक्षक यांचेवर नियंत्रण रहाणेसाठी दोन्ही शाळा वेगळया करणेत याव्यात.

(कार्यवाही- सहा.शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

निर्णय क्र.१६९ शिर्डी बसस्थानकाचे काम संस्थान निधीतून पुर्ण करण्यात आलेले आहे, याकरीता बसस्थानकावर इतर कंपन्यांच्या जाहिरातींचे फलक लावण्यास मनाई करणेत यावी व सध्या लावणेत आलेले फलक त्वरीत काढून घेण्यात यावे. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख)

निर्णय क्र.१७० संस्थानच्या विविध विभागांमध्ये SOP कार्यप्रणाली विकसीत झालेली नाही, तरी मार्च, २०१७ अखेरपर्यंत SOP चे काम पुर्ण करुन घेण्यात यावे. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.०१ ते १७० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-	स्वाक्षरित/-
(बाजीराव शिंदे)	(सुरेश हावरे)
कार्यकारी अधिकारी	अध्यक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी